ख्रिस्ती मराठी वाङ्मय

डॉ. गंगाधर नारायण मोरजे

ख्रिस्ती मराठी वाङ्मय

(फादर स्टीफन्स ते इ. स. १९६० अखेर)

डॉ. गंगाधर नारायण मोरजे

एम्. ए., पीएच्. डी.

मराठी विभाग प्रमुख, अहमदनगर कॉलेज,

अहमदनगर

प्रकाशक

अहमदनगर कॉलेज, अहमदनगर

स्नेहसदन, पुणे ४११ ०३०

प्रकाशक :
डॉ. पी. एस. जेकब,
प्राचार्य, अहमदनगर कॉलेज,
अहमदनगर, ४१४००१.

डॉ. म. रा. लेदर्ले, एस्. जे.
स्नेहसदन,
२५० शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

प्रथमावृत्ती १७ जून १९८४.

मुद्रक :
य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

वितरक
अ. ज. प्रभू.
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३३४ शुक्रवार पेठ, पुणे २

किंमत [illegible]० रुपये

प्रकाशन अनुदान : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
रुपये १०,००० मिळाले आहे.

डॉ. टी. बार्नाबस

व

डॉ. सौ. मनोरमा बार्नाबस यांस
त्यांच्या स्नेहशील व सक्रीय प्रोत्साहनाबद्दल
सादर अर्पण....

— डॉ. गंगाधर मोरजे

प्रकाशकांचे मनोगत

डॉ. लेदर्ले म्हणतात–

डॉ. गंगाधर मोरजे यांनी ' ख्रिस्ती मराठी वाङ्मय ' हा ग्रंथ तयार केला, त्याबद्दल त्या ग्रंथाचे वाचक डॉ. मोरजे यांचे कृतज्ञतापूर्वक ऋणी आहेत. डॉ. मोरजे यांच्या व्यासंगात अन्वेषण वृत्ती व सृजनशीलता यांचा सुरेख मिलाफ आहे. प्रस्तुतचा ग्रंथ हा एक त्यांच्या कार्याचा आणखी एक पुरावा होय. त्यांची शोधकवृत्ती पूर्वग्रहरहित असल्यामुळे मुक्तपणे अंकुरते. त्यामुळे सामाजिक वा धार्मिक मर्यादांच्या तथाकथित बंधनात ते न अडकता, योग्य व महत्त्वपूर्ण दिशेने सत्याचा शोध ते घेऊ शकतात. व्यक्तिशः माझ्या बाबतीत बोलायचे झाले तर, ते माझे निकटवर्ती मित्र आहेत, याचा मला सार्थ अभिमान वाटतो. तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. पद्मा मोरजे, या विनम्र व अतिशय परिश्रमी आहेत. या ग्रंथसिद्धीसाठी डॉ. मोरजे यांच्या बरोबर त्यांनी फार मेहनत घेतली आहे. या निमित्ताने त्यांचे आभार मानण्याची संधी मी घेत आहे.

ख्रिस्ती मराठी लेखकांनी आपल्या धर्मासंबंधी वाङ्मयनिर्मिती करीत असतानाच, जीवनातील इतर विविध क्षेत्रांना स्पर्श केलेला आहे. भारतात नव्याने होऊ घातलेल्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचे स्वरूप व महत्त्व समजून घेण्यासाठी या वाङ्मयाला मोठे स्थान आहे. विशेषतः ' ख्रिस्ती मराठी वाङ्मय ' हा ग्रंथ महाराष्ट्रातील विविध परिवर्तनांची प्रक्रिया आकलन होण्यास महत्त्वाचे ठरणारे साधन आहे. खास करून पेशवाईच्या अखेरीपासून तो आजच्या आमच्या अवस्थेचा विकासक्रम स्पष्ट करणारा आजच्या युगातील तो पुरावा आहे.

आज जगात नव्याने उदयाला येणारी संस्कृती युरोप आणि अमेरिकन यांच्याकडून खूप काही स्वीकारताना दिसते. युरोप आणि अमेरिकन संस्कृतीने ग्रीक, रोमन आणि जर्मन वंशीय संस्कृतीतून आपल्या मूळ परंपरा घेतलेल्या आहेत, तसेच ज्यू व ख्रिश्चन परंपरांचाही ओघ स्वीकारलेला आहे. अशा स्वरूपात तयार झालेल्या त्यांच्या संस्कृतीचा मोठा परिणाम भारतावर आणि विशेष करून महाराष्ट्राच्या संस्कृतीवर झालेला आहे.

दीडशे वर्षांपूर्वीचा लिखित मराठी शब्द, शतकाशतकांची पूर्वपरंपरेने आलेली अर्थच्छटा घेऊन व्यक्त होत होता. त्याला जरी गौरवपूर्ण, आध्यात्मिक व धार्मिक परंपरा होती, तरी ती भाषा एका आवर्तात फिरत होती. मुद्रणकला आली आणि मुद्रित शब्द विविध जीवनक्षेत्रांत व ज्ञानक्षेत्रांत विकास घडवू लागला हे आपण पाहत आहोत. अजूनही ही प्रक्रिया चालूच आहे. यातूनच सामाजिक आणि राजकीय

चळवळींना प्रारंभ झाला. ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा विकास दाखविणारा हा ग्रंथ या संदर्भात महत्त्वाचा ठरला तर ते आश्चर्य नव्हे.

भाषा हा एक गतिमान प्रवाह असतो. त्या प्रवाहाला अखेर झरे, ओढे, नाले मिळतात, तेव्हा तो अधिक प्रभावी बनतो. अशा वेळी प्रत्येक झरा, ओढा किंवा नाला आपापले वैशिष्टय घेऊन येतो, आणि मुख्य प्रवाहाला अधिक सामर्थ्य प्राप्त करून देत असतो. ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचे स्वतःचे असे एक वेगळेपण आहे, ते दर्शित करून, त्याचे विवरण करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारे एखाद्या अंगाचा तपशिलाने विकास स्पष्ट केला, म्हणजे इतर अंगांकडे दुर्लक्ष करायला हवे, असे कुणी म्हणणार नाही. उलट समग्र मराठी वाङ्मयाच्या घडणीचे-वाटा वळणांचे-स्वरूप तपासण्याच्या दृष्टीने, असा शोध घेणे उपकारक ठरते. या विचारसरणी-नुसार, स्वतंत्रपणे भरविले जाणारे ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन ही एकूण मराठी वाङ्मयापासून वेगळी चूल मांडण्याच्या इराद्याने भरविले जात नाही, तर मराठी वाङ्मयाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यास पात्रता प्राप्त व्हावी, स्वतःचे संगोपन व संवर्धन व्हावे यासाठी तो एक प्रयत्न आहे.

मराठीतील ख्रिश्चन मराठी वाङ्मयाचा विचार करीत असताना, फादर स्टीफन्सचे ख्रिस्तपुराण, दीड शतकाहून अधिक काळ चालू असलेले 'ज्ञानोदय' नियतकालिक, रे. ना. वा. टिळक यांची कविता, लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' ह्या कलाकृती अभिजात साहित्यात समाविष्ट होणाऱ्या कृती आहेत. मराठी वाङ्मयाला अमेरिकन आणि युरोपिअन ख्रिस्ती लेखकांनी त्याचप्रमाणे ख्रिस्ती मराठी लेखकांनी वैभवाप्रत नेण्यास हातभार लावलेला आहे. प्रारंभीच्या ख्रिस्ती मराठी लेखकांचे वाङ्मय भाषेच्या अंगाने (कोश, व्याकरण, इत्यादी) आणि सखोल आशय अभिव्यक्त करण्यासाठी निर्माण झालेले दिसते. त्याचे कारण ही परकीय मंडळी भारतात स्थायिक होण्याच्या किंवा भारतात दीर्घकाळ राहण्याच्या इराद्याने आलेली होती. त्यांना सर्वसामान्य लोकांच्या भाषेत रस होता. विशेषतः प्रादेशिक भक्ति-परंपरेच्या संदर्भात हे कुणाच्याही लक्षात येईल. त्यांना मनापासून इथली भक्ति-परंपरा समजून घ्यायची होती, त्याबाबत त्यांचा दृष्टिकोण सहानु-भूतीचा होता.

जेव्हा महाराष्ट्रातील ख्रिस्ती मराठी वाङ्मयाच्या संदर्भात आपण बोलतो, तेव्हा गोवा-मंगलोरकडून आलेल्या ख्रिस्ती लोकांच्या मोठ्या लोकसमूहाचा विचार करायला पाहिजे. या समूहाची मातृभाषा कोकणी आहे, मराठी नाही. त्याशिवाय मल्याळी, तामिळी, हिंदी आदी मातृभाषा असणारे ख्रिस्ती लोकसमूह आहेत. अगदी काही मूठभर लोकांची मातृभाषा इंग्लिश असलेली दिसते. त्यांची ग्रांथिक भाषा मराठी नाही. वसईच्या ख्रिस्ती लोकांची मातृभाषा मराठी आहे. त्यांचे कौटुंबिक संस्कार पूर्णपणे महाराष्ट्रीय आहेत. असे असूनही ही मंडळी, मराठी

वाङ्मयीन चळवळीपासून बराच काळ दूर राहिलेली दिसते. अलीकडे ही मंडळी वाङ्मय निर्मिती करू लागलेली दिसते.

गेल्या दीडशे वर्षांत मराठी भाषिकांनी ख्रिस्तीधर्म स्वीकारला, तरी आपल्या मराठी भाषेशी ते एकनिष्ठ राहिले. त्या भाषेतून करता येण्याजोग्या आविष्कारासंबंधी किंवा त्या भाषेच्या थोरवीसंबंधी त्यांच्या मनात कधी शंका आली नाही. संपूर्ण चित्र न्याहाळले तर असे दिसते की, त्यांना आर्थिक बाबतीत झगडावे लागले आणि त्याचबरोबर दारिद्र्य, व अन्य धार्मिक, सामाजिक लोकसमूहांनी दिलेली वेगळी वागणूक यांना तोंड द्यावे लागले. या ख्रिस्ती लोकसमूहातील बरीचशी मंडळी मागास वर्गातून आलेली होती. नव्याने शिक्षण मिळाल्यामुळे, इतर मागासवर्गाप्रमाणे, नव्याने जागृत झालेला आत्माभिमान आणि स्वतःची प्रतिष्ठा त्यांना शब्दांतून व्यक्त करायची होती. त्यांचे काही वाङ्मय ‘गुलमोहराचा बहर’ अभिव्यक्त करून जाते. गंमत अशी की गुलमोहराच्या झाडाला पाणी खूप कमी लागते, त्या मानाने त्याला बहर मात्र जोरदार येतो. या वर्गाला अतिशय हाल-अपेष्टा आणि हलाखीतून जावे लागले. असे असूनही त्यांच्या वाङ्मयात सौंदर्यदृष्टी आणि दूरदृष्टी प्रत्ययाला येते.

प्रस्तुतचा ग्रंथ वाचल्यावर वाचकाला ख्रिस्ती मराठी वाङ्मयातील त्रुटी आणि ख्रिस्ती मराठी लेखकांनी गमावलेल्या संधीची कल्पना येईल.

अलीकडे निरनिराळ्या ख्रिश्चन समूहात, परस्पर सहकार्य आणि ऐक्याच्या दृष्टीने, नव्याने एक चळवळ उदयाला येत असल्याचे दिसते. इथे एका गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. भूतकाळात निर्माण झालेल्या ख्रिस्ती मराठी वाङ्मयात प्रॉटेस्टंट ख्रिस्ती लोकांचा वाटा मोठा आहे. त्यामानाने कॅथलिक ख्रिश्चनांची वाङ्मय निर्मिती कमी आहे. या घटिताला तसे काही उत्तर नाही. फादर स्टीफन्सच्या ख्रिस्तपुराणानंतर कॅथलिक लेखकांना विश्रांती घ्यावीशी वाटली असाही त्याचा अर्थ नव्हे. खरी वस्तुस्थिती पाहू गेल्यास, बऱ्याचशा कॅथलिक ख्रिश्चनांची मातृभाषा मराठी नाही, असे त्याचे उत्तर आहे. या संदर्भात प्रॉटेस्टंट ख्रिस्ती समाजाची मातृभाषा मराठी होती हे लक्षात घ्यावे लागते.

प्रारंभीच्या काळात परकीय ख्रिस्ती मराठी लेखकांनी प्राधान्याने वाङ्मयनिर्मितीस हातभार लावला. त्याच्यानंतर अर्ध्या शतकानंतर महाराष्ट्रात आलेल्या कॅथलिक ख्रिस्ती मिशनऱ्यांना एतद्देशीय कॅथलिक ख्रिस्ती लोकांना तातडीने शिक्षण देण्याची गरज जाणवली. तेव्हा ते मिशनरी मराठी भाषिकांकडे वळले पण दोन जागतिक युद्धांनी त्यांच्या कार्यांत खीळ घातली. ब्रिटिश सरकारने त्यांना बाजूला सारले. इथे ही गोष्टही लक्षात घ्यायला हवी. गेल्या शंभर दीडशे वर्षांत भारताच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनावर युरोपातील प्रॉटेस्टंट लोकांचा पगडा कॅथलिक लोकांपेक्षा अधिक होता. अलीकडे काही कॅथलिक ख्रिस्ती मराठीत वाङ्मय-

निर्मिती करायला लागल्याचे दिसते.

आमच्या काळाचा विचार केला तर मराठी वाङ्मयाच्या समृद्धीत ब्राह्मण वर्गाचे ऋण मोठे आहे. या काळात ब्राह्मणेतर वर्गातील लेखक वा कवी मराठी वाङ्मयात अल्प प्रमाणात प्रतिनिधित्व करताना दिसतात. समग्र मराठी वाङ्मयाच्या संदर्भांत विचार केला तर खिस्ती मराठी लेखकांचा गट अगदीच लहान दिसेल. असे असूनही मराठी वाङ्मय प्रवाहात त्या गटाचा वैशिष्टयपूर्ण सहभाग आहे. खिस्ती मराठी वाङ्मयाच्या मराठी भाषेच्या विकासाच्या व संपन्नतेच्या दृष्टीने जी वाटचाल झाली, त्या संदर्भांत विचार व्हायला हवा. खिस्ती मराठी लेखकांकडे असलेल्या साधनांची मर्यादा आणि त्या साधनांद्वारे त्यांचा प्रकट झालेला आविष्कार मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने नोंद घेण्यासारखे आहेत. कोणत्याही सामाजिक, धार्मिक लोकसमूहात निर्माण झालेले मराठी वाङ्मय आपण आपले मराठी वाङ्मय म्हणून स्वीकारायला हवे.

प्रस्तुतच्या ग्रंथातून आपणास असे जाणवते की, खिस्ती मराठी वाङ्मयांत खूप नवीन नवीन अर्थसंकेत जाणवतात. पूर्वपरंपरेने मराठी भाषेत रुळलेले शब्द नवीन आशय वा अर्थच्छटा घेऊन अवतरतात. आपल्या धर्मासंबंधी बोलताना खिश्चन लोक मराठी भाषेत व्यवहार करतात. संपूर्ण मराठी बायबलमध्ये एकही इंग्रजी शब्द नाही. त्याशिवाय भक्ती, उपासना व धार्मिक संस्कारांच्या संदर्भात ते मराठी शब्द वापरतात. पण खिस्तीतर मंडळी खिस्तीधर्मासंबंधी बोलतात, तेव्हा इंग्रजी शब्दांचा उपयोग करतात. खिस्ती लोक मराठी बोलताना आपले स्वतःचे शब्द किंवा मराठी आपले म्हणून स्वीकारलेले शब्द वापरतात. खिश्चन लोक येशू म्हणतात, जीझस नाही. बाप्तिस्म न म्हणता 'स्नानसंस्कार' म्हणतील. संत म्हणतील सेंट नाही. खिस्तजयंती किंवा नाताळ म्हणतील खिसमस नाही. भविष्यकालीन मराठी भाषेच्या शब्दकोशकारांनी, अशा प्रकारे खिस्ती मराठी लेखकांनी वापरलेले शब्द आपल्या कोशात वैपुल्याने समाविष्ट करायला हवेत याचे स्मरण लेखकाने दिलेले आहे. त्याचबरोबर जे खिश्चन सहजपणे इंग्लिश शब्दांचा सर्रास उपयोग करतात, त्यांना त्या इंग्रजी शब्दांना मराठीत पर्यायी शब्द आहेत याचेही स्मरण करून दिले आहे.

मराठी बोलणाऱ्या खिस्ती लोकांनी मराठी भाषा समर्थ करण्यास झटले पाहिजे अशी खास बाब आहे. सर्व धर्मीयांच्या प्रार्थनेत हिंदू बहुधा संस्कृत भाषेतील संहितेचा उपयोग करतात. मुसलमान अरेबिक भाषा वापरतात. पारशी पर्शियन भाषा स्वीकारतात, तर बौद्ध पाली भाषा स्वीकारतात. हे सर्वजण आपापली पवित्र भाषा वापरतात. बायबल हिब्रू भाषेत आणि ग्रीक भाषेत लिहिले गेले. कॅथलिक खिश्चनांची प्रार्थनेची भाषा बराच काळ लॅटीन होती. भारतीय खिश्चन ज्या संत थोमासपासून आपली मूळ परंपरा सांगतात, त्यांचा खास करून सीरीयन भाषेशी संबंध होता. हे असे एकूण चित्र असूनही खिस्ती मंडळी

सर्व धर्मीय प्रार्थनासमारंभात प्रार्थनेसाठी ह्या भाषा वापरत नाहीत, तर त्यांची जी मातृभाषा असते, तिचा ते वापर करतात. दैनंदिन प्रार्थना ते ज्या भाषेत करतात, ती त्यांच्या दृष्टीने अतिशय पवित्र भाषा ठरते, या जाणिवेतून मराठी भाषा संपन्न करण्याची त्यांना प्रेरणा लाभायला हवी.

ज्ञानेश्वर आपल्या 'ज्ञानेश्वरी' या अमर ग्रंथांत म्हणतात, 'लावण्यरत्न भाण्डार शारदेचे.' (ज्ञानेश्वरी १:३१) समग्र मराठी वाङ्मय अशा रत्न भांडाराचा ठेवा करावे. प्रस्तुत लेखकाचा हा " ख्रिस्ती मराठी वाङ्मय " निर्मितीसाठी केलेला नम्र आणि प्रामाणिक प्रयत्न, त्या भांडारांत भर घालणारा ठरो ही सदिच्छा.

डॉ. जेकब म्हणतात–

समाजातील विविध घटकांच्या सांस्कृतिक व वाङ्मयीन चळवळींचा वेध घेऊन अभ्यासणे, हे अहमदनगर कॉलेजच्या स्वीकृत कार्यापैकी एक कार्य होय. डॉ. गंगाधर मोरजे, यांचा 'ख्रिस्ती मराठी वाङ्मय' हा ग्रंथ म्हणजे या स्वीकृत कार्याचा एक विधायक आविष्कार आहे. प्रथमच 'ख्रिस्ती मराठी वाङ्मय' या स्वरूपात संकलित करून त्यांनी आम्हाला प्रभावित केले आहे. मानवजातीचा विकासक्रम समजून घेण्यासाठी वाङ्मयाद्वारे पडलेली भर, सामाजिक व धार्मिक लोकसमूहाचे परस्परांशी झालेले अभिसरण, आदी बाबींची नोंद घेणे आवश्यक ठरते. विशिष्ट धार्मिक पंथांच्या कार्याचे स्पष्टीकरण देणे गौण ठरते. सांस्कृतिक कार्य ही समाजातील एका विशिष्ट घटकाची मालमत्ता नसते, तर ती समाजातील सर्व घटकांनी स्वीकारलेल्या सहभागाचे फलित असते. कधी कधी समाजातील काही घटकांचे कार्य अनेक कारणांनी लोकांना फारसे माहीत होत नाही.

डॉ. गंगाधर मोरजे यांच्या या प्रकल्पाला, विद्यापीठ अनुदान मंडळ, दिल्ली यांनी अनुदान दिले आहे. तर ग्रंथाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने काही प्रमाणात अनुदान दिलेले आहे. पुण्याच्या स्नेहसदन संस्थेचे डॉ. मॅथ्यू लेदर्ले आमच्या प्रकाशन कार्यात सहभागी झाले. त्यामुळे आजच्या स्वरूपात हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. स्नेहसदन संस्था व नगर कॉलेज यांचे अशा स्वरूपाचे कार्य विशेषतः महाराष्ट्रात आणि इतरत्र वाङ्मय क्षेत्रात विविध भाषिकांनी केलेली कामगिरी समजून घेण्यास उपयुक्त ठरेल. भारतीय ऐक्यात विविधता कशी सामावली आहे त्याचे सुरेख दर्शन घडवील.

• • •

प्रस्तावना

कोणत्याही संस्कृतीचे भाषा हे एक महत्त्वाचे अंग असते, कारण संस्कृतीची अभिव्यक्ती करणारे ते एक महत्त्वाचे साधन होय. महाराष्ट्राच्या किंवा मराठी संस्कृतीचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा तिची अनेक अंगे आपणाला लक्षात घ्यावी लागतात. संस्कृती ही एक गतिमान प्रवाहधारा असते. ती सतत वाहत असते. वाहत असताना आपली मूळ परंपरा राखून कालोचित बदल स्वीकारूनही आपलेपण धरून असते.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय आदी धार्मिक संप्रदायांनी आपापल्या परीने भर घातली आहे. तसेच गोंधळ, भारूड, कीर्तन, तमाशा आदी लोककलांनी ती समृद्ध करण्यास हातभार लावलेला आहे. मुसलमानी धर्माचा व अरबी, पर्शियन भाषांचा थोडाबहुत भाग आज महाराष्ट्राची संस्कृती असे जिला म्हटले जाते, त्या संस्कृतीत सामावून गेलेला आहे हे आपल्या सहज लक्षात येईल. या भिन्नभिन्न प्रवाहांमुळे मराठी संस्कृतीचा प्रवाह अधिक व्यापक, जोरदार व संमिश्र झालेला आहे.

आजवर महानुभाव, जैन, वारकरी, नागेश, आदी पंथातील व्यक्तींनी लिहिलेला मराठी वाङ्मयाचा इतिहास वा इतिहासवजा आढावा घेणारी पुस्तके व लेख या ना त्या कारणांनी प्रसिद्ध झालेली दिसतात. तसेच अशा प्रकारच्या पंथीय वाङ्मयाने एकूण मराठी साहित्यात घातलेल्या भरीव कामगिरीचा अनेक अंगांनी आढावा घेण्याचे प्रयत्नही चालू आहेत.

वास्तवात खिस्ती धर्माच्या आगमनाने व धर्माच्या प्रसारामुळे व त्यानंतर युरोपातून आलेल्या राजकीय सत्तांमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात फार मोठी खळबळ निर्माण झाली. यापूर्वीची मुसलमानी सत्ता धर्मकारण आणि राजकारण यापुरती काही प्रमाणात मर्यादित होती. पण युरोपातून आलेली ही सत्ता राजकारण व धर्म यापुरतीच मर्यादित राहिली नाही. ती सामाजिक स्वातंत्र्य, वैज्ञानिक विचार, तंत्र, साहित्य व कला याविषयी नवे विचार घेऊन आली. खरे म्हणजे पूर्वपरंपरेने जीवन जगणाऱ्या मराठी सांस्कृतिक जीवनाशी ही संस्कृती व जीवनपद्धती सहजी एकजीव होणे अवघड होते. दोनही अंगांनी क्रिया–प्रतिक्रिया, आघात–प्रत्याघात होणे अपरिहार्य होते. त्या संघर्षातून, वेळप्रसंगी तडजोडीतून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एक "नवा प्रवाह" सामावला जात होता. याचाच एक भाग म्हणून आता खिस्ती मराठी वाङ्मय हा मराठी वाङ्मय धारेतील एक प्रवाह झाला आहे. तिला वेगळे अस्तित्व नाही. असे घडत असताना खिस्ती मराठी वाङ्मयाने

कोणत्या वाट वळणे स्वीकारली त्याचा शोध घेण्याचा हा नम्र प्रयत्न आहे.

महाराष्ट्रात आलेल्या खिस्ती मिशनऱ्यांना "शुभवर्तमान" सांगण्यासाठी सर्वसामान्यांच्या भाषेतून सामान्य लोकांशी संवाद साधायचा होता. तसेच खिस्ती धर्मी युरोपिअन सत्ताधारी वा युरोपिअन नोकरदारांना राज्यकारभाराच्या दैनंदिन कामकाजासाठी सामान्य जनतेची भाषा अवगत असणे आवश्यक होते. म्हणजे प्रारंभीच्या काळातील ख्रिस्ती मराठी वाङ्मय लेखन करणारे लेखक एक तर धर्मप्रसारासाठी मराठी लिहू लागले किंवा शासकीय व्यवहार साधण्यासाठी मराठी शिकू वा लिहू लागले, हे उघड आहे.

धर्मप्रसार हा मनीचा हेतू त्यांनी कुठेही लपवून ठेवलेला नाही. मोल्सवर्थच कोशही याला अपवाद नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

मराठी भाषा समृद्ध करणे (मराठीतून काव्यात्म अभिव्यक्ती करणे) हा त्यांचा प्रारंभी तरी हेतू नाही. आपले विचार लोकांपर्यंत पोचविण्यासाठी साधन म्हणूनच ते भाषेकडे बघतात. फादर स्टीफन्स "खिस्तपुराण" लिहितो तेव्हा "आमच्या पूर्वीच्या धर्मात जशी पुराणे होती तशी आम्हाला (नवखिश्चनांना) पुराणे पुरवा" अशी त्यांच्याकडे मागणी आली होती, हे समजून घ्यावे लागते. युरोपियन लोकांना, व मिशनऱ्यांना आपले विशिष्ट हेतू साधण्यासाठी जेव्हा मराठी भाषा शिकावी लागली त्याचवेळी मराठी "एक भाषाभ्यास (Marathi as a language)" ही अभ्यासाची दिशा मराठी भाषेच्या अभ्यासात नव्याने उजळताना दिसते. मिशनऱ्यांची प्रारंभीची व्याकरणे, कोश आदी भाषिक वाङ्मय अशा प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. खिस्ती मिशनऱ्यांना धर्मप्रसारासाठी महाराष्ट्रातील वरच्या वर्गातून फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. यासंबंधी त्यांनी लिहिलेल्या अहवालात अनेक उल्लेख सापडतात. मग धर्मप्रसारासाठी समाजातील खालच्या समजल्या गेलेल्या लोकांना भिडणे त्यांना आवश्यक होते. ते लोक बोलत असलेल्या बोलभाषेचा आपल्या कामासाठी अभ्यास करून ती भाषा आत्मसात करणे त्यांना अपरिहार्य होते. (काही मिशनऱ्यांना त्यांच्या युरोपातील अधिकाऱ्यांकडून प्रादेशिक भाषांचा अभ्यास करण्याची सक्ती केली जात असे). या प्रक्रियेतच भाषांच्या व्याकरणाबरोबर बोलीभाषांच्या व्याकरणांची निर्मिती खिस्ती मराठी लेखक करताना दिसतात.

युरोपिअन खिस्ती अभ्यासकांनी मराठी कोश वाङ्मय निर्माण करण्यापूर्वीचे मराठी कोश वाङ्मय मराठी भाषिकांसाठी होते. त्यामुळे त्या कोशाचे स्वरूपही वेगळे होते. पण अन्य भाषिकांना मराठी शिकण्यासाठी मोल्सवर्थ, कँडी यांनी तयार केलेल्या कोशाची मांडणी व स्वरूप वेगळे होते हे लक्षात येईल. खिस्ती मराठी लेखकांनी आपल्या स्वार्थासाठी का होईना, मराठी कोश वाङ्मयाचा पाया घालून गोलाची भर घातली आहे हे, विसरता येत नाही.

युरोपिअन ख्रिस्ती मराठी लेखकांना ललित साहित्य निर्मिती करावयाची नव्हती. तर युरोपातील साहित्य, सामाजिक सुधारणा, विज्ञानाने घडविलेल्या नवीन सुधारणा, व्यक्तिस्वातंत्र्य हे सर्व महाराष्ट्रातील लोकांना शिकवावयाचे, त्यांची सुधारणा करावयाची हा त्यांचा प्रयत्न होता. यामागे त्यांचा काही स्वार्थी हेतू होता असेही कुणी म्हणेल. पण महाराष्ट्रातील लोकांचा मिशनरी लोकांशी, युरोपिअन राज्यकर्त्यांशी जसजसा अधिक संबंध येत गेला तसतसा महाराष्ट्रातील काही लोकसमुदाय त्यांच्या संस्कृतीने भारावून गेला हेही नाकारता येत नाही. युरोपिअन ख्रिस्ती मराठी लेखकांनी नवख्रिश्चनांसाठी आणि ख्रिस्तीतर मराठी वाचकांसाठी, सामाजिक, शास्त्रीय, भौगोलिक, वैद्यकीय आदी विषयांवरही मराठीत लिहिले; हे लिहीत असताना त्यांनी मराठी भाषिक पंडितांचे सहकार्यही वेळोवेळी घेतले आहे.

युरोपिअन वा अमेरिकन ख्रिस्ती मिशनरी वा मिशनरी नसलेल्या ख्रिस्ती लेखकांनी प्रारंभीच्या काळात मराठीत ग्रंथलेखन केले.

नंतरच्या काळात महाराष्ट्रातून धर्मांतरित झालेल्या नवख्रिश्चनांनी मराठीत ग्रंथलेखन करण्यास सुरुवात केली. श्री. नारायण शेषाद्री, बाबा पदमनजी, शाहू दाजी कुकडे, रे. रामकृष्णपंत मोडक आदी नवख्रिस्ती मराठीत लिहू लागले. त्यांच्यापुढे मराठी भाषा शिकण्याची अडचण नव्हती. त्यांची अडचण ख्रिस्ती धर्मातील संकल्पना मराठीत कशा आणता येतील ही होती. तसेच ख्रिश्चनांची मराठी भाषा हा बराच काळ सुशिक्षित मराठी भाषिकांचा आणि सुशिक्षित ख्रिश्चनांचा चिंतेचा विषय होता. या संदर्भात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सरकारी विद्याखात्याने मेजर कँडी यांच्या हस्ते मराठी भाषेच्या घडणीत आवश्यक ते फेरफार घडवून आणले. त्यानंतर मराठी भाषेची लेखनपद्धती, शब्दप्रयोग, वाक्यरचना व भाषाप्रचार स्थिर होऊन गद्य पद्धतीला एकप्रकारचा स्थिरपणा आणण्यात शालेय पुस्तकांनी बराचसा हातभार लावला, असे म्हणावयास हरकत नाही. मेजर कँडी यांच्या निधनानंतरही त्याने घालून दिलेल्या मार्गानेच बहुतेक भाषिक व्यवहार चालले ही कृ. भि. कुलकर्णी यांनी घेतलेली नोंद लक्षात घ्यावी लागते (आमगउ पृ ३९६). नवख्रिस्ती बरेचसे खालच्या वर्गातील होते. त्यांचे शिक्षण मिशनच्या शाळेत झालेले होते. त्यांची मराठी भाषा उच्चवर्णीयांसारखी व्हावी यासाठी " बालबोधमेवा " सारख्या नियतकालिकाने कौतुकास्पद प्रयत्न केलेले आहेत.

अमेरिकन मिशन इ. स. १९१३ साली त्यावेळच्या मुंबई राज्यात स्थिरावून शंभर वर्षे झाली, तेव्हा अमेरिकन मिशनचा शतवर्षोत्सव मुंबई व अहमदनगर येथे मोठ्या प्रमाणात साजरा झाला. " ज्ञानोदयाने " त्यावेळी शतवर्षोत्सव अंकाची खास पुरवणी सप्टेंबर १९१२ साली प्रसिद्ध केली. त्या पुरवणीचे संपादक रे. ना. वा. टिळक होते. भारतीय ख्रिश्चनांसंबंधी त्यांची विचारधारा काय होती ते स्पष्ट करताना ते लिहितात, " १८१३–१९१३ पावेतो आमचे जे शतक गेले आहे, त्याचे

खरे चित्र काढावयाचे झाल्यास एका कागदावर १८१३–१९१३ हे आकडे शिरोभागी लिहून त्याखाली एक मोठा पाळणा काढावा, त्याची दोरी अमेरिकेच्या हाती द्यावी, जवळच काही पांगुळगाडे, लहान बाळांच्या दूध पिण्याच्या बाटल्या ठेवाव्यात. सारांश बालपणाचे निदर्शक असे सारे साहित्य रेखाटावे म्हणजे झाले. आपण एकोणिसाव्या शतकातले ख्रिस्ती आहोत. जगातल्या प्रमुख ख्रिस्ती राष्ट्रातल्या म्हणजे सुधारलेल्या राष्ट्रातल्या लोकांना आम्हाविषयी निःसंशय अधिक सहानुभूती आहे. त्या राष्ट्रांच्या मूल तत्त्वांचे ग्रहण आम्हाला जितके लवकर करता येण्यासारखे आहे, तसे हिंदुस्थानातील कोणत्याही दुसऱ्या समाजात नाही. विचारसरणीत पूर्व आणि पश्चिम यांचे अत्यंत मनोहर संमेलन होण्याचा संभव असेल तर तो आमच्या ठायी आहे. आमच्या देशाचे भावी उद्धारक खरोखर आम्हीच आहोत. १८१३–१९१३ या शतकाचे खरेखुरे स्मारक म्हणजे आमच्या स्थितींत आणि कृतींत फरक पडणे होय." रे. टिळकांच्या या विचारधारेतून राष्ट्रीय अस्मिता असलेली ख्रिस्ती मराठी लेखकांची एक परंपरा तयार झाली. भारत आपला देश आहे. भारतीय भाषा ह्या आपल्या भाषा आहेत. भारतीय संस्कृती ही आपली संस्कृती आहे. या सर्व संदर्भात इथला ख्रिस्ती समाज विकसित झाला पाहिजे, असे मानणारी ही परंपरा होती. ख्रिस्ती प्रार्थना मंदिरात म्हटली जाणारी प्रार्थनागीते भारतीय व महाराष्ट्रातील संगीतानुसार रचली व गायिली गेली पाहिजेत असा आग्रह या परंपरेतील लोकांनी धरला, इतकेच नव्हे तर कृष्णराव सांगळे, रे. ना. वां. टिळक यांनी ख्रिस्ती उपासना संगीतासाठी भक्तिपूर्ण विविध भक्तिगीते लिहिली व ती लोकप्रिय झाली. याच परंपरेतील लोकांनी संघटितरीत्या एकत्र येऊन सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन चळवळीचा प्रयत्न इ. स. १९२३ पासून प्रत्यक्षात सुरू केलेला दिसतो. या कार्यासाठी जे मंडळ स्थापण्यात आले होते त्या मंडळाचे नाव होते, "श्री ख्रिस्तशिष्य टिळक मंडळ." या मंडळाची स्थापना अहमदनगर येथे इ. स. १९२३ साली झाली. प्रत्येक वर्षी ख्रिस्ती साहित्यिकाचे एक पुस्तक प्रसिद्ध करावे असा या मंडळाचा उद्देश होता. इ. स. १९२६ साली शा. द. उजगरे यांच्या संपादकत्वाखाली "टिळकानुग्रह" हा काव्यसंग्रह या मंडळाने प्रसिद्ध केला. या काव्यसंग्रहात रे. टिळकांच्या काव्यातून काव्य-लेखनाची प्रेरणा घेतलेल्या अठरा व्यक्तींच्या (स्त्री व पुरुष) कवितांचा समावेश आहे. या काव्य संग्रहाला लक्ष्मीबाई टिळकांची प्रस्तावना आहे.

याच परंपरेतून पुढे महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्य सेवा मंडळ स्थापन झाले व १८ एप्रिल १९२७ रोजी नाशिक येथे महाराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांचे पहिले साहित्य संमेलन रे. डॉ. मॅक्निकल यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी रीत्या पार पडले. इतकेच नव्हे तर या संमेलन प्रसंगी वाचलेल्या अभ्यासपूर्ण सहा निबंधांचा संग्रह डिसेंबर १९३१ सालात, "मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास" (१८१०–१९२७) या नावाने प्रसिद्ध झाला. या संग्रहात असलेले निबंधकार रे. डॉ. एन. मॅक्निकल,

रे. भा. कृ. उजगरे, शा. द. उजगरे, रावबहादूर बा. ना. आठवले, रा. दा. का. ढालवाणी, रे. जे. एफ्. एडवर्डस् हे सारे टिळक परंपरेतील लेखक होत. तसेच मनोहर उजगरे, अमृतराव त्रिभुवन, लक्ष्मीबाई टिळक, देवदत्त टिळक, दशरथ कदम, फादर जॉन विन्स्लो, त्यानंतर लिहिणाऱ्या पिढीतील अशोक टिळक, ध्रुव टिळक, मायावती टिळक हे टिळक कुटुंबीय, स. ना. सूर्यवंशी, थोरात, के. स. ठोकल, रावसाहेब र. लु. जोशी आदी लेखक टिळकांच्या विचारधारेतून आपले लिखाण करताना दिसतात.

महानुभाव वाङ्मय, वारकरी वाङ्मय, जैन वाङ्मय किंवा दलित वाङ्मय ही स्वतंत्रपणे साहित्य प्रकार म्हणून वेगळी नाहीत. शुद्ध साहित्य विचारात असे प्रकार संभवत नाहीत. आशयानुसार अभ्यासाच्या सोयीसाठी केलेले हे प्रकार आहेत. ख्रिस्ती मराठी वाङ्मय हाही तसाच वाङ्मय प्रकार आहे. हिंदू लेखक जसा आपल्या जीवन संदर्भात व धर्मसंबंधात संस्कार स्वीकारून आपली वाङ्मय-कृती निर्माण करतो, तसाच ख्रिस्ती लेखक ख्रिस्ती धर्मसंस्कारात घडल्यामुळे त्या संस्कारातून तो आपले अनुभव वाङ्मयात साकार करतो. त्यामुळे त्याचे वाङ्मय वेगळे होते एवढेच. मला स्वतःला तत्त्वतः वाङ्मयाचे असे वर्गीकरण संभवत नाही हे मान्य आहे. तरी अभ्यासासाठी मी ते वर्गीकरण स्वीकारले आहे. त्यामागची माझी भूमिका अशी—

हळूहळू ख्रिस्ती मराठी वाङ्मय निर्मितीचे प्रमाण वाढू लागले. अनेक अंगांनी ख्रिस्ती लेखक मराठी लिहू लागले. हे सर्व वाङ्मय विखुरलेल्या स्वरूपात होते. ते एका विशिष्ट दृष्टिकोणातून एकत्र केले तर ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचे स्वरूप व कार्य लक्षात येईल. तसेच एकूण मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीस या वाङ्मयाने कोणत्या प्रकारे हातभार लावला ते स्पष्ट होईल. हे मराठी भाषेचा अभ्यासक म्हणून तपासून पहाणे आवश्यक वाटले. तसेच महाराष्ट्रातील विविध सांप्रदायिक वाङ्मयाचा अभ्यास मराठी संस्कृतीच्या आकलनास उपकारक ठरताना दिसतो. ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा या संदर्भात कोणत्या प्रकारचा हातभार लागला त्याचे चित्र रेखाटता आले तर पाहावे असा हा प्रयत्न आहे.

यापूर्वी असा प्रयत्न डॉ. श्री. म. पिंगे यांचा "युरोपिअनांचा मराठीचा अभ्यास व सेवा" असा प्रबंध लिहून त्यांनी युरोपियन ख्रिस्ती मराठी लेखकांचा अभ्यास प्रकट केला आहे. डॉ. कृ. भि. कुलकर्णी यांनीही "आधुनिक मराठी गद्याची उत्क्रान्ती" या प्रबंधातून ख्रिस्ती मराठी साहित्य उजेडात आणले आहे. प्रस्तुत ग्रंथात युरोपिअन व अमेरिकन मिशनरी, मिशनरी नसलेले ख्रिस्ती मराठी लेखक, धर्मांतर केलेले महाराष्ट्रातील मराठी भाषिक ख्रिस्ती मराठी लेखक समाविष्ट केलेले आहेत. अशा प्रकारचा हा पहिलाच इतक्या व्यापक स्वरूपाचा अभ्यास म्हणावा लागेल.

१९६० नंतर लिहिणारे बहुतेक ख्रिस्ती मराठी लेखक मराठी भाषेचे व संस्कृतीचे अभिमानी असून धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे अशी धारणा असलेले आहेत. रे. टिळकांनी ख्रिस्ती विचार वैदिक विचारात सामावून घेतला. तुकारामाच्या सेतूवरून येशूकडे जाण्याची वाट दाखविली. त्याच परंपरेतून पुढील ख्रिस्ती मराठी लेखकांनी ख्रिस्ताला व त्याच्या विचारांना महाराष्ट्रीय संस्कृतीत आपलेसे करून घेतलेले दिसते. याद्दृष्टीने मराठीतील ख्रिस्त चरित्रांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

ख्रिस्ती मराठी वाङ्मयाच्या स्थितीगतीचा असा हा थोडक्यात आढावा आहे.

अभ्यासाच्या सोयीसाठी मी ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा विचार करण्यासाठी फादर स्टीफन्स ते इ. स. १९६० पर्यंतचा काळ स्वीकारला आहे. इ. स. १९६० साली थांबायला तसे वाङ्मयीन कारण नाही हे खरे आहे. पण मराठी भाषा बोलणारांचा "महाराष्ट्र" भाषिक राज्यरचनेच्या योजनेनुसार १९६० साली अस्तित्वात आला. इ. स. १९६० नंतरच्या महाराष्ट्राचे स्वरूप नाही म्हटले तरी पूर्वीपेक्षा वेगळे असणार हे उघड आहे. इ. स. १९६० नंतरच्या काळात खूप ख्रिस्ती मराठी वाङ्मय निर्माण होत आहे. याच कामाचा पुढील भाग म्हणून कुणी त्याचा अभ्यास करायला हरकत नाही. निदान इ. स. १९६० ते १९८० या काळातील ख्रिस्ती मराठी लेखकांच्या वाङ्मयाची स्वतंत्र सूची कुणी केल्यास ती उपयुक्त ठरेल असा भरवसा आहे.

प्रस्तुत ग्रंथ वाङ्मयेतिहास नव्हे. वाङ्मयेतिहासासाठी आवश्यक असलेल्या साधनांचा संदर्भ ग्रंथ होय.

हा ग्रंथ लिहिताना माझी भूमिका अशी आहे.

(१) जे लेखक धर्माने ख्रिस्ती आहेत, मग ते युरोपिअन, अमेरिकन वा भारतीय असोत, ज्यांनी मराठी भाषेत ग्रंथलेखन केले आहे, त्यांचा ख्रिस्ती मराठी लेखक म्हणून विचार केला आहे. शक्य तिथे त्यांचे चरित्र थोडक्यात सांगितले आहे.

(२) उपलब्ध ग्रंथांची तपशीलवार माहिती देऊन त्या ग्रंथात नेमका कोणता विषय हाताळला आहे त्याची शक्य तो लेखकाच्या भाषेत माहिती दिली आहे.

(३) अभ्यासाच्या सोयीसाठी हा ग्रंथ दहा प्रकरणांत विभागला आहे. एका विभागातील पुस्तके दुसऱ्या विभागात घालता येणारच नाहीत असे वर्गीकरण करणे शक्य नाही.

(४) प्रत्येक प्रकरणातील ग्रंथांची नोंद शक्यतो कालानुक्रमे घेतली आहे. एकतर त्यामुळे वाङ्मय विकासाची कल्पना यावी. दुसरे, सर्व ग्रंथ वा लेखक या ग्रंथात समाविष्ट झाले असतील असे नाही. त्यांची नोंद घ्यायची झाली तर

अशी मांडणी सोयीची पडते. पुरवणी जोडून मधली राहिलेली पोकळी भरून काढता येते.

(५) प्रस्तुतचा हा संदर्भ ग्रंथ असल्यामुळे लेखक व ग्रंथसूची देणे आवश्यक झाले आहे.

(६) पुस्तकांच्या नोंदी घेताना खूप अडचणी आल्या. बऱ्याचशा पुस्तकांवर लेखकाचे, संपादकाचे वा प्रकाशकाचे नांव नाही. ग्रंथ प्रकाशन काळ दिलेला नाही. त्यामुळे ग्रंथ हाती असून या ग्रंथात असे ग्रंथ समाविष्ट करता आले नाहीत. जेथे शक्य झाले आहे तेथे ग्रंथकार वा काल निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे, व त्यांचा समावेश केला आहे.

(७) ग्रंथाच्या नोंदी शक्यतो मूळ ग्रंथ पाहून घेतलेल्या आहेत. पण जे ग्रंथ मिळू शकले नाहीत ते दुय्यम साधनांवरून घेतले आहेत व तसे म्हटले आहे. त्यात विशेषतः डॉ. पिंगे यांचा युरोपिअनांचा मराठी अभ्यास व सेवा (यु. म. अ. से. असा संक्षेप), आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती (आमगउ) डॉ. कृ. भि. कुलकर्णी; (A Catalogue of Marathi Christian Literature) (मखि) दातेसूची (दासू) या साधनांचा अधिक उपयोग केला आहे.

(८) ख्रिस्ती मराठी वाङ्मय दहा प्रकरणांत विभागले आहे आणि त्याची मांडणी कालानुक्रमाने केली आहे. त्यामुळे एखाद्या लेखकाची वाङ्मय सेवा एकत्र मिळणार नाही. ती निरनिराळ्या प्रकरणांत विभागली जाईल. पण लेखकाच्या सूचीत त्याच्या सर्व ग्रंथांची यादी एकत्र पाहायला मिळेल.

(९) ज्यांच्याकडून पुस्तके उपलब्ध झाली त्या संस्था, व्यक्ती यांची त्या त्या पुस्तकाखाली कंसात नोंद केलेली आहे. जिथे नोंद केलेली नाही ती पुस्तके एक तर माझ्या संग्रहातील किंवा अहमदनगर कॉलेजच्या ग्रंथ संग्रहालयातील आहेत.

(१०) परदेशी विशेषनामांच्या उच्चारणाबाबत अनेक विकल्प आढळले. उदा. मेरी, मरीया, मारिया; केरी–कैरी इत्यादी, अशा वेळी जिथून ते संदर्भ घेतले त्यानुसार तसे दिले आहेत.

या संशोधन प्रकल्पाला प्रारंभापासून अनेक अडचणींतून जावे लागले. विशेषतः हे सर्व ग्रंथ जमविणे, त्यासाठी विविध संस्था, व्यक्ती यांच्याकडे जाऊन भेटीगाठी घेऊन पुस्तके मिळविणे, लोकांची चरित्रे मिळविणे, या कामी खूप हिंडावे व परिश्रम घ्यावे लागले. इतके करून सर्व काही हाती आले आहे असे म्हणवत नाही. पराकाष्ठेचे प्रयत्न करूनही ग्रंथात काही उणिवा राहिल्या असणार याची जाणीव मला स्वतःला आहे. पण मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने एक पायाभूत काम करण्याचे भाग्य या निमित्ताने मला लाभले यात समाधान आहे.

—गंगाधर मोरजे

ऋण निर्देश

जून १९७१ मध्ये मी अहमदनगर कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख म्हणून आलो. कॉलेजच्या ग्रंथालयात गेलो तेव्हा ग्रंथालयाच्या "रेअर कलेक्शन विभागात" डॉ. भा. पां. हिवाळे यांनी "ज्ञानोदयाच्या" शंभर वर्षांच्या फायली संग्रहित करून ठेवलेल्या दिसल्या. त्या व्यवस्थितपणे कपाटात सांभाळलेल्या दिसल्या. माझ्या दृष्टीने तो मोठा खजिना होता. डॉ. हिवाळे यांच्या खासगी ग्रंथसंग्रहाचाही शोध घेऊन डॉ. सौ. मनोरमा बार्नाबस यांच्या सहाय्याने कॉलेज ग्रंथालयात आणवला. अमेरिकन मराठी मिशनची काही पुस्तकेही सांभाळलेली दिसली. अहमदनगर कॉलेजचे वातावरण संशोधन – शैक्षणिक कार्याला अनुकूल होते. त्यावेळचे कॉलेजचे प्राचार्य डॉ. टी. बार्नाबस अशा बाबतीत प्राध्यापकांना व अभ्यासकांना प्रोत्साहन देत, इतकेच नव्हे तर हाती घेतलेल्या कामासंबंधी प्रत्येक भेटीत आस्थेने विचारपूस करीत. त्यांचे प्रोत्साहन लक्षात घेऊन, माझ्या आवडीनुसार इ. स. १९७४ च्या ऑगस्ट महिन्यात विद्यापीठ अनुदान मंडळाला "ख्रिस्ती मराठी लेखक व त्यांचे वाङ्मय (फादर स्टीफन्स ते इ. स. १९६०)" ह्या अभ्यासप्रकल्पाची योजना सादर केली. १९७७ च्या ऑगस्ट महिन्यात विद्यापीठ अनुदान मंडळाने अनुदान देऊन तीन वर्षात हे काम पुरे करावे असे सुचविले. प्रत्यक्षात हा प्रकल्प साडेचार वर्षात पुरा झाला.

ह्या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाल्यापासून तो प्रकल्प पुरा होईपर्यंत माझ्याकडून हे काम करवून घेण्याचे सर्वांत मोठे श्रेय माझी प्रिय पत्नी सौ. पद्मा मोरजे हिला द्यावे लागेल. नाही म्हटले तरी माझा स्वभाव काहीसा शिथिल आहे. अशा कामासाठी जो कर्तव्यकठोर आचार लागतो तो माझ्याजवळ नाही. सौ. मोरजे यांना संशोधनाची जाण असल्यामुळे पुस्तकांच्या नेमक्या नोंदी घेणे व प्रारंभीचे काम आवश्यकतेनुसार योग्य त्या दिशेने करणे त्यांना शक्य झाले व माझे पुढील काम सोपे झाले. पुस्तकाची संदर्भ सूची, ग्रंथसूची, लेखकसूची हे सर्व त्यांनी केले. विविध पुस्तके जमवून आणणे किंवा अन्यत्र जाऊन पुस्तकांच्या नोंदी करून आणणे व शेवटी नोंदीचे सुसूत्र संपादन करणे हे काम मी केले आहे. आत्मस्तुतीचा दोष पत्करूनही मला हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की या ग्रंथांच्या घडणीमागे सर्वार्थाने सौ. मोरजे आहेत.

माझ्या या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन प्राचार्य डॉ. टी. बार्नाबस व डॉ. सौ. मनोरमा बार्नाबस, प्राचार्य जोसेफ बार्नाबस व डॉ. सौ. सरला बार्नाबस यांनी आवश्यकतेनुसार दैनंदिन कामातून मोकळीक दिली व प्रोत्साहनही दिले. काही वेळा आपल्या खासगी संग्रहांतून (हिवाळे यांचा संग्रह) काही ग्रंथही वापरायला दिले.

त्याबद्दल त्यांचें ऋण मानणे योग्यच ठरेल.

याकामी डॉ. एस्. के. हळवे, उपप्राचार्य अहमदनगर कॉलेज, यांचा कौतुकाचा प्रेमळ हात नेहमीच पाठीवर राहिला आहे.

ग्रंथांचे स्वरूप ठरविणे, त्यासंबंधी आखणी करणे या बाबत डॉ. स. गं. मालशे, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. पी. एस्. जेकब, सध्याचे प्राचार्य अहमदनगर कॉलेज, सौ. मनोरमा बार्नबस, डॉ. लेदर्ले, प्रा. घासकडवी यांचे बहुमोल सहाय्य झालेले आहे.

ग्रंथप्रकाशनापूर्वी प्रा. वसंत दावतर, मुंबई यांच्याशी झालेला विचारविनिमय लाभदायक ठरला हे नमूद करणे आवश्यक आहे.

अहमदनगर कॉलेजच्या ग्रंथालय प्रमुख सौ. हळवे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रंथालयाचा माझ्या गरजेनुसार वापर करायला सदैव मोकळीक दिली त्यामुळे बरेचसे काम मी करू शकलो. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

याशिवाय ज्या संस्थांच्या ग्रंथालयातील पुस्तकांचा मी उपयोग केला, त्यांचा ऋणनिर्देश करणे योग्य ठरेल.

(१) मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, (मुंबई)
(२) स्नेहसदन ग्रंथ संग्रहालय, (पुणे).
(३) युनियन ट्रेनिंग कॉलेज (नगर!).
(४) ट्रक्ट ॲण्ड बुक सोसायटी (मुंबई).
(५) अहमदनगर कॅथलिक चर्च.
(६) सेंट मोनिका हायस्कूल.
(७) इंदापूर मिशन.

तसेच खालील व्यक्तींनी आपल्या संग्रहातील वा मिळतील त्या ठिकाणाहून पुस्तके मिळवून मला दिली.

डॉ. खिस्तोफर शेळके
डॉ. के. एस्. कराडकर
डॉ. एस. व्ही. मुळे
प्रा. अशोक टिळक (नाशिक), श्री. बर्फे (अहमदनगर)
श्री. के. स. ठोकळ (अहमदनगर)
फादर दिब्रेटो व फादर जे. नुनिस (वसई)
बिशप डॉमिनिक ॲब्रिओ, औरंगाबाद,
श्रीमती ज्योत्स्ना त्रिभुवन, अहमदनगर.
श्री. सुधीर शर्मा (नगर)
श्री. हरिश्चंद्र उजगरे (मुंबई)
श्रीमती बंडेलू (अहमदनगर), श्री. अनिल दहिवाडकर (पुणे)
फादर डोंगरे (इंदापूर), श्री. विश्वासकुमार (श्रीरामपूर)

श्रीमती सरस्वती उजगरे (मुंबई), भास्करराव जाधव (पुणे)

याशिवाय काही व्यक्तींनी पत्राने आपली व त्यांना माहीत असलेल्या व्यक्तींची माहिती कळवून मला उपकृत केले आहे. त्यात श्री. सत्यवान नामदेव सूर्यवंशी, श्यामराव आढाव आदी अनेकजण आहेत.

सर्वांचा नामनिर्देश न चुकता करणे शक्य नसल्यामुळे, या कामाला ज्यांचा ज्यांचा कळत नकळत हातभार लागला गेला आहे त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

महाराष्ट्रातील प्रमुख दैनिकातून ख्रिस्ती मराठी लेखक व त्यांच्या ग्रंथांची माहिती देण्यासाठी मी आवाहन केले होते. त्यानुसार ज्यांनी माहिती दिली त्यांचा मी आभारी आहे. पण आवाहनाला त्यावेळी ज्यांनी प्रतिसाद दिला नाही आणि ग्रंथ पुरा झाल्यावर ग्रंथात माहिती आली नाही म्हणून कुणी नाराज झाले तर त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त करण्याशिवाय काही करू शकत नाही.

प्रस्तुत ग्रंथ मी सिद्ध केला होता पण प्रकाशित करण्यासंबंधी माझ्या जवळ नेमकी योजना नव्हती. पण योगायोगाने व माझ्यावरील अकृत्रिम प्रेमामुळे माझे ज्येष्ठ मित्र डॉ. मॅथ्यू लेदर्ले यांनी प्रकाशनासाठी आपण होऊन पुढाकार घेतला. त्यासाठी स्नेहसदन संस्था पुणे, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, व प्राचार्य अहमदनगर कॉलेज, अहमदनगर यांच्याकडून प्रकाशनासाठी अनुदाने मिळविली. त्यामुळे हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अशा प्रकारे सहभागी होणाऱ्या डॉ. मॅथ्यू लेदर्ले यांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत ?

महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी या ग्रंथास प्रकाशन अनुदान देऊन संस्कृती संवर्धनाच्या दिशेने मोठे औचित्य साधले आहे त्याबद्दल व्यक्तिशः डॉ. बारलिंगे व संस्कृती मंडळाचा मी आभारी आहे.

अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य पी. एस. जेकब, या ग्रंथाच्याबाबत प्रारंभापासून पाठपुरावा करीत आले. त्यांचे या संदर्भातील प्रोत्साहन व सक्रिय सहाय्य लाभल्यामुळे हे काम पुरे होऊ शकले. डॉ. जेकब यांचा लोभ व स्नेह असाच राहावा अशी अपेक्षा.

आनंद मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. य. गो. जोशी व माझे स्नेहसंबंध माझ्या ' अक्षरवेध ' या पुस्तकाचे वेळी जमले. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे हा ग्रंथ सुबक स्वरूपांत आपणापुढे येत आहे. आनंद मुद्रणालयाच्या सेवक वर्गाचे सौजन्य व कार्यतत्परता लक्षणीय आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

– लेखक

अ नु क्र म णि का

ख्रिस्ती मराठी वाङ्मय निर्मितीमागील पार्श्वभूमी

धार्मिक वाङ्मय

जगातील एकूण वाङ्मय संभारात, धार्मिक वाङ्मयाचे प्रमाण सर्वांत अधिक आहे, असे का हे समजण्यासारखे आहे. विज्ञानयुग आणि यंत्रयुग यांच्या आधी, जगातील बहुसंख्य मानवजात, धर्मश्रद्धेवर जगत होती, आजही जगते आहे पण प्रमाण काहीसे कमी आहे. या धर्मश्रद्धेच्या पोटी, जशा मानवजातीच्या संघटना उभ्या राहिल्या, वाढल्या, तशी राष्ट्रे घडली, उभी राहिली. राष्ट्र-राष्ट्र एकत्र आली, संघटित झाली, तसेच मानवजातीच्या संघटनांमध्ये या धर्मश्रद्धेच्या पोटी वितुष्टे आली, वेळप्रसंगी धर्मयुद्धेही झाली. ती युद्ध दीर्घकाळ टिकली. धर्म ही एक श्रद्धा आहे. या श्रद्धेच्या जोपासनेने लौकिक व पारलौकिक जीवन यशस्वीपणे अनुभवता येते. प्रत्येकाच्या धर्मश्रद्धेचे स्वरूप वेगळे असेल, तो भाग वेगळा. अनेकदा अनेकांनी सर्व धर्म समान आहेत, अंतिम देव एकच आहे असे सांगण्याचा प्रयत्न केलेला असला, तरी प्रत्येकाला आपला धर्म, आपली जीवनश्रद्धा, आपली जीवनपद्धती एकमेव आहे असे वाटत आलेले आहे. आणि हे मानवी स्वभावाला धरून आहे. इतकेच नव्हे तर, आपली धर्मश्रद्धा इतरांनी स्वीकारावी, लोक स्वीकारत नसतील तर-कधी गोड बोलून, कधी चमत्कार दाखवून, कधी फसवून, कधी जबरदस्ती करून, राजसत्तेचा वा बळसत्तेचा उपयोग करून आपापले धर्म इतरांना स्वीकारावयास लावण्याचे प्रयत्न जगाच्या इतिहासात झालेले दिसतील.

पूर्वी धर्मश्रद्धांच्या बाबतीत असे होत होते, आत्ताच्या नवीन युगात आपापली राजकीय, सामाजिक, नैतिक मते लादण्यासाठी से प्रयत्न होताना दिसतात.

वाङ्मयाच्या दृष्टीने नवीन धर्मश्रद्धांचे आगमन महत्त्वाचे ठरावे, कारण वाङ्मय हे जीवनाच्या सर्वांगाचे शब्दांच्या साधनांनी व्यक्त झालेले मानवाचे चित्रण असते. आपल्या धार्मिक श्रद्धा आपणासाठी म्हणा किंवा इतरांसाठी म्हणा, जेव्हा माणूस व्यक्त करतो त्यावेळी नवीन कल्पना, नवीन शब्द नवीन विचार तो भाषेत आणीत असतो. प्रस्थापित धर्मश्रद्धेहून जेव्हा एखादी नवी धर्मश्रद्धा विशिष्ट भाषिक प्रदेशात येते किंवा आणली जाते, तेव्हा नवीन आलेल्या धर्माच्या श्रद्धा, निष्ठा, संकल्पना इत्यादींच्या अभिव्यक्तीस प्रस्थापित धर्मश्रद्धेची

भाषा सुरुवातीला तरी पूर्णपणे समर्थ नसते. या दृष्टीने पूर्वीच्या, प्रस्थापित भाषेची नव्या स्वरूपात जडण घडण करावी लागते. महाराष्ट्रातील महानुभाव, जैन, नागेश, आदी पंथीयांना भाषेची मोठी अडचण नव्हती. पंथीय संकल्पना आचारविचार, उपास्य दैवते, उपासनादेवता यांसारख्या बाबतीत फक्त ते एकमेकांपासून वेगळे ठरत होते. पण परभाषक परदेशी, वैदिक संस्कृतीशी साम्य नसलेला ख्रिश्चन धर्म जेव्हा आला, तेव्हा त्याला आपल्या धर्मप्रसारासाठी सारेच नवीन उभे करायचे होते. त्याच्या ठायी आपल्या धर्मश्रद्धेच्या प्रसारासाठी लागणारी जिद्द, समर्पणाची वृत्ती, आणि येशूचा संदेश पोहोचविण्यासाठी लागणारी प्रयत्नांची पराकाष्ठा होती. ज्या ख्रिस्ती लेखकांनी मराठी भाषेत लिहिले त्यांनी आपल्या ख्रिस्तीधर्म प्रचाराचे व प्रसाराचे अंग कधी लपवून ठेवलेले दिसत नाही.

युरोपातील अनेक देशांनी आपापल्या प्रवाशांच्या साहाय्याने अनेक मार्ग शोधून काढण्यात यश मिळविले. इ. स. १४९८ च्या मे महिन्यात, वास्को-द-गामा हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून, हिंदुस्थानात आला.

हिंदुस्थानातील एतद्देशीय लोकांशी वास्को-द-गामाने एका स्पॅनिश भाषा जाणणाऱ्या मुसलमान दुभाष्यामार्फत व्यवहार चालविला होता. वास्को-द-गामा जेव्हा आपल्या लोकांबरोबर कालिकत इथे आला, तेव्हा दोन मुसलमानांनी त्याला विचारले ' तुम्ही येथे कशासाठी आलांत ? ' त्यावर त्याने उत्तर दिले, ' आम्ही ख्रिश्चन्स् व मसाला यांच्या शोधार्थ इथे आलो. " * या संवादावरून पोर्तुगीज लोक व्यापारासाठी जरी येथे आले तरी ते धर्मप्रसारालाही तितकेच महत्त्व देत, हे स्पष्ट दिसून येते.

हिंदुस्थानात आल्यावर पोर्तुगीजांनी हिंदू लोकांच्या सहकार्याने आपले वर्चस्व गोव्यात प्रस्थापित केले. हिंदू लोकांना सुरुवातीलाच दुखावणे या परकीयांना मानवणारे नव्हते. त्यांना आपला पाय आपल्या इच्छित कार्यासाठी रोवायचा होता. यामुळे प्रारंभी तरी पोर्तुगीजांची कृती गोव्यातील लोकांशी विशेषतः धार्मिक व सांस्कृतिक बाबतींत सहिष्णतेची होती. पण हळूहळू सत्तेचे बस्तान बसू लागले आणि पोर्तुगीजांची आणि धर्मप्रसारकांची वृत्ती आपल्या मूळ हेतूचे स्वरुप प्रकट करू लागली.

इ. स. १५६० या वर्षी कॅथालिक पंथाच्या समीक्षण (सभेची तपासणी

[* इ. स. पहिल्या शतकात पौर्वात्य देशांत ख्रिस्ती धर्म गेला होता. त्यामुळे युरोपिअन ख्रिस्ती या जुन्या ख्रिस्ती लोकांचा शोध घेत होते. ते कोणत्या पंथाचे होते व त्यांची श्रद्धा कोणती होती, याचे कुतूहल साऱ्याच युरोपिअन ख्रिस्ती लोकांना होते.]

मंडळ)† (इंक्विझिशनची) स्थापना गोव्यात झाली. खरे म्हणजे त्या आधींच गोव्यात निरनिराळ्या गावी वसती करून राहिलेल्या हिंदूंस पोर्तुगीज निरनिराळ्या कारणांवरून छळीत होते. पण समीक्षण सभेच्या स्थापनेने त्यांना आपल्या हातांत कायदेशीर साधन मिळाल्यासारखे झाले. आधीच सत्ताधारी बेबंदपणे वागत होते, त्यात या साधनांची भर पडल्यामुळे गोव्यातील हिंदूंचा धार्मिक छळ करण्याचे साधन पोर्तुगीज ख्रिश्चनांना आयतें सापडले. ख्रिस्ती लोक येण्यापूर्वीच्या गोव्यातील लोकांच्या वापरात असलेले हिंदूंचे धर्मग्रंथ या ना त्या कारणांनी मिळवून जाळून नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू झाले. गोव्यातील अनेक सुशिक्षित कुटुंबांनी आपणाला ख्रिस्ती व्हावे लागेल या भीतीमुळे पोर्तुगाल राज्याची हद्द सोडून दुसरीकडे राहायला जाण्याचा निर्णय घेतला. तिथून पोर्तुगाल सत्तेला व ख्रिस्ती धर्माच्या आक्रमणाला जेवढे व ज्या प्रकारे तोंड देता येईल ते देण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी सारे उपाय थकल्यावर त्यांच्यापैकी बहुसंख्य मंडळींनी त्याकाळी हिंदू राजवटीखाली असलेल्या प्रदेशांत राहणे पसंत केले.

"इ. स. १५४६ या वर्षी व्हाइसराय जुवांव द कास्त्रूला (अल्फान्सो द सौजच्या स्थानी इ. स. १५४६ त त्याची बदली झाली होती.) राजाकडून आज्ञा आली की गोव्यात सार्वजनिक, तशीच खाजगी देवळे राहू देऊ नयेत, बरोबरी व संशयास्पद अशा स्थळी शोध करून हिंदूंच्या मूर्तींचा भंग करावा, हिंदू उत्सव बंद करावेत. ब्राह्मणांना व्याख्याने, प्रवचने-कथा पुराणे वगैरे करावयास देऊ नये. गोवे, वसई आणि दीव येथील जे ब्राह्मण मिगेल व्हाजला (तपासणी अधिकाऱ्याला) अनिष्ट वाटतील त्यास आपल्या (पोर्तुगालच्या) प्रदेशातून हाकलावे "* इ. इ.

"इ. स. १५६२ त इतालिया देशातील त्रिदंत (ट्रेन्ट) नगरांत काथोलिक पंथगुरूंची महत्परिषद भरली. तीत संमत झालेल्या एका ठरावानुसार १५६७ साली भरलेल्या प्रादेशिक परिषदेने हिंदूंचे ग्रंथ नष्ट करावे आणि ब्राह्मणांना देशाबाहेर पिटाळून लावावे, असे ठराव मान्य केले. सेबास्तियांव राजाने त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यात, त्या ठरावास राजाज्ञेचे स्वरूप दिल्याकारणाने तो कायदा बनला, यापुढे धर्मग्रंथांचा नाश, मनाची कोणतीही खंत न बाळगता उघडपणे करणे सोपे झाले."

"हिंदू धर्मग्रंथांना, हिंदू आचार-विचारांना व विधि-विधानांना आणि हिंदू ब्राह्मणांना काथोलिक पंथातील लढाऊ मंडळीचा विरोध असला, तरी महाराष्ट्री

† नव्या मतांच्या आणि सुधारणावादाच्या प्रसारामुळे धर्मश्रद्धेला तडा जाऊ नये आणि धर्म शिक्षणाला बाधा येऊ नये, म्हणून युरोपमध्ये "तपासणी मंडळ" नावाचा आयोग स्थापन केला होता, या तपासणी मंडळाची स्थापना गोव्यातही केली गेली.

भाषेवर त्यांचा काही राग नव्हता. त्याकाळी महाराष्ट्रीला राजमान्यता नव्हती. इतकेच नव्हे तर ती भाषा मानणारी एखादी प्रबल सत्ताही अस्तित्वात नव्हती की जिच्यामुळे राजकारण्यांच्या मनात काही शंका यावी. युरोपात जनसमाजाची शैक्षणिक स्थिती भारताच्या तुलनेने अद्याप मागासलेली होती. तेथे सामान्य जनतेच्या बाबतींत शालेय शिक्षणावर भर नव्हता. पंथाच्या प्रार्थना व मूलतत्त्वे श्रवणद्वारा शिकविण्यात येत आणि ज्याला त्याला त्याच्या देशभाषेतून ती शिकवणे कमी श्रमाचे होते. "[3]

ज्यांना कॅथॉलिक पंथाचा बाप्तिस्मा दिला गेला होता, अशा नव ख्रिश्चनांना ख्रिश्चन धर्माची मूलतत्त्वे, उपासना यासंबंधीचे ज्ञान देणे, ख्रिस्ती धर्मगुरुंचे कर्तव्य होते. कॅथॉलिकांच्या धर्मपरिषदेने ज्याच्या त्याच्या भाषेतून ज्याला त्याला धर्मशिक्षण देण्यात यावे असा ठराव पास केला होता, आणि विशेष म्हणजे गोव्यातील प्रादेशिक ख्रिस्ती परिषदेने तो मान्य केलेला होता. पण दुसरी भाषा शिकण्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. गोव्यामध्ये पहिले ख्रिस्ती धर्मसेवक अल्पशिक्षित व द्रव्यलोभी होते. त्यांनी धर्मप्रसार केला नाही. त्यानंतर सुशिक्षित वा निःस्वार्थी धर्मगुरू आले. ते ख्रिस्ती नसलेल्यांकडे वळले.

खरे म्हणजे ख्रिस्ती झालेल्या काही माणसांना जरुरी पुरते ख्रिस्तीधर्माचे व आचारविचारांचे शिक्षण देऊन आपले साहाय्यक बनवावे या हेतूने इ. स. १५४१ साली "कुलेजियु द सां पावल" नावाची एक पाठशाळा स्थापन केली होती. फ्रान्सिस झेविअर याला या पाठशाळेचे संचालक केले होते. या पाठशाळेमुळे निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांच्या ज्ञानाचा फायदा धर्मगुरूंना धर्मप्रसारासाठी घेता येणार होता.

"ह्या शाळेत कॅथलिक बनलेल्या गोमंतकीयांकडून काही युरोपियन पाद्री भाषा शिकत असत असे म्हणायला आधार मिळतो. इ. स. १५५३ पासून एक गोवेकेर स्वतः देवज्ञान (थिऑलाजी) या विषयाचा विद्यार्थी असून, तोच भाषा (महाराष्ट्र भाषा) शिकविण्याचे काम करीत असे."[4]

तसे पाहिले तर इ. स. १५६७ ते १५७५ युरोपियन धर्मगुरूंनी स्थानिक भाषा आत्मसात करण्याचे फारसे प्रयत्न केलेले दिसत नाहीत. या दृष्टीने पुढील प्रयत्न लक्षांत घेण्यासारखा आहे.

"इ. स. १५७५ त भरलेल्या प्रादेशिक पंथ परिषदेत पाद्रींनी भाषाज्ञान मिळवावे, यावर फिरून जोर देण्यात आला. आलेशांद्रि व्हालिग्नानु या जेसुईट संप्रदायाच्या पर्यवेक्षक पाद्रीने (पाद्री व्हिजितादोर) आपल्या अंमलाखाली असलेल्या पाद्रींना १५७६साली हुकूम दिला होता, की त्यांनी आपली सारी अन्य कामे बाजूला ठेवून फक्त भाषेच्या अभ्यासास लागावे. त्या आदेशानुसार नीतिशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या ज्या आठ पाद्रींनी भाषाभ्यासाच्या कार्याला स्वतःस वाहून घेतले होते,

त्यांनी देशी लिपी व भाषा लिहावयास व वाचावयास शिकावी, ठराविक वेळी खुद्द गोमंतकीयांशी संवाद व विचारविनिमय करावा, अशा आज्ञा त्यांस देऊन सेमिनारीच्या मुख्याध्यापकाने आपल्या वरिष्ठांच्या हुकुमाचा पुरस्कार केला होता."[५]

इ. स. १६०६ पर्यंत तरी प्रादेशिक भाषाज्ञान मिळविण्याच्या बाबतींत गोव्यातील ख्रिस्ती धर्मगुरूंनी फारशी प्रगती केली होती असे दिसत नाही, उलट, "पोर्तुगालहून आलेल्या पाद्रींचे लक्ष ऐहिक संपत्तीकडे अधिक होते. जेसुइट संघटनेच्या द्वारा काही अन्य देशांतील पाद्री हिंदुस्थानात आले होते. त्यांना मात्र ऐहिक विषयाबरोबरच पंथप्रचार हवा होता. त्यांपैकी थॉमस स्टीफन्स हा इंग्रज होता. एतियां द क्रूवा फरान्सहून आलेला होता आणि साल्दान्ज अर्धा इताली होता. "त्या तिघांनी महाराष्ट्रींत ग्रंथ निर्मिती केलेली आज आपणांस वाचावयास मिळते. काही समाधानकारक भाषाज्ञान त्यांनी संपादन केले होते असे आज म्हणता येते."

त्या दृष्टीने सध्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार पहिला ख्रिस्ती मराठी लेखक म्हणून फादर टॉमस स्टीफन्स याचाच उल्लेख करावा लागतो. त्याच्यापासून ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा एक प्रवाह मराठी वाङ्मयाच्या इतिहासात नव्याने सामील होताना दिसतो. मराठी वाङ्मय क्षेत्रात एक नवीन धर्मश्रद्धा आपली अभिव्यक्ती अनेक अंगांनी करण्यासाठी प्रयत्नशील होताना दिसते. धार्मिक श्रद्धेच्या अभिव्यक्तीसाठी ख्रिस्ती मराठी लेखकांना कोणत्या वाटावळणांनी जावे लागले ते बघण्याचा प्रयत्न पहिल्या प्रकरणात केला आहे.

उपासना वाङ्मय

कोणताही धर्मप्रसार करीत असताना त्या धर्माचे तात्त्विक, ऐतिहासिक वाङ्मय जसे आवश्यक असते तसेच दैनंदिन उपासना वा भक्ती करण्यासाठी उपासना–वाङ्मय आवश्यक असते. यात भक्तिभावाने भरलेली स्फुटे गीते असतात तशी दीर्घरचनाही असते. उपासना कशा पद्धतीने व का करावी यासंबंधीही ख्रिस्ती मराठी लेखकांनी लिहिलेले आढळते. महाराष्ट्रातील ख्रिस्ती मंडळी–महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायातून आपले पूर्वसंस्कार घेऊन आलेली आहे. प्रारंभीच्या काळात ती पाश्चिमात्य भक्तिगीतांचे भाषांतर, पाश्चिमात्य गीतांच्या चालीवर उपासना संगीत गाताना दिसते, पण जसजसे एतद्देशीय ख्रिस्ती मराठी लेखक कवी आपली गीतरचना करू लागले तसतसे त्याच्या उपासना वाङ्मयाचे रूप कसे बदलत गेले ते आपण दुसऱ्या प्रकरणात बघणार आहोत.

धर्मप्रसाराचा इतिहास

महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्माचे आगमन पश्चिमेकडून झाले. महाराष्ट्रात धर्म रुजविण्यासाठी आणि प्रसारासाठी धर्माच्या कार्याची परंपरा, अनेक विचारांची

देवाण-घेवाण, कळण्याच्या दृष्टीने प्रसारकांना व धर्मानुयायांना अशा माहितीची आवश्यकता होती. त्या दृष्टीने ख्रिस्ती धर्मगुरूंनी आणि प्रसारकांनी मराठीत ग्रंथ-लेखन करण्यास सुरुवात केली. अर्थात् बरेचसे लेखन बायबल, बायबलचा इतिहास यासंबंधी होते व आहे. तसेच ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी ठिकठिकाणी ज्या संस्था वा मंडळे निर्माण झाली होती त्यांच्या कार्याचा आढावा घेणारे ग्रंथही लिहिले गेले.

महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्माने वाटचाल कशी केली व ती वाटचाल करताना त्या वाटचालीमागे कोणता इतिहास व परंपरा होत्या ते समजून घेण्याच्या दृष्टीने हे लेखन उपयुक्त आहे. तिसऱ्या प्रकरणात हा विचार केला आहे.

ख्रिस्ती मराठी लेखकांची संतचरित्रे

धर्मसाधनेस वा धर्मप्रचारास मूळ धर्मग्रंथ, उपासनागीते आवश्यक असतात, तसेच लोकांच्या समोर अनेक प्रसंगी काही चरित्रांचे आदर्श उभे करावे लागतात. संतांच्या चरित्रांचे अनुकरण केले किंवा त्यांनी निर्माण केलेले आदर्श आपल्या जीवनात आणण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तरी धर्मसाधनेच्या दृष्टीने ते महत्त्वाचे कार्य ठरते. ख्रिस्ती धर्मातील प्राचीन व अर्वाचीन संतांची चरित्रे, ख्रिस्ती मराठी लेखकांनी वारंवार रचलेली दिसतात. जगाच्या पाठीवर जिथे जिथे ख्रिश्चन धर्म आहे, तिथल्या संतांचे, धर्मप्रसारकाची चरित्रे कधी भाषांतर करून तर कधी स्वतंत्र-पणे लिहिलेलीही दिसतात. हिंदूंच्या संतचरित्रांप्रमाणे ख्रिस्तीधर्माच्या संतचरित्रांत अद्भुत, अलौकिक भाग येतो हे लक्षात घ्यावे लागले. नवख्रिश्चनांना अशा प्रकारच्या चरित्रांचा पूर्वीपासून परिचय होता. नवख्रिश्चनांच्या धार्मिक गरजा भागविण्यासाठी अशा प्रकारच्या वाङ्मयाची गरज होती आणि त्या गरजेतून हे वाङ्मय निर्माण झालेले आहे. त्यासंबंधी माहिती चवथ्या प्रकरणात आली आहे. पाचव्या प्रकरणात बायबलच्या मराठी भाषांतरांची माहिती आली आहे.

सामाजिक सुधारणाविषयक वाङ्मय

ख्रिस्ती धर्माचा प्रसार करीत असताना, महाराष्ट्रातील लोकांत काही सामाजिक सुधारणा व्हाव्यात, ते साक्षर व्हावेत, त्यांना आरोग्याच्या कल्पना समजून सांगाव्यात, धार्मिक समजुतीतील अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, बालविवाह, विवाहातील रूढी व त्यातील दोष नाहीसे व्हावेत, कुटुंबे सुधारावीत, दारूचे व्यसन वाईट कसे हे समजून सांगावे या हेतूने ख्रिस्ती लेखकांनी सुधारणाविषयक वाङ्मय लहिलेले आहे.

बाबा पद्मनजी, पंडिता रमाबाई यांनी पूर्वजीवनांत हिंदू धर्मातील दुःखे सिहन केली त्यातून लिखाण होताना दिसते. ख्रिस्ती धर्माचे माहात्म्य प्रामुख्याने सांगायचे आहे हा हेतू कुठे लपत नाही. पण एकण मराठी माणसाला, ख्रिश्चन

गृहीत धरूनही कोणत्या सुधारणा आवश्यक होत्या, त्याचे चित्र या लिखाणातून आपल्या लक्षात येईल. महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजाला सुधारण्याच्या हेतूने लिहिलेले हे लिखाण एकूण महाराष्ट्राच्या सुधारणांसंबंधी बरेच काही सांगून जाते ते सहाव्या प्रकरणावरून कळेल.

ख्रिस्ती मराठी नियतकालिकांनी वाङ्मयाच्या सर्व प्रकारांना स्पर्श करून मराठी वाङ्मयप्रवाह समृद्ध करण्यास कसा हातभार लावला त्याचा आढावा प्रकरण सातमध्ये घेतला आहे.

भाषिक वाङ्मय क्रमिकपुस्तके

प्रारंभीच्या काळात पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी धार्मिक व सांस्कृतिक बाबतीत स्थानिक लोकांशी सहिष्णुवृत्ती दाखविली होती. पण कालांतराने आपले बस्तान बसल्यावर धार्मिक बाबतीत ते जबरदस्ती करू लागले. ख्रिस्तीधर्म जबरदस्तीने लादला जात होता. तरी नवख्रिश्चनांना त्यांची पूर्वीची हिंदू पुराणांच्या धर्तीची ख्रिश्चन पुराणे हवी होतीच. फादर स्टीफन्सने त्या मागणीला ख्रिस्तपुराण लिहून चांगलाच प्रतिसाद दिला.

राज्य कारभारासाठी व धर्मप्रसारासाठी स्थानिक भाषेचा अभ्यास मिशनरी लोकांनी व प्रसारक मंडळींनी करावा म्हणून राज्यकर्त्यांकडून व पंथाधिकाऱ्यांकडून हुकूम निघाले. इ. स. १५६०, १५७५, १५८५, १५९२ व शेवटी इ. स. १६०६ गोव्यात भरलेल्या प्रत्येक प्रादेशिक पंथाधिकाऱ्यांच्या परिषदेत ठराव करण्यात आले. धर्मगुरूंच्या नेमणूकप्रसंगी देशी भाषांच्या परीक्षा घेण्यासंबंधाने नियम अधिकाधिक कडक करण्यात आले.

तरी सुद्धा बहुसंख्य युरोपी प्रचारकांमध्ये भाषाशिक्षणाचे प्रेम दिसून येत नव्हते. काही देवळांतून (आफ्रिकी) गुलामांच्या द्वारा पातकांची कबुली ऐकण्याचा विधी पार पाडण्यात येत असे. त्यामुळे जनतेत खळबळ उत्पन्न होई. काही व्हाईसराय पोर्तुगालहून राजाज्ञा आणवून भाषाज्ञान नसलेल्या धर्मगुरूंवर दडपण आणण्याचा प्रयत्न करीत. पण पंथाधिकाऱ्यांच्या दराऱ्यामुळे त्यांना तात्पुरते यश येई. इ. स. १६४० त धर्मगुरूंनी लोकबोली तरी शिकावी यासाठी दियोगु रिबैरू याने पोर्तुगाली भाषेत छापून प्रसिद्ध केलेल्या व्याकरण, पुस्तकांची किंवा फादर स्टीफन्स आदींनी मराठी भाषेत केलेल्या व्याकरण, कोश, भाषाविषयक कामगिरीची ही पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते. ह्यासंबंधीची माहिती प्रकरण आठ व नऊमध्ये आली आहे.

ललितसाहित्य

ख्रिस्ती मराठी वाङ्मयाची निर्मिती प्रामुख्याने धर्मप्रसारासाठी झालेली

आहे. येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा, आचाराचा संदेश लोकभाषेतून झाला तर तो अधिकच प्रभावी व परिणामकारक ठरतो. हे धर्मप्रसारकांनी व स्थानिक ख्रिस्ती मिशनऱ्यांनीही जाणले होते. सर्वसामान्यांच्या भाषेत धर्मविचार वा तत्त्वविचार सांगितले नाहीत तर सर्वसामान्य जनता 'नागवते' हे महानुभाव आचार्य नागदेवाचार्य सांगतो – तसेच ज्ञानेश्वर, एकनाथ 'मऱ्हाठी' बोलीचे सामर्थ्य व महत्त्व जाणतात. फादर स्टीफन्सकडे, आपणाला हिंदू लोक वाचतात तशी पुराणे रचून, तुम्ही आमची जुनी पूर्व धर्मातील पुराणे वाचण्याची गरज भागवावी, अशी ख्रिश्चन झालेल्या लोकांनी मागणी केली, तेव्हा ख्रिस्तपुराण लिहिले गेले. ख्रिस्ती मराठी वाङ्मयाची निर्मिती प्रामुख्याने पुढील तीन कारणांनी होताना दिसते. (१) ख्रिस्ती धर्मतत्त्व धर्मविचार, स्थानिक लोकांना सहज कळावा म्हणून त्यांच्या बोलभाषेत– मराठीत लिहिले जाते. (२) लोकांनी ख्रिस्तीधर्मतत्त्वे मराठी भाषेत मिळावी हणून मागणी केल्यामुळे. (३) शास्त्रादी विषयांचे ज्ञान स्थानिक लोकांना व्हावे. म्हणून मराठींत लिहिले जाते.

अर्थात साहित्यनिर्मितीचे प्रमुख प्रयोजन ख्रिस्ती मराठी लेखकांच्या समोर नाही. मराठीत लिहिणाऱ्या मध्ययुगीन संत कवींनाही हे प्रयोजन अभिप्रेत नाही 'ज्ञानेश्वर' परतत्त्वस्पर्श हा साहित्याचा अंतिम हेतू मानतात तर पंडित कवी 'काही तरी तरावया गावे' असा भाबडा अध्यात्मभाव सांगतात, असे फार तर म्हणता येईल. धार्मिक प्रेरणेने जीवन जगणे आज कुणाला गैर वाटेल. हा ज्याच्या त्याच्या वाटण्याचा भाग आहे. पण धर्मावर श्रद्धा ठेवून जगणारी माणसे असतात ही वस्तुस्थिती आहे. त्यासंबंधी चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे.

ख्रिस्तीमराठी वाङ्मयनिर्मितीला – एकूण मराठी वाङ्मयनिर्मितीला छापखान्याच्या आगमनामुळे मोठी गती मिळाली. इंग्रजी सत्तेमुळे आणि सार्वत्रिक शिक्षणाच्या योजनेमुळे शिक्षणाचा प्रसार व्हायला लागला. वाचकांचे क्षेत्र वाढले. शैक्षणिक, सार्वजनिक संस्थांमुळे पुस्तकांच्या वाचनाची व्याप्ती वाढली आणि त्यामुळे वाङ्मयनिर्मितीला व्यापक बाजारपेठ उपलब्ध झाली. समाजाच्या जाणिवांची क्षेत्रे अधिक विकास पावू लागली, त्यामुळे केवळ धार्मिक विषय, तत्त्वज्ञान यावरच लिहिले व छापले न जाता भूगोल, इतिहास, गणित, भूमिती, वैद्यक ज्योतिषशास्त्र आदी विविध विषयांवर ग्रंथ निर्मिती होऊ लागली हे लक्षात घ्यावे लागते.

या दृष्टीने महाराष्ट्रांत मिशन प्रेसची स्थापना इ. स. १८१६ च्या अखेरीस झाली. त्यावेळेस मुंबईमध्ये पवित्र पुस्तके, निबंध, शालेय पुस्तके वगैरे काहीच छापण्याची सोय नव्हती. तशी तर भारतातही नव्हती. मिशनरी लोकांच्या धर्मप्रसाराच्या कामकाजास साहाय्य म्हणून छपाईची सोय होणे ही त्याकाळची गरज होती. मिशनऱ्यांच्या दृष्टीने मिशनरी कार्याच्या उपयुक्त मजकुराची छपाई होणे

एवढेच त्यांचे उद्दिष्ट होते. त्या मर्यादित उद्दिष्टांसाठी मिशन प्रेस सुरू केला. त्या प्रेसला प्रारंभी इंग्रजी विभाग नव्हता कारण त्यांच्या विशिष्ट हेतूसाठी इंग्रजी विभागाची आवश्यकता नव्हती. मग पुढे हळूहळू प्रेसचा कार्यभार वाढत गेला.

इ. स. १८१६ च्या नोव्हेंबर मध्ये रे. होरॅशिओ बॉर्डवेल भारतात आला, त्याच्या बरोबर छपाई व्यवस्थेची सामग्री आली. स्वतः रे. बॉर्डवेल यांस छपाईकला अवगत होती. तो मराठी मुळाक्षरे शिकला व इ. स. १८१७ मध्ये पवित्रशास्त्रावरील आठ पानी पुस्तिका छापली. इ. स. १८२० पर्यंत प्रेसचे सर्वकाम रे. बॉर्डवेल पाहत होता. त्यानंतर ते काम रे. न्यूवेलने पाहिले. इ. स. १८११ च्या मे महिन्यानंतर छपाई कामगार भारतात आणविले.

इ. स. १८५६ पर्यंत मिशन प्रेसचे काम पाहणारांत रे. बॉर्डवेल, रे. सॅम्युअल न्यूवेल, जेम्स गॅरेट, सी, स्टोन, डब्ल्यू. सी. सॅम्पसन्, ई. ए. वेबस्टर, डी. ओ. अॅलन, एस्. वी. फेअरबँक, रे. हेजन हे होते.

मिशन प्रेसमध्ये प्रथम मराठीत छपाई व्हायची पण हळूहळू इंग्रजी, गुजराथी, हिंदुस्थानी, इत्यादी भाषांमधील छपाईची सोय करण्यात आली. प्रारंभी शिला प्रेसच्या साहाय्याने छपाई होत होती. पुढे प्रिंटिंग प्रेस सुरू झाला. निरनिराळे टाईप वापरण्यात येऊ लागले, छापखान्यास भरपूर काम मिळू लागले व त्यामुळे आर्थिक नफा मिळू लागला.

मिशन प्रेसची अशा प्रकारे वाढ झाली असूनही पुढे मिशन प्रेस बंद करण्यात आला. कारण एकतर मिशनचा प्रेस असल्यामुळे मिशनरी कार्यभार वाढू लागला. लोकांना शिकविणे, सेवा करणे वगैरे मिशनरी कार्याबरोबर प्रेसचे काम-काजही मिशनरी कार्यक्षेत्रांत अंतर्भूत होऊ लागल्याने मिशनऱ्यांच्या खऱ्या जनसेवा, लोकशिक्षण या प्रकारच्या कामकाजाचा अधिक व्याप वाढला व त्रास होऊ लागला. शिवाय मुंबईमध्ये इतरही अनेक छापखाने निघाले–चालले व वाढले. अशा परि-स्थितीमुळे इ. स. १८५५ साली प्रथम इंग्रजी व इतर भाग बंद करण्यात आला व नंतर तीन वर्षांनी मिशन प्रेसचा मूळ मराठी भागही बंद झाला व सर्व मिशन प्रेस विकण्यात आला.

प्रारंभीच्या काळात येथे कार्य करणाऱ्या मिशनऱ्यांच्या समोर पुष्कळ प्रकारचे व पुष्कळ प्रमाणात कार्य होते. येथे करण्यास आवश्यक ठरणाऱ्या कार्यांपैकी व्यक्ति-गत श्रमाने होणारे शक्य असे कार्य मिशनऱ्यांनी सुरू केले. स्थानिक लोकांना आवश्यक अशा वाङ्मयीन कार्यास हात घालणे मात्र त्यांना लवकर शक्य झाले नाही. त्यासाठी बराच काळ लोटावा लागला, काळाच्या गरजेनुसार वाङ्मया निर्माण होणे आवश्यक होते. कालमानानुसार मराठी वाङ्मयनिर्मितीची निकड जाणवली ती देशी भाषेतून लोकांना पवित्र शास्त्र उपलब्ध करून देण्यासाठी त्या गरजेतून बायबलची भाषांतरे करण्याचे काम सुरू झाले.

तसेच लोकशिक्षणास पोषक म्हणून उपदेशाचे वेळी काही पुस्तिका (Tract)s लोकांसमोर ठेवणे आवश्यक वाटले. त्यानुसार गॉर्डन हॉल यांनी इ. स. १८१५ मध्ये पवित्रशास्त्रावरील पुस्तिका (Tracts) तयार केल्या. अशा प्रकारे पवित्र-शास्त्रावरील पहिली पुस्तिका मराठी भाषेत तयार झाली. यावेळेपर्यंत मिशन प्रेसची स्थापना नसल्याने गॉर्डन हॉलची पहिली मराठी पुस्तिका हाताने लिहून प्रती तयार करून, सिद्ध झाली, छापील प्रती, प्रथम इ. स. १८१७ च्या मार्च महिन्याच्या १० तारखेला तयार झाल्या. त्याच्या १५०० प्रती काढल्या होत्या.

महाराष्ट्रातील मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा हा प्रारंभ म्हणता येईल. त्यानंतर अनेक वर्षांच्या कालावधीत अशा प्रकारचे काळाच्या गरजेनुसार मराठी ख्रिस्ती वाङ्मय वृद्धिंगत होत गेले. ख्रिस्ती धर्माच्या या परिसरातील वाढत्या प्रसारामुळे नवख्रिस्ती लोकांच्या वाङ्मयीन गरजा वाढत गेल्या त्यानुसार अनेक अंगांनी मराठी ख्रिस्ती वाङ्मयाच्या कक्षा विस्तारत गेल्या.

संदर्भ—

१. प्रभु भेंब्रे, लक्ष्मीकांत व्यंकटेश, "**पुर्तुगाली राजवटीपूर्वीचे गोव्यातील धार्मिक वाङ्मय**", प्रका. गोमंतक मराठी भाषा परिषद, मुद्रकः- प्रदीप प्रेस, पोर्ताईश, पणजी गोवा, इ. स. १९७९, पृ. ७ (प्रस्तावना).

२. उनि. पृ. ७ ३. उनि. पृ. ७ ४. उ. नि. पृ. ८

५ उनि. पृ. ८ ६. उनि. पृ. ९.

प्रकरण १ ले

ख्रिस्ती मराठी धार्मिक वाङ्मय

फादर स्टीफन्सची मराठी धार्मिक रचना

इ. स. १५८५ मध्ये ख्रिस्ती धर्माची माहिती देणारा एक सारग्रंथ देशी भाषेत भाषांतरित करावा, असा ठराव तिसऱ्या गोवन कौन्सिलने केलेला होता. बहुधा त्याला अनुसरून फादर स्टीफन्सने आपले दोत्रिन क्रिस्तां (Doutrina-crista) हे पुस्तक लिहिले असावे. दोत्रिन क्रिस्ताचे मराठी भाषांतर 'ख्रिस्तीधम तत्त्व' असे करता येईल. हे ८६ पानांचे ख्रिस्ती धर्मतत्त्वाचे प्रश्नोत्तर रूपाने विवेचन करणारे पुस्तक प्रथम रायतूरच्या जेसुईट कॉलेजमध्ये इ. स. १६२२ मध्ये छापण्यात आले. हे गोमंतक बोलीत आहे. याची एक प्रत लिस्बनच्या सरकारी ग्रंथालयात आहे. याविषयी फादर फरान्सिस सौझ अशी माहिती देतो: "प्रथम १५६७ साली मुद्रित झालेले सेंट झेविअरचे दौत्रिन प्रचारात होते. पण पाद्री मार्कुस जॉर्ज यांच्या दोत्रिनाचे फादर स्टीफन्सने एतद्देशीयांच्या भाषेत केलेले भाषांतर गोव्यातील देशी भाषेचा उपयोग करणाऱ्या सर्व प्रार्थना मंदिरातून प्रचारात आले. या पुस्तकाची यथामूळ आवृत्ती लिस्बन विश्वविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. मारिआनु सालढाणा यांनी इ. स. १९५५ साली प्रसिद्ध केली आहे. यासंबंधी विशेष माहिती प्रा. प्रियोळकरांच्या 'इंडिका' मधील लेखात मिळते.

ख्रिस्तपुराण

या ग्रंथाचे खरे मूळ नाव (Discurso Sobre a vinda De Jesus Christo nosso salvador do Mundo) असे आहे. याचे पहिले पुराण आणि दुसरे पुराण असे दोन भाग असून त्यांची ओवी संख्या अनुक्रमे ४१८१ व ६७८१ अशी आहे. विस्ताराच्या दृष्टीने विचार केल्यास हा ग्रंथ १०९६२ ओव्यांचा आहे, म्हणजे ज्ञानेश्वरीहूनही मोठा आहे. याच्या आजवर पाच संपूर्ण आवृत्त्या निघाल्या आहेत. पहिली इ. स. १६१६ मध्ये फादर स्टीफन्सच्या हयातींत रायतूरला प्रसिद्ध झाली. दुसरी इ. स. १६४९ मध्ये रायतूरलाच व तिसरी इ. स. १६५४ मध्ये गोव्याला निघाली. या पहिल्या तीन आवृत्त्यांची नावे व परवाने प्रो. सालढाणांनी हस्तलिखितावरून तयार केलेल्या इ. स. १९०७ च्या आवृत्तीत

पाहावयास सापडतात. इ. स. १६५४ नंतर या लोकादरास पात्र झालेल्या ग्रंथाची मुद्रित आवृत्ती निघण्याचे कारण म्हणजे इ. स. १६८४ मध्ये निघालेला देशी भाषांना बंदी घालणारा सरकारी हुकूम हे होय. या पहिल्या तिनही आवृत्त्यांपैकी एकही प्रत उपलब्ध नाही. इ. स. १९०७ साली प्रा. जोसेफ एल्. सालढाणा यांनी मंगळूर येथे नवी चवथी प्रत तयार केली होती.† निरनिराळया हस्तलिखितांची सालढानांच्या प्रतीशी तुलना करतांना सालढाणा याची प्रत विश्वसनीय वाटते. पूर्वीच्या तीन व सालढाणा संपादित आवृत्ती अशा या चारही आवृत्या रोमन लिपीत होत्या. इ. स. १९५६ साली पुराणाची पाचवी आवृत्ती प्रा. शांताराम बंडेलू यांनी पुणे येथे नागरी लिपीत प्रसिद्ध केली.†

मंगळूर आवृत्ती तयार करताना संपादकांना निरनिराळया आवृत्तीच्या प्रती मिळाल्या होत्या असे दिसत नाही. धर्मसभेच्या संमतीने फारकोल गोम्स द फारिया याने २४५ ओव्यांची भर पुराणाच्या दुसऱ्या भागात अवस्वर ४५ ते ५१ पर्यंत घातली. हस्तलिखित प्रतीत या क्षेपक ओव्या आढळतात. पण जमविलेल्या प्रतींपैकी एकाही प्रतीत या ओव्यांचा मागमूस लागत नाही, असे प्रस्तावनेत संपादक म्हणतात. पहिल्या आवृत्तीतील पाठ आणि नंतरच्या क्षेपक ओव्या मंगळूर आवृत्तीत आढळत नाहीत. यावरून संपादकांना बहुधा दुसऱ्या आवृत्तीचीच हस्तलिखिते मिळाली होती असे दिसते. या संदर्भात, संपादकांना किती हस्तलिखिते मिळाली, कोठे मिळाली, त्यांचे स्वरूप काय होते, पाठभेद कोणते आढळले, पाठ स्वीकारतांना कोणते निकर्ष लावले, संहिता सिद्ध करताना कोणत्या हस्तलिखिताचा प्रामुख्याने उपयोग केला. कोणती प्रत आधाराला घेतली ही माहिती संपादकांनी दिलेली नाही.

संपादक सालढाणा यांना जुन्या मराठीची ओळख होती असे दिसत नाही. आजकालचे उच्चार प्रमाण मानून ख्रिस्तपुराणातील वर्णांच्या उच्चाराचे नियम संपादकांनी प्रस्तावनेत दिले आहेत.

† ख्रिस्त पुराणाची मंगळूर आवृत्ती संपादक सालढाणा यांनी हस्तलिखित प्रतीवरून सिद्ध केली आहे. हस्तलिखितांची हुबेहूब नक्कल (Reprodudced from MMS Copies) असे आपल्या आवृत्तीचे वर्णन त्यांनी केले आहे. परंतु ती आवृत्ती यथामूल आणि पाठशुद्ध नाही. पुराण लिहिताना निर्मात्याचा प्रयत्न हिंदू पुराणाचे तंतोतंत अनुकरण करण्याचा होता. त्यानुसारच ख्रिस्तपुराणांच्या भागांना आदिपुराण, देवकथा, महापुराण, ख्रिस्तस्वामियांची कथा अशी नावे त्यांवे त्याने दिली. पुराणाच्या अवस्वरांच्या अंती इतिस्री आदि पुराणे देवचरित्र कथा अंतीचा अवस्वरू, शुभंभवतु, इतिस्त महापुराणे, ख्रिस्तस्वामियांची कथा, प्रथमोध्याय शुभंभवतु, असे अवस्वर व पुराण समाप्तिदर्शक संकल्प त्याने घातले. सध्या उपलब्ध असलेल्या प्रतीत हा मजकूर आढळतो. मंगळूर आवृत्तीच्या संपादकांनी तो सर्वत्र गाळला आहे.

ख्रिस्त पुराणाच्या निरनिराळ्या आवृत्तीच्या १६ प्रतींची माहिती आपणास असल्याचे लेखक सांगतो. त्यांतील त्यांनी प्रत्यक्ष अकरा प्रती पाहिल्याचे लेखक सांगतो. त्यातील सहा प्रती गोव्यात, तीन मुंबई इथे, तीन मंगळूर इथे, आणि चार भारताबाहेर पैकी १२ रोमन लिपीत, तीन देवनागरी व एक कानडी लिपीत लिहिलेल्या आढळल्या. काही पहिल्या आवृत्तीच्या, काही दुसऱ्या आवृत्तीच्या व काही सचित्र तिसऱ्या आवृत्तीच्या आहेत.

कुलकर्णी भा. म. **ख्रिस्तपुराणाच्या पाठशुद्ध आवृत्तीची आवश्यकता व शक्यता.**, मराठी संशोधन पत्रिका वर्ष २३, अंक २, जाने.-फेब्रु.-मार्च १९७६ पृ. ६५-६९. *

फादर स्टीफन्सने 'दोत्रीन क्रिस्ता' लिहिले. धर्ममंदिरात दर रविवारी त्याचे पठण होऊ लागले पण त्याने नवख्रिस्ती लोकांचे समाधान झालेले दिसत नाही. फादर स्टीफन्सने ख्रिस्त पुराणाच्या पहिल्या अवस्वरात, तुम्ही मराठी पुराण रचनेची मागणी करविली आहे. आमची पूर्वीची हिंदुधर्मांतील पुराणे बंद केलीत, पण त्यांना प्रतिपुस्तके (substitutes) तयार केली नाहीत. त्यामुळे नवख्रिस्ती लोकांना जुन्या कथा आठवतात, तुम्ही मराठी भाषेची काही भक्तिरसपूर्ण प्रतिपुस्तके द्याल तर आमचा मनोरथ पूर्ण होईल. हे सांगताना ख्रिस्तपुराणकार लिहितो :-

हे निवारावेया कारणे: फ्रिंगियांचा देसी हाती पुराणे:
ती वाचोनिया तेथिल जनु: क्रमविती वेळ: वाचोनि मनी घेती उलासु:
निते सेविती कथारसु:
पण ते देसिचे भासेसि अभ्यासु: नाहीं आमां:
जैसे तेआं तेआं दिपावती: देसपरिची पुराणे हाती:
तैसी पुस्तके कां न मेलती: आमचा देसी:
हा मोटा अभिप्रायो जि म्हणे: तुमी तरि वारिली मागिली पुराणे:
तरि प्रतिपुस्तके आमांकारणे: कैसी न करितां तुमी:
या पासोनियां जि आतां: जेतियांचे पुराण कथा:
नवेआ क्रिस्तावांचे आ चित्ता: आठवती देखा
जरि मराठिये भाषेची काहीं: शास्त्र पुराणे होती आमा ठाई:
तरि लोकांचा मनोरथु पई पुर्न होता. ख्रिस्तपुराण १:१:१४०-४५

---

* स्टीफनचे पुराण तर एका बाटलेल्या पूर्व हिंदू गोमंतकीयाने रचिले असावे अशी कल्पना करावयास जागा आहे. ते पुराण प्रथम स्टीफनने पुर्तगाली भाषेत लिहिले होते व नंतर त्याचे महाराष्ट्र भाषेत परिवर्तन करण्यात आले होते अशी माहिती मिळते. (गोव्यातील धार्मिक वाङ्मय, भेंब्रे पृ. ५)

नवख्रिस्ती ब्राह्मणाच्या मागणीला पाद्री निवेदक उत्तर देतो.
जे आमी केले नाही आवेनिजोरि : ते देवो सिधी नेईल फुडारी :
भवता स्त्रुतेया जिविची उदीः पुरविल स्वामी.

खिस्तपुराण १:१.१४९

फादर स्टीफन्सने आपल्या या ग्रंथाच्या गद्य प्रस्तावनेत आपली भूमिका मांडताना म्हटले आहे. " आणि जे कवण येकादे वेळां पुर्विलेआं कवित्वांचा स्त्रृंगारू वा वरली भास अद्यापी आठवताती ते हे कवित्व वाचुनु संतोसु मानिती आणी फावे तो फळु भोगिती, कां मांगिलेआं कवित्वांचे आस्थानी आणि एक कवित्व देतो. "

पोर्तुगीज सत्ता स्थिर होऊनही पोर्तुगीजांची भाषा स्थानिक लोक आत्मसात करू शकले नव्हते. लोकव्यवहाराची भाषा मराठी होती. गोव्यातील नव्याने ख्रिस्ती झालेल्या लोकांना हिंदु धर्माच्या जुन्या आठवणीतून बाहेर काढायचे असेल तर पर्यायी काही देणे आवश्यक होते. त्यासाठी मराठीत ग्रंथ रचना करणे, नव्या धर्म-प्रसाराच्या धोरणास धरून होते. जुलमी पोर्तुगीज सरकार आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्या छळामुळे बरेच लोक ख्रिस्ती धर्मात ओढले जात होते. पण खरेखुरे मानसिक परिवर्तन धार्मिक दृष्टया झालेलेच नव्हते. या संदर्भात गोव्याच्या वरिष्ठ न्याया-लयाचे माजी न्यायमूर्ती डॉ. अतिनियु नोरोंन्ज म्हणतात " इतक्या द्रुतगतीने आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडून आले, ही गोष्ट आता सर्वांस ज्ञात झाली आहे. काही नैतिक धैर्याच्या अभावामुळे, तर कित्येक जन्मभूमींचे प्रेम न सुटल्यामुळे, अनेक जमीन-जुमल्यांच्या आणि इस्टेटीच्या लोभामुळे, तर काही लठ्ठ पगाराच्या जागा मिळाल्यामुळे, ख्रिस्ती झाले होते. कोणीही खऱ्याखुऱ्या मतपरिवर्तनाने ख्रिस्ती झाला नव्हता. "

या दृष्टीने खिस्तपुराणांतर्गत ओव्या अधिक बोलक्या आहेत.
तेचि परी आमामांजि येकहाति : हिंदुवांचे देसी जे राहती :
ते वेगां न संडती : कुडी भजना :
परमशास्त्र आधरलेल्या उपरी : पुणती जेतियांचे रितुघरी :
करिताति निरांतरी : गुप्तपणे (१:१९:५२–५३)
तंव एक विप्रु म्हणे ते वुधिहिन : जैसे हे येनिल जनु :
जे उधराकारणे क्रिस्तांवपण : अंगिकारिती (२:३२:४९)
म्हणीपे येकेक लोकु जे हाती : ते एकादेआ विघ्ननिर्मिती :
ते निवारावेया क्रिस्ताव होती : येखे नव्हती सर्वथा (२:३६:९९)

एत्तद्देशीय लोकांच्या धार्मिक वृत्तीत बदल व्हावा, नवख्रिश्चनांची ख्रिस्ती धर्मावरील श्रद्धा वृद्धिंगत व्हावी म्हणून खिस्तपुराणासारखा हिंदूच्या ग्रंथरचनेच्या परंपरेशी साम्य असलेला, भक्तिकथारसयुक्त पुराण ग्रंथ फादर स्टीफन्सने रचला ही गोष्ट उघड आणि स्पष्ट आहे. आपल्या स्वतःच्या काव्याची मुद्रितप्रत पाहण्याचे

भाग्यही फादर स्टीफन्सला लाभले होते.

काव्याचा धार्मिक हेतू :

या काळात कवी पारमार्थिक कार्य म्हणून काव्यरचना करीत व श्रोते पारमार्थिक कार्य म्हणून ते श्रवण करीत. या हिंदु-मराठी ग्रंथांना 'प्रतिपुस्तक' म्हणून रचल्या गेलेल्या क्रिस्तपुराणामागे हीच दृष्टी आढळून आल्यास त्यांत नवल वाटण्याचे कारण नाही. क्रिस्तपुराणांतील श्रोतृविनंती, कथा प्रशस्ती, फलश्रुती इत्यादी मधून हीच दृष्टी ठायी ठायी प्रकट झालेली दिसून येईल. क्रिस्तपुराणकार आपल्या 'ग्रंथाला' परमशास्त्र, शास्त्रसुमुर्ती, 'देवकथा,' देवग्रंथ, म्हणवितो. त्यांतील कथा पुण्यपावन, पुण्यपवित्र, परमपावन, निर्मल, अतिनितळ, कपट नसलेली अशी आहे व तिच्या पठणाने वाचक पुण्यशील होईल, त्याचा महापातकाचा 'खता' फिटेल, त्याच्या अविद्येचा नाश होईल, त्याचे अकर्मबंधन सुटेल, यमबंधन तुटेल, त्याला अंती गती मिळेल, मुक्तिपद मिळेल, वैकुंठस्थान प्राप्त होईल असे त्याचे आश्वासन आहे. ही कथा कथन करणाऱ्या जिव्हेला अमृत चाखायला मिळेल, ऐकणाराची कर्णद्वारे मोकळी होतील. नयनकमळात वैकुंठतेज झळकेल आणि एकंदरीत वक्ता आणि श्रोता हे दोघेही पावन होऊन उद्धरतील, असा कवीचा निर्वाळा आहे. यावरून कवीचा पुराणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण भाविकपणाचा आहे हे स्पष्ट होते.

जुन्या हिंदू कवींची आख्यानपर कविता आणि खिस्तपुराण यांचा काव्यहेतू व्यापक अर्थाने धार्मिक असला तरी त्या दोहोंच्या तपशिलांत फरक आहे. ज्या परिस्थितीत खिस्तपुराण जन्म पावले त्या परिस्थितीतच त्याचे मूळ आहे. खिस्त-पुराणासमोर असलेले श्रोते नवखिस्ती होते, ते आपले पूर्वीचे हिंदू आचार-विचार आणि भजनपूजन संपूर्णतया विसरले नव्हते. त्यामुळे खिस्तपुराणाच्या कथा-निरूपणाला दुहेरी हेतू प्राप्त झाला आहे. खिस्ती धर्मतत्त्वांच्या मंडणाबरोबरच हिंदुधर्मतत्त्वांचे खंडण करण्याकडे त्याचा रोख आहे. खऱ्या देवाची ओळख पटविण्याबरोबरच खोट्या देवाचा निषेधही त्याला करावयाचा आहे. उपाख्यानांची हेतुकथने बारकाईने पाहिल्यास ही गोष्ट स्पष्ट होते. धर्मच्युत झाल्यास देव कशी कठोर शिक्षा करतो, हे श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचा पुराणकाराचा हेतू त्यांतून स्पष्टपणे दिसून येतो.

खिस्तपुराणामध्ये बायबलकथा जशी आहे तशीच्या तशी फादर स्टीफन्स सांगत नाही. बायबलातील ज्या घटनांनी वा प्रसंगानी नवखिश्चनांचा भक्तिभाव वाढीस लागेल असा कथाभाग तो विस्ताराने सांगताना दिसतो.

हा विस्तार करीत असताना त्या परिसरांतील लोकांच्या पूर्वीच्या धर्मकल्पना, संस्कार, रीतिरिवाज तो लक्षात घेतो. वास्तविक मेरीच्या बालपणाची कथा बायबल-

बाह्य कथा आहे. पण नव्याने ख्रिस्ती झालेल्या पूर्वीच्या हिंदू असलेल्या लोकांची देवताविषयक अभिरुची तो लक्षात घेतो आणि मेरी माता करुणवात्सल्याची मूर्ती असल्याचे तो आपल्या पुराणात चित्रित करतो.

याशिवाय बायबल आणि ख्रिस्तपुराण यांतील ठळक भेद थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील –

(१) पुराणाच्या प्रारंभीच देवदूतांच्या उत्पत्तीपासून त्यांच्या अधःपातापर्यंतची हकीकत सांगितली आहे. त्याचा उल्लेख बायबलातील उत्पत्तीमध्ये (१.५) एकदाच येतो, पण कवीने बायबलात निरनिराळ्या ठिकाणी आलेले त्यांच्या बद्दलचे लेख एकत्र करून एक संगतवार आख्यान रचिले आहे.

(२) दहा सिबिलीणी (भविष्यवादिनी) च्या कथेला (१.३६.१.८१) बायबलात आधार नाही. सिबिलिणींनी ख्रिस्तपूर्व २ ऱ्या शतकात आपली भविष्ये गीतरूपाने लिहिली होती, ती पुढे इ. स. दुसऱ्या व तिसऱ्या शतकात ख्रिस्ती लोकांनी उचलली व त्यांचा अंतर्भाव आपल्या धर्मात केला. ख्रिस्तागमनाचे भविष्य ज्यू लोकांहून अन्य अशा लोकांनीही वर्तविले होते, हे स्टीफन्सला दाखवायचे असल्याकारणाने त्याने सिबिलिणींच्या भविष्याची भर आपल्या पुराणात घातलेली दिसते.

(३) मेरीचे चरित्र स्टीफन्सने खूपच विस्ताराने रंगविले आहे. त्याला बायबलात आधार नाही. मेरीच्या बालपणाची कथा ही बायबलबाह्यकथा आहे. ख्रिस्तपुराणकाराने लोकाभिरुची ध्यानात घेऊन करुणवात्सल्याची मूर्तीच अशी मेरी आपल्या पुराणात चित्रित केलेली आहे.

बायबलप्रमाणेच ख्रिस्तपुराणाची विभागणी आहे.

पहिल्या पुराणात ज्यू लोकांचा इतिहास आहे, त्यात प्रामुख्याने आंदाव, नोहा, आब्राहांव, जाको, जोजे, मोशे, जोजुवे, सामएल, साऊल, दाविद, सालोमन, एलिए, एलिजाए, इजाय, दानिएल, प्रभृती महापुरुषांची चरित्रे आणि त्यांच्या चरित्रातील अनेकविध प्रसंग आहेत. ख्रिस्त पुराणातील आख्यानोपाख्यानांचे काव्य हेतू पाहिल्यास त्यातूनही ख्रिस्ताच्या आगमनाचे सूत्र गोविलेले असल्याचे आढळते. आख्यानांच्या प्रारंभी व अखेरीस अनेकदा ख्रिस्त नमने आलेली आहेत. ख्रिस्ताच्या आगमनाचे भविष्य तर ठिकठिकाणी वारंवार वर्तविलेले आहे. ख्रिस्तकार्याची स्तुती संक्षेपरूपाने अनेकदा आलेली आहे. दाविदासारखे सद्वर्तनी राजे म्हणजे "ख्रिस्तांचे रूपकार" म्हणून वर्णिले आहेत. महापुरुषांच्या मोठ्या कृत्यांचा प्रतिमात्मक अर्थ लावून त्यातून ख्रिस्ताशी संबंध जोडण्यात आला आहे. या जगात ख्रिस्त येण्यापूर्वीची अवस्था व तो या जगात येण्याची आवश्यकता काय व कशी आहे हे सांगण्यासाठी त्याची पराकाष्ठा आहे. ख्रिस्तागमनाविषयी श्रोत्यांची ही उत्कंठा वाढविण्याकडे कवीचे सतत लक्ष आहे. सारांश समग्र पहिले पुराण

दुसऱ्या पुराणाची म्हणजे खिस्त चरित्राची पार्श्वभूमी आहे.

दुसऱ्या पुराणात प्रत्यक्ष खिस्तचरित्र वर्णिलेले आहे. अवस्वर १–१७ खिस्ताचे बाल्य, अवस्वर १८–४४ खिस्ताची शिकवण, व त्याने केलेले चमत्कार, अवस्वर ४५–५१ खिस्ताच्या आत्मबलिदानाची पार्श्वभूमी व आत्मबलिदान आणि अवस्वर ५२–५९ खिस्ताचे पुनरुत्थान व स्वर्गारोहण अशी ह्या खिस्तचरित्राची चार खंडांत विभागणी आहे. कवीने ग्रंथाच्या प्रथमावृत्तीच्या परवान्यांत ह्या समग्र ग्रंथाचे वर्णन 'जगदुद्धारकाचे या लोकी आगमन झाले, त्याचा ग्रंथ' असे केलेले आहे. तसेच इतरत्र ' जेजुचरित्र ', 'खिस्तकथाशास्त्र', 'स्वामियाची सुमुर्ति' असेही उल्लेख त्याने केलेले आहेत. कवीने आपल्या ग्रंथाची केलेली ही वर्णने व्यापक अर्थाने बरोबर आहेत. पहिल्या भागात खिस्त कथाभाग नसला तरी तेथेही खिस्तागमनावरच कवीची दृष्टी सतत खिळलेली आहे.

खिस्तपुराणाची शैली

खिस्तपुराणकाराची शैली ज्ञानेश्वरांइतकी अर्थसघन आणि अतीव काव्यात्म खचितच नाही. मुक्तेश्वराइतकी ती बहुरूपी, नखरेल वा लवचिकही नाही, पण तिला प्रसन्नमधुरता आहे. स्वच्छ जळाचा ओघ खळ न पडता पुढे जावा, तशी ती पुढे जाते. कथेचा ओघ कोठेही कुंठित होत नाही. प्रसंगी रसालंकारांचा यथायोग्य आविष्कार आणि ओजप्रसाद माधुर्यादि गुणांचे दर्शन घडविण्यात ती कमी पडत नाही. आपले काव्य कवीने ' मघिमा ' लोकांना कळावे म्हणून लिहिले असल्यामुळे अर्थसुलभता गुण ह्या काव्यात सर्वच आहे.

काव्याचा काळ आणि त्याची भाषा

खिस्तपुराणकाराने आपल्या काव्याच्या उपसंहारात काव्याची भाषा आणि त्याचा रचनाकाळ ह्यांचा स्पष्ट निर्देश केलेला आहे. तो निर्देश असा–

जेजु स्वामी भक्तांचा कैवारी : जदीं जन्मु घेतला संसारी :
वरूसे सोळासेतें चौतर्दसवेरि : तैलांगोनि जाहली
तो संखु चालते वरूसीं : वसंत काळी वैसाखमासी :
देवग्रंथू मराठियेसि : अभंगु केला (२.५९.११९–१२०)

याचा अर्थ असा की खिस्तपुराण इ. स. १६१६ मध्ये प्रसिद्ध झाले असले तरी त्याची रचना स. १६१४ च्या वैशाख महिन्यात पूर्ण झाली होती. काव्याची भाषा ' मराठी ' आहे, हे प्रत्यक्ष कवीनेच निर्देशिले आहे. प्रस्तुत काव्य धर्मप्रसाराच्या हेतूने लिहिले गेले असल्यामुळे ते देशी भाषेत, गोमंतकाच्या ग्रंथभाषेत म्हणजेच मराठीत लिहिले जावे, हे अगदी साहजिकच होते. बहुतां जनाची फलसिधि होण्यास कथानिरूपण मराठी भाषेतून केले पाहिजे, याची रास्त जाणीव

कबीला होती (१-१-१२१) तसेच परमेश्वराच्या कथा कथन करण्याच्या दृष्टीने ह्या खंडातील अन्य भाषांपेक्षा मराठी ही अधिक समर्थ आहे, याविषयी त्याची खात्री पटलेली होती (गद्यप्रस्तावना) त्याने केलेल्या मराठीच्या स्तुतीमध्ये मराठी भाषा ' चोखाळ ', ' साजिरी ' आणि ' थोर मान ' असलेली आहे. कवीने ख्रिस्त-पुराणाची रचना अनिच्छेने किंवा केवळ गरज म्हणून मराठी भाषेतून केली असे नसून त्याचे तिच्यावरील प्रेम बावनकशी असल्यामुळे अगदी अंतरीच्या जिव्हाळ्याने त्यान आपल्या काव्यासाठी तिचा अंगीकार केलेला दिसतो.

फादर स्टीफन्सने ख्रिस्तपुराण लिहिले, आणि नव्याने ख्रिस्ती झालेल्या पूर्वीच्या हिंदू लोकांना धार्मिक श्रद्धा जोपासण्यासाठी जसे पुराणग्रंथ व धर्मग्रंथ लागत, तसा ख्रिस्तपुराण ग्रंथ लिहून आपला धर्मग्रंथ लिहिण्याचा हेतू सिद्धीस नेला. जुन्या पुराणग्रंथांना पर्यायी किंवा ' प्रतिपुस्तक ' म्हणून आपणाला तो ग्रंथ लिहायचा आहे याचे भान त्याला सातत्याने होते. त्यासाठी हिंदूंच्या ग्रंथांचा त्याने अभ्यास केला होता.

स्टीफन्स, क्रूवा, साल्दान्ज इत्यादिकांच्या पुस्तकांच्या वाचनाने सोळाव्या शतकात गोमंतक प्रांतात प्रचलित असलेल्या हिंदू पुराणाची भाषाशास्त्राच्या दृष्टीने काही माहिती आपणास मिळते. उदाहरणार्थ ओव्यांची घडण, उपमा-उत्प्रेक्षादि रूढ अलंकार, परमेश्वराला लावण्यात येणारी विशेषणे, आरंभीच्या लिहिण्याची पद्धती, भाषेविषयी व पुराणग्रंथांविषयी सामान्य लोकांत वसत असलेली आदराची व प्रेमाची भावना, शुद्ध संस्कृत रूपांचा अव्हेर करून सर्वसाधारण जनतेत रूढ झालेल्या प्राकृत शब्दांचा उपयोग करण्याची लेखकामध्ये दिसून येणारी प्रवृत्ती, शब्दांची व वाक्यांची रचना यांसारख्या अनेक विषयांचा बोध आपणांस होतो.

मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने फादर स्टीफन्सच्या ख्रिस्त पुराणाचा विचार करावयाचा झाल्यास, बायबलमध्ये अनेक कथाभागातून व्यक्त झालेली ख्रिस्ती-धर्मश्रद्धा, ख्रिस्तभक्ती, ख्रिस्त धर्मीयांचे आचार-विचार मराठी भाषेच्या माध्यमातून मराठी भाषेच्या वाङ्मय अभिव्यक्तीच्या स्वरूपात मराठीतील हिंदू कवींच्या काव्य रचनांचे स्मरण करून देणारी आहे, असे म्हणावे लागते.

फादर स्टीफन्सला ख्रिस्तपुराण लिहीत असताना जिथे ख्रिस्तीधर्माशी समांतर अशा कल्पना भारतीय भाषांत आढळल्या तेथे त्या कल्पनांचे शब्द त्याने भारतीय रूपांतच योजिले आहेत. एकतर वारंवार परकीय शब्दांची योजना केली असती तर भाषेचा तोल बिघडला असता. भारतीय शब्दयोजनेचे मार्मिक उदाहरण म्हणजे " मार " या शब्दाचा उपयोग (१ : १.३२) Holy Holy Holy साठी सांतु सांतु सांतु ही त्रिवारोक्ती आपल्याकडील " शांतिः शांतिः शांतिः " या त्रिवारोक्तीशी आपाततः नादगुणाने जुळून गेली आहे. याशिवाय, धर्मपुत्र, पर्वणी, सद्गति, नीति-कर्मे, मुक्तिपंथ, यमदूत सारखे भारतीय धर्तीचे शब्द तो नेहमी वापरताना दिसतो.

प्रारंभी एक गरज म्हणून फादर स्टीफन्स मराठी भाषेच्या अभ्यासाकडे वळला असेल. पण त्याने मराठी भाषेतील ग्रंथांचे मनापासून अध्ययन केल्यावर मराठी भाषेची गोडी त्याला कळली असावी. आणि मराठी भाषेच्या सामर्थ्याची आणि थोरवीची कल्पना आली असेल. मराठी भाषा " चोखाळ " साजिरी आणि थोर मान असलेली आहे, असे तो म्हणतो. समजा याच्यात व्यवहार्यचातुर्याचा काही भाग गृहीत धरला तरी, मराठी भाषेवर त्याचे मनापासून प्रेम होते, आणि त्या प्रेमापोटी त्याने इतके रसाळ ख्रिस्तपुराण लिहिले, असे म्हटल्यावाचून राहवत नाही.

या काळापासून आशयदृष्टया एक नवीन श्रद्धा, ख्रिस्तीधर्मश्रद्धा मराठी भाषेतून अभिव्यक्तीसाठी प्रयत्नशील झालेली दिसते.

पोर्तुगाल देशातील फ्रान्सिस्कन, डोमिनिकन व जेसुईट इत्यादी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदुस्थानात येऊन गोवे व दक्षिण हिंदुस्थान या भागांत सोळाव्या शतकाच्या आरंभी जम बसविला. परंतु या देशात राहून येथील भाषांचा अभ्यास करणारे व त्या भाषांत ग्रंथ लिहिणारे जेसुईट मिशनरी हेच पहिले परकीय लोक होत आणि त्यांच्यातील फादर स्टीफन्स हा पहिला जेसुईट ख्रिस्ती मराठी ग्रंथकार होय.

पाद्रि एतिएन-द-ला-क्रुवा (फादर क्रुवा-इ. स. १६७९ ते १५४३)

त्याने रचलेले ' सेंट पीटरचे पुराण ' हे ग्रांथिक मराठी भाषेतील पुस्तक १६२९ साली गोव्यात प्रसिद्ध झाले. ते रोमन लिपीत मुद्रित झालेले आहे. या ओवीबद्ध पुराणाचे मूळ नाव पोर्तुगीज भाषेत आहे. त्या नावाचे मराठी भाषांतर असे होईल. ' ज्यात हिंदूधर्मातील चुकांचे खंडण केले आहे असे सेंट पीटरचे चरित्र ' ‡ क्रुवाने रचिलेल्या या सेंट पीटरवरील काव्याचे तीन भाग असून प्रत्येक भागाला तो पुराण असे नाव देतो. प्रत्येक पुराणाचे ' कांडात ' आणि प्रत्येक कांडाचे पुन्हा ' अवस्वरात ' विभाग पाडलेले आहेत. पहिल्या पुराणात ७५ फोलिओज आहेत. यांत सेंट पीटरचे चरित्र दिलेले आहे. दुसऱ्या पुराणात हिंदू धर्मीयांच्या देवदेवता आणि चालीरीतीं यांचे खंडन केले असून त्याची पाने ७६ ते २०८ अशी आहेत. तिसऱ्या पुराणाची पाने २०९ ते २८३ असून त्यांत ' परमेश्वर कवण ' म्हणवुन ऐसें लिहून दाविले आहे. ' प्रत्येक पृष्ठावर साधारण अठरा ओव्या

---

‡ Discurso sobre a vida do apostolo sampedra ew quese refula os principaes erros do gentilsma 1629.

हे पुस्तक छापल्याबद्दल त्याच्यावर १६३४ चा परवाना आहे. हे पुराण मुखपृष्ठावर काळ दिल्याप्रमाणें १६२९ मध्ये (छापण्यास) सुरुवात होऊन ते १६३४ साली प्रसिद्ध झाले असावे, असे वाटते.

आहेत. यावरून या ग्रंथाच्या विस्ताराची कल्पना यईल. तीनही पुराणांची मिळून एकंदर ओवीसंख्या २१८७१ भरते. प्रस्तुत ग्रंथाला जोडलेल्या गद्य प्रस्तावनेत ग्रंथकाराने विषयरचनेसंबंधीचा खुलासा केला आहे.

फादर स्टीफन्सने आपल्या ख्रिस्तपुराणातून नवख्रिस्त्यांना ख्रिस्ती धर्माची माहिती करून दिली. परंतु जुना हिंदुधर्म त्याज्य का हे नवख्रिश्चनांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न फादर क्रुवाने आपले पुराण लिहून केला. हिंदूंनी आपला जुनाधर्म व देव सोडावेत यासाठी सेंट पीटर त्यांच्या मतांचे खंडण करीत आहे असे दाखवून विष्णु, राम, महेश, गणेश, तुळशी वगैरे देवांची क्रुवाने विलक्षण थट्टा, उपहास व विपर्यास केला आहे. § या पुराणाचा आणखी एक विशेष म्हणजे यात अनेक जुन्या हिंदू धर्मग्रंथांचे उल्लेख आढळतात. उदा. योगवाशिष्ठ, अश्वमेध, भागवत, द्रोणपुराण, आदिपुराण, गीता, रामपुराण इत्यादी. याशिवाय 'ख्रिस्ताचे

§ विष्णूने मोहिनीचे रूप घेऊन दैत्यांना फसवून देवांना अमृत वाढले, या कथेत त्याने विष्णूवर टीका केली आहे. फादर क्रुवाची ही मराठी भाषाशैली व खंडनपद्धती समजण्यासाठी पुढील उतारा पाहा :-

माकड जेंतिव पुराणीं । विस्टणु नस्टता बोलिली लिहुनी
की दैत्या देवां कामत्रवाणी । भेडावया ॥ ११ ॥
तेणे विस्टणे रूप आपुलें । स्त्री आकारे पालिटलें ॥
येणें कामत्रें पाडितलें । दोसीं तेयाथे ॥ १२ ॥
स्त्रीरूप धरोनि सुंदर । मांडिला श्रृंघार परिकर ।
काम उपजविले जिव्हारा । देवा आणि दैत्यांसि ॥ १३ ॥
ऐसा विस्टणु दोसाचारी । दोसे लावटे आपसेरिरीं ॥
देवा दैत्यां लावटें करी । काम वासनें भिडोनी ॥ १४ ॥
ग्रंथु बोले जेणे प्रकारि । तुमां निरोपावया जिव्हाग्रि ॥
मन कांपे विटाळ भारि॥ चिंतितांचे बोलू ॥ १५ ॥
म्हणे ते मानले दोगाची मनी । मग देवें रूप धरिले मोहिनी ।
ता जाला तिचे स्थानी । स्त्रीवेशे ॥ १६ ॥
तें देखोनिआ समस्त । कामे भुलले देव दैत्य ॥
ते म्हणती सुरामृत । वाडि आमां ॥ १७ ॥
मग तेया रचिली सुधापात्रे । दैत्यो देव कामातुरें ॥
मग वाडी तेझा मधिरा । मोहिनी माया ॥ १८ ॥

[टीप पुढील पानावर चालू]

वधस्तंभारोहण ' नावाचे एक मराठी काव्य क्रुवाने रचल्याचा उल्लेख सापडतो. अ. का. प्रियोळकर यांनी मुंबई विद्यापीठाच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध केलेले काव्य क्रुवाचेच असावे असा प्रियोळकरांचा तर्क आहे. त्याची ओवीसंख्या ९२ आहे. फादर आलेक्स ऱ्होडस या प्रवाशाने फ्रेंचमध्ये लिहिलेल्या इ. स. १६२१ च्या आपल्या प्रवासवर्णनात क्रुवाच्या देशी भाषांच्या अध्ययनाची मुक्तकंठाने स्तुती केलेली आहे. मात्र फादर क्रुवाने गोमंतकी बोलीत रचलेले कोणतेही पुस्तक अद्यापि उपलब्ध झालेले नाही.

ख्रिस्ती मिशनऱ्यांना ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी मूर्तिपूजा, पुराणातील स्थानिक देवता व त्यांची पूजाअर्चा या गोष्टी प्रामुख्याने टीकाविषय करायच्या होत्या. विष्णू, कृष्ण, राम या देवतांची त्यांनी वारंवार निर्भर्त्सना केलेली आहे. कदाचित अशी टीका केल्यामुळे हिंदू लोक आपला धर्म सोडून आपल्या धर्मात येतील अशी त्यांची अपेक्षा होती. गोव्यातील बहुतेकांनी ख्रिस्तीधर्म स्वीकारला तो राजकीय व धार्मिक सक्तीने असे चित्र दिसते. पण पुढे येणाऱ्या महाराष्ट्रातील प्रॉटेस्टंट पंथीय ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अशाच प्रकारची हिंदू देवतांची चेष्टा, हिंदू सणांचे दोष दाखविण्याची पराकाष्ठा केलेली दिसते. या दृष्टीने अशा प्रकारच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांतील पहिला ख्रिस्ती लेखक फादर क्रुवा ठरतो.

[मागील पानावरून टीप पुढे चालू]

ऐसा पुराणाचा उचारू । तुमी आयिकीला समग्रु ।।
विस्टण घेऊन वेश्याकारू । दोसि पाडिनले देवां देत्या ।। १९ ।।
अभिमंत्रावया कामबाण । स्त्रीरूप सुंधरपण ।।
आणि मथुरेचे वाटपण । आधरिलें तेणें ।। २० ।।
स्त्रीरूप सांदकी कामजाक । सुंधरता चडवी उल्हाळ ।
मधिरा सिंपी धरुत तैल । विस्टणु येग्नु सादकी कळिफुंकी ।। २१ ।।
ऐसी नस्टता विस्टणु नस्टु । आचरितुसे भगितशोत्रु ।।
निस्कामसत्व तेणे रितु । भंगेया येरांचे ।। २२ ।।
पण येतुके भाव आचरण । दोस लवाटे विटाळपण ।।
नव्हे काये खोटेपण । अद्‌भुत ऐसे ।। २३ ।।
म्हणे ऐसा दुर्बुधी भगितनासी । देवो ऐसा कल्पोवेयासि ।।
नेणो केसी तुमासि । उठिली कल्पना ।। २५ ।।
तरी विस्टणु तुमचा । देव नविपेचि देखा ।।
हाचि प्रत्ययो तेयाचा । पुरे गमावेया : ।। २६ ।।
(सेंट पीटरचे पुराण, दुसऱ्या पुराणाचे पांचवे कांड) अवस्वरू २३

फादर आंतोनियु द. सालदाञ्ज (इ. स. १५९८ ते इ. स. १६५३)

मराठीतील संतविजय, भक्तलीलामृत या पद्धतीच्या संतचरित्रसदृश संतचरित्र लिहिणारा सालदाञ्ज हा ख्रिस्ती लेखक होय. त्याने आपले ' सांतु आंतोनीची जीवित्वकथा, ' १६५५ साली प्रसिद्ध केली. या पुराणात सेंट ॲथनी हा निरनिराळ्या देशांत ख्रिस्ती धर्मप्रचार करीत असताना त्याने केलेले चमत्कार वर्णन केले आहेत. या ओवीबद्ध काव्याचे ग्रंथकाराने दिलेले मुळातील नाव " पादुवा म्हळल्या शारांतुल्या सांतु आंतोनीची जीवित्वकथा " या काव्यग्रंथाची ओवीसंख्या ५३९ आहे. यात शास्त्रवचन ऐकण्यासाठी मासे उड्या मारून पाण्याबाहेर आले व शास्त्रवचन ऐकू लागले. दुसऱ्या दिवशी शास्त्रवचन ऐकत असताना वादळ होऊन आकाश ढगांनी भरून आले, पण संत आंतोनिचा धर्मोपदेश चालू असताना कोणी भिजला नाही, असे अद्‌भुत चमत्कार वर्णिलेले आहेत. हे पुस्तक मुंबई मराठी संशोधन मंडळातर्फे प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी संपादित करून प्रकाशित केले आहे. या ग्रंथाच्या भाषेचे स्वरूप पाहण्यासाठी पुढील उतारा लक्षात घेण्यासारखा आहे.

येकि सजनि पतिव्रता नारी । पुत्र नाहीं देखोनि आपुलां घरीं ॥
म्हणउनि नित्यकाल चिंता करी । आपुलां जीवी ॥ ३९३ ॥
सदैव भग्ता सांतु आंतोनिसि । शेरण निगाली येके दिवसी ॥
थोरि कणिव कुणा भग्तापासी । भाकोनि म्हणे ॥ ३९४ ॥
ये सदैवा भग्ता माजे निर्मितीं । प्रार्थना करोनि स्वर्गपती ॥
निपुत्र खंडोनि पुत्रवंति । ऐसे करिं कां मज ॥ ३९५ ॥
तंव देवभग्तु म्हणे तिये नारी । तूं पुत्रत्व पावसी गे संसारी ॥
तो पुत्र देव इंग्रजे भितुरीं । ख्रस्टु हो एक ॥ ३९६ ॥
सांव फ्रान्सिस्काचे ओर्दिचा । रेलिझिओजु देवभग्तीचा ॥
आणी देवशास्त्रा नितिचा । मार्तिरि होएल ॥ ३९७ ॥
आणि तेआ वरि बहुतेकां जनां । तो होएल पितेया समान ॥
मर्तिरां भग्तांचे उपशाम । करिल तोचि ॥ ३९८ ॥
जे वचन देवभग्ते बोलिले । तिये नारिसी तेणें सांगितले ।
मग तेच वचन साच जाले । फलस्त होऊनि ॥ ३९९ ॥

(सांतु आंतोनीची जीवित्वकथा. ओव्या ३९३–३९९)

वरील ख्रिस्ती ग्रंथकाराची भाषा तुकाराम, रामदासकालीन मराठी भाषेसारखी नाही हे उघड आहे. या ग्रंथकारांनी ज्या हिंदू पुराणग्रंथांचा वा अन्य पुस्तकांचा उपयोग आपल्या अभ्यासासाठी केला होता त्यासंबंधीचा शोध " पोर्तुगाली राजवटीपूर्वीचे धार्मिक वाङ्मय " या ग्रंथात प्रभु भेंब्रे यांनी घेण्याचा प्रयत्न केलेला

आहे. त्यांनी गोमंतकीयांना प्रिय असलेल्या प्राचीन पुराणग्रंथांची नावे आणि त्या ग्रंथांतले काही उतारे, लिस्बनच्या " बिब्लियॉलॅक मासियॉनाल मधील द् क्रुवाच्या पुराणाची प्रत वाचताना उद्धृत केलेले आढळले. (पृ. ११)

साल्दांज

प्रस्तुत पुराणाखेरीज आणखीही एक हस्तलिखित मराठी ग्रंथ बोली व ग्रांथिक अशा द्विविध स्वरूपात याच कवीने लिहिलेला उपलब्ध आहे, तो मुद्रित झालेला दिसत नाही. त्याच्या आठशेवर ओव्या आहेत. त्याचे नाव " जिवित वृक्षाची फळे " असे आहे. या ग्रंथात काय वर्णिले आहे ते कवीने पुढील शब्दांत नमूद केलेले आहे. " जेजू नावाची तुस्ती (स्तुती) पवाडे व कवणे क्रिस्तुस्वामी मनुष्य दोसांणा-साऊनि क्रुसी मृत्यू पावली त्याची कथा वित्पती. " याशिवाय साल्दांज याच्या नावावर एक कोकणी कोश आणि इतर तीन ग्रंथ नमूद केलेले असले तरी ते अद्याप उपलब्ध झालेले नाहीत.

मराठी वाङ्मय कोश प्राचीन खंड पृ. ९४

पाद्री दियोगु रिबैरू (इ. स. १५६०–१६२३)

फादर स्टीफन्स याने गोमांतकीमध्ये भाषांतरित केलेल्या " दौत्रिन क्रिस्ता " (ख्रिस्ती धर्म तत्त्व) या ग्रंथात तसेच त्याने रचलेल्या गोमंतकी बोलीच्या व्याकरणात (आर्ति–द–लिंग्न कानारी) याने महत्त्वाची भर घातली.

रिबैरूचा आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे त्याने तयार केलेला गोमांतकी बोलीतील क्रिस्तावाचे दौत्रिनिचो अर्थ (ख्रिस्तीधर्म तत्त्वाचा अर्थ) हा ग्रंथ इ. स. १६३२ साली गोव्यातील रायतूर येथील जेजुइतांच्या कॉलेजच्या कारखान्यात मुद्रित झाला. या ग्रंथाची एकूण १०५ पाने (फोलिओज) असून फादर स्टीफन्सच्या दौत्रिन क्रिस्तापेक्षा त्याचा आकार मोठा आहे. स्टिफन्सच्या " दौत्रिनी "त गुरू हा शिष्याकडून ख्रिस्ती धर्मविषयक प्रश्नांची उत्तरे वदवून घेतो. तर रिबैरूच्या प्रस्तुत दौत्रिनींत शिष्याने उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन स्वतः गुरूच निरनिराळे दाखले देऊन करीत असतो.

प्राचीन वाङ्मय कोश पृ. ९५–९६

पाद्री मिंगेल-द-आल्मेद : (इ. स. १६०७–१६८३)

याच्या (१) पाच प्रवचने (हस्तलिखित) (२) संतांच्या जीवनावरील प्रवचनांचे चार खंड (हस्त.) या दोन ग्रंथांव्यतिरिक्त पाद्री दियोगु रिबैरू याने रचिलेला कोकणी-पोर्तुगीज कोश (हस्तलिखित) पाद्री आल्मेद याने सुधारून वाढविल्याची माहिती आहे. मुद्रित ' ज्यादों-द-पास्तोरिश ' 'वनवळयाचो मळो' हा

त्याचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ होय. हा एकंदर पाच खंडांचा असून त्याचे दोनच खंड (तिसरा आणि पाचवा) उपलब्ध झालेले आहेत. या ग्रंथाच्या लेखकाने दिलेले गोमंतकी बोलीतील नाव ' वनवाळ्याचो मळा ' (वनवा (मा)ळ्यांचा मळा) असे असून, त्याचा पहिला खंड इ. स. १६५८ मध्ये प्रसिद्ध झाला आणि, पाचवा खंड १६५९ साली प्रसिद्ध झाला. नव्याने झालेल्या ख्रिस्ती लोकांना दैनंदिन धार्मिक उपासनेसाठी सदरचा ग्रंथ लिहिला गेला असल्यामुळे या ग्रंथात तत्कालीन धार्मिक व सामाजिक आचार- विचार, रुढी व समजुती, निरनिराळे व्यवहार इत्यादींचे प्रतिबिंब उमटलेले आहे. निरनिराळ्या संदर्भात या बाबीसंबंधी अनेकदा उल्लेख येतात.

फादर आल्मेद याने इतरही काही पुस्तके लिहिल्याचा निर्देश आढळतो. Biblioteca lusitana या ग्रंथात माहिती दिल्याप्रमाणे फादर रिबैरू याचा कोंकणी पोर्तुगीज शब्दकोश त्याने सुधारून वाढविल्याचे दिसून येते.

पाद्री जुवांव-द-पेद्रोझ (इ. स. १६१६ ते १६७२)

याचा गोमांतकी बोलीतील " देवाची येकांग्र बोलणी " हा ग्रंथ इ. स. १६६० साली प्रसिद्ध झाला. या ग्रंथातील मुख्य मजकूर १२८ (फोलिओमध्ये) पानामध्ये सामावलेला असून त्याच्या सुरुवातीला पोर्तुगीज भाषेतील विषयानुक्रमणिका जोडलेली आहे. ही एकंदर आठ " एकांग्रबोलणी " असून त्यापैकी प्रत्येकाची विभागणी " अवस्वर " मध्ये करण्यात आलेली आहे. या ग्रंथकाराचा जुन्या मराठी कथा-पुराणांचा चांगलाच अभ्यास असावा असे त्याच्या ग्रंथातील भाषेवरून व त्याने केलेल्या पूर्वसूरींच्या अनुकरणावरून प्रत्ययाला येते. ग्रांथिक मराठीत व गोमंतकी बोलीत वाङ्मयनिर्मिती करणाऱ्या सतराव्या शतकातील जेजुइट संघीय धर्मगुरूंची, पाद्रींची परंपरा पाद्री पेद्रोझ यांच्या मृत्यूने खंड पावली असे म्हणावयास हरकत नाही.

मराठी वाङ्मय कोश पृ. ९५

पाद्री थेओतोनियु जोसेफ (किंवा-जुजे)

हा जेजुईट संघीय ग्रंथकार. याचा काळ निर्दिष्ट केलेला आढळत नाही. याने गोमांतकी बोलीत एक ख्रिस्ती दौत्रिन (ख्रिस्ती धर्मतत्त्व विषयक ग्रंथ) तयार केली होती. लहान मुलांस शिकविण्यासाठी त्याचा उपयोग होत असे. हा ग्रंथ अनुपलब्ध आहे. या ग्रंथाचे एकंतर तीन अध्याय असून, त्यात ख्रिस्ती धर्माची प्रमुख तत्त्वे पापोच्चारण, खराखुरा ख्रिश्चन बनण्यासाठी कोणकोणते श्रेष्ठ गुण अंगी बाणवावे लागतात इत्यादी विषयांचे स्पष्टीकरण केलेले आढळते. सध्या मात्र या पुस्तकाची एकही प्रत उपलब्ध नाही. या ग्रंथाचा लहान मुलामुलींसाठी उपयोग करण्याची

परवानगी इ. स. १७५८ मध्ये लिस्बन येथे मिळाली होती. हा ग्रंथ इ. स. १७५८ साली मुद्रित झाला असावा.

मराठी वाङ्मय कोश पृ. ९५

फ्रै गाश्पार-द-सांव मिगेल

फ्रान्सिस्कन संघीय सर्व लेखकांमध्ये हा अग्रगण्य. त्या काळी याचे ग्रंथ छापण्यात आले होते हे विशेष महत्त्वाचे होय. इ. स. च्या सतराव्या शतकाच्या मध्यास हा ग्रंथरचना करीत होता.

(१) दाश् इश्तासाइश (मुद्रित) या ग्रंथात याने भक्तगणाला करावयाचा उपदेश व मार्गदर्शन याविषयी लिहिले आहे. हा ग्रंथ काव्यबद्ध असून त्या वेळी तो छापलाही गेला होता. हा सध्या अनुपलब्ध आहे.

(२) कार्दीनाल बार्लामीन याच्या ' सिम्बोलू ' (हस्तलिखित) या ग्रंथाचे याने केलेले भाषांतर गोमंतकी बोलीत असावे.

(३) कानारी भाषेचे (कोकणीचे) व्याकरण (हस्तलिखित) हे हस्तलिखित लंडन येथील " स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज " च्या मार्सडेन संग्रहात आहे.

(४) कानारी भाषेचा (कोकणीचा) व पोर्तुगीज भाषेचा कोश (हस्तलिखित).

(५) वर्षातील एकंदर ऋतू व साधुसंत यांच्या विषयीच्या धर्मोपदेशाचे चार खंड हे गोमंतक बोलीत लिहिलेले असावेत. (हस्तलिखित).

(६) वाकुळ पाश्तोराल (हस्तलिखित) (पॅस्टोरल स्टाफ) हे गोमंतकी बोलीत होते.

(७) सिम्बोलु द. फै. (हस्त.) धर्माचे प्रतीक हे मूळ ग्रंथाचे गोमंतकी बोलीतील भाषांतर होते.

(८) मानुआल परा. उश् पारॉकुश इ रेइतोरिश् (पॅरिशचे पाद्री व रेक्टर यांच्यासाठी मार्गदर्शन)

(९) पाटशांव-द-क्रिश्तु (हस्तलिखित) (ख्रिस्ताच्या वधस्तंभारोहणा-वेळच्या यातना) या विषयावरचे तीन हजार ओव्यांचे काव्य ग्रांथिक मराठीत होते.

(१०) व्रीदा दुश् आपॉश्तॉलुश (हस्तलिखित) (प्रेषितांचे जीवन) या मराठी काव्यात हिंदू लोकांच्या मूर्तिपूजेचे, भोळया समजुतीचे आणि धार्मिक आचारांचे खंडन करण्यात आलेले आहे.

(११) इश्प्लीकासांव-द-केद्रु (हस्तलिखित) धर्मसूत्र व संग्रहाचे स्पष्टी-करण) हे गोमंतकी बोलीत असावे.

(१२) दाश मिझेरिआश् हुमानाज (हस्तलिखित) मानवाच्या आपत्तीसंबंधी.

(१३) ग्राव्हीदाद–द–पेकादु (हस्तलिखित) (पापाचे गांभीर्य १२ व १३ हे दोनही ग्रंथ सहा हजार ओव्यांचे असून त्यांना विवेकमाला असे नाव देण्यात आलेले होते. यात हिंदूचे अपराध व देवदेवता यांविषयी विद्वत्तापूर्ण विवेचन केले होते अशी माहिती मिळते.

(१४) याने फादर स्टीफन्सच्या स्तुतीपर लिहिलेले १४ ओव्यांचे कवन (पोएझिअ) मुद्रित स्वरूपात प्रसिद्ध झालेले आहे. फ्रान्सिस्कन संघीयांच्या ग्रंथ संभारातून मराठीतील म्हणता येईल असे एवढेच एक काव्य आज उपलब्ध आहे. हे कवन जे. एल्. साल्ढाणा यांनी १९०७ साली मंगलोर येथे संपादून प्रसिद्ध केलेल्या क्रिस्तपुराणाच्या चौथ्या आवृत्तीच्या प्रारंभीच छापलेले आढळते.

मराठी वाङ्मय कोश
प्राचीन कोश पृ. ९९

फै. मानुएल बाप्तिश

फ्रान्सिस्कन संघीय ग्रंथकार, फादर स्टीफन्सच्या ख्रिस्त पुराणाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या आरंभी, पुराण छापण्याची जी परवानगी आहे, त्या परवानगीत या फ्रान्सिस्कन धर्मगुरूचा उल्लेख आहे. यावरून तो इ. स. १६५४ साली हयात होता असे मानता येते. याने देशी भाषेत एक प्रश्नावली (ख्रिस्तीधर्मविषयक) तयार केली होती. (हस्तलिखित)

म. वा. को. (पृ. १००)

फै. मानुएल-द लादु

फ्रान्सिस्कन संघीय ग्रंथकार. प्रांतिक ख्रिस्ती धर्माधिकारी म्हणून हा इ. स. १६६१ ते १६६२ या काळात काम करीत होता. याने नवख्रिस्ती लोकांच्या उपयोगासाठी स्थानिक बोलींत एक धर्मविषयक छोटी प्रश्नावली तयार केली होती (हस्तलिखित).

म. वा. को. (पृ. १००)

फै. दुमिंगुश-द. सांव-बॅर्नादिनु

हा जन्माने भारतीय असून देशी भाषेचा उत्तम अध्यापक म्हणून प्रसिद्ध होता. या फ्रान्सिस्कन संघीय ग्रंथकाराने “ धर्ममार्ग ” व “ ख्रिस्तनिष्ठा ” (दोनही हस्तलिखित) यासंबंधी स्पष्टीकरण करणारे दोन ग्रंथ स्थानिक लोकांच्या भाषेत लिहिले आहेत.

म. वा. को. पृ. ९९

फै. आमोदर-द-सांत आन

हा सोळाव्या आणि सतराव्या शतकात परदेशातून आलेल्या जेजुइत मिशनऱ्यांमधील फ्रान्सिस्कन संघीय (ख्रिस्ती). पोर्तुगीज सरदार आफोंस-द-आल्बुकेर्क

याने इ. स. १५१८ मध्ये गोवा जिंकून घेतल्यावर त्याच्या ताब्यात जी एक मुसलमानांची मशीद आली, तीत फ्रान्सिस्कन पंथियांनी आपले धर्मप्रसाराचे आणि देशी भाषांच्या अभ्यासाचे कार्य चालू केले होते असे दिसते. मात्र देशी भाषांतील ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत जेजुइटांइतका उत्साह त्यांनी दाखविल्याचे आढळत नाही. साहजिकच फ्रान्सिस्कनांनी केलेली मराठीची सेवा जेजुइटांच्या सेवेच्या तुलनेने तुटपुंजी वाटते. "फ्लॉस सॅक्टोरम्" (हस्तलिखित अनुपलब्ध) नावाच्या ग्रंथाचे त्याने केलेले भाषांतर पूर्वेकडील लोकांच्या मातृभाषेच्या सौष्ठवाला साजेसे सरस उतरले होते, असा अभिप्राय आढळतो.

म. वा. को; पृ. ९८

दक्षिण कोकणात ख्रिस्ती मिशनरी जसा धर्मप्रसार करीत होते तसा उत्तर कोकणातही त्यांचा धर्मप्रसार सुरू होता. त्यासाठी त्या भागातील बोलींचा त्यांनी अभ्यास करणे अपरिहार्य होते. उत्तर कोकणातील मराठी भाषेत लिहिलेले एक पुराण उपलब्ध आहे. त्यांचे नाव Puran Da Enearnacao, Paixao e morte De N. S. Jesus Cristo Na lingua valgur, 1845.

[देवनागरी प्रत १९२३] याची पहिली आवृत्ती सन १६५९ मध्ये लिस्बन येथे छापली असे म्हणतात. पण ती कुठेही उपलब्ध नाही. Francisco vaz de Guimaraes हा लेखक असावा अशी समजूत आहे. पुराणाच्या हस्तलिखितांवरून इ. स. १८४५ साली व त्यानंतर काही आवृत्त्या मुंबईत छापण्यात आल्या. या रोमन लिपीतील पुराणाचे देवनागरी लिप्यंतर करण्यात येऊन ते इ. स. १९२३ मध्ये प्रसिद्ध झाले.

या पुराणाचे एकंदर ३६ अध्याय असून लेखक कंथा (Cantha) असे त्यांना नाव देतो. खरोखर पाहता या ३६ कथा असून त्याच्या सुमारे सोळा हजार ओळी आहेत. या पुराणाची भाषा मराठी आहे. प्रत्येक कथेचे शीर्षक पोर्तुगीज भाषेत आहे. उत्तर कोकणी बोलीचा तत्कालीन नमुना म्हणून या पुराणातील काही अंश देणे उचित ठरेल. आठव्या कथेतील हा उतारा येशूसाठी मेरीने म्हटलेले हे पाळणा गीत आहे.

नातवाला खेळवणी
हाना अर्थी वनीं,
आसवांच्या नदी
विरजे मरीचे डोळीं

उत्तर कोकणी बोलीतील Cathechismo da doutrina Christian 1778 ही कोकणातील धार्मिक प्रश्नोत्तरावली कुणीतरी पोर्तुगीज मिशनरीने लिहिली असावी असे म्हणतात. या पुस्तकावर लेखकाचे नाव नाही. या पुस्तकाला १४३ पृष्ठे आहेत.

सर्वेश्वराचा ग्नान उपदेश

पेशवाईच्या काळात कोणीतरी धर्मगुरुने महाराष्ट्रातील लोकांकरिता हा ग्रंथ लिहिला असावा असे वाटते. याचा लेखक व लेखनकाळ निश्चित समजत नाही. या पुस्तकात धर्मोपदेशाचा बराच भाग आहे. उपदेशाचे सहा भाग आहेत. त्यात काही मंत्र व प्रार्थनाही समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

हिंदुस्थानात प्रथम येऊन इथली मराठी व देशी भाषा शिकणारे जेजुइट हे पहिले युरोपियन लोक होत. त्यांनी या देशी भाषेत वाङ्मय निर्मिती केली. परकीयांनी केलेली मराठी भाषेची सेवा म्हणून त्यांच्या ग्रंथनिर्मितीला विशेष महत्त्व आहे.

विशेषतः ख्रिस्तीधर्माची श्रद्धा व युरोपातील नवीन ज्ञान-विज्ञान अभिव्यक्त करण्यासाठी या काळापासून मराठी भाषा या निमित्ताने प्रयत्न करू लागली. ती प्रगल्भ होण्यासाठी या काळापासून सुरुवात होताना दिसते.

शिवकाळात युरोपियन आणि महाराष्ट्रीय लोकांमध्ये जो भाषिक व्यवहार होई तो प्रामुख्याने मराठी व पोर्तुगीज या दोन भाषांत होई. या काळात इंग्रज लोक मराठी भाषा शिकलेले दिसत नाहीत किंवा ख्रिस्ती मिशनरीही मराठी भाषेत रचना करताना दिसत नाहीत.

पेशवेकाळांत एल्फिन्स्टनला मराठी भाषा अवगत होती. बाजीराव पेशवा व एल्फिन्स्टन यांची पुण्यास जी भेट झाली (५ मे १८१६) त्यावेळी बाजीराव एल्फिन्स्टनशी मराठीत बोलला. त्यावरून एल्फिन्स्टनला मराठी चांगले समजत होते असे दिसते. राजकारणाच्या संदर्भात इंग्रज लोकांना महाराष्ट्रातील लोकांत मिसळता यावे या दृष्टीने महाराष्ट्राच्या भाषाव्यवहारामध्ये मराठी भाषेला महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले. मराठी भाषा ही वाङ्मयनिर्मितीच्या साधनापेक्षा दैनंदिन व्यवहारातील देवाण-घेवाणीचे साधन म्हणून ती वापरात येऊ लागली. मराठी भाषेचा आपण (इंग्रजांनी) चांगला अभ्यास केला तर आपला अधिक फायदा आहे असे ब्रिग्ज सांगतो.* मराठी लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी, मराठी

* But I strongly advise you to apply yourself, of some future period, to the acquirement of provincial language of your regiment, to enable you to communicate freely not only with the Hindoos in the corps, but with the commom people of the country, who do not speak Hindustany. In the Bombay army alone, of the three presidencies, a reward is held out to induce military men to acquire the Marratta and Guseratty languages, by which means the Europien officers, speaking the dialect of all the men in the regiment, are better able to make impartial selections among the men for promotion.

(Briggs–Letters address to a young person in India–p.53)

लोकांचा आदर प्राप्त करून घेण्यासाठी आपण मराठी भाषा आत्मसात केली पाहिजे असे किंकेड म्हणतो.†

महाराष्ट्राबाहेर तंजावर येथे ट्रांकोबार येथील डॅनिश मिशनऱ्यांपैकी स्वार्टझने मराठी भाषेसंबंधी कार्य केलेले दिसते. तंजावरचा राजा सरफोजी यास स्वार्टझच्या सहवासामुळे व शिक्षणामुळे वाचनाची गोडी लागली. त्याने तंजावर येथे स्वतःचे ग्रंथालय स्थापन केले. त्यांत फ्रेंच, इंग्लिश, जर्मन, ग्रीक, लॅटिन भाषांतील पुस्तकांच्या संग्रहाबरोबर मराठी व संस्कृत भाषेतील हस्तलिखितांचाही संग्रह त्याने केला होता. स्वार्टझ् याच्या आग्रहामुळे, सरफोजीने तंजावर येथे देवनागरी टाईप असलेला 'नवविद्याकलानिधि' नावाचा छापखाना इ. स. १८०५ साली सुरू केला.

प्रत्यक्षात मराठी भाषेत वाङ्मयनिर्मिती केली नाही तरी मराठी भाषेत ग्रंथ निर्माण करून देण्यास स्वार्टझ्ची प्रेरणा उपकारक ठरली आहे याची नोंद घेऊन पुढे जावे लागते.

कॅरी विल्यम – (जन्म १७६१ मृत्यू १८३४)

बंगालमध्ये सेरामपूर येथे छापखान्याची सर्व सिद्धता झाल्यावर इ. स. १८०१ मध्ये त्याने नवा करार बंगाली भाषेत छापून प्रसिद्ध केला. देशी भाषांत बायबल छापण्यास झालेला हा प्रारंभ होय. इ. स. १८०४ च्या सुरुवातीला मिशनऱ्यांनी बायबलच्या भाषांतराची योजना आपल्या कमिटीपुढे मांडली तेव्हा, त्या वेळच्या हिंदुस्थानातील प्रमुख सात भाषांमध्ये बायबलचे भाषांतर करावे असा निर्णय घेण्यात आला. त्या सात भाषांमध्ये 'मराठी' भाषेला स्थान होते. केरीने बायबलचे भाषांतर मराठीत करण्याचे स्वीकारले तरी ते त्याने एकट्याने पार पाडले असावे असे दिसत नाही. त्याच्या मदतीला कुणी पंडित सहाय्याला असावा आणि तो पंडित वैजनाथ पंडित असावा. हा नवा करार तयार करताना केरीचा भाग यांत किती व वैजनाथ पंडिताचा भाग किती याचा थोडा तर्क करता येतो. भाषांतराचे काम वैजनाथ पंडिताने करून केरीने ग्रीक प्रतीबरोबर तपासून त्यांत सुधारणा केल्या आहेत.

---

† Nevertheless the Maratha people have not forgotten their ancient glory of all Indian peoples whom I know they alone are deeply interested in their history and prefer to talk in their own language rather than the language of the foreigner. The surest way to gain their estteem to study their past and to learn their language.

(Parsnis–Poona in Bygone Days Forword P. VI)

(युमअसे–पिंगे वरून उद्धृत पृ. ३३–३४)

हे पुस्तक म्हणजे " मॅथ्यूचे शुभवर्तमान " हेच असावे कारण इ. स. १८०५ मध्ये हे पुस्तक देवनागरी लिपीत होऊन त्याच्या ४६५ प्रती काढण्यात आल्याचे कॅरीच्या चरित्रांत नमूद केलेले आहे. अशा प्रकारे बायबलच्या भाषांतराची सुरुवात " मॅथ्यूचे शुभवर्तमान " या ग्रंथाने झालेली दिसते.

इ. स. १८०५ पासून पुढे २० वर्षे श्रीरामपूर मिशन संस्था मराठी भाषेत बायबलच्या भाषांतराचे काम करीत होती. इ. स. १८०७ मध्ये " मॅथ्यूचे शुभ-वर्तमान " हे पुस्तक पुन्हा प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसते. यावेळी हे पुस्तक मोडी लिपीत छापले होते. ही दोन्ही पुस्तके मिळत नसल्यामुळे यासंबंधी निश्चित काहीच सांगता येत नाही. " मेमोरिअल पेपर्स " मध्ये या पुस्तकातील काही उतारे दिलेले आहेत. या बायबलच्या मराठी भाषेची कल्पना यावी म्हणून त्यातला एक उतारा देणे योग्य ठरेल.

लुक : १६ : १९.२४

एक जण धनवान होता तो मनुष्य वैभवी वस्त्र आणि मलमलाने पुरोहीत होऊन दिवसेंदिवस उत्तम भक्षण करीत होता। आणि त्या धनाड्याचे द्वाराचे जवळ पडलेला आणि त्याचे मेजाच झाडूण–झडपाने उदर पूर्ण करावयाचे इच्छेने व्रणाने परीपूर्ण। लाजरा नावाचा एकजण दरीद्रीही होता। कुत्र्यांही येऊन त्याच् क्षत चाटल। किंचित काळा नंतर दरिद्री मेला आणि दूत मर्तुला आबराहामाच्या वक्ष-स्थळीं वाहीत झाला। धनाढयही मेला आणि कबरेत ठेवला गेला। तदनंतर नरकांत व्यथीत होऊन त्या धनवानाने डोळे उघडले आणि मोठे दूर आबराहामास आणि त्याहांचे वक्षस्थळी लाजारास पाहील! तेव्हा तो हांका फाडून बोलला आहो आबराहाम पीता मला दया करा आणि त्याचे बोटाच अग्रभाग पाण्यांत बुचकळून माझी जीव्हा शीतल करायास्तव लाजारास पाठ्वा, कांकी अग्नीशीखेने मी व्यथीत होतो।

मुंबईमध्ये अमेरिकन मिशनरी इ. स. १८१३ मध्ये जरी प्रथम आले तरी नव्या कराराचे मराठी भाषांतर करून ते प्रसिद्ध करण्याची कामगिरी श्रीरामपूरच्या मिशनऱ्यांनी इ. स. १८११ मध्येच केली होती असे डॉ. विलसनच्या चरित्रावरून समजते. इ. स. १८११ मध्ये नव्या कराराच्या १००० प्रती छापून तयार प्रसिद्ध केल्याचे तोच सांगतो.

इ. स. १८१२ ते १८२१ या नऊ वर्षांत बायबल तीन भागांत प्रसिद्ध केल्याचा उल्लेख सापडतो. पहिल्या भागात Books from genesis ते Song of soldmen पर्यंत मजकूर येतो. दुसऱ्या भागाला मुखपृष्ठ नाही व तिसऱ्या भागाला मराठी व इंग्रजी मुखपृष्ठ आहे. परंतु या दोन भागांत कोणती प्रकरणे आहेत हे समजत नाही. सन १८२४ मध्ये नव्या कराराचे मुळांतून भाषांतर करून

ते मिशनकडून प्रसिद्ध करण्यात आले. याच पुस्तकाची सन १८२५ मध्ये दुसरी आवृत्ती निघाली.

कॅरी मराठी भाषांतर करीत असतानाच कोंकणी भाषेतही नव्या कराराचे भाषांतर करीत होता. इ. स. १८१५ मध्ये नव्या करारातील "सेंट मॅथ्यूचे शुभवर्तमान" कोंकणीत प्रसिद्ध झाले. त्याचप्रमाणे १८१९ मध्ये "नवा करार" व इ. स. १८३१ मध्ये Pentateuch " ही पुस्तके कोंकणीत प्रसिद्ध झाली. कोंकणीतील नवा करार इ. स. १८१८ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यासंबंधी रे. ब्रस लिहितो. 'Kankuna' New Testament, which was published at Serampur in 1818. The chapter is divided into verses differently from the others so that the same passages instead of being from the 7th to the 15th Verses is found in the 12th–19 the Verses.

भाषेच्या या दृष्टीने बायबलची कल्पना यावी या दृष्टीने मूळ पुस्तक उपलब्ध नसल्यामुळे " मेमोरियल पेपर " मध्ये दिलेला उतारा देणे भाग पडत आहे.

पर्व ६ : १२–१९ पर्यंत.

तरि तुमगेलि प्रार्थना केंचि वेलारी देवपुजाकर्तल्या वारि नुस्ते
उत्रं वेयु कोर्नाका तेंयिते तांगेले साबार उत्रंनिमिती तांगेले
उतर आयकिले जायत ते असि हत्रोणु आटैतार्ता । ह्या निमितिं
तांचे वारी जाउ नाका तेंयिते तुमगेलि प्रार्थना कोची पैलें
तुमगेले अवश्य यिते हे तुमगेलो बापुस समजता हे निमिती
असिचि प्रार्थना कऱ्या हे आमगेलो स्वर्गारि आसिल्लो बापुस
तुमगेले नांव पवित्र मान्य जावो तुमगेलें राज्य प्रकाशु जावो कशि
स्वर्गातुं तशि भु्यिचेरि तुमगेले यिष्ट क्रिया केलि जावो आजि
आमेगले संद खावचे आमकां दिया आणि कसे आभि आमेगलें देणेकारांक
रूण सोडता तसे आमेगेले रूण सोडया आमकां परिक्षेंतु वेऊ नाका
तरि आमका आपलेंयां तुलो सुठेया तेंयिते राज्य आनि आणि बळ
किर्ति निरंतर तुमगेलि आस आमिन तेंयिते तुंभि जरि मनुष्यांक
तांगेलि

आदना मिरविले पाप बाकसिशाति तरि तुमले स्वर्गांचे बापुस तुमकां
बकसित तरि जरि मनुष्यांक तांगेलि आदना मिरवीलो अन्यायु ना
बकसिशा तरि तुमगेलो बाप्सु तुमगेले– आदला मिरविल्लो अपराटु
तुमका बकसिसि ना नेंयान.

केरीच्या या बायबलचा हेतू दक्षिणेकडील (मंगळूर) कोंकणातील लोकांत त्यांच्या बोलीभाषेत ख्रिस्ती धर्मप्रसार करावा व ख्रिस्ती धर्माचे ज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहोचवावे असा होता. धर्मप्रसाराचा हेतूही त्यांनी लपविलेला नाही

पण मराठी भाषेच्या दृष्टीने एक महत्त्वाची घटना घडत होती. यावेळेपावेतो मराठी ग्रंथनिर्मिती प्रमाण भाषेत होत होती. बोलीचा उपयोग लौकिक व्यवहार भागविण्यासाठी त्या त्या प्रदेशात होत होता, पण बोली ग्रंथासाठी वापरून मुद्रित स्वरूपात सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्याचे किंवा बोलीतील मुद्रित ग्रंथ प्रमाणभाषा बोलणाऱ्या किंवा वाचणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्याने सुरु केले. प्रमाणभाषा व बोली यांच्या देवाण–घेवाणीचे स्वरूप बदलण्यास सुरुवात झाली. तसे पाहिले तर बोलीच्या व्याकरणाची आवश्यकता व गरज गेल्या ४०–५० वर्षांत महाराष्ट्रात सुरू झालेली दिसते. पण कॅरी धार्मिक हेतूने का होईना, अजाणतेपणे आपल्या हेतूसाठी मराठीच्या बोलांना महत्त्व देतो आहे ही गोष्ट नोंद करण्यासारखी आहे.

इ. स. १८०५ ते १८२५ या वीस वर्षांच्या काळांत :श्रीरामपूर मिशनने बायबलच्या निरनिराळ्या भागांचे भाषांतर व धार्मिक विषयावरील इतर काही पुस्तकांचे भाषांतर केले त्यांची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येईल.

मराठी धार्मिक वाङ्मय

		सन
सेंट मॅथ्यू (Matthewis Gospel in Mahratta)		१८०५
मॅथ्यू शुभवर्तमान		नागरी लिपी
बायबल - The pentateuch & The Testament		१८०७
		१८०७
बायबल – The New Testament	(दोन भाग)	
बायबल - Tee Pentateuch		१८११
बायबल – The Holy Bible		१८१२ व १८१३
बायबल – जुना करार	(तीन भाग)	१८१२ व १८२१
बायबल – नवा करार New Testament		१८२०
बायबल नवा करार New Testament दुसरी आ.		१८२४
बायबल Historical Books		१८२५
Hagiographa		१८१६
Prophetical Books		१८१८
Gospels		१८१९ व १८२१
Acts to Revelations	(दुसरी आवृत्ती)	१८२२
कोकणी बायबल St. Mathew	(दुसरी आवृत्ती)	१८२३
कोकणी बायबल New Testament नवा करार		१८१५
बायबल The Pentateuch		१८१८ व १८१९
		१८२१

कोंकणी व मराठी बायबलसंबंधी हेन्री ब्रूस आपले मत देताना लिहितात–

" It was certainly a grand conception but the wisdom of such an undertaking was a good deal more than questionable with no practical knowledge of the languages in use outside of the Bengal provinces, it follows as a natural result that the translations into those languages would be unpractical, and useless such at least was the case with Marathi version.... The Serampur version was printed in an antiquated style of the Modi (i. e. broken character) which is very abacure. The printing is very poor so that it is very difficult to find any Marathi scholar who is able to read it correctly.

" It will thus be seen that the Serampur Missionaries translated and published the Bible in two local dialects of the Marathi language, which were in use in the two opposite extrenities of the Marathi country, while the language of the great Mass of Marathi people was left certainly untouched. It was a striking, illustration of misdirected energy and zeal. "

कॅरीच्या भाषांतरावर ब्रूस, डॉ. विल्सन यांनी टीका केली ती काही प्रमाणात रास्त होती. तरी लोकांची भाषा शिकून त्या भाषेत बायबलच्या ग्रंथाचे भाषांतर करून त्याचा पाया घातला, याला मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या दृष्टीने मोठे महत्त्व आहे.

कोकणी भाषांतरासंबंधी ब्रूसचे मत वर दिले आहे. मुंबईच्या मिशनरींनीही त्या भाषांतरावर टीका केली, तेव्हा श्रीरामपूर येथील मिशनरींनी दिलेले उत्तर लक्षात घेण्यासारखे–

" We are prepared to state that from Goa northward through the whole of the Konkan, The Maharatta language is universally spoken with only a slight provincial variation from the same language as spoken at Poona. From the name of this country this language has been called the Kunkunee language, but it differs in so slight a degree from the Mahratta, that in our judgement of able brahmins whom we have consulted a distinct version is neither at all desirable nor justifiable. "

श्रीरामपूर मिशनने त्यातल्या त्यात कॅरीने मोठ्या तडफेने जिद्दीने ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न केले. ख्रिस्तवाणी भारतातील अनेक

भाषांत भाषांतर करून भारतीय लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शर्थ केली आणि विशेष महत्त्वाचा भाग म्हणजे देवनागरी लिपीत व मराठी भाषेत पुस्तके छापून इ. स. १८०५ मध्ये एक नवीन पर्व सुरू केले. मराठी गद्याच्या विस्ताराची सुरुवात जशी छापखाने उपलब्ध झाल्यामुळे होण्यास हातभार लागला तसेच मराठी गद्याचा उपयोग ख्रिस्ती धर्मश्रद्धा पसरविण्यासाठी या लोकांनी करण्यास सुरुवात केली. मराठी भाषेकडे भाषा म्हणून बघण्याची दृष्टी प्रथम मिशनऱ्यांनी दिली. त्यांच्या दृष्टीने त्यांना धर्मप्रसारासाठी लोकांत मिसळायचे होते. लोकांच्या भाषेत "शुभ-वर्तमान" सांगायचे होते. त्यासाठी ते मराठी भाषा शिकत होते, अभ्यासत होते. त्या गरजेपोटी मराठी भाषेचा व वाङ्मयाचा अनेक अंगांनी शोध घेणे व ती आत्म-सात करणे अपरिहार्य होते. त्या दृष्टीने कॅरीच्या कार्याचे मोल आपणाला करावे लागेल.

भारतात आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मश्रद्धेचा प्रचार करण्या-साठी प्रादेशिक भाषांचा अभ्यास करून धर्मप्रसाराचे काम कसे केले, हे आपण गोव्यातील फादर स्टीफन्स, फादर क्रुवा, तंजावरचा स्वार्टझ व श्रीरामपूरचा विल्यम कॅरी यांनी केलेल्या ख्रिस्ती मराठी धार्मिक वाङ्मयाचा जो आढावा यापूर्वी घेत-लेला आहे, त्यातून पाहिले आहे. मुंबईत आणि अहमदनगरसारख्या महाराष्ट्राच्या भागात मराठी भाषेचा अभ्यास करून, मराठी भाषेत धार्मिक वाङ्मय, शालोपयोगी ग्रंथ, भाषिक वाङ्मय, काव्य-ललितग्रंथ, तयार करून, नियतकालिके काढून मराठी भाषेचे आणि वाङ्मयाचे संवर्धन करण्याचे कार्य करणारी एक मिशन संस्था म्हणजे अमेरिकन मराठी मिशन ही संस्था होय. सुरुवातीला अमेरिकन मराठी मिशनच्या मराठी ग्रंथनिर्मितीस पाश्चात्त्य ख्रिस्ती लोकांनी हातभार लावला व कालांतराने इथल्या लोकांनी ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यावर, ते लोक मराठी वाङ्मय निर्माण करू लागले असे दिसते.

आशिया खंडातील लोक "नैतिक अंधकारात आहेत, त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी अमेरिकेतील ब्रॅडफोर्ड येथील काही कॉलेज विद्यार्थ्यांनी, सेम्युएल मिलच्या नेतृत्वाखाली इ. स. १८०६ पासून काही प्रयत्न चालविले होते. या प्रयत्नांतून आलेल्या अनुभवातून, विचारातून, ज्याप्रमाणे जेसुइट संघीयांनी ख्रिस्ताची सुवार्ता सांगण्याचा प्रयत्न केला, तसा आपण करावा असे या मंडळीने ठरविले. त्यातूनच इ. स. १८१० मध्ये अमेरिकन बोर्ड तयार झाले व १८ सप्टेंबर १८११ रोजी बोर्डाची वुर्सेस्टर येथे दुसरी सभा झाली व त्यावेळी ब्रह्मदेश, सुरत, पेनांग ही आशिया खंडातील ठिकाणे आपल्या धर्मप्रसाराच्या कार्यासाठी त्यांनी निवडली.

या सभेच्या सर्व सभासदांनी अँडव्हार येथे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता. कलकत्ता येथे निघण्यासाठी १९ फेब्रुवारी १८१२ रोजी कॅरव्हॅन या बोटीने जूडसन व न्यूवेल हे दोघे कामगिरीवर निघाले व २४ फेब्रुवारी रोजी नॉट हॉल व राइस हे

तिघे हार्मनी या बोटीने निघाले. कॅरव्हन ही बोट कलकत्त्यास प्रथम १७ जून १८१२ रोजी लागली. त्या दोघांनी कलकत्त्यास राहण्यासाठी सरकारजवळ परवानगी मागितली पण ती नाकारण्यात आली. त्यामुळे ते (न्यूवेल आणि जुडसन) मॉरिशस बेटाकडे गेले. हार्मनी बोट कलकत्त्यास उशिरा पोहोचली. त्या बोटीवरील हॉल व नॉट आजारीपणामुळे कलकत्त्यास थांबले. पण तिथे राहण्यास सरकारने परवानगी दिली नाही त्यामुळे ते मुंबईला इ. स. १८१३ साली आले व त्यासाली मुंबई येथे त्यांनी अमेरिकन मिशनची स्थापना केली. ७ मार्च १८१४ रोजी मॉरिशसला गेलेला न्यूवेल त्यांना मुंबईत येऊन सामील झाला.

या काळात इंग्लंड–अमेरिकेचे युद्ध चालू असल्यामुळे मुंबईतही त्यांना सहजासहजी स्थिर होता आले नाही. ते अमेरिकेचे हेर असतील या हेतूने त्यांनी इंग्लंडला जावे असा हुकूम झाला, त्यावेळी सिलोनला पळून जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही. पण पुढे १८१५ मध्ये त्यावेळचा मुंबईचा गव्हर्नर सर इव्हन्स नेपिअस यांनी त्यांना मुंबईत राहण्यास परवानगी दिली. अशा प्रकारच्या अडचणींना तोंड देऊन त्यांनी अमेरिकन मिशनची स्थापना करून त्या मिशनचे कार्य वाढविण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावयास सुरुवात केली.

१८१३ मध्ये आलेल्या या तिघा मिशनऱ्यांच्या दृष्टिकोणातून मुंबईतील आणि त्याच्या परिसरातील लोकांची स्थिती वर्णन करताना रे. हेन्री ब्रूस लिहितो–

" १८१३ मध्ये मिशनरी जेव्हा प्रथम मुंबईमध्ये आले, तेव्हा त्यांना असे दिसून आले की भवताली सर्व नैतिक व वैचारिक अंधार पसरलेला आहे. पाश्चात्त्य सुधारणांचे येथील लोकांना वारेही लागलेले नाही, आपल्या पूर्वजांचा धर्म, त्याची सत्यासत्यता, त्यांच्या सामाजिक संस्था इत्यादी बाबत कोणताही विचार न करता सर्वजण त्याच निद्रिस्त अवस्थेत आहेत. निदान स्वतःच्या समर्थनार्थ अथवा संस्कृतीच्या वा सामाजिक संस्थांच्या, विचार, रीतिरिवाजांच्या प्रसारार्थसुद्धा कोणतेही वाङ्मयीन प्रयत्न चालू नाहीत. खुद्द मुंबईत एखादा छापखाना नाही वा कोणतेही नियतकालिक नाही. जे काही थोडेफार वाङ्मय नव्याने सुरू होत होते ते रामायण, महाभारत, पुराणे यांच्या भाषांतराच्या स्वरूपाचे होते. त्यात राम–कृष्ण आदी हिंदू दैवते यांच्याच कथांचा समावेश आहे. काही अंशाने स्थानिक राजे, सरदार इत्यादींच्या शौर्यकथा, वेदातील कथांचा भाग आहे. विशेष म्हणजे हे सर्व वाङ्मय पद्य स्वरूपात होते. स्वतंत्र असे वाङ्मय अतिशय अल्प प्रमाणात होते. आणि अशा वाङ्मयाचा वाचकही अल्प होता. शिक्षण उच्चभ्रूपुरतेच होते. सामान्यांपर्यंत शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता. मौखिक स्वरूपातच ज्ञानाचा प्रसार होत होता. उपवास, व्रतवैकल्ये, यात्रा, यज्ञयाग, सण, उत्सव, अंधश्रद्धा यामध्येच सर्वांचे जीवन गुंतून पडले होते व ठराविक चाकोरीतून लोकजीवनाचे पाणी वाहत होते. कुणीही कुठलाही प्रश्न विचारून वा चौकशी करून चिकित्सा करण्याची वृत्ती दाखवीत

नव्हता.'

त्यांना दिसलेल्या या पार्श्वभूमीवर आपल्या ख्रिस्तधर्म प्रसाराचे कार्य त्यांना करायचे होते. या प्रॉटेस्टंट पंथीय ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी या संदर्भात आपल्या कार्याच्या सिद्धीसाठी कसा विचार केला ते पाहा.

मिशनरी आले तेव्हा मुंबईसारख्या शहरी वर वर्णिल्याप्रमाणे अंधारमय अवस्था होती. त्या अंधारास दूर करणारा एखादा प्रकाश-किरणही नव्हता. त्यांना सांगावे, शिकवावे तर लोकांच्या हाती द्यायला बायबलची एकही प्रत नाही. प्रादेशिक भाषांतून त्यांचे भाषांतर अथवा अर्थविवरण करणारे साधन नाही. मनास शांती देऊ शकेल, त्यांना देवस्वरूप समजून द्यायचे असेल तर त्यांच्या भाषेतून त्यांना ते साधन उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत या मिशनऱ्यांस प्रत्येक गोष्टीत लक्ष घालून ती स्वतः करणे अवश्य होते. सुदैवाची गोष्ट म्हणजे त्यातल्या त्यात एतद्देशीय भाषा शिकण्यास काही अंशाने व्याकरण ग्रंथ व शब्दसंग्रह या स्वरूपाची मदत मिशनऱ्यांस उपलब्ध होती. फारशा प्रवीण नसलेल्या शास्त्री-पंडितांकडून शब्दांची घडण व अर्थ त्यांना समजून द्यावे लागले. मराठी भाषेची मूलभूत तत्त्वे मोठ्या प्रदीर्घ प्रयत्नानंतर जनसंपर्काच्या सहाय्याने तुलनात्मक अभ्यास करून मिशनऱ्यांना समजावून द्यावी लागली. हळू हळू व्याकरण व शब्दसंग्रह यांच्याशिवाय प्रत्यक्ष जनसंपर्कानेच मिशनरी लोक इथल्या लोकांची भाषा शिकू लागले आणि थोड्याच कालावधींत लोकांच्या भाषेत येशूच्या अमाप दयेविषयी व प्रेमाविषयी सांगणे, शिकविणे मिशनऱ्यांना शक्य झाले.

या अमेरिकन मिशनऱ्यांनी ग्रंथनिर्मिती करण्यापूर्वीच मराठी भाषेच्या अभ्यासाला सुरुवात केली होती. हॉल व नॉट यांनी मराठी भाषेचा अभ्यास करून मराठी भाषेत ख्रिस्तीधर्म तत्त्वाच्या प्रसाराची सुरुवात केली. याचीच परिणती म्हणजे या पाश्चात्य ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मराठी भाषेत पुस्तके लिहिली व नव्या कराराचे भाषांतर करण्यास सुरुवात केली. कारण त्यांना येथील लोकांना त्यांच्या खऱ्या धर्माची शिकवण देणे आवश्यक वाटत होते. या बायबलच्या बरोबरच त्यांनी छोटी छोटी धर्मपुस्तके (ट्रॅक्टस) लिहिली व धर्मप्रसारासाठी लोकांना कधी फुकट तर कधी नाममात्र किंमत घेऊन विकली. इ. स. १८१५ मध्ये छपाईच्या कामासाठी अमेरिकन मिशनने मुंबई येथे रे. बार्डवेल यांच्या व्यवस्थापनाखाली एक लाकडी छापखाना सुरू केला. पुढे त्यावर काम भागेना म्हणून इ. स. १८२५ साली कलकत्त्याहून नवीन मराठी टाईप मागविले. तसेच नवीन टाईप पाडण्याच्या कामी या कामात कुशल असलेल्या टॉमस ग्रॅहम या अँग्लोइंडियन कारागिराची नेमणूक करून मराठी टाइपांच्या बाबतीत खूप सुधारणा केली आणि मराठी भाषेत खूप पुस्तके छापून प्रसिद्ध करण्याचे कार्य केले.

ख्रिस्ती मराठी लेखकांनी बायबलच्या भाषांतराचे केलेले प्रयत्न अन्यत्र

स्वतंत्र भागात विचारासाठी घेतले आहेत.

या प्रकरणात अमेरिकन मिशनने वा अन्य ख्रिस्ती मराठी लेखकांनी लिहिलेल्या धार्मिक ग्रंथाचा विचार करणे योग्य ठरेल.

रे. गॉर्डन हॉल – A Scripture tract –

प्रका: अमेरिकन मिशन, १८१७ पृ.८. अमेरिकन मिशनचे धर्मासंबंधी हे पहिले मुद्रित झालेले पुस्तक होय. रे. गॉर्डन हॉल हा या पुस्तिकेचा लेखक आहे पुस्तक उपलब्ध नाही. पण यासंबंधी मेमोरिल पेपर्स मध्ये माहिती मिळते ती अशी:–

" The first christian tract that was printed in the Marathi language was " A Scripture Tract " probably one of those prepared by Gordon Hall. It consisted of eight pages and was issued from the press on the 10th March 1817. The edition consisted of 1500 copies. This was the beginning of the Marathi christian literature. "

† प्रश्नोत्तरावली (Catechism) अमेरिकन मिशन, १८१९, पृ.४० याच्या १८२४, १८२६ व १८३१ व १८३५ मध्ये आवृत्त्या निघाल्या. या पुस्तकाची रचना प्रश्नोत्तरात्मक आहे. त्याचे स्वरूप असे आहे.

प्रश्न :– तुमचा उत्पन्न करणारा कोण ?

उत्तर :– परमेश्वर.

प्रश्न :– देवाने दुसऱ्या कोणत्या वस्तूस निर्माण केले ?

उत्तर :– त्याने धोंडे व डोंगर, ओहोळ व झाडे व जंतू व सूर्य व चंद्र व तार व सर्व प्रकारच्या वस्तू यांस निर्माण केले.

प्रश्न :– देवाने कशापासून सर्व वस्तू निर्माण केल्या ?

उत्तर :– त्याने शून्यापासून सर्व वस्तू निर्माण केल्या.

त्रिभुवनांची गोष्ट :– (The Three Worlds) अमेरिकन मराठी मिशन इ. स. १८२२ पृ. २०

ट्रॅक्ट सोसायटीने आपल्या मालेतील पहिले पुस्तक म्हणून हे पुस्तक प्रसिद्ध केले. याची दुसरी आवृत्ती इ. स. १८२५ साली निघाली. इ. स. १८३१ मध्ये तिसरी आवृत्ती निघाली. तिची २४ पृष्ठे आहेत. पुस्तकाचे स्वरूप व हेतू लक्षात घेण्यासाठी पुढील उतारा लक्षांत घ्यावा लागेल.

---

† ही प्रश्नोत्तरावली रे. जे. निकोल्स आणि रे. गॉर्डन हॉल यांनी लिहिली असून त्याचा आकार ३२ अशी नोंद कॅटलॉग ऑफ मराठी ख्रिश्चन लिटरेचर पृ. ७ वर आढळते.

" त्रिभुवन म्हणजेच लोक व नरक व पृथ्वी असे तीन लोक सृष्टींत आहेत." ह्या तीन लोकांचा उत्पन्न करणारा व धनी कोण ? तर परमेश्वराने आकाश लोक व पृथ्वी व नरक व सगळी सृष्टी यांस उत्पन्न केले आणि परमेश्वरावाचून ह्याचा उत्पन्न करणारा कोणी नाहीं. ह्यांचा कोणी धनी नाही, कोणी प्रभू नाहीं, कोणी राजा नाहीं. सर्व जे आकाशांत आणि सर्व जे पृथ्वीत आणि सर्व जे नरकांत त्या सर्वांस तो आपल्या इच्छेप्रमाणे चालवितो व सगळ्या सृष्टींत तो खरा देव सर्वदा सर्वत्र भरून राहातो. परंतु तो आमच्या डोळयांस दिसत नाहीं कारण की तो केवळ निराकार आहे आणि त्याला पाहणे आणि ओळखणे हे डोळयांचे काम नव्हे परंतु मनाचे काम आहे." (पृ. १.२)

ख्रिस्ती धर्मीयांनी मूर्तिपूजेविरुद्ध चालविलेल्या प्रचाराचे हे स्वरूप प्रारंभीच्या स्वरूपात कसे होते हे यावरून लक्षांत येईल.

देवाच्या दहा आज्ञा :– (Ten Commandments)

प्रका: अमेरिकन मिशन इ. स. १८२५ पृ. १६ याची दुसरी आवृत्ती १८२९ मध्ये प्रसिद्ध झाली. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीने या पुस्तकाची ९ वी आवृत्ती १८४१ साली प्रसिद्ध केलेली दिसते. त्याची पृष्ठसंख्या १४ आहे (दाते सूची) याशिवाय अमेरिकन मिशनमध्ये " परमेश्वराच्या शास्त्रातील दहा आज्ञा व इतर वाक्ये " नावाची ८ पृष्ठांची एक पुस्तिका अहमदनगर मिशन (कॉलेज) मध्ये आहे. त्याच्यावर काळ व आवृत्तीचा निर्देश नाही.

On Workship of God :– अमेरिकन मिशनने प्रसिद्ध केलेल्या या पुस्तिकेची पृष्ठसंख्या ३२ असून ते इ. स. १८२२ मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आले आणि रे. ॲलनने तिची दुसरी आवृत्ती १८३२ मध्ये सुधारून वाढविली.

गॉर्डन हॉलची ही धार्मिक ग्रंथनिर्मितीची कामगिरी त्याने आपल्या मृत्यू-पर्यंत म्हणजे १८२६ पर्यंत केलेली आहे. याशिवाय त्याने शिक्षणविषयक केलेल्या कामगिरीचा विचार अन्यत्र स्वतंत्रपणे केलेला आहे.

सॅम्युएल नॉट हा गॉर्डन हॉलचा सहकारी होता. त्याने मराठी भाषेचा अभ्यास केला होता. त्याने मराठी भाषेत काही ग्रंथनिर्मिती केलेली दिसत नाही. तो इ. स. १८६९ साली अमेरिकेत मरण पावला.

गॉर्डन हॉलचा तिसरा सहकारी सॅम्यूएल न्यूवेल यान शुभवर्तमान नावाची १२ पृष्ठांची एक पुस्तिका लिहिली व अमेरिकन मिशनने ती इ. स. १८२४ साली प्रसिद्ध केली. तिची दुसरी आवृत्ती १८२४ व तिसरी आवृत्ती १८२६ साली प्रसिद्ध झालेली दिसते. याच्या मराठीत नऊ आवृत्त्या निघाल्याचा उल्लेख सापडतो. देवनागरी किंवा बालबोध लिपीप्रमाणे या पुस्तकेच्या मोडीतही प्रती काढण्यात आल्या होत्या. गुजरातीतही ही पुस्तिका छापण्यात आली होती. अहमदनगर येथील मिशन

(कॉलेज) मध्ये हे पुस्तक असून त्याची पृष्ठसंख्या १७ आहे. पुढील उताऱ्यावरून पुस्तकाचे स्वरूप लक्षात येईल—

" उद्धार प्राप्त होण्यासाठी आपण काय करावे। हा विचार मोठा आहे ।। जर तुम्हीं या विषयी समजाल। तर पुढील गोष्टी जाणा ।। "(पृ. ११)

पुस्तकाच्या अखेरीस लोकांना खिस्तीधर्माची माहिती कोठे मिळेल. धर्मपुस्तके कोठे मिळतील याविषयी माहिती देऊन पुस्तक संपविले आहे. या पुस्तकाचा अखेरचा मजकूर खिस्ती धर्मप्रसारकांचा हेतू स्पष्ट करणारा आहे.

" हे वाचणारा। जे त्वां आतां वाचले। ते परमेश्वराच्या पुस्तकांतील मुख्य गोष्ट आहे। लोकांचा उद्धार होण्यासाठी ते धर्मपुस्तक परमेश्वराने दिल्हे आहे आणि जर तूं ते पुस्तक अधिक जाणावयास इच्छितोस। तर मुंबई किंवा बाणकोटांत किंवा हर्णइंत। किंवा सुरतेत। ते मिळेल। आणखी या ठिकाणी हे शुभवर्तमान सांगणारे राहात आहेत। त्याजजवळ तुम्ही जाऊन आपल्या मनातील सर्व संशय सांगा। आणि त्यांच्याजवळ उपदेश मागून शांत व्हा ।। आणि विशेषेकरून देवाची प्रार्थना करा। हे शुभवर्तमान आपणास समजावे आणि मागे सांगितलेल्या मार्गात आपण चालावे आणि ह्यांकडून आपला उद्धार व्हावा म्हणोन देवाच्या जवळ ज्ञान व सुबुद्धी मागा ।।

होरॅशिओ बार्डवेल :-

हा १ नोव्हेंबर १८१६ रोजी मुंबईत आला तो मराठी भाषा शिकला व व मिशनचे काम त्याने सुरू केले. अमेरिकन मिशनने जो मुंबईत छापखाना सुरू केला त्याची व्यवस्था बघण्याचे काम याच्याकडे होते. इ. स. १८२१ पर्यंत छापखान्याचे काम याने पाहिले. खिस्ती मराठी ग्रंथाच्या मुद्रणाच्या कामाबरोबरच त्याने धार्मिक ग्रंथ लिहिण्याचे काम केले. त्याच्या नावावर पुढील पुस्तके प्रसिद्ध झालेली दिसतात.

येशू खिस्त याचे अवतारकृत्याची बखर – History of Our Lord

प्रकाः अमेरिकन मिशन १८२० पृ. २४

ह्या पुस्तकाची १८२१ ची दुसरी आवृत्ती अहमदनगर येथील अमेरिकन मिशन (कॉलेज) मध्ये असून त्याचे नाव History of the blessed saviour असे बदलण्यात आले आहे. या पुस्तकाचे मराठी नाव " आमचा धन्य उद्धरणारा जो यिशु याचे अवतार कृत्याची बखर " असे आहे. याची १६ पर्वे आणि एकंदर पृ. २४ आहेत, येशू खिस्ताचा जन्म ।। पर्व ।। १ ।। यापासून ते येशू आपले शिष्यांस दर्शन देऊन स्वर्गास गेला ।। पर्व १६ ।। येथपर्यंत बखर आहे. त्यांतील भाषेचा नमुना पहा—

" येशु खिस्ताचा जन्म पूर्वीच स्वर्गदूताकडून सांगितला होता ।। प्रांत गालिली

यांतील नाजरत गावांतील मार्या नामे एक कुमारी ती दाविदाचे वंशातील योसेफ नामे एक माणूस याला मागणी करून दिल्ही होती। तिजकडे गाब्येल नामे दूत ईश्वरा कडून पाठविला होता ॥ आणि तो दूत तिला बोलिला सलाम फार कृपा मिळविलेली अशी तू आहेस । प्रभू तुझे जवळ आहे स्त्रियांमध्ये तुं धन्य आहेस ॥ मग ती त्याला पाहून त्याचे गोष्टीवरून बावरी जाली तेंव्हा तो दूत तिला बोलिला हे आयी भिऊं-नको कां त्वां ईश्वराजवळ कृपा मिळविली आहे. ॥ पृ. १ ॥

इ. स. १८४० मध्ये अमेरिकन ट्रॅक्ट सोसायटीने मिशन प्रेसमध्ये छापले त्याची पृष्ठ संख्या ३०४ आहे. त्याचे नावही " आमचा तारणारा प्रभू येशू खिस्त याविषयी सुवर्तमान, पवित्र लेखातून काढले " असे बदलण्यात आलेले दिसते. (The history of our lord and Saviour Jesus Christ, Complied from Gospels.)

इ. स. १८४१ मध्ये याची चवथी आवृत्ती मोडीतून प्रसिद्ध झाली. या आवृत्तीची पृष्ठ संख्या ४६५ इतकी आहे.

‡ Parables of Our Lord.

अमेरिकन मिशन, १८२० पृ. १८. अमेरिकन मिशन नगर येथे या पुस्तकाची १८२१ची आवृत्ती असून तिचे इंग्रजी नाव Parables of our blessed saviour असे आहे. या पुस्तकाचे मराठी नाव " आमचा धन्य उद्धरणारा जो येशू खिस्त याने जे दृष्टांत सांगितले त्यातून काही काढून या वखरीत लिहिले आहेत. "

या पुस्तकात एकूण ९ दृष्टांत आहेत. नमुन्यादाखल हा पाचवा दृष्टांत पहा–

" जर ईश्वर पाप्यास वाचावयास देतो, तर कारण असे आहे कीं त्यास पश्चात्ताप करण्यास अवकाश असावा, हे अंजिराचे वांझे झाडाचे दृष्टांतावरून जाणावे– लुक १३–६–६ "

कोणी येकाचे बेलबागातील अंजीराचे येक झाड लाविले होते आणि त्याचे फळ शोधावयास येऊन कांही सांपडले नाहीं, तेंव्हा तो माळ्यास बोलिला, पहा, तीन वर्षापर्यंत या अंजीराचे झाडापासून फळ शोधीत आलो परंतु मला सांपडले नाही. त्याला कापून टाक, ते भूमीस व्यर्थ का करिते ? तेंव्हा तो उत्तर देऊन त्याला बोलिला, हे प्रभू मी त्याचे भोवते खणितो आणि खत घालितो, तोपर्यंत हे वर्ष राहू दे. कदाचित ते फळ देईल नाहीतर मग त्याला कापून टाकसील (पृ. १२)

Miracles of our Lord.

अमेरिकन मिशन, इ. स. १८२० पृ. ३६ या पुस्तकाच्या इ. स. १८२६ च्या अहमदनगर मिशनच्या आवृत्तीचे नाव Miracles of our Blessed Saviour असे आहे व मराठी नाव " आमचा धन्य उद्धारणारा, जो येशू खिस्त याने जे

‡ मखिलीमध्ये पृष्ठसंख्या २२ दिली आहे. पृ. ४१.

चमत्कार केले त्यातून काही निवडून या वहीमध्ये सांगितले आहे. " असे आहे.

यात येशू खिस्ताचे तेरता चमत्कार देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रातील लोकांची धार्मिक श्रद्धा व चमत्कारांवरील त्यांचा विश्वास लक्षात घेऊन हे पुस्तक लिहिलेले दिसते.

एक चमत्कार सांगितला म्हणजे इतर निवेदन स्वरूप सहज लक्षांत येईल. यशू कोड लागलेल्या व्यक्तींना शुद्ध करतो त्यासंबंधीचा हा चमत्कार पाहा–

....आणि येशू यरूशलेमास जात होता, तेंव्हा असे जालें, कीं शोमरोन व गालील यांचेमधून गेला आणि तो एके गांवात शिरत असता, दाहा कोढी माणूस त्याला भेटले, ते दूर उभे राहिले आणि उंच स्वर काढून बोलिले, येशू गुरू, आम्हावर दया कर आणि तो पाहून त्यास बोलिला, तुम्ही जाऊन आपणांस उपाध्यांसी दाखवा आणि ते जात असतां असे जालें ते शुद्ध केले गेले. (पृ. २८–२९)

याशिवाय बार्डवेलच्या नावावर खालील पुस्तकांची नोंद सापडते.

(१) Discourses of our Lord अ. मि. १८२० पृ. २४

(२) Sermon on the Mount अ. मि. १८१९ पृ.

(३) Useful Instructions अ. मि. १८२५ पृ. ६३

(४) History of Joseph अ. मि. १८२० पृ. १०७

याशिवाय ब्रूसने Epistles of James & Jude या बार्डवेलच्या पुस्तकाचा उल्लेख केलेला आढळतो. पुस्तके पाहावयास मिळत नाहीत.

रे. जॉन निकोल्स †

याने लिहिलेल्या ' प्रश्नोत्तरावली 'ची माहिती गॉर्डन हॉलच्या प्रश्नोत्तरावलीच्या संदर्भात पूर्वी आलेली आहे. याचे अन्य देवांची परीक्षा (Trial of false Gods) अमेरिकन मिशन इ.स. १८२०चे हे पुस्तक आहे. कुठे मिळत नाही. इ. स. १८२६ साली प्रसिद्ध झालेल्या बायबलच्या भाषांतरांत याचा सहभाग होता.

मुंबईत इ. स. १८१३ मध्ये अमेरिकन मिशनची स्थापना झाली. त्यानंतर त्यांनी छापखाना सुरू केला आणि मराठी व अन्य प्रादेशिक भाषांमध्ये पुस्तके व पुस्तिका प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली.

मिशनरी आपली पुस्तके सर्व वर्गातील लोकांस वाटीत. छापील पुस्तके मिळू लागल्यामुळे लोकांची पुस्तके वाचण्याची गोडी वाढू लागली. मिशनऱ्यांनी शाळाही सुरू केल्या होत्या त्यामुळे पुस्तकांचा वाचकवर्ग वाढत होता.

† हा गॉर्डन हॉलचा सहकारी मिशनरी १८१८ मध्ये हिंदुस्थानात आला. १८२४ मध्ये दक्षिण कोकणात धार्मिक कामासाठी गेला व तिथेच ९ डिसेंबर १८२४ मध्ये तापाने मरण पावला.

मिशनऱ्यांची ग्रंथलेखनाची व ग्रंथमुद्रणाची ही परंपरा पुढेही वेगाने चालू राहिली. आता धर्मांतर केलेले नवख्रिस्तीही ख्रिस्तधर्म प्रसार, पाश्चात्त्य ज्ञान विज्ञानाचा, संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी मराठीत लिहू लागले. प्रारंभी युरोपियन मिशनऱ्यांना भाषेबाबत जी अडचण निर्माण झालेली होती ती आता बरीच कमी झालेली होती, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

ॲलन ग्रेव्हज

मुंबईत अमेरिकन मिशनची स्थापना झाल्यावर त्याची एक शाखा २८ डिसेंबर १८३१ मध्ये अहमदनगर येथे स्थापण्यात आली, आणि त्यावेळी ॲलन ग्रेव्हज्, हॉलीज रोड व हार्वे हे तीन मिशनरी अहमदनगर येथे आले. अहमदनगर येथील फऱ्याबाग येथे ह्या अमेरिकन मिशनची पहिली जागा होती. ॲलन ग्रेव्हज १८३१ पासून आपल्या पत्नीसह अहमदनगर येथे राहात होता. याच ठिकाणी तो ३० डिसेंबर १८४३मध्ये मरण पावला. याने केलेल्या बायबलच्या भाषांतरासंबंधीची माहिती अन्यत्र येणार आहे. त्याशिवाय त्याने लिहिलेल्या पुस्तकांची माहिती येणेप्रमाणे –

(१) Marathi Sermon on Joshua अमेरिकन मिशन, १८२५ पृ. २४.

(२) **इस्त्रापलास हितोपदेश** – अमेरिकन मिशन पृ. ७८. ही दोनही पुस्तके उपलब्ध नाहीत.

याने लिहिलेल्या "गीतांचे नवीन पुस्तकां"चा विचार ख्रिस्ती मराठी लेखकांचे उपासना वाङ्मय या प्रकरणात स्वतंत्रपणे केलेला आहे.

रे. डेव्हिड ओ. ॲलन –

हा २७ नोव्हेंबर १८२७ रोजी भारतात आला व १२ फेब्रुवारी १८५३ रोजी परत मायदेशी गेला. इ. स. १८४२ ते १८५० पर्यंत आठ वर्षे मिशन प्रेसचा सुपरिटेंडेंट होता. बॉंबे ट्रॅक्ट सोसायटीचा सेक्रेटरी म्हणून त्याने महत्त्वाचे काम केले. मिशनऱ्यांची लहानमोठी धार्मिक पुस्तके छापण्यात या सोसायटीचा मोठा भाग आहे.

आपले बायबलच्या भाषांतराचे काम, प्रेसचे काम आदी अन्य कामे सांभाळून याने केलेली वाङ्मयसेवा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

शास्त्रांतील उपदेशसार – Summary of Scriptures Doctrines अमेरिकन मिशन १८३०, पृ. ८७

या पुस्तकाची तिसरी आवृत्ती १८३३ मध्ये प्रसिद्ध झाली. तिची पृ. संख्या ५६ आहे व १६ अध्यायांत विभागलेली आहे. पहिल्या अध्यायात देवाचे गुण, व दहा आज्ञा दिल्या आहेत. नंतरचे अध्याय माणसाचे पाप, तारणाराचा जन्म, येशू

ख्रिस्ताची कामे, पवित्र आत्म्याची कारणे, खऱ्या ख्रिस्त्याचे सुख अशा विषयांना वाहिलेले आहे.

शास्त्रातील उपदेशसार : Summary of Scriptures doctrines ची आठवी आवृत्ती १८५१ मध्ये अमेरिकन मिशनने बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे वतीने प्रसिद्ध केलेली आहे. अहमदनगर मिशनमध्ये ही प्रत आहे. पृ. ७४.

लेखकाचे नाव दिलेले नाही. या पुस्तकांत एकूण १९ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायाच्या नावानुसार असलेला आशय २–३पानांत सांगितला आहे. अध्यायाच्या अखेरीस प्रश्न दिलेले आहेत.

याच्या पुढील तीन पुस्तकांच्या नोंदी सापडतात पण पुस्तके उपलब्ध नाहीत. ती तीन पुस्तके अशी.

(१) Summary of the Holy Scriptures अमेरिकन मिशन, इ. स. १८३२, पृ. ८४.

(२) On the Worship of God अमेरिकन मिशन. इ. स. १८३२; गॉर्डन हॉलने १८२२ साली काढलेल्या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ती सुधारून १८३२ मध्ये प्रसिद्ध केलेली दिसते. याची पृष्ठसंख्या ३२ होती. ती माहिती मेमोरिअल पेपर्स पृ. ११२ वर दिली आहे.

(३) **तारणारा जो येशू ख्रिस्त याविषयी** (History of our Saviour) अमेरिकन मिशन इ. स. १८३४ पृ. ११६. याशिवाय शास्त्राचा सारांश (Compendium of the Bible) (स्वतंत्र) अमेरिकन मिशन १८३४ पृ. ३८.

रे. सॅम्युएल न्यूवेल याच्या मूळ ग्रंथाचे Summary of the Holy Scripture या पुस्तकाचे संक्षिप्तीकरण इ. स. १८३२ साली प्रसिद्ध झाले. मूळ ग्रंथाची पृ. ४५, १८३४ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची पृष्ठसंख्या ३८ आहे. मोठ्या ठळक अक्षरांत छापलेली ६० पृष्ठांची एक आवृत्ती छापलेली आहे. केव्हा छापली यासंबंधी नोंद नाही. अमेरिकन ट्रॅक्ट सोसायटीचे प्रकाशन. अहमदनगर येथे अमेरिकन मिशनमध्ये या पुस्तकाची १८३५ मधील शिलाछापाची एक आवृत्ती आहे. तिची पृष्ठे ६० आहेत.

१८४५ च्या आवृत्तीत लेखकाचे नाव दिलेले नाही. पुस्तकाचा आशय थोडक्यात असा आहे.

देवाने सृष्टी उत्पन्न कशी केली. एदन देशांतला बाग, मनुष्याचे पाप, अब्राहमास घडलेले दर्शन, तारणारा येणार असल्याचे भाकित, येशूचा जन्म, जीवन मरण चमत्कार, शिकवण, प्रेषित, पुनरुत्थान, ख्रिस्तानुयायी लोकांचा छळ वगैरे सर्व कथा थोडक्यात, पाल्हाळ न करता आकर्षक रीतीने गुंफली आहे.

अखेरीस येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचे आवाहन व देवाची प्रार्थना आहे. (१८४५ ची आवृत्ती).

१८४५ मध्ये एक आवृत्ती छापली असून ४३ पृष्ठे आहेत. मोडी लिपीत हे पुस्तक १८३७ मध्ये छापलेले असून त्याची ८८ पृष्ठे आहेत.

या पुस्तकांतील भाषेचा नमुना पाहा (आवृत्ती १८३४)

" ज्या देवाने सर्व मनुष्यास उत्पन्न केले, ज्याने सर्वांस बुद्धि दिल्ही व जो सर्वांचे पोषण व संरक्षण करणारा, त्याची ओळख व सेवा केली पाहिजे, या विषयी सर्व लोक मान्य आहेत. व कसे समजावे, आणि त्याची सेवा कशी करावी, हे ज्ञान प्राप्त होण्याचे उपाय दोन प्रकारचे आहेत, म्हणजे त्याच्या कामांवरून व त्याच्या शास्त्रावरून. (पृ. १५)

प्रार्थना (Prayer) अमेरिकन मिशन. इ. स. १८३४ पृ ९. या पुस्तकाची थोडक्यात माहिती अशी.

" प्रार्थनेमध्ये अर्थ पुष्कळ आहेत तर सर्व लोकांनी देवाची प्रार्थना अवश्य करावी. आपल्या पापाचे स्मरण अवश्य करून ती देवाजवळ कबूल करावी आणि येशू ख्रिस्ताच्या नामाने व त्याच्या पुण्यामुळे क्षमा मागावी. मग पुढे देवाच्या आज्ञा प्रमाणे चालून तरून जावे. "

रे सायरस स्टोन

हा भारतात २९ डिसेंबर १८२७ रोजी आला व २०जून १८३८ मध्ये परत गेला. १८३१ ते १८३३ या काळात अमेरिकन मिशनचा सुपरिंटेंडेंट म्हणून त्याने काम केले. त्याच्या नावावर खालील पुस्तके प्रसिद्ध झालेली दिसतात.

(१) Concerning Salvations अमेरिकन मिशन १८३३ पृ. ८
(२) True Remedy for Sinners अमेरिकन मिशन १८३३ पृ. ८
(३) The birth of christ अमेरिकन मिशन १८३३ पृ. ८
(४) The True atonement अमेरिकन मिशन १८३३ पृ. ८
(५) Preparation for Death अमेरिकन मिशन १८३४ पृ. ९
(६) Good instructions अमेरिकन मिशन १८३४ पृ. १२

याचे आत्म्याविषयी लेकराची पहिली पोथी हे पुस्तक अमेरिकन मिशनमध्ये उपलब्ध आहे.

आत्म्याविषयी लेकरांची पहिली पोथी (Child's book on the Soul. Part,) भाषांतर अमेरिकन मिशन १८३६ पृ. ९२ व आत्म्याविषयी लेकराची दुसरी पोथी १८३७ अमेरिकन मिशन प्रेस, पृ. ११७. अहमदनगर मिशनमध्ये हे पुस्तक आहे. पण दुसऱ्या पोथीचे श्रेय रे. सेंडोल. बी. मंगर यांना देण्यात येते. ह्या पुस्तकाचे लेखन संभाषणस्वरूप आहे. आई गंगाबाई आणि मुलगा या दोघांच्या संभाषणातून माणसाचा जीव, फुलांचा जीव, कुत्र्यासारख्या प्राण्याचा जीव यांतील सारखेपणा आईने मुलांस समजावून सांगितला आहे. तसेच देव, देवाचे सामर्थ्य त्याने माणसास काय काय निर्माण करून दिले–धन, धान्य, पाणी, हवा इत्यादी. पण

माणूस पाप करतो. पाप म्हणज काय ? कल्याणकारी देवावर प्रीती करावी. वगैरे विचार व्यक्त केलेले आहेत.

या दोन्ही प्रती एकत्र बांधलेल्या आहेत. त्यातील प्रश्नांवरून असे दिसते की स्टोनच्या पहिल्या पुस्तकाचे काम पुढे मंगरने चालविले असावे. प्रस्तावनेत तो " आत्म्याविषयी म्या पहिली पोथी लिहिली, तिजमध्ये सांगितले होते की कदाचित मी दुसरी एक लहान पोथी लिहून तुम्हांस आपल्या आत्म्याविषयी काही आणखी सांगेन. जी पोथी म्यां केली तीच ही आहे." संभाषणानंतर शेवटी परीक्षेसाठी प्रश्नही देण्यात आले आहेत. (हे भाषांतर आहे).

रे. सेंडॉल बी. मंगर

आत्म्याविषयी लेकराची दुसरी पोथी हे पुस्तक वगळता मंगरच्या नावावर—

(१) प्रार्थनेसंबंधी प्रश्नोत्तरे (Catechism on the Lord's Prayer) अमेरिकन मिशन, १८३६ पृ. ३५

(२) ज्ञानाचे मार्ग (Wisdom and her ways) अ. मि. १८४१ पृ. ३०

(३) नवे उत्पन्न (The New Creature) अ. मि. १८४२ पृ. ३१

(४) Old Testament Selections संपादन-अमेरिकन मिशन १८५१ पृ. २२५

(५) खरेपणाची युद्धे (Conflict of Truth) अ. मि. १८५८ पृ. २४

(६) देव मनुष्य, शास्त्र ह्याविषयी विचार (The scriptures and What they teach of god and Man) ट्रॅक्ट सोसायटी, पृ. ६३

(७) Salvation of Jusus Christ अ. मि. १८६६ पृ. ६४

वरील पुस्तके मात्र कुठे उपलब्ध नाहीत.

रे. हेन्री बॅलंटाईन

शास्त्रातील मुख्य सिद्धांताविषयी प्रश्न

(Topical Questions on the Scriptures)

इ.स. १८४१ पृ. १०१. ह्या पुस्तकाची इ. स. १८४६ साली अमेरिकन मिशन प्रेसने प्रसिद्ध केलेली आवृत्ती अहमदनगर कॉलेजमध्ये आहे. लेखकाचे नाव दिलेले नाही. इंग्रजीवरून भाषांतर केल्याचा निर्देश असून पृष्ठसंख्या ९४ आहे.

प्रारंभी धड्यांची अनुक्रमणिका, शास्त्रातील निरनिराळ्या पुस्तकांच्या नावाचा संक्षेप दिला आहे.

प्रत्येक धड्यात साधारणत: पंचवीस प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर कुठे आहे ते लगेच सांगितले आहे. त्यासाठी संक्षेपाची योजना केलेली आहे.

उदा. धडा पहिला–माणसे पापी आहेत.

(१) माणसांचा स्वभाव कसा आहे, म्हणून शास्त्रात सांगितले आहे ? प. पु. ६:५, १२:१२ स्तो. १४:२,३.

(२) ' पापाकडे त्यांची अंतःकरणे वळली ' याचा अर्थ काय ?

(३) सर्वच लोक असे आहेत की काय ? उप ७:२०, २ काळ ६:३६ यो १.८.१०.

अशा प्रकारे सबंध पुस्तकाची रचना आहे. एकूण धडे चाळीस आहेत. माणसे पापी आहेत हा पहिला धडा तर पुन्हा उठणे आणि न्याय ठरविणे हा चाळिसावा धडा आहे.

निरनिराळे धर्म (Various Systems of Religions)

अमेरिकन मिशन, १८५१ पृ. १९ निरनिराळ्या धर्मांविषयी यांत थोडक्यात माहिती दिलेली आहे.

मतपरीक्षा (Examination of Religions) भाग १, २, १८५६ पृ. ७६ व १३६

मूळ संस्कृतवरून हे पुस्तक अनुवादित केलेले आहे. या पुस्तकाचा मुख्य उद्देश ख्रिस्ती धर्मकल्पना सत्याला धरून आहेत असे पटवून देणे, हा आहे.

याशिवाय हेन्री बॅलंटाईनने बायबलचे भाषांतर करण्याच्या कामी मोठी कामगिरी केली आहे. तसेच त्याने ज्ञानोदयाचा संपादक व संस्थापक म्हणून केलेले काम फार महत्त्वाचे आहे. ज्ञानोदयामुळे महाराष्ट्रातील धर्मांतर केलेले ख्रिस्ती लोक मराठी वाङ्मय लिहिण्यास प्रवृत्त झालेले दिसतात. ज्ञानोदयाचा व मराठीतील ख्रिस्ती लोकांनी चालविलेल्या नियतकालिकांच्या कार्याचा आढावा अन्यत्र घेतलेला आहे. त्यावरून ख्रिस्ती मराठी नियतकालिकांचे स्वरूप व कार्य आपल्या लक्षात येईल.

मोल्सवर्थ

कोशकर्ता मोल्सवर्थ ख्रिस्ती धर्मावर अतीव श्रद्धा असलेला एक धार्मिक प्रवृत्तीचा अभ्यासक होता. त्याचा परिचय भाषिक वाङ्मयाच्या प्रकरणात दिला आहे. त्याच्या नावावर तीन धार्मिक पुस्तके लिहिलेली आढळतात.

(१) **पापपीडितास शांती** : (Relief to the Sin-burdend) ट्रॅक्ट सोसायटी, इ. स. १८२९ पृ. १९

(२) **ज्ञानमार्गाची सूचना** : भाषांतर, ट्रॅक्ट सोसायटी, १८४९ पृ. ५०

(३) God being Compassianate why does man suffer ? ट्रॅक्ट सोसायटी, इ. स. १८५८ पृ. १२

यांपैकी अहमदनगर मिशनमध्ये ' पापपीडितांस शांती ' या पुस्तकाची १८३७ सालची १४ पृष्ठांची व १८३९ सालची १९ पृष्ठांची तिसरी आवृत्ती उपलब्ध आहे. या पुस्तकातील एक उतारा पुस्तकाचा भाषिक परिचय करून देण्यास उपयुक्त ठरेल.

" हे दयाळू देवा म्या पाप पाशात रहावे पापपीडित असावे आणि पुढे पाप परिणाम पावावा ही नव्हे तुझी इच्छा आणि येशूने जर माझे पापाचा भार उचलिला असला आणि माझे पापाचे शासन जर आपल्या अंगी सोसिले असले आणि माझे नावावर जर का संपादिलेले पुण्य लिहिले असले तरी ही असी असताना कशी माझी अर्जी निष्फळ पडेल. माझे आशेची कसी निराशा होईल. मी कृपा व करुणा व प्रीती व प्रसन्नता का पावू नये ? " (पृ. ७) बाकी पुस्तके उपलब्ध नाहीत.

थॉमस कँडी

मराठी भाषेच्या भाषिक व धार्मिक अंगाकडे मनोमन लक्ष देणारा आणखी एक ख्रिस्ती अभ्यासक म्हणजे थॉमस कँडी हा होय. भारतात हा गृहस्थ जवळ जवळ पन्नास वर्षे होता. मोल्सवर्थच्या कोश कार्यात याचा मोठा सहभाग होता. भाषिक प्रकरणात त्याचा विचार आला आहे. त्याने धार्मिक विषयावर अनेक पुस्तके, पुस्तिका–ट्रॅक्टस् लिहिले आहेत. मोल्सवर्थप्रमाणे कँडी हा मताने धार्मिक प्रवृत्तीचा होता. त्याच्या प्रकृति–दोषामुळे त्याला धर्मोपदेशक बनता आले नाही. पण धर्मविषयक काम करण्याची त्याची मूळचीच प्रवृत्ती होती. ट्रॅक्ट सोसायटी मराठीमधून प्रसिद्ध करीत असलेली अनेक पुस्तके त्याने तपासून दिली होती आणि स्वतः ट्रॅक्ट सोसायटीला काही पुस्तके लिहून दिली होती. त्याच्या धार्मिक वाङ्मयाचा आढावा थोडक्यात असा घेता येईल.

खरा मार्ग कोणता याचा विचार :–

(Inquiry concerning the true way) आवृत्ती १ ली ट्रॅक्ट सोसायटी, १८२९ या पुस्तकाच्या इ. स. १८३८ च्या चौथ्या आवृत्तीत वरील खरा मार्ग कोणता याचा विचार असे पुस्तकाचे नाव दिले आहे. खरा मार्ग कोणता हे सांगताना या पुस्तकात कँडी लिहितो–

"परमेश्वराचा पुत्र जो येशू ख्रिस्त तो एकला जगाचा तारणारा, त्या एकल्यानेच जगाला तारायासाठी आपला जीव दिल्हा. म्हणून जगातील सर्व माणसांनी त्याला शरण येऊन त्याजवर विश्वास ठेवला पाहिजे. माझी पापे त्वा क्षमा करून मजवर कृपा करावी अशी प्रार्थना अनन्य भावाने जो कोणी करील, त्याची प्रार्थना परमेश्वर ऐकेल व त्या प्रार्थना करणारांची पापे क्षमा करील." पृ. २६७.

प्रस्तुतचे पुस्तक मोडी लिपीत छापलेले आहे.

खऱ्या धर्माची चिन्हे :–

अमेरिकन मिशन, इ. स. १८२९ यात खऱ्या धर्माची चिन्हे सांगताना कँडी लिहितो–

" जो धर्म देवाकडून आहे तो सकळ जातीला उपयुक्त असावा. तो सर्व

माणसाच्या कामास पडावा तो सर्वांस चांगला व्हावा आणि जो धर्म सर्वांस चांगला नव्हे. तो देवाकडचा नव्हे. खऱ्या आणि खोट्या धर्माच्या अशा खुणा आहेत त्या खुणा ध्यानात आणून खरा धर्म कोणता याचा विचार करावा."

भाव कोण्हावर ठेवावा याचा विचार (In Whom Shall We Trust ?) अमेरिकन मिशन, १८२९ हे पुस्तक मोडीत छापलेले आहे. या पुस्तकात हिंदू देवता विशेषतः लिंगपूजा कशी चुकीची आहे, हे सांगण्यासाठी कँडी लिहितो–

" शिवाला खरा देव कसा म्हणावा, अहो तुमची बुद्धी कोठे आहे. तुमची लाज कोण्हेकडे गेली या गोष्टींचा पुरतेपणी विचार करावा. "

" हिंदु लोकांच्या बायका प्रति दिवशी लिंगाची पूजा करतात अशी पूजा केल्याने त्यांची लज्जा वाढती की कमी होती हे पहावे. "

या पुस्तकाच्या १८३६ व १८३७ मध्ये निघालेल्या आवृत्त्या अहमदनगर कॉलेजमध्ये आहेत.

येशूख्रिस्तानें जी प्रार्थना आपल्या शिष्यांस सांगितली तिजवर टीका (Exposition of the lord's prayer) ट्रॅक्ट सोसायटी, इ. स. १८३६. ख्रिस्ताला सर्वांनी शरण जावे हे सांगताना या पुस्तकातील पृष्ठ ४४ वर तो लिहितो–

" माणसांनो काळजी धरा. स्वस्थ बसू नका, तुम्ही पापांत स्वस्थ बसलात तर तुमचा सत्यानाश होईल. तुम्ही मरणानंतर नरकात बुडाल. अहो मित्रांनो हे तुम्हांस प्राप्त न व्हावे म्हणून एकला जो तारणारा एकला जो सद्गुरू म्हणजे येशू ख्रिस्त त्याला शरण येऊन त्याच्या पाया पडा ह्याजवर भाव ठेवा. ह्याचे शिष्य व्हा मग येशू तुमचे कल्याण करील. "

कँडीच्या नावावर एकूण सात धार्मिक पुस्तके असल्याची नोंद मिळते. पण प्रत्यक्षात वरील पुस्तके पाहावयाला मिळतात.

देवाच्या दहा आज्ञा – ट्रॅक्ट सोसायटी १९२९ पृ. २७ (म. ख्रि.)

पश्चात्तापाची गोष्ट – ट्रॅक्ट सोसायटी १८३५ पृ. २८ (म. ख्रि. ४७) येशू ख्रिस्ताचा धर्म शिकविणारी गोष्ट – ट्रॅक्ट सोसायटी १८३६ इ. ६१ म. ख्रि. १७)

ही पुस्तके कुठे उपलब्ध नाहीत.

परमेश्वराच्या दहा आज्ञा – प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, **मुद्रक** – अमेरिकन मिशन छापखाना, मुंबई. आवृत्ती १२ वी, १८४८ पृ. ३३ (दाते सूची)

निरनिराळे धर्म – मुंबई १८५१, (दाते सूची)

बाबा पद्मनजी

हिंदु लोकांच्या सणाविषयी निबंध –

लेखक– बाबा पद्मनजी, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, मु. अॅग्लो

व्हर्नाक्युलर प्रेस, १८५३.

हिंदु लोकांच्या सणाविषयी ग्रंथरचना करावी व त्यांत पुढील विषय यावेत याबाबत एक निवेदन मुंबईच्या ट्रॅक्ट सोसायटीने केले होते. ते असे– " हिंदू लोकांचे सण पुष्कळ आहेत. त्या सर्वांचे वर्णन करणे कठीण म्हणून निबंध रचणाराने त्यातील आठ किंवा दहा निवडून त्याचे विवरण करावे आणि होळीच्या सणाविषयी मराठी भाषेत ग्रंथ झाले आहेत. त्यावर फार लिहू नये. सणाचे वर्णन करताना त्यासंबंधी क्रिया, कर्मे व त्यातील ज्या कित्येक गोष्टी सद्‌बुद्धीस व सद्-धर्मास विरुद्ध असतील त्यात त्यांच्या आचरणाने काय परिणाम होतात हे सर्व दाखवावे. या ग्रंथाची ६०–७० पेक्षा अधिक पाने असू नयेत. (ज्ञानोदय ९ मे १८५२) (पृ. १३०)

या निवेदनानुसार बाबांनी ८६ पृष्ठांचा निबंध लिहून पाठविला त्या निबंधास १०० रुपये चे बक्षीस मिळाले. पुढे तो १८५३ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला.

" जो सण ईश्वर स्थापित आहे व ज्यापासून गौरव दृष्टीस पडतो, ज्यापासून आपली भक्ति व श्रद्धा वाढते, तो सण पाळावा. ज्या सणापासून घरात ऋण व दारिद्र येते, प्रकृती बिघडते, सदाचरणास कलंक लागतो, नीतीस भ्रष्टत्व येते, मनास त्रास होतो, शरीरी आळस येतो तो सण पाळू नये. "

अशा, निकषानुसार पुस्तकांत अक्षयतृतीया, वटसावित्री, महाएकादशी, नाग-पंचमी, नारळी पौर्णिमा, गोकुळअष्टमी, गणेशचतुर्थी, दसरा, दिवाळी, होळी इत्यादि सणांचा विचार केला आहे.

सणांच्या निमित्ताने कोणत्या दुष्ट राक्षसांचा आपल्या देशात शिरकाव झाला आहे, ते दुष्ट राक्षस आपल्या देशातील लोकांचे शत्रू बनून त्यास गुलामाप्रमाणे राबवतात आणि जर कोणी एखादा या देशातील माणूस त्या दुष्ट राक्षसाचा नाश करण्यास उद्युक्त झाला, तर त्या राक्षसास क्रोध येतो. तो त्या माणसाची छळवणूक करतो वगैरे विचार बाबांनी निवेदनाच्या ओघांत मांडले आहेत. लोकांनी या दुष्ट राक्षसांस मारणारास सहाय्य करावे असे तळमळीने सांगितले आहे.

अनेक निबंध

लेखक – बाबा पदमनजी, प्रका. सी. बी. इ. सोसायटी.

बाबा पदमनजी यांनी सी. बी. इ. सोसायटीसाठी अनेक निबंध लिहिले. ते निबंध नंतर सोसायटीने छापून काढले. अशा छोटेखानी स्वतंत्र निबंधाची पुस्तके आहेत. १०–१५ पृष्ठांची प्रत्येक पुस्तिका आहे. बाबांच्या अशा प्रकारच्या काहीं पुस्तकांची नावे अशी.

(१) वेद कोणी लिहिले ?

(२) मुहूर्तज्योतिष

(३) मानवधर्मशास्त्र (मनुसंहिता कोणी लिहिली ?)

१६०

(४) गणेश चतुर्थी
(५) गोकुळ अष्टमी
(६) रामनवमी
(७) होळी
(८) श्रावणी व नारळी पौर्णिमा.

अशा या पुस्तिकांच्या नावाने सूचित केला जाणारा विषय हाच त्या त्या निबंधाचा मुख्य विषय आहे. सणातून दिसणाऱ्या मूर्ख चालीरीती सोडून द्याव्या व लोकांनी विचारपूर्वक वागावे या विचारास प्राधान्य आहे. ज्यांची पुढे पुस्तकरूपाने छपाई झाली नाही असेही काही निबंध असावेत, असे इतरत्र आलेल्या उल्लेखावरून म्हणता येते.

(कराडकर प्रबंधावरून)

आत्मारामपंत व मृत्यू शिपाई यांचा संवाद

बाबा पदमनजी, प्रका. एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १८५५ पृ. ४० (हिवाळे)

बाबांनी धर्मांतर केल्यानंतर इ. स. १८५५ मध्ये "आत्मारामपंत व मृत्यु-शिपाई" यांचा संवाद हे पुस्तक लिहिले. पुस्तक मनोरंजक व संवादात्मक आहे.

एकनाथांच्या हिंदु-तर्क संवादाच्या धाटणीवर हे पुस्तक असून, रूपकात्मक आहे. त्यात ख्रिस्ती धर्मातील खरेपणा स्वीकारण्याचे तत्त्व गोविले आहे. एक धनवान मनुष्य मरणाला भीत असे. त्या संदर्भात मृत्यू शिपाई यासी त्याचे संभाषण घडते. खरेपणा स्वीकारल्यानंतर त्याच्या मनोभावनेचा पालट होतो व मरणाची भीती जाते.

या ग्रंथाच्या पुष्कळ आवृत्या निघाल्या, सहावी आवृत्ती १८७५. इंग्रजी, मराठी, मोडी व पद्य अशा स्वरूपात हे पुस्तक आहे.

पवित्र शास्त्रातील मुख्य विषय

लेखक ? भाषांतर ? वाइल्डर आर. वी. प्रका. बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई १८५७ पृ. १९०.

प्रस्तावनेत 'पवित्र शास्त्रात नीतीसंबंधी मते व आचरण याविषयी उपयोगी व खरा उपदेश सुबोध लिहून ठेवला आहे. यास्तव हे शास्त्र बरोबर समजून घ्यावे, याचा अभ्यास व मनन करून अभिप्राय ध्यानात आणावा व त्याप्रमाणे चालावे असा सर्वांचा धर्म होय. या लहान ग्रंथात पवित्र शास्त्रातले ७५० मुख्य विषय मांडून ठेविले आहेत.'

एकूण गुंफलेले विषय मोठ्या ठशात छापले असून प्रत्येकास क्रमांक दिलेला आहे. ते ते विषय पवित्र शास्त्रातील प्रमाणे पुढे अंकासह दिली आहेत.

उदा. ईश्वर आपल्या कृत्यावरून प्रगट होतो.

गीत : १९:१, परमेश्वर राज्य करतो, राष्ट्रांनी कापावे, पृथ्वीने थरथरावे २०७५:१ रोम. १:२० कारण की त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याची आनंदी शक्ती व देवपण, ही निर्मिलेल्या पदार्थावरून जाणलेली असता, सृष्टीच्या उत्पत्ती-पासून स्पष्ट दिसून येतात, यास्तव हे निरंतर आहे. ११:३६ इब्री. ३:४ गीत ९:१६.

उदा. देवपणात अनेक आहेत की काय ?

योहान्न ५:७ कारण की आकाशात तिघे साक्ष देणारे बाप शब्द व पवित्र आत्मा असे आहेत. आणि हे तिघे एक आहेत. उत्प. १:२६, ३:२२, ११:६, यशा, ६:८ दानी ४:१७ मात्थी २८:१९

या पद्धतीने सर्व विषय हाताळले आहेत. विषय नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक वगैरे स्वरूपाचे आहेत. अहंकार, निस्वार्थी प्रीती, ईश्वराचा न्यायनिष्ठ अंमल, कर्तव्ये, ईश्वराचे मानवावर उपकार इत्यादी.

पवित्र शास्त्रातील इतिहासाचे कवितारूप कथन भाग १ ला

प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, अमेरिकन मिशन छापखाना, १८५७, पृ. २ + १२५.

(दासू)

मतपरीक्षा—

भाषांतर, मूळ लेखक–मूर जॉन, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसा., अमेरिकन मिशन छापखाना, मुंबई १८५८.

दासू

१८५६ साली भाग पहिला जॉन मूरच्या मूळ संस्कृत ग्रंथावरून प्रसिद्ध करण्यात आला पृ. २ + ७६.

निःशास्त्रवाद परीक्षा

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, अमेरिकन मिशन छापखाना, १८५८, पृ. २३ + १६४

(हिवाळे)

Examinations of the Claim of Deism या इंग्रजी पुस्तकाच्या आधारे प्रस्तुतचे पुस्तक बाबांनी लिहिले आहे. ईश्वराने शास्त्र दिले नाही व देण्याची गरज नाही. अशा मताचे लोक फार झाले आहेत. तेव्हा अशा लोकांच्या मतांचे खंडन करण्यासाठी हा ग्रंथ लिहिला गेला आहे.

प्रस्तुतचा ग्रंथ पत्रात्मक आहे.

(१) पहिले पत्र एका ख्रिस्ती मनुष्याचे त्याच्या निःशास्त्रवादी मित्रास लिहिलेले आहे.

(२) दुसऱ्या पत्रात निःशास्त्रवादाची परीक्षा केलेली आहे. दोन ते चार पत्र या मताची चर्चा करण्यासाठी घातली आहेत.

(३) पाच ते आठ पत्रांत ऐतिहासिक गोष्टीवरून निःशास्त्रवादाची परीक्षा आणि ईश्वरोक्त शास्त्राल प्रमाणे दिली आहेत.

(४) नवव्या पत्रात प्राचीन कालच्या ज्ञानी लोकांची ईश्वर विषयक नीती विषयक मतावरून प्रमाणे दिली आहेत.

(५) दहाव्या पत्रांत अर्वाचीन सूज्ञांची मतें दिली आहे.

(६) अकराव्या पत्रांत निःशास्त्रवादाची फळे दर्शविली आहेत.

(७) बाराव्या पत्रांत जागृत झालेल्या अंतःकरणाचे समाधान बुद्धी शास्त्राकडून होत नाही हे दाखविले आहे.

(८) तेराव्या पत्रांत निःशास्त्रवादाने ईश्वर आपल्या पापाची क्षमा करील याची खात्री देता येत नाही. असा विषय मांडला आहे.

(९) चौदाव्या पत्रांत निःशास्त्रवादाने ईश्वरापासून नाही हे त्याच्या गुणकर्मावरून दिसतें असा विषय आहे.

ख्रिस्ती लोकांचे कर्तव्यसार (A manual of Christian duties.)

लेखक – बाबा पदमनजी, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक – एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १८५९ पृ. १२ + ८५ (हिवाळे)

या पुस्तकात ख्रिस्ती लोकांनी कसे वागावे, तें सांगितले आहे. आईबापांशी, कुटुंबाशी कसे वागावे, संसार, द्रव्य, खर्च, मुलांचे शिक्षण, धर्म यांबाबत ख्रिस्ती माणसाची कर्तव्ये कोणती ? नातलग, दुःखे, दुःख–प्रसंग–रोग, मरण, सांत्वन इत्यादी बाबत वर्तन कसे असावे. ईश्वरभजन, स्मरण, भक्ती, दैनंदिन चालणे, बोलणे, वागणे, इत्यादी बाबतच्या लोकरीती, त्या बाबतची कर्तव्ये असे सर्व आदर्श वर्तनाचे चित्र रेखाटले आहे. त्यानंतर जातिभेद निर्मूलनाचा प्रयत्न आवश्यक कसा तेही विशद केले आहे. स्वदेशप्रीती, स्वदेशी सुधारणा, आत्मोद्धार, ख्रिस्तप्रेम, पापमुक्ती इत्यादी बाबत मार्गदर्शन केले आहे.

या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १८७२ साली निघाली.

वेदधर्मी लोकांचा वृत्तांत

लेखक – बाबा पदमनजी, प्रका. ख्रिश्चन व्हर्नाक्युलर सोसायटी, एक्स्चेंज प्रेस, मुंबई. १८६१ पृ. ४४ (हिवाळे).

प्रस्तुत पुस्तक डॉ. विल्सन यांनी लिहिलेल्या 'तीन हजार वर्षांमागचे हिंदुस्थान' या पुस्तकाच्या आधारे लिहिले आहे. अन्य पुस्तकांचीही मदत घेतलेली दिसते.

वेदधर्मी लोकांचा वृत्तान्त सांगताना बाबांनी प्रथम देशमर्यादा, कालमर्यादा, आर्य लोक, याविषयी विचार केला आहे. त्यानंतर आर्य लोक परदेशातून भरत खंडात आले, ह्याविषयी प्रा. विल्सन यांच्या विचारांचा परामर्श घेतला आहे. आर्य

सिंधू नदीच्या काठी होते, यास प्रमाणे दिली आहेत. आर्यांचा मध्यहिंदुस्थानात संचार, दक्षिणेत संचार, आर्यांचा उद्योग, स्थिती व रीती, त्यांची विद्या, यांचा विचार करून वेद, वेदांची उत्पत्ती, याबद्दल विचार मांडले आहेत. पुढे संस्कृत भाषेचा युरोपातील भाषेशी संबंध, आर्यांचा ब्रिटिश (?) लोकांशी संबंध हे सारे स्पष्ट केले आहे. वेदधर्मी लोक जातिभेद मानीत नव्हते. ब्राह्मण हे पूर्वीचे जातीचे नव्हते, धंद्याचे होते, वेदांचे कर्ते आपल्या उद्योगासाठी प्रार्थना करितात. ऋषींचा क्षत्रियांदिकाशी शरीरसंबंध होत असे. क्षत्रिय शब्दाचा वेदांतील अर्थ पराक्रमी असा होता. वैश्यांचा अर्थ गृहस्थ व शूद्राचे तर नावही वेदात नाही. वेदांतील ब्रह्म म्हणजे अग्नी होय. वेदांत सोवळ्या-ओवळ्याचा विधिनिषेध नव्हता. वेदधर्मी लोक पशुयज्ञ व मांसाहार करीत. अनेक जन्ममरणाचे मत आर्यांस ठाऊक नव्हते. सतीची क्रिया वेदोक्त नाही. नरमेध, लेकरांची लग्ने करण्याची चाल आर्य लोकांत नव्हती. अद्वैतमत वेदांत नव्हते. तसेच प्राचीन आर्य, मूर्तिपूजक नव्हते. अशा प्रकारे प्राचीन वेदकाळाचे दर्शन या पुस्तकात आले आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची माहिती करून देणारे उत्तम पुस्तक असा १ जाने. १८६२ पृ. ६ वर या पुस्तका-संबंधी ‘ ज्ञानोदयाचा ’ अभिप्राय आहे.

अनेक प्रकारच्या पुरवण्या या पुस्तकास जोडल्या आहेत.

आमची भक्तीसंबंधीची पापे वाहणारा उपाध्या

बाबा पदमनजी, प्रका. बॉंबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, एक्स्चेंज प्रेस, मुंबई १८६२ पृ. ५२ (हिवाळे)

या बाबांच्या पुस्तकावर २ मार्च १८६३ पृ. ६८–६९ च्या ज्ञानोदयात अभिप्राय आला आहे. त्यानुसार एतद्देशीय ख्रिस्ती लोकांस फारच उपयुक्त आहे असे म्हटले आहे. ख्रिस्ती धर्मानुसार आमची पापाची क्षमा परमेश्वर करतो आणि येशू ख्रिस्त आमच्यासाठी उपाध्येपण करतो. आम्ही भक्ती करतो. त्यातही आमच्याकडून दोष कसे घडतात ते या पुस्तकात निदर्शनास आणले आहे. ख्रिस्तधर्म तत्त्वांचे स्पष्टीकरण देणाऱ्या पुस्तकास ख्रिस्ती धर्माचीच बैठक आहे. देव तसा भक्त म्हणून देवच जर अपवित्र तर भक्त पवित्र कसा असेल असे प्रतिपादन केलेले आहे.

पंढरीचा वारकरी

लेखक – बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई, १८६३, पृ. ३२ (हिवाळे)

“ पंढरीचा वारकरी ” या पुस्तकात एक वारकरी एक ख्रिस्ती गृहस्थ यांचा संवाद आहे. त्यात पंढरीच्या यात्रेचे विठोबाच्या दर्शनाचे जे माहात्म्य व लाभ वारकरी सांगतो, त्याचे ख्रिस्ती गृहस्थाकडून खंडन केले आहे.

नाशिक क्षेत्राची यात्रा

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, ॲग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, मुंबई १८६३ पृ. ३२ (हिवाळे)

हे एक छोटेखानी निबंधस्वरूपाचे पुस्तक आहे. पुस्तक संवादात्मक आहे. पवित्र मानलेल्या तीर्थांच्या ठिकाणी यात्रा करण्यास जाणाऱ्या जुन्या भाविक हिंदू लोकांची दिलेली प्रमाणे घेऊन त्याचे खंडन केले आहे. पवित्र मानल्या गेलेल्या नद्यांत स्नान केल्याने पातके दूर होत नाहीत. या उलट देवाने नेमलेला जगद्गुरू येशू ख्रिस्त यावर अनन्यभावे विश्वास ठेवल्याने सर्व पापाची क्षमा होते असा या पुस्तकाचा आशय आहे.

सुप्रभात

(भाषांतर) बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई, १८६४ पहिली आवृत्ती, दु. आ. १८९३ पृ. २+११५. (हिवाळे) (Day break in Great Britan) या पुस्तकाचा अनुवाद आहे. हिंदुस्थान देशाप्रमाणे ब्रिटन देशही मूर्तिपूजक होता. तेथे ख्रिस्ती धर्माचा प्रवेश कसा झाला व मनुष्याच्या मनात ख्रिस्तीधर्माची किरणे कशी प्रवेश करतात, हे या पुस्तकांत सांगितले आहे.

"ज्ञानोदयकारांच्या मते हा ग्रंथ ख्रिस्ती व अख्रिस्ती मनुष्यांस सारखाच उपयुक्त आहे." असा ज्ञानोदयकार ५ ऑक्टो. १८९३ पृ. ३१७ वर अभिप्राय देतात.

पहारेकऱ्याची वाणी

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट सोसा., आर्फनेज प्रेस, पुणे. १८६५ पृ. ४+५६. (The Watchman's Voice) या पुस्तकावरून हे पुस्तक तयार केले आहे.

यहुदी लोकांचा अज्ञानांधकार व त्यांच्या जुन्या धर्मातील मिथ्थ्या गोष्टी. समाजास कळून लोकांनी नीतिमार्गावर यावे म्हणून प्रस्तुत पुस्तक लिहिले गेले होते. बाबांनी भाषांतरांत ते घेतले आहे, अब्राहम, ईझाक, याकोबा, व त्याचे वंशजाचे तारण करण्यासाठी प्रार्थना करणाराचे भाषण, मसीहाचे जगात येणे, त्याचे दुःख सोसणे, मरणे, मसीहाचे देवपण, ख्रिस्तीधर्माची सत्यता, अर्वाचीन यहुदी लोकांकडून जुन्या करारात झालेला वैचारिक गोंधळ इत्यादी विषय या पुस्तकात आलेले आहेत. ख्रिस्ती धर्माचा प्रसार मुसलमान लोकांत करण्याच्या दृष्टीने हे पुस्तक उपयुक्त आहे.

सिद्धान्तरत्नमाला

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक–ओरिएंटल प्रेस मुंबई १८६६. पृ. १२+१०८.

या पुस्तकात थोडक्यात पवित्र शास्त्रातील निवडक सिद्धान्ताची ओळख करून दिलेली आहे. पवित्र शास्त्र ही त सर्व ईश्वरी ज्ञानाची एक खाण आहे.

" सिद्धान्तरत्नमालेतील सिद्धान्त शास्त्रांत शोधून पडताळून पाहा. " ही पुस्तकाच्या मुखपृष्ठावर सूचना आहे. हे सिद्धान्त लोकांस समजावेत म्हणून प्रस्तुत सिद्धान्त रत्नमाला बाबांनी गुंफिली. प्रस्तावनेत बाबा लिहितात " ज्यांस शास्त्र-वाचूनही शिकविणाराची गरज भासते, अशा ख्रिस्ती लोकांसाठी व शिकविणारा-साठी प्रस्तुत पुस्तक रचले आहे."

" धर्माचे सिद्धान्त शुद्ध, सशास्त्र, निर्भेळ असणे अगत्याचे असते. इतर देशा-प्रमाणे येथेही पाखंडी, अशुद्ध, असत्य मते प्रसृत होण्याचे भय आहे. म्हणून एत-द्देशीय ख्रिस्ती जनांत असे पाखंडी, अशुद्ध धर्म सिद्धान्त प्रसृत होऊ नयेत या हेतूने हे पुस्तक रचिले गेले आहे. "

पश्चाताप, प्रार्थना, पवित्रशास्त्र, तारण येशू ख्रिस्त, संतान, पवित्र आत्मा, प्रभुभोजन, शाब्बाथ, विश्वास, पुनरुत्थान, पापक्षमा, पापकबुली, आत्मनिवेदन, न्याय इत्यादी शीर्षकाची प्रकरणे आहेत. त्यावरून पुस्तकाच्या अंतरंगाविषयी कल्पना येते व ख्रिस्ती जनांस अशा पुस्तकाची आवश्यकता पटते.

उत्पत्ति यावर टीका

भाषांतर – बाबा पदमनजी, मुद्रण – ओरिएंटल प्रेस, मुंबई १८६६, पृ. १२ + २५०.

डॉ. आर्. जेमसन यांच्या उत्पत्तीवरील टीका ग्रंथाचे बाबांनी केलेले भाषांतर म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय.

त्या काळात पवित्रशास्त्रावरील टीकाग्रंथाची ख्रिस्ती जनास आवश्यकता होती. टीकाग्रंथामुळे शास्त्रार्थ विपरीत लावला जाण्याची भीती कमी होते. या दृष्टीने बाबांच्या या पुस्तकात ख्रिस्ती जनांस पवित्र शास्त्रातील स्थल, काळ, व्यक्ती वगैरेचे उल्लेख, संदर्भ, मांडलेले विचार, मते यांचा नमका अर्थ इत्यादी समजण्यास सोय झाली. बावांनी धर्मशास्त्र, पुराणे यांतून दाखले देऊन पवित्र शास्त्रानुसार वर्तनाच्या रीतिभाती, कायदेकानू वगैरे विषय स्पष्ट केले आहेत.

धर्माविषयी संवाद

बोपेन जॉर्ज, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक–एज्युकेशन सोसा. छापखाना, मुंबई १८७० आ. ३ री, पृ. ५८.

कृष्ण आणि ख्रिस्त यांची तुलना

बाबा पदमनजी, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसा. मुद्रक–ओरिएंटल प्रेस, मुंबई. तिसरी आवृत्ती १८७१, चवथी आवृत्ती १८८५ पृ. ४ + ४८ (हिवाळे).

येशू ख्रिस्त आणि कृष्ण यांची विस्ताराने तुलना प्रस्तुत पुस्तकात केलेली आहे.

वालपण, बालक्रीडा, याबाबत कृष्णाची पुराणे, हरिवंश, कीर्तने, भागवत वगैरे अनेक ठिकाणी आलेली वर्णने सांगून त्यानुसार माहिती दिली आहे. देवीची कृत्ये,

नामचर्चा, इ. बाबत अशाच रीतीने माहिती दिली आहे. नेहमीप्रमाणे ख्रिस्तीधर्म-प्रचारात्मक असे हे पुस्तक आहे. संशोधन पद्धतीचे मूल्य या पुस्तकाला आहे असे म्हणवत नाही.

शास्त्रातील उपदेशसार

बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक– एज्युकेशन सोसा. छापखाना. आवृत्ती १० वी. १८७१ पृ. ७६ (दासू).

नव्या करारावर टीका भाग १ ला

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, १८७४ पृ. १४०० (हिवाळे)

ट्रॅक्ट सोसायटीने (लंडन) प्रसिद्ध केलेल्या इंग्रजी कराराचा परिचय मराठीत करून देण्यांच्या निमित्ताने बाबांनी ' नव्या करारावर टीका ' या ग्रंथ लेखनास सुरुवात केली. परंतु तरीही बाबांचा ग्रंथ म्हणजे अक्षरशः भाषांतर नाही. स्वतःचे विचार व दुसऱ्या नामांकित टीकाकारांचे विचार यांचा समावेश करून बाबांनी मूळ ग्रंथात भर घातली आहे. ज्या गोष्टी इकडील वाचकांस लाभदायक नाहीत त्या सोडून दिल्या. जेथे शास्त्रात वर्णिलेल्या लोकांच्या रीतीभाती आणि संप्रदाय व हिंदू लोकांच्या रीती व संप्रदाय यांसी मिळतात तेथे उदाहरणांनी स्पष्ट दाखविले आहे. ख्रिस्ती-शास्त्र आणि हिंदुशास्त्र यांच्या सिद्धान्ताचा कितपत मेळ व अंतर आहे हे दाखविले आहे. ख्रिस्ती शास्त्रातील बोध व निषेध ही स्पष्ट करण्याकरिता हिंदू कवींच्या ग्रंथातून वेचे घेतले आहेत. त्यास योग्य वाटेल तेथे उपयुक्त सूचना केल्या आहेत. ग्रंथाची भाषा सुगम आहे.

बाबांनी या ग्रंथात प्रथम जुन्या कराराची पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे. प्रत्यक्ष जन्म होण्यापूर्वी ईश्वराचा संदेश प्रेषितांच्या, संदेष्ट्यांच्या उक्तिकृतीतून मनुष्य जातीपर्यंत कसा पोचला याबद्दलचे जुन्या करारातील भागांचे साधार विवेचन केले आहे.

त्यानंतर मार्क, मात्थी, लूक, योहान यांच्या चार शुभवर्तमानांचे सविस्तर विवेचन केले आहे. ते पुढे दिले आहे.

मार्कचें शुभवर्तमान

यात मार्कस याचा थोडक्यात जीवनपरिचय दिला आहे. मार्कसने आपला ग्रंथ रचतेवेळी मात्थीच्या ग्रंथाचे अवलोकन केले असावे काय? असा प्रश्न उपस्थित करून बाबांनी त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. हा ग्रंथ केव्हा व कोठे लिहिला याचा निश्चय होत नाही. परंतु त्याचा काळ सन ४८ पासून ६५ यामध्ये असावा व स्थळ रोम असावे, असे आपले अनुमान त्यांनी व्यक्त केले आहे. या शुभ वर्तमानात प्रभू येशूचा उपदेश भाग थोडा आहे. ज्या चमत्कारिक घटनांवरून कृत्यावरून प्रभू येशू हा देवाचा पुत्र असल्याचे सिद्ध होते त्याचे निवेदन मात्र

विस्ताराने केले आहे. या शुभवर्तमानात येशूचा जन्म वृत्तांत संक्षिप्त आहे पण असलेल्या वृत्तांतावरून, तो कोणी अपार सामर्थ्याचा पुरुष असावा असे लक्षात येते.

मात्थीचे शुभवर्तमान

या बाबत मात्थी हा शुभवर्तमान लिहिणारा पहिलाच लेखक असे पूर्वीपासून ख्रिस्ती मंडळी मानीत आलेली आहे. “ ही गोष्ट आम्ही खात्रीने सांगत नाही म्हणून कोणास आश्चर्य वाटू नये. ” असे बाबा लिहितात. मात्थीचे चरित्र थोडक्यात दिलेले आहे. या मात्थीकृत शुभवर्तमानास नव्या करारात जे आद्य स्थान दिलेले आहे ते योग्यच आहे. कारण ते जुना व नवा करार यांचा संबंध अगदी पूर्णतेने प्रकट करणारे आहे, असा अभिप्राय व्यक्त केलेला आहे. ह्याशिवाय ते इब्री लोकांच्या उपयोगी पडावे असे होते, व त्याकरिता ते प्रथम लिहिले गेले असावे असे बाबा म्हणतात.

लूकाचें शुभवर्तमान

याचीही प्रथम थोडक्यात चरित्रपर माहिती दिली आहे. तो सीरिया प्रांतातील अंत्योख गावी राहत होता. हे एक मत, तर त्याच्या वैद्यकीच्या धंद्यावरून तर्क करता तो कोणी रोगी धनवान गृहस्थाचा दास असावा असे एक मत. दोन्ही मतांची व आणखी संभाव्य अंदाज यांची पुस्तकात थोडक्यात चर्चा आहे. लूकाच्या शुभवर्तमानात, ऐतिहासिक गोष्टींची पूर्तता इतर शुभवर्तमानाहून (वरून) असल्याचे बाबांचे म्हणणे आहे व लूकाने सांगितलेल्या गोष्टींचा परस्परांशी संबंध दाखविला आहे. इतर शुभवर्तमानाहून अधिक काही महत्त्वाच्या गोष्टी लूकाने सांगितल्या आहेत. म्हणून हा ग्रंथ अधिक मौल्यवान झाला आहे. प्रभूच्या तोंडून निघालेल्या प्रसंगपरत्वे अशा वाक्याचे स्पष्टीकरण त्याने दिले आहे. परंतु लूकाचे कथा-निरूपण सर्वत्र सारखे विस्तृत नाही. काही गोष्टी तो संक्षेपाने सांगतो.

एकंदरीत लूकाच्या वर्तमानावर बाबांनी सविस्तर टीका केली आहे. टीकेतून या शुभवर्तमानाचे महत्त्व-मूल्यमापन झाले आहे. तसेच लूकाच्या चरित्रविषयक प्रश्नांचाही ऊहापोह झाला आहे.

योहान्नाचें शुभवर्तमान

याचीही प्रथम चरित्रविषयक माहिती दिली आहे. मात्थी वगैरे सुवार्तिकांनी लिहिलेल्या गोष्टींची योहान्न जागोजाग सूचना करतो पण त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा सांगत नाही. जेव्हा क्वचित सांगतो तेव्हा आपल्या ग्रंथाच्या मुख्य उद्देशाने मात्र सांगतो. येशने सांगितलेल्या चमत्कारांपैकी सहा चमत्कार तो सांगतो. पैकी पाच केवळ त्याच्याच ग्रंथात मिळतात. येशूने सांगितलेले दाखले, डोंगरावरील उपदेश, भविष्यात्मक संवाद हा भाग योहान्नाने वगळला आहे. एकूण योहान्नाचे शुभवर्तमान जवळ जवळ दोन तृतीयांश भागात नवनिवेदन देणारे आहे.

अशा प्रकारे नव्या कराराची टीका भाग १ यामध्ये चारही शुभवर्तमानांवर साधार माहिती, शुभवर्तमानकारांचा परिचय, शुभवर्तमान लेखनाचे स्थळकाळ, स्वरूप, प्रत्येकाचे वेगळेपण, प्रत्येकाचा पूर्व-इतिहास व त्यानुसार प्रत्येक शुभवर्तमानाचे वैशिष्टय असा विविधांगी परिचय आहे. या सर्व लेखनात बाबांनी दिलेला बारीकसारीक तपशील, केलेला सूक्ष्म अभ्यास, उचित टिपणे, स्पष्टीकरणे, साधार उल्लेखसंदर्भ, अशा भाष्यकारांच्या अनेक लेखन विशेषांचे दर्शन घडते. मधून मधून हिंदुधर्माबाबतही केलेल्या विवेचनात तुलनात्मक भूमिका दिसते व ख्रिस्ती धर्माची सविस्तर माहिती तर उपलब्ध होतेच.

आदामा तू कोठ आहेस ?

लेखक – बाबा पदमनजी, १८७६ (कराडकर)

" आदमा तूं कोठे आहेस " अशा विषयावर अहमदनगर येथील अमेरिकन मराठी मिशनमध्ये भाषण केले.

आदामाप्रमाणे प्रभू प्रत्येक माणसास तूं कोठे आहेस असा प्रश्न विचारणारा व त्यास आपणापाशी उत्तर हवे. ते उत्तर त्यांनी प्रस्तुत भाषणान्वये देण्याचा प्रयत्न केला आहे. हे भाषण प्रथम " सत्यदीपिका २ फेब्रु. १८७६ पृ. १७९–८८ यांत प्रसिद्ध झाले, नंतर पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले.

नव्या करारावर टीका भाग–२ [प्रेषितांची कृत्ये प्रकटविणे]

बाबा पदमनजी, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १८७७ पृ. ८५५ (शेळके)

पुस्तकात प्रथम लेखकाच्या सूचना व नंतर प्रस्तावना. सूचना सांगताना लेखकाने सांगितले आहे की, या (दुसऱ्या) भागांत शास्त्राचे संपूर्ण प्रतीक १८५७ च्या तरजुम्यावरून घेतले आहे. केवळ रोमकराच्या पत्राचे प्रतीक मात्र १८७२ च्या तरजुम्यातील आहे. तथापि बहुतेक ठिकाणी मूळचा खरा अर्थ दाखविण्याकरता त्याच (१८७२ च्या) तरजुम्याचे सहाय्य घ्यावे लागेल.

प्रस्तावना – प्रस्तावनेत लेखकाने ' प्रेषितांची कृत्ये ' ह्या पुस्तकाचा कर्ता लूक असल्याचे नमूद केले आहे. हे पुस्तक केव्हा लिहिले गेले असावे या विषयी अनुमान मांडले आहे. पुस्तकाच्या लेखन काळाविषयी निश्चित काही सांगता येत नाही असे म्हटले असले तरी लेखक लिहितो, " तथापि त्यांत पौल दोन वर्षे कैदेत होता " इतकी गोष्ट लिहून ते समाप्त केले आहे. व पौलाच्या चौकशीविषयी काहीच लिहिले नाही. यावरून ते सन ६३ इ. स. साली लिहिले असावे असे अनुमान करण्यात काही चूक नाही.

लेखकाच्या प्रस्तावनेतील निवेदनानुसार पुस्तकाला प्रेषितांची कृत्ये असे जरी नाव असले तरी त्यात प्रेषितांनी केलेली सर्वच कामे सांगितली आहेत असे समजूं

नये. कित्येक गोष्टी गाळल्या आहेत.

पुस्तकाचा मराठी अनुवाद दिलेला असून त्यास प्रत्येक पानावर आवश्यक तशी A, b, c, d, e अशी चिन्हे टाकली आहेत. त्यायोगे वचनांचे संदर्भक्रमांक दिले आहेत. १, २, ३, ४, ५ असे आकडे टाकले असून त्यायोगे टीकात्मक टीपा दिलेल्या आहेत. काही ठिकाणी टीपांमध्ये अर्थस्पष्टीकरणात्मक छोट्या टीपा आहेत. उदा. ३ " सोसल्यानंतर " म्ह. मरण सोसल्यानंतर पृ. ६

१८ " पालथे पडून " म्ह. तो तोंडावर उपडा पडला पृ. ९

५ " पाण्याने बाप्तिस्मा इ. " पाण्याचा बाप्तिस्मा ही बाहेरची खूण होती. पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा हेच आत्मिक जीवनाचे तत्त्व होते. पृ. ७

निवेदनात्मक अथवा माहितीवजा अशा काही टीपा आहेत.

उदा. ५ आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रांतील—

ह्या काळीच यहुदी लोक सर्व जगांत पसरले होते. मिसर सीरिया–एशिया–मैनर यात सहस्रावधी यहुदी गेले होते व तेथून ते करिंथ व रोम शहरापर्यंत जाऊन त्याच्याही पलीकडे पांगले होते. जेथे ते नव्हते असा रोमन राज्यात एकही प्रांत नव्हता. पृ. १२

५ " आशी " नव्या करारांत अशा किंवा एशिया हे नाव एशिया खंडात रोमन राज्याचा जो सुभा होता त्याला दिले आहे असे समजावे. हा प्रांत एशिया मायनरच्या पश्चिम कांठास होता व त्याचे मुख्य शहर एफस हे होते. पृ. १३

अशा प्रकारे टीपांनी २८ अध्यायांचा समावेश करणारे २८ प्रेषित (chapter चे नाव) आहेत. प्रत्येक अध्यायाचे शेवटी टीपांत " उपयुक्त सूचना व बोध " या नावाखाली अध्यायातील मथितार्थ व आशयबोध दिलेला आहे, येथपर्यंत पुस्तकाची एकूण १५३ पृष्ठे संपतात. पृष्ठ १५४ ते १५८ " यरूशलेमाचा नाश होईपर्यंत घडलेल्या गोष्टींचा संक्षिप्त वृत्तांत " दिलेला आहे.

पृ. १५९ ते १६२ " प्रेषितांच्या पत्रावर साधारण विचार " व्यक्त केला आहे. यानंतर प्रेषितांची पत्रे ती नेहमीप्रमाणे आहेत. अशी बावीस पत्रे आहेत.

एवढ्या पत्रांचा समावेश आहे. प्रत्येक पत्रास लेखकाची २–४ पानांची प्रस्तावना आहे. या प्रस्तावनेत त्या उल्लेखिलेल्या शहराबाबत भौगोलिक माहिती, पाठविलेले पत्र, तत्कालीन तेथील लोकांची स्थिती, पत्र पाठविण्याचे कारण, पत्र लेखन काळाची निश्चिती, एवढ्या गोष्टींची चर्चा आहे. पत्राचा थोडक्यात आशयहीं दिला आहे.

पुस्तकाचे अखेरीस प्रगटविण्याचे पुस्तकातील भविष्यसूचक दृष्टान्ताबद्दल लिहिले असून, नंतर टीकेतील कित्येक मुख्य विषयांचे सूचिपत्र दिले आहे.

एकंदरीत हा मोठा ग्रंथ अभ्यसनीय वाटतो. कारण एक तर ग्रंथनिर्मितीसाठी घेतलेले परिश्रम त्याने केलेल्या संकलनावरून दिसून येतात. लेखकाने दिलेल्या विविध टीपा हीच नव्या करारावरील टीका असून ती अभ्यासपूर्ण दिसते. तीत ओघा-

ओघात अनेक विषयांवरील भौगोलिक, धार्मिक महत्त्व, धार्मिक तपशील, तत्कालीन परिस्थिती, समाज, ख्रिस्तीधर्माचा प्रसार, ख्रिस्ती धर्म व इतर धर्म याबाबत तुलनात्मक विचार, तत्कालीन राजनैतिक स्थिती, ख्रिस्ती धर्मगौरव, अर्थविस्तार इत्यादी अंगांनी ऊहापोह केला आहे.

पत्रास लिहिलेल्या सर्व प्रस्तावना वाचनीय व अभ्यासपूर्ण आहेत. त्यातही नेमकेपणा आहे व माहिती आहे.

ग्रंथ प्रदीर्घ आहे पण केवळ पाल्हाळिक वाटत नाही. त्यातील विस्तार हा बारीक सारीक किरकोळ विषयावरही दिलेल्या सविस्तर माहितीमुळे आहे.

ख्रिस्तीधर्म व हिंदुधर्म यांची तुलना

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, ॲंग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, आ. ४ थी, १८७८

प्रस्तुत पुस्तक पुत्र आणि बाप यांच्यातील संवादरूपाने आहे. यात बाप हिंदुधर्मविषयक मते मांडतो, तर पुत्र ख्रिस्तीधर्माचे विवेचन करतो.

हिंदुधर्मात तारण नाही, पाप कबुली, पापक्षमा व पापविमोचन यासाठी उपाय नाही. त्यामुळे अनेक वासना, मोह, लोभ इत्यादींत अडकणाऱ्या मनुष्यजीवाचे पापक्षालन, न होता त्यास पुन्हा निराशा कर्दमात लोळावे लागते. पाप पीडितास, दुःखितास, शांती न लाभता हिंदुधर्मात त्याची हेळणा होते असा प्रस्ताव मुलाने मांडला आहे. त्या अनुषंगाने ख्रिस्ती धर्मानुसार तारण, सिद्धता, पापक्षालन इत्यादी कल्पना स्पष्ट केल्या आहेत. ख्रिस्ती धर्मनियम सांगितले आहेत. हिंदुधर्मातील कर्मकांड, व्रतवैकल्ये, यज्ञ, त्यासाठी होणारी ऐहिक संपत्तीची हानी व दिले जाणारे निर्घृण पशुबळी, प्रसंगी नरबली, मूर्तिपूजा, अनेक देव, मतामतांचा गलबला इत्यादींवर हल्ला चढविला आहे.

पुत्राच्या मताने हिंदुधर्मात पापी मनुष्याचा स्वभाव बदलण्याची शक्ती नाही. हिंदुधर्मातील मोक्षकल्पना पितृमुखाने ओझरती मांडली आहे, पण पुत्रमुखाने उच्चारलेल्या मतांत त्यावर फार स्पष्टीकरण नाही. दुर्लक्षच आहे. तसाच ज्ञानमार्गाविषयी ऊहापोह आढळत नाही.

या पुस्तकाच्या १८५०, १८६२, १८६६, १८७८, १८८२ अशा आवृत्त्या निघाल्या.

उद्धार मार्ग आणि विज्ञान

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, प्रका. ॲंग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, मुंबई. १८७८ पृ. ८ + १४८.

हे पुस्तक रूपांतरित आहे. मूळ ग्रंथाचा कर्ता नास्तिक होता. परमेश्वरावर त्याचा विश्वास नव्हता. पण एका मित्राच्या सूचनेवरून त्याने ख्रिस्ती धर्माचा अभ्यास

सुरू केला. अभ्यासाने व वाचनाने ख्रिस्ती धर्म ईश्वरदत्त असल्याची त्याच्या मनाची खात्री होऊ लागली. या संदर्भात लेखकाने आपल्या मित्रास पत्रानेच धर्माविषयी शंका विचारल्या, मित्राने पत्रानेच शंकानिरसन केले; हा पत्रव्यवहार म्हणजेच प्रस्तुत पुस्तक होय. असे या पुस्तकाचे स्वरूप पत्रात्मक आहे. भाषांतरांत मूळ पुस्तकातील काही मजकूर गाळला आहे असे दिसते. पण विषयाचे संधान तुटलेले दिसत नाही.

हिंदू धर्माचे स्वरूप भाग १ व २

बाबा पद्मनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, निर्णयसागर प्रेस, १८८३ पहिली आवृत्ती भाग १, १८८४ पहिली आवृत्ती भाग २. (हिवाळे).

बाबांचा हा ग्रंथ म्हणजे प्रबंधात्मक विस्तृत रचना आहे. लहानपणापासून बाबांना हिंदुधर्म विषयक ग्रंथ गोळा करण्याचा नाद होता. मुंबईतील वास्तव्यात त्यांनी अनेक ग्रंथांचा संग्रह केला. तुकारामाचे अभंग, रामदासी श्लोक, मोरोपंती आर्या, भक्तलीलामृत, भक्तविजय, गुरुचरित्र, इत्यादी ग्रंथ त्यांनी खरेदी केले व वाचले. त्या सर्वांचा " हिंदुधर्मांचे स्वरूप " हा ग्रंथ लिहिताना उपयोग झाला. प्रस्तुत लेखनात वेद, उपनिषदे, ब्राह्मणे, आरण्यकें, दर्शनग्रंथ, सूत्रग्रंथ, स्मृतिग्रंथ, इतिहास, पुराणे इत्यादी कित्येक ग्रंथातील विपुल संदर्भ बाबांनीं दिले आहेत. हिंदु-धर्माबाबत युरोपियन विद्वानांनी लिहिलेल्या ग्रंथांचाही आधार घेतलेला आहे.

तरीही शास्त्रीपंडिताला साजेशी बुद्धीची गती बाबांना नव्हती याची जाणीवही बाबांनी व्यक्त केलेली आहे. ते लिहितात, ' रे. नीलकंठशास्त्री नेहम्या गोरे यांसारख्या विद्वानानी अशासारखे ग्रंथ लिहिले असते, तर अतिशय उत्कृष्ट रचना झाली असती व उपयुक्तताही विशेष झाली असती. '

पुस्तकाच्या प्रथम भागांत हिंदुधर्म, वेदशास्त्रे, पुराणे यांतून कसा दिसतो ते सांगितले आहे. दुसऱ्या भागांत हिंदुधर्माचे आचार, कर्मे, भक्ती इत्यादींचे स्वरूप सांगितले आहे. प्रत्येक बाबतींत ख्रिस्ती धर्माची तुलना करून ख्रिस्ती धर्मगुणकथन व हिंदु धर्मदोषकथन अशी भूमिका दिसते.

हिंदुधर्मातील व्रतवैकल्ये, वेद, उपनिषद्, ब्राह्मण ग्रंथ वगैरेत दिसणारे तत्त्वभेद त्रिमूर्ती, चतुर्भुज, मोक्ष, सृष्टीची उत्पत्ती, मंत्रतंत्र, अवतार कल्पना, सोळा संस्कार, अशा हिंदुधर्माच्या संकल्पना स्पष्ट करताना उपहासाची भूमिका दिसते या संदर्भात उचित अशी रामदास, तुकाराम यांची वचने उद्धृत केलेली आहेत.

अर्थात हिंदुधर्माचे स्वरूप तात्त्विक दृष्टीने सांगणारे हे पुस्तक नसून ख्रिस्तीधर्म प्रसाराच्या बुद्धीने ते लिहिले आहे हे उघड आहे.

ख्रिस्ती जिणे व हिंदु जिणे यांची तुलना

बाबा पदमनजी, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, ऑर्फनेज प्रेस, पुणे १८८१ पृ. ६+९९ (हिवाळे).

हिंदुमाणसाची जीवनपद्धती ख्रिस्ती माणसाची जगण्याची पद्धत, यातील भिन्नता प्रस्तुत पुस्तकांत मांडली आहे. धार्मिक जीवनक्रमातील दोघांचा फरकही सांगितला आहे.

जीवनास सुरुवात जन्मापासून होते तेथपासून या फरकास सुरुवात होते व तितके निवेदन केले आहे.

त्यांत भक्तीचे जिणे, सांसारिक जिणे, सुखदुःखे अशा काही विशेष मुद्द्यांवर विस्ताराने फरक सांगितले आहेत.

हिंदुधर्माचे स्वरूप भाग – २

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, निर्णयसागर प्रेस, १८८७ द्वितीय आवृत्ती. पृ. २+२+४३५+८

प्रथम भागात वेदशास्त्रादी ग्रंथात हिंदुधर्माचे जे स्वरूप दृष्टीस पडते ते दाखविले, दुसऱ्या भागात तो धर्म लोकांचे आचार कर्मे व भक्ती यांच्या रूपाने जसा दिसतो तसा दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. असे प्रस्तावनेत म्हटले आहे.

प्रस्तुत भागाची सहा खंडांत मांडणी केलेली आहे.

खंड १ ला – चार जातींची उत्पत्ती, मिश्र किंवा संकर जाती, मिश्र जातीचे सामान्य आचार. अशी जातीभेदाविषयी माहिती आहे.

खंड २ रा – या प्रकरणात निरनिराळ्या जातीची कर्मे, अधिकार, आचार इत्यादीविषयी माहिती दिली आहे. त्यानुसार कर्मे, संस्कार, ब्रह्मचर्य, वेदपठण, संस्था, गृहस्थाश्रम, विवाह, गृहस्थाश्रमाची नित्यकर्मे, वानप्रस्थ, आणि संन्यास, शूद्राचे विचार हे सर्व विषय समाविष्ट केले आहेत.

खंड ३ रा – या भागात कर्ममार्गातील वर्षांच्या बारा मासांतील कर्मे 'पितर, श्राद्धे, प्रेतकर्मे, अंत्येष्टी, कर्मठपणाची उदाहरणे, यमपुरीची यात्रा या विषयांवर विवेचन आहे.

खंड ४ था – भक्तिमार्गातील नवविधाभक्ती, देवांच्या मूर्तीच्या आकृती, देव, पूजा, मूर्तीसंबंधी कल्पना व कथा-देवस्थाने, तीर्थयात्रा, याचा, किंवा जत्रा अर्वाचीन पशुयाग, 'गुरुभक्ती', क्षुद्र दैवते, भूतपिशाच्च, देवऋषीपणा, जादू, कुणबी लोकांचा धर्म.

खंड ५ वा – यात नवग्रह, पंचांग, वर्षफल, मुहूर्त, जोशी, शकुन, प्रश्न, स्वप्नविचार, पल्लीपतन, असा सर्व ज्योतिषविषयक विचार आहे.

खंड ६ वा – यात हिंदुधर्मातील विविधपंथ व संप्रदाय यांची माहिती आहे. वैष्णवपंथ, कबीरपंथ व शैवपंथ या तीनांची अधिक माहिती दिली आहे.

शेवटी ख्रिस्ती धर्माचे स्वरूप असे छोटेसे प्रकरण आहे. पुरवणीमध्ये ग्रंथात वापरलेल्या कित्येक संस्कृत श्लोकांचा मूळ मुद्द्याच्या अनुषंगात अर्थ दिलेला असल्याने

तो संक्षिप्त आहे. यासाठी या पुरवणीत त्याच श्लोकांचे सविस्तर अर्थ दिले आहेत. अनेक प्रकारचे ग्रंथसहाय्य नमूद केले आहे. त्यात मराठी–इंग्लिश–संस्कृत सर्व मिळून ९८ ग्रंथाचे ऋण नमूद केले आहे. सूचिपत्र आहे.

पुस्तकात हिंदुधर्मस्वरूप व अनुषंगाने येणाऱ्या चालीरीती रूढी, समजुती वगैरेबद्दल जी माहिती दिली आहे ती नमूद केलेल्या ९८ ग्रंथाचे ऋण घेऊन दिलेली आहे. पण प्रत्यक्षात लिहिलेल्या मजकुरावरून असे जाणवते की धर्मस्वरूपाची तात्त्विक चर्चा अगर सखोल व गंभीर निवेदन याची फारशी बूज राखलेली नाही. बहुतेक सर्व मजकूर ऐकीव वाह्यात्कारी माहिती गोळा करून लिहिल्यासारखा वाटतो.

जगत्शेटच्या पुत्र नरनायक यांचे चरित्र

बाबा पदमनजी, बाँबे ट्रक्ट अँड बुक सोसायटी, १८७९ पहिली आवृत्ती, पृ. ४ + ९१ (हिवाळे)

बायबलमधील प्रख्यात कथा 'Prodigal Son' यांचे खुलवून केलेले रूपांतर म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय. यांच्या १८८२ दुसरी आवृत्ती १९१८ मध्ये तिसरी आवृत्ती अशा आवृत्त्या निघालेल्या दिसतात.

शंका निवृत्ती

बाबा पदमनजी, बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, १८७९ सहावी आवृत्ती. (कराडकर)

प्रस्तुत पुस्तकांत खरोखरच शंका व त्याचे निरसन करणारी उत्तरे असे स्वरूप आहे. हिंदूच्या ख्रिस्ती धर्माबाबत शंका व त्यास ख्रिस्ती धर्मीयांनी दिलेली उत्तरे आहेत. फुकट वाटण्याकरिता धर्मप्रचार पुस्तिका असे पुस्तकाचे स्वरूप आहे.

सत्यवेदात काय आहे ?

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी अँग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, १८८० भाग १–२ पृ. ४ + ६६, आवृत्ती २ री १८८२. (हिवाळे)

ईश्वरीशास्त्र म्हणजेच ख्रिस्ती शास्त्र हा या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय आहे. ख्रिस्ती शास्त्र म्हणजे येथे सत्यवेद, ईश्वर व त्याचे गुणस्वभाव, सृष्टीची उत्पत्ती, मनुष्याची उत्पत्ती, पाप, मनुष्याची पतितावस्था, पापांचा परिणाम या विषयी पवित्र शास्त्रातून वचने उतरून घेऊन त्यावर भाष्य केलेले आहे.

ख्रिस्ती शास्त्राला सत्यवेद म्हणण्याचे कारण ग्रंथ कर्त्याने असे दिले आहे की हे कल्पित ज्ञान वा ह्या कथा नाहीत. त्यात ईश्वराविषयी सांगितलेले सर्व काही शुद्ध स्वरूपाचे असल्यामुळे त्यास पवित्र शास्त्र म्हणतात.

पुस्तकाची एकूण १४ प्रकरणे असून, त्यात ख्रिस्ती शास्त्रांतील सर्व विषय हाताळले आहेत. हिंदूंच्या वेदामध्ये सांगितलेल्या कित्येक गोष्टी सत्य नसल्याचे नमूद केले आहे व त्या तुलनेने ख्रिस्ती शास्त्रात सांगितलेले सारे ईश्वरप्रणीत व शुद्ध

स्वरूपाचे आहे असा आशय आहे.

जातिभेद विवेचन

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, अँग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, मुंबई १८८१ पृ. ४ + ६१.

जातिभेदामुळे हिंदुधर्मातील माणसामाणसांत भेद पडलेले आहेत, याचे वर्णन करून हिंदुधर्मातील दोषाविष्करण केले आहे. तसेच बाबांच्या जातिभेद विवेचन या नावाच्या पुस्तकात जातिभेद ईश्वरप्रणीत नाही, तो सृष्टीविरुद्ध आहे. तसेच जातिभेदापासून होणारे तोटे आणि ब्राह्मण जाती यांचे चांगले विवरण केले आहे. सूज्ञांनी जातिभेद पाळू नयेत, तो एक दुष्टपणा आहे, अविचारी लोकांस जातिभेद चांगला वाटतो, पण विचार केल्यास जातिभेद पाळण्याची लाज वाटेल, इत्यादी विचार बाबांनी मांडले आहेत.

पवित्र शास्त्राविषयी माहिती

बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, निर्णयसागर, मुंबई – १८८२ पृ. ४+४७.

(दासू)

ख्रिस्तवर्तन

बाबा पदमनजी, मुद्रक– अँग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, मुंबई, १८८३ पृ. ६१ (Nature and supernatural) या बुशनेल या अमेरिकन धर्मोपदेशकाच्या पुस्तकाचे हे भाषांतर आहे.

त्यात येशूख्रिस्ताची गुणलक्षणे व वर्तन याविषयी माहिती सांगितली आहे. मूळ पुस्तकापेक्षा भाषांतर संक्षिप्त आहे. प्रभूचे बालपण, तारुण्य, बोलणे, आचरण इत्यादी विषयी माहिती देऊन त्याचा स्वभाव, वर्तन गुण यावरून तो अलौकिक असून मानव नव्हता; आकाशातून उतरला होता वगैरे सिद्ध होते असे मत मांडले आहे.

सत्यवेदोपदेश – येशूसभेचा एक गुरू

प्रकाशक – महागुरूस्वामी यांचे अनुमतीने प्रसिद्ध केले.

प्रकाशन स्थळ – एक्झॉमिनर प्रेस, मुंबई, सन १८८८ पृ. २१६

(फा. शेळके)

प्रस्तावना – सर्वेश्वराने प्रकट केलेली दिव्य सत्ता व आज्ञा ही बरोबर माहिती असली, तर सत्यवेद द्रोहाचा धोका कमी होईल. म्हणून सत्यवेद शिकविण्यास ही पोथी उपयोगी पडेल. रोमन कॅथॉलिक साधारण श्रीसभेने शिकविलेला वेदधर्म हा एकच सत्यवेद धर्म व मोक्षस्थलास नेणारा एकच सन्मार्ग असे यात दाखविले आहे. एकूण सर्व पुस्तक प्रश्नोत्तर रूपाने आहे. एकूण अडतीस अध्याय आहेत. ही प्रश्नोत्तरे खालील मुद्द्यांस अनुलक्षून आहेत.

(१) देव आहे आणि एकच आहे. याविषयी (२) देव लक्षणाविषयी (३) परिशुद्ध त्र्यैक्याविषयी. (४) सृष्टीविषयी (५) देवदूताविषयी (६) मनुष्याविषयी (७) मागल्या विषयावरून काढलेले काही सिद्धान्त. (८) लोकोद्धारापूर्वी घडलेल्या गोष्टी. (९) दुसरी राष्ट्रे तारणारा सिद्ध होण्याची व्यवस्था. (१०) देवपुत्राचा अवतार. (११) स्वामीच्या जन्मानंतर घडलेल्या गोष्टी. (१२) येशूख्रिस्तस्वामी जाहीर चाल वर्तणूक. (१३) स्वामीचा दिव्य ज्ञानोपदेश व पुण्यचाल. (१४) येशूनाथ स्वामी खरा लोकोद्धार कर्ता याविषयी पूर्वीच्या काळी लिहिलेली भविष्ये. (१५) स्वामी येशू ख्रिस्त यांनी स्वतः सांगितलेले भविष्यवाद आणि केलेली अद्‌भुत कृत्ये. (१६) आणखी काही महाद्‌भूताविषयी. (१७) हिंदू लोक सत्य विश्वासीत नाहीत म्हणून त्यांनी सांगितलेली निमित्ते व बहाणे. (१८) स्वामी येशू ख्रिस्त मनुष्यासाठी दुःख सोसून मरण पावला. (१९) स्वामीचे देह पुरणे, पुनरुत्थान व मोक्षारोहण. (२०) सत्यवेदाचे साक्षीविषयीच्या काही गोष्टी. (२१) स्वामी येशूख्रिस्त लोकन्यायकर्ता. (२२) मोक्ष आणि नरक. (२३) सत्यवेदाचा शुद्धिकारक अग्नी आणि हिंदुमतांचा पुनर्जन्म. (२४) इहलोक संकटाचा अर्थ. (२५) देवाच्या आज्ञा आणि पाप याविषयी. (२६) परिशुद्धात्म्याचे आगमन–श्रीसभा. (२७) सर्वेश्वर साधारण श्रीसभा व सत्यवेद राखितो व सर्वांस प्रसिद्ध करतो, म्हणून इतिहास व अनुभव या पासून उतरलेले पुरावे. (२८) श्रीसभेची लक्षणे. (२९) प्रोतेस्तंत मते संबंधी आणखी काही विषय. (३०) साधारण श्रीसभेचे ख्रिस्तवान याचा ज्ञानालागे बांध व अर्च्य शिष्टादरण. (३१) दिव्यकृपा आणि प्रार्थना. (३२) येशूची वेदना आणि दिव्य हृदय ह्या विषयींचे भक्तिज्ञान. (३३) देवद्रव्य लक्षणे या विषयींचा साधारण मजकूर ज्ञानस्नान व धृत्यभ्यंग. (३४) सद्‌प्रसाद. (३५) पश्चाताप. (३६) अत्याभंग आणि गुरुस्तव. (३७) विवाह. (३८) संन्यास, नवस आणि सभा संस्कार ह्याविषयी.

पुस्तकाची मराठी भाषा जुनी लकब दर्शविणारी आहे.

सृष्टिजन्य व ज्ञापितधर्म आणि सृष्टिव्यवस्था व क्रम यामध्ये सादृश्य –

(भाषांतर) मूळ लेखक लॉर्ड एच्. एफ्. मिशन छापखाना, कोल्हापूर, १८८९.

(दासू)

शास्त्रांत वर्णिलेल्या क्रिया भाग – २

लेखक एल्. बिसेल, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, १८९० पृ. ८+२५०

(दासू)

ब्राह्मणधर्माने हिंदुस्थानकरता काय केले आणि ख्रिस्ती धर्म त्याकरिता काय करील ? म्हणजच लाभालाभ – प्रका. ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, मेथॉडिस्ट पब्लिशिंग हाऊस, १८९४ पृ. २ + ४ + ३ + १६४.

प्रस्तुत पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्या भागांत हिंदुधर्मातील दोषकथन केले आहे. दुसऱ्या भागात हिंदुस्थानातील लोकांनी ख्रिस्ती धर्माचा खऱ्या मनाने स्वीकार केल्यास त्यांस कोणकोणती सुखे प्राप्त होतील असे लेखकास वाटते, याचे सविस्तर निवेदन केले आहे.

दुसऱ्या भागात आरोग्य वाढेल, दीर्घायुष्य लाभेल, ज्ञानाचा प्रसार होईल, मानव जातीतील बंधुत्वभाव सर्वत्र प्रसृत होतील; दुःख कमी होईल व मनांस खरे सुख व शांती लाभेल, पापाची क्षमा लाभेल त्यायोगे पवित्र आचरण वाढेल; अंतःकाळी गौरव प्राप्त होईल; वगैरे अनंत प्रकारे ख्रिस्तीधर्म स्विकारून होणारे फायदे वर्णिले आहेत.

खऱ्या धर्मांची चिन्हे

बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मराठी सीरीज, मुद्रक – व्हिक्टोरिया प्रिंटिंग प्रेस, १८९४ आठवी आवृत्ती पृ. २८

पापी मनुष्याचा उद्धार करण्याचा मार्ग, अविचाराचे परिणाम, हिंदुधर्मातील देवाविषयी माहिती (हरीविजय वगैरे वरून) तपाविषयी माहिती, मुक्ती म्हणजे काय, पाप म्हणजे काय या विषयी तपशिलाची हिंदुधर्मानुसार सांगितलेली माहिती वा कल्पना चूक कशा आहेत हे लेखकाच्या दृष्टीने दाखवून दिले आहे. व त्या संदर्भात खरा धर्म कसा व कोणता, अर्थात तो ख्रिस्ती धर्म हे सांगितले आहे. शेवटी देवाची प्रार्थना काय म्हणावी ते दिले आहे.

राक्षसरूपी मनुष्यास ठार मारणाऱ्या दाविदाची गोष्ट

ऋत्री एम्. के. प्रका, ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, मुंबई, मुद्रक–निर्णयसागर, मुंबई–१८९६ पृ. १६. (दासू)

एका विद्यार्थ्याची साक्ष

रे. ना. वा. टिळक, प्रका. रघुनाथ नारायण हर्षे, मराठी वाङ्मय विभाग, मेथॅडिस्ट चर्च, मुद्रण–बॉम्बे कॉन्फरन्स, आयव्ही टॉवर्स, लॉरेन्स रोड पुणे–१. नागरिक छापखाना, नाशिक पहिली आवृत्ती १८९८ साली दुसरी आवृत्ती १९६९ (जेसुईट फादर्स नगर).

रे. ना. वा. टिळक यांचे " एका विद्यार्थ्याची साक्ष " (A Student's Testimony) हे पुस्तक १८९८ साली बिराज वैभव छापखाना, वाई येथे छापले. पहिल्या आवृत्तीचे मुखपृष्ठ १९६९ च्या आवृत्तीत छापले आहे. त्या मुखपृष्ठावर " तेव्हाच त्याला दृष्टी आली आणि त्याने उठून बाप्तिस्मा घेतला." आणि एतावत सरसिज कुड्मलस्य कृत्यम्भित्वांभः सरसि विनिर्गमो बर्हियत्त् आमोदो विकसना इंदिरा निवासः । स्तत्सर्वं दिनकरकृत्यमामनन्ति । " ही दोन सुवचने छापली आहेत.

१९६९ च्या आवृत्तीमध्ये पानाच्या उजव्या बाजूस आजची प्रस्तावना व डाव्या बाजूस ' मूळची प्रस्तावना ' छापली आहे. नंतरही पानाचे डाव्या बाजूचे भागात पुस्तकाचा मूळ मजकूर आणि उजव्या भागात आवृत्तीमधील संदर्भ आधुनिक काळास न समजतील तर ते समजावे अशा संदर्भयुक्त टीपा दिलेल्या आहेत. त्या टीपांत तत्कालीन (मूळ आवृत्तीच्या काळातील) काही व्यक्तीची नावे, घटना, प्रसंग, इत्यादींचा समावेश आहे.

एका विद्यार्थ्याची साक्ष हे पुस्तक " A Spiritual Awakening Among India's Students " या पुस्तकावरून केलेले भाषांतर आहे.

पुस्तकाचे अखेरीस स्वदेशाभिमान ही कविता आणि अवतार हिंदूमताप्रमाणे व ख्रिस्तीमताप्रमाणे याबाबत संस्कृत श्लोक व त्याचे मराठी भाषांतर दिले आहे.

मुळात सुमंत विष्णु करमरकर यांची प्रस्तावना आहे. त्यात रे. ना. वा. टिळकांची धर्मांतराविषयी काय भूमिका होती याविषयी निवेदन केले आहे. ज्या धर्ममताकडून हिंदुस्थानातील भिन्न जाती व लोक यांचे ऐक्य होऊन आर्यभूमीची उन्नती होईल असा धर्म स्वीकारायचा अशी नारायणरावांची धारणा होती. त्यासाठी अनेक धर्मांचे साधन केले तेव्हा त्यांना ख्रिस्तीधर्माबद्दल खात्री वाटली. त्यांनी मनाच्या सांगीप्रमाणे वागण्यास विलंब लावला नाही असे या प्रस्तावनेत म्हटले आहे.

" प्रस्तावना आजची " अशोक देवदत्त टिळक यांची आहे. या प्रस्तावनेत व्यक्त केलेल्या आशयानुसार ९ मे १९६९ हा रे. टिळक यांचा ५० या स्मृतीदिन. रे. टिळकांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना निवडून पुन्हा एकवार लोकांसमोर ठेविली आहे. पूर्वी १८९८ साली धर्मांतरविषयक हे पुस्तक लोकांसमोर आले. त्याचीच काही स्पष्टीकरणात्मक टीपा देऊन काढलेली आवृत्ती आहे. (१९६९–) १८९५ साली रे. टिळकांनी बाप्तिस्मा घेतला. ख्रिस्ती झाल्यावर अकरा महिन्यांनी रे. टिळकांनी A Spiritual Awakening among India's Students या इंग्रजी पुस्तकासाठी " A Student's Testimony " लिहून दिली. त्यांनीच त्याचे मराठी भाषांतर केले. १८९७ च्या नोव्हेंबर डिसेंबरच्या बालबोध मेव्यातून प्रसिद्ध झाले. १८९८ साली तेच त्यांनी पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले.

' एका विद्यार्थ्याची साक्ष ' या पुस्तकात रे. टिळकांनी दिलेल्या निवेदनानुसार हिंदुस्थानासाठीं एक नवा धर्म स्थापण्याचे मी प्रयत्न करीत होतो खरा. इतके नाही तर ज्याच्या योगाने जगातील सर्व राष्ट्रे एकबंधुत्वाच्या अनुबंधाने एकजीव होतील असल्या धर्मांच्या मागे मी लागलो होतो....कोणतेंही कार्य एकदम होत नाही. मी ख्रिस्ती झालो पण हा परिणाम ज्या परोक्षापरोक्ष कारण परंपरेचा झाला. तिचे इत्थंभूत वर्णन देण्यास मला अवकाश नाही. " रे. टिळकांनी दिलेली कारणे थोडक्यात अशी—

(१) टिळकांची आई फार भाविक व प्रेमळ होती– " देवाला भिऊन

वागा, सर्वांचे बरे करा " असा उपदेश ती नेहमी करीत असे ते संस्कार त्यांच्या मनावर घडले.

तसेच लहानपणी लाभलेल्या एका शिक्षकाच्या बोलण्याने स्वदेशप्रीतीची बीजे मनात रुजली. आपल्या देशातील परिस्थितीचे अवलोकन व तिजविषयी विचार मनात सतत घोळत. त्यामुळे जातिभेदाच्या, कर्मठपणाच्या, धर्मढोंगाच्या वातावरणातून देशाची होत असलेली अवनती पाहून आपल्या देशाचे पुढे काय होईल, याची सतत चिंता लागून राही. अनेक सुधारक शिक्षकांची गाठ पडल्याने अनेक विषयांवर प्रांजलपणे विचार करण्याची सवय झाली. यातूनच विचार, उच्चार, आचार या त्रयीत एकरूपता राखण्याचा धीटपणा आला. विचार–स्वातंत्र्यास खंड पडेल असा धाकधपटशहा कधी वाट्याला आला नाही. परिपाक म्हणून देशासाठी नवधर्मस्थापना व्हावयास हवी असे सारखे जाणवूं लागले, एकदा आगगाडीत भेटलेल्या साहेबाने दिलेले बायबल वाचले त्यांत अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली. गरिबांस, दुःखितास तारणारा असा हवा असलेला धर्म आहे असे जाणवले. बुद्धीने ख्रिस्ती झालो. मनाने ख्रिस्ती होण्यास काही काळ लोटला.।"

बाप्तिस्मा १० फेब्रुवारी १८९५ मुंबईस अमेरिकन मिशन भजनालयांत झाला. शेवटी छापलेली स्वदेशभिमान ही कविता ज्ञानोदय २७–१२–९४ मध्ये छापली आहे. स्मृतिचित्रांत "धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे" या शीर्षकाने आहे.

जुन्या करारातील चित्रे व गोष्टी

लेखक–ऋषी एम्. के. प्रका. ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, मुंबई, निर्णयसागर मुंबई १८९८, पृ. ४+६१. (दासू)

मनुष्याविषयी देवाचा हेतू भाग २

प्रका. बॉम्बे गार्डियन, मुंबई १८९९ पृ. ४+१३९ मिसेस एम्. बॅक्सरकृत इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर.

(दासू)

ज्ञाननीतिबोध संग्रह

बाबा पदमनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मेथॉडिस्ट पब्लिशिंग हाऊस, १८९९ पृ. ४+८+८+३०३.

पवित्रशास्त्रांतील नीतिविषयक पुस्तकावरील निवडक विषयांवर उपदेशपर टीका ग्रंथ मुळात इंग्रजीत आहे. त्यावर आधारलेला हा संग्रह यात घेतलेले विषयः ईश्वरभक्ती, ईश्वराची सूत्रे, मनुष्याची कर्तव्ये, सदाचाराचा सुपरिणाम, दुराचाराचे दुष्परिणाम, धार्मिक व अधार्मिक गुण लक्षणे, सद्‌गुरू प्रशंसा, दुर्गुणनिषेध, इत्यादी एकशे तेवीस विषय आहेत.

ख्रिस्ती धर्मोपदेशाची सिद्धता

रे. रे. ई. एम्. विल्सन, अमेरिकन प्रेसबिटेरिअन मिशन, इस्लामपूर, प्रका.

ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मराठी लिटरेचर समिती करिता, "ज्ञानोदयावरून" पुनर्मुद्रित १९२४ पृ. २३.

या पुस्तकात उपदेशाची लक्षणे कोणती असावीत हे सांगताना (१) विषय-संगती (२) व्यवस्थित कथानुक्रम (३) विचारोघ अशी तीन लक्षणे सांगितली आहेत. नंतर प्रत्येक लक्षणाचे स्वतंत्र विवेचन केले आहे.

विषय सांगतो म्हणजे काय, हे सांगताना विषय संगतीची व्याख्या केली आहे ती अशी एका विशिष्ट कार्याकरता एखाद्या विषयामधून काढलेल्या विचारांची नीट जुळणी होय. हे विचार अनेक प्रकारचे व परस्परांहून भिन्न स्वरूपाचे देखील असू शकतील. तरी विषय व हेतू या दोहींच्या धोरणाने त्यांची जुळणी झाली पाहिजे.

ही विषय संगती कशी साधावी, विषय एकच घ्यावा, भाषणाचा हेतू एकच असावा, विषय समजून सांगणे हेच उद्दिष्ट, उपदेशकाने स्वतःच्या गुणांचे प्रदर्शन करू नये.

खिस्ती होणे म्हणजे काय ? व आपला जुना धर्म टाकून खिस्ती का व्हावयाचे हे समजल्याखेरीज कोणी खिस्ती होणार नाही.

प्रभू येशू खिस्ताचे शिक्षण बहुतेक दृष्टांतरूपी होते. त्या पद्धतीचा आपण शांतपणे विचार करावा. दृष्टांतोपयोगी गोष्टी टिपून ठेवण्याची सवय लावावी.

शास्त्रात वर्णिलेल्या क्रिया (भाग १ ला)

लेखक – विसेल एल्. बॉम्बे ट्रक्ट ॲड बुक सोसायटी, प्रका. एम्. ई. पब्लिशिंग हाऊस, मुंबई. इ. स. १९०१ पृ. २८४.

बायबलमध्ये येणाऱ्या क्रियांची माहिती – (दाते सूची)

जुन्या करारातील गोष्टी

सांगळे ए. एम्. प्रका. खिश्चन लिटरेचर सोसायटी, मुद्रक – निर्णयसागर, मुंबई. १९०१ पृ. ४ + ६७ (दाते सूची)

जुन्या करारातील शंकांचे निवारण

भाषांतरकार :– इ. एस्. मोडक, प्रकाशक – सोसायटी फॉर प्रमोटिंग खिश्चन नॉलेज, मिशन प्रेस, कोल्हापूर, १९०३, पृ. १ + ७१ किंमत ४ आणे. (हिवाळे)

जुन्या करारातील शंकांचे निरसन हे पुस्तक 'इ. एम्. मोडक' यांनी केले. रेव. राईट बिशप ए. एफ. डब्ल्यू. यूंग्म,' लंडनचे बिशप यांनी केलेल्या इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर आहे. मुंबई येथील सोसायटी फॉर प्रमोटिंग खिश्चन नॉलेज या संस्थेसाठी त्यांनी हे भाषांतर केले.

लेखकाने उपोद्घातामध्ये इंग्रजी भाषेतून प्राकृत महाराष्ट्र भाषांतर करणे किती अवघड आहे त्यासंबंधी निवेदन दिलेले आहे. इंग्रजी विशेषनामे मराठीत भाषांतरित करण्यास लोकप्रसिद्ध नियम नसल्याने फारच दुर्धर ठरते. त्यातच

मंडळींनी सांगितल्याप्रमाणे अक्षरशः भाषांतर करणे फारच दुर्घट होते असे भाषांतर-काराचे म्हणणे आहे.

सदर पुस्तकात प्रथमाध्यायात आमचे धर्मशास्त्र आम्हास कसे मिळाले याची माहिती दिली आहे. त्यातही प्रथम भागात धर्मशास्त्राचे इंग्रजीत भाषांतर करण्यापूर्वीची हकीकत आणि द्वितीय भागात प्रथम इंग्रजी भाषांतरापासून शेवटच्या पुनरावृत्तीपर्यंत माहिती दिली आहे. प्रथम भागात यरूशलेम वा रोम अथवा एक्लेसातील मंडळीचे इ. स. सुमारे १२० च्या वेळचे जे दफ्तर त्यातील माहिती दिली आहे. त्या दफ्तरात–

(१) जुन्या करारातील पुस्तकांचे हस्तलेख.

(२) जुन्या करारातील बहुत पुस्तकांचे ग्रीक भाषेत केलेले भाषांतर.

(३) कित्येक 'अपाविफल' म्हणजे शास्त्रसंहिताबाह्य असल्या पुस्तकांच्या वळया.

(४) पवित्र शुभवर्तमाने असल्याचे नमूद केले आहे.

द्वितीय भागांत मूळ पवित्र शास्त्राचे ज्ञान.

(१) ग्रीक व इब्री हस्तलेख.

(२) प्राचीन भाषांतरे.

(३) खिस्ती लेखकांनी पवित्र शास्त्रांतून घेतलेले उतारे.

या तीन उगमांपासून प्राप्त होते असे सांगून नंतर प्राचीन भाषांतरकर्त्यांचे नाव, काळ, भाषांतरकर्त्याविषयी काही माहिती व भाषांतराविषयी काही माहिती असा मसुदा आहे.

अध्याय दुसरा

या अध्यायामध्ये पवित्रशास्त्र ईश्वरप्रणीत आहे असे आम्ही का म्हणतो, या संबंधी मीमांसा केली आहे. (१) पवित्र शास्त्राची विलक्षण एकवाक्यता हे एक प्रमुख कारण सांगितले आहे. प्रेरित आत्मे जे असतात त्यांच्या उक्ती, कृत्ती, चमत्कार वगैरेत आढळणारे साम्य ही ती 'पवित्र शास्त्रा'ची विलक्षण एकवाक्यता होय. त्याविषयी सविस्तर लिहून नंतर हेच आत्मे प्रेरित आत्मे म्हणून ईश्वराने का निवडले बरे ? हा प्रश्नच चर्चेस घेतलेला आहे. प्रेरितांच्या जीवनातील चमत्काराचे निरूपण करून तद्नंतर सर्व निवेदनाचा निष्कर्ष म्हणून पवित्र शास्त्र आम्ही ईश्वर प्रणीत मानतो असे म्हटले आहे.

यानंतर (१) पवित्र शास्त्राचे सर्व भाग सममहत्त्वाचे आहेत काय ? (२) ईश्वर प्रेरणेने बुद्धिवैभवाचा लोप होतो काय ? (३) पवित्र शास्त्राच्या ईश्वर प्रणीतपणावर विश्वास ठेवल्याने त्यातल्या व त्याविषयींच्या लेखांचा स्वतंत्रपणे शोध करण्यात काही अडथळा येईल का ? हे प्रश्न विचारात घेतले आहेत.

पहिल्या प्रश्नाचे उत्तर एका अर्थी पवित्र शास्त्राचे सर्व भाग सम महत्त्वाचे आहेत व दुसरे पक्षी नाहीत असे दिले आहे. सममहत्त्वाचे आहेत असे सांगताना "ईश्वरप्रणीत सर्व लेख शिक्षणाकरिता, निषेधाकरिता व न्यायीपणासंबंधी बोधाकरिता उपयोगी आहेत." या समर्थनाचा आधार घेतलेला आहे. तर सममहत्त्वाचे नाहीत सांगताना पवित्र शास्त्राचा प्रथम भाग व्यावहारिक ज्ञान शिकविणारा व द्वितीय भाग देवत्वाविषयी भरपूर माहिती देणारा आहे. असे निदान सांगितलेले आहे.

ईश्वर प्रेरणेने बुद्धिवैभवाचा लोप होतो काय ? या प्रश्नाचे उत्तर देताना लूकाने केलेल्या शुभवर्तमानाच्या प्रथम काही ओव्यांचा संदर्भ दिलेला आहे. पवित्र शास्त्र लिहिणारापैकी प्रत्येक जण एकेका काळचा मनुष्य असल्याने त्यावेळच्या लोकांत प्रवृत्त असलेलेच शास्त्रीय व ऐतिहासिक ज्ञान होते. हा मुद्दा विचारात घेऊन पडणाऱ्या मर्यादांची जाणीव करून दिली आहे. ईश्वर प्रेरणेने बुद्धिवैभवाचा लोप होत नाही व होऊ नये व लोप झाल्यास तो तात्कालिक असतो असे म्हटले आहे.

ईश्वर प्रणीतपणावर विश्वास ठेवल्याने पवित्र शास्त्रातील लेखांचा स्वतंत्र शोध घेण्यास अडथळा येत नाही. नव्या कराराबाबत आला नाही व तसा तो जुन्या कराराबाबत येऊ नये असा आशय आहे. बिशप कार्लेक यांचे विग्रेसंबंधी प्रश्नापासून किंवा वादविवादापासून निष्पन्न होणारे परिणाम कितीही भारी असोत, त्या प्रश्नांचा विचार करण्यास योग्य माणसे, योग्य निकाल घेत असतात. त्यांच्या निकालाची प्रतीक्षा करीत स्वस्थ बसणे आपणास उचित आहे. अशी वचने उद्धृत केलेली आहेत.

तिसऱ्या अध्यायात प्रत्यक्ष जुन्या करारातील शंकाचे निवारण आहे. याचे एकूण आठ भाग असून, प्रत्येकात एकेका मुख्य व आनुषंगिक किरकोळ शंकांचे निवारण केलेले आहे. उत्पत्तीविषयी खऱ्या गोष्टी सांप्रतकाळच्या भाषेत लिहिणे अवघड आहे परंतु त्याविषयी जे लिहिले आहे ते सरासरी विचार करण्यापुरते लिहिले आहे, असे लेखकाचे म्हणणे आहे.

आदाम व हव्वा यांच्या कथेविषयी वादविवाद ऐतिहासिक आधारावरच केल्याचा लेखकाचा दावा आहे. या कथेच्या वादाच्या संदर्भात आदामला देवाच्या प्रतिभेप्रमाणे कसे उत्पन्न केले, ते सांगितले आहे. तसेच मनुष्य स्वभावात पतनाचे प्रमाण काय सापडते याही प्रश्नाचा विचार केला आहे. ईश्वराने आदामचे पतन का होऊ दिले ? याचा विचार करताना –

"परमेश्वर कोणत्याही स्वतंत्र इच्छेवर बलात्कार करीत नाही" हा महत्वाचा विचार मांडला आहे. तसेच काईन व हाबेल यांच्या विषयीच्या शंकाही पण विचारांत घेतल्या आहेत. काईनाची खूण काय होती ? काईनाची बायको कोण होती ? जलप्रलय सर्व पृथ्वीव्यापक होता काय ? जलप्रलय होणे कसे शक्य झाले ? वगैरे प्रश्नांची पण उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जलप्रलयासंबंधी कथा

सांगताना खारद्याची कथा, हेल्लेणी कथा, हिंदुकथा, अमेरिकेतील कथा, यांचा उल्लेख केला आहे. तावांच्या आकाराविषयी शंका, नोहाच्या तावांच्या परिणामाविषयी शोध यांचे निवारण केले आहे. मेधमनुष्याविषयीं थोडेसे लिहून इझाकाचे वर्तन अनीतीचे होते काय ? याचा विचार केला आहे. पाचव्या भागात लोटाची बायको मिठाचा खांब कशी झाली हे निवेदन करून नंतर लेखक याकोबा व एसाव यांच्या कथेकडे वळला आहे. सहाव्या भागात योसेफबद्दल लिहिताना गवताशिवाय इटा करणे, निर्गमाच्या पुस्तकात लिहिलेली हकीकत खरी आहे काय ? चिन्हे व पीडा ज्येष्ठ पुत्राचा नाश, देवाने फारोचे अंतःकरण कठीण कसे व का केले ? वगैरे अनेक उपविषयांवर लिहिले आहे. पहिले बुक केव्हा लिहिले या विषयी लिहिताना अलीकडचे शोध, अडचणी तांबड्या समुद्राचे उल्लंघन, लावोपक्षी, मान्ना वगैरे बद्दल विचार केला आहे. आठव्या भागात, इस्रायली लोकांचे चाळीस वर्षे रानात भटकणे. विचारार्ह म्हणून चर्चेस घेतले आहे. या अवधींत त्यास वस्त्र प्रावरण कसे मिळाले ? बलाम व त्याचे गाढव, समूळ नाश करणारे गाढव" या बाबत ओ.घात लिहिले आहे.

उपसंहारात अखेरीस जुन्या करारांतील शंकाविषयी विचार व त्यांचे निवारण करण्याचे काम अखेरीस वाचकांवरच सोपवितो असे म्हटले आहे.

यात्रिक्रमण

मूळ लेखक – जॉन बन्यन्, प्रकाशक–बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, निर्णयसागर प्रेस, १९०१, ५ वी आवृत्ती, (हिवाळे) पृ. २५२.

या आवृत्तीला सु. वि. करमरकर यांची प्रस्तावना आहे. त्यावेळी करमरकर. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे व्हर्नाक्युलर सेक्रेटरी होते. त्यामुळे प्रस्तावनेनंतर पृ १–६ यात लंडन ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचा वृत्तांत दिलेला आहे, व पुढे पृ. ६ ते १६ बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचा वृत्तांत दिलेला आहे. पुढे पृ. १ ते ८ बन्यन् यांचा संक्षिप्त वृत्तांत दिलेला असून अनुक्रमणिका पृष्ठे ३ व पवित्रशास्त्रांतील ओव्यांची अनुक्रमणिका ६ पृष्ठे आहे. इ. स. १९३६ साली "स्वर्गमार्गावर यात्रिकाचे प्रयाण" या नावाने दि युनायटेड सोसैटी फॉर ख्रिश्चन लिटरेचर, लंडन तर्फे बी. आर. सी. सी. मराठी लिटरेचर कमिटी यांनी तत्त्वविवेचक प्रेस मध्ये छापून प्रसिद्ध केले. प्रस्तावनेत याच्या आवृत्तीसंबंधी उल्लेख नाही. पहिली आवृत्ती १८४८ सालापूर्वीच प्रसिद्ध झाली असली पाहिजे कारण दुसऱ्या आवृत्तीवर १८४८ हे साल आहे. ही भाषांतरे कोणी व कोठे प्रसिद्ध केली हे कळत नाही. परंतु १८५३ साली हरी केशवजी सोमवंशी क्षत्रिय पठारे यांनी केलेले भाषांतर मुंबईस पहिल्या आवृत्तीच्या रूपाने प्रसिद्ध झाले असले पाहिजे. १८६२ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या भाषांतरावर Third edition असे लिहिले आहे. इ. स. १९०१ पाचवी

आवृत्ती प्रसिद्ध झाली १९२० साली रे. जेम्स स्मिथ ह्यांनी ट्रॅक्ट सोसायटीतर्फे नवीन भाषांतर प्रसिद्ध केले. हरि केशवजी याचे भाषांतर तत्कालीन मराठीचे दृष्टीने उत्कृष्ट वठले होते. पण सांप्रत काळी भाषाप्रेमी वाचकांस ते पसंत पडणार नाही म्हणून प्रस्तुत नवीन भाषांतर तयार केले. हरि केशवजी व रे. जेम्स स्मिथ यांच्या ग्रंथातील शब्दरचना व वाक्य रचना यांचा उपयोग करून प्रस्तुतचे इ. स. १९३६ चे भाषांतरित पुस्तक तयार केले असल्याचे सांगतात.

या पुस्तकातील पद्ये – शाहूराव द. उजगरे. शास्त्री ग. स. पंडित, (अमेरिकन मिशन हायस्कूल) शिरूरचे के. स. ठोकळ रे. पीं. के. उजगरे यांनी केलेली आहेत.

इहलोकापासून परलोक पर्यंतच्या प्रवासाचे स्वप्नदर्शनाच्या रूपाने कथन अशा स्वरूपाचे हे पुस्तक आहे.

ख्रिस्त आमचा त्राता

बाबा पदमनजी, १९०४, प्रत्यक्षात हे पुस्तक उपलब्ध झाले नाही पण ज्ञानोदयात याचा उल्लेख सापडतो.

शास्त्रातील महत्वाच्या गोष्टी

हिंटन विल्यम एच्. सहाय्यक, नयनसुख खरात प्रका. नसरापूर ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, प्रकाशन स्थळ, इंडियन व्हिलेज मिशन प्रेस, पुणे १९०५ पृ. ८+१२३. (दाते सूची)

ख्रिस्ती शास्त्रातल्या कथा (जुन्या कराराच्या)

प्रकाशक बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई–निर्णयसागर, मुंबई. इ. स. १९०५, पृ. ६+१९९. (दाते सूची)

पित्याकडे जाणे

भाषांतर – बाबा पदमनजी स्वतः प्रसिद्ध केले. निर्णयसागर प्रेस, इ. स. १९०४ पृ. ४+२८ याची माहिती १० मार्च १९०४ पृ. ७५ ज्ञानोदयात आलेल्या प्रायावरून मिळते ती अशी— Prof. Henry Dumand याच्या Ideal life या पुस्तकाचे हे भाषांतर आहे.

दहा आज्ञा व त्यांचे स्पष्टीकरण

लेखक सरोदे के. सी. प्रकाशक – बॉम्बे ट्रॅक्ट अण्ड बुक सोसायटी, मिशन छापखाना, कोल्हापूर इ. स. १९०५ पृ. ४ + १०२. (दाते सूची).

परीक्षण (The Temptation) G. R. Navalkr

प्रका. मेथॉडिस्ट एपिस्कल पब्लिशिंग हाऊस, फोर्ट, मुंबई १९०८

(हिवाळे)

मिल्टनच्या ‘ पॅराडाईज रिगेन्ड ”मधील चार खंडाचे पद्यमय भाषान्तर. ही ओवीसदृश पद्यरचना आहे.

प्रथम खंड	एकूण	३२९ ओव्या
द्वितीय खंड	,,	३४८ ओव्या
तृतीय खंड	,,	३०९ ओव्या
चतुर्थ खंड	,,	४९५ ओव्या
		१४८१

ग्रंथाची मांडणी जुन्या पद्धतीची असून प्रारंभी देवता नमन व मग कथा निवेदन, कठीण शब्दांचे अर्थ देणाऱ्या व काही माहितीवजा तळटीपा दिलेल्या आहेत. उदा. सैतान कोणाला म्हणतात, योहान्न कोण, गालील देश, नाबिलात शहर, यादेन नदी, याबाबत माहिती.

येशूच्या जन्मापूर्वी योहान्नाने भविष्य वर्तविले तेथपासून कथा भाग घेतला आहे. येशू जन्मानंतर सैतानाचे राज्य संपून त्यांचा विनाश झाला व आनदी आनंद झाला. शेवटी येशूचा जयजयकार.

काव्याची भाषा ओघवती व रसाळ आहे. वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने कामगिरी प्रशंसनीय आहे.

पहिले आणि दुसरे शमुवेल

संपा. ? प्रका. ब्रिटिश ॲण्ड फॉरिन बायबल सोसायटी, मुद्रण–मिशन प्रेस, कोल्हापूर इ. स. १९०९ पृ. २ + २ + १२७. (दाते सूची)

शास्त्र कथा भाग १ ला

पंडिता रमाबाई, प्रका. मुक्ति मिशन, केडगाव इ. स. १९११ पृ. ५६ ?

आमचा प्रभू आणि तारणारा येशू ख्रिस्त याचा नवा करार

(भाषांतर) प्रकाशक – पंडिता रमाबाई, मुक्तिमिशन, केडगाव – मुद्रण – मुक्ती मिशन प्रेस, इ. स. १९१२. पृ. ४२७ (हिवाळे)

मूळच्या हेल्लनी भाषेतल्या ग्रंथाचे सुधारलेले साधे मराठी भाषांतर (Tentlative Simplified Translation) मात्थीने सांगितलेले शुभवर्तमान – त्यामध्ये येशूची वंशावळी, येशूची दैवी उत्पत्ती, मागी लोकांचे येणे, हेरोदाचा मत्सर, मिसर देशात जाणे, बेथलहेमांतील मुलांचा वध, नाजारेथात येऊन राहणे, बाप्तिस्मा करणारा योहान, येशूचा बाप्तिस्मा, त्याविषयी बापाची साक्ष, येशूची परीक्षा, येशूच्या कामाचा आरंभ, येशूचे प्रथम शिष्य, डोंगरावरील उपदेश, सुखी कोण ? ख्रिस्त राजाची प्रजा, पृथ्वीचे मीठ, विशेष न्यायीपण, हत्या करू नको,

व्यभिचार करू नको, सूटपत्र देणे, शपथ घेणे व सूड उगविणे, वैऱ्याशी वर्तन, दान धर्म कसा करावा, प्रार्थना कशी करावी, प्रभूची प्रार्थना, क्षमा करणे, उपास करणे, निर्लोभता, देवावरचा भरवसा, काळजी करू नका, दुसऱ्याशी कसे वागावे, प्रार्थनेत विश्वास व स्थिरता धरणे, दोन दरवाजे, खोटया उपदेशकाविषयी सावध राहण्याची सूचना, शास्त्राचे आचरण करण्याविषयी, येशूचे आरोग्यदायक चमत्कार, त्याच्या कामाकडून प्राचीन भविष्याविषयी परिपूर्ती, दोन प्रकारची दोन माणसे, खिस्त समुद्रावरील वादळ शांत करतो, भूतांवर अधिकार चालवितो, वात रोग्यास बरे करितो, येशू मात्थीला बोलावितो, त्याच्या घरी भोजनास जातो. उपास करणे, येशू एका स्त्रीला बरे करतो, अधिकाऱ्याच्या कन्येला उठवीत दोन आंधळयांस दृष्टी देतो. एका मुक्या भूतग्रस्तास बरे करतो, येशूची करूणा, येशू बाराप्रेषित नेमतो, तो त्यास आज्ञा देतो, येशू त्यास समाधानकारक वचने देतो, त्यांचा स्वीकार करणा. रास त्याचे आशीर्वचन, बाप्तिस्मा करणारा योहान्न याचा खिस्तास निरोप, योहान्नविषयी येशूची साक्ष, लोकांच्या अविश्वासास शब्द ताडण, उपकार स्तुती, कष्टयास येशूचे आमंत्रण, शाब्बाथ दिवस पाळण्याविषयी येशूचे उत्तर, खांचेत पड-लेले मेंढरू, त्याचा घात करण्याविषयी परोश्याच्याकडे इत्यादी विषय आलेले आहेत.

निर्गम मोशाचे दुसरे पुस्तक

मिस्. ए. ए. ॲबट, मुद्रण – धर्मविजय, १९१४ पृ. ३२ (दाते सूची)

धर्मतुला (Religion weighed)

प्रका. बॉम्बे ट्रक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रण - कोल्हापूर येथे मिशन छापखान्यांत छापले. इ. स. १९१४.

हिंदु धर्मात जितके म्हणून हजारो पंथ आहेत, तितके जरी धुंडाळले तरी पापा-पासून मुक्त होण्याचा खरा उपाय तर राहोच पण निदान खरा मार्ग दाखविणारे दुसरेचिन्ह सुद्धा मिळणार नाही. तुमचे वेद, शास्त्रे पुराणे यात मनुष्याच्या बुद्धीने शोधूत काढलेले लाखो मार्ग म्हणजे भुरळ पाडणाऱ्या थापा यांची रेलचेल आहे. असे यात म्हटले आहे. हिंदुधर्मांच्या दोषांचे विवरण पहिल्या भागांत व दुसऱ्या भागांत पुढीलप्रमाणे सांगितले आहे. या पृथ्वीवरील झाडून सर्व लोक पापी आहेत, आणि पापामुळेच सर्वच शिक्षेला पात्र आहेत, मनुष्याला त्याच्या पातकापासून क्षमा मिळावी म्हणून प्रभू येशू खिस्त मानवी देह धारण करून ह्या जगात अवतरला. त्याने असह्य दुःख व यातनाही सोसली, स्वतःचा प्राणही अर्पण केला. तो तीन दिवस कबरेत राहिला. तिसऱ्या दिवशी कबरेतून उठला व स्वर्गात चढला. जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो. तो त्याचा शिष्य बनतो. तो येशूला आपला उद्धारक समजतो येशूच्या पुण्याने व प्रार्थनेने त्याला त्याच्या पातकांची क्षमा होऊन मुक्ती मिळते. वगैरे

यहोशवा आणि न्यायाधीश

ब्रिटिश अँड फॉरिन बायबल सोसायटी, मुंबई, निर्णयसागर, मुंबई १९१४ पृ. २+५२+१३.

(दाते सूची)

आमचा प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याचा नवा करार

संपादकाचे नाव नाही, प्रका. आर. ए. आदामस्, सेक्रेटरी – ब्रिटिश अँड फॉरिन बायबल सोसायटी, मुंबई, निर्णयसागर प्रेस, इ. स. १९१६, (Revised edition) पृ. ५५४. (हिवाळे)

पवित्रशास्त्र प्रसारक मंडळीच्या मुंबईतल्या सहाय्यकारक मंडळीसाठी मूळ हेल्लणी भाषेतील सुधारलेले नवीन भाषांतर (समानवचनासहित).

या पुस्तकात – मत्तय मार्क, लूक योहान, प्रेषितांची कृत्ये, रोमकरांस पत्र, करिंथीकरास पहिले पत्र, करिंथीकरास दुसरे पत्र, गलती यास पत्र, इफिसकरास पत्र, कलसैकरांस पत्र, थेस्सलनीकैकरास पहिले पत्र, थेस्सलिनीकैकरास दुसरे पत्र, तीमथ्याला पहिले पत्र, तिमथ्याला दुसरे पत्र, फिलेमोनाला पत्र, तीनाल पत्र, इब्रर यास पत्र, आदी विषय सविस्तरपणे हाताळलेले आहेत.

सत्यलेख (Marathi abriged edition)

प्रका. मिस्. ई. मोरलंड, फॉर द ख्रिश्चन बुकशॉप, अमर बिल्डिंग, फोर्ट मुंबई, मुद्रक – आर्यभूषण प्रेस, पुणे. (हिवाळे)

पहिली आवृत्ती १९१६ दुसरी आवृत्ती ? १९४२ नंतर ? पुस्तकातील मजकूराची आठ प्रकरणांत विभागणी केलेली आहे. आठ प्रकरणांची माहिती येणेप्रमाणे–

१ ले प्रकरण – उत्पत्तिस्थान, पवित्रशास्त्राचा जन्म, मूळ हस्तलेख, हल्ली अस्तित्वात असलेला हस्तलेख, पवित्र शास्त्राची मूळ भाषा, यासंबंधी विवरण.

२ रे प्रकरण – पवित्रशास्त्र व त्याचा इतिहास या संबंधी.

३ रे प्रकरण – पवित्रशास्त्रातील ग्रंथ, जुन्या करारातील एकूण चाळीस व नव्या करारातील सत्तावीस ग्रंथांची माहिती दिली आहे.

४ थे प्रकरण – पवित्रशास्त्राचे अस्तित्व हाच एक चमत्कार होय, असा आशय सांगितला आहे.

५ वे प्रकरण – पवित्र शास्त्रासंबंधी वापरलेली रूपके वा सांकेतिक चिन्हे या विषयी विचार येथे केला आहे. दीप, आरसा, गंगाल, अन्न, मध, निर्मळ सोने, अग्नी, तलवार, सूर्य, पाऊस व हिम, देवाचा शब्द अशा साऱ्या रूपकांचे विवरण.

६ वे प्रकरण – पवित्रशास्त्र – प्रेरणा, तिचे मूळ स्वरूप या विषयी विचार केला आहे. देवाची प्रेरणा करण्याची रीत, प्रेरणेचे साक्षीदार. वगैरे.

७ वे प्रकरण – पवित्र शासनाची योजना कशी झाली ? प्रारंभ, शेवट, ग्रंथाची उत्पत्ती वगैरे कसे तयार इत्यादी माहिती.

८ वे प्रकरण – पवित्र शास्त्रातील शास्त्रीय ज्ञानाविषयी विवेचन, मनुष्य, मनुष्याचे मूळ वसतिस्थान, मनुष्य अस्तित्वात कसा आला ? वगैरे.

असा एकूण मजकूर पुस्तकात आहे

बालबोध गोष्टी – भाग २ रा

प्रकाशक – रे. जे स्मिथ, ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, १९१८ (ठोकळ) हे " लाईन अपॉन लाईन " या इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर आहे. या दुसऱ्या भागात प्रकरण ४० ते ७९ कथांचा समावेश आहे. यातील धार्मिक कथांस आवश्यक तो भाषेचा आकर्षकपणा नाही. भाषा जास्त प्रमाणात उपदेशप्रधान आहे.

शास्त्रातील रत्ने

संपादक :– फ्रिचले इ. डब्ल्यू. प्रका. मनोरंजन मुंबई, १९१८ पृ. १२६ (दाते सूची) ?

ईश्वरी प्रेरणा, देहधारी ख्रिस्त आणि पवित्र आत्मा

लेखक – ज. एफ्. एडवर्डस्. प्रका. जे. एफ्. एडवर्डस्, पश्चिम हिंदुस्थानातील संयुक्त ईश्वर परिज्ञान पाठशाळा, सोलापूर रोड, पुणे. मुद्रण–आर्यभूषण प्रेस, पहिली आवृत्ती १९१९, दुसरी १९४०.

तीन भागांत या पुस्तकाची मांडणी केलेली आहे. पहिल्या भागात अध्याय दोन असून पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याविषयी शास्त्रातील शिकवण या मथळ्याखाली (१) पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याविषयी जुन्या करारातील संदेश. (२) व नव्या करारातील संदेश, सांगितला आहे.

दुसऱ्या भागात– **पवित्र शास्त्रातील पवित्र आत्म्याचे सामर्थ्य** चार अध्यायात विशद केलेले आहे.

तिसऱ्या भागात– देहधारी ख्रिस्तात ईश्वरी आत्म्याचे सामर्थ्य स्पष्ट करण्यासाठी अध्याय ७ मध्ये ख्रिस्ताच्या देहधारणात ईश्वरी आत्म्याचे कार्य, देहधारण आणि अवतार या विषयी टीप व येशूच्या अनुभवात व जीवनक्रमात पवित्र आत्म्याचा प्रभाव कसा होता ते विशद केलेले आहे.

योहानाचे नियमशास्त्र (जे मोशेच्या हाती दिले होते ते म्हणजे **मोशेनें लिहिलेली पाच पुस्तके**). (प्रारंभ, निर्गम, लेवी, गणना, अनुवाद) प्रका. पंडिता रमाबाई मुक्तीमिशन, केडगाव, १९२० पृ. ३२२ + १ (दासू)

यहोशवा, शास्ते व रूथ Joshva, Judges and Ruth प्रका. R. A. Adms, Secretary British and foreign Bible Society, Bombay

Auxillary, Bombay १९२०, (Revised edition) मनोरंजन प्रेस, (हिवाळे)

जुन्या करारातील तीन पुस्तकांचे मराठी भाषांतर.

२४ पवित्र शास्त्रपाठ

संपा. सावरकर दि. शं., मुद्रक– आर्यभूषण प्रेस, १९२२, आवृत्ती २ री २ + ३८. (दासू)

संक्षेपात्मक ख्रिस्तालॉजी,

लेखक– व्ही. आर. पंडित, प्रका. रे. जे. हेन्री लॉर्ड, सेक्रेटरी– ख्रिस्ती ज्ञान प्रसारक संस्था, एस्. पी. जी. मिशन छापखाना, अहमदनगर. १९२२.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे पवित्र देहधारणांचे अद्‌भुत रहस्य आणि आत्मिक अनुग्रहांचे साधन सप्तक यावर सरळ बुद्धिवाद होय. ख्रिस्ताविषयी तुम्हांस कसे काय वाटते ? तो कोणाचा पुत्र ? तो मनुष्य आहे किंवा मनुष्यापेक्षा अधिक आहे ? आणि जर अधिक तर कितपत ? तो देवाचा पुत्र कसा ? तो देव आहे की देवापेक्षा काही कमी ? आणि जर कमी तर कितपत व कसा ? अशा अनेक प्रश्नांस उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे.

देहधारी प्रभू येशूचा ईश्वरी स्वभाव, प्रभू येशूचा मानवी स्वभाव, या दोहींचा एकाच व्यक्तित असलेला संयोग व भेद, ख्रिस्तामध्ये देहधारण होण्याचे मानवी साधन, ईश्वरी देहधारण, त्याचे हेतू, देवाशी मनुष्य प्राण्यांचा समेट, ख्रिस्ताचे देहधारण हे ईश्वरी गुणांची साक्ष आहे. अशा प्रकारच्या मुद्यानुसार पूर्वार्धात विवेचन केलेले आहे.

उत्तरार्धात पवित्र एक्लेसियाची माहिती दिली आहे. हे पुस्तक तयार करण्यास कित्येक इंग्रजी लेख व पुस्तकांचा लेखकाने आधार घेतला आहे. ते वेळोवेळी तळटीपांत नमूद केले आहे.

कुलपती व भविष्यवादी

जुन्या करारातील गोष्टी, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड सोसायटी, मुंबई, मुद्रक– लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई. १९२३ पृ. ६ + २५२.

रे. जे. स्मिथकृत इंग्रजी ग्रंथाच्या आधारे लिहिलेला ग्रंथ. (दासू)

ख्रिस्तानुवर्तन

भाषांतरकार– ना. वा. टिळक व दे. ना. टिळक, प्रका. भास्कर सदानंद जाधव, चिटणीस, भारतीय ख्रिस्ती ज्ञान प्रसारिणी, पुणे. आर्यभूषण मुद्रणालय, पुणे, १९६८ द्वितीय आवृत्ती. पृ. २५१ (लेदर्ली).

" थोमा–अ–केम्पिस कृत ग्रंथाचे " खिस्तानुवर्तन हे भाषांतर ना. वा. टिळक व दे. ना. टिळक यांनी केले.

मूळ ग्रंथ पवित्रशास्त्रानंतर परमार्थावर लख्ख प्रकाश पाडणारा असा अत्यंत लोकप्रिय झालेला ग्रंथ होय. यात देवाच्या प्रेरित शब्दांचा फारच मोठ्या प्रमाणावर समावेश केलेला आहे. आध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त करून देण्याचे हे पुस्तक साधन असून खिस्तीतर बांधवांनासुद्धा हे पुस्तक प्रिय झालेले आहे, असा मूळ ग्रंथाबद्दलचा अभिप्राय ' उपोद्घातात ' व्यक्त केलेला आहे. उपोद्घात अमरावतीचे महागुरूस्वामी यांचा आहे.

पुस्तकाचे प्रथम भाषांतर ना. वा. टिळक यांचे असून ' खिस्ताचे अनुकरण ' या नावाने प्रथम १९२४ साली प्रसिद्ध झाले. १९२९ व १९३० पुन्हा दोन भागांत हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर १९५९ साली त्या पुस्तकाची पुनरावृत्ती प्रसिद्ध झाली. १९६८ साली त्याचीच द्वितीयावृत्ती निघाली.

भाषांतराच्या मूळ ग्रंथाचे नाव " De Imitato Christi " " असे असून १४१८ मध्ये तो प्रसिद्ध झाला. त्यावेळी ग्रंथावर ग्रंथकर्त्यांचे नावही नव्हते. नंतर अनेक पुराव्यांनिशी तो ग्रंथ केम्पिस् कृत असल्याचे सिद्ध झाले.

ग्रंथाचा आशय थोडक्यात असा—

पुस्तक पहिले – जगातल्या पोकळ गोष्टी सोडून खिस्तानुवर्तन करणे, स्वतः विषयी नम्रपणाची समजूत असणे, सत्याचे शिक्षण, कर्तव्यात दूरदर्शित्व, पवित्रशास्त्राचे परिशीलन, उच्छृंखल वासना, रिकामी आशा व पोवळ गर्व यांपासून दूर राहणे, कोणाशीही अतिपरिचय नसावा, आज्ञेला मान देणे, अंकित असणे, बहुभाषण, शांती प्राप्त करून घेण्याविषयी, आपल्या ठायी परमेश्वराच्या अनुग्रहाचे कार्य अधिकाधिक व्हावे अशी उत्कट इच्छा धरण्याविषयी, आपत्तीपासून लाभ, मोह प्रतिकार, अविचाराने मत न बनविण्याविषयी, कार्ये उदारबुद्धीने करावी, दुसऱ्यांचा कमीपणा सोसून घेणे, जगापासून अलिप्त असे जिणे, पवित्र धर्मपित्याची उदाहरणे, धर्माचार, एकान्तवासाची आणि मौनाची आवड, अंतःकरणाच्या अनुताप अवस्थेविषयी व ' पाप्यां 'ना होणाऱ्या दंडाविषयी, आपल्या जिण्याची आस्थापूर्वक संशुद्धी करण्याविषयी.

पुस्तक दुसरे – आभ्यंतर जीवनाविषयी, नम्रपणे सादर असणे, चांगल्या शांत मनुष्याविषयी, अंतःकरणाचा शुद्धपणा व हेतूचा साधेपणा, स्वतःविषयी विचार, चांगल्या सद्सद्विवेक बुद्धीपासून प्राप्त होणारा आनंद, सर्वांपेक्षा येशूवर अधिक प्रीती करणे, येशूशी निकट स्नेह असणे, सर्व सांत्वनाचा अभाव, देवाच्या कृपेबद्दल कृतज्ञता, क्रूसाची आवड धरणारांचे अल्पसंख्यात्व, पवित्र क्रूसाचा राजमार्ग.

पुस्तक तिसरे – श्रद्धावान आत्म्याशी, खिस्ताचे अंतःस्थ रीतीने भाषण, अंतर्यामात सत्याचे मूक भाषण, देवाची वचने नम्रपणे ऐकून घेण्याविषयी व त्याचा

विचार पुष्कळजण करीत नाही याविषयी देवासमोर सत्य आणि विनय हीच आपले निवासस्थाने बनली पाहिजेत याविषयी, ईश्वरी प्रीतीचा आश्चर्यकारक परिणाम, खऱ्या प्रीती करणाराचे लक्षण, विनयाच्या पदराखाली कृपादान झाकून ठेवणे, देवापुढे स्वतःला क्षुद्र समजणे, अंतिमसाध्य परमेश्वर होय. परमेश्वर म्हणून त्याच्याचकडे नित्य नजर ठेवून कार्ये करावीत. देवाच्या सेवेचे माधुर्य, वासनांचे परीक्षण आणि दमन, सहनशीलता आणि विषयोपभोगांच्या वासनेचा उच्छेद, प्रभू येशूचे उदाहरण पुढे ठेवून व देवाला विनयपूर्वक शरण राहून त्याच्या आज्ञांना मान देणे. आपणा मध्ये काहीतरी चांगले आहे या भावनेने फुगून जाऊ नये म्हणून ईश्वराच्या गुप्त निर्णयाचे मनन करीत असणे, आपल्या प्रत्येक वासनेविषयी आपण काय म्हणावे व करावे याविषयी केवळ परमेश्वराच्या चरणी सुख शोधावे, साऱ्या चिंता देवाला वहाव्या. ऐहिक दुःखे अपकार सोसून घेणे, स्वतःचे मनोदौर्बल्य कबूल करणे, ईश्वराच्या ठायी विसावा पावणे, देवाचे उपकार स्मरणे, आदी.

पुस्तक चौथें – यामध्ये ' पवित्र प्रभुभोजना 'साठी श्रद्धान्वित प्रबोध, प्रभुभोजन घेण्यापूर्वी कशी तयारी करावी याविषयीचे विचार, ख्रिस्ताशी ऐक्य करण्याचा प्रयत्न करावा. ख्रिस्ताचा स्वीकार करण्याविषयी उत्कट प्रेम व प्रबळ इच्छा, ख्रिस्त शरीर संस्कार जे घेतात त्यांनी आपली सर्व इंद्रिये पवित्र श्रद्धेच्या स्वाधीन करावीत.

अशा आशयावर पुस्तकात लेखन आहे. मराठी भाषांतरातील भाषा निवेदनात्मक आहे. प्रौढ व प्रगल्भ आहे. मधून मधून उपदेश, प्रतीके, रूपके, दृष्टांत इत्यादींचा वापर केलेला आहे. अर्थात हे सर्व मुळातील असावे.

शेजारधर्म

लेखक – दि. शं. सावरकर, प्रका. दि. शं. सावरकर, ४६४, रास्तापेठ, पुणे. मार्च १९२४ आ. १ ली. पृ. ३२.

शेजाऱ्यावर प्रेम करा या येशू ख्रिस्ताच्या उपदेशाचे विवरण, पॅलेस्टाईन देशातील यहुदी व्यापाऱ्यांची बोध गोष्ट, दुःखाने गांजलेल्या किंवा संकटात पडलेल्या लोकांना मनापासून सहाय्य करावे हे आपले कर्तव्य आहे. तुम्ही आपल्या सुख दुःखाचा विचार करताना आपल्या शेजाऱ्याच्या सुखदुःखाचा विचार करावा. शेजारी शब्दाचा व्यापक अर्थही समजावून सांगितला आहे.

" पवित्र मार्क लिखित शुभवर्तमानातील मजकुरावर मनन " (Meditation on Gospel, according to St. Mark)

लेखक – रे. कॅनन व सी. एस्, रिविंग्टन प्रका. एस्. पी. जी. मिशन प्रिंटींग प्रेस, अहमदनगर. १९२४.

(हिवाळे)

या पुस्तकात – ख्रिस्ताची थोरवी, ख्रिस्ताचा अधिकार, ख्रिस्ताची सहानुभूति,

ख्रिस्ताच्या दृष्टीने प्रत्येक जीवात्म्याची किंमत केवढी आहे? मनाचे काठिण्य असे चवतीस विषय शास्त्रवचने देऊन स्पष्ट केलेले आहेत.

नव्या करारातील पुस्तकांची प्रवेशिका

मूळ लेखक – रे. जी. पी. टेलर, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट अँण्ड बुक सोसायटी करिता, रे. एन्. मॅक्नीकल, ॲक्टिंग मराठी लिटरेचर मिशनरी, आर्यभूषण प्रेस, १९२५ आ. १ ली. पृ. ३८६ (हिवाळे)

रे. जी. पी. टेलर यांच्या Introduction to the books of the New Testament या पुस्तकाचे भाषांतर. रे. आर. बी. डग्लस यांच्या परिशिष्टाचाही समावेश आहे. प्रस्तुतचे पुस्तक मूळ इंग्रजी पुस्तकाच्या गुजराती भाषांतरावरून मराठीत भाषांतरित केले आहे. भाषांतरकाराचे नाव दिलेले नाही.

मत्तय मार्क, ल्युक, योहान, ख्रिस्त चरित्रे, प्रेषितांची पत्रे याबावत सविस्तर लिहिले आहे.

नव्या करारातील पुस्तकांचे कालानुक्रमाप्रमाणे टिपण देणारा आलेख दिलेला आहे.

परिशिष्टांत–नवा करार कसा बनत गेला, पुस्तककर्त्याविषयी दोन शब्द, नव्या कराराची भाषाशैली, नव्या करारातील प्रमाणभूत मानलेल्या पुस्तकांचा संग्रह अशी माहिती दिलेली आहे.

विश्वबंधुत्व अथवा योनाच्या पुस्तकाची शिकवण

मूळ लेखक – इ. डब्ल्यू. फेल्ट, प्रका. रे. दि. शं. सावरकर, एल्. सी. ई. मराठी लिटरेचर मिशनरी, आर्यभूषण, पुणे. १९२५ पृ. ६४. ट्रॅक्ट बुक सोसा. न प्रसिद्ध केलेले हे भाषांतरित पुस्तक. भाषांतरकाराचे नाव कुठेच दिलेले नाही.

पहिल्या भागात–पूर्वेतिहास सांगितला आहे. त्यात या पुस्तकाविषयी लोकांची गैरसमजूत दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांना या पुस्तकाचे वाटावे तितके अधिक महत्त्व वाटत नाही हे सांगून पुस्तकांत उन्नत स्वरूपाचे शिक्षण असल्याचे विशद केले आहे. हिंदवासीय ख्रिस्तीलोकांना व हिंदी राष्ट्राला या पुस्तकापासून काय शिकता येण्याजागे आहे ते सांगितले आहे. यानंतर लेखक योना यांच्याविषयी लिहिले आहे. त्याचा काळ व कामगिरी विशद केलेली आहे. या पुस्तकाबाबत प्रचलित असलेली दोन मते मांडली आहेत. एका मतानुसार योनाचे पुस्तक ऐतिहासिक मानले जाते, तर दुसऱ्या मतानुसार योनाचे पुस्तक दृष्टान्तरूप व उपदेशपर समजले जाते. पुस्तकाबद्दल मतान्तर गौण ठरून शिकवणुकीचे महत्त्व अधिक आहे असे म्हटले आहे. प्रभूख्रिस्ताने योनासंबंधाने केलेला उल्लेख दिला आहे व त्यानंतर इस्राएल लोकांचा दास्यातील काळ, यरूशलेम शहराचा नाश, इस्राएल

लोकांचा बंदिवास इत्यादीबद्दल लिहिले आहे. दुसऱ्या भागात योनाचे चरित्र सांगितले आहे. तिसऱ्या भागात योनाने प्रकट केलेला संदेश कोणता त्याचा तपशील आहे.

अखेरीस हिंदवासीयांच्या संदर्भात योनाच्या शिकवणुकीचे महत्त्व स्पष्ट केले आहे. देवाचे हिंदवासीयांवर प्रेम आहे. विश्वबंधुत्वाचे महत्त्व हिंदवासीयांस पटावयास हवे. राष्ट्रीयत्वाच्या अतिरेकी कल्पनांमुळे महायुद्धासारखी संकटे उद्भवतात. योनाच्या पुस्तकावरून हिंदवासीयांनी कोणत्या गोष्टी शिकाव्यात हे सांगताना, प्रेम भाव, सहकारित्व, विश्वबंधुत्व आदी शिकावे. यानंतर हिंदी ख्रिस्तीजनांनी धर्मप्रसाराचे कार्य का व कसे करावे ते सांगितले आहे.

सर्व विषयांवर लहान लहान प्रकरणे असून प्रकरणाखाली अभ्यासासाठी सूचना व प्रश्न दिलेले आहेत. आवश्यक संदर्भही दिलेले आहेत.

शास्त्रासंबंधी प्रश्नोत्तरावली

लेखिका – पंडिता रमाबाई, प्रका. मुक्तिमिशन केडगाव १९२८. पृ. २+९२

(दासू)

प्राचीन ख्रिस्तशिष्यांची कामगिरी अथवा प्रेषितांची कृत्ये – सटीक

मूळ लेखक– रे. डॉ. चार्लस आर. अर्डमन, अनुवादक– दि. शं. सावरकर, प्रका. दिनकर शंकर सावरकर, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रण–आर्यभूषण प्रेस, पुणे, प्रथमावृत्ती १९२९ किं. ८ आणे पृ. १६०. (सौ. बार्नबस)

प्रास्ताविक – प्रास्ताविक दोन शब्द ए. आर. ब्रायन, वेस्टर्न इंडिया मिशन प्रेस्बिटेरीअन चर्च यु. स्टेट्स अमेरिका, सांगली यांचे आहे.

मूळ ग्रंथकर्त्यांचा उपन्यास मराठीत दिला आहे. रे. डॉ. चार्लस अर्डमन हे ईश्वरी परिज्ञान शास्त्राचे, अमेरिकेत प्रिन्स्टन विद्यालयात प्राध्यापक होते.

(१) 'प्रेषितांची कृत्ये' या पुस्तकाचा कर्ता लूक हाच असावा हे साधार मांडले आहे. नंतर 'लूक' ची थोडीशी चरित्रात्मक माहिती दिली आहे. लूकच्य पुस्तकाचा उद्देश, त्यातील मुख्य विषय, पुस्तकाचे नाव, पुस्तकातील विषयांचे स्थूल वर्णन, हे मुद्दे थोडक्यात मांडले आहेत.

यानंतर आरंभीचे शिष्य, विरोधाला सुरुवात, अनुशासनाचा प्रथम पाठ, पहिली छळणूक, समाजघटनेचा उपक्रम, प्राणार्पण करणारा प्रथम 'वीर' फिलीप्पाची कामगिरी, शौलाचे धर्मांतर, पेत्राचा दौरा, कर्नेल्य जमादार, हेरोदाने आरंभिलेली छळणूक, पौलाची पहिली फेरी, पौलाची दुसरी फेरी, पौलाची तिसरी फेरी. पौलाचा बंदिवास, पौलाचे रोम शहरी प्रयाण या विषयांवर माहिती दिलेली आहे.

पवित्र सहभागिता

प्रका. दि. रिलीजस बुक डेपो, सेंटिनरी चर्च बिल्डिंग, ग्रँट रोड, मुंबई ७ तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई ८. द्वितीयावृत्ती १९३१. पृ. ४६. (ठोकळ)

" पवित्र सहभागिता " हा विधी आचरण्यापूर्वी करावयाच्या तयारीचे विवेचन या पुस्तकात आहे.

रे. जेम्म. जी. गूल्ड यांच्या First Communion या पुस्तकाचे मराठी भाषांतर आहे.

अनुवाद

(मूळ लेखक – रे. डब्ल्यू. गोल्डसॅक) बी. आर. सी. सी. चॉ लिटरेचर कमिटी, लव्हलेन, माजगाव मुंबई १० इ. स. १९३१ किं. २ (लेदर्ली.)

पवित्र शास्त्रातील, कित्येक वचनांत मुहम्मदासंबंधी भविष्यकथन केलेले आढळते या मुद्याची शहानिशा.

मुसलमान लोक महंमदाच्या आगमनाविषयी पवित्र शास्त्रात भाकीत केले आहे, असा दावा करतात. त्याबद्दल शहानिशा करणारे विवेचन आहे. मुसलमानांनी आपल्या प्रतिपादनासाठी पवित्र शास्त्रातील ज्या वचनांचा आधार घेतला आहे,त्या वचनांचा मुसलमानांनी लावलेला अर्थ चुकीचा कसा आहे ते या पुस्तकात लेखकान आपल्या मतानुसार दाखवून दिले आहे. तसेच त्या वचनांचा नेमका अर्थ लेखकाच्या मते काय आहे तेही दिलेले आहे व येशू हाच अखेरचा संदेशकार हे सिद्ध केलेले आहे.

खिस्ती मंडळीत प्रविष्ट होणे म्हणजे काय ? पवित्र सहभागिता हा विधी चालू लागतेवेळी वय किती असावे ? हा विधी पाळण्यास कोण लायक आहेत ? त्यात भासणाऱ्या अडचणी कोणत्या ?

पवित्र सहभागितेचा प्रारंभ कसा झाला ? हा विधी पाळण्याचा उद्देश, येशू खिस्ताबरोबर सहभागिता, समर्पण हा विधी करावयाच्या वेळची उपासना, हा विधी पाळणे म्हणजे काय ? अशा अनेक मुद्यांचा विचार केलेला आहे. शेवटी पवित्र सहभागितेसंबंधी शास्त्रपाठांचे परिशिष्ट दिले आहे.

पण वाट पाहतो कोण

लेखिका – ताईसाहेब, प्रका. मिसेस ई. मुलिन्स, Chethalli, P.O. Coorg, South India आर्यभूषण प्रेस, इ. स. १९३२ तिसरी आवृत्ती पृ. ४४

पुस्तकास प्रस्तावना वगैरे काही नाही. पुस्तकाचे स्वरूप गोष्टीरूप आहे. जवळजवळ बारा गोष्टी आहेत. उदा. मी पुन्हा येईनच. यात प्रभू येशूने दिलेले आश्वासन यावर आधारित गोष्टीरूप माहिती. दूर देशीस निघाला सरदार! अशा प्रकारच्या कथा आहेत. सर्व कथा धर्मप्रचाराच्या थाटाच्या आहेत, पण शैलीदृष्टया आकर्षक आहेत.

तुकाराम बोवांचा सेतु

लेखक – जे. एफ्. एडवर्डस्, प्रका. मि. व्ही. ई. आढाव, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी करिता, ७९. गणेशपेठ, पुणे. आर्यभूषण प्रेस, १९३२, आ. १ ली पृ. २०२.

(हिवाळे)

प्रारंभी " तुकाराम निर्मित सेतूवरून । मीही आलो ख्रिस्त चरणी " ही रे. टिळकांची उक्ती उद्धृत केलेली आहे.

ग्रंथकर्त्यांची प्रस्तावना–प्रस्तुतचे पुस्तक लिहिण्यात मुख्य उद्देश दोन–पहिला विठोबाच्या पुष्कळशा भक्तांना " तुकाराम निर्मित सेतूवरून " ख्रिस्ताकडे पार जाता येते हे दाखविणे, दुसरा महाराष्ट्रातील ख्रिस्त शिष्यांना तुकारामांच्या अनुयायांकडे जाण्यास या तुकारामनिर्मित, सेतूचा उपयोग करून घेता येण्यासारखा आहे हे सुचविणे.

तुकारामाचे चरित्र व आत्मचरित्र, तुकारामाच्या चरित्रविषयक माहितीची साधने, ' हिंदूचा भक्तीमार्ग व महाराष्ट्रीय भक्त, तुकाराम बोवाना आलेला भगवद्-भक्तीचा अनुभव, तुकाराम बोवांची शिकवण, तुकाराम बोवांचे गुणमाहात्म्य, लोकांना ख्रिस्तचरणी नेण्यास तुकाराम बोवा कसे साधनीभूत होतात, या विषयीचे तुकारामाचे विचार, तुकाराम बोवा व हिंदी जनता, तुकारामाच्या सेतूवरून जाऊन ख्रिस्तचरणी लागलेले भक्त, तुकाराम बोवा व महाराष्ट्रीय ख्रिस्ती मंडळ या विषयी विवेचन केले आहे.

पवित्र शास्त्राचा आराखडा

संपा. एस्. मोडक, प्रका. एस्. मोडक, मुद्रक–विजय प्रेस, पुणे. इ. स. १९३२ पृ. ६८.

(दाते सूची)

येशू ख्रिस्ताचे मरण व पुनरुत्थान

लेखक – रे. जे. एफ्. एडवर्डस्, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, पुणे, आर्यभूषण प्रेस, पुणे. इ. स. १९३३. आ. १ ली पृ. ९६

(हिवाळे)

मराठी बोलणाऱ्या लोकांच्या क्षेत्रातील हिंदी ख्रिस्ती कामदार व मिशनरी यांना एक पाठ–पुस्तक व्हावे व येशूच्या संदेशाकडे ज्यांचे लक्ष आहे त्यांना प्रस्तुत पुस्तकांत लिहिलेल्या महान अशा दोन ख्रिस्ती धर्मसिद्धान्तावर थोडाबहुत प्रकाश पडण्यास काही साधन व्हावे, हा पुस्तक लिहिण्याचा हेतू आहे, असे प्रस्तावनेत म्हटले आहे. पश्चिम हिंदुस्थानातील संयुक्त ईश्वरपरिज्ञान पाठशाळा यामधल्या विद्यार्थ्यांना दिलेल्या व्याख्यानांचा या पुस्तकांत समावेश आहे.

मराठी भाषांतराचे कामी रा. म. कृ. उजगरे यांचे सहाय्य झालेले आहे. या पुस्तकातील ३, ४, ६ ही प्रकरणे ' ख्रिस्ती लोकशिक्षण ' यांत व काही भाग

ज्ञानोदयात प्रसिद्ध झालेला आहे.

पुस्तकाची मांडणी पुढीलप्रमाणे आहे.

येशूचे मरण याविषयी – भाग पहिला

प्रकरण पहिले – येशू ख्रिस्ताने उपदेशिलेले व अनुभवलेले दुःखसहन (१) गृही असताना येशूने वाहिलेला दुःखभार. (२) देवाच्या कोकरा. (३) येशू व पापक्षमा. (४) भावी वधस्तंभाची छाया. (५) शेवटच्या भोजनावेळचा प्याला.

प्रकरण दुसरे–गेथ्शेमाने व कल्वहरी

प्रकरण तिसरे – येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे रहस्य. यांत वधस्तंभाचा खरा अर्थ समजण्यास येशू ख्रिस्ताची महती जाणणे अगत्याचे आहे यासंबंधी विवेचन.

प्रकरण चौथे – वधस्तंभापासून लाभ कसा होतो ?

प्रकरण पाचवे – पवित्र शास्त्राची साक्ष आणि तिचा अर्थ.

दुसऱ्या भागात – प्रकरण सहावे – येशूच्या पुनरुत्थानासंबंधी विवेचन केले असून—

सातव्या प्रकरणात – येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. आठव्या प्रकरणात – येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या पुराव्याचे मोल तपासून नवव्या प्रकरणात – ख्रिस्ताच्या पुनरुत्थित शरीराचे स्वरूप विशद केलेले आहे. दहाव्या प्रकरणात – येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाविषयी काही दुसरी मतें.

अकराव्या प्रकरणात – ख्रिस्ताचे पुनरुत्थान हे हिंदीस्तानाचे सामर्थ्य आहे हे स्पष्ट करताना पुढील मुद्दे विचारात घेतलेले आहेत.

(१) हिंदीस्तानाला पुनरुत्थान ही अत्यंत महत्त्वाची बाब होय.

(२) या विषयावरील हिंदवासियांच्या शंकांना उत्तर.

(३) पुनरुत्थित ख्रिस्त हिंदवासियांचे स्थित्यंतर करणारे एक सामर्थ्य.

(४) येशू ही दैवी व्यक्ती कोण याविषयी हिंदवासियांना वाटत असलेली अडचण.

(५) आध्यात्मिक दुर्बलतेचा हिंदीस्तानापुढे असलेला प्रश्न.

(६) एक हिंदी ग्रंथकर्ता व पुनरुत्थान.

रत्नमंजूषा अथवा संक्षिप्त ' पवित्रशास्त्र '

भाषांतर – आठवले बा. ना. सहाय्यक – कृ. ल. आपटे, प्रका. आर. बी. डग्लस्, अध्यक्ष – मराठी वाङ्मय कमिटी ऑफ बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह ख्रिश्चन कौन्सिल, दि रिलीजस ट्रॅक्ट सोसायटी, लंडन. तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई. १ ली आवृत्ती. १९३४, पृ. ३९२ (हिवाळे).

होली बायबल या धर्मग्रंथामधून तरुण वाचकांकरिता निवडून घेतलेल्या उताऱ्याचे सरळ मराठी भाषांतर. पवित्र शास्त्र, जुना करार यातून पुढील विषय निवडून

घेतलेले आहेत.

(१) सृष्टीची उत्पत्ती, (२) निर्गम, (३) गणना असे एकूण २९ विषय निवडले आहेत. पुस्तक सचित्र आहे.

धर्माचे उच्चाटन

लेखक – जाधव डी. एस., प्रका. शंकर ज्योतिबा मोहिते, यशवंत; बेळगाव, १९३७.

धर्माच्या गुंगीत हालअपेष्टा सोसणाऱ्या बहुसंख्य श्रमजीवी माणसांची माणुसकी जागृत करणारी विचारसरणी असलेले पुस्तक.

आराधना रहस्य

मूळ लेखक – रे. ॲण्ड्रू मरे, अनु. वा. ब. जोशी आणि हॉवर्ड, प्रका. एन. जी. हॉवर्ड, कोडोळी, कोल्हापूर, आर्यभूषण प्रेस, १९३७. पृ. ६३.

रे ॲण्ड्रू मरे यांच्या "The Secret of Adoration" या पुस्तकाचा रा. रा. वासुदेव बळवंत जोशी व एच. जी. हॉवर्ड यांनी मराठी अनुवाद केला. पुस्तकाला प्रस्तावना वगैरे काही नाही.

खरी भक्ती, देव आत्मा आहे, मध्यस्थी व वंदन, ईश्वरप्राप्तीची इच्छा, शांत आराधना, देवमुख म्हणजे प्रकाश, देवावर निष्ठा, देवाशी एकांतवास, देवाकडे स्वतःला पूर्णपणे वाहून घेणे, देवविषयक ज्ञान, देवपिता, देवपुत्र, देवपवित्र आत्मा, प्रभूचे रहस्य, स्वर्गातील वातावरण, देवाची थोरवी, सात्त्विक चित्त, देव सर्वसमर्थ आहे. ईश्वरविषयक भय, देव अगम्य आहे, देवाची पवित्रता, देवाची दया, देववचन, स्तोत्र संहिता, देवाचा गौरव, पवित्रैक्य असा देव, ईशप्रेम, देवाची प्रतीक्षा, ईश-स्तुती – या विषयांना अनुलक्षून चर्चात्मक माहिती आहे. पुस्तकाची बैठक वचारिक आहे.

प्रभूचा मासे धरणारा

लेखक – मोरलंड, ई., प्रका. इंटर मिशन ऑफिस. आर्यभूषण प्रेस., पुणे. १९३७. आवृत्ती २ री. पृ. २० व्यक्ती व्यक्तींच्या संवाद प्रसंगी उपयोगी पडतील अशी पवित्र शास्त्रातील वचने.

यहुद्यांच्या डोंगरावरील स्तोत्रगायक

मूळ लेखक – चार्ल आर्थर वाईड (निवडक स्तोत्रांची पार्श्वभूमी दर्शविणारी कथामाला) प्रका. A. A. Abbot for All India Literature Committee of the W. F. M. S. 10 Phayne Rd. Poona. (प्रथमावृत्ती – १९३८.

पुस्तकाचे इंग्रजी नाव – The Singers of Judah's hills series of stories setting for selected Psalms.

(डोंगरे)

या पुस्तककर्त्यांचा प्रधान हेतू एवढाच आहे की ही अद्‌भुत प्राचीन स्तोत्रे अधिक चालती बोलती करावी. ज्यांचे पवित्र शास्त्रावर प्रेम आहे व म्हणून ज्याचा अर्थ अधिक चांगला समजावून घेण्याची ज्यांना इच्छा आहे, त्यांना विशेषेकरून आमच्या मंडळातील तरुणांना या प्राचीन क्षेत्रातील जिव्हाळ्याचे संदेश उपलब्ध करून द्यावे.

अठरा स्तोत्रांची पार्श्वभूमी अतिशय ओघवत्या व व्यावहारिक उदाहरणांनी स्पष्ट केलेली आहे. अठरा स्तोत्रांची तीन भागांत विभागणी केलेली आहे.

(१) देवाच्या बाह्यसृष्टीची गायने–त्यात आठ स्तोत्रांची पार्श्वभमी.

(२) भक्तीची गायनें– यात चार स्तोत्रांची पार्श्वभूमी.

(३) विश्वासाची गायने– सहा स्तोत्रांची पार्श्वभूमी.

सर्वसामान्य माणसाला आवडेल अशी निवेदनशैली व ओघवती भाषा या ग्रंथात आहे.

धन्यकुमारी मरीयाचा निर्दोष गर्भसंभव याची लहान पद्धति

मुद्रक–एक्झॅमिनर प्रेस, मुंबई. आवृत्ती दुसरी, इ. स. १९३९ पृ. १६. (जेसुइट फादर्स, नगर)

सोळा पृष्ठांची ही छोटीशी पुस्तिका आहे. पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना दिली आहे. त्यात नमूद केल्यानुसार या पद्धतीचा– रचणार कोण हे माहित नाही. ज्याला पवित्र शास्त्राची चांगली माहिती नाही त्याला ही पद्धती बरोबर समजणार नाही. आमचे नवीन ख्रिस्ती लोक पवित्र मरीयाचा सन्मान करण्यात वाढावे अशी आमची आशा आहे व याच हेतूने आम्ही या पद्धतीचे भाषांतर केले आहे.

१९१३ सालच्या जुन्या भाषांतराची पुनरावृत्ती छापली आहे, मरीयाच्या स्तुतिगीतांत तिचा – मोठेपणा प्रस्थापित केला आहे.

पवित्र पौलाने करिंथकरांस लिहिलेल्या पहिल्या पत्राचे स्पष्टीकरण–

भाषां. रे. बा. म. गद्रे, प्रका. द राईट रे. लॉर्ड बिशप ऑफ नाशिक, तत्त्व-विवेचक प्रेस, मुंबई. जून १९३९. पृ. १३७. (हिवाळे)

हे पुस्तक भाषांतरित आहे. डानीकलचे बहुसन्मान बिशप आझराया ह्यांनी पवित्र पौलाने करिंथकरांस लिहिलेल्या पहिल्या पत्राचा अभ्यास करू इच्छिणारांसाठी इंग्रजीत लिहिलेल्या टीपांचे हे मराठी रूपान्तर आहे.

पुस्तकात करिंथची माहिती, पौलाच्या कामगिरीची माहिती इत्यादि बाबींचे विवेचन आले आहे.

बोबडे बोल संपा. : केशव सयाजी ठोवळ, ९ मे १९३९

हा अनेक कवींच्या कवितांचा संग्रह असून तो कुमारी इंदिराबाई त्रिभुवन

यांच्या सहकार्याने संपादित व प्रकाशित केलेला आहे. नाशिक येथील नागरिक छाप-खान्यात तो ९ मे १९३९ साली प्रसिद्ध करण्यात आला. त्याची पृष्ठसंख्या ४७ आहे. हा काव्यसंग्रह ख्रि. वा. लक्ष्मीबाई टिळक यांना अर्पण करण्यात आलेला असून त्या संग्रहाला देवदत्त टिळकांची प्रस्तावना लाभली आहे. यांत स्वतः केशव सयाजी ठोकळ, सुहासचंद्र साळवी, सत्यवान नामदेव सूर्यवंशी, ज. जा. थोरात, खुशालभाऊ घोरपडे, डी. एल्. साळवी, मेघःशाम पिराजी जाधव, इंदिराबाई त्रिभुवन, आदींच्या कविता आहेत. निरनिराळ्या वृत्तांत धार्मिक, सामाजिक, बाळजीवन आदी विषयांवर या कविता असून तत्कालीन मराठी कवितेची रचना, वृत्त कवितेचे विषय, आपल्य वैशिष्टयानिशी आलेले आहेत.

ख्रिस्तीदानार्पण

अनु. रे. वसंत निलकंठ भाटेगांवकर, प्रका. टी. एच्. वीरकर, सेक्रेटरी ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई. पहिली आवृत्ती १९३९, दुसरी आवृत्ती, १९५२ पृ. ८४.

मूळ लेखक राईट रे. व्ही. एस्. आझराया, Christian या इंग्रजी ग्रंथाचे मराठी भाषांतर. करेन चर्च, वनक चर्च, कोरिया येथील ख्रिस्ती मंडळया, आशिया खंडातील ख्रिस्ती मंडळया, हिंदुस्थानातील ख्रिस्ती मंडळया, अपुरे दान देण्याची कारणे, पवित्र शास्त्राधारावर रचलेली दान देण्याची कारणे, आमच्या प्रभूची पैशा-विषयी शिकवण या मुद्दयांवर माहिती व सूचना दिलेल्या आहेत.

मुस्लिम बंधूंना येशूख्रिस्ताचे निमंत्रण

रे. जे. एफ्. एडवर्डस्, प्रका. जे. एफ्. एडवर्डस, युनायटेड थिऑलाजिकल कॉलेज ऑफ वेस्टर्न इंडिया, पुणे. १,; १९३९.

युनायटेड थिऑलॉजिकल कॉलेज ऑफ वेस्टर्न इंडिया यातील विद्यार्थ्यांना दिलेली व्याख्याने या पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत.

पुस्तकात एकूण अकरा प्रकरणे आहेत त्यातून पुढील विषयांचा विचार केलेला आहे.

प्रकरण पहिले – हिंदुस्थानातील मुस्लिम लोकांना ख्रिस्तसंदेश देण्याची ख्रिस्त महामंडळाची जबाबदारी आहे, याबद्दल विवेचन करताना हिंदुस्थानातील मुस्लिमांची संख्या, प्रांतातील व संस्थानमधील मुस्लिमांची संख्या, हिंदुस्थानातील मुसलमानांचे शेकडा प्रमाण, वर्तमानपत्रे, शुभवृत्त प्रसाराची चळवळ, धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य, ख्रिस्ती काम करण्याची तयारी, आपल्या कर्तव्याची जाणीव, भूवार्ता गाजविणारे संघ, इस्लामी धर्मात अनेक भाषा बोलणारे आहेत. मुस्लिम लोक किती निरक्षर आहेत, संघटना वगैरे बाबत चळवळ, ख्रिस्ताविषयी नवी वृत्ती, पुढारी तयार होण्याची जरुरी, या विषयांचा विचार केला आहे.

दुसऱ्या प्रकरणात- हिंदुस्थानातील इस्लामी धर्माच्या सुधारणेच्या चळवळी यांचा विचार आहे.

तिसऱ्यात महंमद आणि येशू यांची तुलना चवथ्या प्रकरणात हिंदुस्थानातील ख्रिस्त महामंडळ व इस्लामी धर्म यांचा सोळाव्या शतकानंतरचा इतिहास, यात जेसुईट मिशन्स, हेन्री मार्टिन, कार्ल फॅडर, सफदर अली, इमामुद्दीन, नव्या इस्लामी धर्माचा उदय याबाबत माहिती आहे. पाचव्यात इस्लामी धर्मातील सामर्थ्याची उगमस्थाने स्पष्ट केलेली आहेत व सहाव्यात इस्लामी धर्माची अपूर्णता सांगितली आहे. त्यात महंमदाचे चारित्र्य, देवाविषयी कल्पना, पाप आणि क्षमा, प्रार्थना, स्त्रियांविषयी दृष्टिकोन, शिक्षण, आत्मिक सामर्थ्यांची उणीव वा विषयांचा समावेश आहे. सातव्या प्रकरणात- मुस्लिम लोकांच्या पूर्वग्रहाच्या दृष्टिकोणातून ख्रिस्ती शिकवण विचारात घेतली आहे. आठव्या प्रकरणात- येशू ख्रिस्ताविषयी बदललेली वृत्ती, येशूचा अलौकिक जन्म, येशूचे चमत्कार, चारित्र्य, पुनरुत्थान याविषयी माहिती दिलेली आहे. ९-१० व ११ प्रकरणात ख्रिस्ती-धर्माचे मोठेपण सांगून ख्रिस्ती धर्म स्वीकारणे किती हितावह ते सांगितले आहे.

मला जगणे म्हणजे (For me to live)

प्रका. मिस्. ए. ए. ॲबट, मुद्रक- आर्यभूषण मुद्रणालय, प्रथमावृत्ती १९४०. पृ. ९६ (वैरागर).

लेखकाच्या परवानगीने भाषांतरित व प्रसिद्ध केले. अनुवादकाचे नाव दिलेले नाही.

फ्रान्स देशातील हॉटेस पिरनीज या प्रांतातील लूर्ड्स या गावी मरीयाने दिलेल्या दर्शनांचे वर्णन प्रस्तुत पुस्तकात दिले आहे.

याशिवाय चमत्काराने रोग बरे केल्याची उदाहरणे सांगितली आहेत. अशा तीस उदाहरणांची यादी दिलेली आहे..

बेर्नादेतला दिलेल्या दर्शनाबद्दल सर्वत्र माहिती कळत गेली तसतसे लोकांचे कुतूहल, शासकीय अधिकाऱ्यांकडून झालेला धार्मिक छळ. त्या मुलीस सोसावे लागलेले हाल, प्रदीत मारियाचे रूपदर्शन वगैरे सर्व वर्णन सविस्तर दिले आहे.

शेवटी वेर्नादेतचे व्यक्तिगत चरित्र थोडक्यात वर्णिले आहे.

प्रभुपदी

लेखक- साधु सुंदरसिंग, अनुवादक- रे. दा. आ. पटेकर, प्रका. सुमन्त दयानंद करंदीकर, चिटणीस, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, बॉडवी रोड, फोर्ट, मुंबई १. पृष्ठे ८४. प्रकाशन स्थळ- नागरिक छापखाना, शांतिसदन, नाशिक २.

या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या, पहिली डिसेंबर १९४०, द्वितीयावृत्ती सप्टें. १९५८, तृतीय आवृत्ती जाने. १९६९, प्रास्ताविकात साधु सुंदरसिंगाने ख्रिस्ता-

द्वारे आपणास आलेला अनुभव व्यक्त करण्यासाठी आपण हे पुस्तक लिहिले आहे, असे म्हटले आहे. प्रकाशकाने आपल्या दोन शब्दांत माहिती देताना मूळ पुस्तक उर्दूत लिहिले व त्याचे इंग्रजी भाषांतर रे. आर्थर व मिसेस पार्कर ह्यांनी केले व ते मद्रासच्या ख्रिश्चन लिटरेचर सोसायटीने १९२३ मध्ये प्रसिद्ध केले, असे नमूद केले आहे. रे. दा. आ. पटेकर यांनी केलेले हे मराठी भाषांतर १९४० मध्ये ट्रॅक्ट सोसायटीने प्रसिद्ध केले. परंतु ही आवृत्ती खपल्यामुळे अष्टे येथील सुप्रसिद्ध डॉक्टर सतीश्चंद्र गोर्डे ह्यांनी हे पुस्तक पुनर्मुद्रित केले. नॅशनल ख्रिश्चन कौन्सिलच्या लिटरेचर फंडातूनही ह्या पुस्तकाच्या प्रकाशनास आर्थिक सहाय्य मिळाले– (१) परमेश्वराचे मूर्तस्वरूप, (२) पाप व तारण, (३) प्रार्थना, (४) सेवेचे महत्त्व, (५) वधस्तंभ, दुःखसहन यांचे रहस्य, (६) स्वर्ग आणि नरक एवढ्या सहा प्रकरणांतून ख्रिस्तीधर्मतत्त्वे, परमेश्वर उपासना इत्यादी चर्चा केलेली आहे.

ही चर्चा व निवेदन करताना स्वानुभवांचे दाखले दिले आहेत व त्यातून चिरंतन सत्याचे स्वरूप विशद केले आहे. आधारार्थ योहान, लूक, करिंथ वगैरेची वचने आहेत.

संदेष्टे व त्यांचा संदेश

लेखक – रे. विल्यम हेजन, प्रका. विल्यम हेजन, सोलापूर, आर्यभूषण प्रेस, १९४१ पृ. २ + १३२.

(ठोकळ)

या पुस्तकाला प्रस्तावना वगैरे काही नाही.

संदेश का आला, याजकाद्वारे विचारलेल्या प्रश्नांना देवाचे उत्तर देण्यासाठी विवरण केलेले आहे. ख्रिस्तपूर्व काळांतील आद्य संदेष्ट्यापासून येशूपर्यंत झालेले अनेक संदेष्टे–त्यांचे संदेश, शिकवणी, कार्य, पुस्तके, त्या त्या संदेष्ट्याच्या काळातील शासकीय, सामाजिक परिस्थिती इत्यादी विषयींची सविस्तर माहिती दिलेली आहे. कोणकोणते संदेष्टे, त्यांची नावे वरील सारांशकथनांत दिलेली आहेत व ती अधोरेखित केली आहेत. पुस्तकांत अखेरीस विश्वव्यापी संदेश, मनुष्याशी देवाचे नाते व देव आणि आचरण, देव आणि पाप, देव आणि तारण याबाबतही थोडे फार लिहिले आहे.

येशू ख्रिस्ताचे ईश्वरतत्त्व आणि त्याचे उद्धारकार्य

जे. एफ्. एडवर्डस, प्रका. रे. जे. एफ्. एडवर्डस; पश्चिम हिंदूस्थानांतील संयुक्त ईश्वर परिज्ञान पाठशाळा सोलापूर, मुद्रक – आर्यभूषण प्रेस. १९४१ पृ. ८२ (हिवाळे)

महाराष्ट्रातील सर्व निरनिराळ्या चर्चशी संबंध असणारे पालक, शिक्षक, बाय-बल विमेन यांना सर्व प्रकारे उपयोगी पडावे म्हणून हे लहानसे पुस्तक प्रसिद्ध

करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक ख्रिस्ती चर्चच्या वायबल क्लासमध्ये आणि खासगी अभ्यासाकरता या पुस्तकाचा उपयोग करण्यात येईल अशी आम्ही पूर्ण उमेद बाळगतो असे प्रस्तावनेत म्हटले असून या पुस्तकाचे कामी पंडित नारायणराव हर्षे यांची मदत झाल्याची नोंद केली आहे.

पुस्तक आठ प्रकरणांमध्ये विभागलेले आहे. उपोद्घातात—

(१) हा विषय शिकविण्याचे पाच प्रकार,

(२) येशू ख्रिस्ताविषयी दोन खात्रीलायक गोष्टी,

(३) नव्या कराराच्या लेखकाचे चार हेतू,

(४) या ख्रिस्ती सिद्धान्ताचे चिरकालीन महत्त्व; विशद केले आहे.

पहिल्या प्रकरणात – पहिल्या तीन शुभवर्तमानातील येशू ख्रिस्त या मथळ्याखाली येशूविषयी त्याच्या शिष्यांच्या मनांत उमटलेला ठसा कसा होता हे स्पष्ट केले आहे. दुसऱ्या प्रकरणात – येशू ख्रिस्त आणि आरंभीचे ख्रिस्त महामंडळ विशद करून सांगितले आहे.

दुसरा भाग – पाप, त्यातील तिसरे प्रकरण, पापनिरसन असे आहे. त्यात पाप व पापी स्वभाव यातून सुटका होण्याचा मार्ग हिंदुधर्मात आहे काय ? असा प्रश्न विचारला आहे व ख्रिस्ती धर्माचे मोठेपण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तिसऱ्या भागाचे नाव– क्रूसाचा संदेश असे आहे. यातील चौथ्या प्रकरणात हिंदू लोकांना येशू ख्रिस्ताच्या मृत्यूपासून मिळणारा संदेश स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. पाचव्या प्रकरणात– पुढे येणाऱ्या मृत्यूसंबंधी येशू ख्रिस्ताचा दृष्टिकोण सांगितला आहे. सहाव्या प्रकरणामध्ये येशूच्या मरणाची ऐतिहासिक कारणे संक्षेप रूपाने सांगितली आहेत. सातव्या प्रकरणात वधस्तंभ आणि पापाची खात्री यासंबंधी सांगून पश्चात्ताप जीवनाकडे नेतो असे सुचविले आहे. आठव्या प्रकरणात– पवित्र आत्म्याने प्रेरित शुभवर्तमान प्रसाराचा विषय वधस्तंभ यासंबंधी विवरण केले आहे.

स्तोत्रसंग्रह

होली बायबल मधील साम्स या स्कंधाचे नवीन भाषान्तर. भाषा. बा. ना. आठवले, द बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, २०३ हॉर्नबी रोड, मुंबई, तत्त्वविवेचन प्रेस, मुंबई १९४१. पृ. १९८. (हिवाळे)

भाषांतरकाराने आपली भूमिका प्रास्ताविकात मांडताना स्पष्ट केले आहे, " साम्स या स्कंधाचे हे शब्द रूपांतर नसून नवीन भाषांतर आहे. या स्कंधाची (१) बायबल सोसायटीने केलेले (२) साधारण प्रार्थना या पुस्तकात समाविष्ट केलेले आणि (३) पंडिता रमाबाईंनी केलेले अशी तीन नवीन रूपांतरे सध्या उपलब्ध आहेत. परंतु ती रूपांतरे बव्हंशी मुळातील शब्दास मराठी प्रतिशब्द देऊन

केलेली असल्यामुळे, त्यांच्या भाषेत एक प्रकारचा परकेपणा दिसून येतो. म्हणून हे नवीन भाषांतर आपल्या नेहमीच्या भाषेत यथामती केले आहे. "

भाषांतरकाराच्या म्हणण्याची प्रचीती पुस्तक वाचताना येते. आधुनिक मराठीचा उपयोग भाषांतरासाठी केला आहे. अखेरीस काही विशेष शब्द का वापरले, त्यासंबंधी खुलासा केला आहे. -जरूर तेथे अगदी थोडया शब्दार्थ टीपा तळटीपेत दिल्या आहेत.

कवि ना.वा. टिळक यांची या स्कंधावरील हृदयंगम कविता शेवटी छापली आहे.

गुप्त गोष्टी

प्रका. लेखक– माहिती दिलेली नाही. वर्ष ८-९-१९४१ पृ. ४२

impre-mature – M. M. Bolaquer, S. J. Bombay.

मीखायेल आणि फादर यांच्या आठ संभाषणांतून धर्मविषयक चर्चेचा हा वृत्तांत आहे.

या चर्चेत कुमसार, कन्फेशन या धर्मसंस्कारांची माहिती, साक्रामेत म्हणजे काय ? साक्रामेत किती, त्याचा अधिकार कोणता ? पापहरण, येशूने स्थापन केलेला खरा धर्म, अशा प्रकारचे अनेक धर्मप्रश्न चर्चिले आहेत.

संभाषणाची भाषा खऱ्या अर्थाने संवादरूप नसून केवळ दोघांत आहे म्हणून संभाषण म्हणावयाचे. एरवी सरळ निवेदन व उपदेश यास प्राधान्य देणारी भाषा आहे.

साधारण आशय असा–

साक्रमेत म्हणणे धर्मसंस्कार, येशूने सांगितलेली साक्रामेत फक्त सात आहेत. फादर देवासाठी म्हणून देवाने इच्छिलेले सर्व साक्रमेत करतो. 'कुमसार' म्हणजे पापांची क्षमा करण्याचा देवाचा अधिकार, कन्फेशन म्हणजे माणसाकडून स्वतःच्या अपराधांची कबुली, येशूच्या पुनरुत्थानाचा अर्थ असा की जसा यशू मेलेल्यांतून उठला तसे प्रत्येकाने पापातून उठावे. कुमसार (पापांची क्षमा करण्याचा) संस्कार नव्हता. तो येशूने मेलेल्यातून उठल्यानंतर स्थापन केला कारण पुनरुत्थानाने "मी देव आहे" अशी खात्री पटविली गेली व त्यानंतरच त्याने दुसऱ्यास हा जरुरीचा संस्कार सांगितला. कुमसार फादरजवळच करावा आणि आपली आपण क्षमा घेता येत नाही. तसेच पवित्र नद्या, तीर्थ वगैरे स्नानाने पण पापांची माफी होत नाही. येशूने पापांची माफी करण्याचा अधिकार फादरला दिलेला आहे. 'कुमसार' विधी पुढे ढकलला, अशी हयगय करू नये. कितीही दुष्ट पापी असला तरी या विधीने शुद्ध होतो.

अशा प्रकारे सर्व विवेचन प्राधान्ये करून कुमसार विधीबाबत आहे.

दुःखी मातेप्रती भक्तिमार्ग

प्रका. राईट रे, लुईस एफ्. गायेट, कॅथालिक बिशप, नागपूर, एप्रिल १९४१. पृ. ६४.

प्रस्तावनेत प्रथम लौकिक जगात असलेली मातेची महती वर्णिलेली आहे. त्यानंतर स्वर्गीय माता–मरिया हिची थोरवी. हिने तर जगाच्या कल्याणासाठी आपल्या एकुलत्या एक पुत्राची आहुती डोळ्याने पाहिली. त्या पवित्र मातेच्या अनंत उपकाराची फेड करणे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य होय असे म्हटले आहे.

पुस्तकाच्या शेवटी दुःखी मातेची जप नामावली, दुःखी मातेसाठी प्रार्थना, दुःखी मातेच्या पुतळ्यांसमोर करावयाची प्रार्थना; सुखी मरणाविषयी करावयाची प्रार्थना, अमूल्य अर्पण, पवित्र मेरीच्या अश्रूंच्या गौरवार्थ प्रार्थना, हे सारे दिलेले आहे.

चौथा मागी (कल्पित)

लेखक – स. ना. सूर्यवंशी. प्रका. मिस्. इ. मोरलंड. सेक्रेटरी बॉम्बे ट्रॅक्ट, प्रकाशन स्थळ – तत्त्वविवेचक प्रेस. मुंबई १९४१.

" The other wise men " यावरून " चौथा मागी " ही कल्पित कथा लिहिलेली आहे. राजांचा राजा येशू बेथलहेमी जन्मला तेव्हा आकाशात क्षितिजापासून वर फेकला गेलेला तेजस्वी तारा पर्शियात अर्तबानने पाहिला. त्याबद्दल अद्भूत वाणी ऐकली. नंतर त्या राजांचा राजा असणाऱ्या बाळास पाहण्यासाठी पर्शियातून तो प्रवासास निघाला, प्रवासात भुकेलेल्यास, संकटग्रस्तास, तहानेल्यास, पीडितास त्याने मदत केली. अशी मदत करीत प्रवास केला पण राजा दिसलाच नाही. अखेरीस तो निराश असता दैवी वाणी पुन्हा ऐकू आली व त्यानंतर त्यास जो कोणी भेटला तोच तो राजांचा राजा होता हे त्यास नंतर संभाषणावरून उमगले.

ही कथा अतिशय आकर्षक भाषेत लिहिलेली आहे.

नव्या कराराचा साथी

लेखक – सु. ना. थोरात, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मिस्. ई. मोरलंड, आर्यभूषण प्रेस, पुणे. १९४२ पृ. १२०. (ठोकळ) पुस्तकाला प्र. गो. भागवत यांची प्रस्तावना आहे. पुस्तकाची मांडणी पाच भागांत केलेली आहे.

पहिल्या भागात – पॅलेस्टाईन व तेथील रहिवाश्यांची माहिती दिली आहे. तर दुसऱ्या भागात जुना करार व नवा करार यांच्यातील मधल्या अज्ञान काळासंबंधी विवरण आहे. तिसऱ्या भागात नव्या कराराची पार्श्वभूमी विशद केलेली आहे. चौथ्या भागात पंथ व सनेद्रीन सभेची माहिती दिलेली आहे. त्यात ख्रिस्ताचा जन्म, येशूला अवगत असलेल्या भाषा इत्यादी विषयासंबंधी माहिती दिलेली आहे

ख्रिस्तजयंतीची भेट

लेखक– केशव सयाजी ठोकळ, मुद्रक– श्रद्धानंद प्रेस, नगर, नोव्हेंबर १९४६. ख्रिस्तजयंती कशी साजरी करावी असा प्रश्न नेहमी सर्वत्र निर्माण होतो. ही अडचण लक्षात घेऊन हा भक्तीचा कार्यक्रम तयार केलेला आहे.

भक्तिपर कार्यक्रमाचे स्वरूप– भक्तिपर गीतगायन, शास्त्रवचनाचे वाचन असा संमिश्र असून ११ गीते त्यामधून सुवार्तिकांची वचने आहेत. १०–११ पानांची ही छोटीशी पुस्तिका हिला " Marie L. Fairbank " ची प्रस्तावना आहे.

जगप्रसिद्ध प्रवचन

संपादक– रे. फादर जे. एस्. मिरांडा, प्रका.| मराठी सी. टी. एस्. ऑफ बॉम्बे. अमला चर्च, विरार. मुद्रक– न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, केळेवाडी गिरगाव, मुंबई- ४. १९४७. पृ. २५ (जेसुईट फादर्स).

येशूचा डोंगरावरून केलेला उपदेश या प्रवचनात समाविष्ट केलेला आहे.

इतरांशी कसे वागावे, मनात सुविचार असावेत, खोट्या उपदेशकापासून सावध असावे, आदी विषयांबाबत येशूने केलेला बोध यात आहे. शेवटी या प्रवचनांचा लोकांवर झालेला सुपरिणाम, आणि प्रवचनाविषयी काही| विचार सांगितले आहेत.

आपल्या गृहात परमेश्वर

लेखक – डीक्नेस कॅरोल ग्रॅहॅम, प्रका. मिस्. ए. ए. ॲबट, ऐवी टॉवर्स, लारेन्स रोड, पुणे. आर्यभूषण मुद्रणालय, सन १९४९. पृ. ४८.

डीकनेस कॅरोल ग्रॅहम याने लिहिलेले हे पुस्तक मातृसभांच्या विद्यमाने तयार करण्यात आलेल्या पुस्तकांपैकी एक आहे. परमेश्वराचा मानवाबद्दल काय उद्देश आहे, पापामुळे हा उद्देश कसा बिघडला आहे, यासंबंधीची हकीकत या पुस्तकात दिलेली आहे.

शाब्बाथ शाळा चळवळीचे जनक (नाटिका) के. स. ठोकळ, इ. स. १९५३

ज्ञानोदय, नोव्हेंबर १९५३ च्या अंकात मिस् हेटी पॉल हिच्या ' रॉबर्टरेक्स ' या नाटिकेचा ७–८ पानांत केलेला हा अनुवाद आहे. उनाडपणा करून गोंधळ घालणाऱ्या मुलांना रॉबर्टरेक्स ने शाब्बाथ शाळा सुरू करून कसे चांगले व वेगळे वळण दिले, त्यासंबंधीचा आशय या नाटिकेत आहे. अनुवादाची भाषा सुबोध आहे.

ख्रिस्ती मंडळीच्या सभासदाच्या शिक्षणाचा सारसंग्रह के. स. ठोकळ, इ. स. १९५५

अमेरिकन मराठी मिशनचे को–ऑर्डिनेटर रे प्र. शि. भोसले यांनी संपादित

केलेल्या या ग्रंथाचा अनुवाद श्री. ठोकळ यांनी केला असून, या ग्रंथाचे प्रकाशन मिस् इंशिया प्राईस. चेअरमन, लिटरेचर कमिटी, अमेरिकन मिशन, अहमदनगर यांनी १९५५ साली केले, या ग्रंथाला रे. प्र. शि. भोसले यांचे प्रास्तविक आहे. यात खिस्ती महामंडळ आणि त्याचा अर्थ, कार्य मूळारंभ, खिस्ती मंडळी म्हणजे काय ? सभासदत्वाची लायकी कोणती ? खिस्ती मंडळाच्या सभासदाची कर्तव्ये, खिस्ती मंडळीत का मिळावे त्याची कारणे अशा मुद्द्यांचा वापर केला आहे. एकूण पाच प्रकरणे असून, आध्यात्मिक जीवनाची लक्षणे सांगण्यावर अधिक भर आहे.

खिस्ती मंडळ्यांचे स्वावलंबन के. स. ठोकळ, प्रकाशन काळ ?

आर्यभूषण प्रेस, पुणे येथे हा ग्रंथ छापलेला असून छोटासा लेखवजा हा ग्रंथ आहे. सध्याच्या खिस्ती मंडळांच्या आर्थिक दुरवस्थेचे चित्रण असून त्यावर विविध उपाय सुचविण्याचा श्री. ठोकळ यांनी प्रयत्न केलेला आहे.

संत पेत्रस आणि प्रथमारंभींचे खिस्ती महामंडळ –ले. के. स. ठोकळ

प्र. भा. पां. हिवाळे, उषा मुद्रणालय, फेब्रु. १९५९, पृ. ८०

या पुस्तकाला प्रस्तावना प्रा. शांताराम बंडेलू यांची असून डॉ. हिवाळे यांनी प्रकाशकाचे दोन शब्द लिहिले आहेत. या पुस्तकात एकूण वीस प्रकरणे असून पेत्रसची चरित्रात्मक माहिती दिलेली आहे. चरित्र अगदी सुव्यवस्थित मांडले असून भाषा सुबोध, सरळ आहे. ग्रंथ वाचनीय आहे.

का–नाबन

उषा प्रेस, स्टेशन रोड, अहमदनगर इथे हा ग्रंथ छापला गेला, प्रकाशन काळ उपलब्ध नाही.

दीड शतकापूर्वी आसामातील खाशी आणि जैंतिया नावांच्या डोंगराळ प्रदेशात का-नाबन नावाची एक देवभीरू बाई रहात होती. तिने आपला धर्मानुभव सुंदर रीतीने सांगितला आहे. त्याचा हा अनुवाद आहे. का-नावन या मुलीने खिस्ती-धर्म कोणत्या अवस्थेत स्वीकारला त्यासंबंधीची कथा. धर्मांतराच्या काळात प्रत्येक क्षणी तिला येशूच्या मदतीचे आश्वासन, सहकार्य लाभले व धीर मिळाला त्या मनोव्यथेचे सुंदर चित्रण आहे.

महाराष्ट्राला आध्यात्मिक जीवनाची भूक अथवा आध्यात्मिक सामर्थ्याची गरज

सामर्थ्याची गरज

लेखक – रे. जे. एफ्. एड्वर्डस्, प्रका. रे. जे. एफ्. एडवर्डस्, १ स्टेव्हले रोड, पुणे १, आर्यभूषण प्रेस, एप्रिल–१९४७, पृ. १८–२१८ (हिवाळे)

सदर पुस्तकाच्या प्रस्तावनेत रे. जे. एफ्. एडवर्डस म्हणतात की India's

needs of spritual power या त्यांच्या इंग्रजी पुस्तकात विस्तृत व खुलासेवार स्पष्टीकरण असलेले सारे विषयच प्रस्तुत पुस्तकात मुख्य मुद्द्यांच्या सारांश स्वरूपात हाताळलेले आहेत. लेखकाचे इंग्रजी पुस्तक "खिश्चन लिटरेचर सोसायटी ऑफ इंडिया-मद्रास" या संस्थेने एप्रिल १९४७ मध्ये प्रसिद्ध केले. पुस्तकाची चोवीस प्रकरणे आहेत.

पहिले प्रकरण विषय प्रवेश स्वरूपाचे असून, जुन्या कराराविषयी व येशू-विषयी माहिती दिली आहे. प्रकरणाच्या अखेरीस आध्यात्मिक सामर्थ्यांची प्राप्ती ही वैयक्तिक जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. दुसऱ्या प्रकरणात संत पौलाने दिलेल्या ख्रिस्त संदेशाचा गोषवारा दिलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात डॉ. राधाकृष्णन् यांच्या Eastern Religon and Western thought या १९३९ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर टीका असून राधाकृष्णन् यांनी पौर्वात्य धर्माच्या सांगितलेल्या कल्पना नव्या करारातील असून, त्याच कल्पनांचे वेगळ्या नावांनी हिंदुकरण केले आहे, असा आशय सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अनुषंगाने सर्व धर्म समान आहेत काय ? माणसाने जन्मजात लाभलेल्या धर्मातच राहावे काय ? अशा काही प्रश्नांची चर्चा करून, अखेरीस हिंदुस्थानची संकटे हिंदू धर्माने निवारण होणार नाहीत असे मत मांडले आहे.

चवथ्या प्रकरणात हिंदुधर्मातील दोषांचे विवरण केलेले आहे. पाचव्या सहाव्या प्रकरणात हिंदुस्थानातील संत, त्यांचे काव्य व शिकवण विचारात घेतली आहे. सातव्या व आठव्या प्रकरणात, हिंदी लोकांत धार्मिक वृत्ति असून तिचा योग्य व अधिक विकास कसा होईल यासंबंधी विचार. असा अनेक अंगांनी विचार करून महाराष्ट्राची आध्यात्मिक भूक ख्रिस्तधर्मतत्त्वांनी भागेल हा आशय प्राधान्याने पुस्तकात व्यक्त झाला आहे.

पवित्र आत्माविषयक शुभवर्तमान अथवा प्रेषितांची कृत्ये, पुस्तक १ ले

(महाराष्ट्राला आध्यात्मिक जीवनाची भूक) प्रका. रे. जे. एफ्. एडवर्डस्, स्टेव्हले रोड, पुणे, आर्यभूषण प्रेस, १९४७. (हिवाळे) "ना. वा. टिळक आणि पुणे येथील ईश्वर विज्ञान पाठशाळेतील विद्यार्थी (१९३०–१९४६) यास स्मृति-दाखल अर्पण. "मूळ ग्रंथ इंग्रजी भाषेतील, त्याचे मराठी भाषांतर पंडित नारायण लक्ष्मण हर्षे व दाविद गोपाळराव गायकवाड यांनी केले.

पुस्तकाची अठरा प्रकरणे आहेत.

प्रेषितांच्या कृत्यांचे पृथक्करण– प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाच्या लेखकाच्या उद्देशाचे विवरण, येशूची व त्याच्या शिष्यांची शेवटची भेट, येशूची आई मारिया, ख्रिस्ती महामंडळ व यहुदी राष्ट्र यांमधील लढा, असत्य व पातक उघड करणारा,

सामाजिक सेवेकरता ख्रिस्त महामंडळाची संघटना, विश्वचर्चची पहिली महासभा वगैरे प्रकरणे लिहून चर्चा केलेली आहे.

पवित्र आत्माविषयक शुभवर्तमान अथवा प्रेषितांची कृत्ये भाग-२

प्रका. रे. जे. एफ्. एडवर्डस, स्टेव्हले रोड, आर्यभूषण प्रेस, १९४७.

या दुसऱ्या पुस्तकांत प्रकरण एकोणीसपासून एकवीस प्रकरणापर्यंत प्रकरणे आहेत. संत पौलाने निरनिराळ्या वर्गातील लोकांना शुभसंदेश सांगितला ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे. संत पौलाची मित्रांनी व सहकारी बंधूंनीही भेट घेतली. संत पौलाने आपल्यावर पहारा करणाऱ्या प्रत्येक शिपायाला शुभसंदेश सांगितला हे विचार करण्याजोगे, पौलाचे रोम शहरी वास्तव्य, प्रेषित पौलाचे आपले शेवटचे ओझरते दर्शन यावरून कोणता धडा घ्यावा या मुद्यावर विवेचन आहे.

आदरणीय थोमा केम्पनकर ख्रिस्ताचें अनुसरण या विषयी

लेखक – आर्च बिशप डोरींग, एस्. जे. मुद्रक – सेंट पॅट्रिक्स प्रेस, पुणे-१. दुसरी आवृत्ती १९५१ पृ. १५८.

पुस्तक दोन विभागांत विभागलेले आहे. पहिल्या विभागांत २५ अध्याय असून दुसऱ्या विभागात १२ अध्याय आहेत. पहिल्या विभागात–ख्रिस्ताचे अनुसरण आणि आपणाला नीच मानण्याविषयी, सत्याच्या शिक्षणाविषयी, आमच्या कृतीतील शहाणपणाविषयी, पवित्र शास्त्राचे वचनाविषयी, असे आचरण शुद्धीच्या विषयीचे विचार स्पष्ट केलेले आहेत.

दुसऱ्या भागात–अंतर आचरण, नम्रता, शुद्ध मन, चांगुलपणा, येशूशी सलगी ईश्वरी कृपेबद्दल कृतज्ञता अशा मुद्यांवर विवरण केलेले आहे. पुस्तकांत आज्ञा, सल्ला व्यक्त करणारी भाषाशैली आहे. ठिकठिकाणी शुभवर्तमानातील संदर्भ दिलेले आहेत.

योहानकृत शुभवर्तमान

प्रका. बायबल सोसायटी ऑफ इंडिया पाकिस्तान आणि सिलोन, मद्रक– C. L. S. Barnglore, १९५१, पृ. ६०. हे लहानसे ६० पृष्ठांचे पुस्तक भाषांतर-काराचे नाव दिलेले नाही, (हिवाळे) यात जवळ जवळ सत्तेचाळीस मुद्दे घेतले आहेत.

प्रास्ताविक– (१) बाप्तिस्मा करणाऱ्या योहानने येशूविषयी दिलेली साक्ष, (२) बाप्तिस्मा करणाऱ्या योहानचे शिष्य व येशू आदी प्रसंग सांगितल्यावर (४४) येशू योमाला दर्शन देतो. (४५) या शुभवर्तमानाचा हेतू. (४६) येश तिबीया समुद्राजवळ शिष्यांना दर्शन देतो. (४७) पेत्रा बरोबर येशूने शेवटचे भाषण असे प्रसंग सांगून पुस्तक संपते.

ख्रिस्त व ख्रिस्ती

लेखक– सदानंद आप्पाजी पाठक, अध्यापक– बिशप कॉलेज, कलकत्ता प्रथमावृत्ती– १९५२. पृ. ५८ (जेसुईट फादर्स)

नाशिक धर्मप्रांताचे वहिले परमपूज्य बिशप प. वा. फिलीप हेन्री लॉईड यांच्या पुण्यस्मृतीस पुस्तक अर्पण केलेले आहे.

" खिस्त व खिस्ती यांचे नाते काय ? आज आपण विसाव्या– शतकांत २००० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या खिस्ताशी आपला संबंध काय ? हे नाते कोणत्या प्रकारचे ? " वगैरे विचार या पुस्तकात केला आहे, असे लेखक प्रस्तावनेत सांगतो.

यातील लेख प्रथम नागपूर येथील संत थोमाचे प्रार्थना मंदिर व कलकत्याचे बिशप कॉलेज येथे प्रवचने म्हणून दिली होती. ते श्रोत्यांना आवडले व पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्यावर वाचकांना आवडतील व खिस्ताशी असलेला संबंध दृढतर करतील म्हणून ती प्रसिद्ध केली.

प्रारंभीच्या दहा प्रकरणांतून येशूचे थोडक्यात चरित्र सांगितले आहे.

जीवन चरित्र सांगताना, केवळ जीवनातील घटना, प्रसंग इत्यादी निवेदनाची भूमिका नसून येशूच्या जीवनातील घटना, प्रसंग, उक्ती वगैरे वरून अन्वयार्थ शोधण्याची भूमिका दिसते. त्या अन्वयार्थ चर्चा इत्यादी अनुषंगाने गुंफले आहे. यांतून सांगितलेला सारांश असा–

खिस्त आणि खिस्ती यांचे नाते भावाभावाचे आहे. आपण माणसे आहोत. तोही मनुष्य होता पण त्याचे गुण आपणापेक्षा श्रेष्ठ होते. पण त्याचे श्रेष्ठत्व, त्याचे संतपण त्याने आपणासमोर मिरवले नाही. तो स्वतःला ' मनुष्याचा पुत्र ' म्हणवू लागला पण त्याच्या मानवी चरित्रातून त्याचे देवगुण आपणाला उमगावे लागतात. हे उमगणे आत्मसात करणे म्हणजेच आपण त्याच्यासारखे होणे हे आपले व त्याचे भावाभावाचे नाते होय.

वधस्तंभाचे सहा चमत्कार – मूळ लेखक– विलयम्. आर. निकलसन.

भाषांतरकार – भास्कर लक्ष्मण सोज्वळ, प्रका. आर. एफ्. कटूर, जीवन वचन साहित्यालय, चाळीसगाव, पूर्व–खानदेश, हनुमान छापखाना, ३०० सदाशिव, पुणे. इ. स. १९५४ पृ. ९३ (बर्फे).

विलयम आर. निकलसन यांच्या The Six Miracles of Calvary या ग्रंथाचे भाषांतर. पुस्तकात रे. जेम्स एम् ग्रे. डी. डी. यांची प्रस्तावना असून त्यात मूळ लेखकाची थोडक्यात ओळख करून दिलेली आहे.

येशू क्रूसावर टांगलेला असतांना घडलेल्या चमत्कारांचे साधार निवेदन या ग्रंथात आहे.

(१) पहिला चमत्कार – येशूला क्रूसावर टांगले आणि मिसर देशावर अंधार पसरला. या प्रसंगाची बुद्धिवादी छाननी करूनही ते ग्रहण वगैरे नसून एक-दैवी चमत्कार होता हे मत प्रस्थापित केले आहे. त्या चमत्काराचा गूढ अर्थ काय ते शोधण्याचा प्रयत्न केला आहे. हा अंधःकार म्हणजे कशाचे प्रतिरूप तेही सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

(२) दुसरा चमत्कार – म्हणजे येशूला क्रूसावर टांगताच मंदिरातील पडदा फाटून दुभंगला.

(३) तिसरा चमत्कार – येशूने प्राण सोडला तेव्हा भूमी कापली. खडक फुटले.

(४) चवथा चमत्कार–थडगी उखडली.

(५) पाचवा चमत्कार–येशूच्या प्रेतवस्त्रांच्या स्थितींत पालट घडला.

(६) सहावा चमत्कार–येशू ख्रिस्तावरोबर पवित्र जनांचे पुन्हा उठणे.

सर्व चमत्कारांच्या खरेखोटेपणाचा शोध घेऊन बुद्धिवादाच्या निकषावर मत प्रतिपादन केलेले आहे.

ख्रिस्तीधर्म

लेखक–रघुवेल पुरणसिंग चव्हाण, प्रका. रे. ई. एफ. ऐकर, चेअरमन, ख्रिश्चन ॲण्ड मिशनरी, अकोला, मध्यप्रदेश, आर्यभूषण छापखाना, पुणे १९५५. पृ. ९५.

रे. जी. एल्. कारनेर यांनी लेखक व पुस्तकाचा परिचय करून दिलेला आहे. लेखकाचे ब्राह्मण मित्र भास्कर गणेश देव यांचा अभिप्राय जोडलेला आहे.

ख्रिस्ती धर्म, पवित्रशास्त्र, देव, येशू, ख्रिस्त चरित्र, मनुष्याचा पापीष्टपणा, पश्चात्ताप, विश्वास, तारण, नवीन जन्म, बाप्तिस्मा, प्रभू भोजन, पवित्रीकरण, न्यायीपण, रोगमुक्तत्व, प्रार्थना, सुवार्ता, सैतान, प्रभू येशूचे दुसरे येणे, ख्रिस्ती मंडळी, ख्रिस्तीगृह, ख्रिस्ती मनुष्य, देवाचे भांडार, बाप्तिस्मा घेणाराची माहिती अशी विषयानुसार प्रकरणे आहेत. पवित्र शास्त्रातून उतारे, ख्रिस्तीधर्मास उपयुक्त अशी अभंग, पदे, गीते वगैरे दिलेली आहेत. सर्व पुस्तकास मोठा ठसा वापरला आहे. ख्रिस्तीतर बांधवासही वाचण्याजोगे पुस्तक आहे अशी देवांची शिफारस आहे.

जुन्या शास्त्रवचनावर नवा प्रकाश – मूळ लेखक : थॉमस ए. लॅबि

अनुवादक – र. ना. हर्षे, प्रका. मिस्. ई. स्टुअर्ट, एवी टॉवर्स, लॉरेन्स रोड पुणे – १ आर्यभूषण मुद्रणालय, १९५५, किंमत १ रु. पृ. १७४ (वर्फे).

डोनाल्ड जेम्स मॅके यांची मूळ प्रस्तावना इंग्रजीत असून, प्रस्तावनेत डॉ. लॅबि व त्यांचे कुटुंब यांची माहिती दिली आहे. पुस्तकांत एकूण चोवीस प्रकरणे आहेत. लेखन कथानिवेदनाच्या तोंडवळयाचे आहे. परंतु प्रत्येकाच्या अखेरीस आध्यात्मिक

भावार्थ सांगितलेला आहे. तसेच प्रत्येकात मथळ्याशी निगडित अशा संदर्भातील शास्त्रवचने दिली आहेत. उदा. धाब्यावरील गवत.

" धाब्यावरील गवत उगवते न उगवते तोच सुकून जाते. "

स्तोत्र १२९·६.

भावार्थ – फलरहित झाड, धाब्यावरील गवत निरुपयोगी व कुचकामी ख्रिस्ती लोक हे सारखेच नाहीत काय ? शिवाय गवताविषयी आढळून येणारे पवित्रशास्त्रातील विवेचने, निवेदने सांगितली आहे. अशाप्रकारे वरील सर्व प्रकरणांतील विषय हाताळले असून प्रत्येक विषयातून अशा प्रकारचा उपदेशात्मक भावार्थ सिद्ध केला आहे.

क्रुसावरील मौल्यवान सात शब्द व मृत्युंजय ख्रिस्त

लेखक – रे. सुमंत धो. रामटेके, प्रका. मिसेस प्रेमाबाई सुमंत रामटेके, लेपर हॉस्पिटल, पोलादपूर, जि. कुलाबा. (वर्षे)

२५–३–१९५५ रोजी क्राईस्ट चर्च, पुणे येथे दिलेला शुभ शुक्रवारचा व त्यानंतरचा ईस्टर संदेश.

पहिला शब्द—" हे बापा. ह्यांची क्षमा कर, कारण हे काय करतात हे त्यास समजत नाही. " लूक २३–२४.

याबाबत ' अर्पिलेला कोंकरा ' ही मेरी ई. बिसल यांची कविता, यापुढे या बाबतचे गद्य निवेदन.

दुसरा शब्द – येशूने त्याला म्हटले " मी तुला खचित सांगतो की तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील. " लूक २३ : ४३.

कविता " आपली विस्मृती होऊ नये म्हणून विनंती " वि. का. कोशे यांची, गद्यनिवेदन.

तिसरा शब्द – " बाई पहा पहा, हा तुझा पुत्र ? पहा, ही तुझी आई. "
योहान १९ : २५ :२८

या बाबत कविता – मरीयेचा शोक – कृ. रा. सांगळे, गद्य – निवेदन.

चवथा शब्द " माझ्या देवा ? माझ्या देवा ? तू माझा त्याग का केलास ? "
मत्तय २७ : ४६

या बाबत कविता – अद्‌भुत प्रीती – ना. वा. टिळक, गद्य निवेदन.

पाचवा शब्द – " मला तहान लागली " योहान १९ : २८,या बाबत कविता – ख्रिस्ताचे दुःख सहन यशाया ५३ : ४३.५ कृ. रा. सांगळे गद्य निवेदन.

सहावा शब्द – " पूर्ण झाले " योहान १९ : ३० ', प्रभूचे भक्तावरील प्रेम " कविता ना. वि. टिळक – गद्य निवेदन.

सातवा शब्द – " हे बापा ! मी आपला आत्मा तुझ्या सोपवून देतो ! "
लूक २३ : ४६

कविता – खांबाला खिळलेला ख्रिस्त, ना. वा. टिळक गद्य निवेदन यानंतर प्रभुसहवासाचे सुख याबाबत कविता पुनरुत्थान व येशू जगाचा प्रकाश या ना. वा. टिळक यांच्या कविता – पुनरुत्थानाबाबत गद्य निवेदन – " मृत्युंजय ख्रिस्त " वि. का. कोशे यांची कविता.

येशू वधस्तंभावर काय करीत होता ? मूळ लेखक – जॉर्ज सिंकर

अनुवादक – पी. के. कोष्टी, मिस्. बी. फ्रिमन, न्यू पॅलेस पोस्ट, कोल्हापूर १९५६ पृ. ५०, ६ आणे. (बर्फे).

सृष्टी उत्पन्न करण्यात देवाचा संकल्प, देवाचे उद्देश निष्फळ झाले. नवी उत्पत्ती, देवाची प्रीती, जगाचे पापहरण, आपल्या जीवनात पवित्र आत्म्याचा वास, त्याबद्दल पुरावा असे प्रश्न चर्चिले आहेत. अखेरच्या प्रकरणात " अग्नीने बाप्तिस्मा " या विषयी विवेचन केलेले आहे.

" नवी उत्पत्ति " सांगत असताना मानवाचे पाप कितीही मोठे असले, तरी देवाचे मानवावरील प्रेम त्याहूनही मोठे आहे, उत्पत्तीचा मूळ उद्देश देवाचे राज्य स्थापावे. माणसाचा नव्याने जन्म कसा होऊ शकेल ? अशा काही प्रश्नांची उत्तरे, चर्चा समाविष्ट केली आहे.

ख्रिस्तानुवर्तनोत्तेजक प्रवचने व लेख ग्रिअर बी. ए. ख्रिस्त प्रचार संस्था, नासोरी येशूची मंडळी, बुलढाणा, विदर्भ म. प्र. १९५६. (बर्फे).

ख्रिस्त लोकांसाठी प्रचारात्मक लिखाण, त्यात ख्रिस्त जयंतीनिमित्त तर्कशुद्ध विचार, ख्रिस्ती होऊन काय फायदा ? वगैरेसंबंधीची चर्चा आहे. सर्व निवेदन आकर्षक व वाचनीय आहे.

याशिवाय स्वर्गातील पित्यास उल्लेखून शास्त्रवचने, देवासमोर हिशोब देणे, आधुनिक दाखले, मधून मधून अर्थ अधिक स्पष्ट करणाऱ्या छोट्याशा परिणामकारक कथा आदींचा चांगलाच उपयोग करून घेतला आहे. ख्रिस्ती होऊन फायदा काय हे सांगताना ख्रिस्ती होण्यापूर्वी व नंतर एतद्देशीय माणसाच्या वर्तनात प्रत्यक्षात दिसून येणारा फरक नमूद केला आहे. ख्रिस्ती झाल्यावर अपेक्षित असे योग्य वर्तन नसल्यास ख्रिस्ती होऊन फायदा नाही असे सांगितले आहे.

प्रेममार्ग – (योहान प्रेषिताचे एक पत्र)

भाषांतरकार येशूदास, प्रका. एम्. झिंस्तर, २००४, सेंट व्हिन्सेंट स्ट्रीट, पुणे १९५६, पृ. १७ किंमत ३ आणे. (लेदर्ले)

येशू ख्रिस्ताचा शिष्य योहान याच्या एका पत्राचे भाषांतर म्हणजे ही छोटी पुस्तिका होय. या पत्राचा उद्देश ख्रिस्ती लोकांची श्रद्धा दृढ करणे आणि ख्रिस्ताचे मत व्यवहारात आचरणात कसे आणावे हे दाखविणे हा होता. ही छोटी पुस्तिका म्हणजे ख्रिस्ताच्या मताचे सार आणि ख्रिस्तभक्ताचे आयुष्य यांची कल्पना करून देते. पत्राचा सारांश–" परमेश्वर उजेड आहे त्याच्या ठायी काही काळोख नसतो " मी प्रकाशात चालतो आहे. असे जो कोणी म्हणतो तथापि आपल्या भावाचा द्वेष करतो, तो अजून अंधारात आहे. " जर परमेश्वराने आम्हावर असे प्रेम केले तर आम्हास एकमेकांवर प्रेम करणे भाग आहे. " इत्यादी उपदेशपर वाक्ये आहेत.

कॅथॉलिक धर्मासंबंधी प्रश्नोत्तरावली किंवा कातेखिसम आणि प्रार्थना

प्रका. रे. मॉ. आर. गोन्सालविस, मुद्रक–सेन्ट पॅट्रिक प्रेस. पुणे १९५७ चौदावी आवृत्ती. पृ. ६७ (शेळके)

पुस्तकात प्रार्थना, बोध, धर्म शिक्षणाचा सारांश, मनुष्याचा परमार्थ याविषयी एकूण मजकूर आहे.

एकूण एकतीस प्रार्थना दिल्या आहेत. त्यात क्रूसाची खूण, नमो मारिया, हे आमच्या बापा, पापाची कबुली, पश्चात्ताप, योसेफ वगैरे अनेक नेहमीच्या प्रार्थनांचा समावेश आहे. तसेच भारतासाठी व भारतीय लोकसत्ताक राज्यासाठी अशाही दोन प्रार्थनांचा समावेश आहे.

परमेश्वराच्या दहा आज्ञा, एक्लेसियाच्या सहा आज्ञा, एक्लेसियेत नेमलेले सणाचे दिवस, उपवासाचे व मांसान्न वर्ज्य करण्याचे दिवस. त्यात भारतासाठी सवलती, सात साक्रामेन, सत्कार्ये येशूने शिकविलेले आठ धन्यवाद, ख्रिस्ती सद्गुण, पवित्र आत्म्याविरुद्ध सहा पापे, कृपेची साधने असे अनेक विषय सविस्तर हाताळलेले आहेत.

फादर स्टीव्हन्स यांचे ख्रिस्ती पुराण-ख्रिस्ती मरणाची कथा–

संपादक–रे. भा. पां. हिवाळे, प्रका. भा. पां. हिवाळे, मिशन हाऊस, गवालिया टँक रोड, मुंबई ७, मुद्रक–तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई. पृ. ३९. (हिवाळे)

ख्रिस्ती लोक शिक्षणमालेचे पुष्प चवथे म्हणजेच वरील पुस्तक होय. " ख्रिस्ती पुराण " याचा कर्ता फादर स्टीव्हन्स याच्याबद्दल प्रारंभी थोडक्यात म्हणजे दोन परिच्छेदांत माहिती दिलेली आहे. फादर स्टीव्हन्स यांचे मराठी भाषेवरील प्रेम व्यक्त करणाऱ्या ओळी उद्धृत केल्या आहेत.

नंतर ख्रिस्ती पुराणातील 'पुराण दुसरे' यामधून ख्रिस्त मरणाची कथा सांगणारे अवस्वरु क्र. ४६, ४७, ४८, ४९ डाव्या बाजूच्या पानावर उद्धृत केलेले आहेत व उजव्या बाजूच्या पानावर त्याचा गद्यामध्ये गोषवारा दिलेला आहे.

त्यांना ईश्वराचें दर्शन घडेल

मूळ लेखक– पे. जो. सोटांग येसं, अनुवादक–म. न. देशपांडे. प्रका. धर्माधिकाऱ्यांच्या संमतीने मुद्रित १९५८. दुसरी आवृत्ती, पृ. १९ (लेदलें)

प्रस्तुत पुस्तिका–हिंदी, मल्याळी, तामीळी, गुजराथी, कानडी, सिंधी, इंग्रजी व मराठी अशा आठ भाषांत प्रसिद्ध झाली आहे. बंगाली व कोकणी भाषांतरे प्रकाशित होण्याच्या वाटेवर आहेत. इ. स. १९५८ साली नुसत्या इंग्रजी पुस्तकांच्या २५००० प्रती विकल्या गेल्या.

ही पुस्तिका पत्रस्वरूपात आहे. "प्रिय प्रभुदास, ही तुझ्या मामाची वाढदिवसाची भेट...." अशा रीतीने पत्रास प्रारंभ झाला आहे व तुझा शुभेच्छु मामा, असा शेवट केलेला आहे.

वेळोवेळी गोंधळून टाकणाऱ्या प्रश्नांची जाणीव आता तुला होत असेल व कित्येक वेळी त्यांची उत्तरे कोणाला तरी विचारावीत असेही तुला वाटत असेल. अशा संदर्भात आध्यात्मिक विषयांसंबंधी माहिती दिली आहे. त्यात परमेश्वरी हेतू, ईश्वराची सुंदर योजना, देवाच्या नंदनवनातील गोष्टींचा भावार्थ, मृत्यूशी खेळ, विजय मिळविण्याची युक्ती, तुझा मार्ग इत्यादी विषयांचा समावेश आहे.

जन्म देणाऱ्या ईश्वराचे मनात जन्मलेल्या जीवाने येथे व स्वर्गात सर्वत्र व अनंतकाल सुखी व्हावे असाच हेतू असतो. त्या हेतूने मानवी शरीराची सुंदर योजना परमेश्वराने केली आहे. म्हणून मानवाने परमेश्वरी हेतू ओळखून आपल्या शरीराचा वापर सुखशांतिनिर्मितीसाठी करणे उचित होय. देवाची मनाई ओळखून त्या कृत्यापासून परावृत्त व्हावे. नंदवनातील गोष्टींचा भावार्थ हाच आहे. प्रभूच्या कृपेशिवाय कुणीच फार काळ शुद्ध राहू शकणार नाहीं. अशा आशयाचा मजकूर पत्रात आहे. पत्राची भाषा बोलभाषेच्या लकबी स्वीकारून लिहिली आहे. वेळोवेळी संबोधने, प्रश्नपद्धती, होय ना ? का बरे ? बरे ना ? या सारख्या भाषेच्या प्रयोगामुळे स्नेहपूर्ण वातावरण–निर्मिती साधणारी भाषाशैली मनोवेधक आहे.

सर्व धर्म सारखेच काय ?

लेखक–रे. फादर जे. एस्. मिरांडा, प्रका. मराठी कॅथॉलिक लिटरेचर बोर्ड, सेन्ट पॅट्रिक्स प्रेस, पुणे–१९५८. पृ. २८. (शेळके)

मानवी मनास सुखाची ओढ असते ही सर्वव्यापी सुखेच्छा शांत व तृप्त करण्यास देवानेच योग्य साधने व उपाय योजिले असावेत. ही निव्वळ मनोशांति इहलोकी पूर्णपणे मिळविणे असाध्य असल्यामुळे ती प्राप्त करून घेण्याची जागा म्हणजे स्वर्ग असला पाहिजे. स्वर्गाचे अस्तित्व मानण्यास चार प्रमुख कारणे आहेत.

(१) प्रत्येक स्वाभाविक व उपजत प्रवृत्तीस काही निश्चित ध्येय असते. (२) ते साध्य करण्याची साधने परमेश्वराने प्रत्येकास दिलेली असतात. (३) ही

मानवास दिलेली साधने म्हणजे " स्वर्गकल्पना " सर्वधर्मांची संस्थापक समान नाहीत कारण दुसऱ्या कोणत्याही धर्मसंस्थापकाने " मी मीच देव आहे " असे शिकवले नाही आणि समजा सांगितले असले तरी निर्दोष आचरणाने सत्कृत्यांनी, दैवी शक्तीने वा चमत्कार करून अथवा धर्मतत्त्वासाठी आपले प्राणार्पण करून लोकांची देव असल्याबद्दलची वा दैवी प्रतिनिधी असल्याची खात्री केलेली नाही. येशू ख्रिस्ताने ही खात्री केली म्हणून सर्व धर्मसंस्थापक समान नाहीत.

सर्व धर्म सारखे नाहीत कारण देव एकच असतो, सर्वच धर्मानुसार देव एकच मानला गेला असता तर सर्व धर्म सारखे मानता आले असते. सर्व धर्म सारखे असते, तर सत्य–असत्य, न्याय–अन्याय या गोष्टी सर्व धर्मात सारख्या असत्या. सर्व धर्मातील तत्त्वे सारखी असती.

जर सर्व धर्म सारखे असते तर सर्व धर्मावाटे धर्माचारी तारण पावून मुक्तिप्राप्तीस पोहोचले असते. पण तारण पावता येणे प्रत्येक धर्मात शक्य नाही.

येशू ख्रिस्ताने देवाचा, 'खरा धर्म' प्रचारात आणण्याआधी स्वतःच्या आचरणात आणला. त्याच्या जीवनात ढंग, दुराचार नाही. त्याने शिकविलेला धर्म हाच खरा धर्म होय.

ख्रिस्ती धर्म तत्त्वानुसार वैयक्तिक स्वातंत्र्याची मोकळीक आहे. काही जण जरी वाईट वर्तनाचे असले तरी धर्मतत्त्वे हीं पारमार्थिक संपत्ती त्यामुळे कमी होत नाही. कारण व्यक्तिगत वर्तन ही व्यावहारिक बाब आहे.

येशू ख्रिस्त हाच जीवनमार्ग – मूळ लेखक–ई. ले. जॉली एस्. जे. अनुवादक प्रा. शांताराम वंडेलू, प्रका. रे. फादर ए. टेम्पर, फॉर धी सोसायटी ऑफ पॉल. मुद्रण–एक्झामिनर प्रेस, फोर्ट, मुंबई. १९५८ पृ. १४२. या पुस्तकाला प्रस्तावना वगैरे काही नाही. (लेदर्ले)

प्रा. शांताराम वंडेलू यांनी १९५७ साली फादर स्टीफन्सच्या ख्रिस्तपुराणाचे देवनागरीत लिप्यंतर करून फार मोठी कामगिरी केल्याचा उल्लेख मागे आलेलाच आहे. ख्रिस्तधर्म विचाराच्या दृष्टीने प्रस्तुत एक महत्त्वाचे पुस्तक म्हणावे लागेल.

तुम्ही धन्य आहात हे सांगताना– येशूच्या अवताराचे महत्त्व तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे महत्त्व, येशूचा दिव्य संदेश म्हणजे वैयक्तिक पावित्र्य व सामाजिक न्याय, येशूच्या देवराज्यात स्वार्थ-निरपेक्ष बंधुत्व प्रेम, न्यायशीलता दानशीलता वगैरे महत्त्वाच्या गोष्टी होत.

मराठी भाषा विशेष या दृष्टीने प्रौढ, प्रगल्भ, ओघवती मराठी भाषा हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. विदित करणे, अधिष्ठान, निष्कामता, वक्र-स्वभावधर्म, निर्लोभ वृत्ती, परमोच्च स्थिती, इत्यादी कितीतरी संस्कृत प्रचुर, प्रौढ योजना दिसते. निवेदनाची धाटणी गंभीर पण रसाळ जाणवते.

येशूने सांगितलेली प्रेमधर्माची कल्पना विशद केलेली आहे. दृष्टान्त देऊन स्वार्थनिरपेक्ष प्रेमाची शिकवण स्पष्ट केलेली आहे. स्वर्गराज्यातील प्रेमाचा न्याय व पृथ्वीवरील प्रेमाचा न्याय यातील फरक स्पष्ट केलेला आहे. प्रेम अपराधांचे स्मरण ठेवीत नाही. प्रेमधर्माचा हा आदेश गतिमान आहे. प्रार्थना या प्रकरणात येशूने लोकांना प्रार्थनेचे महत्त्व पटवून दिले त्याचे या प्रकरणात निवेदन केलेले आहे. परमेश्वराला कोणत्या प्रकारे संबोधावे, आपले मन व अंतःकरण यांना त्यांचे सन्निधान कसे प्राप्त करून घ्यावे, हे प्रार्थनेच्या रूपाने त्याने शिकवले. परमेश्वराची प्रार्थना ही स्वर्गराज्याला अनुलक्षून असते. प्रेम धर्माचे विश्वव्यापित्व प्रार्थनेच्या रूपाने प्रत्यक्षात अवतरते, अशी प्रतिपादने यात आहेत.

अधिकारपत्रे या प्रकरणात– येशू ख्रिस्ताची विविध सामर्थ्ये विशद केलेली आहेत. फक्त परमेश्वर जे करू शकेल असे करणारा, मृत्यूवर सत्ता गाजविणारा असा येशू हा मनुष्य होता.

परमेश्वराचे गूढतम रहस्य स्पष्ट करीत असताना– तत्कालीन यहुदी राष्ट्रांत अनेक देवदेवता, परमेश्वरविषयक कल्पना हीन दर्जाच्या होत्या. येशू देवपुत्र असल्या-मुळे त्याने ऐक्य अनुभवले होते. त्यामुळे तो परमेश्वराचे गूढमय रहस्य उलगडू शकला.

येशूचे मरण म्हणजे लोकांवरील प्रेमाचा परमोत्कर्ष, आपल्या बांधवांसाठी जीवन अर्पण करण्यात, प्रेमाचा एक अभिनव मानदंड, धर्मगुरूंनी येशूचा केलेला अपमान, छळ, दिलेली शिक्षा, ते सर्व बांधवाप्रीत्यर्थ सोसणे, हा प्रेमाचा परमोत्कर्ष होय, असे ‘ प्रेमाच्या परमोत्कर्ष ’ या प्रकरणी सांगितले आहे. सत्ता आणि ऐश्वर्य ‘ परमेश्वराचे हे पारितोषिक जगाला मिळाले ’ असे म्हटले आहे. येशूने आपल्या साक्षीदारांस निरतिशय प्रेम व सामर्थ्य दिले असे म्हटले आहे. जुने आणि नवे या दहाव्या प्रकरणात, सर्वधर्म सारखे आहेत का या प्रश्नांची चर्चा केलेली आहे. या संदर्भात जुन्या समजुती व ख्रिस्त शिकवणुकीचे नवेपण सांगितले आहे. सर्वधर्म सारखे नाहीत असे लेखकाचे प्रतिपादन आहे. येशूच्या नवधर्मास विरोध झाला तो राष्ट्रीय पूर्वग्रह व जुना धर्म यामुळे. राष्ट्रीय धर्म हे मानवनिर्मित असतात. पण येशूने शिकविलेला धर्म हा परमेश्वराचा धर्म असल्यामुळे वैश्विक व शाश्वत स्वरूपाचा असतो, म्हणून तो राष्ट्रातीत आहे. ख्रिस्त महामंडळाचे ऐक्य हे ख्रिस्ताच्या व्यक्ति-मत्त्वातील ऐक्याचा परिणाम होय ’ ऐक्याचा चमत्कार प्रकरणात म्हटले आहे. परमेश्वरी सहाय्यासाठी प्रार्थना, मनन, चिंतन, पापांची कबुली, आत्मावलोकन, चित्त-शुद्धी, प्रायश्चित्त वगैरे असा हा प्रार्थना प्रेम दान हा तिहेरी मुकुट होय. ही कल्पना विशद केलेली आहे. आव्हानामध्ये – ख्रिस्ताने शिकविलेल्या शाश्वत धर्माचा पुरेपूर मोबदला ख्रिस्त मागत आहे. पृथ्वीवर देवराज्य स्थापन करण्याची वाट त्याने दाखविली. मानवी सहकार्यानेच ते शक्य आहे. त्यासाठी श्रद्धा हवी, प्रेमासाठी,

सत्यासाठी, सहानुभूतीसाठी वाटेल ते हाल, कष्ट सोसण्याची तयारी हवी, असे येथे प्रतिपादन आहे

पुस्तकांत अखेरीस सर्वांच्या उपयोगार्थ, प्रातःकालीन, सायंकालीन पश्चात्ताप दग्दर्शनार्थ, सर्वाप्रीत्यर्थ, रुग्णावस्थेच्या वेळी करावयाची, अशा अनेक प्रार्थना व मनने सांगितली आहेत.

संत्रपेत्रस आणि प्रथमारंभींचे ख्रिस्ती महामंडळ

लेखक – केशव सयाजी ठोकळ, प्रका. भा. पां. हिवाळे, उषा मुद्रणालय, नगर फेब्रु. १९५९ पृ. ८०.

(ठोकळ)

प्रस्तुतचे पुस्तक ख्रिस्तास अर्पण केलेले असून रे. प्र. शि. भोसले यांचा अभिप्राय, प्रा. शांताराम बंडेलू यांची प्रस्तावना आणि डॉ. भा. पां. हिवाळे यांनी प्रकाशकाचे दोन शब्द लिहिले आहेत. असा तपशील प्रारंभी आहे.

वीस प्रकरणांमध्ये संत पेत्राचे चरित्र अनेक अंगांनी सुव्यवस्थित स्वरूपात दिले आहे. भाषा सुबोध, सरळ आणि वाचनीय आहे.

प्रभु भोजन

प्रका. फादर जी. हंटले, महाराष्ट्र एस्. पी. सी. के. कमिटीतर्फे पंचहौद मिशन, पुणे. मुद्रक – चित्रशाळा प्रेस, पुणे १९५९. पृ. ३४.

प्रभु भोजन या विधीची अनुष्ठानपद्धती, १९५१ सालची पद्धती, तिची १९५८ पर्यंत एपिस्कोपड सिनॉडने केलेली पुनरावृत्ती, प्रभु भोजन विधीसाठी सामान्य कानू, पूर्व तयारीची प्रार्थना, प्रभु भोजनाच्या पद्धतीचा क्रम, वचन, प्रचारक, मध्यस्थीची प्रार्थना, पवित्र सहभागितेची तयारी, अर्पणांची वाक्ये, संस्कृत करण्याची प्रार्थना, विशेष प्रस्तावना, प्रभुभोजन, उपकारस्तुती या विषयींचा मजकूर.

सुवार्ता आणि प्रेषितांची कृत्ये

भाषांतरकार येशूदास, विन्यास, वारांको, प्रका. सि. मेनेझिस, येशू संघ, डि. नोबिली कॉलेज, पुणे ६ (पहिली आवृत्ती ६० च्या सुमारास म्हणून समाविष्ट) आवृत्ती दुसरी, १९६३ मूल्य २ रुपये (लेदर्ले).

संत मत्तय शुभवर्तमान – भाषांतरकार – येशूदास

(येशूच्या स्वर्गारोहणानंतर इ. स. ६० चे सुमारास शुभ वर्तमानाचा पहिला मूळ लेखक 'मत्तय' झाला असावा असे प्रस्तावनेत निवेदन केले आहे) या ग्रंथात येशू ख्रिस्ताचे आगमन, वंशावळी, जन्म, ख्रिस्ताचे आगमन वंशावळी, जन्म, ख्रिस्ताचे स्वागत, येशूचे पलायन. बालबांचा वध, नाझरेथ निवासी, इजिप्त देशातून आगमन, बाप्तिस्मा देणारा योहान, येशूचा बाप्तिस्मा, येशूची

परीक्षा, येशूची कार्यभूमी, उपदेशकार्यांची सुरुवात, येशूचे शिष्य, चार शिष्यांस आवाहन, शिष्यधर्म, छळ, जगातील मीठ व प्रकाश, आज्ञा, चमत्कार, विरोध, शंका, ख्रिस्त प्रेषित, दुराग्रह व निंदा, स्वर्गराज्य, अनेक दृष्टान्त, यहुदीतर लोकांच्या प्रदेशात, नाझेरेथास, प्रत्यागमन, श्रद्धाभाव, योहानाचा वध, ख्रिस्तीमहामंडळ, महामंडळाचे सेवक, जेरूसलेमातील मुक्काम, न्यायदिन, जगाचा न्याय, प्राणार्पण, ठार मारण्याचा कट, अंतिम भोजन, योनाचे चिन्ह, पुनरुत्थान, देवदूताचे दर्शन, येशूचे दर्शन इत्यादी शीर्षके देऊन भाषांतर केले आहे. भाषांतराची भाषा साधी निवेदनात्मक असून व्याकरण दृष्टया शुद्ध आहे.

संत मार्कलिखित शुभवर्तमान – (भाषांतरकार येशूदास)

(हे दुसरे शुभवर्तमान – मूळ लेखक योहान मार्क इ. स. ५३ ते ६३ च्या दरम्यान होऊन गेला).

यात तीन साक्षीदार, ती अदृश्य पात्रे,| पवित्र आत्मा–सैतान देवदूत, येशूचा प्रतापी प्रवेश – " चला माझ्या मागे या " येशूचे शिष्यास आवाहन, अधिकारानुरूप उपदेश, भूतमात्रे येशूची आज्ञा पाळतात, अनेक रोग्यांस बरे करणे – गालीलीया प्रांतांत हिंडणे – अधिकाऱ्यांस संदेश, पापांस क्षमा करणे, पापी माणसांबरोबर जेवण, मतयाची मेजवानी, नवीन पद्धतीचे वैरागी. त्याचे शिष्य व तो शाब्बाथ पाळत नाहीत. येशूच्या नाशाचा निश्चय, जवळच्या मित्रांची निवड, प्रेषितास आवाहन, शास्त्र्यांची निंदा, परमेश्वराचे राज्य, त्यास विविध दृष्टान्त, बी आणि जमीन, दिवा याचे दृष्टान्त. मापाचा दृष्टान्त, वारा आणि समुद्र येशूची आज्ञा पाळतात, रक्तस्रावाने पीडलेली स्त्री झग्यास स्पर्श करून बरी होते, प्रेषितास उपदेश करण्यास पाठवितो. योहानाचा खून, शिष्याचे बुद्धिमांद्य. रोट्यांचा पहिला चमत्कार, येशूचे समुद्रावरून चालणे. फारशी लोकांशी खडाजंगी, पवित्रता म्हणजे काय ? स्वदेशातून स्थलांतर,| रोट्यांचा दुसरा चमत्कार, क्रूसाचे पहिले भविष्य, येशू प्रेक्षितांची श्रद्धा दृढ करतो, भूतग्रस्त मुलगा, क्रूसाचे दुसरे भविष्य, नम्रतेची जरुरी, बालकाविषयी आदर, सहिष्णुतेचे शिक्षण, मोहाचे निवारण, मुलांसारखा भोळेपणा, द्रव्य लोभाचा त्याग, श्रीमंतीचा धोका, सेवकांचे पारितोषिक, क्रूसाचे तिसरे भविष्य, याकोबा व योहानची मागणी, यारिशेममधील आंधळा – जरूशलेममध्ये प्रवेश, धर्माधिकाऱ्यांनी केलेला इन्कार, निष्फळ अंजीरवृक्षास शाप, देवमंदिराचे शुद्धीकरण, श्रद्धेचे सामर्थ्य, अपराध्यास क्षमा, येशूने केलेला आरोप, पुत्राचा खून, द्राक्ष मळ्यातील कामकऱ्यांचा दृष्टान्त, फारसी लोकांचा प्रश्न – " सम्राटास कर देऊ का " सदुकी लोकांचा प्रश्न – " पत्नी कोणाची होईल ? " शास्त्र्यांना प्रश्न " दाविदाचा पुत्र त्याचा प्रभू कसा होईल ? " येशूला ठार मारण्याचा कट, उत्तरक्रिये ाठी करण्यात आलेला येशूचा तैलाभ्यंगस्नान प्रसंग – यहुदाचा विश्वासघात, शेवटचे

भोजन, पहिला खिस्त याग, पेत्राच्या इन्काराचे भविष्य, गेथ शेमाने, येशूची अटक, शत्रू न्यायाधीश झाले, यहुदी न्यायसभेसमोर, पेत्राचा इन्कार, रोमन राज्यपालासमोर, न्यायाविरुद्ध द्वेष, रोमन सैनिकांनी केलेली चेष्टा, काट्यांचा मुकूट, कूसावर उत्तरक्रिया, देवदूतांचा संदेश, येशूची तीन दर्शने, सर्व जगताकडे - एवढे विषय या ग्रंथांत समाविष्ट केलेले आहे.

संत लुकालिखित शुभवर्तमान - भाषांतरकार-येशूदास

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत " येशू खिस्ताचे चार जीवनवृत्तांत त्याच्या समकालीनांनी लिहिले. त्यापैकी हा तिसरा या पुस्तकाच्या अस्तित्वाचा लेखी पुरावा खिस्तोत्तर दुसरे शतकाच्या द्वितीयार्ध इतका मागे जातो. इ. स. १६० मध्ये दिवंगत झालेला मर्सियन व इ. स. १६६ मधील हुतात्मा जस्टीन यांनी या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. " असे म्हटले आहे.

लूखचे १०-१५ ओळीत छोटेसे जीवन चरित्र दिलेले आहे. त्याच्या लेखनाविषयी समीक्षणात्मक प्रतिपादनही थोडक्यात केलेले आहे.

या ग्रंथात प्रामुख्याने-जखऱ्याला ग्राबियेलाचा निरोप, मारियेला ग्राबियेलाचा निरोप, दोन मातांची भेट, योहानाचा जन्म, जखऱ्याचे स्तुतिगान, वगैरे सर्व खिस्तचरित्राचे विषय हाताळलेले आहेत.

याही ग्रंथाची भाषा साधी निवेदनात्मक व व्याकरण शुद्ध आहे.

संत योहान लिखित शुभवर्तमान-

भाषांतरकार - विन्यास आणि वारांको.

चौथ्या शुभवर्तमानाचा लेखक योहान हा खिस्तगुरूला भेटलेल्यापैकी एक होय. इ. स. १२५ त लिहिलेल्या पुस्तकात याचा उल्लेख आहे. (पापियास हिये रोपोलिसचे महागुरुस्वामी यांच्या पुस्तकात- तो संत योहानचा शिष्य होता.) संत योहानने हे शुभवर्तमान इ. स. ९५ त लिहिले असावे असे पंडितास वाटते.

या पुस्तकात येशूच्या चरित्रातील नेहमीचे विषय आलेले आहेत. विशेष म्हणजे या पुस्तकाचे अखेरीस ज्ञानकोश दिलेला आहे. त्यात भौगोलिक स्थानांची आणि ऐतिहासिक व्यक्तींची विशेषनामे याबद्दल माहिती दिलेली आहे. तसेच पवित्र खितयागाच्या सुवार्तेसाठी उपयोग केलेले पवित्र शास्त्राचे उतारे - त्यांचे क्रमांक देणारी यादी दिली आहे. त्यात रविवार व सण, खिस्त जयंती पुनरुत्थानाचा सण, येशूचे स्वर्गारोहण, पेन्तेकोस्त, खिस्तशरीर, साक्रामतेचा सण, येशूच्या दिव्य हृदयाचा सण, संताचे सण, इत्यादींचा समावेश आहे. शेवटी एक नकाशापण दिला आहे.

(संत मत्तय, मार्क, लूख, योहान यांनी लिहिलेली शुभ वर्तमाने आणि संत लखूलिखित प्रेषितांची कृत्ये यांचा या संपूर्ण ग्रंथात समावेश आहे.) ꙮ ꙮ

प्रकरण २ रे

ख्रिस्ती मराठी उपासना वाङ्मय

हेन्री ब्रूस – प्रारंभीच्या उपासना गीत रचनेसंबंधी लिहिताना मेमोरिअल पेपर्समध्ये लिहितो–

"It is natural for the true worshipper to express the feelings of his heart in song so accustomed are we to the use of hymns that we know not how our first Missionaries could give interest and rest to their Marathi services, when there was not a hymn or even a portion of scripture, which they could sing. We know that this want was felt by them, only in a less degree than the want of the scriptures themselves, and the efforts were very early introduced for the supply of this want. The first book of Christian hymns in the Marathi Language was published in 1819."

या पुस्तकाचे नाव "प्रार्थना पुस्तक" (Hymn Book) असून अमेरिकन मिशनने प्रसिद्ध केले होते. त्याची पृ. १६ होती अशी A Cataloge of Marathi Christian Literature 'मखी'मध्ये नोंद सापडते. याच पुस्तकाची दुसरी आवृत्ती १८२५ मध्ये निघाली तेव्हा पृष्ठसंख्या ४७ होती. (मखी)

या ग्रंथासंबंधी ख्रिस्ती मिशनऱ्यांचे मत देताना ब्रूस लिहितो.—

"We have made considerable exertion to introduce the most solemn and appropriate of the native popular tunes, adopted to the Marathi hymns we have prepared and printed and with considerable success. Many of our school boys and teachers singing the hymns with greast propriety. But we are aware that our native singing must be very imperfect till we get a gamut prefected in the Marathi. We find no written music among the natives."

(मेमोरिअल पेपर्स पृ. १२१)

म्हणजे पहिल्या आवृत्तींत काही हिंदी चालीची गीते समाविष्ट केली होती असे दिसते. या पुस्तकाच्या आवृत्ती इ. स. १८३३ व १८३५ साली सुधारून वाढविण्यात आल्या, त्यापैकी १८३५ सालात प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीच्या २००० प्रती छापल्या होत्या आणि त्यात अनेक विषयांवरील ४३ गीते समाविष्ट केली होती. याच साली दुसरे एक गीतांचे पुस्तक छापले होते. त्यात दाविदांच्या गीतांचा समावेश केला होता. ही गीते इंग्रजी चालीची होती. इ. स. १८३५ साली रे हेन्री बॅलेन्टाईन या देशात आल्यावर त्यांनी संस्कृत व मराठी भाषेचा अभ्यास केला. व त्यानंतर इंग्लिश गीताच्या आधाराने इंग्रजी चालीवर पुष्कळ नवीन गीते रचली.

देवाचें भजन करण्याची गीते : (Hymns for Divine Worship)

अमेरिकन मिशनने इ. स. १८४५ साली प्रसिद्ध केले. त्याची पृष्ठसंख्या १४८ असून त्यात १०० गीते आहेत. हे पुस्तक लिहिण्यामागे, "मराठीमध्ये चांगल्या गीत संग्रहाचे पुस्तक नाही, जी पुस्तके आहेत ती प्रार्थना करण्याच्या मुळीच उपयोगी नाहीत, पूर्वीच्या अमेरिकन मिशनऱ्यांनी लिहिलेल्या पुस्तकातील गीतांची स्वररचना देशी पद्धतीची होती. प्रार्थना करताना खिस्ती लोकांच्या डोळ्यांपुढे त्यांचे पूर्वीचे रीतिरिवाज व धार्मिक चाली उभ्या राहात व त्यांची त्यांना आठवण होईल या भीतीनेच ही गीते प्रार्थनेच्या वेळी निरुपयोगी ठरली." अशी त्यांची भूमिका होती. " या आवृत्तीतील गीते पश्चिम हिंदुस्थानातील म्हणजे महाराष्ट्रातील खिस्ती लोकांस पसंत पडल्यामुळे आणखी इंग्लिश गीतांचे भाषांतर करण्याची उमेद बॅलेन्टाईन यास आली. तसेच शास्त्रातील वचनांच्या आधाराने त्यात बरीच गीते लिहिली. नव्या करारातील ५६ शब्दांत लिहिलेली प्रभूची प्रार्थना, त्यांनी ५३ शब्दांत पद्यरूपाने लिहिली. इ. स. १८५४ व १८५५ साली त्यांनी त्या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या अधिक सुधारून वाढविल्या. त्यात दोनशेहून अधिक गीते घालून जुन्या गीतांत सुधारणा केली. एका आवृत्तीत दाविदाच्या गीतापैकी काही गीते इंग्रजी चालीवर करून घातली. इ. स. १८५८ साली या पुस्तकाची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध करावी लागली पण त्यात दाविदाच्या गीतांचा समावेश केला नाही. १८५४ च्या आवृत्तीची ४४० पृष्ठे असून ३३६ गीतांचा संग्रह आहे, इ. स. १८५५ च्या आवृतीची ३१० पृष्ठे आहेत. यात चालीसहित गीते प्रसिद्ध केली गेली याला 'Sacred Songs' असे नाव देण्यात आले. गीतांची रचना करण्याबरोबरच गीतांचे स्वरलेखन करून ते प्रसिद्ध करण्याचा पहिला प्रयत्न बॅलेन्टाईनने केला.

या पुस्तकाची चौथी आवृत्ती १८६५ साली बॅलेन्टाईननी स्वतःच सुधारली व ती ट्रस्ट सोसायटीत छापण्याचे काम सुरू केले होते. त्याची मुद्रिते वगैरे तपासण्याचे काम करीत असताना ते आजारी होऊन स्वदेशास जाण्यास निघाले पण त्यांना ९ नोव्हेंबर १८६५ रोजी प्रवासात देवाज्ञा झाली. या पुस्तकाच्या द्वारे महाराष्ट्रातील

ख्रिस्ती धर्मीयांवर त्यांनी मोठे उपकार करून ठेवले आहेत.

या पुस्तकाची पाचवी आवृत्ती १८७४ साली छापली गेली. त्यात हिंदी चालीवरची काही गीते घातली होती. ह्या गीतांचे कवी कृष्णाजी रत्नाजी सांगळे हे होते. ह्या पुस्तकात एकंदर ६६५ गीते असून त्याचे प्रकाशक रे. डॉ. फेअरबॅंक हे होते. त्यांनी हे पुस्तक अमेरिकन मिशनच्या वतीने प्रसिद्ध केले. इ. स. १८७८ साली काहीही बदल न करता सहावी आवृत्ती छापली, सातवी आवृत्ती इ. स. १८८३ साली प्रसिद्ध झाली. तिच्यात विषयांची अनुक्रमणिका व नवीन गीतांची पुरवणी ही अधिक घातली होती. या आवृत्तीच्या वेळी अमेरिकन मराठी मिशनने ह्या पुस्तकासंबंधीचे सर्व हक्क ट्रॅक्ट सोसायटीला दिले. इ. स. १८८९ साली प्रसिद्ध केलेल्या आठव्या आवृत्तीत फारसा बदल केला नाही. फक्त पुरवणीत काही नवीन गीतांचा समावेश केला गेला.

अनेक युरोपिअन मिशनरी व एतद्देशीय ख्रिस्ती बांधव यांच्या सूचनेवरून बॉम्बे बुक ॲण्ड ट्रॅक्ट सोसायटीने रे. डॉ. जे. ई. ॲबट रे. सुमंत विष्णु करमरकर व रे. बाबा पद्मनजी ह्यांची 'कमिटी' नेमून तिच्या द्वारे पुष्कळ फेरफार व सुधारणा करून इ. स. १८९५ साली प्रसिद्ध केली. कृष्णरावं रत्नाजी सांगळे यांना धर्मांतरापूर्वी गाण्याची आवड होती. देशी गीतांच्या निरनिराळ्या चालीही त्यांना अवगत होत्या. त्यांनी प्रथम जेव्हा इंग्रजी गाण्याच्या चाली ऐकल्या तेव्हा, त्यांना त्या आवडल्या नाहीत म्हणून बॅलेंटाईनकृत "One there is above all others oh my soul, what means this Sadness"

'मुलांनो बोध घ्या' ही स्तोत्रे घेऊन त्यांना देशी गीतांच्या चाली दिल्या तरी पण दिलेल्या चालींनी त्यांचे स्वतःचे समाधान झाले नाही. त्यानंतर "ख्रिस्त चरित्र" पद्यातून लिहिण्यास त्यांनी प्रारंभ केला. त्याचे स्वरूप त्यांनी पूर्वी अभ्यासिलेल्या हिंदू पद्धतीच्या ग्रंथासारखे होते. ते ख्रिस्त चरित्र अतिशय प्रदीर्घ झाले. आणि मूळ स्वरूपात ते कधीच प्रसिद्ध झाले नाही. '**खरा तरणोपाय**' यात त्यातील भाग आलेला आहे. त्यांचे इ. स. १८७० साली ट्रॅक्ट सोसायटीने Prodigal Son वर आधारित असलेले पद्य प्रसिद्ध केले. त्या काव्याला डॉ. मुरडोच (B. Murdoch) यांचे मराठीतील उत्कृष्ट काव्यात्मक ट्रक्ट म्हणून बक्षीस मिळाले. प्रार्थनेसाठी रचले गेलेले कृष्णरावांचे पहिले स्तोत्रगीत Alas and did my saviour bleed and hymn of Superior Merit. या बॅलेंटाईनच्या गीताचा अनुवादक होता. आजही सर्व प्रार्थनामंदिरांत हे गाणे लोकप्रिय आहे.

कृष्णरावांची स्तोत्र–गीत रचनेची संख्या वाढत गेली आणि लोकप्रियताही वाढत गेली. ही लोकप्रियता इतकी वाढली की सर्वसामान्य लोकांच्या उपयोगाला ही गीते सहजासहजी उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा लोक करू लागले. त्यानुसार इ. स. १८६७ साली मिशनने लहान असे गायनामृत किंवा The Nector of

Songs पुस्तक काढले. ते ५२ पृष्ठांचे होते. त्वरित ते लोकप्रिय झाले व भरपूर प्रमाणात वापरले जाऊ लागले. याच 'गायनामृताची' सुधारलेली आवृत्ती इ. स १८७० साली निघाली. ट्रक्त सोसायटीने १४५ पृष्ठांची ही आवृत्ती काढली. त्यात १४९ स्तोत्रे किंवा गी यांचा समावेश होता.

"पश्चिम भारतातील छापखान्यातून निघालेल्या पुस्तकात देशी ख्रिश्चनांनी स्वागत केलेल्या ग्रंथात (गायनामृत) असे उदाहरण अपवादात्मक म्हणावे लागले." असा गौरव या ग्रंथाचा केलेला आहे.

या गायनामृताची तिसरी आवृत्ती इ. स. १८७६ साली मूळ गीत संख्येत एकवीस नवी स्तोत्रे अधिक समाविष्ट करून प्रसिद्ध करण्यात आली.

इ. स. १८६२ साली वलेंटाईनने स्तोत्रगीतांचे लहान मुलामुलींसाठी संकलन केले. त्यात कृष्णराव सांगळे, मिसेस बिसेल, डॉ. फेअरबंक आदींच्या गीत रचनांचा समावेश आहे. त्या गीतसंग्रहाचे नाव '**बुलबुल**'. त्याची दुसरी आवृत्ती इ. स. १८८१ साली निघाली. त्यातही कृष्णराव सांगळे, आनंदराव सांगळे, सौ. ब्रूस यांची गीते आहेत. दहावी आवृत्ती काही फेरफार न करता रा. वि. कोशे व रे. डी. एल. जोशी यांनी प्रसिद्ध केली.

आता महाराष्ट्रामध्ये अमेरिकन मिशन येऊन शंभर वर्षांचा काळ होत आला होता. इथल्या ख्रिश्चनांच्या स्वतःच्या अशा जाणीवा तयार झालेल्या होत्या. इ. स. १९१२ साली या पुस्तकांचे नव्याने काम करण्यासाठी एक कमिटी नेमण्यात आली. संपादनाचे काम रे. ना. वा. टिळक यांच्याकडे सोपविले. त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक हे काम केले. त्यांच्या कारकीर्दीत या पुस्तकाबाबत घडलेला महत्त्वाचा बदल म्हणजे या पुस्तकाचे जुने नाव त्यांनी बदलले व या गीतसंग्रहाला "उपासना संगीत" हे नाव देण्यात आले. भाषा, छंद, गान ह्यांच्या दृष्टीने या आवृत्तीतील गीतांत बराच फेरफार करण्यात आला. हा फेरफार विशेषतः इंग्रजीतून ज्या गीतांचे मराठीत भाषांतर करण्यात आले होते, त्याबाबत विशेष होता. पूर्वीच्या आवृत्तीतील बरीच गीते ह्या आवृत्तीत गाळली व काही नवीन घातली. पुस्तकाच्या शेवटी 'मुलांची गीते' म्हणून पंचवीस गीतांची एक पुरवणी जोडली होती.

बाराव्या आवृत्तीत अकराव्या आवृत्तीतील इंग्रजी चालीवरची काही गीते वगळण्यात आली व त्यांच्याऐवजी भारतीय चालीवरची बरीचशी नवीन. गीते समाविष्ट करण्यात आली. जी गीते वळगण्यात आली त्यांचा फारसा उपयोग होत नव्हता. अर्थात इंग्रजी चालींवर असलेली सर्व गीते उपासना संगीतामधून काढून टाकणे शक्य नव्हते. एक तर बऱ्याच वर्षांपासून ती गायिली जात होती, त्यामुळे लोकांच्या सवयीची व परिचयाची ती गीते झाली होती, आणि भावनिक अंगाने उपासनेच्या प्रसंगी ती गीते गायिल्यामुळे धार्मिक भावना चांगल्या प्रकारे व्यक्त करता येतात असा काही लोकांचा अनुभव व सल्ला होता. या आवृत्तीच्या

संपादन कार्यात डॉ. मिस एमिली बिसल, रे. भा. कृ. उजगरे आणि रा. ब. बा. ना. आठवले ह्यांच्या समितीने गीतांची मांडणी व जुळणी करण्याचे काम केले होते. इ. स. १९२४ च्या आवृत्तीत गीतांत काही बदल केला गेला नाही पण पूर्वी गीतकारांच्या मागे लावलेली रे. मि. मिसेस वगैरे उपपदे काढून टाकण्यात आली.

इ. स. १९३० साली डॉ. एमिली बिसल ह्यांनी ही आवृत्ती स्वरलेखनासह तयार करून पूर्वीच्या आवृत्तीतील गीतांत काही बदल न करता प्रसिद्ध केली. पंधरावी आवृत्ती इ. स. १९३३ साली काहीही बदल न करता छापण्यात आली.

सोळाव्या आवृत्तीत भारतीय चालीवरच्या गीतांचे राग व ताल गीतांवर सुचविण्यात आले. पण गीतांत काही बदल केला नाही. ही आवृत्ती इ. स. १९३९ साली प्रसिद्ध केली तर तिचेच पुनर्मुद्रण १९४९ साली करून सतरावी आवृत्ती प्रसिद्ध केली.

इ. स. १९५५ साली उपासना संगीताची अठरावी आवृत्ती प्रसिद्ध झाली. ही आवृत्ती तयार करण्यासाठी ट्रॅक्ट सोसायटीने श्री. देवदत्त नारायण टिळक (अध्यक्ष) रे. डॉ. एच्. जी. हॉवर्ड आणि सोसायटीचे सेक्रेटरी श्री. सुमंत दयानंद करंदीकर ह्या तिघांची समिती नेमली. ह्या समितीने काळजीपूर्वक सर्व गीते तपासली व काही ठिकाणी भाषा, गीतरचना ह्या दृष्टींनी आवश्यक तेवढे किरकोळ फेरबदल केले. पूर्वीच्या आवृत्तीत सुचविलेले राग व ताल ह्यांचा फारसा उपयोग होत नसल्याचे आढळून आल्यामुळे ते गाळून टाकले. प्रत्येक गीताच्या शेवटी गीतकर्त्याचे नाव द्यावे अशी काही जबाबदार व्यक्तींकडून सूचना आल्यामुळे गीतकर्त्यांची नावे तिरक्या टाईपात छापली. गीतांतील कठीण शब्दांचे अर्थ तळटीपांत दिले. त्यामुळे गीते गात असताना सर्वसामान्य उपासकांना गीतांचा अर्थ चटकन कळू शकेल अशी सोय झाली.

पूर्वीच्या आवृत्तीतील थोडीशी गीते काही सबळ कारणासाठी कमी करून त्यांच्या जागी दुसरी योग्य गीते घेतली. उदा. राजाकरिता प्रार्थना या विषयावरील ५९४, ५९५, ६०० व ६०५ ही गीते भारतीय राजकीय बदल लक्षात घेता अनावश्यक वाटली म्हणून वगळली. त्याऐवजी भारताचे राष्ट्रगीत व राष्ट्राकरिता प्रार्थना ह्या विषयावरील गीतांचा समावेश करण्यात आला. बदलती राजकीय सत्ता, सामाजिक बदल लक्षात घेऊन मराठी ख्रिस्ती ‘ उपासना संगीतात ’ होत गेलेले बदल नोंद करण्यासारखे आहेत.

इ. स. १९२३ साली जी आवृत्ती प्रसिद्ध झाली होती, तीच वेळोवेळी तपासून व भाषेच्या दृष्टीने किरकोळ फेरफार करून तिची पाच पुनर्मुद्रणे झाली होती. त्यानंतरच्या बत्तीस एक वर्षात ज्या ख्रिस्ती कवींनी गीत रचना केली तिचा लाभ उपासना संगीताच्या द्वारे झालेला नव्हता. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सुमारे

१०० गीतांची पुरवणी या आवृत्तीस जोडण्याचे ठरविले व त्यानुसार ११६ गीतांची निवड केली गेली.

इ. स. १८१९ साली प्रथम "प्रार्थनापुस्तक" म्हणून १६ पृष्ठांच्या या पुस्तकाचे नाव १९१२ साली 'उपासना संगीत' असे झाले व या पुस्तकाची एकोणिसावी आवृत्ती १९६० साली, इ. स. १९२३ साली प्रसिद्ध झालेल्या आवृत्ती-नुसार प्रसिद्ध करण्यात आली. यावेळी बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे सेक्रेटरी सुमंत दयानंद करंदीकर हे होते. त्यांनीच ही आवृत्ती प्रकाशनाचे कार्य केले. त्या पुस्तकाच्या प्रारंभी 'उपासना संगीता'चा प्रारंभापासून आढावा घेतलेला आहे. या पुस्तकाची पृष्ठसंख्या ४०० आहे. एकूण ७९८ गीतें समाविष्ट केलेली आहेत.

ॲंग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, बाबा पदमनजी, १८८० (भाषांतर). (कराडकर)

हे पुस्तक म्हणजे Select Sermon या ग्रंथाचे भाषांतर आहे. यात एकूण १२ उपदेश आहेत.

(१) समेट कर, (२) ख्रिस्ताचे पुनरुत्थान, (३) स्वर्गारोहण, (४) प्रपंचाची निवड व तिचा परिणाम, (५) ईश्वर आमचा वाटाड्या, (६) ख्रिस्ताची आपल्याकरिता, (७) आपल्या शिष्यांकरिता प्रार्थना (८) सोयीची वेळ व पदरी न घेतलेल्या पापाचे भय असे आठ उपदेश सर्वांकरिता आहेत.

त्यानंतर चार उपदेश मुलांसाठी आहेत ते असे—

(१) अगत्याचा प्रश्न. (२) आज्ञाधारक मनुष्य. (३) आज्ञाभंजक स्त्री (४) आमचा बाप.

प्रस्तुत उपदेश पुस्तकात चार शुभवर्तमानकारांच्या शास्त्रविषयक वाक्यांचे विवेचन आहे. त्या वाक्यांचा अर्थ उदाहरणासह स्पष्ट केलेला आहे.

रोजच्या मार्गावरील रोजचा उजेड

एस्. बॅग्स्टर ॲण्ड सन्स यांनी प्रकाशित केलेल्या Daily light on the daily path ह्या पुस्तकाचे भाषांतर प्रथम मिस्. रिचर्डसन ह्यांनी सुमारे १८९० च्या सुमारास प्रसिद्ध केले. पहिली आवृत्ती १८९० याच्या एकूण पाच आवृत्त्या निघाल्या. दुसरी १९०९, तिसरी १९३१, चवथी १९५८, पाचवी १९६७ ही बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीने प्रसिद्ध केली.

१ जाने ते ३० डिसेंबर या काळात रोज वाचनासाठी प्रार्थना, उतारे, संदर्भ क्रमांक दिलेले आहेत.

पुस्तकात शेवटी विशेष प्रसंगासाठी ईशोपकारस्मरण म्हणून उतारे दिलेले आहेत. त्या विशेष प्रसंगात वाढदिवस, विवाह, विपत्ती, आजार, मृत्यु यांचा समावेश आहे.

भजनसंग्रह

ना. वि. टिळक, ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, प्रका. केडगांव मुक्ती मिशन प्रेस दुसरी आ. १९०६ (नगर कॉलेज)

रे. टिळकांच्या २८ भजनगीतांचा हा संग्रह. पहिले गीत – " गुरुमाउली " असे असून यांत ख्रिस्त हा माझा गुरू असून माझ्या मातेसारखा आहे असे म्हटले आहे. तर दुसऱ्या गीतात " मित्र येशू " चे गौरवगान आहे. खरे देऊळ, ' ख्रिस्ता आत ये दार उघडे आहे, ख्रिस्तावाचून काही नको,' अशा तऱ्हेच्या कविता आहेत. टिळकांच्या हिंदुधर्मांच्या अभ्यासाचा, तुकाराम ज्ञानेश्वरांच्या भक्तिकाव्याचा परिणाम या काव्यावर जागोजाग आढळतो.

माहितीसाठी दोन उदा. बघा. – गीत ५ वे

ख्रिस्तावाचून काही नको (पृ. ३)
जगउद्धारक प्रभु येशूला नित्य मुखे गावे
घ्यावे पुढती नित्य बघावे हेच मला ठावे

या संदर्भात तुकारामाचा

घेई घेई माझे वाचे। गोड नामे विठोबाचे।
तुम्ही घ्यारे डोळे सुख। पहा विठोबाचे मुख।
तुम्ही आईकारे कान। माझ्या विठोबाचे गुण

या अभंगाचे स्मरण व्हावे, किंवा गीत सातवे–

" परमेश्वराचे ऐश्वर्य "
" एकमनाने किती मी घ्यावे, एक मुखे किती गावे "

या चरणाचे 'अनंतहस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने' असलेले साम्य पहावे.

प्रातःस्मरण

ना. वा. टिळक, सुदर्शन प्रेस, अहमदनगर, १९०९ (नगर कॉलेज)

या पुस्तकात प्रातःकाळी म्हणावयाच्या १६ गीतांचा संग्रह केलेला आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेत टिळक लिहितात–

" आवाहनांवाचून उपासना नाही, प्रार्थनेवाचून ख्रिस्ती जिणे नाही. उपदेश नाही. प्रातःकाळी ईश्वराला शरण गेल्यावाचून त्याला श्रद्धापूर्वक स्तोत्रे गायिल्यावाचून, त्याची मनोभावे प्रार्थना केल्यावाचून प्रातःकाळच्या पुढचा दिवसही नाही. आपल्या प्रभूच्या सांगीप्रमाणे पुढे संसाराच्या लहरीमध्ये उडी घालण्याच्या अगोदरच, उठल्याबरोबर सकाळी आम्हाला एकान्तस्थळी गेले पाहिजे. सारी द्वारे लावून घेतली पाहिजेत व आपला दुर्बळपणा कबूल करून, गतउपकार स्मरून लेकरा-

प्रमाणे आपल्या पित्याची आराधना केली पाहिजे. " यासाठी त्याने मात्थीचे अवतरण दिलेले आहे. "

या गीतांमधील टिळकांनी येशूची भक्तिभावपूर्ण केलेली आर्त भक्ती मराठी संतांच्या तोडीची आहे. मराठी ख्रिस्ती वाङ्मयांत महाराष्ट्रातील संतमंडळींच्याप्रमाणे आर्तता, जिव्हाळा आणि प्रासादिक उत्कट रचना करण्यात टिळकांनी मोठे यश मिळविले आहे यात शंका नाही.

आत्मनिवेदन आणि सेवा–गीतसंग्रह

संपादक – मिस् एमिली विसेल आणि रे. ना. वा. टिळक स्कॉटिश मिशन इंडस्ट्रीज कंपनीच्या छापखान्यात छापले इ. स. १९०८. (ठोकळ)

या पुस्तकाची अखेरची पाने फाटलेली आहेत. अनुक्रमणिकेत ३८ गीतांची नोंद आहे. प्रत्यक्षांत ३१ गीते पूर्ण व बत्तीसावे गीत अपूर्ण एवढीच या पुस्तकांत उपलब्ध आहेत. यांत (१) शाब्बाथच्या उपासनेला आमंत्रण (२) माझा परम-मित्र येशू. (३) तुझे नाम पवित्र मानले जावो, (४) येशूला स्तवा. अशी गीते आहेत.

टिळकांची येशूकडे बघण्याची दृष्टी तीन क्रमांकाच्या गीतांत दिसते. " द्राक्षवेल तो शाखा त्याची मी मजला ठावे " असे ते म्हणतात. शंकराचार्यांच्या " मानसपूजेचा " त्यांच्या कवितेवरील परिणाम सहज कळून येण्यासारखा आहे.

हेनरी महागुरू – प्रकाशन वर्ष १२–२–१९११ (शेळके)

पुस्तकास प्रस्तावना वगैरे काही नाही. लेखक, प्रकाशन, मुद्रक यासंबंधी काही नोंद नाही.

पुस्तकात एप्रिल १९११ ते नोव्हें. १९१४ या काळातील महिन्यासाठी प्रार्थनेचे विषय दिलेले आहेत.

प्रार्थनेच्या विषयामध्ये अर्थातच सर्व ख्रिस्ती धर्मतत्त्वांचा अंतर्भाव आहे. ख्रिस्ती शिकवणीच्या आविष्कारासाठी संत पौल, संत पेत्रा इत्यादींची वचने, पवित्र-शास्त्रातील उतारे, बोधपत्रे, इत्यादी उद्धृत केलेली आहेत. ' पवित्रशास्त्र ' काळा-पासून चालत आलेल्या कित्येक कथांचे संदर्भ घेतले आहेत.

कित्येक रक्तसाक्षींच्या जीवनातील हकीकती निवेदन केल्या आहेत. ख्रिस्ती सद्गुण, त्यानुसार योग्य वर्तन, असे अनेक विषय हाताळले आहेत. येशूचा मोठेपणा, त्याने सोसलेली दुःखे इत्यादी संदर्भ देऊन ख्रिस्ती शिकवणीचे विषय प्रार्थनेसाठी स्पष्ट केले आहेत.

लेखनाची धाटणी मधूनच संवादरूप, तर मधूनच ' प्रिय वाचकहो ' ! असे म्हणून निवेदनात्मक, मधून मधून उपदेशप्रधान, तर केव्हा केव्हा गोष्टीरूप आहे त्यामुळे पुस्तकात वैविध्य आहे.

पुस्तकात घेतलेल्या विषयानुसार अनुकूल अशी पवित्र शास्त्रातील वचने, क्रमांकासह त्यांचे विवरण, स्वत:साठी विचार, प्रार्थना व त्यासाठी गद्य-पद्य वेचे अशी मांडणी आहे. पुढील दिलेल्या मुद्द्यावरून पुस्तकाची काही कल्पना येईल.

प्रार्थना करणाऱ्या ख्रिस्तावर पवित्र आत्म्याचे पूर्णावतरण, ख्रिस्ताचा पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा, पवित्र आत्म्याने परिपूर्ण असलेला ख्रिस्त, पवित्र आत्म्याविषयी येशू ख्रिस्ताची आज्ञा व अभिवचन वगैरे.

पवित्र आत्मा

लेखक – रे. जे. एफ्. एडवर्डस्, ख्रिस्त जयंती, इ. स. १९१६. (अहमदनगर कॉलेज).

या पुस्तकाचा उपयोग कसा करावा हे सांगताना लेखक लिहितो—(१) एकांतीची उपासना व सर्वांनी मिळून करावयाची उपासना यासाठी हे पुस्तक आहे. हे पुस्तक तयार करण्याचे कामी डॉ. भा. पां. हिवाळे, मनोहर कृष्णाजी उजगरे यांची मदत झाल्याबद्दल आभार मानण्यात आले आहेत.

कीर्तन कलाप

ना. वा. टिळक, संग्राहक – दे. ना. टिळक, नागरिक मुद्रणालय, नासिक. पॉकेट साईज, पृ. १०७. (जेसुईट फादर्स, नगर).

या पुस्तकाला दे. ना. टिळकांची प्रस्तावना आहे. त्यात "ज्ञानोदयामध्ये कीर्तन कलाप" या सदरातून प्रथम ही कीर्तने प्रसिद्ध झाल्याचे त्यांनी सांगितले आहे. "पुराण किंवा प्रवचन, भजन कीर्तन हे हिंदुस्थानातले. धर्मसंजीवनाचे व धर्मप्रसाराचे परंपरागत लोकमान्य मार्ग आहेत." असे टिळकांचे म्हणणे देवदत्त टिळकांनी उद्धृत केले आहे.

प्रभू येशूचे जीवन, ख्रिस्ती धर्मतत्त्वे यांस अनुसरून जी कीर्तने टिळकांनी ज्ञानोदयांतून प्रसिद्ध केली त्यातील दोन कीर्तने या संग्रहात संग्रहित केलेली आहेत. अशी कीर्तने इतरांनीही लिहावीत अशी टिळकांची अपेक्षा होती.

पहिल्या कीर्तनाचा विषय "सद्‌गुरुमाहात्म्य" असा आहे व आख्यान "लाजारसाचे नांदी किंवा मंगळ" हे आहे.

दुसऱ्या कीर्तनाचा विषय "पाप आणि त्याचे परिणाम" हा असून आख्यान "यहूदा इस्कायोते" याचे आहे.

कीर्तनाची सर्व रचना भारतीय कीर्तन परंपरेप्रमाणे आहे.

अभङ्गाञ्जलि –

या पुस्तकाची पहिली आवृत्ती भास्कर कृष्णा उजगरे यांनी १९२० मध्ये प्रसिद्ध केली. दुसरी आवृत्ती, देवदत्त नारायण टिळक यांनी १९३० साली प्रसिद्ध

केली, त्यात " तुकाराम आणि येशू ख्रिस्त " असा पुरवणी निबंध समाविष्ट केला होता. इ. स. १९५४ साली या पुस्तकाची तिसरी आवृत्ती दे. ना. टिळक यांनी प्रसिद्ध केली व चौथी आवृत्ती १९५९ साली अशोक देवदत्त टिळक यांनी प्रसिद्ध केली. या आवृत्तीचे प्रकाशक औरंगाबादचे जोशी ब्रदर्स आहेत. या चवथ्या आवृत्तीत ३०३ अभंग ना. वा. टिळकांचे, १११ अभंग देवदत्त टिळकांचे व १४ अभंग लक्ष्मीबाई टिळकांचे आहेत. प्रा. अशोक टिळकांची चिकित्सक प्रस्तावना असून शेवटी स्पष्टीकरणात्मक टीपा व सूची जोडलेली आहे.

या पुस्तकात टिळकांचे अभंग समाविष्ट का केले आहेत या संबंधी स्पष्टीकरण देताना अशोक टिळक सांगतात की फेब्रुवारी १९१७ पासून 'ज्ञानोदया' मध्ये 'अभंगाञ्जली' हे सदर सुरू करण्यात आले. त्या सदरासाठी टिळक अभंग लिहीत. त्यांचा मृत्यू १९१९ मध्ये झाला तेव्हा या सदरासाठी अभंग लिहिण्याचे काम देवदत्त टिळक करीत. त्यांची अभंग रचना तयार नसे, तेव्हा लक्ष्मीबाई रचना करीत म्हणून तिघांच्या रचनेचा समावेश या पुस्तकात केला आहे.

या कवितेतून टिळकांच्या " आध्यात्मिक विकासाचा आलेख " आपणास पहावयास सापडतो. नासिकवृत्तमध्ये १८८२ साली " धन्य धन्य पंचवटी " हे भक्तिगीत लिहिणारे टिळक १८८५ मध्ये मूर्तिपूजा करणे हे पाप नव्हे. " अशी चर्चा असणारे पुस्तक लिहितात. " १८९५ मध्ये धर्मांतर पाप नव्हे. " अशी चर्चा असणारे पुस्तक लिहितात. १८९५ मध्ये धर्मांतर करतात व नंतर ख्रिस्ताचे खरेखुरे शिष्य होतात व मानवतेत परमेश्वर पहातात व त्या अनुभवातून त्यांची कविता आकारते.

अभंगावर संपूर्णपणे तुकारामाच्या अभंगाची दाट छाया आहे. तसेच पवित्र बायबलचा टिळकांच्या जीवनावर झालेला परिणाम अभंगातून व्यक्त होतो. ख्रिस्ती धर्माच्या आणि तत्त्वज्ञानाच्या टिळकांच्यावर झालेल्या परिणामाचे चित्र त्यांच्या अभंगातून दिसते. कित्येक अभंगांतून टिळकांची ख्रिस्तावरील अढळ श्रद्धा जाणवायला लागते. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्र त्यांच्या अभंगातून आपणाला दिसते. तसेच त्यांची लोकसेवा, लौकिक सुख दुःखाबाबतची अलिप्तता जाणवते. टिळकांना आध्यात्मिक रीत्या जाणून घ्यायचे असेल, तर ह्या अभंगाञ्जलीचा बारकाईने अभ्यास करावा इतके ते महत्त्वाचे आहे.

ख्रिस्ती धर्मोपदेशाची सिद्धता – रे. ई. एम्. विल्सन

प्रका. टॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई., मराठी लिटरेचर सभेकरिता ज्ञानोदयावरून पुनर्मुद्रित, १९२४. किंमत ३ आणे. पृ. २३

प्रकाशन स्थळ – अमेरिकन प्रेसबिटेरिअन मिशन, इस्लामपूर. (हिवाळे)

" ख्रिस्ती धर्मोपदेशाची सिद्धता " या पुस्तकात–

उपदेशाची लक्षणे कोणती असावीत हे सांगताना

(१) विषयसंगती, (२) व्यवस्थित अनुक्रम (३) विचारौंव अशी तीन लक्षणे सांगितली आहेत. नंतर प्रत्येक लक्षणाचे स्वतंत्र विवेचन केलेले आहे.

विषयसंगती म्हणजे काय हे सांगताना विषयसंगतीची व्याख्या अशी केली आहे : विषयसंगती म्हणजे एका विशिष्ट कार्यांकरिता एखाद्या विषयातून काढलेल्या विचारांची नीट जुळणी होय. हे विचार अनेक प्रकारचे व अनेक स्वरूपाचे असू शकतील. तरी विषय व हेतू या दोहोंच्या धोरणांतून त्यांची जुळणी झाली पाहिजे.

उपदेशकाने विषय समजून सांगणे हे उद्दिष्ट. आपल्या गुणांचे प्रदर्शन करू नये.

ख्रिस्ती धर्मोपदेशकाने आपल्या कार्यसिद्धीसाठी तयारी कशी करावी ते निवेदन करणारे हे पुस्तक उपदेशकास मार्गदर्शक ठरेलच. परंतु विषय विवेचनाबाबत या अनुषंगाने आलेली शास्त्रीय व तात्त्विक चर्चा तितकीच उल्लेखनीय व मार्गदर्शक आहे. रे. विल्सन हे भारतीय ख्रिस्ती नाहीत, तरी मराठी भाषेचा वापर या दृष्टीने या पुस्तकातील भाषा प्रशंसनीय आहे.

स्तोत्राञ्जली–

" दाविदाची स्तोत्रे " याचे अभंगात रूपांतर, मनोहर विठ्ठल तर्खडकर, ख्रिस्ती ज्ञान प्रसारक संस्था, अहमदनगर मिशन प्रेस यांनी प्रसिद्ध केले. याची पृष्ठसंख्या ६ + १५४ असून प्रसिद्धी काळ इ. स. १९२६ आहे. प्रस्तावनेत पुस्तक प्रसिद्ध झालेले पहायला रूपांतरकार तर्खडकर हयात नसल्याचे दुःख प्रकटन आहे. तसेच, प्रस्तुत पुस्तक वापरण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यात शाळेत मुलामुलींसाठी कोणती स्तोत्रे वापरावीत व खासगी प्रार्थनेत कोणती वापरावी याबद्दल सूचना केलेल्या आहेत. ग्रंथसमाप्तीच्या अभंगात ग्रंथकाल नमूद केलेला दिसतो.

" तारीख सव्वीस रोजी महिना तिसरा व साल आठरावे ।
ग्रंथ समाप्ती झाली, नमितो त्या धन्य येशू ख्रिस्ताते ॥

एकूण १५० स्तोत्रांचे अभंगात रूपांतर केलेले आहे.

एकेक स्तोत्राच्या रूपांतरास अभंगांची संख्या निश्चित नाही. आशय भक्तिरसाचा असून, देवबापा येशू सर्वांस तारणारा आहे. सर्वांचे अपराध, चुका पोटात घालणारा आहे. त्याच्या कृपेने आमचे जीवन सुखी होते. तो आम्हांस अंधारातून वाट दाखविणारा आहे. म्हणून मी त्याची उपकारस्तुती गातो, अशी प्रतिपादने आहेत.

उपासकाचा साथी – रे. दि. शं. सावरकर, ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई. पहिली आवृत्ती १९२७ व दुसरी आवृत्ती १९३८ (नगर कॉलेज). या पुस्तकाला एन्. मॅक्निनल यांचा उपोद्घात आहेत. या पुस्तकात २८ प्रार्थना दिलेल्या आहेत. सर्व प्रार्थना गद्यात आहेत. प्रार्थनेचे काही विषय–

(१) तरुण मंडळींबरोबर करावयाची उपासना.

(२) प्रत्येक व्यक्तीने करावयाचे स्वार्पण.

(३) रविवारची आनंदोपासना.

तीन तासांचा धर्मोपदेश

मूळ लेखक – पॉल कॅनमारी, प्रका. म. कृ. उजगरे, निसबत मराठी वाङ्मय कमिटी, मुद्रक – आर्यभूषण प्रेस, प्रथमावृत्ती १९२८. (ठोकळ).

मूळ जपानी धर्मोपदेशक पॉल कॅनमॉरी यांच्या इंग्रजी पुस्तकाचे हे भाषांतर आहे. भाषांतरकाराचे नाव नाही पण भाषांतराच्या कामी सहाय्यक झालेल्या व्यक्तींत, कोडोळी येथील प्रेसबिटेरियन मिशनचे रे. एच्. जी. हॉर्वड, मिरजेचे डॉ. व्हेल व माधवराव गोर्डे यांचा उल्लेख आहे.

या ग्रंथात देव, पाप आणि तारण, ख्रिस्तीधर्माचा ओनामा, उपदेश करण्याच खरा हेतू, ख्रिस्ती धर्मीयांचा ग्रंथ बायबल, देवाविषयी ख्रिस्ती धर्मीयांची कल्पना, धर्मभोळेपणा, देव बनविण्याचा धंदा, माणसे इथून तिथून सारखीच, पाप हे काय आहे ? ख्रिस्ती धर्माचे महाद्वार, परमेश्वरी दंड, आयुष्य हा एक प्रवास आहे, न्यायासन, नरकाचे अस्तित्व, तारण हे काय आहे ? येशू हा आपला बदली, रक्ताची मोहर, वधस्तंभाचे सामर्थ्य, ख्रिस्ताचा स्वीकार या आनुषंगिक विषयांवर निवेदन आहे.

उपासना पद्धती व विशेष प्रसंगांकरता प्रार्थना

लेखक – ना. वा. टिळक, प्रका. दे. ना. टिळक, बाळबोधमेवा, मुद्रण– सुदर्शन–प्रेस, नाशिक, पृ. ६४, ९ मे १९२९. (ठोकळ)

रे. ना. वा. टिळक यांच्या दशवार्षिक स्मृतिदिनानिमित्त हे पुस्तक मित्रमंडळा- पुरते काढले. प्रारंभी रे. टिळकांच्या जीवन चरित्रातील ठळक गोष्टी दिलेल्या असून प्रस्तावनेत देवदत्त टिळक लिहितात " हिंदी मताला हिंदी संस्कृतीला साजेल अशी आपली उपासना असावी, या मताचे टिळक होते हे सर्वांना ठाऊकच आहे. या दृष्टीने टिळकांनी केलेले सर्व प्रयत्न पुन्हा ख्रिस्ती जनतेपुढे ठेवावेत, या हेतूने उपासनापद्धती, कीर्तनकलाप, प्रातःस्मरण, वगैरे छापून टिळकांच्या मित्रांना व चाह- त्यांना द्यावी असा टिळकांच्या कुटुंबातील मंडळीचा बेत ठरला. त्यानुसार छापलेले हे एक पुस्तक. "

यात–उपासना पद्धति क्रमांक १.

आचार्य व उपासक यांच्यातील संवाद, शास्त्रवचने, गीते, उपदेश वगैरे आहे.

उपासना पद्धती अनुक्रमांक २—उद्बोधन.

आचार्य आणि मंडळी यांचा संवाद – शास्त्रवचने वगैरेच्या आधारे उपासना पद्धती अनुक्रमांक ३.

प्रभू भोजनानंतरचा पहिला आदितवार. उपासना पद्धती क्र. ५ आचार्य व

उपासक यांत दानधर्माविषयी उपदेश–या उपदेशाच्या प्रारंभी गाण्यासाठी एक गीत दिलेले आहे. "विवाह पद्धती" ही टिळकांनी रचलेले आहे. आचार्यांचा उपदेश, जनसमूहास उद्देशून करावयाचे भाषण, सात पावलांसाठी सात ओव्या, मंगलाष्टके, मंगळसूत्र बंधनास गीत, इतर अनेक प्रसंगानुसार गावयाची गीते व विवाहप्रसंगी म्हणावयाची गीते, गृहप्रवेश, वधूवरांस सूचना, इत्यादी तपशील यात आहे. शास्त्र-वचने दिलेली आहेत. वधूने एकट्याने करावयाची व वराने एकट्याने करावयाची उपासना दिलेली आहे. त्याशिवाय दिनचर्येसाठी उपासना, विशेष प्रसंगांकरिता प्रार्थना, जेवणाआधी, बैठकीच्या प्रारंभी, अधिकारारूढ झाल्यावर करावयासाठी, अशा उपासना आहेत.

विशेष म्हणजे या उपासनांमध्ये पारंपारिक असे फारसे नाही. या उपासनां-साठी टिळकांनी स्वतः रचलेले रसाळ गोड काव्य आहे. आणखी विशेष म्हणजे टिळकांनी रचलेली विवाहपद्धती उपासना वाचनीय आहे.

धर्मशिक्षणाचे पाठ – (मूळ लेखिका मेरी एवेरेट रॅकिन,)

प्रकाशक – दि. शं. सावरकर, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, प्रकाशन स्थळ – आर्यभूषण प्रेस, पृ. २२३, वर्ष १९३३ (ठोकळ)

मूळ लेखिका मेरी एवेरेट रॅकिन किंडर गार्डन शिक्षणाच्या मुख्य–अध्यापिका, टीचर्स कोलंबिया युनिव्हर्सिटी यांनी लिहिलेल्या "A course for beginners in Religious Education" या पुस्तकावरून मुळचे पाठ महाराष्ट्रातील मुलांना योग्य असे जुळवून, फेरबदल करून प्रस्तुत पुस्तक 'एम. एल. एडवर्डस्' यांनी तयार केले.

पाच वर्षे वयाच्या मुलांकरता योजलेले एका वर्षांत द्यावयाचे बावन पाठ यांत ग्रंथीत केले आहेत. मुलांना लहान वयातच धार्मिक शिक्षण देण्यासाठी मदत व्हावी, हा या पुस्तकाचा उद्देश आहे. प्रत्येक धड्याबरोबर पालकांस पत्र जोडले आहे. ही पत्रे म्हणजे घर व शाळा यांना जोडणारा पूलच आहे. पालकांची सहानुभूती व उत्साह साधून घेण्यासाठी या पत्रांचा उपयोग करावा, अशी शिफारस आहे. मोठ्या इयत्तांतील मुलांना त्या पत्रांच्या नकला करण्यास सांगावे. फ्रोबेलच्या शिक्षण विष-यीच्या तत्त्वावर हे पुस्तक आधारलेले आहे.

५२ दिवसांसाठी ५२ पाठ दिले आहेत. पाठातून गाणे, दाने कोणास कशासाठी द्यावयाची ? प्रार्थना, संभाषण, विश्रांती वगैरे तपशील आहे.

भजनसंग्रह आणि सुवार्तिकांचा साथी – रे. ना. वा. टिळक

प्रका. व्ही. ई. आढाव, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, आर्यभूषण प्रेस, आवृत्ती ९ वी. १९३५, पृ. २५६. (ठोकळ).

प्रस्तुत पुस्तकाच्या एकूण २५,५०० प्रती खपल्या असे या ९ व्या आवृत्तीत नमूद केलेले आहे.

रे. ना. वा. टिळक यांची १९०६ सालची प्रस्तावना यात समाविष्ट केलेली आहे. त्यांत ते म्हणतात, " प्रथमतः भजनसंग्रह पंडिता रमाबाईनी मुक्तीमिशनमधून छापला व त्याच्या हजार प्रती फुकट वाटल्या. तसेच मुक्ती मिशनांत या भजनांचा प्रसार व्हावा म्हणून करता येतील तेवढे प्रयत्न केले. "

या नवव्या आवृत्तीची प्रस्तावना श्री. वसंतराव आढाव यांनी लिहिलेली आहे. यांत एकूण ११२ भजनांचा संग्रह आहे.

' सुवार्तिकांचा साथी ' यामध्ये एकूण १०९ पदे समाविष्ट केलेली आहेत.

भजनसंग्रहाच्या अखेरीस कठीण शब्दांचे अर्थ देणारा कोश जोडलेला आहे.

" खेडेगावांतील ख्रिस्ती मंडळ्यांच्या उपयोगासाठी भक्तीची साधी पद्धती "

प्रका. मिशन प्रेस, अहमदनगर, संपादक- नाशिक धर्मप्रांतातील एक मिशनरी, १९३५ पृ. ७३. ग्रंथ निर्मितीचा हेतू स्पष्ट करीत असता प्रस्तावनाकार म्हणतात.

" खेड्यापाड्यातील सामान्य ख्रिश्चन लोकांना सकाळच्या किंवा संध्याकाळच्या भक्तीच्या वेळी सहज आणि सोप्या रीतीने भक्ती, प्रार्थना करता यावी अशी तरतूद या पुस्तकांत केलेली आहे. " पुढे या पुस्तकात भक्त व उपदेश करणारा यांना सूचना दिलेल्या आहेत.

या पुस्तकांत निरनिराळ्या दहा प्रार्थना, स्तोत्रे दिली आहेत. त्यावेळचे पंचांग, आठवड्याच्या पाठासाठी व सणासाठी नेमलेले शास्त्रभाग, रोजच्या पाठासाठी नेमलेले शास्त्रभाग, इत्यादी सामग्री दिलेली आहे. प्रार्थना स्तोत्रे म्हणताना ती कशी म्हणावीत याबद्दलच्या सूचना वारंवार दिलेल्या आहेत. उपदेशकारांनी जेथे २–३ शब्दांचे खंड पाडावेत अशी अपेक्षा आहे, तेथे छापताना उभ्या रेघा छापल्या आहेत. तेवढा खंड उपदेशकाने प्रथम सांगावयाचा व नंतर मंडळींनी म्हणावयाचा. तसेच कोणती धृ. पदे, ओव्या मंडळींनी म्हणाव्यात व कोणती उपदेशकाने म्हणावीत, तेही स्पष्ट केलेले आहे. अशा पद्धतीने निवेदन करीत, दहा आज्ञा, प्रार्थना व स्तोत्र तेविसावे, रदबदलीच्या प्रार्थना, विश्वासात निवर्तलेल्यांच्या जीवात्म्यासाठी प्रार्थना, पवित्र आत्म्याच्या सात देणग्यांसाठी प्रार्थना, शुद्धतेसाठी प्रार्थना, श्रीप्रभू येशूच्या दुःखभोगाच्या स्मरणार्थ प्रार्थना, उपकारस्तुति इतकी सामग्री पुरविली आहे. इ. स. १९५७ साली याच पुस्तकांची आवृत्ती रे. एम्. मुलिन्स एस्. पी. सी. के. महाराष्ट्र पुणे यांनी प्रकाशित केली. संपादक, बिशप लॉईड. पृ. ११९ आहे. पुस्तकांत लेखकाचे नाव स्पष्टपणे कुठेच नमूद केलेले नाही.

धार्मिक शिक्षणपद्धती व तत्त्वे

(प्राथमिक शिक्षकांकरिता रूपरेषा) लेखक – ए. एफ्. राईट.

प्रका. रे. एच्. के. राईट, युनियन ट्रेनिंग कॉलेज, अहमदनगर.

प्रकाशन स्थळ – आनंद मुद्रणालय, दुसरी आवृत्ती १९३५. पृ. १०० (ठोकळ)

चर्चेसाठी धार्मिक शिक्षणाचे प्रारंभी काही प्रश्न नमूद केले आहेत. धर्मशिक्षणास सुरुवात करताना खालील प्रश्न विचारावे–

(१) तुम्ही या शाळेत कोणत्या हेतूने आला आहात ?

(२) तुम्हाला कोणता अभ्यासक्रम आहे ?

(३) कोणत्या प्रकारचे विद्यार्थी घडविण्याचा आपला प्रयत्न राहील ?

(४) तुमच्या मते खिस्ती विद्यार्थ्यांची गुणलक्षणे कोणती ?

(५) या गुणाची वाढ कोण करील ?

धर्मशिक्षण, पूर्व माहितीची कसोटी, शास्त्रभागाची उदाहरणे, जनसेवेची उदाहरणे, शिक्षकाची स्वपरीक्षा, विद्यार्थ्यांच्या शीलाची परीक्षा, पालकांना द्यावयाची माहिती, मुलांकरिता प्रश्न, अशी परिशिष्टे दिलेली आहेत.

सुवार्ता संगीत

प्रकाशक – मिस्. ई. मोरलंड, कन्व्हीनर लिटरेचर कमिटी, बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह, खिश्चन कौन्सिल, आर्यभूषण प्रेस, पृ. १०० नोव्हें. १९३६. (ठोकळ)

या पुस्तकात सुवार्तिकास उपयोगी पडतील अशा एकूण १०९ गीतांचा संग्रह केलेला आहे. वरील बरीच गीते उपासना संगीत, गानसुधा, पद्यमाला, भजनसंग्रह, बालोद्यान या पुस्तकांतून निवडलेली आहेत. त्याशिवाय कित्येक नवीन गीतांचा सुद्धा समावेश केलेला आहे. यातील गीतांचे—(१) स्तुतिपर गीते (२) येशूविषयी गीते (३) सुवार्ता सांगताना उपयोगी पडणारी गीते (४) आमंत्रणपर गीते (५) धर्मसमीक्षकांसाठी गीते व (६) मुलांसाठी गीते, असे वर्गीकरण केलेले आहे.

भक्तिसुधा (स्वरताल लिपीसह)

प्रका. मिस्. ई. मोरलंड, बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह खिश्चन कौन्सिल, आर्यभूषण प्रेस, पुणे. पृ. ९२ इ. स. १९३६. (ठोकळ)

प्रस्तावना लेखकाचे नाव नाही. प्रस्तावनेत पुस्तकासंबंधी माहिती देताना प्रस्तावनाकार लिहितो – " भक्तिसुधा या सर्वांस परिचित पुस्तकातीलच गीते या पुस्तकात घेतली आहेत. सांघिक उपासनेच्या वेळी गीतांना संगीताची जोड असणे अत्यंत महत्वाचे आहे. संगीतामुळे तालबद्धता येऊन व्यक्तिमत्त्वाच्या ठिकाणी असलेली संगीतासंबंधीची जिज्ञासा प्रदीप्त होते. गीतांना संगीताची जोड. योग्य व सौंदर्याच्या पायावर दिली असता, जे कार्य घडेल ते नुसती गीते वाचून घडणार नाही. मनुष्य प्राण्याच्या मनात वास्तव्य करणाऱ्या भक्तिभावाने मन प्रफुल्ल व्हावे, या हेतूने या पुस्तकाची रचना केलेली आहे. "

या पुस्तकात समाविष्ट केलेल्या गीतांना भिन्न भिन्न शंभर चाली उपयोजिल्या

आहेत. चालींची निवड आजकालची सौंदर्याची अभिरुची लक्षात घेऊन केलेली आहे. वेगवेगळ्या पंचवीस रागांत त्या दिलेल्या आहेत. त्यामुळे पंचवीस रागांची माहिती सहज होईल. तसेच ही गीते निरनिराळ्या आठ तालांत आहेत. त्यामुळे आठ तालांची माहिती अनायासे होईल. या आठ तालांचे बोल तबल्यावर वाजविण्यासाठी स्वतंत्र पानावर तबल्याचे बोल दिलेले आहेत. गीतांचे स्वरलेखन देण्यात आलेले आहे.

प्रस्तावना लेखकाने केलेल्या उल्लेखानुसार – गीतांत चाली बसविण्याच्या कामी श्री. गं. भि. आचरेकर संगीताध्यापक, गव्हर्मेंट ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणे यांची व ख्रिस्ती समाजातील गायन शिक्षक चिंतामणराव स. गायकवाड यांची मदत झालेली दिसते. या पुस्तकाची कल्पना व मूर्त स्वरूप देण्याच्या कामी मिस्. एम्. लॅर्वट यांनी फार मेहनत घेतलेली दिसते.

यात केरवा, दादरा, रूपक, विलंबित केरवा, धुमाळी, झपताल, दीपचंदी, त्रिताल एवढे ताल आहेत.

यात एकूण ९७ गीते आहेत.

गीतांच्या स्वरलेखनानंतर बारा अक्षरी, आठ अक्षरी अभंग, साकी दिंडी यांच्या चाली दिलेल्या आहेत.

उपासना संगीताचा व्यावहारिक अंगांनी केलेला हा विचार औचित्यपूर्ण म्हणावा लागेल.

खेडेगावातील ख्रिस्ती मंडळ्यांच्या उपयोगासाठी भक्तीच्या साध्या पद्धती–

लेखक – बिशप लॉईड, प्रका. हिंद इ. एम्. मुलिन्स, एस्. पी, सी. के. महाराष्ट्र. ५ काहून रोड, पुणे १ (आवृत्ती पहिली १९३८) (१९५७ आ. ?) ११९.

(हिवाळे)

पुस्तकाच्या प्रस्तावनेत ‘देवाची भक्ती कशी करावी’ या विषयी लिहिले आहे. देवबाप्पाचे साह्य मागणे हाच भक्तीचा हेतू असून उपासना करताना योग्य ती पूज्यबुद्धी मनात असावी. त्याबाबत पुढाऱ्याने आपल्या एकाग्रवर्तनाबद्दल विशेष काळजी घेतली पाहिजे. ‘हे पुस्तक कसे वापरावे’ या मथळ्याखाली आलेला सर्व मजकूर म्हणजे पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीसाठी लिहिलेला मजकूर असल्याचे नमूद केले आहे. फिलीप, नाशिक १९३८ ही पहिली आवृत्ती होय. १९५७ साल या पुस्तकावर आहे. पण आवृत्ती कितवी ते नमूद केलेले नाही.

भक्तीची स्तोत्रे, भजने, जुन्या करारातून वाचून दाखवायचे शास्त्रपाठ, नव्या करारातील वाचून दाखवावयाचे शास्त्रपाठ, रदबदलीच्या प्रार्थना, ख्रिस्तीतर लोकांचा पालट होण्यासाठी प्रार्थना, ख्रिस्ती मंडळींसाठी प्रार्थना, श्री येशूच्या दुःखभोगाच्या स्मरणार्थ प्रार्थना, निवर्तलेल्या जीवात्म्यासाठी प्रार्थना, उपकारस्तुती, इत्यादी तपशील आहे.

महिन्याची सामग्री भाग - १

अमृता भागाजी त्रिभुवन, वकील, चित्रशाळा प्रेस, पुणे. १९३९ आ. १ ली. (ज्योत्स्ना त्रिभुवन)

अमृतरावांनी " महिन्याची सामग्री ", भाग १ व २ अशा स्वरूपात लिहिली. या पुस्तकास आर. एच्. गायकवाड यांची प्रस्तावना असून त्यात ते म्हणतात " ख्रिस्ती मराठी वाङ्मयामध्ये भक्तिभावपोषक लिखाण अगदीच दुर्मिळ आहे. या लहानशा पुस्तकाने ही मोठी उणीव अल्पांशाने भरून निघत आहे. लेखक आपल्या भूमिकेत म्हणतो ' आर्थिक हलाखी व रोजच्या जगण्यातील डोंगराएवढ्या अडचणी अशा बिकट परिस्थितीत जीविताचे तारू सुरक्षितपणे पैलतीरी पोहचावे म्हणून त्याचे खुद्द मालकाच्या म्हणजे देवबाप्पाच्या हाती द्यावे म्हणून दैनंदिन उपासनेच्या परिपाठासाठी ही महिन्याची सामग्री आहे." तीस धार्मिक बोधपर लेखांचा हा संग्रह आहे. प्रत्येकाच्या सुरुवातीला व्यावहारिक पार्श्वभूमीवर काही प्रसंग वातावरण निर्मितीसाठी निवेदन असून त्या अनुषंगाने त्या परिभाषेत पवित्र शास्त्रातील उपदेशाचे निवेदन, काहीशी रूपकात्मक रचना दिसते.

या पुस्तकातील एक नमुना पहा-

नवीन जन्म- (१७ वी गोष्ट)

एका जुन्या खुर्चीस एकदा दुरुस्त केले. पुन्हा ती नादुरुस्त झाली. दुसऱ्यांदा दुरुस्त केली. पुन्हा तिसऱ्यांदा दुरुस्त करण्याची वेळ आली. या दुरुस्तीचे वेळेस खिळे ठोकताना त्या जुन्या खुर्चीचा पायच मोडला. अखेरीस सुतार म्हणाला " साहेब, या जुन्या खुर्चीस नवीन पाय घालून दुरुस्ती करण्याचे भरीस पडू नका. आता नवीनच खुर्ची घ्या. जुन्या कुजक्या झालेल्या लाकडांचे जिन्नस दुरुस्तीपेक्षा नवीन डाग घेणे फायद्याचे ठरेल. "

प्रापंचिक आघातांतील, संकटांनी जुने शरीर व जुनाट मन खिळखिळे होऊन जाते. माणसाचा समतोल ढळतो. अशा अवस्थेत नवीन जन्म घेतल्याने देवाचे राज्य निर्माण होते. असेच प्रभूने शिकवले आहे. रंगात, विलासात, कलहात, मत्सरात खिळखिळा झालेल्या मनुष्याने ख्रिस्ताला परिधान केल्यावर तो नवा मनुष्य होतो. "

महिन्याची सामुग्री भाग - २

ले. अमृत भागाजी त्रिभुवन, चित्रशाळा प्रेस, पुणे - १९४१.

दुसऱ्या भागाची मांडणी पहिल्या भागाप्रमाणे असून स्वरूप पहिल्यासारखेच आहे. ३१ दिवसासाठी ३१ लेख आहेत. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत तिसरा भाग लवकरच प्रसिद्ध होणार असल्याची सूचना आहे.

या पुस्तकातील शैलीचा हा छोटासा नमुना पहा.

आहेत. चालींची निवड आजकालची सौंदर्याची अभिरुची लक्षात घेऊन केलेली आहे. वेगवेगळया पंचवीस रागांत त्या दिलेल्या आहेत. त्यामुळे पंचवीस रागांची माहिती सहज होईल. तसेच ही गीते निरनिराळया आठ तालांत आहेत. त्यामुळे आठ तालांची माहिती अनायासे होईल. या आठ तालांचे बोल तबल्यावर वाजविण्यासाठी स्वतंत्र पानावर तबल्याचे बोल दिलेले आहेत. गीतांचे स्वरलेखन देण्यात आलेले आहे.

प्रस्तावना लेखकाने केलेल्या उल्लेखानुसार – गीतांत चाली बसविण्याच्या कामी श्री. गं. भि. आचरेकर संगीताध्यापक, गव्हर्मेंट ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणे यांची व ख्रिस्ती समाजातील गायन शिक्षक चिंतामणराव स. गायकवाड यांची मदत झालेली दिसते. या पुस्तकाची कल्पना व मूर्त स्वरूप देण्याच्या कामी मिस्. एम्. लॅबंट यांनी फार मेहनत घेतलेली दिसते.

यात केरवा, दादरा, रूपक, विलंबित केरवा, धुमाळी, झपताल, दीपचंदी, त्रिताल एवढे ताल आहेत.

यात एकूण ९७ गीते आहेत.

गीतांच्या स्वरलेखनानंतर बारा अक्षरी, आठ अक्षरी अभंग, साकी दिंडी यांच्या चाली दिलेल्या आहेत.

उपासना संगीताचा व्यावहारिक अंगांनी केलेला हा विचार औचित्यपूर्ण म्हणावा लागेल.

खेडेगावातील ख्रिस्ती मंडळयांच्या उपयोगासाठी भक्तीच्या साध्या पद्धती–

लेखक – बिशप लॉईड, प्रका. हिंद इ. एम्. मुलिन्स, एस्. पी, सी. के. महाराष्ट्र. ५ काहून रोड, पुणे १ (आवृत्ती पहिली १९३८) (१९५७ आ. ?) ११९.

(हिवाळे)

पुस्तकाच्या प्रस्तावनेत ' देवाची भक्ती कशी करावी ' या विषयी लिहिले आहे. देवबाप्पाचे साह्य मागणे हाच भक्तीचा हेतू असून उपासना करताना योग्य ती पूज्यबुद्धी मनात असावी. त्याबाबत पुढाऱ्याने आपल्या एकाग्रवर्तनाबद्दल विशेष काळजी घेतली पाहिजे. ' हे पुस्तक कसे वापरावे ' या मथळयाखाली आलेला सर्व मजकूर म्हणजे पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीसाठी लिहिलेला मजकूर असल्याचे नमूद केले आहे. फिलीप, नाशिक १९३८ ही पहिली आवृत्ती होय. १९५७ साल या पुस्तकावर आहे. पण आवृत्ती कितवी ते नमूद केलेले नाही.

भक्तीची स्तोत्रे, भजने, जुन्या करारातून वाचून दाखवायचे शास्त्रपाठ, नव्या करारातील वाचून दाखवावयाचे शास्त्रपाठ, रदबदलीच्या प्रार्थना, ख्रिस्तीतर लोकांचा पालट होण्यासाठी प्रार्थना, ख्रिस्ती मंडळींसाठी प्रार्थना, श्री येशूच्या दुःखभोगाच्या स्मरणार्थ प्रार्थना, निवर्तलेल्या जीवात्म्यासाठी प्रार्थना, उपकारस्तुती, इत्यादी तपशील आहे.

महिन्याची सामग्री भाग – १

अमृता भागाजी त्रिभुवन, वकील, चित्रशाळा प्रेस, पुणे. १९३९ आ. १ ली. (ज्योत्स्ना त्रिभुवन)

अमृतरावांनी " महिन्याची सामग्री ", भाग १ व २ अशा स्वरूपात लिहिली. या पुस्तकास आर. एच्. गायकवाड यांची प्रस्तावना असून त्यात ते म्हणतात " ख्रिस्ती मराठी वाङ्मयामध्ये भक्तिभावपोषक लिखाण अगदीच दुर्मिळ आहे. या लहानशा पुस्तकाने ही मोठी उणीव अल्पांशाने भरून निघत आहे. लेखक आपल्या भूमिकेत म्हणतो ' आर्थिक हलाखी व रोजच्या जगण्यातील डोंगराएवढ्या अडचणी अशा विकट परिस्थितीत जीविताचे तारू सुरक्षितपणे पैलतीरी पोहचावे म्हणून त्याचे खुद्द मालकाच्या म्हणजे देवबाप्पाच्या हाती द्यावे म्हणून दैनंदिन उपासनेच्या परिपाठासाठी ही महिन्याची सामग्री आहे." तीस धार्मिक बोधपर लेखांचा हा संग्रह आहे. प्रत्येकाच्या सुरुवातीला व्यावहारिक पार्श्वभूमीवर काही प्रसंग वातावरण निर्मितीसाठी निवेदन असून त्या अनुषंगाने त्या परिभाषेत पवित्र शास्त्रातील उपदेशाचे निवेदन, काहीशी रूपकात्मक रचना दिसते.

या पुस्तकातील एक नमुना पहा–

नवीन जन्म– (१७ वी गोष्ट)

एका जुन्या खुर्चीस एकदा दुरुस्त केले. पुन्हा ती नादुरुस्त झाली. दुसऱ्यांदा दुरुस्त केली. पुन्हा तिसऱ्यांदा दुरुस्त करण्याची वेळ आली. या दुरुस्तीचे वेळेस खिळे ठोकताना त्या जुन्या खुर्चीचा पायच मोडला. अखेरीस सुतार म्हणाला " साहेब, या जुन्या खुर्चीस नवीन पाय घालून दुरुस्ती करण्याचे भरीस पडू नका. आता नवीनच खुर्ची घ्या. जुन्या कुजक्या झालेल्या लाकडांचे जिन्नस दुरुस्तीपेक्षा नवीन डाग घेणे फायद्याचे ठरेल. "

प्रापंचिक आघातांतील, संकटांनी जुने शरीर व जुनाट मन खिळखिळे होऊन जाते. माणसाचा समतोल ढळतो. अशा अवस्थेत नवीन जन्म घेतल्याने देवाचे राज्य निर्माण होते. असेच प्रभूने शिकवले आहे. रंगात, विलासात, कलहात, मत्सरात खिळखिळा झालेल्या मनुष्याने ख्रिस्ताला परिधान केल्यावर तो नवा मनुष्य होतो. "

महिन्याची सामुग्री भाग – २

ले. अमृत भागाजी त्रिभुवन, चित्रशाळा प्रेस, पुणे – १९४१.

दुसऱ्या भागाची मांडणी पहिल्या भागाप्रमाणे असून स्वरूप पहिल्यासारखेच आहे. ३१ दिवसासाठी ३१ लेख आहेत. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत तिसरा भाग लवकरच प्रसिद्ध होणार असल्याची सूचना आहे.

या पुस्तकातील शैलीचा हा छोटासा नमुना पहा.

(२) जुनी विहीर–

" एका शेतकऱ्याने सावकाराकडील गहाण जमीन सोडवून घेतली. जमीन सावकाराकडे असताना रान एवढे माजले होते की शेतात असलेली जुनी विहीर दिसतही नव्हती. गहाण सोडवून घेतल्यावर शेतकऱ्याने पुन्हा विहीर उपसली, चालू केली, चांगले शेत फुलले. परमेश्वराने केलेल्याने कृपेच्या विहिरी पण आपण बुझू देतो त्या चालू करा. प्रीतीचा अखंड झरा चालू असलेला आढळेल." "**ख्रिस्त जयंतीची भेट**" ही सोळा पृष्ठांची पुस्तिका त्यांनी लिहिली असून त्यात "तुम्ही दीनापैकी एकाला (सहाय्य) केले म्हणणे मलाच सहाय्य केले" या येशूच्या उपदेश स्मरणात कथा संपते.

प्रथमोपचार – (आजाऱ्याचा उद्धार)

संपादक रे. फादर जे. एस्. मिरांडा, प्रका. रे. फादर जे. एस्. मिरांडा, मर्सिस चर्च, वसई, मुंबई, हिंदी प्रिंटिंग प्रेस, गिरगाव, मुंबई. इ. स. १९३९. पृ. ९६ (शेळके)

रोग्याचे आजारावर ऐहिक उपाय करण्यापेक्षा पारमार्थिक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे प्रारंभी नमूद करून नंतर आध्यात्मिक उपायमार्गाचे निवेदन केले आहे. निरनिराळ्या संतांच्या दुखण्याच्या कथा निवेदन केल्या आहेत. अखेरीस येशूची क्रूसाच्या आदी प्रार्थना दिलेल्या आहेत. निरोगी प्रकृती ही ईश्वरी देणगी असल्याने एहिक डॉक्टर, वैद्य यांच्यापेक्षा खऱ्या अर्थाने ईश्वर रोग्यास बरे करतो अशी भूमिका. सृष्टिनियमाविरुद्ध वर्तन, दुर्व्यसन, इत्यादीचे परिणाम म्हणून आजार होतो. त्याबाबत नैराश्यवृत्ती आणखीच दुःखदायक होते. येशूवर श्रद्धा ठेवणे व डॉक्टरांच्या आज्ञेत राहणे हे त्यावर उपाय आहेत. मनःशांतीसाठी पवित्र शास्त्रातील वाक्ये सांगितली आहेत.

संत अल्फॉन्स, संत फ्रान्सिस, येशू ख्रिस्त, यांचे याबाबत विचार सांगितले आहेत व अनुभव नमूद केलेले आहेत. गैरसमजूत व औषधे यांस रोगी बळी पडतो. त्यासाठी थोरांचे विचार व अनुभव लक्षात घेऊन रोग्याने त्यांच्या वचनाचे मनन करावे. त्या मननाने त्याची सहनशीलता वाढवावी, ती रोग प्रतिबंधास उपयुक्त असते असे प्रतिपादन यात केले आहे. तसेच ख्रिस्तजपनामावली अखेरीस दिली आहे. तिचा योग्य उपयोग करून मनःशांती प्राप्त करून घ्यावी, असे सांगितले आहे.

अशाप्रकारे प्रथमोपचार म्हणजे सर्व पारमार्थिक उपाय हेच सांगितले आहे.

शेवटी आजाऱ्याच्या खोलीचा नकाशा छापला आहे. बिछाना, जवळ एक मेज, त्यावर शुभ्र टेबल क्लॉथ, जवळच भिंतीवर क्रूस, क्रूसाच्या दोन्ही बाजूस मेणबत्त्या, एका बाजूस लहान पेल्यात पिण्याचे पाणी, खिडक्या वगैरेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

भजनमाला

लेखक – एफ्. ए. म्हंकाले, प्रका. रे. पी. गायकवाड, शिवाजी प्रेस, संगमनेर १९४०. पृ. ३८.

लेखकाने " दोन शब्दांत " सांगितले आहे– " धर्मसंस्था दृढमूल होण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्या सर्वांत सोपा सहजभक्ती उत्पन्न करणारा आवडीचा मार्ग म्हटला म्हणजे भजन हा होय. " त्यासाठी ही भजनमाला छापली आहे. यांत येशू-ख्रिस्ताची भक्तिभावाने भरलेली भजने, पाळणा, पोवाडा अशी रचना आहे.

आदर्श ख्रिस्ती गृह

लेखक – सुलोचनाबाई जाधव, रे. मि. सुमंत धो. रामटेके. प्रका. मिस्. एफ्. एफ्. मास्टर्स, ऐवी टॉवर्स, लॉरेन्स रोड, पुणे १. (वार्नबस संग्रह). प्रका. आर्य-भूषण मुद्रणालय,| इ. स. १९४३ पृ. १९. आदर्श ख्रिस्तीगृह ही एक छोटीशी नाटिका आहे.

ख्रिस्ती गृहोत्सवाचा आठवडा वायल्डर मेमोरिअल चर्चने कोल्हापूर येथे नाताळच्या सणांत इ. स. १९४२ मध्ये मोठ्या उत्साहाने पार पाडला. त्यावेळी शाहूपुरी येथील ख्रिस्ती तरुण मुलींनी आदर्श ख्रिस्ती गृह या नावाची ही नाटिका बसविली.

मुलाने मातृपितृसेवा करावी, अपराधाची कबुली द्यावी. अपराधास क्षमा करणारे उदार मन असावे. असा हा ख्रिस्ती गृहांचा संतोष आहे.

स्पर्श माहात्म्य – (कीर्तन)

लेखक – सदाशिव नारायण देठे, ह्यूम हायस्कूल, भायखळा.

प्रका. तत्त्व विवेचक प्रेस, मुंबई–१९४० पृ. २४ (ठोकळ)

पुस्तकाला " दोन शब्द " मनोहर कृष्ण उजगरे यांचे असून लेखकाचे हृगद्त, कौटुंबिक दुःखाचा विसर पडण्यासाठी लेखक या कीर्तनरचनेकडे वळला असे स्पष्टीकरण.

यांत येशू ख्रिस्ताने स्पर्शाने बरे केलेल्यांच्या कथा, डोंगरावरील उपदेश, धन्य कोण, स्पर्श म्हणजे काय ? स्पर्शाचे सामर्थ्य, इत्यादी विषय अंतर्भूत झाले आहेत. प्रभू येशूचा गौरव, आरती वगैरे आहेत.

पुस्तकाची रचना हिंदूपद्धतीच्या कीर्तन पद्धतीला अनुसरून केलेली आहे.

उपासना पद्धती

संपादक – सु. ना. थोरात, प्रका. सु. ना. थोरात, पब्लिकेशन सेक्रेटरी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई. आर्यभूषण, इ.स. १९४४. (अहमदनगर कॉलेज).

हिंदुस्थानातील प्रेसबिटेरियन व काँग्रिगेशनल ऐक्य १९२४ साली झाले. सीनड व चर्च कौन्सिले यांच्या हद्दी ठरल्या. महाराष्ट्र सीनडचे दुसरे अधिवेशन १९२७ साली झाले, तेव्हा मराठी उपासना पद्धतीची आवश्यकता जाणवली. त्यानंतर गरज अधिकाधिक जाणवत गेली व १९४३ च्या अधिवेशनात मराठी उपासना पद्धती पुस्तक रूपाने छापून घेण्याचा ठराव पास झाला.

या पुस्तकात रे. भा. कृ. उजगरे, डॉ. रॉबर्ट बेली, डग्लस, रे. ना. वा. टिळक यांच्या रचना आहेत. निरनिराळ्या इंग्रजी उपासना पद्धतींवरून संपादकांनी या उपासना घेतलेल्या आहेत. उपासनेचे मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकांच्या उपयोगासाठी हे पुस्तक आहे.

प्रस्तुत पुस्तकात "उपासनेची तयारी" या प्रकरणात प्रभूची प्रार्थना, प्रेषितांचा मतांगीकार, नायसीन मतांगीकार, आचार्यांनी करावयाच्या प्रार्थना, गायक मंडळींबरोबर करावयाची प्रार्थना यांचा समावेश आहे. तर दुसऱ्या "सामुदायिक उपासना" प्रकरणात एकूण आठ पद्धती सांगितल्या आहेत. त्यांत दोन खेड्यातील मंडळ्यांसाठी व दोन लेकरांसाठी आहेत.

तिसऱ्या प्रकरणात "संस्कार व विधी" या बद्दलच्या उपासनापद्धती आहेत. बालकाचा बाप्तिस्मा, दोन पद्धती, वयस्काचा बाप्तिस्मा, दृढीकरण व प्रभू भोजन करू देण्यास मान्यतेची उपासना, प्रभू-भोजनाच्या तीन पद्धती, विवाहाच्या दोन पद्धती, त्यांत एक रे. ना. वा. टिळकांची, अंत्यविधी - घरी किंवा उपासना मंदिरात अंत्यविधी, स्मशानभूमीत वडिलांचे विभक्तीकरण, धर्मोपदेशकास सनद, आचार्यांची दीक्षा व प्रतिष्ठापना, उपासना मंदिराचे समर्पण. स्मशानभूमीचे समर्पण, याबाबत उपासना पद्धती दिलेल्या आहेत.

उपासना पद्धतीसाठी गद्य, पद्य, संवाद, निवेदन अशा संमिश्र शैलीचा वापर केलेला आहे. काही ठिकाणी पवित्रशास्त्रातील संदर्भ क्रमांक दिले आहेत.

आपल्या गृहात परमेश्वर –

ग्रॅहम डीस नेस करोल, मिस. ए. ए. ॲबट, ऐवी टॉवर्स, लॉरेन्स रोड, पुणे १. आर्यभूषण मुद्रणालय, १९४५. पृ. ४८. किंमत ८ आणे. (शेळके).

डीकनेस कॅरोल ग्रॅहम यांनी लिहिलेले हे पुस्तक मातृसंघाच्या विद्यमाने तयार करण्यात आलेल्या पुस्तकमालेपैकी एक आहे.

परमेश्वराचा मानवाबद्दल काय उद्देश आहे, पापामुळे हा उद्देश कसा बिघडला, मनुष्याला आपल्याकडे वळविण्याचा पुष्कळ वर्षेपर्यंत कसा प्रयत्न केला आणि ज्याच्याद्वारे मनुष्याचा परमेश्वराशी समेट झाला अशा तारकाच्या मृत्यूत, प्रयत्नाचा शेवट कसा झाला, या सर्वांची हकीकत पाठांच्या रूपाने या पुस्तकात दिलेली आहे.

खेड्यापाड्यांतील स्त्रियांना शिकविण्यासाठी उपयुक्त म्हणून हे लिहिले गेले.

गजर संग्रह –

संपादक एल्. आर. कारनर, नारगाव प्रका. रे. आर. एच्. स्मिथ, चेअरमन द इंडिया मिशन द ख्रिश्चन ॲण्ड मिशनरी अलायन्स, अकोला. नागरिक प्रेस, नाशिक.

गजर संग्रहाच्या एकूण चार आवृत्त्या निघालेल्या दिसतात. पहिली आवृत्ती १९४७ साली निघाली, तिच्या ५००० प्रती होत्या. नंतरच्या आवृत्त्यांच्याही प्रत्येकी ५००० प्रती काढलेल्या दिसतात. यात खासगी, कौटुंबिक, सामुदायिक, उपासनेसाठी उपयुक्त असा भजनसंग्रह, शिकविण्यासाठी व म्हणण्यासाठी केलेला आहे. त्यात नव्या जुन्या गीतांचा समावेश केलेला आहे. दुसरी आवृत्ती जोरदार मागणीमुळे काहीही बदल न करता, तिसरी आवृत्तीही काहीच बदल न करता १९५८ साली काढली. चौथ्या आवृत्तीच्या वेळी संपादक लॉरन कारनर हयात नव्हते. प्रस्तावनेत त्यांच्या मृत्यूबद्दल शोक व कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आलेली आहे. चौथ्या आवृत्तीचे प्रकाशक ई. सी. कान्रेड, जीवनीवचन साहित्यालय; हे आहेत. या आवृत्तीतही काही फरक नाही.

या पुस्तकात दहा विभागांत दहा विषयांवर भजनी गीते समाविष्ट केलेली आहेत. त्यांत ना. वा. टिळकांची बरीच गीते आहेत.

गीतसंग्रहानंतर ' उपयुक्त गोष्टी ' यामध्ये दहा आज्ञा, दोन आज्ञा, नवीन आज्ञा पवित्रशास्त्रातील मुख्य ओवी, प्रेषितांचा मतांगीकार, प्रभू येशू ख्रिस्ताने शिकविलेली प्रार्थना, सकाळची प्रार्थना, सायंकाळची प्रार्थना, भोजनसमयी करावयाची प्रार्थना, पाच वाक्यात सुवार्ता, ख्रिस्ती होणे म्हणजे काय, पवित्र शास्त्र काय आहे, नैमित्तिक शास्त्रभाग, ज्याला ख्रिस्ती व्हावयाचे असेल त्याला भजनरूपात ख्रिस्त चरित्र, प्रभू जवळ आहे, परमेश्वर माझा मेंढपाळ आहे, ख्रिस्त सण, ख्रिस्ती विधी याबद्दल माहिती दिली आहे.

त्यानंतर गीतांच्या पहिल्या ओळीनुसार उपासना संगीत व गजरसंग्रह यातील क्रमांक देऊन सूची दिलेली आहे.

ख्रिस्ती गाण्यांचा व पोवाड्यांचा संग्रह – संग्राहक– रे. पी. एस्. भोसले

प्रकाशक– टी. एच्. वीरकर, सेक्रेटरी बॉम्बे ट्रॅक्ट ॲंड बुक सोसायटी, मुंबई. श्रीलक्ष्मी नारायण प्रेस, मुंबई २.

या पुस्तकाच्या तीन आवृत्या निघालेल्या दिसतात. पहिली आवृत्ती १९४७, दुसरी १९४९ व तिसरी आवृत्ती १९५१ साली.

पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेमध्ये “ महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील ख्रिस्ती मंडळ्यांच्या गरजा लक्षात घेऊन या पुस्तकातील कोरसांचा संग्रह करण्यात

आला आहे, असे नमूद केले आहे. ज्या रचना-कर्त्यांची रचना आहे, तेवढ्यांची नावे दिलेली आहेत.

दुसऱ्या आवृत्तीत पहिलीपेक्षा रचनांची अधिक भर, पण तिसऱ्या आवृत्तीत अधिक भर घातलेली नाही. पण पुस्तकाला अनुक्रमणिका जोडली आहे.

यात श्री. लिंबाजी एस्. बोरुडे, रे. वि. आ. सत्राळकर, रे. सु. पन्हाळकर, श्री. स. ना. सूर्यवंशी, श्री. सदाशिवराव देठे, श्री. आ. साठे, श्री. सो. स. ठोकळ, श्री. जी. बी. जाधव आदींची गीते समाविष्ट केलेली आहेत. एकूण ६९ गीतांचा संग्रह आहे.

या संग्रहात कोरसगीते, पोवाडे, पाळणे, येशूचा जन्म, दहा आज्ञा, ख्रिस्त-जयंती, ख्रिस्ताचे सरदार, भजने, मरियेचा शोक, पुनरुत्थान, प्राणोत्क्रमण, क्रूसा-वरील सात शब्द इत्यादी विविध विषयांवरील गीते आहेत.

गानसुधा (Gospel Hymns)

संपादन – एस्. व्ही. करमरकर, प्रका. रे. एस्. व्ही. थोरात, बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, लक्ष्मी नारायण प्रेस, २४ वी आवृत्ती १९४९. (शेळके)

या पुस्तकास प्रस्तावना नाही. पण प्रस्तुत पुस्तकाची ही २४ वी आवृत्ती २०००० प्रतींची असून एकूण ३२०००० प्रती आजवर खपल्या असे म्हटले आहे.

यात प्रथम येशूविषयक ६ अभंग व नंतर गीतसंग्रह आहे. एकूण ७५ गीतांचा संग्रह आहे.

गीतांच्या पहिल्या ओळीची पृष्ठक्रमांकानुसार अनुक्रमणिका दिलेली आहे. गीते कुणाची याचा नामनिर्देश नाही.

संगितांझेला

संपादक – जे. एस्. मिरांडा, मांडवी चर्च, मुंबई सी. टी. एस्. मुंबई. इ. स. १९४९.

हे पुस्तक लॅटिन व मराठी भाषेत देवनागरी लिपीत मुद्रित केलेले आहे. त्यात अनेकविध गीतांचा समावेश केलेला आहे. प्रारंभी विदि आववाम, ऑस्पेशस मे, पवित्र मिस्सावलि, मयतार्थ मिस्सा अशी गीते आहेत. नंतर आदवेंत काळी, नाताळकाळी, येशूच्या पवित्र नामास्तव उपासकाळी, पास्खकाळी (Joyous Easter) पेन्तेकास्त काळी, सान्क्रामेस्तात, येशूच्या पवित्र हृदयास्तव, कुमारी मरीयास्तव, देवदूत व पवित्रांस्तव, विविध सद्गीते, मुख्य वेस्पेट, ख्रिस्ती प्रेत-संस्कार इत्यादी अनेक विषयांस, सणकाळात अनुलक्षून गीते आहेत. एकूण १६६ गीतांचा समावेश आहे.

लॅटिन गीताचा एक नमुना पहा—

एकचे पानिस ॲजेलारूम । फास्तुस चीवुस वोआर्तारूम ।
वेरे पानिस पिली ऑरूम । नॉन मीतेन्दुस कानिबुस ॥

गीतांच्या लेखनात, सर्वांनी म्हणावे, दोनदा म्हणावे, म्हणताना सर्वांनी उभे राहावे, सर्वांनी गुडघे टेकावे अशा प्रकारच्या गाणी गायनासाठी सूचना लिहिल्या आहेत.

रोजची सकाळ – संध्याकाळची प्रार्थना

(मूळ लेखक – डॉ. जॉन बेली, भाषांतरकार – पंडित हर्षे, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, चर्च ऑफ स्कॉटलंड मिशन, एन. एम. वाडिया हॉस्पिटलकरिता, डिसें. १९४९. पृ. ७१. (ठोकळ)

A diary of private prayer या प्रो. जॉन बेली यांच्या पुस्तकाचे भाषांतर – विल्सन कॉलेजचे माजी प्रिन्सिपल रे. डॉ. जॉन मॅकेन्झी व त्यांच्या पत्नी यांच्या विनंतीवरून हे भाषांतर केले गेले. पुस्तकात महिन्याच्या एकतीस दिवसांच्या सकाळ – संध्याकाळच्या प्रार्थना दिल्या आहेत. सर्व प्रार्थना गद्यामध्ये आहेत. प्रत्येक प्रार्थना, पुस्तकाचे एक पान, म्हणजे सुमारे तीस ओळींची आहे. प्रत्येक प्रार्थनेत भाव व आशय भक्तीचा असला तरी विषय व शब्द यांत भिन्नता आढळते. नमुना पहिला दिवस–सकाळ.

" हे माझ्या आत्म्याच्या सनातन पित्या, आजच्या दिवशी माझ्या मनात येणारा पहिला विचार तुझ्या संबंधीचाच असो. तुझी आराधना करणे हीच अंतःकरणाची प्रथम स्फूर्ती असो. तुझे नाव हाच मुखातून निघणारा पहिला शब्द असो आणि प्रार्थनेकरीता तुझ्यापुढे गुडघे टेकणे हीच माझी दिवसाची पहिली कृती असो. "

यात कॅनन वसंत डेविड, श्री. शलमोन चव्हाण, डी. के. भोसले, श्री. भास्कर जाधव, रे. वा म. गद्रे, रे. ना. वा. टिळक इत्यादींची गीते समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

संग्रहातील काही गीते मराठी चालीवर तर काही इंग्रजी चालीवर आहेत.

पुस्तकाचे अखेरीस पहिल्या ओळीच्या आद्याक्षरानुसार अकारविल्हान गीतसूची दिली आहे. इंग्रजी भाषांतराने पहिल्या ओळीनुसार सूची सुद्धा दिलेली आहे.

एकूण ६११ गीतांचा हा संग्रह आहे.

खालील विषयवारीने गीते दिलेली आहेत.

सकाळची गीते, संध्याकाळची गीते (मराठी चालीवर)
" " (इंग्रजी चालीवर)

रविवार आगमन समय, ख्रिस्तजयंती, आनंदगीते, संत स्तेफानाचा सण, संत योहान सुवार्तिक, निर्दोषांचा दिवस, ख्रिस्ताच्या सुंतेचा क्षण, नवे वर्ष, एपिकजी, उपवास समय, झांवळयाचा रविवार, पवित्र सप्ताह, लाभ शुक्रवार, पुनरुत्थान,

विनंतीचे दिवस, स्वर्गारोहण, पवित्र आत्मा उतरण्याचा क्षण, पवित्र त्रयाचा रविवार, एंबर दिवस, मिशनऱ्यासाठी, जलमार्गी प्रवास करणारांसाठी, वियोगसमयी, लढाईच्या समयी उपकारस्तुती, पिकासाठी उपकारस्तुती, पावसासाठी, मंदिर समर्पणाचा क्षण, संताचे सण, हुतात्मादिन, पवित्र सहभागिता, पवित्र बाप्तिस्मा, दृढीकरण, पवित्र विवाह, मृतांचे उत्तरकार्य, विविध प्रसंगांसाठी (मराठी चालीवर) विविध गीते (इंग्रजी चालीवर) विशेष प्रसंगासाठी, शिशुगीते, मातृसंघाचे गीत, मिरवणुकीसाठी भारतीय राष्ट्रगीत.

सुवार्तिकांचा सवंगडी – ले. विश्वास आनंद सत्राळकर

मंगळवार पेठ, मिरज, इ. स. १९५१.

(वर्फे)

या पुस्तकात सुवार्तेची रूपरेषा अथवा ख्रिस्तीशास्त्र, पवित्र शास्त्र काय आहे? माणसाचे तारण, ते कोणते, तारणाची गरज काय वगैरे, तसेच पातकाबाबत चर्चा, सुवार्ता सांगण्याची पद्धत, सुवार्ता सांगण्याचे नमुने, देवाचे तारण असे विषय समाविष्ट केलेले आहेत.

सुवार्ता सांगण्याच्या पद्धतीतील रूपरेषा, हप्ते, मजकूर वगैरे सर्व नमुने दिले आहेत.

एक्लेसियेचा गीत संग्रह

प्रका. भास्कर सदानंद जाधव, चिटणीस, भारतीय ख्रिस्ती ज्ञान प्रसारिणी, पुणे. मुद्रक–कर्नाटक मुद्रणालय, मुंबई २. पृ. ३८३

(शेळके)

पहिली आवृत्ती १९५१ व दुसरी आवृत्ती डिसेंबर १९६४.

दुसरी आवृत्ती उपलब्ध, यात पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना दिली आहे. त्यात " ख्रिस्ती महामंडळाचे अनेक सण व विशेष प्रसंग इत्यादींसाठी उचित अशा गीतांचा संग्रह " असे याला म्हटले आहे. दुसऱ्या आवृत्तीत पहिल्या आवृत्तीपेक्षा गीत संख्येत भर घातली आहे व काही दुरुस्त्या केलेल्या आहेत.

मिनिटांचा खेळ — (नवजीवन देणारा अनुभव)

मूळ लेखक फ्रँक सी. लॉबाक, अनुवादक – र. ना. हर्षे, प्रका. मिस् एफ्. एफ्. मास्टर्स, एबी टॉनर्स, पुणे. (जेसुईट फायर्स)

पहिल्या आवृत्तीत पुस्तकाचे नाव " **भारतीय जीवन संदर्भात ख्रिस्ती धर्म** " असे आहे. पहिली आवृत्ती इ. स. १९२९ साली निघाली, दुसरी आवृत्ती १९५२ साली निघाली. पृष्ठ संख्या २९.

" येशू ख्रिस्त हेच जगाचे आशास्थान " हे प्रथम विशद करून सांगितले आहे. अशा येशूची आपल्या दिनक्रमात आपण किती मिनिटे आठवण करतो व आपली किती मिनिटे त्याच्यासाठी खर्च करतो याचा आपण हिशेब करणे आवश्यक

आहे, यातून हे पुस्तक लिहिले गेले.

प्रथम अगदी एक मिनिट दररोज त्याच्या प्रार्थनेत घालविण्याची सवय करावी व हळूहळू मिनिटांचा काळ वाढवत जावा असा हा उपक्रम या पुस्तिकेत सांगितला आहे. या खेळाचा मिळणारा आनंद दिव्यानंद स्वरूपाचा आहे, असे म्हटले आहे.

सामर्थ्यदाता पवित्र आत्मा (पुस्तक दुसरे)

व्यक्तिसेवा आणि चर्चमधील कार्य– लेखक– जे. एफ्. एडवर्डस, प्रका. रे. स्मिथ, सेक्रेटरी बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मनोरंजन प्रेस, मुंबई, पृ. १११. (शेळके).

पुस्तकाच्या प्रारंभीच " पवित्र आत्म्याची प्रार्थना " ही कविता आहे.

सोळा ते सव्वीस या आठवड्यांसाठी केलेले विवरण पुस्तकात ग्रथित केलेले आहे.

प्रत्येक अध्यायाचे शेवटी प्रश्न दिले आहेत, तसेच सर्व अध्यायांचे अखेरीस " सूचना व प्रतिज्ञा " आहेत. सूचनांत जी तत्त्वे कळली नसतील त्या बाबत लेखकाकडे विचारणा करावी व ग्रंथवाचनाने जो अनुभव आला असेल तो कळवावा असा आशय आहे.

ख्रिस्ती धर्माच्या आचरणाबद्दल प्रतिज्ञा आहे.

पुस्तकात साधारणपणे खालील मुद्द्यांवर विवेचन आहे.

ख्रिस्ताचे पाचवे जीवनचरित्र, तुकाराम आणि ख्रिस्ती संदेश, अंतःकरणरूप मंदिरातील जीवन, पापापासून मुक्तता, पवित्रिकरणाच्या आवश्यकतेची खात्री, पवित्र आत्म्याची फळे, पवित्र आत्म्याच्या आशीर्वादाची संपदा, पवित्र आत्म्याची पूर्णता, ही पूर्णता कशी मिळते व कशी टिकते ? वगैरे संबंधीची चर्चा.

त्याशिवाय आद्य ख्रिस्ती धर्माने केलेले थोर सामाजिक कार्य, चर्चवर अर्वाचीन निषेधाचा मारा, पवित्र आत्म्याचे दान प्राप्त झालेले समाजसुधारक, ईश्वरप्रेरित हेतूने परोपकार करणाऱ्या व्यक्ती, सामर्थ्यदायी ख्रिस्ती धर्म व हिंदी सामाजिक सुधारणा, सार्वत्रिक शांतीचा प्रेरक ख्रिस्तीधर्म यासंबंधी माहिती दिली आहे.

अभंग सुवार्ता–

विश्वास आनंद सत्राळकर, प्रकाः ए. प्रे. मिशन रत्नागिरी, श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर पृ. २४.

' अभंग सुवार्ता ' हे एक छोटेसे पुस्तक आहे. यात एकूण ३० अभंग आहेत. पुस्तकास प्रस्तावना वगैरे नाही.

" अभंग सुवार्तेमध्ये सर्व अभंग आहेत. वाटतील त्या चालीवर गावेत " अशी प्रारंभी सूचना आहे.

भाषा सुबोध व आकर्षक आहे. अभंग गेय, वाचनीय व भावपूर्ण आहेत.

प्रार्थनाद्वारे सामर्थ्य—

मूळ लेखक– इ. एम्. बाउण्डस, भाषांतर– वि. आ. सत्राळकर, प्रका. आर. एफ्. कूटर, प्रका. जीवनी वचन साहित्यालय, चाळीसगाव, पूर्व खानदेश

सामर्थ्याचे दैवी माध्यम, सामर्थ्यांचा उगम, माणसांचा सर्वात उत्तम व्यवसाय, माणसाकरिता देवाशी बोलणे, जिव्हाळ्याची प्रार्थना, प्रार्थना करणारी थोर माणसे, सामर्थ्याचे रहस्य, प्रार्थनेद्वारे रहस्य, प्रेषितांची उदाहरणे, देवाची अपेक्षा, आदी मुद्द्यांवर, विषयांची चर्चा केलेली आहे.

आजच्या लोकांत प्रभुप्रार्थनेची तीव्र उणीव दिसून येते. प्रार्थनेत खरे तर सामर्थ्याचा उगम असतो. प्रार्थनेद्वारे लाभणारे मानसिक सामर्थ्य मनुष्याला उदात्त, देवगुणान्वित बनविते. प्रार्थनेपोटी जिव्हाळा हवा, प्रेषितांच्या आयुष्यातील उदाहरणे तसेच अनेक थोर माणसांच्या जीवनातील सामर्थ्यांची उदाहरणे तसेच अनेक थोर माणसांच्या जीवनातील सामर्थ्यांची रहस्ये या दृष्टीने समजून घेतली पाहिजेत व आपले मानसिक सामर्थ्य वाढविले पाहिजे, असा एकूण आशय.

ख्रिस्त जयंती व गीते

लेखक ना. वा. टिळक, संग्राहक – दे. ना. टिळक, नागरिक मुद्रणालय, आग्रा रोड, नासिक १९५३. पृ. १२४ (पॉकेट साईज)

रे. ना. वा. टिळक याच्या भक्तिकाव्यापैकी ख्रिस्तजयंती व नववर्ष या विषयावरील त्यांची सर्व गाणी या छोट्याशा पुस्तकात संग्रहित केलेली आहेत. ही गाणी १८९५ ते १९१९ या कालखंडात रचलेली आहे.

गाण्यातील अवघड शब्दार्थांच्या टीपा तळास दिलेल्या आहेत.

एकूण ६६ गाणी या संग्रहात आहेत. गाण्यांच्या पहिल्या ओळीनुसार अकारविल्ह्याने अनुक्रमणिका दिली आहे.

भक्तिक्रम – लेखक प्र. शि. भोसले

प्रका. मिस्. इंडिया प्राईस, चेअरमन लिटरेचर कमिटी, अमेरिकन मिशन, नागरिक प्रेस, आग्रा रोड, नासिक. पहिली आवृत्ती १९५४ व दुसरी आवृत्ती १९५५ पृ. ४७. (शेळके)

अमेरिकन मराठी मिशनच्या "सुवार्ते"च्या कामातील योजनेनुसार भक्तिक्रम हे छोटेसे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. खेड्यापाड्यांतील ख्रिस्ती मंडळ्यांच्या अशिक्षित स्वयंसेवक पुढाऱ्यांच्या उपदेशाकरिता हे पुस्तक आहे.

पालकांच्या वा कामगारांच्या अभावी ज्या ठिकाणी रविवारच्या उपासना रविवारी होऊ शकत नाहीत, अशा ठिकाणी मंडळ्यांच्या कामगारांना आणि इतर पुढाऱ्यांना देण्यात येणाऱ्या धार्मिक शिक्षणासाठी व उपयोगाकरिता हे पुस्तक आहे.

यात अनेक व निरनिराळ्या गोष्टींचा समावेश करण्यात आलेला आहे.

उदा. रविवारच्या उपासनेचा सर्वसाधारण कार्यक्रम, खेड्यात मृत्यू घडला आहे, पण अंत्यविधीसाठी पालक नाही, अशा वेळेस पुढाऱ्यास उपयोगी कार्यक्रम, जेवणावरच्या प्रार्थना, सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थना, प्रेषिताचा मतांगीकार, निवडक सुवर्णवचने, गाणी, स्तोत्रे अशा सर्व गोष्टी यात दिल्या आहेत.

दुसऱ्या आवृत्तीत ' सुवर्णवचनां 'ची भर घालण्यात आली आहे. टाईप मोठा वापरला आहे. काही ठिकाणी तळास कठीण शब्दाचे अर्थ दिलेले आहेत.

रोजची आध्यात्मिक प्रगती – लेखक भा. पां. हिवाळे.

प्रका. भा. पां. हिवाळे, उषा मुद्रणालय, अहमदनगर १९५४ (ठोकळ).

प्रस्तुत पुस्तिका रे. जे. एफ्. एडवर्डस यांना अर्पण केलेली असून पुस्तकाला लेखकाची प्रस्तावना आहे.

पद्धतशीर प्रार्थना कशी करावी याविषयी लेखकाने स्पष्टीकरण दिलेले आहे.

प्रार्थना कोठे करावी, केव्हा करावी, मनाची एकाग्रता, ईश्वराच्या आध्यात्मिक दर्शनाची अपेक्षा, यशस्वी प्रार्थनेची खूण हे मुद्दे लक्षात घेऊन विषय मांडला आहे.

मननाकरिता पाठांत – योहानचे 'शुभवर्तमान' दिले आहे. भक्तिरसाची गाणी, आराधना, पश्चात्तापाच्या प्रार्थना, बायबलातील थोर विचार दिले आहेत.

मंगल चिंतन– लेखक पंडित ना. ल. हर्षे.

प्रका. सुमंत दयानंद करंदीकर, सेक्रेटरी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, जून १९५७. (पटवर्धन संग्रह)

अर्पण पत्रिकेत लेखकाच्या आजारीपणाच्या काळात वाडिया हॉस्पिटलचे चालक डॉ. जी. के. गोखले व त्यांचे सहकारी व कर्मचारी यांनी केलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. पुस्तकाला प्रस्तावना डॉ. जी. के. गोखले यांची आहे.

महिन्याच्या प्रत्येक दिवशी करावयाचे एक एक चिंतन अशी ३१ मंगल चिंतने प्रस्तुत पुस्तकात आहेत.

मत्तय, योहान, लुक, मार्क इत्यादीमधील वचने (मराठी भाषांतरे) उद्धृत केलेली आहेत. त्या अनुषंगाने एकेका उताऱ्यात अर्थस्पष्टीकरणात्मक उपदेशात्मक विवेचन आहे. बऱ्याचशा उताऱ्यात आशयास अनुकूल अशी उपासना संगीतातील गीते दिली आहेत. तसेच प्रत्येक उताऱ्याच्या शेवटी त्यांतील आशयास अनुकूल अशी उपासना संगीतातील गीते दिली आहेत. तसेच प्रत्येक उताऱ्याच्या शेवटी त्यांतील आशयास अनुलक्षून प्रार्थना काय करावी तेही सांगितलेले आहे.

नमुन्यादाखल – मंगल चिंतन दिनांक-१.

" मी तर तुम्हास सांगतो की तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रेम करा. आणि जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. (मत्तय ५-४४) आठवले कृत

ख्रिस्ती संदेश सामग्री व उपदेश पद्धतीचें तंत्र

लेखक – प्र. शि. भोसले, प्रका. प्र. शि. भोसले, चेअरमन, ख्रिश्चन लिटरेचर कमिटी, अमेरिकन मराठी मिशन, अहमदनगर, नागरिक मुद्रणालय, नासिक.

पृ- १५८

खेड्यातील ख्रिस्ती मंडळ्यातील कारभाऱ्यांच्या व अशिक्षित पुढाऱ्यांच्या उपयोगासाठी तयार केलेले पुस्तक.

अमेरिकन मिशनने आखलेल्या योजनेनुसार हे पुस्तक तयार केलेले आहे. पुस्तकांचे एकूण पाच विभाग केलेले आहेत.

भाग १ ला उपदेश पद्धतीचे तंत्र.

भाग २ रा उपदेशाचे पाठ.

भाग ३ रा येशूने दिलेल्या काही दाखल्यातील महत्त्वाचे शिक्षण, पवित्र शास्त्रातील काही महत्त्वाच्या गोष्टीचे शिक्षण.

भाग ४ था उपदेशासाठी उपयुक्त वचने, शास्त्रभाग, विषय.

भाग ५ वा उपदेशासाठी काही उपयुक्त उदाहरणे.

उपदेश पद्धतीचे तंत्र सांगताना– उपदेश म्हणजे काय? उपदेशाचा हेतू, उपदेशाची गरज, उपदेशाचा उगम, उपदेशाचे सार, उपदेशाचे प्रकार, शास्त्र भागावरून, प्रतीकावरून, विषयावरून उपदेश तयार कसे करावे, आत्मविश्वास, धैर्य, निराश न होणे, व्यक्तिमत्त्व राखून समोरचा समाज पाहून हावभाव, आवाज, स्वतःस विसरून– अशी सर्व माहिती दिलेली आहे.

सर्व भागातील मजकूर सविस्तर तपशिलासह दिला आहे.

सन्मार्गधारण–

प्रका. सेंट पॅट्रिक्स प्रेस, पुणे १. आवृत्ती दुसरी, १९५८, पृ. २२८ (शेळके)

सन्मार्गाची मुख्य साधने, ध्यान लागणे, ध्यान तुरा, आत्म्याचा आरसा, सकाळच्या प्रार्थना, 'पवित्र मिस्साची' भक्ती, जेवणापूर्वी व नंतर प्रार्थना, रोझरीची प्रार्थना, क्रूसाच्या वाटेची भक्ती, सांक्रामेंताची भेट घेणे, रात्री झोपताना प्रार्थना व मिस्साची सेवा या विविध मथळ्यांखाली लिहिलेला मजकूर या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे.

मननमाला– भाषांतरकार– येशूदास, (संपादक– गुदिअर)

प्रका. गेरार्द बादर एस्. जे. २००४, सेंट व्हिन्सेट स्ट्रीट, पुणे, १९५९, पृ. स. ४०. (जेसुईट फादर्स, अहमदनगर)

परमेश्वराचे अस्तित्व, परमेश्वर आणि मी, जीवनाचा उपयोग, पाप, पश्चात्ताप, निश्चय, हांव, स्वात्मार्पण, येशू ख्रिस्ताचे अस्तित्व, मारिया जन्म, येशू आणि पापी मनुष्य, दैवी उपदेश, तो कार्यच्युत झाला नाही, कार्यच्युत न होणे, ज्ञान, एक ध्येय,

बंदिवान येशू, येशू क्रूसावर, अमूल्य रक्त, शिक्षेच्या क्षमेबद्दल प्रार्थना, प्रीतीचे रहस्य, येशूचे अतिपवित्र हृदय.

या विषयास अनुलक्षून " मनने " दिली आहेत. ही मनने म्हणजे लयबद्ध वाक्यसमूह आहेत. अशी एकूण २४ मनने आहेत.

या मननमालेचा उपयोग कसा करावा याविषयी सूचनावजा माहिती दिलेली आहे.

ख्रिस्ती गीते –

प्रका. एडवर्ड एफ्. जेली, ख्रिश्चन हिमनल्, बाप्तिस्ट मिशन, वांबोरी, अहमदनगर. मुद्रण– उषा प्रेस, १९६०. पृ. ४८

पुस्तकाला दोन शब्द डी. एस्. हिवाळे यांनी लिहिले आहेत, पुस्तकांत एकूण ५० गीतांचा संग्रह आहे. यादीत गीतांच्या पहिल्या ओळी दिल्या आहेत.

पंधरा मिनिटांची समाईक उपासना–

संग्रा. शां. ल. साळवी, प्रका. शां. ल. साळवी, अहमदनगर, मुद्रक– न्याय सिंधु प्रिंटर्स.

पुस्तकाला लिहिलेल्या खुलाशात पुस्तक लेखनामागील उद्देश, उपासनेची मुख्य अंगे योजनासंबंधी निवेदने आहेत.

सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार व रविवार या वारांसाठी रोजी पंधरा मिनिटांचा काल लागेल अशी उपासना यात दिलेली आहे.

प्रार्थना, शास्त्रवचने, संदेश, इत्यादींचा उपासनेत समावेश केलेला आहे.

वसंतोपवास व पवित्र सप्ताह– देव प्रसाद ?

प्रकाशक– देवप्रसाद, रे. डी. के. शिंदे, नाशिक, पुस्तकाचा कालोल्लेख नाही.

देवप्रसादने पुस्तक लिहिण्याची प्रेरणा झाली, प्रस्तावनेखाली देवप्रसाद असे नाव. ३० डिसें. १८९९ साली ख्रिस्तवासी झालेल्या मातुश्रीस पुस्तक अर्पण.

उपोद्घातांत एक्लेसियेनुसार धार्मिक व आत्मिक जीवनाची धारणा, समजूत वगैरे संबंधीची माहिती आहे.

वसंतोपवासासंबंधी विषयप्रवेशात माहिती दिली आहे. ध्वजा– रविवार, महा गुरुवार– दानधर्माचा गुरुवार, शुभ शुक्रवार, याविषयी माहिती आहे.

दुसऱ्या भागांत वसंतोपवासाचे काळात प्रवचनमालांचे निवेदन आहे. तिसऱ्या भागांत– ' पवित्र सप्ताहां'तील घडलेल्या गोष्टींचा कालानुक्रम, प्रभुचे दुःखसहन वगैरे माहिती आहे. चौथ्या भागांत– प्रार्थनेसाठी येणाऱ्या लोकांस सूचना, प्रार्थना गीते, प्रवचने, सात उद्‌गारांवर उपसंहार इत्यादींचा समावेश आहे.

साधारण प्रार्थना पुरवणी –

प्रका. भास्कर सदानंद जाधव, भारतीय ख्रिस्ती ज्ञानप्रसारिणीकरिता, वासवानी कुंज, मुद्रक आर्यभूषण मुद्रणालय, पुणे. पृ. ८५

The book is suppliment to the book common Prayer (1960) in Marathi (selected portion only) Published by I. S. P. K. in 1971.

यात अनेकविध प्रार्थनांचा संग्रह आहे. त्याची (१) सर्वसाधारण प्रार्थना (२) विशिष्ट प्रसंगासाठी प्रार्थना (३) 'सुवार्ताप्रसारक' विषयक प्रार्थना (४) संत मंडळी करिता केव्हाही म्हणण्याकरिता प्रार्थना अशी मांडणी केलेली आहे.

प्रकरण ३ रे

ख्रिस्ती धर्मप्रसाराचा इतिहास

ख्रिस्ती मराठी धर्मप्रसार विषयक ग्रंथाची माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

ख्रिस्ती शास्त्र ईश्वरदत्त आहे या विषयी इतिहासावरून घेतलेली प्रमाणे–

प्रका.– बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, अमेरिकन मिशन प्रेस, १८५६ पृ. ८२ (हिवाळे).

पुस्तकात एकूण आठ अध्याय आहेत.

मनुष्याची उत्पत्ती, त्याचे श्रेष्ठत्व, त्यास निर्माण करणाऱ्या ईश्वराचा हेतू कोणता, शास्त्री-पंडितांच्या मताप्रमाणे, इतर लोकांच्या मताप्रमाणे कोणते मत खरे, मनुष्याच्या पापरूप स्थितीत ईश्वराची ओळख कशी होईल, निरनिराळे धर्म– कोणता धर्म खरा, याविषयी बोध घेण्याचा प्रयत्न या अध्यायात केलेला आहे.

लोक योग्य कारण नसताना विश्वास ठेवतात व योग्य कारण असताना ठेवीत नाहीत. आपले बहुतेक ज्ञान ऐकीव असते. ऐकीव गोष्टींवरून आपण फसतो. सर्वच ऐकीव गोष्टी फसविणाऱ्या नसतात. विश्वास बसण्याचे नियम कोणते ?

ख्रिस्ती शास्त्राचे मुख्य भाग, त्यातील पुस्तके, ती कोणी लिहिली ? त्यास प्रमाणे कोणती ? केव्हा लिहिली ? त्यास प्रमाणे काय ? नव्या करारास प्रमाण, भाषांतरावरून जुन्या करारास व हस्तलेखावरून प्राचीन ग्रंथकर्त्यांची साक्ष, नव्या कराराचा खरेपणा, प्रत्यक्ष साक्षी, ख्रिस्तानुयायी लोकांची साक्ष, ख्रिस्ती धर्माच्या शत्रूंची साक्ष, यहुदी ग्रंथकर्ते, मूर्तिपूजक ग्रंथकर्ते, इतिहासकर्ते, रोमी सुभेदार, रोमी बादशहा, जुन्या कराराचा खरेपणा, त्याबाबत नव्या कराराची साक्ष, निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांच्या लेखनाच्या साक्षी, भविष्यवादी व भविष्याची पूर्ण प्राचीन लोकांची साक्ष.

ख्रिस्ती शास्त्राचे अवलोकन, नव्या कराराचा मजकूर, संक्षेप, पुस्तकांच्या खुणा, ख्रिस्ती शास्त्रातील फेरफार, पाखंडमती, प्राचीन लेखाची साम्यता – प्राचीन भाषांतराची साम्यता – निरनिराळ्या ग्रंथकारांचे लेखनाची साम्यता, हे ग्रंथकार कोण ? ख्रिस्तीशास्त्राची विश्वासार्हता-असा आशय या पुस्तकात आहे.

पवित्र शास्त्रातील इतिहास

बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी; मुद्रक – एज्युकेशन सोसायटीचा छापखाना मुंबई १८७३. पृ. १२+३+८१+२ (दासू)

रे. सी. एफ्. स्वार्त्सकृत जर्मन ग्रंथावरून शास्त्राप्रमाणे कथिला आणि

टीकारूपाने स्पष्ट केला आहे.

अमेरिकन मराठी मिशन यासंबंधी मंडळ्यांची संक्षिप्त बखर

रे. रा. वि. मोडक, प्रका. – १८८१ च्या वार्षिक योबेल सभेसाठी, ऑर्फनेज प्रेस, १८८३ पृ. ८+१५८. (हिवाळे)

या इतिहासात ज्या मुख्य गोष्टींचे विवेचन केले आहे त्या पुढीलप्रमाणे —

प्रस्तावनेत या महाराष्ट्र देशांत या मिशनचे पहिले ठाणे सन १८१३ मध्ये मुंबईत स्थापित होऊन शुभवर्तमान प्रसाराचे काम आरंभले. नंतर या मिशनाची एक शाखा अहमदनगर येथे सन १८३१ मध्ये स्थापित होऊन इकडेही शुभवर्तन प्रसाराचे काम आरंभले असता मुंबईतील या मिशनरी मंडळीची शाखा अशी एक मंडळी नगरास तारीख ३१ डिसेंबर १८३१ मध्ये स्थापित झाली आणि जे इकडे शुभवर्तमानावर विश्वास ठेवून ख्रिस्ती होऊ लागले, त्यास प्रथमच याच मंडळीत बाप्तिस्मा देऊन घेण्यास आरंभ केला. पुढे या मंडळीत सात-आठ एतद्देशीय मनुष्ये बाप्तिस्मा घेऊन मिळाल्यावर त्या सर्वांची तारीख ६ मार्च १८३३ रोजी अहमदनगरास अमेरिकन मिशन ख्रिस्ती मंडळी प्रथमच स्थापित झाली.

प्रकरण पहिले

सन १८३१ मध्ये मुंबई अमेरिकन मिशन मंडळीतला एक एतद्देशीय ख्रिस्त भाऊ जो नगरास येऊन राहिला त्याला नगर मंडळातील प्रथमचा एतद्देशीय ख्रिस्ती धरून पुढे १८३२ सालापासून सन १८५४ पर्यंत ह्या अहमदनगर अमेरिकन मिशन मंडळात साल दरसाल जे ख्रिस्ती झाले त्यांची संख्या दिली आहे.

इ. स. १८५४ पासूनच्या मिशनात अनेक वेगवेगळ्या मंडळ्या स्थापन झाल्या. त्यावर एतद्देशीय पालक नेमण्याचा क्रम जो चालला त्याचे वर्णन केले आहे. इ. स. १८५५ पासून १८८१ पर्यंत ह्या अनेक मंडळ्यांमध्ये ख्रिस्ती मनुष्यांची जी संख्यावृद्धी होत गेली ती दाखविली आहे. सन १८५५ पासून १८८१ पर्यंतच्या काळात मिशन मंडळ्यांची जी विशेष समृद्धी झाली त्याला कोणती कारणे घडली ते स्पष्ट केले आहे.

दुसऱ्या प्रकरणात मंडळ्यांतील अंतर्गत रचना व सुस्थिती आणण्यासाठी काय केले त्याचा ऊहापोह केला आहे. या मंडळातील लोकांच्या मानसिक सुधारणे-साठी व विद्याअभिवृद्धीसाठी कोणते उपाय केले गेले यासंबंधीचे विवरण केले आहे, तिसऱ्या प्रकरणात. चौथ्या प्रकरणात – वार्षिक सभा, ख्रिस्ती कीर्तने, मंडळ्यांच्या ऐक्याची सभा इ. असाधारण व नैमित्तिक साधने, ह्या मंडळ्यांची खर्चाचे बाबतींत आजवर जी स्वतंत्रता राहिली ती कशामुळे व पुढे या बाबतीत मंडळ्या स्वतंत्र होण्याचे चालविलेले उपाय.

पाचव्या प्रकरणात – आमच्या मंडळयांत नीच मानलेल्या जातीतले लोकांचा सर्वांहून मोठा भरणा असून उंच म्हटलेल्या ज्ञातीतले फार थोडे का ? या संबंधी प्रश्न उभा केला आहे. हे उंच जातीतील जे या मंडळयांत मिळाले त्यांच्या कांहींच्या खिस्ती होण्याच्या चित्तवेधक गोष्टी सांगितल्या आहेत.

सहाव्या प्रकरणात– वेगवेगळया मनाच्या खिस्ती कामदारांकडून मंडळाच्य वृद्धीस व सुधारण्यास आलेले व्यत्यय निदर्शनास आणले आहेत. तसेच या मंडळास मिळालेल्या एतद्देशीय खिस्त्यांचे पाठलाग कसे व किती झाले व त्यांचा परिणाम विशद केला आहे. सातव्या प्रकरणात व आठव्या प्रकरणात एतद्देशी खिस्ती लोकांचे पाठलागाने हरण झालेले कोणते हक्क इंग्लिश सरकारने देवविले. अशा कित्येक विषयांची माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

पहिल्या तीन शतकांतील खिस्ती मंडळींच्या अंतर्गत इतिहासाची अंगे–

बाबा पद्मनजी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, जॉईंट स्टॉक प्रेस, मुंबई, १८९२, पृ. ४ + ५४ (हिवाळे)

प्रस्तुत पुस्तक म्हणजे बाबांनी दिलेले एक भाषण आहे. पुढे पुस्तक रूपाने छापले.

प्रथमारंभीचे बारा प्रेषित हेच खिस्ती मंडळीमध्ये होते. ही मंडळी खिस्ताच्या स्वर्गारोहणानंतर काही काळ यरूशलेमात होती. म्हणून पहिली खिस्त मंडळी यरूशलेमचीच होय असे मत मांडून त्यांनी इतिहास कथनास प्रारंभ केला आहे. पुढे त्यांची धर्ममते व धर्मशिक्षण, गृहस्थिती, खिस्ती कुटुंब, दानधर्म, ईश्वरभक्ती, मंडळीतील प्रार्थना, भजनालये, नाटके इत्यादींची माहिती सारांशरूपाने दिली आहे. खिस्ती धर्माची स्थापना ही जगातील घडामोडीत एक आश्चर्यकारक घटना आहे, असेही मत अखेरीस मांडले आहे.

म्याक्लोअरकृत जुन्या करारांतील संक्षिप्त इतिहास–

भाषांतर – फ्रँक्लीन बेल, प्रका.– फ्रँक्लीन बेल, खिस्ती – ज्ञानप्रसारक सभेकरिता, अहमदनगर छापखाना, १८९८, दुसरी आवृत्ती १९१५ पृ. १७४, (हिवाळे) पृ. ६ + १७४. Old Testament History by Rev. Maclear D. D.

या पुस्तकाचे हे भाषांतर, दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशक– Rev. J. Henry Lord, Hon. Secretary For The Society for Promoting Christian Knowledge.

या पुस्तकात–

(१) ‘ उत्पत्तीपासून मनुष्य जातीच्या पांगण्यापर्यंत ’ या प्रकरणात पहिल्या अध्यायात पृथ्वीची उत्पत्ती, मनुष्याची उत्पत्ती, आदाम आणि हाव्वा, बरेवाईट जाणण्याचे झाड, माणसाचा मोह, पापात पडणे, तारणाऱ्या विषयीचे पहिले वचन,

याविषयी मजकूर आहे. दुसरा अध्याय– आदाम एदेन बाग सोडतो. काईन व हाबेल या दोन पुत्रांविषयी, काईनाची संतती, सेथाचे वंशज, मनुष्याचे दुष्टपण – जलप्रलयाची सूचना, नोहा एकटा तारणामुळे वाचला.

तिसऱ्या अध्यायात– मेधमनुष्यांचा करार, नोहाचे भविष्य – बाबेळाचे बांधणे नोहाच्या वंशजाची यादी, चवथ्या अध्यायात – निमरॉड, मूर्तिपूजेचा फैलाव, इयोब, इयोबाची परीक्षा, इयोबाचे मित्र या विषयी मजकूर आहे.

पूर्वजांचा काळ– या दुसऱ्या प्रकरणात सहा अध्याय आहेत.

यात याकोब मिसरात जातो, याकोबाचे मरण, प्रेतक्रिया, योसेफाचे मरण पर्यंतचा मजकूर येतो. तिसऱ्या प्रकरणात– मिसर देशांत इस्राएल लोकांनी वस्ती केल्यापासून त्यांना नेमशास्त्र मिळाल्यापर्यंतचा काळ विचारात घेतला आहे. या प्रकरणात चार अध्याय आहेत. चौथ्या प्रकरणात– सीना डोंगराहून निघाल्यापासून योशाच्या मरणापर्यंतचा आशय सांगितला आहे. यात चार अध्याय आहेत. पाचवे प्रकरण– यहोशबा आणि पश्चिम पालेस्टाईन देशाचे जिंकणे या संबंधीचे आहे. हे सर्व तीन अध्यायांत सांगितले आहे. सहावे प्रकरण न्यायाधीशांचा काळ असे आहे. त्यात पाच अध्याय आहेत. शामशोनाच्या मृत्यूपर्यंतची हकीकत यात आली आहे. सातव्या प्रकरणात– शमुवेलाच्या काळापासून दाविदाच्या गादीवर बसण्यापर्यंतची हकीकत पाच अध्यायात येते. दाविद शलोमोन ह्यांची कारकीर्द आठव्या प्रकरणात सहा अध्यायांत सांगितली आहे. नवव्या प्रकरणात यहुदा व इस्रायल यांची राज्ये यासंबंधीचा तपशील तीन अध्यायांत सांगितला आहे. दहाव्या प्रकरणात जुन्या कराराच्या अखेरपर्यंतचा मजकूर येतो. त्यात चार अध्याय आहेत.

अखेरीस मूळ पूर्वज आणि त्यांचे 'वंशज' लेवी आणि याचक वर्ग यांच्या वंशावळी. यहुदाचे व इस्रायलचे राजे व त्यांचा काळ याचा तक्ता, भविष्यवादी यांचे कोष्टक हे दिलेले आहे.

खोदीव लेखांची साक्ष अथवा अर्वाचीन काळच्या शोधांकडून जुन्या कराराचे स्पष्टीकरण–

लेखक – सावरकर दिगंबर शंकर, प्रका.– बॉंबे ट्रॅक्ट ॲण्ड बुकसोसायटी, निर्णयसागर, १९०३. पृ. ८ + २१०

विश्वबंधुत्व अथवा योनाच्या पुस्तकाची शिकवण—

रे. इ. डब्ल्यू फेल्ट, प्रकाशक – रे. दि. शं. सावरकर, एल्. सी. ई. मराठी लिटरेचर मिशनरी, रास्तापेठ, पुणे, ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, १९२५. (आ. १ ली. पृ. ६४.)

या योना चरित्रात उल्लेखिलेल्या स्थळांचा नकाशा प्रारंभीच दिलेला आहे.

त्यानंतर ॲसीरीयन लोकांनी यरूशालेम शहराचा नाश केल्यापासून शिकंदर बादशहाने इराण देश जिंकून घेतल्यापर्यंतच्या मुदतीचा इस्रायल राष्ट्राचा कालानुक्रम.

पुस्तकाचे लेखन तीन भागांत आहे–

पहिल्या भागात– विषयाचे सामान्य स्वरूप. योनाच्या पुस्तकाविषयी गैरसमजूत. त्याबाबतची दोन मते. हिंदवासीय खिस्ती लोक, व हिंदी राष्ट्र ह्यांना या पुस्तकापासून शिकण्यासारखे काय आहे ? पुस्तकाचा लेखक, त्याचा काळ, अमित यांचा पुत्र योना याची कामगिरी, इस्राएल लोकांचा दास्यातील काळ, त्या बाबत इतिहासाचे धागे, यरूशलेम शहराचा नाश व इस्राएल लोकांचा बंदिवास, पर्शियन लोकांची कारकीर्द, बॅबिलोन शहराचा नाश, धर्मजागृती, ग्रीकांची कारकीर्द, परराष्ट्रांच्या उद्धारार्थ सहन करणारा देशसेवक, त्यांचे कार्य इत्यादी माहिती.

दुसऱ्या भागात– योनाचे चरित्र सविस्तर दिले आहे. तिसऱ्या भागात– योनाचा संदेश सांगितला आहे. देव सर्व लोकांवर प्रेम करतो, दुर्बल गरजवंत माणसे, मुले, मुकी जनावरे वगैरेकडे देवाचे लक्ष असते वगैरे. या शिकवणीतून विश्वबंधुत्वाचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

प्रत्येक प्रकरणाचे अखेरीस क्लिष्ट संदर्भाची स्पष्टीकरणे, अभ्यासाकरिता सूचना व प्रश्न आहेत.

इस्राएल, एडवर्ड. ए. ॲनेट, सुमंत दयानंद करंदीकर, बाँबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी. माकनी प्रिंटिंग प्रेस, प्रॉक्टर रोड, मुंबई–७. प्रथमावृत्ती १९३०, पृ. १३२ (जेसुईट फादर्स) दुसरी आवृ. १९७३.

पवित्र भूमीविषयी हे पुस्तक असून दुसऱ्या म्हणजे १९७३ च्या आवृत्तीत पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना दिली आहे. तीत म्हटले आहे की बायबल मधील कथा शिकवत असताना त्या ज्या भूमीवर घडल्या त्या भूमीसंबंधी माहिती असणे आवश्यक आहे. म्हणून मुख्यत्वे शिक्षकांसाठी हे पुस्तक तयार केलेले आहे. हे पुस्तक तयार करताना (१) पवित्र भूमीचा ऐतिहासिक भूगोल सर जॉर्ज ॲडम स्मिथ. (२) यरूशलेम– २ भाग सर जॉर्ज ॲडम स्मिथ. (३) इस्राएलची भूमी– डॉ. आर. एल्. स्टेवर्ड या तीन ग्रंथांचा उपयोग झाल्याचे नमूद केले आहे.

दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत प्रस्तावनाकार फ्रेंड रॉथ म्हणतात की ' पॅलेस्टाई देवाच्या पसंतीची भूमी ' हे पुस्तक अनेक वर्षांपासून उपलब्ध नाही. म्हणून दुसऱ्या आवृत्तीची गरज भासली. १९३० नंतर पुष्कळ घडामोडी घडल्या. त्यानुसार योग्य त्या सुधारणा करून प्रस्तुत आवृत्ती काढली आहे. देवाने निवडलेल्या राष्ट्राविषयी माहिती देणारे हे पुस्तक आहे. पॅलेस्टाईन देशाची भौगोलिक माहिती यात दिली आहे.

पॅलेस्टाईनमधील प्राचीन रहिवासी, समुद्रालगतचे मैदान गालील, इज्रेलचे खोरे, शोमेरेन प्रांत, यहुदीचा प्रांत, यरूशलेमातील मंदिरे, योदेनचे खोरे, योदेन

पलीकडचा मुलुख इतक्या अंगांनी ही भौगोलिक माहिती सविस्तर दिली आहे.

प्रत्येक प्रकरणाचे शेवटी प्रश्न व अध्ययनाचे विषय दिले आहेत.

देवाच्या पसंतीची भूमी अर्थात पॅलेस्टाईन देश—

लेखक– ॲनेट एडवर्ड ए, प्रकाशक मराठी लिटरेचर कमिटी, मुंबई. श्री. लक्ष्मीनारायण मुंबई १९३०, पृ. ८ + ११८

नव्या व जुन्या कराराचा शास्त्र इतिहास – रे. एच्. डोअरिंग,

प्रका.– इक्झामिनर प्रेस, मुंबई १९३०, पृ. ४२९. (दासू)

ख्रिस्ती महामंडळाचा इतिहास – प्रो. ए. सी. झेनोस, दि रिलीजस बुक डेपो सेन्टेनरी चर्च, ग्रँट रोड, मुंबई ७. तत्त्वविवेचक प्रेस, १९३१ (ठोकळ)

प्रो. ए. सी. झेनोक्त Compendium of Church History

या ग्रंथाचे भाषांतर. जॉन डिविट यांची १२ जुलै १८९६ तारीख असलेली प्रस्तावना. पवित्र रोमी साम्राज्य, स्टॅडेनेव्हियन व स्लाव लोकांचे ख्रिस्तीकरण, वादाचे विषय आणि फाटाफुटी, मध्ययुगीन चर्चमधला आयुष्यक्रम, पोपसत्ता व सम्राटसत्ता यांचा झगडा, क्रुसेडस धर्म युद्धे, म. संप्रदाय, तार्किक सिद्धान्तवाद, पोपच्या सत्तेची उतरती कळा. वाङ्मय आणि तत्त्वज्ञान, पारमार्थिक जिणे ह्या विषयांचा विचार झाला आहे.

तिसरा खंड इ. स. १५१७ पासून पुढील काळाचा आहे. यामध्ये धर्म-सुधारणेचा उदय, धर्मसुधारणेचा विस्तार, धर्मसुधारणेच्या विरुद्ध चळवळ, युरोपातील प्रोटेस्टंट पंथाचे झगडे, इंग्लंड व स्कॉटलंड या देशातील ख्रिस्ती मंडळे, प्रोटेस्टंट पंथी, ईश्वर परिज्ञानाची परिणती, राजकीय उलथापालथी, लूथरपंथी शास्त्र, मार्गवलंबन आंग्लिकन व सुधारलेली ख्रिस्ती मंडळे, तत्त्वज्ञान व ईश्वरीविद्या, क्वेकर व मेथाडिस्ट पंथी लोक, एकोणिसाव्या शतकातील नवीन परिस्थिती, एकोणिसाव्या शतकातील रोमन कॅथॉलिक चर्च, एकोणिसाव्या शतकातील प्रॉटेस्टंट पंथ, वसाहतीच्या मन्वतरा-तील अमेरिकेतले चर्च या विषयांवर लिहिले आहे. शेवटी अकारविल्ह्याने विषय सूची आहे. एक परिशिष्ट असून त्यात रे. फादर मूअर यांची आधुनिक काळा-तील चर्चच्या इतिहासास जोडलेली टिपणे आहेत.

एकूण पृष्ठ १० + २ + ३६६ + १६ अशी आहेत.

त्यात धर्म, धर्माचे महत्त्व, धर्माचा इतिहास, धर्माच्या इतिहासाचे अध्ययन कसे करता येईल इत्यादी विषयांवर थोडक्यात विचार मांडले आहेत.

उपोद्घातात सर्वसाधारणपणे इतिहास म्हणजे काय ? चर्चचा इतिहास, ख्रिस्ती महामंडळाचा इतिहास, दृश्य व अदृश्य ख्रिस्ती चर्च, चर्चचा इतिहास व जगाचा व्यावहारिक इतिहास, इतिहासाच्या अध्ययनाचे फायदे, चर्चच्या इतिहासाचे स्थूल

भाग व त्याचे पोटभाग या विषयी माहिती दिली आहे.

पहिला खंड इ. स. पूर्व ४ ते इ. स. ५९० एवढ्या काळाचा आहे. त्यामध्ये त्यावेळचीं जगाची स्थिती, चर्चची स्थापना, प्रेषिताचे युग, प्रेषितीय छायेखालचा काळ, अॅन्टीनायरसीन, निकेच्या कौन्सिल पूर्वीचा कालखंड, निकेच्या कौन्सिलापूर्वीची खिस्ती विचारसरणी, धर्मसत्तेची अभिवृद्धी, निकेच्या कौन्सिलच्या काळातील धर्मसत्ता व राज्यसत्ता, धर्माधिपत्य आणि अधिकार सूत्रे, ईश्वर परिज्ञान आणि धार्मिकवाद, निकेची कौन्सिल व तदनंतरच्या संस्था या विषयीची माहिती या खंडात आहे.

दुसरा खंड मध्ययुगाच्या इ. स. ५९० ते १५१७ या काळाबद्दल आहे. या मध्ये मध्ययुगाचे सामान्य स्वरूप, पूर्वेकडील चर्च, पश्चिमेकडील चर्च व फ्रॅंक लोकांचे राज्य, व न्यूटनांचे खिस्तीकरण, पश्चिमेकडील धर्मविचार इ. पोपचे पीठ व पवित्र रोमी.

अमेरिकन मराठी मिशनची मिशन जयंती-स्मरण मनन

लेखन :- रे. शां. ल. साळवी.

प्रकाशक :- रे. शां. ल. साळवी, अमेरिकन मराठी मिशन इव्हान्जेलिस्टिक कमिटी करीता. मुद्रणस्थळ – सुदर्शन प्रेस, अहमदनगर इ. स. १९३२ पृ. १८ किंमत १ आणा. (हिवाळे संग्रह)

प्रस्तुत छोटेसे १८ पानी पुस्तक प्रसिद्ध करण्याचा हेतू-पुष्कळांस अमेरिकन मराठी मिशनच्या मूळ पीठीकेचा असावा तितका परिचय नसेल आणि असला तरी त्या दिवशी प्रारंभीच्या मिशनऱ्यांचे काही अमोल व अगम्य असे अनुभव नजरेसमोर आणावेत व विशेषतः खेड्यापाड्यातील कामदार व त्यांचे सभोवार जमणारी ' मंडळी ' यास मिशनच्या प्रारंभीच्या काही गोष्टींचे स्मरण करता यावे म्हणून ही पत्रिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. खिस्ताच्या अलौकिक प्रेमाने बद्ध झालेल्या अमेरिकन खिस्त शिष्यांनी पृथ्वीला वळसा घालून ११ फेब्रु. १८१३ रोजी हिंदुस्थानात (पृथ्वीच्या शेवटापर्यंत) स्वतःस प्रभूची आज्ञा म्हणून शुभवर्तमान प्रसारासाठी दाखल केले. अमेरिकन बोर्ड व अमेरिकन मराठी मिशन ही प्रभूच्या आज्ञेच्या (प्रेषित १ : ८) विलक्षण प्रभावाची उदाहरणे होत.

इ. स. १८०६ मध्ये अमेरिकेतील मासाच्युसेट संस्थानातील एका ईश्वर विज्ञानपीठशाळेत काही धार्मिक व आस्थेवाईक तरुणांचा संघ जमला. या संघाने प्रभूच्या आज्ञेनुसार प्रभूची शिकवण पृथ्वीच्या शेवटापर्यंत नेण्याची प्रतिज्ञा केली. इ. स. १८१० मध्ये या संघाचे खासगी स्वरूप बदलून आजच्या अमेरिकन बोर्ड ऑफ कमिशनर्स फॉर फॉरिन मिशन्स याचे प्रारंभीचे स्वरूप मिळाले. या बोर्डामार्फत गार्डन हॉल, श्यामुएल नॉट, स्यामुएल न्यूवेल अडोरिअन जडसन आणि

ल्यूथर राईस हे पाच धाडसी तरुण मिशनरी म्हणून १८१२ त हिंदुस्थानात आले.

" त्यावेळेस ब्रिटिशांच्या कंपनी सरकारकडून या अमेरिकनांना खूप विरोध झाला. अमेरिका व इंग्लंड यांचे संबं बिघडल्यामुळे हे अमेरिकन हेर असावेत अशा समजुतीने या मिशनऱ्यांवर खूप निर्बंध घालण्यात आले. कंपनी सरकारच्या भागांत राहण्यास बंदी करण्यात आली. त्यातच नव्या देशाची हवा न मानवल्यामुळे वायकामुलेही गमावण्याचा प्रसंग आला. तर एकास प्रकृती अस्वास्थ्यामुळे मायदेशी परतावे लागले.

या मिशनरींच्या संकटांची व अडचणींची सविस्तर माहिती या पुस्तकात दिली आहे व या त्यांच्या हालअपेष्टांची आठवण ठेवून आज त्यांचे कार्य चालवत राहणे कसे अगत्याचे आहे, हे नमूद केले आहे. इ. स. १९१३, १९२३, १९३३ या दशवार्षिक अहवालातील आकडेवारीसह माहिती दिलेली आहे. त्यावरून १९१३ सालच्या शतवार्षिक उत्सवानंतर २० वर्षांत काय घडले ते लक्षात यावे हा हेतू आहे.

बायबल व तत्संबद्ध लोक व समकालीन राष्ट्र

हिवाळे भा. पां., तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई. १९३६. पृ. ३३ (हिवाळे)

बायबल व तत्संबद्ध इतिहास भाग १ ला

ख्रिस्ती लोकशिक्षण माला, लेखक :–भा. पां. :हिवाळे, प्रकाशक - रे. भा. पां. हिवाळे, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई १९३६. (ठोकळ)

ख्रिस्ती लोकशिक्षण मालेतील हे पाचवे पुस्तक. यातील पहिल्या भागात इस्रायल लोक व समकालीन राष्ट्रे यांची माहिती आहे. त्याशिवाय बायबल संबंधीचे संशोधन, समेरिक कोण होते ? इजिप्तचा भूगोल, मिसरी संस्कृती, सुमेरी संस्कृती वबोलोनी संस्कृती, अशूरी संस्कृती, खाल्डियन संस्कृती, हिती लोकांचा इतिहास, वगैरेसंबंधी थोडक्यात सर्वसामान्य वाचकाला समजेल अशा भाषेत माहिती दिलेली आहे.

जुन्या व नव्या कराराचा शास्त्र इतिहास

हेन्री दोरिंग, प्रका. – हेन्री दोरिंग, आर्चबिशप, बिशप हाऊस, पुणे. धी एक्झामिनर प्रेस, दलाल स्ट्रीट, मुंबई १९३८. पृ. २+१८३+११.

उपोद्घातातील माहिती अशी :–

तारणारा येईपर्यंत मनुष्यांनी त्याची वाट पाहताना कसे चालावे. देवाने त्याला वेळोवेळी प्रकट केले, वाईटाला शिक्षा दिली विश्वास ठेवणारावर दया केली, तरी स्वर्गाचे द्वार त्यासाठी बंद राहिले. हा देवाने मनुष्याशी केलेला जुना करार होता.

हजारो वर्षांनंतर तारणारा आला तो येशू ख्रिस्त आहे. तो बाप व पवित्र

आत्मा या बरोबर एकच खरा देव असता एक पवित्र कुमारीकडून मनुष्याचा स्वभाव घेऊन मनुष्य झाला. त्याने जुना करार पूर्ण करण्यासाठी स्वतः वागून इतरांस शिकवून स्वर्गाची वाट दाखविली. दुःख व मरण सोसून मनुष्याचे कर्ज फेडले. जिवंत उठून सर्व लोकांना शिकवण्यासाठी, चालविण्यासाठी आपली कॅथॉलिक एक्लेसिया स्थापिली आणि स्वर्गात चढून स्वर्गाचे दार चांगल्या विश्वासी मनुष्यासाठी उघडले. हा देवाने मनुष्याशी केलेला 'नवा करार' होय.

पहिल्या युगात देवाने मनुष्याला कसे वागविले व मनुष्य कसे वागले याची नेहमीच निर्विवाद आठवण राहावी म्हणून देवाने हे पहिल्यापासून लिहावयास सांगितले आणि त्यानंतरही भविष्यवादी व पवित्र जन अशांस उठवून देवाची मोठी कर्मे सांगावयास आणि उपदेश करावयास लाविले. या सर्वांनी जे लिहून ठेवले ते जुन्या कराराचे शास्त्र आहे.

येशू ख्रिस्ताने स्वतः काही लिहिले नाही आणि लिहिण्याची आज्ञाही केली नाही. त्यानंतर याबाबत त्याने पृथ्वीवरील सर्व मनुष्यांस शिकविण्यासाठी आपली कॅथालिक एक्लेसिया स्थापिली. तरी त्याच्या शिष्यातील चौघांनी त्याचे एकेक एवान्जेलिडम म्हणून चरित्र काढिले. त्यातून एकाने एक्लेसियाच्या आरंभीचे वर्णन केले. पाचांनी विशेष लोकांसाठी पत्रे लिहिली आणि एकाने गूढ प्रकारे एक्लेसियाचे भविष्य वर्तविले. ही सर्व लेखपत्रे मिळून नव्या कराराचे शास्त्र झाले.

जुन्या व नव्या कराराच्या शास्त्राला एका नावाने पवित्रशास्त्र असे म्हणतात; का तर देवाचे शब्द त्यात मिळतात.

पवित्रशास्त्र फार मोठे पुस्तक आहे व त्यातील पुष्कळ वाक्ये समजावयास अवघड आहेत. तरी देवाने मनुष्याला कसे चालविले हे सर्व लोकांना सहज रीतीने माहिती करून द्यावे म्हणन एक्लेसियाच्या देखरेखीखाली शास्त्रांतील मुख्य गोष्टी काढून घेऊन जुन्या कराराचा व नव्या कराराचा शास्त्र इतिहास केला.

उपोद्घातानंतर कालखंडानुसार विवेचन आहे.

पहिले युग– आदामापासून आब्राहामापर्यंत इ. स. पूर्व सु. ४००० ते २००० यामध्ये जगाची उत्पत्ती, देवदूताची उत्पत्ती आणि पातक, पहिल्या मनुष्याची उत्पत्ती, पारादीस, पहिली आज्ञा, एवेची उत्पत्ती, पहिल्या आईबापांचे पाप, पहिल्या पापाची शिक्षा आणि तारणाऱ्याचे वचन, काईन आणि आबेल, मनुष्यांची वृद्धी आणि त्यांचा दुराचार, नोहाचे तारू, जलप्रलय, नोहा तारवातून निघतो आणि बली आणितो, नोहाचे पुत्र, त्याचे मरण, बाबेलचा बुरूज, मनुष्यांचा वियोग, मूर्तिपूजा.

दुसरे युग – आब्राहामापासून येशू ख्रिस्तापर्यंत इ. स. पू. २००० दुसऱ्या युगातील पहिला काळ– आब्राहामापासून ते मोश्यापर्यंत इ.स. पू. सुमारे २००० ते १५००. आब्राहामाची नेमणूक, आब्राहामाची शांतता व स्वार्थत्याग, आब्राहामाचा विश्वास आणि पाहुणचार, सुंता, सोदॉमा, गोमॉ–ही या नगरांचा नाश इसाअकाचा जन्म,

आब्राहामांचा बळी, इसाअकाचे रेब्बेकाशी लग्न, आब्राहामाचे मरण, एसौ आणि याकोब, याकोबाचा लाबानाकडे प्रवास, याकोबाचे पुनरागमन, ईसाअकाचे मरण, योसेफ याकोबाचा बहुप्रिय पुत्र, योसेफाचे भाऊ त्याला विकतात. योसेफ प्रतिकाराच्या घरात, योसेफ बंदिशाळेत– याकोबाचे आणि योसेफाचे मरण.

दुसऱ्या युगातील दुसरा काळ– मोश्यापासून राजापर्यंत इ. स. पूर्व १५०० ते १०००. मोशाचा जन्म व मोश्याचे पलायन पासून मोश्यांचा शेवटचा उपदेश, त्याचे मरण, रूथ सामुएल पर्यंतची हकिकत.

दुसऱ्या युगातील तिसरा कालखंड– इ. स. पू. १००० ते ५०० पहिला भाग अखंड राज्य, यात सौल पहिला राजा, दाविदचा राज्याभिषेक पासून सालोमोनाचा उत्कर्ष व शेवटपर्यंत माहिती.

दुसऱ्या भागात– दुभागलेले राज्य–एलीया भविष्यवादी, एलियाचा बळी पासून तारणारा केव्हा येणार या विषयी दानियेचा भविष्यवाद दानियेल आणि बेलमूर्ती दानियेल दुसऱ्या वेळीस सिंहाच्या खड्यात.

दुसऱ्या युगातील चौथा काळ

इ. स. पू. ५०० ते ० परदेशातून सुटका, देवाळयाचे व शहराचे पुन्हा बांधण्यापासून हेरोदराजा, कालबी पूर्णता, तारणाऱ्याच्या अपेक्षेपर्यंत.

नवा करार पहिला भाग

प्रकरण १ येशू ख्रिस्ताचा जन्म व बालपण

प्रकरण २ येशू ख्रिस्ताच्या प्रसिद्ध वर्तनासाठी तयारी

प्रकरण ३ येशू ख्रिस्ताच्या प्रसिद्ध वर्तनाचे पहिले वर्ष

प्रकरण ४ येशू ख्रिस्ताच्या प्रसिद्ध वर्तनाचे दुसरे वर्ष. येशूने केलेले अनेक चमत्कार.

प्रकरण ५ येशू ख्रिस्ताच्या प्रसिद्ध वर्तनाचे तिसरे वर्ष येशू गलिलियात खूप रोग्यांस बरे करतो वगैरे हकिकत, आपले दुःख, मरण, व पुनरुत्थान याविषयी बोलू लागतो वगैरे.

प्रकरण ६ वे यात येशू ख्रिस्ताच्या प्रसिद्ध नर्तनाचे तिसरे पर्व. येशू गलिलेया सोडून येरूशलेमास जातो. शिष्यांस पाठवितो तिथपासून शुद्धीकरण सणाचे दिवशी येशूला दगड मारावयास पाहातात. सातव्या प्रकरणांत येशू योहोन| नदीच्या पलीकडे जाऊन शिकवतो व बंद करतो. मोठ्या भोजनाचा दाखला सांगतो. तिथपासून येशू येरिखोस येऊन आंधळ्यास दृष्टी देतो, जाखेय जकातदाराच्या घरी रहातो. बोथा-निया येथे येशूचे जेवण, मारिया त्याला तेल लावते.

प्रकरण ८ शेवटला आठवडा– येशू समारंभाने येरूशालेमात प्रवेश करतो, येशू आपल्या शिष्यास येणारे धोके कळवतो. येशू दुःख सोसण्यापूर्वी शिष्यांस शेवटचे

बोधन करतो. येशूला फटके मारतात, काट्यांचा मुकूट घालतात– पीलात येशूला लोकांच्या समक्ष दाखवितो व क्रूसावर देण्यासाठी त्याच्या स्वाधीन करतो. येशू आपला क्रूस पाहतो, त्याला क्रूसावर चढवितो येशूचे सात शेवटचे शब्द व त्याचे मरण.

प्रकरण ९– येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान व स्वर्गात आरोहण.

नवा करार भाग दुसरा –प्रेषितांची कृत्ये, शिष्य पवित्र आत्म्याची वाट पाहातात. मॅत्थीया यूदाच्या जागी प्रेषित ठरतो. यात दोन प्रकरणे आहेत.

या ग्रंथात बारीक टाईपात स्पष्टीकरणात्मक तळटीपा दिलेल्या आहेत. त्यास टीका असे म्हटलेले आहे. पुरवणी जोडली आहे त्यात प्रेषितांची माहिती आहे.

मराठी भाषेच्या वेगवेगळया लकबी दिसून येतात. उदा. ते सर्व लोकांस वाचण्याजोगे नाही. देवाने मनुष्याला कसे चालविले हे सर्वांना सहज रीतीने माहीत करून घ्यावे म्हणून. "योसेफाची महिमा" उकरण्यात, 'फरफराट', देशात पुरफराट होईल. 'त्यानंतर एवढया दुष्काळाची सात वर्षे येतील की ज्यात सर्व घुरघुराट खाऊन टाकतील. 'क्रोधावून आज्ञा केली की.' वगैरे.

दुसऱ्या आवृत्तीचे संपादन रे. रेजिनाल्ड गोन्सावेस यांनी केलेले आहे. व प्रिन्स ऑफ वेल्स ड्राईव्ह, सेंट पॅट्रिक चर्च पूना, मुद्रक– सेंट पॅट्रिक प्रेस पूना ही दुसरी आवृत्ती १९५२ साली निघाली. दुसऱ्या आवृत्तीत काही बदल केलेला नाही.

अमेरिकन मराठी मिशन १२५ वी जयंती

प्रका. बी. पी. हिवाळे, मॉडरेटर ह्यूम मेमोरिअल चर्च, मुंबई, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई, १९३९ पृ. २३.

अमेरिकन ख्रिश्चन मिशनचे भारताशी संबंध १८१३ सालापासून आहेत. १९३९ साली १२५ वी जयंती साजरी केली. या जयंती समारोहास अध्यक्ष रे. डगलस हार्टन होते. निरनिराळया चौदा संस्था व व्यक्तीकडून शुभसंदेश आले होते जे संक्षिप्त स्वरूपात दिले आहेत.

ख्रिस्ती महामंडळाचा इतिहास

मूळ लेखिका – डोरोथिया स्टीव्हन्स (ख्रिस्ती एक्लेसिएच्या इतिहासाची रूपरेषा) अनु. मा. ल. हर्षे., प्रका. ई. एम्. मुलिन्स, एस्. पी. सी. के. पुणे, मुद्रण– आर्यभूषण मुद्रणालय, पुणे ४. दुसरी आवृत्ती १९५८ पृ. १४८. पुस्तकास प्रस्तावना नाही (जेसुईट फादर्स नगर).

ख्रिस्तावताराची पूर्व तयारी, ख्रिस्ताने केलेली जनसेवा, दुसरे व तिसरे शतक, कॉन्स्टटाईन बादशहाचे धर्मांतर, ख्रिस्ती महामंडळाच्या परिषदा, एफिसस येथील दोन परिषदा, युरोपचे ख्रिस्तीकरण, इस्लामचा उदय, क्रूसेड्स नामक धर्मयुद्धे, पाश्चिमात्य महामंडळाचा जीवनक्रम, पोपचे हक्क, ध्यानयोगी लोक, विद्येचे पुनरुज्जीवन, विक्लिफ, पौर्वात्य मंडळे, पश्चिमेकडे झालेली धर्मसुधारणा,

धर्मप्रचार कार्याची जागृती, युरोपातील धार्मिक प्रचार कार्याची जागृती, युरोपातील धार्मिक आणि लोकहितैषी, पुनरुज्जीवन, भौतिकशास्त्र आणि पवित्र शास्त्राचे तात्त्विक अध्ययन, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील चळवळी, एवढ्या अठरा प्रकरणातून विषय विशद केलेला आहे. प्रत्येक प्रकरणास खंड म्हटलेले आहे.

प्रत्येक खंडाचा सारांश पुस्तकाचे अखेरीस थोडक्यात दिलेला आहे.

चला आपण गुरूरायाला भेटू या–

लेखक – हरिभाऊ रंगराव ख्रिस्ती (भाषा)

मूळ लेखक– रे. जे. एस्. थॉम्सन यांच्या स्टडीज इन दी लाईफ ऑफ जीझस या पुस्तकाचा अनुवाद, मिसेस विल्मा एस्. स्टुअर्ड, नागपूर चर्चसाठी मिशनबोर्ड इ. स. १९४३, पृ. ६१, किं. ८ आणे.

१९२६ साली फिन्लॅंडमध्ये भरलेल्या वाय्. एम्. सी. ए. च्या जागतिक सभेत येशूच्या जीवनवृत्तान्ताचा अभ्यास या विषयाला प्राधान्य दिले होते. त्या पुस्तकमालिकेत प्रसिद्ध झालेले पुस्तक.

या पुस्तकात येशूच्या चरित्राची ऐतिहासिक सत्यता आदी विषयावरले लेखन. एकूण १२ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायात जीवन वृत्तान्ताची माहिती. अभ्यासासाठी नियुक्त केलेले प्रश्न, चर्चेसाठी विषय असा मजकूर आहे. मत्तय, मार्क, लूक योहान्न इत्यादीची वचने, इब्रिपत्रे, स्तोत्रे वगैरेतील संदर्भ दिले आहेत.

ख्रिस्ती महामंडळाचा इतिहास

लेखक– म. रा. लेदर्ले, ये. सं. प्रका. – मार्ग प्रकाशन, सि. मेनेझिस, ये. स. डि नोबिली कॉलेज, लोकसंग्रह छापखाना – पहिली आवृत्ती १९५५ दु. आ. १९६३. पृ. २७० (लेदर्ले).

लेदर्ले आपल्या प्रस्तावनेत लिहितात – "परमेश्वराचा पुत्र मानव झाल्यापासून ते आजतागायत ख्रिस्त महामंडळाची वाढ कसकशी होत आली, संकटात आणि समृद्धीत त्याचे कार्य कसे चालले, ख्रिस्ताची ओळख अधिकाधिक लोकांस कशी पटली, स्त्री पुरुष, प्रांत आणि राष्ट्रे, खंडे आणि निरनिराळ्या संस्कृती ख्रिस्ताभिमुख कसकशा होत गेल्या याचा थोडक्यात पण संगतवार वृत्तांत या पुस्तकात दिला आहे. प्रभु ख्रिस्ताशी संबंध जोडणाऱ्या ख्रिस्ती महामंडळासंबंधी अधिक माहिती मिळविण्याची इच्छा आपणांस असणे स्वाभाविक आहे. ख्रिस्ताने स्थापन केलेल्या महामंडळासंबंधी सुशिक्षित महाराष्ट्रीयांच्या मनात येणाऱ्या प्रश्नांची संक्षिप्त व स्पष्ट उत्तरे देणे हा या पुस्तकाचा हेतू आहे."

पुस्तकाच्या पहिल्या भागात कॅथालिक ख्रिस्ती महामंडळाच्या जन्माविषयी लिहिले आहे. येशू ख्रिस्त म ामडळाची स्थापना करतो हे सांगितले आहे. त्यासाठी ऐतिहासिक आधार दिले आहेत. हा भाग इ. स. १ ते ३३ या कालखंडाचा परामर्श

घणारा आहे.

दुसरा भाग इ स. ३३ ते ५०० या काळावर आधारलेला आहे. या काळात ख्रिस्त महामंडळाचा भूमध्यसमुद्राभोवती विस्तार झाला. जेरूसलेमात, पॅलेस्टाईनमध्ये, रोमन साम्राज्यात या सर्व ठिकाणी प्रसार कसा झाला, केव्हा, कसा जुलूम व छळ सोसावा लागला, केव्हा विजय झाला त्याबद्दल माहिती दिली आहे, त्यानंतर उत्तर, पूर्व दक्षिण दिशांसही ख्रिस्त महामंडळाचा प्रसार झाला. त्यात प्रामुख्याने भारत देशाचा समावेश आहे. वेळोवेळी तत्त्वभ्रष्ट जनांवर महामंडळास विजय मिळवावा लागला. ख्रिस्ती धर्मावरील मोठे संकट, संज्ञानवाद (ग्नॉस्टिसिझम) व त्याचे खंडन करणारा आयरेनियस याची माहिती दिली आहे. आयरेनियस, अथनेशिअस, नेस्ततोरियस व पेलेजस, ऑगस्टन या संतांचे कार्य सांगितले आहे. ख्रिस्त महामंडळाचे वीर पुरुष व महात्मे, पवित्रशास्त्र, ईश्वरवाणी, संत अंतोनी महागुरूस्वामी या सर्वांची माहिती समाविष्ट केली आहे.

तिसऱ्या भागामध्ये इ. स. ५०० ते १५०० या कालखंडाचा विचार केलेला आहे. युरोपातील व नवीन राष्ट्रांचे ख्रिस्ताकडे आगमन कसे झाले ते सांगताना नैऋत्य युरोप, इंग्लंड, आयर्लंड, मध्य युरोप, उत्तर युरोप, पूर्व युरोप येथील हाल-चालींचा आढावा घेतला आहे. ग्रीक दुफळीची मीमांसा आहे. मुसलमानी धर्माची पवित्र स्थाने, धर्मयुद्धे, धार्मिक आणि राजकीय सत्तेमधील संबंध, मध्ययुगीन ख्रिस्ती राज्यसंघ, धार्मिक व सांस्कृतिक उन्नती, मोंगवामधील धर्मप्रसाराचे कार्य, भारतातील ख्रिस्ती धर्म, पश्चिम प्रवासी, भारतातील ख्रिस्ती लोक व त्यांचे प्रश्न, तत्त्वभ्रष्ट पंथ, नव्या नव्या चळवळी, मध्ययुगीन काळातील संत, मध्ययुगीन काळाची अखेर या विषयांबाबत विवरण केले आहे.

चवथ्या भागात– इ स. १५०० ते १९६२ एवढया कालखंडाचा समावेश आहे. प्रारंभी कालखंडास पोचेपर्यंत ख्रिस्त महामंडळाने अनुभवलेले अनुभव, संकटे इत्यादींबद्दल थोडक्यात आढावा घेतला आहे नंतर या अर्वाचीन कालखंडाचे स्वरूप विशेषांसह स्पष्ट केले आहे. ख्रिस्ती महामंडळाविरुद्ध प्रॉटेस्टंट बंडाळी, जर्मनीतील मार्टिन लूथर, स्वित्झर्लंडमधील झ्विंगली, फ्रान्स, इंग्लंड या देशातील धार्मिक परि-स्थिती विशद केली आहे. ट्रेन्ट शहरी भरलेली धर्मपरिषद, स्पेन व पोर्तुगाल या देशांतील अंतर्गत धर्मसुधारणा, संत फ्रान्सिस, व्हिन्सेंट दी पॉल, पेत्र कॅनिसिअस इत्यादींचे कार्य, माहिती, येशू संघ, कॅथॉलिक प्रतिक्रिया, ख्रिस्ती महामंडळाचा नवीन विस्तार, सतराव्या अठराव्या शतकांतील परिस्थती, जान्सेनिझम, व्यक्तिस्वातंत्र्यवाद मध्ययुगातील ख्रिस्ती संघ, भारत देशातील कार्य, चीनमध्ये प्रसार ह्या गोष्टींचा विचार आलेला आहे.

पाचव्या भागात – एकोणिसाव्या शतकातील ख्रिस्ती महामंडळाच्या परि-स्थितीतील बौद्धिक प्रवाह, स्वतंत्र वर्तनवाद, भांडवलशाही, साम्यवाद (कम्युनिझम)

लोकशाही, भौतिक शास्त्राचा प्रसार, या काळातील ख्रिस्त महामंडळाची परिस्थिती या सर्व विषयांची माहिती दिली आहे.

सहाव्या भागात – शाखा-शाखांमध्ये ख्रिस्ती बांधवांची झालेली विभागणी, निरनिराळे उपपंथ, त्यांचा विकास, प्रत्येक पंथीय मिशन्सचे कार्य, सार्वभौम चळवळ विशेषतः भारतातील चळवळीच्या संदर्भात विचार मांडला आहे.

सातव्या भागात – आधुनिक काळातील ख्रिस्त महामंडळ या विषयी माहिती आहे. त्यात अलीकडचे परमगुरुस्वामी, ख्रिस्ती महामंडळाचा छळ, तसेच मंडळाचा विस्तार, भारतातील ख्रिस्त महामंडळ महाराष्ट्रातील ख्रिस्त महामंडळ यासंबंधी विचार केलेला आहे.

या पुस्तकाची दुसरी आवृत्ती १९६३ मध्ये पहिल्या आवृत्तीनुसार निघाली.

ऐतिहासिक येशू ख्रिस्त भाग १ ला

घोरपडे खुशालभाऊ शांतवन, प्रका. खु. शां. घोरपडे, कालिकुडती रोड, जालना, मुद्रक – शांतिसदन, आग्रा रोड, नासिक, इ. स. १९५८ पृ. ४३ (ठोकळ)

जगातील विद्यमान धर्म या ग्रंथाचा अभ्यास करीत असताना हे पुस्तक लिहिले गेले.

विश्वाचा प्रारंभ, उत्पत्तिक्रम, आदाम मानवाचे पतन, आदामाचे पुत्रपौत्र, नोहा, जलप्रलय, बॉबेल, अब्राहम, मोशे, लेवीयुग, लेण्यांची कामे, लेण्यांचे वर्चस्व, लेण्यांचा विस्तार, लेण्यांचे देशांतर, यहुद्यांच्या वसाहती, शिकंदर, इस्रायल लोकांचे सण यासंबंधी ऐतिहासिक माहिती.

आद्य संस्कृती – (संक्षिप्त)

खुशालभाऊ शांतवन घोरपडे, प्रका. रमेशकुमार घोरपडे, कालीकुडती रोड, जालना, नागरिक मुद्रणालय, १९६२, पृ. ६८ (ठोकळ)

प्रारंभी लेखकाचे मनोगत असून लेखकाची व पुस्तकाची ओळख दे. ना. टिळक यांनी करून दिलेली आहे.

प्राचीन संस्कृती या प्रकरणात संस्कृती म्हणजे काय, प्राचीन संस्कृतीची मिसरी, मेसोपेटोमिया, बॉबिलोनी, सुमेरी, अशूरी एजीथन, फिनिशियन, चिनी सिंधु व इतर संस्कृतीची माहिती दिली आहे. दुसऱ्या प्रकरणात प्राचीन संस्कृतीमधील धर्मसत्यता विचारात घेतली आहे. प्राचीन संस्कृती जलप्रलयानंतरच्या आहेत असे तिसऱ्या प्रकरणात सांगितले असून त्यांचा प्रसार कसा झाला या संबंधी विवेचन केले आहे. चौथ्या प्रकरणात देव-दानवांच्या कथा सांगितल्या आहेत. पाचव्या प्रकरणात आद्य पूर्वजांची निवासस्थाने विचारात घेतली आहेत.

सहाव्या प्रकरणात मूळ पूर्वजांची शासन व्यवस्था सांगितली आहे. सातव्या प्रकरणात – (१) काल, विश्वोत्पत्ती, पृथ्वीचा जन्म बायबलातील दिवस, काल-

गणनेतील घोटाळे, काकेशियन टोळ्या, जलप्रलयानंतरची संस्कृती, जलप्रलयापूर्वीच्या संस्कृती, संस्कृतीचा काळ, इतर संस्कृती व आद्य संस्कृतीचा विचार केला आहे.

ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी लिहिलेल्या वाङ्मयाचे स्वरूप अशा प्रकारचे मुख्यतः प्रसाराचे आहे हे स्पष्ट आहे.

प्रकरण चवथे

ख्रिस्ती मराठी लेखकांनी लिहिलेली संत चरित्रे

(मराठीतील संत चरित्राप्रमाणे ख्रिस्ती लेखकांनी त्यांच्या स्वतःची चरित्रे लिहिली. त्यासंबंधी माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.)

अथ मॅथ्यूकृत सद्‌गुरुचरित्र (Saint Matthew 's Gospel in Marathi Verse)

लेखकाचे नाव नाही पण पुस्तकावर हस्ताक्षरात कुणी तरी By Rv. V. Karmarkar असे लिहिलेले आहे.

प्रका – अँग्लो व्हर्नाक्युलर छापखाना, इ. स. १८७८

या पुस्तकाचे स्वरूप पोथीसारखे आहे. एकूण अध्याय अठ्ठावीस असून पद्य रचना अनुष्टुभ छंदात जुन्या पद्धतीने केलेली. अध्यायाच्या अखेरीस इति....अध्याय समाप्त असा शेवट आहे. पण विशेष म्हणजे प्रारंभी कोणासही नमन नाही, एकदम विषयास प्रारंभ केलेला दिसतो. बाकी चरित्र लेखनातही तपशील नेहमीप्रमाणे. अब्राहमपासून वंशमाला – तारणारा जन्मास येणार ही भविष्यवाणी – मरियेस पुरुषसंगाशिवाय अद्‌भुत रीतीने गर्भधारणा – येशूचा जन्म – बाळपण – चमत्कार दुःखसहन वगैरे कथाभाग.

सदा रोगी सदा उद्योगी किंवा रिचर्ड बॅक्स्टर याचा काळ व चरित्र–

लेखक – बाबा पद्‌मनजी, प्रका–बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, निर्णय-सागर छापखाना, मुंबई. १८९०

प्रथम बाबा पद्‌मनजी यांनी " रिचर्ड बॅक्स्टर यांचा काळ व जीवन चरित्र " या विषयावर अमेरिकन मिशन मंडळाच्या वार्षिक सभेत व्याख्यान दिले होते. त्यावरून नंतर पुस्तक तयार करण्यात आले.

रिचर्ड बॅक्स्टर यांना क्षयरोगाने पछाडले होते. त्यांच्या शरीराची वाढ खुंटली होती. आरोग्यदृष्टया एकही दिवस त्यांना चांगले जगता आले नाही. पण असा हा सदा रोगी मनुष्य सदा उद्योगी होता. ईश्वरी विद्येविषयी लिहिणारे जे महान ग्रंथकार झाले, त्यात त्यांचा हात धरील असा कोणीही नाही. धार्मिक विषयावर त्यांनी लहानमोठी १६० पुस्तके लिहिली. आपल्या उद्योगीपणाची किल्ली प्रभूजवळ

आहे, असे त्याचे म्हणणे असे. ऐहिक जीवनातील तापाने व्यथित झालेल्यास बॅक्स्टरचे जीवनचरित्रज्ञान हे शीतल छायावृक्षाप्रमाणे शांतविणारे आहे असा बाबा पदमनजीच अभिप्राय आहे. हे पुस्तक प्रत्यक्षात पहायला मिळाले नाही. पण १० एप्रिल १८९० च्या ज्ञानोदयात पृ. ११७ वर या पुस्तकावर अभिप्राय आलेला आहे. मूळ पुस्तकातील उतारे दिले आहेत त्यावरून हे उद्धृत केले आहे.

लथरचा इतिहास-लेखक-बाबा पदमनजी, प्रका. : बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, निर्णयसागर छापखाना, १८९१, पृ. ११ + १९

इ. स. १८५० साली परदेशी गृहस्थाकडून लूथरचे चरित्र लिहून घेऊन प्रसिद्ध केले होते. तेच चरित्र पुढे १८९१ साली बाबांनी प्रसिद्ध केले.

मार्टिन ल्यूथर याच्या धर्मसुधारक म्हणून असलेल्या कार्याचा परिचय या पुस्तकात आहे. पण केवळ माहिती निवेदनापेक्षा ल्यूथरच्या धर्मनिष्ठा, धार्मिक सुधारणा करण्यासाठी त्याने वापरलेली साधने, धर्मसुधारणेमागील त्याची तत्त्वे, या सर्व स्पष्टीकरणावर लेखकाचा अधिक भर आहे. मार्टिन ल्यूथर याच्यापूर्वी पाल्हो, योहान, विक्लिफ, हस इत्यादींनी ख्रिस्ती मंडळींच्या वर्तनशुद्धीसाठी केलेल्या प्रयत्नांचीही पण माहिती दिली आहे. त्यामुळे ल्यूथरच्या वेळेपर्यंतच्या धर्मसुधारणांस अनुकूल वातातावरण कसे निर्माण झाले तेही स्पष्ट केले आहे. ल्यूथरच्या इतिहासावरून आपणही असेच देवाचे काम करावे असा बोध केला आहे.

नीसिमा जपानी देशभक्त याचे चरित्र :–लेखक –बाबा पदमनजी,

प्रका – ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, मुद्रक – निर्णयसागर प्रेस, पुणे १८९३.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावरच " हिंदुस्थानातील शिक्षित जनास अनुकरणीय' असे लिहिले आहे. त्यावरून पुस्तक लेखनामागील हेतू सूचित होतो.

नीसिमाचा जन्म आणि बाळपण प्रारंभी सांगून, तो अमेरिकेत पळून जातो व तिथे राहातो, तिथून युरोपास जातो व जपानला परततो. जपानातील कामास आरंभ करतो, ख्रिस्ती युनिव्हर्सिटी स्थापन करण्याची सूचना करतो. आयुष्याची अखेर व मृत्यू अशी माहिती प्रारंभी येते.

शेवटी हिंदुस्थानातील लोकांनी नीसिमाचा कित्ता का गिरवावा त्याबाबत दिग्दर्शन करताना म्हटले आहे. (१) नीसिमा खरा देशाभिमानी होता. (२) जपानच्या बादशहाचे नोकर होण्यापेक्षा ख्रिस्ताचे चाकर होण्याचे त्याने पसंत केले. (३) तारुण्यात त्याने कारखाने, गोद्या वगैरे उद्योग सुरू करून देशाची संपत्ती वाढविली. (४) त्याने बुद्धी व अंतःकरण या दोन्ही बाबतीत ज्ञान संपादन केले. (५) शुभवर्तमानाचा प्रसार केला. अशा अनेक गोष्टी नीसिमाच्या चरित्रापासून शिकण्याजोग्या आहेत.

मत्तयकृत शुभवर्तमान यावरील टीका

लेखक – रे. डेव्हिड, मल्हार निसबत, युनायटेड फ्री चर्च, पुणे. प्रका. रे. जे. स्मिथ, सेक्रेटरी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, काळबादेवी, मुंबई. एस. पी. जी. मिशन प्रेस, अहमदनगर, इ. स. १९१८. पृ. ४८+२.

मत्तयचे चरित्र, जीवनविषयक माहिती, ग्रंथकर्तृत्व, लक्षणे आणि त्यास आधार, ग्रंथ मीमांसा, येशू ख्रिस्ताच्या काळात पॅलेस्टाईन देशाची स्थिती – या सर्वांसंबंधी उपोद्‌घातात उल्लेख आलेला आहे. मत्तयकृत शुभवर्तमान वर ठळक ठशांत मजकूर व खाली बारीक टाईपमध्ये टीपा, असे मुद्रित केलेले आहे.

मत्तयचे चरित्र – हल्फ याचा पुत्र लेवी हा येशूचा अनुयायी झाल्यावर त्याने मत्तय हे नाव धारण केले. मत्तय नावाचा अर्थ ‘ प्रभुचे दान ’. येशूचा अनुयायी बनला त्याच दिवशी त्याने आपल्या जुन्या मित्रमंडळीस मेजवानी दिली. त्या मेजवानीस येशू आला होता. त्यामुळे त्याचे चालणे बोलणे सर्व जवळून प्रत्यक्ष, पहायला, ऐकायला मिळाल्यामुळे ‘ मत्तय ’ला फारच आनंद झाला.

यानंतर त्याच्या चरित्राची वाटचाल माहीत नाही. पण प्रेषितांच्या नामावलीत त्याचे नाव मात्र आहे. त्याने स्वतःच्या नावापुढे जकातदार हे उपपद जोडलेले दिसते. मत्तय हा कट्टा यहुदी होता व त्यास यहुदी लोकांचे भविष्यग्रंथ व इतिहास यांचे चांगले ज्ञान होते. हेरोदाच्या घराण्यात यहुदी लोकांचा उद्धारक उत्पन्न होईल असा त्याच्या मनाचा ग्रह होता. पुढे लवकरच ख्रिस्तांची गाठ पडल्यावर रात्रंदिवस मनात घोळत असलेले उद्धारकाचे प्रतिबिंब येशूचे ठायी दिसल्यामुळे जकातदाराच्या नोकरीवर पाणी सोडून तो येशूच्या चरणी लीन झाला. यहुदी लोकांप्रमाणे त्याला द्रव्यलोभ होता, पण जकातीच्या नोकरीमुळे तो गलीली लोकांच्या पुंडाईपासून अलिप्त राहिला. तो फार श्रीमंत नव्हता तरी खाऊन पिऊन सुखी होता. ख्रिस्ताच्या तीन निवडक शिष्यांपैकी तो नव्हता. त्याचा स्वभाव शांत व ध्यानस्थ होता. तो मौनवृत्तीचा असून जे काही पाहाण्यात, ऐकण्यात येईल त्या सर्वांचा मनात संग्रह करून ठेवीत असे. तो मननशील असल्यामुळे, पाहिल्या, ऐकल्या व घडल्या गोष्टींवर विचार करून योग्य अन्वयार्थ लोकांसाठी लिहून ठेवावे, एवढी पात्रता त्याच्या अंगी आली होती. ‘ प्रेषितांची कृत्ये ’ किंवा ‘ पत्रे ’ यात ‘ मत्तय ’ चा उल्लेख नाही. पण प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथातून त्याच्याबद्दल काही उल्लेख आढळतात. त्यावरून त्याचे चरित्र उपलब्ध होते. इतर प्रेषितांपेक्षा ‘ मत्तय ’ हा अधिक काळ पॅलेस्टाईनमध्ये राहिला होता. त्याने आपल्या देशबांधवांस ख्रिस्ताची माहिती करून दिली. लेखी शुभवर्तमानाचा पाया घालण्याचे मुख्य श्रेय मत्तयकडे जाते. प्राचीन ग्रंथकारांच्या मतानुसार मत्तयने कडक वैराग्य धारण केले होते. तो मांसाहार देखील करीत नसे. ‘ मत्तय ’ याचा अंत कोणत्या प्रकारे झाला ते निश्चित सांगता येत नाही. काही म्हणतात की त्याला स्वाभाविक

मरण आले, तर काही म्हणतात की त्याला सत्यासाठी बळी जावे लागले.

ग्रंथकर्तृत्व (१) ' पहिले ' शुभवर्तमान ' मत्तयने लिहिले अशी प्राचीन दंत-कथा परंपरेने चालत आली आहे. याचा काळ निश्चित नसला तरी पेत्र व पौल रोम शहरात धर्मस्थापना करीत असताना मत्तयने ' शुभवर्तमान ' लिहिले, आजमितीस ते उपलब्ध नाही.

इतर शुभवर्तमानात नसून याच शुभवर्तमानात मात्र आहेत असे भाग म्हणजे (१) चमत्कार (२) दाखले (३) उपदेश (४) कथाभाग.

येशू ख्रिस्ताच्या काळातील पॅलेस्टाईन देशाची स्थिती थोडक्यात सांगितली आहे.

नवा करार, शुभवर्तमान, नव्या कराराच्या पुरातन हस्तलिखित प्रतीसंबंधी थोडक्यात लिहिले आहे.

प्रत्यक्ष शुभ वर्तमानात – येशूचा वंशवृक्ष, येशू ख्रिस्ताचा जन्म, मागी लोक येशूच्या दर्शनास येतात, मिसरास पलायन, बेथलहेमातील बालकांची कत्तल, मिसरातून परतणे, नाजेरथात वसतीस राहणे, यहुदीयेच्या रानात बाप्तिस्मा करणारा योहान धर्मोपदेश करतो. येशूचा बाप्तिस्मा, येशूची परीक्षा, येशूचे प्रथम शिष्य, पेत्र, अंद्रिया, याकोब, योहान येशू गालीलांना उपदेश करीत व रोग बरे करीत फिरतो. डोंगरावरील उपदेश, स्वर्गाचे राज्य, स्वर्गाच्या राज्याच्या प्रजेची कामगिरी व जबाबदारी, नेमशास्त्राची सिद्धी, सहावी, सातवी, तिसरी आज्ञा, मोशाने दिलेले हुकूम–प्रतिकाराचा नेम, प्रीती कोणावर करायची ? या राज्यातील प्रजेने कसे वागायचे, धर्म करणे, प्रार्थना व प्रार्थनेचा मासला, उपास, ऐहिक वित्तविषय व रोजच्या काळजीचा रगडा, ख्रिस्ती जिण्यात प्रगती व्हावी म्हणून नियम, प्रार्थनेचे अगत्य, ईश्वरप्रार्थनेस उत्तर देणार, राज्यात प्रवेश करण्याचे असंद द्वार, खोटे व खरे मार्गदर्शक ओळखण्याची कसोटी, राज्याची खरी व खोटी प्रजा, एका कुष्ठरोग्यास ख्रिस्त बरे करतो. जमादाराच्या चाकरास बरे करतो.

पेत्राच्या सासूचा ताप हटवतो व दुसऱ्या पुष्कळ जणांस बरे करतो, शिष्य-धर्म प्रकाशन, समुद्रावरील वादळ शांत करतो, एका पक्षघात्यास बरा करतो, येशूचा अनुयायी होण्याकरिता मत्तयला निमंत्रण, त्याच्या घरी भोजनोत्सव आणि उपोषणासंबंधी चर्चा, याईराच्या मृतकन्येस सजीव करणे, आंधळ्या मुक्या रोग-ग्रस्तास बरे करणे, प्रभूची गालीलात तिसरी फेरी, लोकांविषयी त्यांची करुणा, बारा प्रेषितांस धर्मप्रसारार्थ पाठवितो, प्रेषितांची रवानगी, छळणुकीच्या समयी समाधान व्हावे म्हणून त्यास ख्रिस्ताचा बोध, प्रेषितांचा स्वीकार करणारास ख्रिस्ताचे आशिर्वचन, बाप्तिस्मा करणाऱ्या योहानविषयी माहिती, अविश्वासाबद्दल शब्दताडण, उपकारस्तुती, भाराक्रान्त जनांस विश्रांती, शब्बाथ दिवस पाळण्याविषयी, परूशी येशूचा नाश करण्याविषयी कट करतात, येशू तेथून निघून जातो, आरोपास उत्तर, पवित्र आत्म्याबद्दल दुर्भाषण, परूशी चिन्ह मागतात त्या काळच्या दुष्टाईचे

स्पष्टीकरण करणारा दाखला, अनेक दाखल्यांनी दिलेल्या शिकवणी, पेरणाराचा दाखला, निंदणाचा दाखला, तसेच मोहरीच्या दाण्याचा, खमीराचा, लपविलेल्या ठेवीचा, अतिमौल्यवान मोत्याचा, असे दाखले.

स्वर्गाच्या राज्याचे शास्त्री, नाजेरथेचे लोक, येशूचे शिष्यासह अरण्यात जाणे, पाच हजार लोकांस भोजन घालणे, येशूचे शिष्य समुद्र ओलांडून जातात, खरा धर्म व खोटा धर्म या संबंधी परूशांस व इतर लोकांस येशूचा उपदेश, कनानी स्त्रीच्या कन्येस बरे करणे, परूशी व सदूकी चिन्ह मागतात. पेत्राने केलेला अंगिकार, येशूने दिलेले वचन – स्वतःचे मरण व पुनरुत्थान याविषयी केलेले भविष्यकथन – आत्मनिग्रहाची आवश्यकता, येशूचें रूपांतर, फेफरेकरी मुलास बरे करणे, देवळाच्या पट्टीचा पैसा देणे, नम्रतेविषयी बोध, स्वर्गीय राज्य, बालकाविषयी चिंता, पापाची क्षमा करण्याविषयी, द्राक्षमळ्यातील मोलकऱ्यांचा दाखला, येशूला धरण्यासाठी हेरोदाची युक्ती, यहुदी राष्ट्र व परूशी लोक यांच्याबाबत येशूने आपल्या शिष्यांस इशारा देणे, स्वतःचे मरण व पुनरुत्थान या विषयी तीन वेळा भविष्य, यरूशलेमाच्या नाशाविषयी भविष्य, अनेक दाखले, कुष्ठरोगी शिमोन याच्या घरी मेजवानी, शेवटच्या भोजनाची तयारी, शेवटचे भोजन, शिष्य अडखळतील, त्यांची दाणादाण, ख्रिस्ताच्या प्राणांत यातना, येशूला पकडणे, चौकशी, पेत्राचा नकार, रोमी शिपायांकडून येशूचा अपमान, वधस्तंभावर नेणे, मरण, प्रेतक्रिया, पुनरुत्थान, मरीयांस येशूचे दर्शन, रोमी पहारेकऱ्यास लाच, येशूने पुनःदर्शन देणे येवढे विषय या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहे.

पौलसाधूचे चरित्र – मूळ लेखक रे. जॉन टॉरन्स, अनु. रे. दि. शं. सावरकर, प्रकाशन रे. दि. शं. सावरकर, मराठी लिटरेचर (मिशनरी, बॉम्बे ख्रिश्चन कौन्सिल, आर्यभूषण प्रेस, पुणे इ. स. १९२३, पृ. १६४ (वर्फे)

हिंदी प्रेसबीटीरिअन् मंडळीच्या सभासदांस हे पुस्तक अर्पण केलेले आहे. रे. जॉन टॉरन्स यांनी युनायटेड फ्री चर्च मिशनमधून काम करीत असताना १८९८ साली "पौलसाचे चरित्र" या नावाने मराठीत ६०–६५ पृष्ठांचे पुस्तक लिहिले. त्यानंतर त्यात सुधारणा करून त्यांनी इंग्रजी पुस्तक लिहिले. त्या इंग्रजी पुस्तकाचे हे भाषांतर रे. दि. शं. सावरकर यांनी केले असे प्रस्तावनेत म्हटले आहे.

या पुस्तकात पौल साधूच्या चरित्रातील समाविष्ट केलेला भाग असा – जन्म, प्रारंभीचे शिक्षण इ. धर्मांतर, आयुष्याच्या मुख्य कामगिरीची तयारी, धर्मोपदेशाची यशस्वी फेरी, यरुशलेमातील ख्रिस्ती धर्मपरिषद, धर्मोपदेशाची दुसरी फेरी, तिसरी फेरी, कारागृहात अंतःकाळ, पौलाचे ख्रिस्ती मंडळातील कार्य, पौलाचे सामाजिक व राजकीय विचार, पत्रव्यवहार, संदेश, ईश्वरविषयक मते, मित्रपरिवार, गुणवर्णन वगैरे माहिती दिली आहे.

पौलाच्या जीवनातील प्रमुख घटना अनुक्रमाने नमूद केलेल्या आहेत. मात्र हा काळ अगदी निश्चितपणे नमूद करता आलेला नाही. हेही सांगितले आहे.

महिला रत्नमाला भाग १ ला – प्रका. मिस ए. ए. ॲबट, ऑल इंडिया लिटरेचर कमिटी, आर्यभूषण प्रेस, पुणे १९३३ पृ. ४८ (ठोकळ) एल्. सी. इ. ऍगरमैर याच्या मूळ इंग्रजी पुस्तकातील निवडलेली जीवन चरित्रे, या पुस्तकात एकत्रित केलेली आहेत.

(१) रानटी लोकांना ' येशूचा मार्ग ' दाखविणारी मुलगी
(२) स्विडिश कोकिल
(३) मनोराज्य खरे करून दाखविणारी मुलगी
(४) धैर्यवान क्वेकरी मुलगी
(५) आपला देश स्वतंत्र करणारी तरुणी

या पाच महिला रत्नांची कथा या पुस्तकात दिलेली आहे.

(१) रानटी लोकांना ' येशूचा मार्ग ' दाखविणारी मुलगी.

स्कॉटलंड देशात एबर्डीन शहरात राहणाऱ्या मिस्टर स्लेसर याची मुलगी मेरी हिने आफ्रिकेत जाऊन येशूचे कार्य केले. मेरीची आई ख्रिस्तभक्त होती. तिची इच्छा होती की आपल्या मुलाने येशूचा धर्म जगास शिकवावा. पण तिचे दोन मुलगे वारले. मिस्टर स्लेसर यास दारूचे व्यसन लागले. व्यसन सुटेल म्हणून डंडीस बिऱ्हाड हालविले व कामधंदा पाहिला. पण व्यसन सुटले नाही. घरी पैशाची टंचाई. मेरीची आई व मेरी दोघी कारखान्यातील कामाला जाऊ लागल्या. तरीही मेरीच्या आईची येशूवरील श्रद्धा कमी झाली नाही. किंवा आपल्या मुलींनी येशूचा धर्म शिकवावा ही ओढ संपली नाही. तिन मेरीवरही तेच दृढ संस्कार केले. ती फार शिकलेली नव्हती, तरीही धर्मप्रसारार्थ आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळ असलेल्या ' कॅलबार ' या ठिकाणी गेली. तेथील ' इफिक ' भाषा शिकली. तिथे तिने शाळा चालविली. आपल्या प्रेमळ वर्तणुकीने सर्वांना आपलेसे केले. आवळी–जावळी मुले झाल्यास आफ्रिकन लोक ती जंगलात टाकून देत असत. अशी ही मुले मेरी जंगलात जाऊन आणीत असे, व त्यास येशूचा धर्म शिकवीत असे, त्यांचा सांभाळ मेरी करीत असे. तिने तिथे जम बसविला व श्रद्धेने आपले कार्य चालू ठेवले. एकूण चौतीस वर्षे तिने काम केले. तिने दिलेल्या शिक्षणामुळे कितीतरी दुष्ट चालीरीती आफ्रिकन लोकांनी सोडून दिल्या. तिचे काम पाहून पुढे ब्रिटिश सरकारने तिला आपला प्रतिनिधी नेमले. तिला सारेजण मोठ्या आदराने अंकवा – मोठी आई व गमतीने शुभ्रराणी असे म्हणत.

(२) स्विडीश कोकिळा

जेनी लिंड हिला जन्मतः गोड गळ्याची देणगी होती. गोड गळ्याची देणगी

देवबापाने दिली आहे असा तिच्या आईने आणि आजीने लहानपणापासून केलेला संस्कार तिच्या मनावर बिंबला होता. तिच्या गोड गळ्याने मोहून गेलेल्या अनेक हितचिंतकांच्या प्रयत्नांना यश येऊन निसवत येथील रॉयल थिएटरमध्ये तिची संगीत शिक्षणाची सोय झाली. उत्तम गायिका म्हणून तिला दिगंत कीर्ती व मान-सन्मान मिळाले. पण तिने फक्त देवबापाची गाणी गाऊन भक्तीचा प्रसार केला.

(३) मनोराज्य खरे करून दाखविणारी मुलगी

अमेरिकेतील मॅसाचुसेटस् संस्थानच्या पश्चिम भागातील बकलंड नावाच्या गावाजवळ झाडीतच मि. एरन लायन याचे कुटुंब रहात होते. इ. स. १७९७ च्या २८ फेब्रुवारीस त्यांच्या पाचव्या अपत्याचा जन्म झाला. या मुलीचे नाव मेरी व हिनेच पुढील आयुष्यात एक आगळे मनोराज्य साकार केले.

मेरीचा बाप फार सज्जन मनुष्य होता तो येशूचा श्रद्धावंत होता. आजूबाजूच्या परिसरांत लोकप्रिय होता. त्याच्या सद्‌विचारामुळे अनेकजण सल्ला घ्यायला व भांडण सोडवायला त्याचेकडे येत. मुलावर पण त्याने चांगले संस्कार केले होते. पण दुर्दैवाने तो लवकर मरण पावला. त्याच्यामागे त्याच्या पत्नीवर सात मुलांचा भार पडला. होती त्या जमिनीवर खूप मेहनत करून ती निर्वाह चालवीत होती. मेरीची आई व भाऊ शेतावर गेले की मेरी लहान दोन भावंडाना सांभाळणे, खाऊ घालणे, घर स्वच्छ ठेवणे, जमेल ते सारे काम करीत असे. पण पुढे काही वर्षांनी मेरीच्या आईने दुसरे लग्न केले व ती दुसरीकडे निघून गेली. मेरी व तिचे भाऊ एकटे पडले, वडिलार्जित शेतीवर मेहनत करून ती लहान मुले वाईट दिवस रेटीत होती. या काळात मेरी स्वयंपाकासह सारेच काम करू लागली, त्यातही त्या खेडेगावच्या शाळेत जाऊन जमेल तेवढे शिक्षण ती घेऊ लागली.

वडिलांचे संस्कार व वळण यामुळे आधीच मेरीचे बरेच पाठांतर होते त्यामुळे शिक्षणात थोड्याशा मार्गदर्शनानेही ती चांगली प्रगती करू शकली. हळूहळू 'ॲश-फिल्ड' येथील शिक्षण संस्थेत तिने प्रवेश मिळविला. त्या शाळतील शिक्षण उत्तमप्रकारे पुरे केले. शिक्षणाच्या काळात आर्थिक दृष्टया फार टंचाई जाणवली. अशा वेळेस पिंजण्या-कातण्यापासून स्वतः हाताने तयार केलेल्या रजया, चादरी वगैरे तिने विकल्या व पैसे उभे केले. एवढ्या जिद्दीने बापाचा आधार नसताना ती शिकली व शाळेनंतर पुढील शिक्षण घ्यावे अशी तिची इच्छा होती. परंतु तत्कालीन रूढीनुसार स्त्रियांना कॉलेज शिक्षणास प्रवेश दिला जात नसे. केवळ मुलगी असल्याने आपणास उच्च शिक्षणाचा लाभ घेता येत नाही या गोष्टीचा तिला फार खेद झाला. हे दुःख ती विसरू शकली नाही. त्यामुळे स्त्रियांसाठी एक कॉलेज सुरू करण्याचा निर्धार तिने केला.

त्या काळात मुलींना कॉलेज शिक्षण ही कल्पना सामाजिक रूढीविरुद्ध

असल्याने, त्यासाठी प्रयत्न करताना तिला अतोनात अपमान सोसावे लागले. अवहेलना, अपमान याबरोबर एकाकी सारे प्रयत्न, कष्ट, धडपड तिला करावी लागली पण मेरी लायन हिने सारा भार समर्थपणे पेलला. युनायटेड स्टेट्स मधील मुलींसाठी पहिले कॉलेज मेरी लायन हिच्या प्रयत्नांचे दृश्य फल होय. इ. स. १८३७ च्या हिवाळ्यात मुलींसाठी नवे कॉलेज 'माऊंट होली ऑफ सेमिनरी' तयार झाले. मेरी लायन ही त्या कॉलेजची पहिली प्रिन्सिपॉल झाली. वयाच्या चाळीसाव्या वर्षी तिने आपले मनोराज्य खरे करून दाखविले. वयाच्या बावन्नाव्या वर्षी इहलोक सोडून ती गेली. पण परमेश्वरावरील श्रद्धेमुळे आपण हे करू शकलो असे मरणसमयी ती म्हणाली.

(४) धैर्यवान क्वेकर मुलगी

लक्रीशिया ही एका गलबतावरील कप्तानाची मुलगी. हिचा जन्म १७९३ मध्ये झाला. हिचे कुटुंब क्वेकर पंथाचे होते. पूर्वी प्रॉटेस्टंट लोक या पंथाच्या लोकांचा फार छळ करीत म्हणून त्यांचे कुटुंब युनायटेड स्टेटस मधील मॅसाच्युसेट्स संस्थान सोडून नॅनटकर या बेटावर रहायला गेले. या बेटावरच लक्रीशिया हिचा जन्म झाला. प्रथम एका खासगी शाळेत आणि नंतर सार्वजनिक शाळेत व नंतर न्यूयॉर्क संस्थानातील नाईन पार्टनर्स येथील बोर्डींग स्कूलमध्ये तिचे सर्व शिक्षण झाले. लहानपणापासून घरातील वातावरणामुळे धार्मिक पुस्तकांचे बरेचसे वाचन झाले होते. त्यामुळे सर्व माणसे सारखीच आहेत अशी तिची नितांत श्रद्धा होती. या श्रद्धेतून मोठेपणी तिने मुलांमुलींना समान वर्तणूक असावी, या मताचा आग्रहाने प्रसार केला. गुलामगिरीविरुद्ध तर तिने त्याहीपेक्षा अधिक प्रभावी व प्रखर कार्य केले. तिने देशभर फिरून गुलामगिरी विरुद्ध व्याख्याने दिली. तिचे विस्तृत वाचन, तेजस्वी वाणी, प्रभावी व्यक्तित्व इत्यादी अनेक गुणांमुळे तत्कालीन समाजात, मतपरिवर्तन घडण्यास तिची व्याख्याने अत्यंत प्रेरक ठरली. जेम्स मॉर याच्याशी तिने विवाह केला. गृहिणी, माता या जबाबदाऱ्या तिने समर्थपणे पार पाडल्या. धर्मोपदेशक व शुभवर्तमानाचा प्रसार यासाठी तिने व्याख्याने दिली. गुलामगिरीविरुद्ध चळवळ करताना, कित्येक वेळा प्राणावर बेतले, तरीही तिने आपले कार्य सोडले नाही.

गृहिणी, माता, विदुषी, समाजसुधारक, धर्मोपदेशक अशा अनेक क्षेत्रांत भरघोस व यशस्वी कार्य करून ती वृद्धापकाळाने मरण पावली. राष्ट्रीय पुढारी म्हणून मान्यता पावलेली ही अद्वितीय स्त्री होती.

(५) आपला देश स्वतंत्र करणारी तरुणी

फ्रान्स देशातील एका खेडेगावातील जोन ही एक तरुणी होती. त्यावेळेस फ्रान्सचा असा राजा नव्हता. युवराज चार्लस याला राज्याभिषेक होऊ शकत नव्हता. कारण इंग्लंडच्या राजाने त्या देशात शिरून धुडगूस घालण्यास सुरवात केली होती.

चार्लस दुबळा होता.

जोन प्रकृतीने सुदृढ होती. लहानपणापासून देशप्रेम जाज्वल्य. अनेक देशप्रेमी लोकांच्या पलटणी सतत तिच्या नजरेसमोर तळपत. ती नेहमी स्वतःशीच चिंतन करीत असे. पुढे फ्रान्सच्या विकल अवस्थेत राजाला मदत करण्यासाठी देवदूतांनी तिला आदेश दिले. त्याबाबत तिने आपल्या वडिलांना सांगितले व इतरांना तिच्या मनात काय चालले आहे ते कळले तेव्हा परिसरातील अनेकांनी तिची टिंगल केली. पण अनेक जणांनी असाही विचार केला की देवदूताच्या आदेशानुसार वागल्याने नुकसान तर नाही. मग तिच्या प्रांताच्या सुभेदाराने पत्र व चार स्वार देऊनच जोनला चार्लसकडे पाठविले. चार्लससमोर जोनने असे वीरश्रीचे भाषण दिले की चार्लसला आपल्या दुबळेपणाची लाज वाटली. त्याने लगेच जोनला नेतृत्व देऊन पलटणी सिद्ध केल्या व नंतर चार्लसची अनेक माणसे जोनच्या नेतृत्वाने इंग्रजांविरुद्ध उठली, शहरामागून शहरे त्यांनी परत काबीज केली. ऱ्हास शहरी चार्लसला राज्याभिषेक करण्यात आला. अशा प्रकारे एका खेडवळ मुलीच्या आत्मप्रेरणेची ज्योत, अनंत ज्योती पेटवू शकली व देश स्वतंत्र करू शकली.

इयोबाच्या ग्रंथाचे स्पष्टीकरण – लेखक – आर. वी. डग्लस्, भाषा कृ. अ. केळूसकर.

प्रका. मिस् मोरलंड करिता बी. आर. सी. सी. ची मराठी लिटरेचर कमिटी, मुंबई, तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई–१९३५.

केंब्रिज बायबल सिरीजमध्ये डेव्हिडसन व लँचेस्टर यांनी इयोबा ग्रंथावर जे टीकात्मक पुस्तक इंग्रजीमध्ये लिहिले आहे त्याच्या आधारावर हे पुस्तक लिहिलेले आहे.

अहमदनगर येथील डिव्हिनिटी कॉलेजमधील इंग्रजीमधून इयोबा ग्रंथाचे अध्ययन करीत असलेल्या एका वर्गाला शिकविण्यासाठी या ग्रंथाची टाचणे प्रथम इंग्रजीत केली.

या ग्रंथाचे भाषांतर करण्याचे काम प्रारंभी कृष्ण अर्जुन केळूसकर यांनी केले पण त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे उरलेले काम मनोहर कृष्ण उजगरे यांनी पुरे केले. कॅनन डी. एल. जोशी यांचेही भाषांतराचे कामी मोठे साहाय्य झाले. या पुस्तकासंबंधी काम करीत असताना रे. सु. ना. थोरात यांचे उपयुक्त मार्गदर्शन लाभले याचा उल्लेख केलेला आहे.

इयोबा हा सात्त्विक व सरळ वृत्तीचा पुरुष, सदाचरणी, ईश्वरभक्ती करीत साधे सांसारिक जीवन जगणारा होता. स्वर्ग लोकाच्या सभेत सैतान इयोबाची भक्ती प्रामाणिक नसून, केवळ अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या वैभवासाठी आहे असे सांगतो व त्याच्या भक्तीचा खरेपणा पाहण्यासाठी त्यास क्लेश देण्यास सुचवितो. इयोबाच्या संपत्तीचा ऱ्हास होतो. त्याची मुले घराची भिंत कोसळून मरण पावतात. चोर त्याची

गाढवे, मेंढरे यांचे कळप चोरून नेतात. अशी संकटे येऊनही त्याची भक्तिभावना ढळत नाही. मग पुन्हा स्वर्गलोकी सभा भरली, तेव्हा देवाने इयोबाची वाखाणणी केली. पण सैतानाने म्हटले झाले हे क्लेश त्याच्या जिव्हारी लागणारे नव्हते. त्याच्या हाडामासाला क्लेश होऊ द्या, म्हणजे बघा तो देवाला कशा शिव्या देतो. नंतर इयोबास रक्तपिती फुटते, अंगाला गळवे होतात, अंगाची लाही लाही होते व राखेत बसून आपले अंग खापरीने खाजवावे, अशी अवस्था होते. इयोबा ते करतो आणि म्हणतो, "देवाने चांगले दिलेले तेवढे आम्ही घ्यावे मग वाईट दिलेले का बरे घेऊ नये ?" त्याची ही ईश्वर–श्रद्धा ढळत नाही. अलिफज, बिल्दद, सोफर हे त्याचे सहकारी त्याच्यासाठी शोक करतात. देवावरील श्रद्धेबाबत त्याच्याशी वाद घालतात. देवाच्या अन्यायावर टीका करतात. पण इयोबा आपल्या मित्रांच्या सर्व वादास व भाषणास उत्तरे देतो व देवावरील श्रद्धा प्रकट करतो. त्यानंतर स्वर्गलोकीच्या सभेत इयोबास क्लेश देण्यास प्रवृत्त केल्याबद्दल देव सैतानास दोष देतो. इयोबास पुन्हा सुखाचे व वैभवाचे दिवस येतात. मुले–बाळे होतात. तो दीर्घायुष्य सुखाने जगतो.

इयोबाची ही कथा गोषवारा–रूपाने सांगताना, देव, दानव, सैतान वगैरे बाबतच्या इब्री लोकांच्या समजुती, मनुष्याची जीवनमर्यादा, देवाचा थोरपणा, मानवाने देवाशी कसे वागावे ? देव माणसावर अन्याय करतो काय ? सैतान देवाचा सेवक म्हणून वागतो ते योग्य काय ? मानवाची प्रतिक्रिया काय असावी ? अशा अनेक प्रश्नांचा ऊहापोह झालेला आहे. त्यामुळे पुस्तक विचारप्रवर्तक, चिंतनीय व वाचनीय झाले आहे. मूळ काव्यातील ओव्या क्रमांकानुसार गोषवारा देताना आलेला विचार प्रवर्तक आशय मूळ काव्याची थोरवी सिद्ध करतो.

ईयोबा ग्रंथाची सर्वसाधारण ओळख, नंतर ग्रंथाचे स्वरूप, ग्रंथाचा उद्देश, हा ग्रंथ कधी व कोणी लिहिला हे सर्व सांगितल्यानंतर अध्यायानुसार मूळ ग्रंथाचा आशय दिला आहे. तो गोषवारा–स्वरूप आहे. भाषांतर-स्वरूप नाही. मात्र गोषवारा असेल त्या त्या ओव्यांचे क्रमांक दिले आहेत. ईयोब ग्रंथाचे एकूण ३८ अध्याय गोषवारा रूपात आहेत. गोषवारा देत असतानाच मूळ ग्रंथास आवश्यक ती स्पष्टीकरणे प्रस्तुत पुस्तकात दिलेली आहेत.

खालील विषय प्रामुख्याने आलेले आहेत–

ईयोबाचा सात्विकपणा, ईयोबाची पहिली सत्त्वपरीक्षा, मृत्यू प्राप्त व्हावा अशी ईयोबाची प्रार्थना, ईयोबा आपण निरपराध असल्याचे पुनरपि सांगतो. दुराचारी मनुष्याचे भवितव्य, ज्ञानाचा शोध, ईयोब आपल्या स्थितीचे अखेरचे पर्यालोचन करतो, ईयोबा आपणाला सर्व अपराधापासून मुक्त ठरवितो, देवाने वादळातून ईयोबाला उत्तर देणे, मर्त्य मानवाने देवाशी वाद घालावा काय ? जगाचे नियमन करताना देव अन्याय करतो असे मनुष्यमात्राने म्हणावे काय ? उपसंहार व समारोप,

शी पालक :- अनुवादिका सौ. सुधा सानकर,

प्रकाशक :- एफ्. व्ही. वालिन, जीवनीवचन साहित्यालय, ४०७/५ नाना पेठ, पुणे २. प्रकाशन स्थळ – सर्वोदय मुद्रणालय, ४५०, बुधवार, पुणे २. पृ. १४२

(जेसुईट फादर्स)

संपादकीय – शी पालकचे चरित्र प्रथम इ. स. १९०० साली इंग्रजीतून प्रसिद्ध करण्यात आले. तेव्हापासून या पुस्तकाच्या एकोणतीस आवृत्त्या निघाल्या. युरोपातील व भारतातील अनेक प्रादेशिक भाषांतून भाषांतरे झाली.

कन्फ्युशिअन पंडित व ख्रिस्तसेवक शी पालक–

संपूर्ण नाव – शी शन्ग मो

हा एक चिनी ख्रिस्त सेवक– लहानपणापासून– सद्यःस्थिती, मरणोत्तर विचार यांचा त्याच्या मनात गोंधळ असे. वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने पदवी संपादन केली. पुढे थाटात विवाह झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर आपला हिस्सा घेऊन चान्ग गावी स्थायिक झाला. आधीच वैचारिक दडपणाने तो दुःखी असे. मूलबाळ नव्हते. पत्नी आजाराने लवकरच वारली. मानसिक अस्वास्थ्य अधिक वाढले. कन्फ्युशियन धर्मतत्त्वात त्याच्या प्रश्नास उत्तर मिळेना. शांती देणाऱ्या धर्मासाठी तो तळमळू लागला. त्याच काळात डेव्हिड हिल व त्याचा स्नेही टर्नर त्या भागात आले. त्यांनी त्या लोकांच्या समृद्धीसाठी प्रार्थना केली. त्यांच्या प्रार्थनेला यश आले. पाऊस पडला. या दोन मिशनऱ्यांनी लहान–मोठी पुस्तके, पत्रिका वाटून शुभवर्तमानाचा प्रभाव सांगितला. पुढे १८७९ च्या सुमारास 'शी' ने ख्रिस्तीधर्म स्वीकारला. 'शी' चा मृत्यू १८९६ मध्ये झाला. सतरा वर्षे त्याने ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य केले.

संत रोख वर्तनसाक्षी :- सेबास्टीयन जे. पी.

प्रकाशक – रे. जे. एस्. मिरांडा, कॅथालिक सत्यप्रचार संघाकरिता, मर्सिस चर्च, वसई.

प्रकाशन स्थळ :- न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, केळेवाडी, मुंबई. पृ. ३२ (लेदर्ले) किं. १ आणा.

इ. स. १२८४ साली फ्रान्स देशातील लान्वेडोक भागातील मोन्टेपेलीयर नावाच्या शहरात संत रोखचा जन्म झाला. त्याच्या जन्मासाठी येशूची कृपा झाली होती. जन्मतःच त्याच्या पोटावर क्रूसाची खूण होती. आई-वडिलांच्या उपदेशा-नुसार दीन-दुबळ्यांची सेवा, धर्मोद्धारासाठी प्रयत्न यात आयुष्याचे हित आहे असे मानून आयुष्य खर्च करण्याचे त्याने ठरविले.

आई–वडील गेल्यावर सर्व संपत्ती वाटून टाकली. प्लेगच्या साथीत त्याने रोग्यांच्या हातावर क्रूसाची खूण करावी व रोगी रोगमुक्त व्हावा असा चमत्कार तेथे घडला. अद्भूत घटनांनी चरित्र भरलेले आहे, प्लेग निवारणासाठी त्याने केलेले

प्रयत्न कौतुकास्पद आहेत. तो मरण पावला तेव्हा त्याचेच काका गव्हर्नर होते. पोटावरील क्रूसाच्या खुणेमुळे त्याला लोकांनी ओळखले व सर्वजण हळहळले.

दोन प्राचीन स्त्रीरत्ने – लेखक– अगौस्तीन पेर्नांडिस.

प्रकाशक :– जे. एस्. मिरांडा कॅथालिक सत्य प्रसारक संघ, मर्सिस चर्च, वसई. दुसरी आवत्ती १९४१ पृ. २४.

संत पर्पेतुआ आणि संत आग्नेस यांची १५–२० पानात अल्पचरित्रे या छोट्याशा पुस्तकात दिली आहेत.

ता. ७ मार्च इ. स. २७३ रोजी आफ्रिका खंडाच्या उत्तरेस कारथेज शहरात रेव्होकेटस, फेलिसिटस, सेटर्नीनस यांच्या बरोबरच पेर्पेतुआ हीस कैदेत टाकले. त्यावेळीस पेर्पेतुआजवळ लहान बालक होते व पेर्पेतुआचे वय अवघे बावीस वर्षांचे होते. ती एक अब्रूदार कुलीन घराण्यातील स्त्री होती. एक सज्जन सद्गुणी तरुणाबरोबर तिचा विवाह झालेला होता. तिचा म्हातारा बाप मूर्तिपूजक, धर्माला धरून वागणारा होता. पेर्पेतुआ खिस्ताची अनुयायी होती हाच केवळ तिचा अपराध होता. त्याबद्दल तिला कैद झाली, पुढे तिला अंधारकोठडीत कोंडण्यात आले. प्रथम तिचे लहान बालक तिच्याजवळ देण्यात आले नव्हते. तो पर्यंत तिच्या आईने (पेर्पेतुआच्या) बालकाला सांभाळले. तिचा बाप तिला खिस्ताची निष्ठा सोडून देण्याचा खूप आग्रह करीत असे. येशूची निष्ठा सोडावयास तयार नसल्यामुळे तिला मरणाची शिक्षा झाली.

पेर्पेतुआ व फेलिसिटस या दोन स्त्रियांना सर्व लोकांसमोर संपूर्ण नग्न करून रानटी गाईशी लढण्यास सोडले व नंतर रानटी जनावरांपुढे एका जाळयात ठेवले. रानटी गाईंनी या नाजुक व सुंदर स्त्रियांना खूप दुखापत केली. पण त्या जराही दुःखित दिसल्या नाहीत. झालेल्या दुखापतीवर लगेच फटके मारीत होते. तलवारीचे घाव घालीत होते. अशाप्रकारे अमानुष छळ करून त्यांना मारले. त्यांची प्रेते विश्वासू खिस्ती लोकांनी नेऊन चांगल्या जागी पुरली.

संत आग्नेस – रोम शहरात चौथ्या शतकाच्या आरंभास आग्नेस नावाची सुंदर, श्रीमंत व उदार मुलगी रहात होती. तिचा जन्म श्रीमंत कुलीन घराण्यात झाला होता. तिला आई–वडिलांकडून उत्तम धर्मशिक्षण लाभलेले होते. आजन्म कुमारिका राहून आत्म्याची शुद्धता प्राप्त करून घेण्याची तिने शपथ घेतलेली होती.

लहानपणी शाळेतून येत असताना रोमच्या गव्हर्नरच्या मुलाने तिला पाहिले, तिच्यावर तो मोहित झाला. तिच्या आईबापांकडे गेला व त्याने तिला लग्नासाठी मागणी घातली. आई बापांनी व आग्नेसने लग्नाला नकार दिला. तो मुलगा आशाभंगाने दुःखी झाला व त्याचे पर्यवसान वेडात झाले. रोमच्या गव्हर्नराने माणसे पाठवून मागणी घातली, तेव्हा आग्नेस खिश्चन असून चेटूक करते असे त्याच्या अंमलदारांकडून त्याला कळले. त्याने आग्नेसला कैद करून तुरुंगात ठेवले. तिला गव्हर्नरने खूप आमिषे दाखविली पण तिने नकार दिला. आणि शेवटी धमकी दिली

की " मुली तू ख्रिस्ताला सोड व माझ्या मुलाबरोबर लग्न कर, तेही मान्य नसेल व जर तुला कुंवार राहून देवाची भक्तीच करावयाची असेल तर वेस्ता या देवीची (मूर्तीची) भक्ती कर. नाहीतर तुला फारच वाईट दिवस भोगावे लागतील." पण आग्नेस भ्याली नाही. ख्रिस्ताची निष्ठा तिने सोडली नाही. आग्नेसच्या निश्चयामुळे गव्हर्नर चिडला व त्याने तिला वस्त्रहीन केले. पण त्याच क्षणी तिचे केस इतके लांब व जाड झाले की त्यायोगे तिचे शरीर कापडाप्रमाणे झाकले गेले. देवाने तिला पांढरे वस्त्र पुरविले. गव्हर्नराचा मुलगा तिच्यावर बलात्कार करावयास गेला, तो मरून पडला. पण तिने येशूची प्रार्थना करताच उठला. व मूर्तीपूजेचा धर्म खोटा असल्याचे सांगू लागला. खरा देव ख्रिश्चनांचा आहे असे बोलू लागला, तिला जाळण्याचा व कापण्याचा प्रयत्न झाला. पण तिच्यावर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी तिच्या आईबापांनी तिला सन्मानाने वागविले.

मातीचे सोने करणारा जादूगार – सुमन्त दयानंद करंदीकर,

मिस्. ई. मोर्लंड, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, अमर बिल्डिंग, सर फिरोजशहा मेहता रोड, तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई. इ. स. १९४२ पृ. ५२ (ठोकळ)

मातीचे सोने करणारा जादूगार म्हणजे डॉ. जॉर्ज वाशिंग्टन कार्व्हर याचे चरित्र. हा एक निग्रो होता. त्याची आई निग्रो गुलाम होती. बापाचा तबेला होता. बाप विश्वासू व प्रामाणिक होता. पशुपक्षी, रानटी झाडे, फुले-फळे यांची त्यास विशेष माहिती होती. चित्रे रंगविणे, गायन, वादन करणे असा त्याचा छंद होता. निग्रो असल्यामुळे शिक्षण घेताना त्याला त्रास झाला. कॉलेजमधील मुलांचे कपडे धुऊन उदरनिर्वाहास तो पैसे मिळवित असे. त्याने आयोव्हा संस्थानातील कॉलेजात शेतकीविषयक रसायन शास्त्राचा अभ्यास केला. एम्. एस्सी. झाल्यावर हुशारी पाहून एका रसायनशास्त्र संस्थेवर त्याची नेमणूक झाली. एका निग्रोला अशी नेमणूक मिळणे त्या काळात असाधारण होते. त्याने शेतकऱ्यांची सुधारणा करण्याचे काम हाती घेतले. १९१७ साली 'रॉयल सोसायटी ऑफ आर्टस'चा तो फेलो झाला. १९२२ साली स्पिगर्न मेडल देण्यात आले. १८३९ साली, आपल्या कार्यातील प्राविण्याबद्दल 'थिओडर रूझवेल्ट मेडल' मिळाले. पुढे त्याची कामगिरी लक्षात घेऊन हेन्री फोर्ड यांनी जॉर्जिया येथे स्थापन केलेल्या शाळेला "जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर स्कूल फॉर कलर्ड बॉईज्" असे नाव दिले. तो धार्मिक व पापभीरू होता.

ख्रिस्ती महात्म्यांच्या सहवासात – लेखक – पीटर फिलिप कोलासो,

चुळणे, वसई रोड, ठाणे. प्रका.– S. Athade, at Examiner Press Dalal street Bombay 1, 1960 पृ. (लेदर्लें).

या ग्रंथात १७ कॅथॉलिक धर्मातील संतांची अल्पचरित्रे सांगितली आहेत.

(१) पवित्र मरीयेची थोरवी

देवपुत्र खेरीज करून सर्वोत्तम व सर्वश्रेष्ठ कुमारी माता मरिया होय. आमच्याकरिता तिने आपल्या पुत्राला दुःख सोसण्यास आज्ञा केली.

(२) माथेय टालबोट

जन्म २ मे १८९६ डब्लीन येथे झाला. दारूचे व्यसन. पुढे आयुष्य बदलले. माता मरीयेचे त्याला दर्शन होत असे. तिला हाक मारून एकांतात तो संभाषण करी. इ. स. १९२५ मध्ये मरण पावला.

(३) संत ख्रिस्तोफर

ख्रिस्तोफर म्हणजे ख्रिस्ताचे वाहन करणारा. मूळचा मूर्तिपूजक नंतर ख्रिस्ती झाला. बाप्तिस्मा घेतल्यावर ख्रिस्ताचे जीवन कंठिलें. धर्मासाठी क्लेश सहन केले.

(४) कास्सियाची संत रीता

अन्तोनिओ मॉन्सीनी व अमाटाफेरी यांच्या पोटी जन्मली. १३८६ साली तिचा जन्म झाला. विरक्ती तिचा उपजत गुण होता. घरात एका खोलीत सर्वत्र येशू ख्रिस्त क्लेश व दुःखे दाखविणारी चित्रे तिने लावली होती. तिथे प्रार्थना करीत ती सतत वेळ घालवी. १२ वर्षांची झाल्यावर आई-बापांनी लग्न करून दिले. नवरा तापट व रागीट होता. अशा विरोधी नवऱ्याच्या सहवासात १८ वर्षे गेली. पुढे रीता विधवा झाली. त्यावेळी इटलीमध्ये कान्व्हेंटमध्ये विधवांना घेणे नियमा-विरुद्ध होते. रक्षक संतांच्या पाठबळाने तिला कसातरी प्रवेश मिळाला. १४५६ मध्ये २२ मे रोजी वयाच्या सत्तराव्या वर्षी मरण पावली.

(५) संत मॉनिका

चवथ्या शतकात महामंडळाला जिच्यामुळे महत्त्व प्राप्त झाले, त्या संत मॉनिकाचा जन्म इ. ३३३ मध्ये न्युमिडा येथे झाला. ती एका चांगल्या कॅथॉलिक कुटुंबात जन्मली होती. तिला लहानपणी दारू पिण्याची सवय होती. पुढे सुटली. मॉनिकाचा नवरा धनाढ्य पण व्यसनी, क्रोधी होता. पण आपल्या वागणुकीने तिने त्याला सन्मार्गावर आणले. मुलांनाही विशुद्ध आचरणाचे वळण लावले. इ. स. ३८७ ख्रिस्तवासी झाली.

(६) संत लुईस

संत लुईस हा एक नामांकित फ्रेंच राजा होता. तो उत्तम वक्ता, शूर व योद्धा होता. आठव्या लुईचा तो मुलगा, त्याचा जन्म २५ एप्रिल १२१५ रोजी पाईसी येथे

झाला. त्याच्या आईने त्याला विशुद्ध जीवनाची शिकवण दिली. इतिहास वाचनाची आवड असल्याने त्याने धर्मग्रंथांचा अभ्यास केला. १२२६ मध्ये आठवा लुई मरण पावला, तेव्हा अल्पवयात लुई गादीवर आला. प्रारंभी झालेल्या बंडाळीचा बिमोड केला. मूळ धार्मिक प्रवृत्तीचा असल्यामुळे त्याने इमारती, रुग्णालये, योगीगृह वगैरे बांधली. राजाचे वैभव, सत्ता, शौर्य, धैर्य, बुद्धिमत्ता अशा अनेक गुणांची त्याला देणगी होती. शिवाय संगीत, वक्तृत्व इत्यादी कलांची आवड होती. असे असूनही तो फार धर्मशील वृत्तीचा होता. नेमस्तपणा व आत्मसंयमन हे त्याचे गुण वाखाणण्यासारखे होते. वयाच्या पन्नासाव्या वर्षी २५ ऑगस्ट १२५० मधे तो मरण पावला येशूचा काटेरी मुकुट मस्तकावर चढवून जीवन जगलेला हा राजा आणि संत म्हणून दोन्ही तऱ्हेने अत्युच्च योग्यता असलेला हा अद्वितीय राजा होता.

(७) संत थोमा

येशूने धर्मप्रसारासाठी पाठविलेल्या १२ शिष्यांपैकी एक. त्याचे चरित्र "भारतात आलेले प्रेषित" या ग्रंथात आले आहे. (याचा सण २१ डिसेंबर)

(८) संत कोल्युमकिल

आयर्लंडमधील क्टिस लोकांचा प्रेषित. जन्म इ.स. ५२१ मध्ये टिर्कोनेलमध्ये झाला. इ. स. ५४६ मध्ये धर्मगुरू झाला. इ. स. ५५० डेअरभाग मध्ये मोठा आश्रम बांधला. ९ जून ५९७ मध्ये इहलोक सोडून गेला.

(९) संत जॉन गॉलबर्ट

अकराव्या शतकात इटाली देश फ्लॉरेन्स शहरात याचा जन्म झाला. भावाचा ह्यूगाचा खून झाला. त्याचा सूड घेण्यासाठी प्रवृत झाला पण शेवटी पर्यवसान मैत्रित झाले. मानवजातीच्या सुधारणेसाठी झटला.

(१०) पश्चात्तापी जोनथास

सीरियामध्ये जोनथास नावाचा एक चोर होता. ईश्वरी कृपेने एकदा त्याच्या मनात पश्चात्तापाचे विचार निर्माण झाले. संत सायमनच्या स्तंभाजवळ त्याने पश्चात्ताप व्यक्त केला. न्यायाधिकारी त्या स्तंभाजवळ त्याला पकडायला आले तेव्हा ज्या ईश्वरी शक्तीच्या प्रेरणेने तो तिथे आला ती त्याला तारील असे त्यान सांगितले. त्याला कुणी पकडले नाही. सात दिवस तो तिथेच राहिला मग काही दिवसांनी मरण पावला.

(११) संत पीटर

येशूने धर्मप्रसारासाठी निवडलेल्या बारा शिष्यांपैकी हा एक. इ. स. ६६ साली रक्तसाक्षी झाला. ख्रिस्त तत्त्वासाठी छळ सोसला. याला क्रूसावर देण्यात आले.

(१२) संत जॉन ब्रिटो

जन्म १ मार्च १६४७ मध्ये झाला. लहानपणी त्याला मोठे दुखणे झाले. दुखण्यात मुलगा बरा झाला तर त्याला 'सोसायटी ऑफ जीजस'मध्ये पाठवीन असा आईने नवस केला होता. त्याप्रमाणे तो बरा झाल्यावर, वयाच्या १२ व्या वर्षी त्याला त्या सोसायटीत पाठविले. त्याला सर्वजण बालप्रेषित म्हणत. वयाच्या १४ व्या वर्षी त्याने येशूचे बोलावणे स्वीकारले व आईचा निरोप घेतला. हिंदुस्थानात मदुरा मिशनचे काम त्याने केले. १६९३ साली त्याचा वध झाला, मरणसमयी त्याचे वय ५६ वर्षांचे होते.

(१३) संत ब्रिजेट

जन्म इ. स. ४५३ मध्ये फॉची येथे. तिचा बाप राजवंशातील असून आई दासी होती. ती बारा वर्षांची असताना संत पट्रीकचा तिला आशीर्वाद मिळाला. त्यावेळे-पासून ईश्वरप्रीती तिच्या मनात ठसली. नम्रता, ईश्वरी श्रद्धा, गरिबांची दया हे गुण तिच्या अंगी लहानपणापासून होते. बिशपच्या परवानगीने एक कान्व्हेंट स्थापन करण्यात आले. तिची 'सुपिरीअर' म्हणून ब्रिजेट काम करू लागली. मठवासिनी ब्रिजेट इतकी लीन होती की मेंढरे चारण्याच्या कामाकरता ती स्वतः जाई. अनाथ अपंगांच्या सेवेत तिचे सारे आयुष्य गेले. तिने काम केलेल्या संस्था आयर्लंडमध्ये ठिकठिकाणी आहेत. हे काम केल्यावर १ फेब्रुवारी ५२३ मध्ये मरण पावली. आयर्लंडमध्ये तिला द्वितीय मारिया म्हणतात.

(१४) संत थॉमस अवकानास (अक्वीनीस)

जन्म इ. स. १२२५ मध्ये झाला. हा एका उमरावाचा मुलगा होता. पाचव्या वर्षी त्याला माऊंट कॉसिनच्या प्रसिद्ध आश्रमात पाठविण्यात आले. या आश्रमात तो अकरा वर्षे राहिला.

इ. स. १२४१ मध्ये त्याला नेपल्स विद्यापीठात पदवी घेण्यासाठी, पाठ-विण्यात आले. तेथे डॉमनिक भिक्षूंशी त्यांचा संबंध आला, व त्याने लवकरच १२४४ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी डॉमनिकन संघामध्ये प्रवेश केला. थॉमस हा माऊंट कसिनोचा अधिपती व्हावा अशी घरच्यांची इच्छा होती. त्यासाठी त्याच्या अनेक प्रकारे विनवण्या व प्रयोग केले पण तो बधला नाही. तो फार कमी बोले म्हणून त्याचे सहकारी त्याला मुका बैल म्हणत. तो ७ मार्च १२४७ रोजी फोसा-कोव्हा येथे अनाथ सिस्टर्सिअनच्या योगीगृहात मरण पावला.

(१५) संत फिलीप

येशूने धर्म प्रसारासाठी निवडलेल्या १२ शिष्यांपैकी एक जण. योहानचे प्रवचन ऐकणारामध्ये हा होता. येशूची भेट होण्यापूर्वी याने तारकाचे भाकित केले

होते. येशू भेटल्यावर हाच तो तारणारा असे ओळखले. धर्म प्रसाराचे काम याने उत्तम रीतीने केले. सिथिया मधील रानटी, अज्ञानी तंबूत राहणाऱ्या लोकांसही त्याने खरा धर्म शिकविला. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारामुळे त्याला क्रूसावर लटकावे लागले. ज्यांनी क्रूसावर चढविले त्यांच्यासाठी त्याने प्रार्थना केली.

(१६) संत गोन्सालो गार्सिया

जन्म इ. स. १५५६ च्या अखेरीस किंवा १५५७ च्या आरंभी वसई गावी. बाप पोर्तुगीज सरदार व आई वसईची. १५८० च्या सुमारास जेसुईटांना वसईचा किल्ला सोडून जाणे भाग पडले. त्यावेळी त्याने आपल्या बरोबर गार्सियाला जपानला नेले. त्यावेळेस तो २०–२५ वर्षाचा होता. त्याचा स्वभाव मनमिळाऊ व गोड असल्यामुळे त्या लोकांत धर्मप्रसारासाठी अडथळा आला नाही. आठ वर्षे त्याने तिथे धर्मशिक्षकाचे काम केले. पुढे व्यापारी धंदा सुरू केला. फ्रान्सिस्कन ब्रदर म्हणून मोठ्या उत्साहाने आपल्या सहकाऱ्यांसह जपानमध्ये देवदत्त धर्माच्या प्रसारासाठी तो हिंडला. त्याच वेळेस बौद्ध धर्मातील लोकांना त्याच्या कार्याचा मत्सर वाटून त्यांनी या, फ्रान्सिस्कन ब्रदर्सना मारण्याचे योजिले. १५९६ मध्ये ८ डिसेंबर रोजी गार्सियास त्याच्या काही सहकाऱ्यांसह कोंडून ठेवण्यात आले. त्याला नागासाकी येथे नेऊन खड्डयात क्रूसावर मारण्यात आले.

(१७) संत जॉन बर्गमन्स

बेल्जियममधील चांभाराचा मुलगा. याचा जन्म १५९९, २३ मार्च रोजी झाला. धर्मगुरू व्हावे अशी त्याची इच्छा. कॅमॉन फेमो नावाच्या एका फादरने त्याचे शिक्षण व पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारली. २४–९–१६१६ त्याने येशू संघात प्रवेश केला. २३–८–१६२१ रोजी वयाच्या २२ व्या वर्षी मरण पावला.

संत फ्रान्सिस झेविअरचे जीवन चरित्र–

संपादक – रेजिनाल्ड गोन्सालिव्स, प्रकाशक – रे. रेजिनाल्ड गोन्सालिव्स, प्रिन्स ऑफ वेल्स ड्राईव्ह. प्रकाशन स्थळ – संत पॅट्रिक प्रेस, पुणे. १, १९५२.

(फादर शेळके – कराड)

संत फ्रान्सिसचा जन्म स्पेन देशात झेविअर नावाच्या किल्ल्यात ७ एप्रिल १५०६ रोजी झाला त्याचे पूर्वज, वडील भाऊ सैन्यात भरती झाले होते. पण फ्रान्सिसचा या कामाकडे कल नव्हता. त्याला लहानपणापासून लिहिण्या–वाचण्याची आवड होती. म्हणून तरुण वयापर्यंतचा काळ विद्या शिकविण्यात घालवला. तो पॅरिस विश्वविद्यालयात डॉक्टरची पदवी मिळवून, तेथेच अध्यापक झाला. तेथे त्याने कुशल अध्यापक म्हणून लौकिक मिळविला. त्याची बुद्धी तीव्र होती. तो स्वभावाने गंभीर, थोर मनाचा, नीव वर्तनाचा तिटकारा व कुणालाही न भिणारा असा होता. त्याचे

वागणे बोलणे मोहक असल्याने अनेक जण त्याच्याकडे आकर्षिले जात. प्रारंभी काही काळ तो गर्विष्ठ, कीर्तीचा भुकेला होता. पण परमेश्वराने कृपा केली व त्याचा दुर्गुण कमी झाला. पॅरीस शहरात त्याची इग्नेशियस लायोलाकराशी ओळख झाली. इग्नेशिअसच्या सहवासात ऐहिक कीर्तीची आस कशी फसवी आहे ते त्यांच्या लक्षात आले. त्याच्या सल्ल्यानुसार फ्रान्सिसही ईश्वरचिंतनात मग्न होऊ लागला. लवकरच त्याने इग्नेशिअसने स्थापन केलेल्या येशू संघात प्रवेश केला. इ. स. १५३६ मध्ये पॅरिसचे वास्तव्य सोडून व्हेनिस, रोम वगैरे शहरांतून त्याने लोकसेवेचे काम केले. इ. स. १५४१ मध्ये 'पवित्र शास्त्राच्या'च्या प्रसाराचे कार्यासाठी फ्रान्सिस हिंदुस्थानात गोवे शहरी दाखल झाला. लोकसेवा, रुग्णशुश्रुषा, परमेश्वरी धर्माचे आचरण करीत, फ्रान्सिसने खिस्ती धर्माचा प्रसार केला. प्रेषितांचे अनेक चमत्कारही तो करीत असे. मेलेल्यास जिवंत करणे, रोग बरे करणे वगैरे. अशा प्रकारच्या चमत्कारांमुळे लोकांची त्याच्यावर व त्याने शिकवलेल्या धर्मतत्त्वावर श्रद्धा बसत असे. त्याच्या प्रसारकार्यात हिंदुस्थानात पुजारी, ब्राह्मण त्याचे मोठे वैरी झाले. त्यांच्या विरोधाचा फ्रान्सिसला पुष्कळ त्रास झाला. त्याच्या झोपडीस आगही लावण्यात आली. पण परमेश्वराने त्याचे रक्षण केले. अनेक प्रकारचा विरोध व अडचणी यांना तोंड देऊन फ्रान्सिसने आपले कार्य गोवा, त्रावणकोर, मानार बेट, तोलो शहर, अशा ठिकाणी हिंडून येशू संघाचे कार्य यशस्वी केले. चीन, जपान, आशिया या भागातही तो हिंडला. धर्मकार्यासाठी हिंडून अडचणी सोसून फ्रान्सिसच्या प्रकृतीवर पुष्कळ परिणाम झाला. तो फार अशक्त झाला. या भ्रमंतीत सनवोअर बेटावर इ. स. १५५२ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यावेळी त्याचे वय फक्त ४५ वर्षांचे होते. त्याचे प्रेत गोव्यात आणून ठेवण्यात आले.

फादर स्टीफन्स यांचे जीवन चरित्र आणि वाङ्मय

लेखक :- प्रा. शांताराम बंडेलू, प्रका.- प्राचार्य टी. बार्नबस, अहमदनगर कॉलेज अहमदनगर. इ. १९५४, पृ. ४ + ५३. (नगर कॉलेज)

थॉमस स्टीफन्सचा जन्म इ. स. १५४९ मध्ये एका घरंदाज कुळात बुल्स्टन येथे बुल्कशायर परगण्यात झाला. त्याच्या जन्मानंतर त्याचे वडील लंडन येथे जाऊन स्थायिक झाले आणि व्यापारात पडले. या क्षेत्रात त्यांनी बरीच मान्यता मिळविली. त्यांचा समावेश लंडनमधील तत्कालीन मोठ्या श्रेष्ठींत होऊ लागला. यामुळे लहानग्या थॉमसवरही व्यावहारिक जगासंबंधीचे संस्कार झाल्याशिवाय राहिले नसतील. त्याच्या कौमार व युवा अवस्थेतील जीवनासंबंधी फारच थोडी माहिती उपलब्ध होऊ शकते.

त्याचे शिक्षण ऑक्सफर्ड येथील न्यू कॉलेजमध्ये झाले, असा उल्लेख सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांनी "एन्सायक्लोपिडिआ ब्रिटानिका" मधील 'भारत'

विषयक लेखात केला असल्याचे प्रा. बंडेलू करतात. पण खुद्द लेखकास तसे वाटत नाही. ऑक्सफर्ड येथील विद्यार्थ्यांच्या रजिस्टरमध्ये तसा पुरावा नाही, असे सांगून तेथे न्यू कॉलेजमध्ये शिक्षण घेतलेला 'रिचर्डस स्टीफन्स' हा थॉमसचा भाऊ असावा असा अंदाज प्रा. बंडेलू व्यक्त करतात. या संबंधी उलट सुलट मते देऊनही फादर स्टीफन्सचे शिक्षण नेमके कोठे झाले या बाबत निश्चित विधान न करता, ऑक्सफर्डमध्ये शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तत्कालीन सुप्रसिद्ध कॅथॉलिक विद्यार्थ्यांशी त्याचा परिचय होता, असे अनुमान काढल्यास चुकीचे ठरणार नाही असे लेखकास वाटते. अभ्यासक्रम संपल्यावर त्याचा थॉमस पाऊंडेशी (Thomas Pounde) त्याचा परिचय झाला. आकांक्षा व अभिरुची यांत बरेच साम्य असल्यामुळे त्यांचे मैत्रीचे संबंध दृढ झाले. पुढे ज्यावेळी इंग्लंडमध्ये कॅथॉलिकांची छळणूक उत्तरोत्तर वाढू लागली. त्यावेळी पाऊंडेच्याच घरी त्याला निवारा सापडला. कॅथॉलिकांच्या आणि विशेषतः सुस्थितीतील कॅथॉलिकांच्या हालचालींवर पाळत ठेवणाऱ्या प्रॉटेस्टंट शेजाऱ्यांना चकविण्याकरिता पाऊंडे मालक व स्टीफन्स त्याचा नोकर अशा रीतीने ते दोघे राहू लागले. या स्थितीत त्यांनी दोन वर्षे घालविली पण त्यांच्या हृदयातील ध्येय ज्योत त्याला स्वस्थ बसू देईना. त्याच्याजवळ जे पैसे होते ते व जवळच्या वस्तू विकून जो पैसा उभा करता आला तो एकत्रित करून रोमला जाण्याच्या पहिल्या संधीचा फायदा घेण्याचा त्यांनी निश्चय केला. पण दुर्दैवाने पाऊंडे ज्या गृहस्थाकडे राहात होता, त्याने विश्वासघात केल्यामुळे एलिझाबेथ राणीच्या अधिकाऱ्याच्या हाती तो पडला. आणि दीर्घकाळ तुरुंगवास त्याच्या नशिबी आला. आपल्या मित्रावर कोसळलेल्या संकटाने स्टीफन्स अत्यंत दुःखी झाला आणि एकटाच रोमला निघाला. तेथे 'येशू संघा' च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपणास संस्थेत प्रविष्ट करून घ्यावे असे विनंती पत्रक त्याने सादर केले. आपल्या प्रमाणेच पाऊंडेलाही त्याच्या अनुपस्थितीत प्रवेश द्यावा अशीही विनंती केल्या-शिवाय तो राहिला नाही. स्टीफन्सचा विनंती अर्ज लगेच मान्य झाला व नवागत म्हणून सेंट अंड्रियाच्या रोमन सेमिनरीत त्याने २० ऑक्टोबर १५०५ मध्ये प्रवेश केला. या उमेदवारीच्या काळात पुष्कळ देशबांधवांशी व पूर्वी ऑक्सफर्ड विद्या-पीठात असलेल्यांशी त्याचा परिचय झाला.

अशा रीतीने नवागत म्हणून संस्थेत प्रवेश केल्यावर व तेथे स्थिरावल्यावर एका नवीनच महत्त्वाकांक्षेने त्याचे हृदय प्रस्फुरित झाले. हिंदुस्थानात जाऊन आयुष्याच्या शेवटपर्यंत तेथे धर्मप्रसाराचे कार्य करावे ही त्याची महत्त्वाकांक्षा होती.

तत्त्वज्ञान आणि आध्यात्म या विषयात नैपुण्य मिळविल्यावर, आपली रवानगी भारतात करावी अशी त्याने आपल्या वरिष्ठांना विनंती केली. फादर इव्हेरार्ड मक्युरिअन हे त्यावेळी संस्थेचे प्रमुख होते. त्यांनी स्टीफन्सची विनंती मान्य केली. त्यानंतर रोमहून त्याची रवानगी लिस्बनला झाली. आणि तेथून ४ एप्रिल १५७९

ला निघणाऱ्या पाच बोटींच्या काफिल्यापैकी एकीतून भारताकडे येण्यास तो निघाला. २४ ऑक्टोबर १५७९ रोजी गोमंतकाच्या गोव्याच्या कर्मभूमीवर त्याने पाय ठेवला.

काही वर्षे गोव्यास धर्मोपदेशक व पुढे पाच वर्षे साष्टी कॉलेजचा रेक्टर म्हणून त्याने काम पाहिले. यानंतर उरलेली चाळीस वर्षे साष्टीस ब्राह्मण कथॉलिकात धर्मोपदेशकाचे पवित्र कार्य करण्यात घालविली आणि तो त्या लोकांत 'पाद्री एस्तेवा' या नावाने प्रसिद्धीस आला.

सेंट आंड्रिया येथे उमेदवार असताना त्याच्या स्वप्नात एक अज्ञात इमारत नेहमी दिसे. पुढे साष्टीस आल्यावर 'जेजुइट हाऊस' त्याचे निवासस्थान झाले. त्याच्याशी या स्वप्नातील इमारतीचे साम्य होते असे सांगतात. त्याची कार्यनिष्ठा व लोकांची त्याच्यावर असलेली भक्ती पाहून त्याच्या वरिष्ठांनी साष्टीच्या जनतेलाच त्याच्या सेवेचा लाभ मिळू दिला. तो सर्वांच्या उपयोगी पडे ज्या इंग्लिश प्रॉटेस्टंटांनी त्यांच्या मित्राचा छळ केला त्यांनाही सल्ला देण्यास व सहाय्य करण्यास तो नेहमी तयार असे. कॅथॉलिकांची छळणूक करणाऱ्या इंग्लंडमधील प्रॉटेस्टंट बांधवांना सहाय्य करताना त्याची देशभक्तीच अधिक दिसून आली. इ. स. १८५३ मध्ये गोव्यास असलेल्या राल्फ फिट्च, जॉन न्यूबरी, लीडस् आणि स्टोरी या चार इंग्रज व्यापाऱ्यांना पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी जेव्हा मत्सरग्रस्त होऊन बंदिस्त केले तेव्हा अधिकाऱ्यांवरील आपल्या वजनाचा उपयोग करून स्टीफन्सने त्यांची सुटका केली.

साष्टीच्या ब्राह्मण कॅथालिकांच्या सेवेत त्याने आपल्या आयुष्याची चाळीस वर्षे घालविली. या काळात धर्मांतर करणाऱ्यांची संख्याही त्याने वाढविली. त्याची वाङ्मय सेवाही तितकीच महत्त्वाची आहे.

फादर स्टीफन्स वयाच्या सत्तराव्या वर्षी म्हणजे १६१९ मध्ये ख्रिस्तवासी झाला. त्याचे अवशेष रायचूर येथे पुरले असावेत असे एक मत आहे. गोव्याचे गव्हर्नर फर्नाओंद अल्बुकर्कने गोव्याहून पाठविलेल्या पत्रात 'याच शहरी' म्हणजे गोव्यात ते दिवंगत झाले असा उल्लेख केला आहे. अर्थात त्यांचे अवशेष निश्चितपणे कुठे पुरले ह्या संबंधात आज तरी निश्चित माहिती उपलब्ध नाही.

प्रा. बंडेलू यांनी अतिशय ओघवत्या भाषेत माहितीपूर्ण असे हे चरित्र लिहिलेले आहे. विशिष्ट ठिकाणी आपली मतभिन्नता नोंदविलेली आहे. तसे हे एक चिकित्सापूर्ण चरित्र म्हणता येईल. याच पुस्तकामध्ये फादर स्टीफन्सच्या ख्रिस्तपुराण इ. स. १६३४ फादर कुवाचे, सेंट पीटरच्या चरित्रावरील मराठी पुराण. तीन भागातील १५,००० ओवीसंख्या असलेले राचोल येथील जेसुईट कॉलेजचा डायरेक्टर फादर ॲटोनिओ–द–सालढाणा याचे 'ख्रिस्ताचे वधस्तंभारोहण' अभंग वृत्तांत रचना फादर सालढाणाचे 'सेंट ॲथनीच्या जीवनचरित्रावर मराठी भाषेत ओवी

वृत्तांत काव्य व फादर गासपर द एस्. मिगेल याचे ख्रिस्ताचे वधस्तंभारोहण ओवी संख्या ३००० या संबंधी थोडक्यात माहिती येते.

सेंट ऑगस्टीन ह्यांचे पाप निवेदन

अनुवादक-रे. सि. ग. नवलकर, प्रका.-सुमन्त दयानंद करंदीकर, सेक्रेटरी-बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड सोसायटी मुंबई. नागरिक मुद्रणालय, आग्रा रोड, नासिक. इ. स. १९५५ पृ. ५५ (लेदर्ली).

मूळ पुस्तकातील अध्याय ८ व ९ यांचा हा अनुवाद आहे.

प्रास्ताविकात सेंट ऑगस्टिन याचे छोटे चरित्र दिले आहे. त्यानंतर आभार वगैरे Confessions या पुस्तकाची अनेक इंग्रजी भाषांतरे झाली आहेत. त्यापैकी मेसर्स जे. एम्. डेन्ट ॲण्ड सन्स लि. लंडन यांनी प्रकाशित केलेल्या डॉ. ई. बी. पुसे डी. डी. यांच्या इंग्रजी भाषांतरावरून प्रस्तुतचा अनुवाद केलेला आहे.

सेंट ऑगस्टीन यांचें छोटे चरित्र

याचा जन्म इ. स. ३५४ उत्तर आफ्रिकेतील न्युमिडिया प्रांतात झाला. वयाच्या सतराव्या वर्षी अध्ययनासाठी तो कार्थेज शहरी गेला. उत्तम वक्ता होण्यासाठी अलंकारशास्त्राचा अभ्यास केला. सिसरोच्या लेखांची पारायणे करीत असतानाच मानवी पंथाकडे लक्ष वळले. पुढे इटालीतील मिलान शहरी वक्तृत्वशास्त्राचा अध्यापक म्हणून काम पाहू लागला. बिशप अंवोज या नाणावलेल्या वक्त्याच्या भाषणाचा त्याच्यावर सुपरिणाम घडल्यामुळे पुढे मतपरिवर्तन होऊन त्याने ख्रिस्त धर्माचा स्वीकार केला. पुढील आयुष्य हिपो येथे बिशप म्हणून काम करण्यात गेले. तेथे इ. स. ४३० मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी त्यास मृत्यू आला.

अखेरच्या काळात ऑगस्टीनने विपुल ग्रंथरचना केली. आपले चरित्र त्याने अत्यंत प्रामाणिकपणे लिहून ठेवले आहे. Confessions या नावाने ते प्रसिद्ध असून, त्याचे एकूण तेरा अध्याय आहेत.

तारुण्याच्या काळात अनेकदा दुर्विकारांच्या तडाख्यात तो सापडला होता. त्याच्या धार्मिक वृत्तीच्या आईने त्याला सन्मार्गी आणण्यासाठी अनेक प्रयत्न केले व अखेरीस तिच्या प्रयत्नास यश आले.

अनुवादित केलेल्या आठव्या अध्यायात आपल्या परिवर्तनासंबंधी हकिकत व नवव्या अध्यायात आपल्या मातेच्या सद्धर्माचरणाचे वर्णन केलेले आहे. अनुवादाची भाषा प्रौढ- प्रगल्भ असून, काहीशी क्लिष्ट आहे. त्यासंबंधी अनुवादकाने आपली भूमिका मांडताना मूळ इंग्रजी ग्रंथात क्लिष्टता असल्यामुळे भाषांतरात येणे अपरिहार्य आहे असे म्हटले आहे.

एकनिष्ठ

प्रका. आ. मोन्तोल्वो ये. सं. डि नोबिली कॉलेज, पुणे, डिसेंबर १९५७ पृ. १६.

इ. स. ५४ ते ६८ पर्यंत नेरो नामक एका क्रूर बादशहाने रोमवर राज्य केले. त्याने असा वटहुकूम काढला की, ' जगणे हा ख्रिस्ती लोकांचा हक्क नव्हे. ' यास्तव त्याच्या कारकीर्दीत संत पेत्र व संत पोल हे प्रेषित रक्तसाक्षी म्हणून मरण पावले.

यानंतर १०० वर्षांनी त्याच देशात संत पोलिपार्क यांचा धर्मासाठी होम करण्यात आला. त्याची हकिकत स्मिरना येथील लोकांनी एका पत्राद्वारे सर्व ख्रिस्ती लोकांस कळविली. पोलिकार्प विषयीचे हे पत्र स्मिरना येथून लिहिलेले असून ते प्रमाणभूत आहे या विषयी कोणाच इतिहास संशोधकास संशय नाही. हे पत्र इ. स. १५६ साली लिहिलेले आहे.

पत्रातील आशय

फिलोमेलियुम येथील व जगातील सर्व कॅथॉलिक धर्म मंडळास स्मिरना येथल्या देव मंडळाचा सप्रेम नमस्कार. आम्ही रक्तसाक्ष्यांची पण विशेषतः महात्मा पोलिकार्प याची हकिकत तुम्हांस कळविणार आहोत. महागुरू पोलिकार्प सर्वांच्या शेवटी मरण पावले. अखेरीस त्यांचा विश्वासघात होऊन त्यास मरण आले. त्याच्यापूर्वी कित्येक रक्तसाक्षीस फटक्यांची शिक्षा भोगावी लागली. कित्येकांची शरीराची कातडी लोंबत राहिली. काहींना चित्तेवर जिवंत जाळण्यात आले. काहींना रानटी जनावरांपुढे टाकण्यात आले. इतर काहींच्या शरीरावर दंताळे फिरविण्यात आले. कोवळ्या वयाच्या तरुण धर्मवीरांना आमिषे दाखवून मन वळविण्याचे प्रयत्न झाले. पण यापैकी कोणत्याही प्रकारच्या छळाला भिऊन वा कंटाळून आपला ख्रिस्तधर्माचा आग्रह या धर्मवीरांनी सोडला नाही. वृद्ध पोलिकार्प अनेकांना धीर देत होता. प्रथम काही काळ तो लपून छपून राहिला व धर्मवीरांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करीत राहिला. सरतेशेवटी त्यालाही पकडले. हेरोद नामक सुभेदाराने त्यास म्हटले " बादशहा देव आहे. त्याच्या मूर्तीची पूजा करण्यात काय वाईट आहे ? " पोलिकार्प यास बादशहाच्या मूर्तीची पूजा करण्याची सक्ती होऊ लागली. तेव्हा अखेरीस पोलिकार्पने तसे करण्याचे स्पष्टपणे नाकारले. हेरोदाने त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण यश येत नाही असे पाहून चालत्या गाडीतून त्याला खाली ढकलले. त्याला जबर मार बसला. अखेरीस पोलीकार्पला जिवंत जाळण्याचा आदेश दिला गेला. त्याला चित्तेवर खिळविण्यात येऊ लागले तेव्हा पोलीकार्पने म्हटले " राहू द्या, मला खिळू नका. धीर देणारा येशू तुमच्या खिळ्यांशिवाय स्थिर रहायला मला मदत करील. " मग त्याला फक्त दोरीने बांधले व जिवंत जाळले. त्याच्या अस्थी ख्रिस्तप्रेमी जनांनी मोती वेचावीत अशा काळजीने जपून ठेवल्या.

संत इग्नाती लोयोलाकार यांचे संक्षिप्त जीवन चरित्र

अनुवादक–जॉन डिमेलो. प्रका. ज. बरांको ये. सं.

सेन्ट झेविअर्स हायस्कूल, मुंबई १. १९५७ (लेदर्ले)

लेखकाने अर्पण पत्रिकेत "माझ्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक स्वास्थ्यासाठी आस्थेने झटणारे आणि माझ्या लेखनास उत्तेजक शब्दांनी उत्स्फूर्त करणारे माझे काका इग्नेशियास" असे म्हटले आहे. ते पुस्तक स्वतःच्या काकांस समर्पण केले आहे.

आत्म्याच्या मुक्तीचे कार्य करावे व अधिकाधिक हृदये येशूच्या सन्निध आणावीत या हेतूने संत इग्नातीने धर्मगुरूंचा एक संघ स्थापन केला या संघाचे नाव 'येशू संघ' होय.

संत इग्नातीच्या हयातीतच येशू संघाची चळवळ आशिया, आफ्रिका, अमेरिका या खंडात पसरली होती. येशू संघाने सामाजिक धार्मिक आणि शैक्षणिक बाबतीत अमोल कामगिरी केली होती.

संत इग्नातीच्या असामान्य व्यक्तित्वाचा सोळाव्या शतकावर मोठा प्रभाव पडलेला आहे.

त्याचे पिताजी आस्ट्रेन हे प्रथम श्रेणीचे इतिहासकार. त्यांनी येशू संघाचा विस्तृत इतिहास लिहिला. त्यांनी संत इग्नाती यांचे चरित्र लिहिले ते इतके लोकप्रिय झाले की त्यांची जर्मन, इटालियन, पोर्तुगीज भाषेत भाषांतरे झाली. त्यांचेच इंग्रजी भाषांतर १९२७ साली फादर रॉबर्ट हल, ये. स. यांनी केले. त्या इंग्रजी अनुवादावरून हा मराठी अनुवाद केलेला आहे.

यामध्ये इग्नातीच्या चरित्रातील महत्त्वाच्या घटना तेवढ्या घेतल्या आहेत. विवाद्य संशयास्पद घटना सोडून दिल्या आहेत.

संक्षिप्त चरित्र

स्पेन देशात गिपुझकोआ प्रांतात अझपेलिया नावाच्या शहराजवळ लोयोला नावाच्या लहानशा गावात १४९१ साली संत इग्नातीचा जन्म झाला. त्याचे कुटुंब मोठे होते, सुस्थिर होते. पुर्वायुष्यात इग्नाती एक सरदार होता. एका युद्धप्रसंगी निकराने लढताना, तो प्राणघातक जखमा झाल्यामुळे घायाळ झाला. त्या जखमांच्या दुखण्यामुळे बराच काळ अंथरुणावर होता. बरे वाटू लागल्यानंतर पराक्रमी जीवन जगण्यास आपण शारीरिक दृष्ट्या असमर्थ झाल्याचे त्याच्या व सर्वांच्याच लक्षात आले. आजारपणात वेळ जाण्याचे साधन म्हणून त्याने येशू चरित्र व इतर बरीच पवित्र शास्त्राची पुस्तके वाचली होती. त्याचा त्याच्या मनावर परिणाम होत होता. आता पराक्रमी सरदार होण्याचे जीवनाचे स्वप्न पण साकार होणार नव्हते. त्यामुळे या आघातानंतर इग्नाती संत प्रवृत्तीकडे झुकला व आपले जीवन ईश्वराला वाहून घेण्याचे त्याने ठरविले.

काही निमित्त काढून तो घरातून बाहेर पडला. कुठेही देवळात रानात एकटेच राहून त्याने पुष्कळ वेळा, प्रदीर्घ कालावधीचे चिंतन केले. ऐहिक जीवनातील सैतानाचा मनावरील पगडा दूर सारण्याचा त्यान सतत प्रयत्न केला. या साऱ्या जीवनामुळे अतोनात मानसिक क्लेश अनुभवले. त्यामुळे आधीच आघाताने दुर्बल झालेल्या त्याचे शरीर आणखीच अशक्त होत गेले. चिंतनाचे काळात भूक तहान याकडे त्याने कधीच लक्ष दिले नाही. भिकाऱ्यासारखा वेष करून तो राहात असे. त्याच्या या विचित्र वेषामुळे कधी त्याला हाकलून दिले जाण्याजोगे वाईट अनुभवही आले. पण कालमानाने हळूहळू लोकांच्या असेही लक्षात येऊ लागले की हा भिकारी साधा नव्हे. त्याच्या विचारांनी प्रभावित होऊन कित्येक जणांची त्याच्यावर श्रद्धा बसली.

प्रत्यक्ष व्यवहारातील शैक्षणिक पात्रतेचे शिक्के इग्नातीजवळ नव्हते, पण पुष्कळ काळानंतर उशिरा का होईना त्याची गरज इग्नातीच्या लक्षात येऊन नंतर त्याने ईश्वरी अध्ययनाच्या विद्यालयात रितसर शिक्षण घेतले.

त्याने येशू संघाची स्थापना केली. दिनांक २२-४-१५४१, १५४७ ते १५५० या काळात येशू संघाची घटना लिहिली. १५५० मध्ये येशू संघाची घटना जाहीर झाली. येशू संघाची घटना व तपासणी या बाबतीत इग्नातीने दोन पुस्तके लिहिली त्याशिवाय "सौजन्याचे नियम घरातील जबाबदाऱ्या व शैक्षणिक कर्तव्य" ही पुस्तके लिहिली.

१५४० ते १५५६ या कालखंडात येशू संघ सुसंघटित झाला व त्याचा जगभर प्रसार झाला. जीवनभर इग्नातीने येशू संघाच्या उत्कर्षासाठी अतोनात धडपड केली. त्याशिवाय इग्नातीने अशा काही संस्था स्थापन केल्या की ज्यात तरुण मुलींना शीलास धोका न वाटता निर्धास्तपणे राहता येईल. स्त्रियांच्या मठामध्ये त्याने पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. वैरभाव असणारांचे समेट घडवून आणले. कैद्याचे दंड भरून मुक्ती करावी, अशी कितीतरी सामाजिक हिताची कामे इग्नाती सतत करीत असे.

येशू संघाच्या चळवळी इग्नातीच्या हयातीतच परदेशातही पसरल्या होत्या. पाखंडी मताविरुद्ध त्याने खंबीर लढा दिला.

इग्नातीचे हे सारे कार्य नम्रता व सौजन्य या गुणांवर झाले. बाह्यतः गरीब लीन वागणे, जाडाभरडा वेष, अशक्त प्रकृती, अशा इग्नातीचे चिंतनातून स्फुरलेले विचार सामर्थ्य एवढे अलौकिक होते की युगप्रवर्तक संत कार्य त्याचे हातून घडले. त्याचा मृत्यू ३१-७-१५५६ रोजी झाला.

सुजन, येशूसंघी फ्रान्सिस गाराते

प्रका.-ए. इ. नुरा ये. सं. दि नोबिली कॉलेज, पुणे. ५ फेब्रु. १९५८ पृ. ४२. येशूसंघी फ्रान्सिस गारातेचे हे छोटेसे चरित्र आहे.

स्पेन देशांत बिल्बाओ नावाच्या गावाजवळ असलेल्या लोबोला किल्ल्याजवळील शेतकऱ्यांच्या झोपड्यात ३ फेब्रु. १८५७ रोजी फ्रान्सिस गारातेचा जन्म झाला. फ्रान्सिस गारातेचे वाडवडील येथे राहिले होते, आईवडील सालस, सज्जन, विनम्र आणि धार्मिक वृत्तीचे होते. उदरनिर्वाह शेतीवर चाले. गाराते याला जन्माचे दुसरे दिवशी बाप्तिस्मा देण्यात आला. १४ वर्षांचा झाल्यावर त्याने ओर्दुनी गावी एका येशू संघीय कॉलेजमध्ये नोकरी धरली. तेथे तीन वर्षे नोकरी केल्यावर त्याने येशू संघात प्रवेश केला. १८६८ साली झालेल्या स्पॅनिश क्रान्तीनंतर येशू संघास हद्दपार करण्यात आले. त्यानंतर येशू संघीयांना ' पुयान ' येथे रहावें लागले. पण फ्रान्सिस गाराते या नव्या वातावरणात समरस झाला. २ फेब्रु. १८७६ रोजी फ्रान्सिसने धर्मप्रतिज्ञा केल्या. नंतर थोड्याच काळाने ' लागार्डिया ' विद्यालयात ' रुग्णव्यवस्थापक ' म्हणून त्याची नेमणूक झाली. नंतर १८८२ पासून तेथेच देवळातील देखरेखीचे काम तो पाहू लागला. रात्रभर जागून दयाळू मनाने, आत्मीयतेने त्याने रुग्णसेवा केली. कुठेही रुग्णास सहाय्य करण्यास धावणे हा त्यांचा स्वभाव होता. ' ला गार्डिया ' येथे दहा वर्षे काम केले, नंतर त्याने उत्तरेकडे देऊस्तीला प्रयाण केले. १८८८ पासून ' देऊस्ती ' विद्यापीठाचे काम पाहण्यास त्याने सुरुवात केली. त्याचा मृत्यू ८ सप्टेंबर १८२९ रोजी झाला. त्याचे जीवन आदर्श संत जीवनासारखे होते.

धर्मवीर संत आंद्रेयास बोबोला, ये. सं.

लेखक– निकलस् डिसोजा, प्रका.– ज. बरांको, ये. सं., डि. नोबिली कॉलेज पुणे. जाने. १९५८ पृ. १५.

बोबोलाचे मूळ घराणे बोहेमिया येथले. परंतु त्याच्या पूर्वजांनी स्थलांतर केल्याने हे घराणे पोलंडात नांदू लागले. तेथेच १५९१ साली आंद्रेयस बोबोला याचा जन्म झाला. याच्या आयुष्यातील पहिल्या बत्तीस वर्षांचा इतिहास फारसा उपलब्ध नाही. मिळणाऱ्या थोड्या फार माहितीवरून एवढे म्हणता येते की तो फार आज्ञाधारक विद्यार्थी होता. बाळपणापासून तत्त्वज्ञान व आत्मिकउन्नती याबाबत त्यास उत्कंठा होती.

गुरुदीक्षा घेतल्यावर जीवनभर त्यांनी ईश्वरी संदेश लोकांना सांगितला व सत्यधर्माचा प्रसार केला. या कार्यात ते कधी थकले नाहीत. त्याकाळी पक्षोपपक्षांत फार लाथाळी सुरू होती. स्वार्थाने जो तो आपले घोडे पुढे दामटी अशी स्थिती होती. त्यामुळे कॅथॉलिकांस संरक्षण नव्हते. पण आंद्रेयास पिताजींनी आपल्या तेजस्वी प्रचाराने गरीब श्रीमंतापर्यंत दिव्य संदेश पोहचविला. हे करताना त्यांना खूप त्रास झाला. त्यानी धीर सोडला नाही. खरा धर्म समजावला व लोकांचे शंका निरसन केले. रोगाच्या साथी पसरलेल्या गावांतही राहून उलट आजाऱ्यांची सेवाशुश्रूषा

केली. धर्मविरोधी लोकांनी येशू संघीयांची देवळे लुटली. एकदा तर एका देवळात आंद्रियस पिताजीवर प्राणघातक हल्ला केला. व त्यास मारहाण केली. दोन घोडयांस उभे करून पिताजीस त्यांचे खोगिरास बांधून टाकलें व घोडयास धूम पळावयास लावलें. घोडयांच्या वेगानुसार पिताजी ओढले जात होते, सरपटले, घसरले जात होते. पण त्यांनी सारे सहन केले. त्यांचा अनेकांनी अनेक प्रकारे छळ केला. एकेक डोळा, कान, नाक, ओठ कापून काढलें. असें अनेकविध छळ त्यांनी सहन केलें. पण तरीही आपल्या जीवनकार्याचा आचार व उच्चार त्यांनी सोडला नाही. शेवटी त्यांना तरवारीने ठार मारण्यात आलें. (इ. स. १६५७)

"रक्तसाक्षी आंद्रेयम बोबोला याचे कष्टमय जीवन आणि यातनामय शेवट हा काही मध्ययुगातील चरित्र वाङ्मयात एखादा प्रकार नाही." असे उद्‍गार १७ एप्रिल १९३८ रोजी अकरावे पियुस यांनी आंद्रेयस यांना 'संत' पदवी बहाल करताना काढले.

१८९३ साली नववे पियुस यांनी आंद्रेयस यांस 'धन्य' म्हणून पदवी जाहीर केली. आंद्रेयसचे शव पिन्स्क येथ पुरण्यात आले.

महात्मा संत पियुस दहावे

लेखक–जॉन डिमेलो ये. सं., डि नोबिली कॉलेज, पुणे, ६.

मुद्रक–लोकसंग्रह छापखाना, पुणे. फेब्रु. १९५९, पृ. ५२.

पुस्तकाला प्रस्तावना नाही. पुस्तक सचित्र आहे. लहान मुलांना कळेल अशा सोप्या भाषेत लिहिलेले आहे. पुस्तक गोष्टीरूपाने चरित्र सांगणाऱ्या स्वरूपाचे आहे.

इटलीमधील रिएस या गावी सार्तो घराणे होते. त्या घरात बेप्पो सार्तो जन्मास आला. हाच पुढील महात्मा संत दहावा पियुस. बेप्पोच्या आईचे नाव मार्गारेट व वडिलांचे नाव योसेफ, हे कुटुंब शेतीवर निर्वाह करणारे होते. पण शेती फार मोठी नव्हती. त्यामुळे पुष्कळ श्रम करूनही उदरनिर्वाहास पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. अशा गरीब आई वडिलांचे पोटी आलेला बेप्पो लहानपणापासून तेजस्वी होता. प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमांत तो हुशार होता. लहान असताना घरी शेतीच्या कामात तो मदत करीत असे. बेप्पोच्या आईची ईश्वरावर अतीव श्रद्धा होती. ईश्वरावर सुखदुःखाचा हवाला ठेवून समाधानी जीवन जगणाऱ्या मातेचे संस्कार लाभलेल्या बेप्पास कळू लागल्यापासून, आपण उत्तम धर्मगुरू व्हावे व ईश्वर कार्य करावे अशी तीव्र इच्छा होती. पण घरच्या परिस्थितीमुळे गुरूमहाविद्यालयांत राहून शिक्षण घेणे त्याला शक्य नव्हते. पण त्यांची हुशारी, कष्टाळू वृत्ती व तेज पाहून तेथील स्थानिक गुरुस्वामींनी, आई बापास सांगून शिक्षणाची व्यवस्था केली. त्याच्या हुशारीमुळे शिष्यवृत्ती मिळाली. शिक्षणातील अडचण दूर झाली. अतिशय अडचणीत त्याने आपले शालेय शिक्षण पुरे केले. यानंतर पुन्हा डॉन टीटो यांनी

व्हेनिसमधील कार्डिनल मॉनिको यांस पत्र लिहून बेप्पोच्या हुशारीबाबत कळविले. त्यामुळे पदुआ येथील गुरुमहाविद्यालयात बेप्पोच्या पुढील शिक्षणाची सोय झाली. शिक्षणक्रम चालू असतानाच वडील वारले. शिक्षण सोडून कुटुंबाचा भार उचलण्यासाठी परत घरी येण्याचा बेप्पोचा विचार होता. पण आईने निग्रहाने परिस्थितीला तोंड देण्याचे ठरविले. बेप्पोचे पुढील शिक्षण चालू ठेवले.

बेप्पोला गुरुदीक्षा मिळाली त्यावेळी त्याचे वय तेवीस वर्षांचे होते. संत आन्द्रेयसच्या देवळाचे स्थानिक धर्मगुरू डॉन कोन्स्तान्तीनी यांचा मदतनीस म्हणून बेप्पो काम पाहू लागला. तोम्बोले गावांत लवकरच तो लोकप्रिय झाला. विशेषत: लहान मुलांत तो फारच आवडता बनला. साऱ्या नित्याच्या आचरणात तो ईश्वरी श्रद्धेचे संस्कार मुलांवर उमटवीत होता. डॉन कोन्स्तान्तीनी बेप्पोची पात्रता जाणून त्रेव्हीसो येथील वार्षिक परीक्षेस बसावयास लावले. तिथे त्याला पहिल्या नंबरचे यश मिळाले व लवकरच त्यांची सालझानो येथें प्रमुख धर्मगुरू म्हणून नेमणूक झाली. लोकांची सेवा करीत कार्य करत असताना ईश्वरालाही त्याचे कार्य मंजूर होते. मान्तुआमध्ये त्यानें केलेल्या प्रचंड कार्यामुळें इ. स. १८९३ साली बिशप सार्तोना (बेप्पोला) कार्डिनल करण्यात आले. आणि व्हेनिसमध्ये पात्रिआर्क म्हणून त्याची नेमणूक झाली. यानंतर थोड्याच दिवसांत त्याची आई मरण पावली. तिच्या अखेरच्या काळात ते तिला भेटण्यास गेले तेव्हा कार्डिनलचा वेश मुलांच्या अंगावर पाहून तिला अतोनात आनंद व समाधान झाले. त्यानंत १९०३ मध्ये २० जुलैस परमगुरूस्वामी तेरावे लियो मरण पावले व व्हेनिसचे पात्रिआर्क पोप म्हणून निवडले गेले. पोप म्हणून त्यांनी दहावे पीयूस असे नाव धारण केले. दहावे पीयूस पोप असूनही नम्रच होते. १९१० साली दहावे पियूस यांनी मुलांना समज आल्यावर म्हणजे सुमारे सातव्या वर्षी पवित्र ख्रिस्तप्रसाद दिले जावे असा हुकूमनामा काढला व मुलांस मोठीच देणगी दिली. १९१४ साली ऐंशी वर्षांचे असताना दहावे पियूस मरण पावले.

लेखणी बहाद्दर जस्टिन

लेखक – रे. पै. जी. पेरी, प्रका. ई. एम्. मुलिन्स, हिंद एस्. पी. सी. के. शिवाजीनगर, मुद्रक– चित्रशाळा प्रेस, पुणे. दुसरी आवृत्ती. १९६० पृ. १४

याचा जन्म इ. स. १०० च्या सुमारास पॅलेस्टाईन देशातल्या नियापोलीस गावी एका धनवान उच्च ग्रीक कुळात झाला. योग्य शिक्षण लाभले व अंगच्या हुशारीने चांगली प्रगती केली. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे जस्टिनला प्राचीन मूर्तिपूजक धर्माचे शिक्षण मिळाले होते. त्याबरोबर हेल्लणी लोकांची विद्या व तत्त्वज्ञान यातही तो प्रवीण झाला होता.

तरुणपणी ज्ञानप्राप्तीसाठी देशाटन करण्यास पाठविण्यात आले. प्रवास करता करता तो मिसर देशात आला. अलेक्झांड्रियात ईब्री शास्त्राचे हेल्लणी रूपांतर

करणाऱ्या भाषांतरकारांची माहिती मिळविली. तेथील तत्त्वज्ञान पंथाचा अभ्यास केला. प्लांतोनिस्त पंथाचे तत्त्वज्ञान पटून त्याने त्या पंथाचा स्वीकार केला. प्लान्तोन्स्तिचा अनुयायी झाल्यावर आपण आता ज्ञानी झालो असे त्याला वाटू लागला. पुढे आपण नीट एकान्ती मनन करावे असे वाटून त्याने अरण्यवास पत्करला. त्या अरण्यवासात एका ख्रिस्त अनुयायाची गाठ पडली. त्याच्या बोलण्या-वरून प्रथमच त्याला ख्रिस्ताविषयी कळले. त्याने जे सांगितले त्यामुळे मनावर खोल परिणाम झाला. औत्सुक्याने त्यांचे भविष्यवाद्यांचे ग्रंथ ' ख्रिस्ताच्या सोबत्यांचे लेख ' यांचे आस्थापूर्वक अध्ययन सुरू केले. त्या अध्ययनाने त्याला ख्रिस्ताचा मार्ग पटला.

यानंतर ख्रिस्तप्रभूच्या कार्यासाठी कशाचीही पर्वा न करता अनेक उत्कृष्ट व सणसणीत लेख लिहिले. तो सडेतोड लेखणी बहाद्दर म्हणून प्रसिद्ध झाला. त्यावेळी ख्रिस्ततत्त्वाचे लेख लिहिणारे इग्नेशस, पोलिकार्प हे होते. पण त्यांच्यापेक्षा जस्टीनचे लेखन ज्वलंत आणि सडेतोड होते. प्राचीन यहुदी धर्माचे दोष निदर्शनास आणण्यात त्याची लेखणी फारच जळजळीत व स्पष्टोक्तीची होती. तितकेच ख्रिस्ततत्त्वाचे विशुद्ध निर्मलपण व चिरंतन सत्य स्वरूप स्पष्ट करताना त्याचे लेखन रसाळ व भावपूर्ण होत होते. आपल्या तडाखेबंद लिखाणाने जनजागृती करणे हेच त्याने जीवनाचे ध्येय ठरविले इ. स. १३३ च्या सुमारास तो ख्रिस्त शिष्य झाला.

हर तऱ्हेच्या धार्मिक अन्यायात जस्टिन लक्ष घालीत असे व आपल्या लेखनाद्वारे अन्यायास जाहीर वाचा फोडून जनतेत जागृती निर्माण करीत असें. त्यावेळच्या स्टोईकपंथी बादशहाच्या आचरणाचे व त्या पंथाच्या तत्त्वज्ञानाचे खंडण करणारे लेखनही त्यानें केले. अशा प्रकारे क्रेस्केन बादशहा यासारख्या मोठमोठ्या आसामी विरुद्ध जस्टीनने उघडउघड व स्पष्ट संघर्ष सुरू केला. जस्टीनला अशा प्रकारच्या लिखाणाबद्दल तुरुंगात डांबण्यात आले. त्याचा तुरुंगातही बराच छळ करण्यात आला पण जस्टिन अभंग राहिला. इ. स. १६५ च्या सुमारास त्याचा वध करण्यात आला.

आणखी एक प्रकाशझोत

लेखक–देवदत्त नारायण टिळक, प्रका.– जो. वि. वेलिंगकर ये. स., डि नोबिली कॉलेज पुणें, संगम प्रेस, पुणे–२. जानें १९६०. पृ. ६३.

संगमनेरचे फादर रे. शुबिगर यांचे हे छोटेसें चरित्र आहे. लेखक देवदत्त टिळक यांनी " तीन प्रकाश झोत (१९५२) असें पुस्तक लिहून ह्यूम घराण्यातील तीन परोपकारी, निःस्वार्थी जनसेवकांची चरित्रें वाचकांना सांगितली. परंतु हे तिघेंही प्रॉटेस्टंट असल्यानें फक्त प्रॉटेस्टंट लोकच असे निःस्वार्थ जनसेवा करणारे असतात काय अशी शंका वाचकांच्या मनात राहू नये म्हणून तीन कॅथॉलिक

जनसेवकांची चरित्रें लिहिण्याचे ठरविले, परंतु त्यापैकी संगमनेरचे फादर शुबिगर यांचा प्रत्यक्ष परिचय असल्यामुळे त्यांचे चरित्र लवकर लिहून हे पुस्तक "आणखी एक प्रकाश स्रोत या नावाने पुढे आले."

रे. फादर शुबिगर हे जेजुईट होते. इ. स. १८७८ साली ३० ऑक्टोबरला स्वित्झर्लंडमधील उच्नख नावाच्या एका प्रशांत खेड्यात फादर शुबिगर यांचा जन्म झाला. त्यांचे घराणे धार्मिक रोम कॅथॉलिक आहे. त्यांचे वडिल शिक्षक होते. आई एक सोज्वळ प्रेमळ धार्मिक वृत्तीची बाई होती. तिचे नाव बर्ना. प्राथमिक शिक्षण उच्नख येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना एंजलबर्ग येथील हायस्कूलमध्ये ठेवले. ते हायस्कूल फादर्सनी चालविले होते. त्यांचा धर्मपरायण आदर्श त्यांच्या मनावर ठसला. १ ऑक्टोबर १८९७ रोजी फ्रान्सिसने जेजुईट संघात प्रवेश केला. पुढे हॉलंड देशात जाऊन त्यांनी लॅटीन, ग्रीकवाङ्मय, इतिहास. अलंकारशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित, सृष्टीज्ञान या विषयांचा अभ्यास केला. २३ डिसेंबर १९०४ रोजी मुंबईस आले. मुंबईस सेंट झेविअर संस्थेत गणित व सृष्टी-ज्ञान शिकविण्याचे काम त्यांना देण्यात आले. लोकप्रिय शिक्षक म्हणून लौकिक मिळविला. याच काळात फादर क्रेकजवळ त्यांनी मराठीचा अभ्यास सुरू केला, त्यानंतर पुन्हा चार वरिष्ठांच्या आज्ञेनुसार त्यांना युरोपमध्ये जावे लागले. हॉलंड देशांत फाल्कनवर्ग येथे इग्नेशियस धर्मविद्यालयात धार्मिक शिक्षणास सुरुवात झाली. तेथील अभ्यासक्रम पुरा करून गुरुदीक्षा संस्कार झाल्यावर पुन्हा भारतात जाण्याची त्यास आज्ञा मिळाली.

पुन्हा भारतात आले तेव्हा त्यांचे वय ३३ वर्षांचे होते. १५ ऑगस्ट १९१२ साली पुन्हा भारतात आले. मिशनरी कार्यसिद्धी आल्यावर त्यांनी काही काळ अनेक मिशने पाहिली. २२ आक्टोबर १९१३ रोजी ते संगमनेरला आले. मराठीचा अभ्यास त्यांनी चालूच ठेवला होता. पुण्यांतील डॉ. हेन्री डोअरिंग यांच्या जवळ अधिक मराठी! शिकले. हायस्कूलचे वा कॉलेजचे मुख्याध्यापक होण्याची पात्रता असूनही संगमनेरसारख्या खेडेगावी राहणे त्यांनी पसंत केले. मोठमोठ्या शहरांतील लोकांकडे जाणे येणे त्यांना नकोसे वाटे. महाराष्ट्राचा व त्यातही विशेषतः संगमनेर व त्याचा परिसर याचा इतिहास त्यांनी माहीत करून घेतला. १८९२ साली संगमनेर येथे येऊन झाडाखाली राहू लागले व नंतर नदीपलीकडील परिसरांस मंदिराचे 'रूप' दिले. पहिल्या महायुद्धाच्या काळात जर्मन मिशनऱ्यांवर संकट कोसळले, अशा अवस्थेत फादर शुबिगर यांनी मिशनचे सर्व कार्य एकट्याने अखंडित चालू ठेवले. त्याच कठीण काळात १९१८ सालचा दुष्काळ व इन्फ्लुएन्झा या संकटांनाही तोंड द्यावे लागले. १९२० पर्यंत या दोन संकटांना तोंड देण्यात व त्याचे परिणाम भोगण्यात सारा काळ गेला. ही दोन संकटे संपतात न संपतात तोच कॉलरा उभा राहिला. फादर शुबिगरने ज्या काळात कार्य केले तो काळ असा युद्धाची अस्थिरता,

भीषण परिणाम व नैसर्गिक संकटे असा सर्वस्वी प्रतिकूल होता. तरीही न कंटाळता आपले कार्य विशुद्ध सेवाभावाने त्यांनी अखेरपर्यंत केले. संगमनेरच्या ख्रिस्ती लोकांसाठी त्यांनी मराठीत ‘ निरोप्या ’ नावाचे एक मासिक चालविले होते.

फादर शुबिगर यांच्यावर अनेक आयाबायांनी ओव्या रचल्या आहेत. त्याचा मृत्यू १९३९ साली झाला.

प्रकरण ५ वे

बायबलची मराठी भाषांतरे

बायबल हा खिस्तीधर्मीयांचा प्रमुख ग्रंथ. बायबल हे जुना करार आणि नवा करार या दोन मुख्य भागांत आहे. जुन्या करारातील पुस्तके दोन प्रकारची आहेत. ज्यू (हिब्रू) मूलस्रोताप्रमाणे ३९ लहान मोठी पुस्तके आहेत. खिस्तपूर्व काळातील शेवटल्या काही शतकांत ईजिप्त देशातील अलेक्झांड्रिया शहर ज्यू लोकांच्या संस्कृतीचे मोठे केंद्र होते. त्या काळातही ज्यू धार्मिक साहित्य तयार झाले, ते साहित्य विशेषकरून ग्रीक भाषेत तयार झाले. त्याकाळची ९ पुस्तके व हिब्रू मूलस्रोतातील ३९ पुस्तके म्हणजे सर्व मिळून अठ्ठेचाळीस पुस्तके अशी 'सेप्टुआजिंट' नावाची ग्रीक भाषेत आवृत्ती तयार करण्यात आली. खिस्ती धर्माच्या प्रभावकाळात ही ग्रीक आवृत्ती ज्यू आणि खिस्ती लोक मोठ्या प्रमाणात वापरीत होते. हल्ली प्रॉटेस्टंट खिस्ती मंडळाचा जुना करार हिब्रू ३९ पुस्तके असलेल्या मूलस्रोताप्रमाणे आहे. कथलिक आणि पौर्वात्य ऑर्थोडॉक्स मंडळाचा जुना करार ४७ पुस्तके असलेल्या ग्रीक मूलस्रोताप्रमाणे आहे; तर नव्या करारात सत्तावीस पुस्तके आहेत. ही सारी पुस्तके एकाच वेळी लिहिली गेली नाहीत. फार प्राचीन काळापासून ईश्वरभक्तांनी ईश्वरी प्रेरणेप्रमाणे ती लिहिली आहेत. त्यातील लिखाण विविध विषयांवर असून ते अत्यंत मनोवेधक आहे. या विश्वाची उत्पत्ती, मानवाचा जन्म, यहुदी लोकांचा इतिहास, त्यांच्या अनेक नेत्यांच्या चरित्रकथा, त्या काळातील धर्म आणि कर्मकांड, त्यासाठी झालेला आणि केलेला छळ, धाडसी कृत्ये, स्तोत्रगीते, नीतिसूत्रे, भविष्यवाद्यांनी वर्तविलेली भविष्ये आणि या सर्वांतून स्पष्ट होणारे परमेश्वरी योजनेचे सूत्र जुन्या करारात पहावयास मिळते. हे लिखाण इब्री म्हणजे हिब्रू भाषेत आहे. त्यातील थोडेसे 'अॅरेमाईक' भाषेत आहे.

जुना करार व नवा करार यामधील लेखन काळात ग्रीक मूलस्रोताप्रमाणे जवळ-जवळ २०० वर्षांचा खंड आहे. हिब्रू मूलस्रोताप्रमाणे हा खंड ४०० ते ५०० वर्षांचा असावा.

नव्या कराराच्या कालखंडाकडे वळल्यास त्यावेळच्या खिस्ती लोकांना संपूर्ण जुना करार उपलब्ध होता असे आपणास दिसून येईल. प्रभू येशू खिस्तानेही, त्यातून उतारे घेतल्याचे व त्यास धर्मशास्त्र या नात्याने संबोधल्याचे उल्लेख नव्या

करारात आहेत. येशू ख्रिस्ताच्या स्वर्गारोहणानंतर, त्याचे शिष्य व त्याला मानणारी इतर मंडळी, लहान मोठ्या खेड्यांतून व शहरातून संघ करून राहिली होती. त्यात कोळी, शेतकरी, रखवालदार, तंबू शिवणारे, कारागीर इत्यादी अशिक्षितांचा प्रामुख्याने समावेश होता. त्यातील पुष्कळांना वाचता येत नव्हते आणि लिखाण करण्याचे सामर्थ्य तर फारच मोजक्या लोकांमध्ये होते. ज्यांनी प्रभू येशू ख्रिस्ताला पाहिले होते, ते देत असलेली साक्ष ऐकण्याकरिता ही मंडळी साप्ताहिक सभा भरवून जमत असत. त्यांना लेखी मजकुराची गरज भासली नाही. त्या सर्वांचे धार्मिक शिक्षण अशाच तोंडी पद्धतीने होत होते. येशू ख्रिस्ताचे देहधारण, त्याचा बाप्तिस्मा, त्याचे जीवनकार्य, त्याने दिलेली शिकवणूक, त्याचे मरण व पुनरुत्थान याबद्दल दिलेली साक्ष हेच त्या प्रथम ख्रिस्ती मंडळीचे शुभवर्तमान बनले. येशू ख्रिस्ताचे कार्य आणि त्याच्या संदेशासंबंधी संत पौलाची पत्रे लिहिली गेल्यानंतर म्हणजे इ. स. ६४ च्या सुमारास सुरुवात झाली असावी असे मानण्यात येते. संत पौलाची सर्व १३ पत्रे त्या आधीच लिहिली गेली होती. संत पौलाच्या सांगण्याबरहुकूम ही पत्रे सिल्वानस्, तिमथ्यस, तर्तियस आणि कदाचित बार्णबस या मंडळींनी लिहिली. संत पौलाची ही पत्रे आणि इतर काही प्रेषितांची पत्रे अनेक ख्रिस्ती मंडळींनी आपल्या आध्यात्मिक प्रेरणेसाठी चर्मपत्रांवर उतरून घेतली.

याच काळात येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीतले उतारे बरेच लोक पपायरसाच्या तुकड्यावर कोरून ठेवीत असत व अशा लिखाणाचा त्याच्या चरित्र लेखकांना उपयोग झाला असावा असे दिसते. ख्रिस्त चरित्रातील घटना कालानुक्रमाने लिहिण्याचे कार्य प्रथम 'लूकाने' हाती घेतले. मार्कने पहिले संपूर्ण शुभवर्तमान लिहिले. मार्क हा ख्रिस्त शिष्यांपैकी नव्हता व त्याने कदाचित ख्रिस्ताच्या तोंडून स्वतः काही ऐकलेही नसावे. तो पेत्राचा शिष्य होता. पेत्राने सांगितलेला वृत्तांत मार्कने आत्मसात करून बिनचूक लिहिला व पुस्तकरूपाने एकत्रित केला. या पुस्तकाच्या आधारे नंतर लूक आणि मत्तय यांनी आपली शुभवर्तमाने लिहिली असे विद्वानांचे मत आहे. त्यानंतर जवळ जवळ पंचवीस वर्षांनी योहानने आपला शुभवर्तमान ग्रंथ प्रसिद्ध केला. योहानचा मृत्यू इ. स. १२० च्या सुमारास झाला. योहानचे शुभवर्तमान पहिल्या तीन शुभवर्तमानाहून भिन्न असून त्यात लेखकाचे प्रभावी व्यक्तिमत्व दिसून येते. त्याने साक्ष दिली आहे. "येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास धरावा आणि विश्वास धरून त्याच्या नावाने जीवन पावावे म्हणून ही लिहिली आहेत." जगातील प्रमुख भाषांत भाषांतर झालेला बायबल हा धर्मग्रंथ आहे. जुन्या करारातील सर्व इब्री मूलस्रोतातील 'हिब्रू' पुस्तके मूळ भाषेत लिहिली गेली आहेत. दुसऱ्या मूलस्रोतातील पुस्तके तीन हिब्रू भाषेत एक अरामेइक भाषेत व इतर पुस्तके मूळ ग्रीक भाषेत आहेत. नवा करार मूळ ग्रीक भाषेत लिहिला गेला आहे. म्हणजे बायबलचे भाषांतर करणारास हिब्रू आणि ग्रीक या भाषांचे उत्तम

ज्ञान असायला हवे आणि ज्यां भाषत भाषांतर करावयाचे आहे त्या भाषेचेही अत्युत्तम ज्ञान पाहिजे हे ओघानेच आले. बायबलच्या मराठी भाषांतराचा इतिहास १७५ वर्षांचा आहे.

सध्या सेरामपूर म्हणून ओळखले जाणारे कलकत्त्याजवळ असलेले श्रीरामपूर हे बायबलच्या भाषांतराचे उगमस्थान आहे. तेथील डॅनिश वसाहतीत राहणारे डॉ. विल्यम केरी यांनी नागपूरकडील सागर या ठिकाणच्या वैजनाथ पंडिताच्या सहाय्याने नव्या कराराचे पहिले मराठी भाषांतर १८०७ साली केले. सेरामपूर मिशनने बहुतेक प्रमुख भारतीय भाषांतून बायबलचे भाषांतर करण्याच्या कामात त्यातल्यात्यात अधिक उत्साह दाखविला. सेरामपूर मिशनने प्रथम ब्रिटिश व इतर परदेशी बायबल सोसायटींना सव्वीस भारतीय भाषांतून बायबल छापण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याचा प्रस्ताव मांडला. सेरामपूर मिशनने नंतर तीस भारतीय भाषांतून पवित्रशास्त्र छापले.| सर्व भारतीय भाषांतून बायबल छापण्याची कल्पना खूपच भव्य होती याबद्दल प्रश्नच नव्हता; पण प्रत्यक्षात तेथील मिशनरी कार्यकर्त्यांना बंगालमधील स्थानिक भाषेव्यतिरिक्त इतर भाषांचे फारसे प्रत्यक्ष ज्ञान नव्हते व इतर भाषेतून केलेली भाषांतरे निरुपयोगी आणि अव्यवहार्य करण्याची शक्यता होती. आणि काही अंशी झालेही तसेच. सेरामपूर मिशनने मराठी भाषांतर म्हणून जे बायबल प्रथम मराठी भाषेत छापले, ती प्रत्यक्षात मराठी भाषा नसून स्थानिक बोली होती. बॉम्बे बायबल सोसायटीने हे तथाकथित मराठी बायबल *

* Serampore version 1811

In 1804, Carey started his translation of the New Testament in Marathi and engaged the services of a Munshi or Pandit, Vidyanath (or Vaijanath) Sharma by name. His Gospel according to St. Matthew, in Marathi, was published in 1805. This was lithographed in Devnagari characters and is the first book ever published in this script in Marathi. It was also the first portion of the Scriptures ever published in this language. It was printed at the Mission Press, Serampore, and consisted of 108 pages in 4vo size, of which only 465 copies were printed at a cost of (sicca) Rs. 465/-. It was, however, brought to the notice of Carey that Modi script was more easily read by the people, so a second edition was published in 1807, in Modi. The title page of this Gospel was the same as that of the New Testament, though it was not the whole New

Testament. By 1809, Carey had completed the translation of the New Testament and this first ever 'Mahratta New Testament,' in 8vo size with 744 pages, was published in 1811.

The reaction to this Serampore version was quite alarming. S. Pearce Carey writes, "Thomas Twining (one of Calcutta Customs), and Major Scott Waring (Warren Hasting's chief champion), and the notorious Colonel Stewart (who, abjuring Christianity, became an effusive Hindu), filled the air with wild asserverations and alarms.... The distribution of the Scriptures in Marathi is not unlikely to produce another Mahratta War."

There was also a savage attack on Carey's New Testament by Vans Kennedy, in an article which appeared in the 'Oriental Magazine' and also in the 'Asiatic Journal' in September 1829. Kennedy was then Judge and Advocate General of the Bombay Army, and had also published a Marathi-English and English-Marathi Dictionary in 1824. He called those at Serampore, 'a set of narrow minded, tasteless. moneymaking bigots', and said that Carey's Marathi New Testament showed ignorance of the first rudiments of this language and that it was unintelligible to all who spoke Marathi. He further criticized the Bible Society for subsidizing 'the work of such a bigot whose translations were exactly fit for worms'. Carey refrained from defending his work and said, "Those who are not prepared to follow their Lord through evil report, cannot follow Him at all." However, William Greenfield, another Oriental scholar, defended both the accuracy and readability of the Marathi New Testament and forcefully condemned Kennedy's attack on Carey 'whose stupendous learning is the theme of admiration and praise from the shores of the Ganges to the banks of the Thames." (A Defence of the Serampore Mahratta Version of the New Testament,

London, 1830).

Some of the critics said, that the language of this New Testament proved useless for general circulation in the Marathi country, since Pandit Vaijanath spoke a dialect peculiar to a district near Nagpur and which was the one employed in this version. Others said that it was hardly possible to find anyone anywhere who could read it connectedly and that it was not the language of Maharashtra.

Claudius Buchanan writes that the Marathi Version normally attributed to Carey was in fact the work of a Maratha Pandit in the college of Fort William; Carey had revised and compared (it) with the original Greek. (The College of Fort William in Bengal —London, 1805, p. 230).

However, all the criticisms levelled against Carey's New Testament seem to be not only uncharitable but unwarranted and uncalled for, as can be seen from the Serampore Memoirs. In a letter dated the 10th December 1811, Carey writes; " A friend who resides in Mahratta territories, with whom we are in habits of correspondence, tells us that many read it there with much avidity. " The Fourth Memoir of June 1812 states, " Of the Mahratta version, a gentleman who resided some years in that country and who has distributed considerable number of copies, writes thus to Mr. Ward : " Tell Dr. Carey, that the style and the language of the Mahratta New Testament are well understood and much commended. Mr. J., who knows something of Sanskrit and reads Mahratta very freely, mentions it with great praise. " He also mentions Kistna, Mahadeo, Bhuwanee and Naravuna, who are reading and rereading the New Testament, and reading it to others too. The Fifth Memoir (for 1813) gives the story of a ' Brahmun, a man of high estimation ' and the effect through divine blessing, produced ' entirely by his perusing the Scriptures : it does not appear that anyone ever conversed with

कधीच स्वीकारले नाही वा वापरले नाही. सेरामपूर मिशनने प्रथम छापलेले मराठी बायबल जुन्या वळणाच्या मोडी लिपीत आहे. त्या पुस्तकामुळे भाषांतर केल्याचे समाधान मिळाले तरी सद्विवेकबुद्धीला पटेल असा पवित्रशास्त्राचा आशय त्यात येऊ शकला नाही. त्यानंतर त्यांनी येथील भाषांचा अभ्यास सुरु केला.

त्या त्या भाषेचे ज्ञान वाढविण्याचे प्रयत्न केले. आणि नंतर मुळातून हव्या त्या भाषेत असा भाषांतराचा उपक्रम सुरू केला.

१८१८ साली विल्यम केरीने **बायबलचे कोकणी भाषांतर** प्रसिद्ध केले.

बायबल सोसायटीची स्थापना इंग्लंडमध्ये १८०४ सालीच झाली होती. १८१६ साली अमेरिकन मिशनने मुंबईत स्वतःचा छापखाना सुरू केला व १८१७

[पान १८८ वरून टीप पुढे चालू]

him on the subject of Christianity. Then the Ninth Memoir of December 1822 gives 'the testimony of Rungnath, Chief Pandit to the Honourable Company; "I have received the copy of the Scriptures. The Holy Book which you have translated into the Mahratta language is correct. All the Mahrattas will understand it; of this there is no doubt."

It will thus be seen that Carey's New Testament was translated into the language of the people for whom it was intended, or, in other words, into common language Marathi. It is interesting to note that, though there was a hue and cry over Carey's New Testament by those whose mother-tongue was not Marathi, it was well received by the 'Mahrattas' themselves. None of them seems to have found the translation unintelligible or uncouth. None seems to have criticised it as being vulgar, artificial or unnatural. On the contrary, its readability and usefulness are etablished beyond doubt by several instances given in the Serampore Memoirs. No one ever termed it 'Mission'. Souvenir, Holy Bible Release of New Testament in Common language Marathi, Pune, March the 20th 1982. Pages 1 to 7. Edited by Shri Bhaskar Jadhav, printed, by Spicer College Press, Pune 411007.

साली मत्तयकृत शुभवर्तमान मराठीत भाषांतर करून छापले. हे भाषांतर डॉ. जॉन टेलर यांनी प्रसिद्ध केले होते. महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेले हे पहिले मराठी भाषांतर होय.

बायबलच्या भाषांतराचे काम मिशनरींच्या सर्व शक्तीनुसार सुरू झाले. मिशनप्रेस मध्ये छपाई होऊ लागली आणि (१) १८१८ मध्ये प्रेषितांची कृत्ये. (२) १८१९ मध्ये जॉनकृत शुभवर्तमान, १८१९ मध्ये उत्पत्तिविषयक पवित्र पुस्तक. (३) १८२० मध्ये याकोब व यहूदा यांच्या पत्राचा मजकूर. (४) १८२२ मध्ये मार्क्सकृत शुभवर्तमान. (५) १८२४ मध्ये हिब्री पत्राचा मजकूर. इत्यादीची मराठी भाषांतरे प्रसिद्ध झाली.

उत्पत्तीविषयी पवित्र पुस्तकाच्या ३००० प्रती संपून १९२४ मध्ये दुसरी आवृत्ती निघाली. याच काळात लुकाकृत शुभवर्तमानाच्या दोन-तीन आवृत्त्या निघाल्या पण त्यांच्या तारखा नमूद केलेल्या नाहीत. संपूर्ण नवा करार १८२६ मध्ये भाषांतर करून प्रसिद्ध करण्यात आला. ते अष्टपत्री होते. त्यातील अनेक पुस्तकांना भिन्न पृष्ठांक दिलेले होते. त्यांचा टाईप खडबडीत, अस्पष्ट, फारसा वळणदार नसलेला असा होता. त्यात विराम चिन्हांचा वापर केलेला नाही. वाक्याची अखेर दोन उभ्या दंडांनी दाखविली आहे.

१८२६ च्या बायबलचे भाषांतरकार–

(१) रे. गॉर्डन हॉल. (२) रे. सॅम्युएल न्यूवेल. (३) रे. होराशिओ बार्डवेल. हे १८१६ मध्ये मुंबईस आले. रे. जॉन निकॉलस, रे. ॲलन ग्रेव्हज, हे इ. स. १८१८ मध्ये मुंबईस आले. रे. ग्रेव्हज् १८३१ पर्यंत भारतात होता. तो आपल्या एका पत्रात लिहितो–

" नव्या कराराच्या भाषांतरापैकी पाचही जणांचा मराठी भाषेशी बराच चांगला परिचय होता. तसेच पवित्र शास्त्राची मूळ भाषाही त्यांना अवगत होती. त्यांच्यापैकी एकजण एकेका भागाचे भाषांतर करीत असे व उरलेले चौघे ते भाषांतर मुळाबरोबर तपासून पहात असत. अशा रीतीने एकेका भागाचे भाषांतर एकाने करावे व इतरांनी तपासावे या प्रकारे भाषांतराचे काम केले. पाचही जणांना प्रत्येकी एक दोन पंडित मदतनीस म्हणून होते. पाच भाषांतरकारांचे मिळून बोलावलेले मदतनीस पंडित देशाच्या विविध ठिकाणचे होते. भाषांतराच्या पहिल्या कच्च्या प्रतीत मुळातील शब्दांचा सरळ व प्रत्यक्ष अर्थ नमूद केला जात असे. नंतर मदतनीस पंडिताच्या सूचनानुसार प्रत्येक पंडिताने सुचविलेले दोन-तीन अर्थ टिपले जात. त्यानंतर भाषांतरासाठी निश्चित शब्द ठरविला जाई. आम्ही स्वतः असे त्यात फारच थोडे लिहिले आहे. "

बायबलचे भाषांतर करण्यासाठी त्यांनी कोणती आधारभूत तत्त्वे स्वीकारली

होती ते सांगताना रे. ग्रेव्हज सांगतात (१) प्रथमतः मूळाचा चांगला अभ्यास करणे. (२) शक्य तितक्या व्यावहारिक दृष्टीने मूळाचा जास्तीतजास्त पूर्ण अर्थ व्यक्त करणे. तोही मुळातील वाक्ये, वाक्यांश, शब्द, अन्वय वगैरेनुसार. (४) वाक्य-रचनेतील आधी व नंतर येणारे मुळातील भाग मराठीत अधिकाधिक प्रमाणाने तशाच क्रमाने व तशाच संबंधाने ठेवणे. हे करीत असताना मुळातील शब्दांचा तेथील जोरकसपणा वजन तेथेच भाषांतरात आणणे. (६) मुळातील वाक्यसमूहाचे अन्य वाक्य समूहाशी, शब्दाचे शब्दाशी असे सारे संबंध भाषांतरात शक्य तो तसेच राखणे. (७) अशा अनेक तत्त्वांनी भाषांतर करणे, जेथे अशक्य होईल वा तत्त्वानुसार घडलेले भाषांतर विचित्र वाटेल, तेथे अर्थ तसाच ठेवण्याकडे लक्ष पुरविणे. (८) शुद्ध व नेमके पण उच्चस्तरीय नाही फार नीचस्तरीय नाही असे मराठी शब्द वापरणे. (९) देशातील जास्तीतजास्त लोकांस अधिक लवकर समजतील असे मराठी शब्द वापरणे. (१०) साधी केवळ वाक्ये पण त्यातले त्यात व्यावहारिक उपयोगातील वाक्ये वापरणे. (११) कोणत्याही वेळेस मूळ अर्थ गमावून काही भाषांतर न करणे.

इ. स. १८२२ च्या अखेरपर्यंत अमेरिकन मिशन व बॉम्बे बायबल सोसायटीचा कारभार स्वतंत्र होता. नव्या कराराचे मराठी भाषांतर या पुस्तकापासून प्रथमच दोन्ही संस्थांचा एकत्र कारभार सुरू झाला. नव्या कराराचे भाषांतर प्रसिद्ध करण्यासाठी प्रथम बॉम्बे बायबल सोसायटीने इंग्लंडकडे जरूर तितक्या कागदाची मागणी केली, या कागदाच्या खरेदीस मिशनने मदत केली. या प्रसंगानंतर पुढे मिशनने सोसायटीस अनेक वेळा मदत केली. दोन तीन प्रसंग सोडले तर मिशनच्या सहकार्यानेच सोसायटीने पुढील बरीचशी प्रकाशने काढली.

नव्या कराराची सुधारित आवृत्ती काढण्यासाठी बायबल सोसायटीने अमेरिकन मिशनरीच्या मदतीने योजना आखली. खर्च बायबल सोसायटीने सोसला. ग्रेव्हज् यांच्या सांगण्याप्रमाणे सुधारणा झाल्या. सुधारित आवृतीचे काम कमिटीने त्यांच्यावर सोपविले. छपाई अमेरिकन मिशन प्रेसमध्ये झाली. स. १८२६ सालच्या आवृत्तीपेक्षा या म्हणजे १८३० मधील सुधारीत आवृत्तीत टाईप अधिक स्पष्ट, स्वच्छ व सुबक, इंग्रजी विराम चिन्हांबाबत (Punctuation) माहिती देणारी प्रस्तावना अशी काही वैशिष्टये आहेत. याच्या प्रथम ३००० प्रती काढण्यात आल्या.

नव्या कराराच्या यानंतरच्या आवृत्तीसाठी रे. ग्रेव्हज् यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे रे. ॲलन यांची नेमणूक झाली. यापुढे निघालेल्या आवृत्तीत Gospel of Matthew डॉ. जॉन टेलर यांचे जवळील प्रत आणि रे. मिचेल यांचेकडील प्रत या तीनही संहिता पाहून योग्य त्या सुधारणा करण्यात आल्या.

'उत्पतीचे' पुस्तक प्रथम १८१९ भाषांतरित करून प्रसिद्ध केले गेले. १८३४ मध्ये त्याची पुन्हा आवृत्ती निघाली. त्यानंतर १८३६ मध्ये त्याची आणखी

आवृत्ती निघाली; पहिल्या दोन अमेरिकन मिशनने काढल्या तर १८३६ मधील आवृत्ती बायबल सोसायटीने प्रसिद्ध केली. तिसऱ्या आवृतीत रे. ॲलन याच्या सुचनांनुसार सुधारणा केल्या गेल्या. १८३८ आणि १८४० या वर्षात आणखी आवृत्त्या निघाल्या. रे. ग्रेव्हज यांनी प्रकृती सांभाळून या आवृतीसाठी काम केले. त्यांच्या एका पत्रातील मजकुरानुसार भाषांतरामध्ये प्रादेशिकता शक्यतो टाळली आहे. कोणत्याही मराठी भाषिकास परिचित व सहज अर्थ कळणारे शब्दच भाषांतरात वापरले आहेत. याबाबत रे. ग्रेव्हज् याने पहिल्या दोन आवृत्त्यांसाठी त्या त्या भागातील पंडितांशी विचारविनिमय केला.

इ. स. १८४७ पर्यंत ' पवित्र शास्त्रा 'तील सर्वच पुस्तकांची मराठी भाषांतरे पूर्ण झाली.

बायबलच्या भाषांतरातील अडचणी

मराठी सारख्या भाषेमध्ये बायबलचे भाषांतर करण्यातील अडचणी डॉ. ॲलन यांनी १२ ऑक्टोबर १८४१ च्या आपल्या लेखांत चांगल्या रीतीने व्यक्त केलेल्या आहेत.

ते लिहितात. ' मराठी सारख्या विदेशी भाषेत आणि हिंदूसारख्या निधर्मी लोकांसाठी बायबलचे भाषांतर करण्यातील अडचणींची कल्पना, त्या कष्टांचा अनुभव घेतलेल्यांनाच येऊ शकेल, कोणतीही भाषा त्या त्या लोकांचा इतिहास, संस्कृती यांतून घडत जाते. त्यांच्या आशयाविष्काराचे त्यांची भाषा हे एक साधन असते. '

मराठी भाषा बोलणारांच्या बाबतीत हेच होते की शब्दाचे अर्थाबाबत त्यांच्या काही संकल्पना घडल्या होत्या व काही सहचारी भाव आधीच अस्तित्वात आलेले होते. मराठी भाषिक काही शब्दार्थांबाबत काही धार्मिक समजुती वा श्रद्धा आधीच बाळगून होते. त्यामुळे या अडचणी निर्माण होत होत्या आणि मराठी भाषा बोलणाऱ्या-मध्ये ख्रिस्त व त्याचा धर्म याविषयीचे अधिकाधिक ज्ञान प्रसृत झाल्याशिवाय या अडचणींचे निराकरण होणार नव्हते. कोणतीही भाषा जोपर्यंत त्या विशिष्ट जन-समूहापर्यंत मर्यादित आहे, तोपर्यंत त्या भाषेचा बायबलच्या भाषांतरासाठी वापर करणे अडचणीचे ठरते. ख्रिस्ताची तत्त्वे या जनांस माहिती नसतात, अगर ख्रिस्ती धर्म त्याची तत्त्वे वा ख्रिस्तजीवन वगैरे कशाबाबत त्या लोकांस जिव्हाळा असत नाही. अशा परिस्थितीत ख्रिस्तजीवन, धर्म वगैरेबद्दल जिव्हाळ्याने लिहिणाऱ्या बायबलचे भाषांतर करणे हे काम मोठे जिकिरीचे होते. अशा वेळी भाषांतरासाठी प्रसंगी नवनवीन शब्दांचा वापर करणे आवश्यक ठरते. त्या नव्या शब्दांची अर्थ-निश्चिती करणे हेही जरूर असते. तसेच आधी रूढ असलेल्या शब्दास नवे व उचित अभिप्राय देणे आवश्यक ठरते. थोडक्यात, मराठी वा कोणतीही एत्तद्देशीय भाषा ख्रिस्तानुकूल बनवणे क्रमप्राप्त असते. त्याचबरोबर हेही घडणे आवश्यक असते

की, लोकांत घडणारे परिवर्तन व त्यांच्या भाषेतील बदल दोन्ही एकाच गतीने घडायला हवेत. दोन्ही परिवर्तनांपैकी एक मागे वा एक पुढे होऊन चालत नाही.

प्रथम इ. स. १८४७ साली संपूर्ण बायबलची प्रत १ मार्च १८४७ रोजी अमेरिकन मिशनने मुंबईत प्रसिद्ध केली, पण ती शैली व छपाई या दृष्टीने ठिकठिकाणी भिन्न होती. तसे पाहिले तर मराठी बायबलची पहिली प्रमाण आवृत्ती इ. स. १८५५ मध्ये प्रसिद्ध झाली. या आवृत्तीमध्ये जुन्या कराराची ९४२ पृष्ठे व व नव्या कराराची २६८ पृष्ठे होती. (एकूण पृष्ठसंख्या १२१०) इ. स. १८५२ मध्ये डॉ. ॲलन यांची प्रकृती खालावली. फेब्रु. १८५३ ला डॉ. ॲलन भारत सोडून अमेरिकेला गेले. जाण्यापूर्वी बायबलच्या प्रमाण आवृत्तीसाठी त्यांनी सर्व तयारी केली होती. ॲलन अमेरिकेस गेल्यावर ही आवृत्ती निघाली. या बाबत बायबल सोसायटीने म्हटले आहे की, "बायबल सोसायटी रे. ॲलन यांच्या ऋणातून केव्हाच मुक्त होणार नाही, इतके अविश्रांत परिश्रम स्वजीवनाची पर्वा न करता रे. ॲलन यांनी बायबलच्या आवृत्तीसाठी केले आहेत."

बायबलच्या या प्रमाण आवृत्तीनंतर ऑगस्ट १८५७ मध्ये रे. हेजन यांनी मराठी बायबलची दुसरी आवृत्ती ५००० प्रती पृ. ११९६ असलेली काढली.

त्यानंतर बायबल पुढीलप्रमाणे निरनिराळ्या स्वरूपात प्रसिद्ध झाले.

१८७२ रे. हेजन बायबलची आवृत्ती २००० प्रती.

१८७३ रे. एस्. बी. फेअरबॅक– नव्या कराराची पॉकेट एडिशन ३००० प्रती.

१८६२ रे. हार्डिंग सी आणि रे. हरिपंत, गॉस्पेल ऑफ मार्क, मोडी.

१८६६ रे. आर. व्ही. मोडक, मात्थीकृत शुभवर्तमान.

१८६८ रे. अप्पाजी बापूजी (चर्च मिशन) शाहू दाजी कुकडे "गॉस्पेल अॅण्ड ॲक्टस्"

१८७० रे. शाहू दाजी कुकडे, मार्क कृत, शुभवर्तमान, मोडी.

१८७३ रे. सी. हार्डिंग– मार्ककृत शुभवर्तमान– बालबोध लिपी.

बायबल सोसायटीच्या ट्रान्सलेशन व रिव्हिजन कमिटीचे सभासद म्हणून खालील लोकांनी वेळोवेळी काम पाहिलेले दिसते. रे. एच्. बॅलेन्टाईन (१८६५ पर्यंत) रे. एस्. बी. फेअरबॅक (१८५३ पासून पुढे) रे. हेजन (१८५६, १८६५, १८७२) रे. हरिपंत रामचंद्र (१८५६ ते ६२) रे. आर. व्ही. मोडक (१८५५ पासून पुढे). रे. शाहू दाजी (१८६८ पासून पुढे) रे. सी. होर्डिंग (१८७० ते १८८०) रे. विष्णू भास्कर (१८७० ते १८८१) सी. डब्ल्यू. मार्क (१८७८ ते १८८१) एच्. जे. ब्रूस (१८७८ पासून पुढे) रे. आर. के ह्यूम (१८८० पासून पुढे). रे. इ. एस्. ह्यूम (१८८० पासून पुढे).

इ. स. १८३१ मध्ये बायबल सोसायटीने बायबलचे मराठी भाषांतर करण्यासाठी एक भाषांतर समिति नेमली होती. त्या समितीवर पहिली चोवीस

वर्षे फक्त परदेशीय मिशनरीच होते. त्यात मोल्सवर्थ व कँडी हेही होते. हेन्री वॅन्लटाईन यांची नेमणूक १८४० साली झाली. त्यांच्या नेतृत्वाने अहमदनगर मिशनने पुढीलप्रमाणे नवा करार प्रसिद्ध केला.

१८४७ जॉनकृत शुभवर्तमान
१८४८ लूकाककृत शुभवर्तमान
१८४९ मात्थीकृत शुभवर्तमान
१८५० मार्ककृत शुभवर्तमान

या सर्वांची एकत्र बांधणी केली इ. स. १८५१ मध्ये. "**नगरचा नवा करार**" या नावाने प्रसिद्ध असलेले हे नव्या कराराचे भाषांतर होय.

इ. स. १८७२ ते १८७८ या काळात मराठी बायबलमध्ये काही सुधारणा करून नव्या आवृत्त्या काढण्यात आल्या.

१८९३ सालात एक पुनरीक्षण (Revision Committee) नेमण्यात आली. डॉ. मकिकन या समितीचे अध्यक्ष होते. बिशप मिल्न्, कनन टेलर, डॉ. ॲबट, ना. वा. टिळक व सदाशिवराव लोटलीकर यांचा या समितीत समावेश करण्यात आला. पण टिळक, लोटलीकर लवकरच या समितीतून बाहेर पडले.

पवित्रशास्त्र म्हणजे जुना व नवा करार १९२४, पृ. ६ + १२७५ + २ + १२७७ पृ. १७१७. (हिवाळे)

पंडिता रमाबाईंनी मूळ हिब्रू व ग्रीकवरून भाषांतरित केलेल्या संपूर्ण मराठी बायबलची प्रथमावृत्ती इ. स. १९२४ साली प्रकाशित झाली. दुसरी आवृत्ती १९६४ साली प्रसिद्ध झाली.

पहिली आवृत्ती डेमी साईझ पायका टाईप पृ. १७१७ ची आहे. ती मुक्ती मिशन प्रेस, केडगाव यांनी प्रसिद्ध केलेली आहे.

'पवित्रशास्त्र' वर बाईंचा विशेष भाव होता. बायबलमधील ठेवा आपल्याप्रमाणे इतरांच्या हाती यावा म्हणून बाईंना नेहमी तळमळ लागलेली असे. बायबल अगदी अडाणी व अशिक्षित माणसालाही समजावे, गरीब माणसालाही बायबलचा लाभ मिळावा, वाटेवरील अगदी सामान्य माणसाची किंबहुना मूर्ख माणसाचीही चूक-भूल त्या वाचनाने होता कामा नये, असे बाईंना वाटत होते. त्यांच्यामते बायबलचे वैशिष्ट्य सालंकृतता व संस्कृत प्रचुरता नसून अत्यंत साधेपणा व सोपेपणा हे होय.

बायबल सोसायटीने सुधारून केलेल्या भाषांतरावर त्यांचा विशेष कटाक्ष होता.

बायबलचे नवीन भाषांतर करण्यामागील आपली कारणमीमांसा बाईंनी दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, बायबल सोसायटीच्या भाषांतराची शब्दयोजना संस्कृत-प्रचुर असल्याने ती खेड्यापाड्यातील व इतर अज्ञजनांस समजणे कठीण

होई. जनता ही साध्यासुध्या लोकांचीच बनलेली आहे, विद्वानांची नव्हे. दुसरे कारण म्हणजे बायबल सोसायटीने नवीन भाषांतरात वापरलेले काही काही शब्द हिंदू कल्पनांशी इतके निगडित झालेले आहेत की त्यांची आयात करताच खिस्ती धर्माला संमत नसलेल्या तत्त्वांचा व विचारांचा खिस्ती धर्मात प्रवेश करवून देण्यासारखे होणार होते. त्यामुळे असे शब्द कटाक्षाने वगळावेत.

उदा. मराठीतील उत्पन्न, परमेश्वर, पुत्र, पश्चाताप, मुक्ती वगैरे शब्द भारतीय संस्कृतीत विशिष्ट अर्थछटा घेऊन येतात. खिस्तीधर्माच्या संदर्भात त्यांना वेगळेच अर्थ असतात. भाषांतराच्या कामात मदत व्हावी म्हणून बाईंनी आपल्या भोवती संस्कृत जाणकार गोळा केले होते. त्यांत प्रा..म. दा. साठे, रे. ना. वा. टिळक हेही होते. इब्री व ग्रीक भाषेच्या पंडितांशीही त्यांनी चर्चा केली होती.

पंडिता रमाबाईंनी बायबलच्या भाषांतरासाठी घेतलेल्या परिश्रमांची कल्पना पुढील गोष्टीवरून लक्षात येईल.

(१) ग्रीक व हिब्रू शब्दांची शब्द–सूची तयार करून बायबलमधील प्रत्येक वचनातील शब्दांचे व्याकरणदृष्ट्या पृथक्करण करणे.

(२) अधिकृत आवृत्ती (authorised) इंग्रजी सुधारलेली आवृत्ती, अमेरिकन सुधारलेली आवृती, ह्यांच्यातील वाक्ये घेऊन ओळी ओळी मध्ये शब्दांचे भाषांतर द्यायचे. ह्या शिवाय यंगचे शब्दशः भाषांतर बाजूला देऊन खाली व्यक्तिगत मत दर्शनासाठी न्यूबरी बायबलमधील उतारे द्यायचे.

(३) ओळी ओळीमधील भाषांतर देऊन काही भाषांतील शब्द घेऊन सोपे असे शब्दशः भाषांतर देणे.

(४) संक्षिप्त बायबल टीका पवित्र शास्त्राच्या भाषेत.

अल्पशिक्षित, स्त्रिया, खिस्ती धर्मशिक्षक, उपदेशक यांना बायबलचा अर्थ स्पष्टपणे आणि विनासायास कळावा हा यामागील हेतू होता.

भाषांतराचे काम इ. स. १९०५ साली बाईंनी सुरू केले. त्या कामाला त्यांच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत खंड पडला नाही. संपूर्ण बायबल तयार व्हायला अठरा वर्षांचा काळ लागला. संपूर्ण जगात प्रत्यक्ष इब्री आणि ग्रीक भाषांतरावरून असे अन्य भाषांतर करणारी दुसरी कोणतीही स्त्री सापडणार नाही.

या भाषांतराच्या ५०००० प्रती त्यांच्या निधनानंतर त्यांच्याच छापखान्यातून छापून निघाल्या.

पंडिता रमाबाईंच्या भाषांतराच्या संदर्भात काही उदाहरणे पाहणे उद्बोधक ठरेल.

उदा. येहोवा–जो आहे, होता, जो सदासर्वकाळ आहे तो.

वेदीलाह – मोती

सोहाम – गोमेद

बेनहोनी – माझ्या कष्टाचा मुलगा

दाविद–सुप्रिय. असे इब्री व ग्रीक शब्दांचे अर्थ दिले आहेत. तर संस्कृत शब्दांना देशी पर्यायी शब्द त्या देतात.

उदा. सायंकाळ – सांज, बीज – बी, भूमि – जमिन, संचयाला–साठ्याला, नाकतोडे–गवत्ये टोळ.

भाषांतरात–योहान, लूक, मार्क इत्यादीमधील संदर्भक्रमांक दिले आहेत.

इ. स. १८०७ पासून १९५७ पर्यंत बायबलची जी भाषांतरे झाली त्यांत भाषेच्या दृष्टीने कसकसा फरक होत गेला हे लक्षात येण्यासाठी पुढील काही उदारणे पहा.

" तेव्हा फारशी आणी कीतीक अध्यापक येरोशालमाहून त्याहांचे जवळ आलेत आणि त्याहांचे शिष्यांचे कितीक लोकाला अशौच अर्थात अधौत हाताने खाता पाहून दोष म्हटल. " (बायबल सोसायटी. १८०७ श्रीरामपूर)

" तेव्हा फारीशी आणि शास्त्र्यांतून कित्येक (मनुष्य) येरूशाले–मापासून येऊन त्यापासी मिळाले, आणि ह्यांनी त्याच्या शिष्यांतील कित्येकांस साधारण म्हणजे न धुतलेल्या हातांनी भाकरी खाता पाहून दोष ठेविला. "

(१८३६ बायबल सोसायटी)

" मग पारोशी व कित्येक शास्त्री येरूशलेमापासून येऊन त्याजवळ मिळाले, आणि त्यांच्या शिष्यांतील कित्येकास अशुद्ध म्हणजे न धुतलेल्या हातांनी भाकरी खाता पाहून दोष ठेवू लागले. "

(१८७२ बायबळ सोसायटी)

" आणखी पेरूशी व कित्येक शास्त्री त्याच्याजवळ मिळाले, येरूशलेमापासून आले होते आणि त्यांनी पाहिले होते की त्यांच्या शिष्यांतील कित्येकांनी त्यांची भाकरी अशुद्ध म्हणजे न धुतलेल्या हातांनी खाल्ली. "

(१९२४ पंडिताबाई)

"मग परूशी व कित्येक शास्त्री येरूशलेमहून येऊन त्याजवळ मिळाले त्यांनी त्यांच्या किती एक शिष्यांस अशुद्ध म्हणजे न धुतलेल्या हातांनी भाकरी खातांन पाहिलें होते. "

(१९२५ बायबळ सोसायटी)

" नंतर येरूशलेमहून आलेले परूशी व कित्येक शास्त्री मिळून येशू जवळा आले. त्यांनी त्यांच्या शिष्यापैकी कित्येकास तशाच हातांनी म्हणजे न धुतलेल्या हातांनी जेवताना पाहिले होते. (१९३१; रा. ब. आठवले.)

देहवली बोलीमध्ये नव्या कराराचे एक भाषांतर झालेले दिसते.

नवो करार– (New Testament in Dehvali) प्रका.– R. A. Adam, Secretary British and Foreign Bible Society, Bombay

मुद्रक– आत्माराम प्रिंटींग प्रेस, धुळे. (हिवाळे) १९३० पृ. ६६२.

यातील भाषेचा नमुना पहा.

" येशू खिस्त जो दाविदा पोवरो जो अब्राहामा पोपशो तिया वंशावली "

" हेरोद राजा विहांम यहुदीयांमदेखू बेथलेम तांहां नगरांम येशू जन्म बियो. तांहां हेआ, दिही उगताने जोशी लोक यरूस्लेमांत अर्वान फुचा लाग्या के– "

नेहमीप्रमाणे पुस्तकांत मत्तय, मार्क, लूका, योहान यांची सुवार्ता, प्रेषितांची कृत्ये, रोमकर करिंथकर इत्यादीस लिहिलेली प्रेषितांची पत्रे प्रकटीकरण इत्यादी सर्व मजकूर आहे.

नवा करार

भाषांतर– बा. ना. आठवले, प्रका. दि रिलीजस् बुक डेपो, सेन्टिनरी चर्च बिल्डींग, ग्रँट रोड, मुंबई–८, तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई ८. १९३१ पहिली आवृत्ती– पृ. ६२१, दुसरी आवृत्ती १९३४ (हिवाळे).

बॉम्बे रिप्रेझेन्टेटीव्ह खिश्चन कौन्सिल, मराठी वाङ्मय कमिटी यांच्यातर्फे श्री. बा. ना. आठवले यांनी तयार केलेले हे भाषांतर प्रसिद्ध करण्यात आले.

विद्यार्थीदशेपासून गुरुवर्य रे. कॅनन सी. आणि एस्. रिव्हिंग्टन यांचे भाषांतराच्या कामी खूप सहाय्य झाल्याचे आठवले यांनी नमूद केले आहे.

प्रास्ताविकात आठवले लिहितात, " न्यू टेस्टामेंट या जगविख्यात पवित्र ग्रंथाचे सुबोध व सरळ मराठी भाषांतर अद्यापि झालेले नसल्याकारणाने प्रस्तुत भाषांतराचा प्रयत्न करण्यात आला आहे. नवा करार हा ग्रंथ मराठी भाषा बोलणाऱ्या हजारो खिस्ती जनांच्या नित्य पाठातला असल्यामुळे त्यातील भाषा सहज अर्थबोध होण्यासारखीच असली पाहिजे आणि हाच उद्देश दृष्टीपुढे ठेवून होता होईल तो मूळास न सोडता व अर्थहानी न होऊ देता प्रचलित पण धार्मिक ग्रंथास साजेल अशा शुद्ध व प्रौढ मराठीत हे भाषांतर उतरविण्याचा यथामती व यथाशक्ती प्रयत्न केला आहे. "

ग्रंथात सुरेख चित्रे समाविष्ट केलेली आहेत.

यात–(१) मत्तयने विदित केलेले शुभवर्तमान.
(२) मार्कस्ने विदित केलेले शुभवर्तमान
(३) लुकाने ,,
(४) योहानाने ,,
(५) प्रेषितांची कामगिरी

(६) प्रेषित पौलस ह्यांचे–(१) रोमकरांस पत्र (२) करिंथकरास पहिले पत्र (३) करिंथकरास दुसरे पत्र (४) गलतीयास पत्र (५) इफिस्सकरांस पत्र (६) फिलीफीकरांस पत्र (७) कलस्सैकरांस पत्र (८) थेस्सलनिकाकरांस पहिले

पत्र. (९) थेस्सलनिकाकरांस दुसरे पत्र (१०) तिमथ्‌सास पहिले पत्र. (११) तिमथ्‌सास दुसरे पत्र. इत्यादी विषय प्रस्तुत भाषांतरात समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

अखेरीस काही अपरिचित शब्दांचे अर्थ दिलेले आहेत.

पवित्रशास्त्र – जुना व नवा करार (भाषांतर)

हे भाषांतर ही १९३१ साली प्रसिद्ध केलेल्या आवृत्तीची प्रतिकृती आहे. प्रका. सेक्रेटरी बायबल सोसायटी ऑफ इंडिया आणि सिलोन, ख्राईस्ट चर्च पॅरिश हॉल, मुंबई. मुद्रक – नॅशनल इन्फॉर्मेशन आणि पब्लिकेशन प्रेस, १९५०. पृ. ९५७+२९६.

बायबलची तोंडओळख

ले. दे. ना. टिळक, प्रका. र. ना. हर्षे, एवीटॉवर्स, लॉरेन्स रोड, मेथॉडिस्ट चर्च, बॉम्बे कॉन्फरन्सकरिता १९५०.

(हिवाळे)

बायबलमधील पुस्तके या प्रकरणात ' जुना करार ' ' नवा करार ' यासंबंधी माहिती दिली आहे. प्रकरण चारपर्यंत जुन्या, नव्या करारांची पार्श्वभूमी विशद केलेली आहे.

त्यानंतर मराठीतील बायबलांच्या भाषांतरासंबंधी माहिती व चर्चा केली आहे. त्यात बायबलच्या भाषांतरातील अडचणी, भारतातील पहिले चर्च व बायबलची पहिली प्रत, बायबलाचे पहिले भाषांतर या संबंधीची माहिती येते. त्यानंतर बायबलचे पहिले मराठी भाषांतर व नंतर झालेल्या भाषांतराची माहिती देण्यात आली आहे. भाषांतरे व रूपांतरे यातील अडचणी विशद केल्या आहेत.

अशा प्रकारे मराठीतील बायबलच्या भाषांतराचा माहितीवजा आढावा घेण्यात आलेला आहे.

पुराण – मूळ लेखक फ्रान्सिस वा. डी. गिमराएज

संपा. जॉन डिमेलो. प्रका. जो. बारांको ये. सं. डि. नोबिली कॉलेज, पुणे–६. प्रकाशन स्थळ :– संगम प्रेस, नारायण पेठ, पुणे–२. फेब्रु. १९६०. पृ. २४७.

(पटवर्धन संग्रह)

मराठी भाषेतील ' पुराण ' प्रभू येशू ख्रिस्ताचे कष्ट, मरण व पुनरुत्थान.

वसई, साष्टी या बाजूकडील ईस्ट इंडिअन बोली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठीच्या एका पोटभाषेत हे पुराण आहे.

फादर फ्रान्सिस्को वाझ डी गिमराएज यांनी मुळात पोर्तुगीज भाषेत हे पुराण लिहिले. जॉन डिमेलो यांनी त्याचे ईस्ट इंडिअन बोलीत रूपांतर केले. " हे देव-नागरी लिप्यंतर मुळाबरहुकूम आणि उच्चाराबरहुकूम केले आहे. असे जॉन डिमेलो आपल्या ' निवेदनात ' या पुस्तकाचे संपादन करीत असताना आणि

लिप्यंतराच्या कामी प्रा. शांताराम बंडेलू यांनी संपादन केलेल्या फादर स्टीफन्सकृत ' ख्रिस्तपुराणाची ' थॉमस कार्व्हालोच्या पुस्तकाचा उपयोग केला आहे. पुस्तक सचित्र आहे. एकूण पंधरा कथा आहेत. शेवटी शब्दसूची आहे. थोडा भाषिक नमुना पहा :–

कथा पैली – कैंसे जेजूस स्वामी सा दिस पुंड आपले मरनाचे गेले जेरुवालेमचें शारामदे मरावाला पाप्यांतो पाट्यांतो आनि जे बिजं तिथं विचले.

(१) सांव ज्यांव एंवाजेलिस्त बोलते शास्त्री
सा दिस पास्कूचे पुंडं
गेले बेथानिया नगरामंद । जेजूस स्वामी

वरीलप्रमाणे प्रत्येक कथेच्या प्रारंभी थोडे गद्यवाक्य आणि नंतर सर्व पद्य आहे.

फादर स्टीफन्सचे ख्रिस्तपुराण उपलब्ध असताना (तेही देवनागरी) हे ईस्ट इंडिअन बोलीतील पुराण नव्याने छापण्याची आवश्यकता होती काय ? यावर संपादक म्हणतात " गोव्यात आणि दक्षिण कोकणात १६१४ पासून १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या एक दोन दशकापर्यंत फादर स्टीफन्सच्या ख्रिस्तपुराणाला अमाप लोकप्रियता आणि उदंड लोकाश्रय लाभला होता. नंतरच्या काळात तो झपाट्याने ओसरत गेलेला दिसून येतो.

मराठी भाषेचा फादर स्टीफन्सनी आपल्या पुराणात व्यक्त केलेला सोज्वळ अभिमान, या पुराणाच्या जन्मस्थळी पुन्हा निर्माण झाल्याखेरीज, त्या पुराणाला वाचकवर्ग मिळणे शक्य नाही आणि जन्मस्थळी लोकाश्रय लाभल्याखेरीज, महाराष्ट्रात तरी तो कसा अपेक्षिता येईल ? म्हणून प्रस्तुत पुराण छापण्याचा उपद्व्याप केलेला आहे.

फादर फ्रान्सिस्को वा. डी. गोमराएज यांनी पोर्तुगीज भाषेत लिहिलेल्या पुराणाची जुन्यात जनी उपलब्ध प्रत १५९३ साली पोर्तुगालमध्ये एव्होरा (Evora) येथे प्रसिद्ध झालेली आहे. फादर अन्तोनियो लेर्ते या पोर्तुगीज इतिहासकाराच्या मते ही सर्वांत जुनी प्रत नसून हे पुस्तक प्रथमतः १५५९ साली प्रसिद्ध झाले असावे. पोर्तुगीज भाषेतील पुराणाचे पुढे ईस्ट इंडिया बोलीत नंतर शंभर वर्षांनी १६५९ साली रूपांतर झाले. हे पुस्तक रोमन लिपीत आहे. १८७६ मध्ये पुन्हा त्याच लिपीत मुद्रित झाले. १६१४ साली फादर स्टीफन्सचे पुराण प्रसिद्ध झाले. १६५९ मध्ये ईस्ट इंडिअन बोलीतील रूपांतर प्रसिद्ध झाले. माणिकपूरच्या थॉमस कार्व्हालो यांनी केलेले देवनागरी लिप्यंतर १९२२ साली प्रसिद्ध झाले. १६५९ नंतर ३०० वर्षांनी १९६० साली पुन्हा प्रसिद्ध झाले.

मराठीतील येशू ख्रिस्त चरित्रे

बायबल व इतर धार्मिक ग्रंथांतून येशू ख्रिस्ताच्या चरित्रासंबंधी निरनिराळ्या

स्वरूपात येशूची माहिती दिली जात होती, तरी सुद्धा सर्वसामान्य वाचकांसाठी सलग अशा येशू चरित्राची धर्मपंथीयांना आवश्यकता वाटणे अपरिहार्य होते. इतर धर्मीयांतसुद्धा येशूच्या चरित्राचा महिमा सांगण्याची ख्रिस्ती धर्मप्रसारकांना व ख्रिस्ती धर्मीयांना आवश्यकता वाटली तर ते योग्यच होते. त्यातून येशूची मराठी चरित्रे लिहिली गेलेली दिसतात.

येशू ख्रिस्ताचे चरित्र भाग ३—बाबा पद्मनजी

बॉम्बे ट्रॅक्ट अण्ड बुक सोसायटी, मुंबई यांनी इ. स. १८८२ साली प्रसिद्ध केले.

(हिवाळे)

मोठ्या पुस्तकाचा हा अल्प भाग असून पृ. ८५ ते १२४ आहेत. यात अध्याय १०, ११, १२ खंड २ मधील आणि खंड ३ मधील अध्याय १, २, ३ समाविष्ट केलेले आहेत.

दोन पुरवण्या असून पहिल्या पुरवणीत येशूच्या गालीलातील फेऱ्या व पुरवणी दोन मध्ये यहुदी लोकांची भुते काढण्याची रीत सांगितली आहे.

येशू ख्रिस्ताचे चरित्र–

बाबा पदमनजी, बाँबे बुक ॲण्ड ट्रॅक्ट सोसायटी, मुंबई–१८८३ पहिली आवृत्ती १२+३८३ + ३९५ (हिवाळे) १८९५ दुसरी आवृत्ती (इ. स. १८८३ साली प्रथम सात भागात प्रसिद्ध झाले.)

चार शुभवर्तमाने व चार प्रसिद्ध ग्रंथ यांच्या सहाय्याने आपण हे चरित्र लिहिले असे ते प्रस्तावनेत म्हणतात. ते त्या ग्रंथाची नावे देतात ती अशी–

(१) Farrar's life of Christ.
(२) Geikies life and words of Christ.
(३) Pressense's Jesus Christ His times and works.
(४) Andrew's Bible Student's life of our Lord याशिवाय
(५) Robinson's Harmony of Gospel.
(६) Andrew's Life of Christ.

प्रस्तावनेतील प्रदीर्घ मजकुरानुसार " देवपुत्राचे चरित्र " लिहिताना मानव-बुद्धीच्या पडणाऱ्या मर्यादांची जाणीव बाबांना सातत्याने होती हे स्पष्ट दिसते. या चरित्रासाठी बाबांनी नामवंत लेखकांच्या प्रसिद्ध पुस्तकांचे सहाय्य घेतले होते. त्या पुस्तकांचा वापर करताना स्थळ, काळ, व्यक्ती इत्यादी बाबतच्या उल्लेखातील विपर्यास टाळण्याचा प्रामाणिक व हेतुपुरस्सर प्रयत्न सर्वत्र दिसून येतो.

१८९५ मध्ये येशूख्रिस्त चरित्राची दुसरी आवृती निघाली. यात प्रथम दहा कुमारी हे छायाचित्र, बाबा पदमनजी यांनी लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना आहे. एकूण

पुस्तकात ७ खंडांत चरित्राची मांडणी केलेली आहे ती अशी–खंड १ ला–खिस्तजन्म यात येशूचे बालपण ते बाल येशूचे सणाकरिता यरूशलेमास जाणे पर्यंतची हकिकत

खंड २ मध्ये – बाप्तिस्मा करणारा योहान्न ते येशूचे कानागावी दुसऱ्यांदा सणाकरिता येरूशलेमास जाणे या काळातील चरित्रभाग.

खंड ३ मध्ये – बाप्तिस्मा करणारा योहान यांचा वध या हकिकतीपासून तो येशू बारा प्रेषितांस सुवार्ता गाजवावयास पाठवितो त्यास त्याचा आदेश. तो कापरणाहूमास परत येतो. तेथे त्याचे प्रेषित त्याला येऊन भेटतात.

खंड ४ मध्ये – चार हजार मनुष्यांस भोजन घालण्याचा प्रयत्न, तेथून येशू एका जन्मांध मनुष्यास दृष्टी देतो. इथपर्यंतचा कथा भाग.

खंड ५ मध्ये – येशूच्या प्रयाणातील कित्येक गोष्टीपासून सुरूवात होऊन लाजारसाचे मरण व पुनरुत्थान. यरीहा व बेथानी येथे घडलेल्या गोष्टी या हकिकती येतात.

खंड ६ मध्ये – बेथानी येथील मेजवानी येशू यरूशलेमात प्रसिद्ध रीतीने व मोठ्या समारंभाने प्रवेश करतो पासून तो येशूचे वधस्तंभीचे मरण. त्याची प्रेतक्रिया इथपर्यंतचा कथा भाग.

खंड ७ मध्ये – खिस्ताचे पुनरूत्थान, शिष्यास दर्शन, पुनरूत्थानानंतरची खिस्ताची आणखी दर्शने, खिस्ताचे स्वर्गारोहण हा भाग येतो आणि चरित्रकथा संपते.

येशू खिस्ताचे चरित्र

रे जेम्स स्मिथ, भाषा : सुमंत दयानंद करंदीकर, सेक्रेटरी–बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई, निर्णसागर प्रेस. आ. १ ली १९१५. पृ. १७० (जेसुईट फादर्स नगर) द्वितीय आवृत्ती १९१७.

बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे एक माजी सेक्रेटरी रे. जेम्स स्मिथ ह्यांच्या ‘ Life of Jesus Christ in Mordern English ’ ह्या पुस्तकाचे हे मराठी भाषांतर आहे. मराठी पवित्र शास्त्रातून खिस्ताच्या चरित्र संबंधातील उतारे निवडून ते कालानुक्रमाने जुळवून ह्या पुस्तकाची वैशिष्टयपूर्ण रीतीने रचना केली केली.

अपेक्षा आणि भविष्य–येशूचा जन्म व बालपण–कार्याची सिद्धता–येशूच्या लौकिक कार्याचा प्रारंभ–येशूचा गालीलातील मुक्काम–येशूला शास्त्र्यांचा विरोध–डोंगरावरील उपदेश–गालिलातील एक फेरी–प्रतिकारास प्रारंभ–सरोवराच्या नजिक चमत्कारांचा दिवस–गालिलातील उपदेश ककर्णहून येथील आणीबाणीचा प्रसंग–गालिलातल्या उत्तर भागातले त्याचे कार्य–गालिलातून अखेरचे प्रयाण–येशू पेरियात जातो–येशू येरूशेलेमास परत येतो. येशू बेयानिस परत येतो येशू ईफ्राइमास निघून

जातो–यरूशलेमाला अखेरची फेरी–त्याचा शेवटचा आठवडा–वादाविवादाचा दिवस–येशूची दर्शने.

पुस्तकाची भाषा चरित्रग्रंथास साजेशी निवेदनपर आहे. याच पुस्तकाची दुसरी आवृत्ती १९१७ साली निघाली व तिसरी आवृत्ती १९५६ साली निघाली. १९१७ ची आवृत्ती लक्ष्मीनारायण प्रेस मध्ये छापली. तिची पृष्ठसंख्या १८१ आहे.

श्रीख्रिस्त विजय (श्रीख्रिष्ठ विजय)

नवलकर गणपतराव, पृ. ५७८ (डोंगरे) सप्त खंडात्मक ख्रिस्त चरित्र. अभंगरूप एकूण सदुसष्ट अध्याय. (इंदापूर मिशन)

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत हिंदू लोकांचे सर्व ग्रंथ पद्यात्मक असल्याकारणान ते त्यांस अतिप्रिय झालेले आहेत. असे कवितारूप ग्रंथ आम्हा ख्रिस्ती लोकाचे उपयोगास्तव का नसावेत ? तीस चाळीस वर्षांमागे अशा ग्रंथाची आवश्यकता जाणून रे. हरी रामचंद्र ख्रिस्ती यांनी एक ओवीबद्ध ग्रंथ तयार करण्याचा क्रम चालविला होता. पण त्यांच्या अकाली निधनाने त्यांना ते शक्य झाले नाही.

या ग्रंथातील कविता अभंग रूपाने केलेली आहे आणि तीतील भाषा जितकी सुबोध होईल तितकी केलेली आहे.

त्या काव्यातील चार शुभवर्तमानात वर्णिलेले प्रभू येशू ख्रिस्ताचे चरित्र समग्र व यथाक्रम सांगितलेले आहे. जागोजागी विशेष स्पष्टीकरणार्थ ऐतिहासिक शास्त्रीय माहिती दिली आहे.

मुलांचा ख्रिस्त

प्रका. मिस्. ए. ए. अॅबट फॉर डब्ल्यु. एफ्. एस्. च्या ऑल इंडिया लिटरेचर कमिटी करिता १९३२, पृ. ३४. (हिवाळे)

मिस् इ. रॉबिन्सन यांच्या मूळ इंग्लिश पुस्तकाचे हे भाषांतर होय.

लहान मुलांस योग्य अशा भाषेत येशू ख्रिस्ताचे जीवनचरित्र सांगितले आहे.

नवजीवन प्राप्ती अथवा प्रे, योहान लिखित ख्रिस्तचरित्राचे विवरण

अनुवादक– रे. दि. शं. सावरकर, प्रका. रे. जे. एफ्. एडवर्डस्, ७, सोलापूर रोड, पुणे. मुद्रण– आर्यभूषण प्रेस, पुणे किंमत ८ आणे. इ. स. १९३७ आवृत्ती १ ली. (ठोकळ)

पुस्तकात मूळ ग्रंथकर्त्यांचा उपन्यास (अर्थात मराठी रूपांतर) रे. जे. एफ्. एडवर्डस यांची पूर्वसूचना– भाषांतरकाराचा उपोद्घात आणि चरित्र एवढा मजकूर आहे. चौथे ख्रिस्त चरित्र लिहिणाऱ्या लेखकाने कोणत्या उद्देशाने लिहिले ते यातील मजकुराच्या आधारे ठरविणे. प्रे. योहान यांनी लिहिलेल्या ख्रिस्त चरित्राचा हिंदी

वाचकांना कसा उपयोग होईल, धर्माचा खरा अर्थ, चवथे ख्रिस्त चरित्र व पहिली तीन यांतील फरक. चौथे ख्रिस्तचरित्र कोणी लिहिले याबद्दल प्राचीन ख्रिस्ती मंडळ व आधुनिक अभिप्राय, योहान या विषयी काही प्राचीन शंका व दंतकथा, धार्मिक वाङ्मयात प्रे. योहानकृत ख्रिस्तचरित्राचे स्थान वगैरे मुद्दे हाताळले आहेत.

अनुवादकाने आपल्या उपोद्घातांत; ख्रिस्त चरित्राच्या कथेविषयी आपला अभिप्राय अर्डमनकृत विवरण, पुस्तकाचे स्थान, असे विषय हाताळले आहेत.

प्रभूचे अपरिचित चरित्र (The hidden years)

मूळ लेखक– जॉन ऑक्झनहॅम, अनुवादक– पी. के. कोष्टी, प्रका. र. ना. हर्षे, मेथॉडिस्ट चर्च, बॉम्बे कॉन्फरन्सकरिता, आयव्ही टॉवर्स, लॉरेन्स रोड, पुणे १, पहिली आवृत्ती १९४०.

पहिली भेट या प्रकरणात येशूचा मावसभाऊ आईसह नासरेथ येथे रहायला आला. त्यानंतर येशूची व त्याची पहिली भेट झाली वगैरे प्रसंगाचे वर्णन आहे. तिथपासून चरित्रास सुरुवात केली आहे. पुढे त्या सर्व मंडळीत स्नेह निर्माण झाला. येशू व अज्जुर यांच्यातील समवयस्क मुलांचा आनंद, खोड्या वगैरे प्रसंगाचे निवेदन संवाद रूपाने व घरगुती वातावरणातील आहे. अज्जुरच्या शब्दांतून लहानपणच्या येशूच्या अपूर्व व्यक्तिमत्वाचे वर्णन आहे. त्यानुसार येशू वयाच्या मानाने फार समजूतदार, खोड्या फारशा न करणारा, भलते – सलते उपद्व्याप न करणारा असा होता. तो असला की बरोबरच्या मुलांत भांडण तंटे होत नसत, त्याने लवकरच शाळा सोडली, तत्परतेने तो वडिलांना सुतार कामास मदत करत असे. त्या मुलांनी पाळलेल्या तोबायस नावाच्या कुत्र्याचे वर्णन व आनुषंगिक प्रसंग वाचावयास मिळतात. येशु व तोबायस यांचे तळ्यातील पोहणे, सर्व मुलांनी मिळून डोंगरावर चढण्याच्या केलेल्या गमती, हमरस्त्यातून चालताना येशूने सर्वांस गोष्टी सांगाव्या त्याही आकर्षक रीतीने, सर्व बरोबरच्या मुलांत अनेक तऱ्हांनी हुंदडले तरी सर्वांस सांभाळून घेऊन वागण्याचे मोठेपण येशूकडेच होते. अशा प्रकारचे येशूच्या बालपणचे जीवन चित्रित केले आहे. येशू जरा मोठा झाल्यावर दिसलेले गुण, मनाची भरारी, गंभीरपणा, औदार्य, अठरा वर्षांचा होतो तोच वडिलांचा मृत्यू झाला. त्या वयातही येशूचे जबाबदार वर्तन इत्यादींचे दर्शन घडविले आहे. येशू आणि जेरह अज्जुर व जो यांच्यात निर्माण झालेले प्रणयी वातावरण, आनुषंगिक प्रसंग, तोबायस कुत्र्याचा मृत्यू येशूची लोकांशी वागण्याची रीत, लोकांच्या उपयोगी पडण्याचे व्रत, अज्जुरची आई अंगावर वारं जाऊन आजारी झाली तेव्हा तिची केलेली सेवा, त्याचे मुक्तिदाता म्हणून सामर्थ्य, उपदेश, चमत्कार इत्यादीचे निवेदन दिले आहे. सर्व निवेदन अज्जुरच्या प्रथम पुरुषी शब्दांत व घरगुती वातावरणातील आहे.

जगातील मुलांचा मित्र येशू

हे भाषांतरित पुस्तक " Jesus, friend of children everywhere " या मूळ इंग्रजी ग्रंथाचे आहे. ह्या पुस्तकाचे भाषांतर सन्डे स्कूल युनियन, कून्नूर, निलगिरी, भारत यांच्या वतीने करण्यात आलेले आहे. येशू खिस्ताचा जन्म, सुतार कारखान्यात येशू आणि मुले, येशूने भुकेल्यांना तृप्त करणे, येशूची शेवटली मोठी यात्रा. एवढा मजकूर गोष्टीरूप व ठळक टाईपात दिलेला आहे.

या पुस्तकाचा काळ व लेखकाचे नांव उपलब्ध नाही.

प्रकरण ६ वे

सामाजिक सुधारणांविषयक वाङ्मय

ख्रिस्ती मिशनरी धार्मिक प्रसाराबरोबर सामाजिक व शैक्षणिक सुधारणांनाही महत्त्व देत होते. युरोपातील सामाजिक परिवर्तनाचा त्यांच्यावर परिणाम होताच होता, पण नव्या विज्ञानाने त्यांची दृष्टी अधिक व्यापक झालेली होती. स्वातंत्र, समता, बंधुभाव याचे फायदे ते अनुभवित होते. भारतातील धर्मप्रसारासाठी या गोष्टीही त्यांना भारतात आणणे आवश्यक वाटत होते. या दृष्टीने महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणाबाबत त्यांचे वाङ्मयीन कार्य असे आहे.

व्यभिचारी निषधक बोध

बाबा पदमनजी, स्वतः छापून प्रसिद्ध केले, अमेरिकन मिशन छापखाना, १८५४, पृ. १० + ९२ + ७. (हिवाळे)

बाबा पदमनजी हे सामाजिक सुधारणांविषयक पुस्तक होय. यात व्यभिचार कर्मांचे प्रकार, त्याविषयी लोकांचे मन, जार कर्मांचे अपराध, रंडीबाजी व त्याचे वाईट परिणाम, त्या सर्वांबाबत प्राचीन कालची दंडनीती, इष्कबाजीत अडकलेली तरुण पोरे, मैफिली, बैठकी वगैरे प्रकारचे आचरण, या सर्वांमुळे प्राप्त झालेली दशा, असे निवेदन पुस्तकाच्या पहिल्या भागात आहे.

दुसऱ्या भागात या सर्व प्रकारच्या दुर्वर्तनास आळा घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या थोर विद्वानांचे महत्त्व, त्यांचे कार्य, त्यातून घडणारे, स्वदेश कल्याण, इत्यादी विषयी विशद केले आहेत.

पंडित, उपाध्ये, हरदास यांच्याशी याबाबत संभाषण अशा प्रकारच्या पुरवण्या आहेत.

व्यभिचारी वर्तनाची कारणमीमांसा देताना अविचारी लोक व विचारी लोकांची दुर्बलता ही दोन कारणे स्पष्ट केली आहेत. इंद्रिय भोगात रममाण झाल्याने झालेली अवस्था दर्शविणारे प्राचीन दाखले दिले आहेत. तसेच अशा वृत्तीतून निर्माण झालेल्या लग्नप्रसंगी कलावंतिणींचा नाच, वगैरे सारख्या रूढी यावर हल्ला केला आहे. धर्माच्या आधाराने व निमित्ताने घडणारा व्यभिचार उघड केला आहे. कुटुंब सुखावर होणारे दुष्परिणाम दाखविले आहे.

अखेरीस समाजास लागलेली कीड नाहीशी कशी होईल याचा तळमळीने विचार केला आहे. उपाययोजना सुचविल्या आहेत.

प्रस्तुत निबंधात अवलोकन, सांगोपांग अभ्यास, चटकदार प्रारंभ, परिणामकारक मांडणी व आकर्षक शेवट, अशा अनेक निबंधगुणांचा प्रत्यय येतो.

यहुदी, मुसलमानी, फ्रान्स, स्पेन, पोलंड इत्यादी अनेक देशांतील लोकांना कोणती शासने केली जातात तेही लेखकाने ठिकठिकाणी सांगितले आहे.

कुटुंबाची सुधारणा–

बाबा पदमनजी, पुणे पाठशाळा, शिलाप्रेस, १८५५. पृ. ४+११९. (कराडकर)

या निबंधास दक्षिणाप्राईज कमिटीचे १५० रुपयांचे बक्षिस मिळाले होते.

या पुस्तकात हिंदू लोकांची सांप्रतची स्थिती, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह विचार, शील, बालविवाह इत्यादी विषयांचा विचार केलेला आहे.

प्रस्तुतचा निबंध – (१) कुटुंबाविषयी सुधारणा विचार, (२) हिंदू लोकांच्या स्त्रियांची सांप्रतची स्थिती, (३) स्त्री-शिक्षण, (४) विधवाविवाह लाभालाभ. (५) मुलांस विद्याभ्यास व सुशिक्षा, (६) बालविवाह, (७) कन्या विक्रय, लहान मुलांस अलंकार घालणे अनर्थकारक, (८) हिंदू लोकांचे सण अशा प्रकरणातून विभागला आहे.

या सर्व प्रश्नांचा विचार करताना कुटुंबातील घटकांच्या सुधारणांची आवश्यकता विशद केली आहे. कुटुंब म्हणजे काय ? हे विशद करताना संसार असार आहे हे मत चूक कसे आहे ते स्पष्ट केले आहे. प्रपंचात गोडी उत्पन्न करून ऐहिक जीवन आनंदात कसे घालविता येईल त्यासंबंधी चर्चा केलेली आहे.

या सर्व विवेचनात कनिष्ठ व उत्तम दोन्ही कुटुंबाची अवस्था लक्षात घेतली आहे. सांप्रतच्या कुटुंबस्थितीत मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष कसे होते, त्यांच्यावर योग्य ते संस्कार घडत नाहीत, लग्न, जेवणावळी, नाच वाजंत्री वगैरेसाठी बेसुमार खर्च होतो, बाल विवाहाने घडणारे तोटे, मुलांना अलंकार घालून नटविण्यात होणारे दुष्परिणाम या सर्वांचे चित्र मांडले आहे.

पुनर्विवाह प्रश्नांचा जिव्हाळ्याचे व विस्तारपूर्वक विचार व पुरस्कार केला आहे. तसेच सण वगैरेतून असणाऱ्या अंधश्रद्धा, अडाणीपणा, घातकी रूढी वगैरेंवर हल्ला चढविला आहे.

या निबंधावर लोकहितवादींच्या विचाराची छाप आहे. हा निबंध संवाद रूपाने लिहिलेला आहे. त्यातील रुक्षता कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. शतपत्रांतील कित्येक अवतरणे दिली आहेत. १६ एप्रिल १८५६ च्या ज्ञानोदयात "This book is very much useful to the Hindoos and we trust it may have extensive circulation " असे म्हटले आहे.

स्त्रीधर्मनीती – पंडिता रमाबाई, ज्ञानप्रकाश छापखाना, पृ. १४४, ३० जून १८८२ (हिवाळे)

पतिनिधनानंतर चारपाच महिन्यांत पंडिता रमाबाईंनी आपले पहिले पुस्तक स्त्रीधर्मनीती हे लिहिले. ह्या विषयावर त्याच सुमारास मुंबईच्या हलाई भाटिया महाजनवाडीत त्यांचे भाषण झाले होते. व ह्या भाषणाचे वेळीच ह्या पुस्तकाचा आराखडा तयार झाला. हे पुस्तक लिहिताना त्यांची मनःस्थिती कशी असावी हे या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेवरून स्पष्ट होते.

अर्पणपत्रिका – " स्वर्गवासी–

प्रियतम भर्ता

बापू बिपिन बिहारी एम्. ए. बी. एल्.

ह्यांच्या स्मरणार्थ

त्यांच्या शोकाकुल पत्नीने

हे

लहानसे पुस्तक रचून

स्वदेश भगिनीस

प्रितीपूर्वक नजर केले असे. "

पतिनिधनाचे दुःख त्यांच्या मनात अगदी ताजे होते. त्याला थोडा विरंगुळा म्हणून त्यांनी हे पुस्तक झटपट लिहिण्यास घेतले. ४ फेब्रु. १८८२ या दिवशी श्री मेधावी वारले व ३० जून १८८२ रोजी हे पुस्तक, तयार झाले. पतिनिधनानंतर पत्नीधर्माबद्दल एखादा ग्रंथ मराठीत सापडतो काय म्हणून त्यांनी शोध घेतला. त्यांना तसा ग्रंथ सापडला नाही. तेव्हा त्यांचे मन अधिकच अस्वस्थ झाले. खरे म्हणजे " महाराष्ट्र भाषेत पुस्तक लिहिण्याचा प्रथम प्रयत्न होता. " तरी ते काम अंगावर घेऊन अत्यंत थोड्या अवधीत हातावेगळे केले. पुस्तक इतके उपयुक्त ठरले की जून १८८२ मध्ये पहिली आवृत्ती निघून ती ताबडतोब खपली व १८८३ च्या सुरुवातीला एप्रिलमध्ये दुसरी आवृत्ती काढावी लागली. ती पुणे वैभव छापखान्यात छापली. पृ. १७२ होती.

शंभर वर्षांपूर्वीच्या ह्या पुस्तकाला इतका चांगला लोकाश्रय मिळाला यावरून या पुस्तकाचे मोल कळून येते. या पुस्तकाद्वारे मिळालेल्या पैशातून रमाबाईंच्या इंग्लंडच्या प्रवासासाठी खर्चाची तरतूद झाली.

दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत बाई म्हणतात–

" हा ग्रंथ छापून झाल्यावर त्याच्या गुणदोषांविषयी वर्तमानपत्रात बरीच चर्चा झाली. तिच्यावरून या पुस्तकात अनेक दोष असले तरी ग्राह्यांशही बराच आहे असे दिसते. व तेवढ्यानेच माझ्या श्रमाचे सार्थक झाले. ह्या ग्राह्यांशाकडे नजर देऊन मेहेरबान डायरेक्टर साहेबांनी प्रथमावृत्तीच्या ५०० प्रती घेतल्या व बाकी इतर

लोकांत खपल्या म्हणून हल्ली ही दुसरी आवृत्ती काढली आहे. " हीत पहिल्या आवृत्तीत जे शब्दरचनेचे दोष राहिले होते त्यांपैकी बरेच काढून टाकले आहेत, संस्कृत व अपरिचित शब्द फार आहेत. अशाविषयी फारच बोभाटा ऐकला, तेव्हा असे शब्दही बहुतेक बदलले आहेत. ह्या शिवाय क्वचितस्थळी मूळच्या मजकुरातही कमीजास्त केले आहे. "

पुस्तकात एकूण आठ परिच्छेद आहेत ते असे - (१) पाया (२) विद्या (३) मर्यादा (४) धर्म (५) वधूवृत्त (६) गृहकृत्य (७) बालकांचे पालन व शिक्षण (८) इतिकर्तव्य.

चौथ्या परिच्छेदात– " धर्म " या विषयाची फोड अशी केली आहे– (१) धृति (धैर्य) (२) क्षमा (३) दम (मनोनिग्रह) (४) अस्तेय (५) शौच (अन्तर्बाह्य शुद्धता) (६) इंद्रियनिग्रह (७) धी (धर्मसंबंधी बुद्धी) (८) विद्या (९) सत्य (१०) अक्रोध (द्वेष, मत्सर राग यांचा त्याग) पहिले चार परिच्छेद सर्वसाधारण स्त्रीजीवनाविषयी असून पाचव्या " वधूवृत्त " या परिच्छेदापासून स्त्रीच्या चरित्रात विवाहानंतर होणाऱ्या बदलास अनुसरून उपयुक्त असा मजकूर आहे. कित्येक स्त्रिया पतीचे उष्टे खाणे, त्यांचे पाय धुऊन ते पाणी पिणे इत्यादी बाह्यात्कारी सोंगे दाखवितात परंतु खरा पत्नीधर्म " आपल्या पतीच्या ध्येयधोरणास व मनास अनुसरून धर्माला आणि ईश्वराला स्मरून आचरण पवित्र ठेवणे " यात आहे.

गृहकृत्य या प्रकरणात अत्यंत सोप्या रीतीने त्यांनी नववधूंना बोध केलेला आहे. आळस नको, चाकराशी आदबीने बोलावे, नणंदा किंवा आप्त यांची गाऱ्हाणी चाकराजवळ सांगू नयेत. घरात सर्व जिनसा आपणास कोणत्याही वेळेस सहज सापडेल अशा ठेवाव्या. केर साचू देऊ नये. एखादे मनुष्य काही वाईट कर्म करून निंद्य झाले आहे, अशाची तुम्ही निंदा करू नका, अशासारखा बोध या प्रकरणात आहे.

शेवटले प्रकरण " इतिकर्तव्यता " म्हणून आहे. त्याचा शेवट करताना बाई लिहितात–मांडव्य ऋषी ईश्वर ध्यानात निमग्न असून वनात रहात होते. त्यावर चोरीचा आळ घालून दुष्टांनी त्यास सुळावर लावले. तशा प्राणांतिक दुःखदशेतसुद्धा त्यांचे धैर्य पर्वताप्रमाणे अचल होते. ते वनात असताना त्यांची जी क्षमा तीच शेवट पर्यंत होती. त्यास ज्या दुष्टांनी सुळावर दिले त्यास त्यांनी क्षमा केली व विचार करून सर्व आचरण केले. त्यावेळेस त्यांस क्रोध, निराशा वगैरेंनी अगदी उपद्रव दिला नाही. येशू ख्रिस्तास दुष्ट लोकांनी क्रूसावर सर्वांगी खिळे ठोकून मारले, परंतु त्या भयंकर वेळेस त्याचे मनास अगदी भय किंवा दुःख झाले नाही. क्रूसावर अशा शोचनीय दशेत मरतेवेळी सुद्धा त्याने स्थिरचित्त होऊन शांत मनाने जगत्पित्याशी सर्व प्राण्याचे मंगल होण्यासाठी प्रार्थना केली आणि मोठ्या धैर्याने सर्व यातना सोसून घेतल्या, परंतु तो धर्ममार्गावरून घसरला नाही, त्याचे नाव धार्मिक. "

(तिसऱ्या आवृत्तीत हा मांडव्यमुनींच्या उदाहरणाचा उतारा सापडत नाही.)

ईश्वरादेशावाचून दैव म्हणून एखादा कोणी जगातील कर्ता नाही. यास्तव दैवास किंवा ईश्वरास दोष लावू नये. कोणाचे अत्यंत प्रिय असे एखादे मनुष्य मेले तर त्याबद्दल शोक न करून संतोषच मानावा. कारण पूर्वी आपले प्रिय मनुष्य असता आपले सर्व प्रेम त्याचेच ठायी एकवट होऊन राहिले होते. म्हणून निर्मल अंतःकरणाने त्या प्रेमाचा प्रसार इतरांवर करण्यास सवड राहिली नव्हती. आता ईश्वर-कृपेकरून निःस्वार्थ प्रेम करण्यासारखे महत्कृत्यास विघ्नरूप ते मनुष्य जेव्हा नाहीसे झाले, तेव्हा आता आपण त्याचा शोक का करावा ? आपले प्रेम एका जागीच कोंडून न ठेवता सर्व प्राण्यांच्या ठिकाणी त्याचा प्रसार करावा. तसे केले म्हणजे मनास अनिर्वचनीय आनंद आणि समाधानही होईल. सर्वांवर निर्मल अंतःकरणाने प्रेम ठेवून निःस्वार्थ परोपकार केल्याने मनुष्यास जे सुख प्राप्त होते, त्यास उपमा द्यावी असे जगात काहीच नाही. एखादा जलप्रवाह सारख्या मैदानातून वहात असला म्हणजे त्याचे अंगी अगदी वेग नसतो. त्याच्या गतीला पर्वत किंवा अशाच प्रकारचे काही आड आले म्हणजे त्याचा वेग अतोनात वाढतो. ”

या पुस्तकाचा मुख्य आशय असा सांगता येईल. स्त्रीने परावलंबी राहू नये. गृहकृत्य सांभाळून संसारोपयोगी उद्योग करावा. विद्यार्जन करावे. संगोपन, आजारपण, शुश्रुषा, हिशोब, क्रयविक्रय व्यवहार, आरोग्य, स्वच्छता, पाकशास्त्र, गृहरचना इत्यादी ज्ञान संपादन करावे. वर्तन मर्यादाशील, सभ्य, पतीचे कलानुसार पण पतीचे दुर्वर्तनही सुधारणारे वगैरे असावे. ईश्वराला सुख-दुःख अर्पण करावे.

पुस्तकाची भाषा सर्वत्र उपदेशप्रधान आहे. रामायण, महाभारत, पाश्चात्य ग्रंथ यांतील दाखले वेळोवेळी दिले आहेत.

तिसरी आवृत्ती प्रकाशक– मिस्. लिलियन डर्करन, रमाबाई मुक्ती मिशन, केडगाव (जि. पु.) मुद्रक– वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, पुणे.

युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त– पंडिता रमाबाई

इ. स. १८८६ मार्च महिन्यापासून १८८८ च्या नोव्हेंबर अखेरीपर्यंत अमेरिकेत राहून रमाबाईंनी त्या देशात सुमारे ३०००० मैल इतका प्रवास करून माहिती मिळविली. ती या पुस्तकात ग्रंथित केली. अमेरिकेहून परत आल्यावर डिसेंबर १८८९ मध्ये हा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

त्यात लिव्हरपूलपासून फिलाडेल्फिया पर्यंतचा जलप्रवास, अमेरिकेतील शासन पद्धती, तेथील लोकस्थिती, गृहस्थिती, तेथील विद्याव्यासंग, धर्ममते. दानधर्म, स्त्रियांची स्थिती, व्यापारधंदे इ. विषय हाताळून बाईंनी आपला चतुरखपणा दाखवून दिला आहे. त्यांचे सूक्ष्म निरीक्षण व तत्कालीन आपल्या देशातील त्यांनी केलेले निःस्पृह परीक्षण आजही चिंतनीय आहे. ८० वर्षापूर्वी प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचे सुबोध शब्दचित्र बाईंनी काढून दाखविले. प्रजासत्ताक राज्यात जनतेचे आचार,

विचार, व्यवहार व मनोव्यापार कसे चालतात व कसे चालायला हवेत, याविषयीचे त्यांचे इशारे आजही मननीय आहेत. भारताला एकच राष्ट्रीय भाषा असायला हवी आणि ती हिंदी असे खणखणीतपणे रमाबाईंनी सांगितले होते. आपल्या म्युनिसिपालिटया, फायर ब्रिगेड, पोलिस, दानधर्म, शाळा इत्यादीमध्ये कशा कशा सुधारणा व्हायला हव्यात हेही ह्या पुस्तकात सांगितले आहे.

हिंदी भाषा भारताची राष्ट्रभाषा व्हावी या बाबत बाई म्हणतात, " फ्रेंच, स्कँडिनेवियन, स्पेनी, डच, इटालियन, वेल्श, बोहिमियन, पोर्तुगीज इत्यादी बहुतेक सर्व युरोपिअन जातीचे लोक ह्या देशात येऊन रहातात. ते आपल्या कुटुंबात स्वदेशभाषा बोलतात आणि सगळे मिळून हजार एक पत्रे आपल्या भाषांत काढतात. परंतु त्यास बहुतेक सर्वच इंग्रजी भाषा बोलणाऱ्या लोकांशी दळणवळण ठेवावे लागते. सार्वजनिक शाळांतून इंग्रजी शिकवितात, राज्य कारभार इंग्रजीत चालतो. त्यामुळे त्यांनी इंग्रजी भाषा शिकल्यावाचून निर्वाहच नाही. आणि चोहीकडे हीच भाषा ऐकू येते, तिथे ती शिकण्यास फारसे प्रयास करावे लागत नाहीत. आपणही भारतात एक भाषा व एक लिपी भारतीय भाषा व भारतीय लिपी म्हणून अंगीकारली पाहिजे. ती भाषा म्हणजे हिंदी व ती लिपी म्हणजे देवनागरी. हा प्रश्न राष्ट्रीय सभेने हाती घ्यावा म्हणून त्या लिहितात, पुढील राष्ट्रीय सभेच्या बैठकीत तिने या गोष्टीचा अवश्य विचार करावा अशी माझी तीस विनयपूर्वक सूचना आहे. "

अमेरिकेतील स्त्रियांनी मद्यपान व्यसनाच्या बाबतीत केलेले कार्य बाईंना फारच आकर्षक वाटते. त्या लिहितात, " ही मद्यपान निषेध मंडळी म्हणजे सर्व देशातील स्त्रियांचे संयुक्त लोकसत्ताक राष्ट्र होय. स्त्रिया आपल्या पांढऱ्या फितीच्या पवित्र बंधनाने, ह्या शांतीच्या आणि प्रीतीच्या खुणांनी सर्व पृथ्वीला मैत्री बंधनात बांधून एकवट करीत आहेत. सर्व राष्ट्रांतील स्त्रियांमध्ये शांती, प्रीती व मैत्री ह्या अमोलिक सर्वसुखधाम गुणत्रयाचा प्रसार करीत आहेत. हजारो वर्षांपूर्वीपासून ज्यांच्या हातात हत्यारे आहेत, ज्यांच्या शरीरात बळ आहे व जे समाजाचे चालक व शासक आहेत, अशा पुरुषांच्या राजराजांच्याने, विद्यादिग्गजांच्याने जे महत्कार्य झाले नाही ते ह्या अशा अबला म्हणून धिक्कारलेल्या बायकांनी केले ! हे परमेश्वरा तू धन्य आहेस. अहंकाऱ्यांचा गर्व मोडून टाकायला तू अशीच धिक्कारलेली माणसे साधनाभूत करतोस. तुझ्या हाती एखादे तृण देखील वज्रासारखे अपार शक्तीमान होते. "

पंडिता रमाबाई यांचा इंग्लंडचा प्रवास – ले. पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाई इंग्लंडला जाण्यास निघाल्या, तेव्हा त्यांच्या बहुतेक मित्रमंडळीने त्या गोष्टीला विरोध केला. न जाण्याची अनेक कारणे त्यांनी त्यांच्यापुढे मांडली. त्या साऱ्यांना उत्तरे देण्यास त्यावेळी वेळ नव्हता आणि उसंतही नव्हती. मात्र इंग्लंडला पोहोचताक्षणी त्यांनी त्या साऱ्या प्रश्नांना आणि आक्षेपांना उत्तरे लिहून

ते पत्र तेथील एका मित्राला दिले. या मित्राने ते पुस्तक रूपाने छापून विकले व मिळाला तो पैसा बाईंना पाठवून दिला. या पुस्तकामुळे बाईंच्या इंग्लंडमधील राहाण्या-जेवण्याच्या खर्चाची तरतूद झाली.

बाईंनी या पुस्तकात वृद्धकुमारी विवाहाविरुद्ध काही तडाखे दिले आहेत; तर लठ्ठपणाची टर उडविली आहे.

नमुन्यादाखल दोन उतारे पहा—

" दुसऱ्या बाजीरावांनी साठ वर्षांच्या वयात अग्निहोत्र कायम ठेवण्याकरिता एका ९-१० वर्षांच्या मुलीशी लग्न केले होते. थोडयाच दिवसामागे एका ६५ वर्षांच्या गृहस्थाने एका अकरा वर्षांच्या मुलीच्या बापाला ३०,००० रुपये देऊन लग्न लावले हे आपणास माहीत असेलच. असे पुण्यात्मे आमच्या देशात हजारो आहेत. "

" वयोवृद्ध झाल्यावर मनुष्यांत वजन वाढते हे अचल मिचल बाईला पाहिल्यावर कुणासही खरे वाटण्याजोगे आहे. एक दिवस सदरहू बाई आणि मी गाडीने बसून फिरावयास गेलो होतो. तेव्हा त्या गाडीत बसताक्षणी गाडी आता मोडते की काय असे भय मला पडले होते. परंतु ईश्वरी कृपेने तसे काही झाले नाही. पण वजन वाढण्यास ज्ञान जितके कारणीभूत आहे, तितके वयोवार्धक्य आहे असे म्हणणे सर्वांशी खरे ठरत नाही. पुण्यात रस्त्यातून पायी फिरणाऱ्या वामनरावांचे वय ६५ वर्षांपेक्षाही जास्त आहे. परंतु त्यांची प्रकृती पाहून त्रेतायुगातील रामानुचर हनुमान हे कलियुगात वामनराव झाले आहेत असे वाटल्यावाचून रहात नाही. "

पंडित रमाबाईंनी इंग्लंडला जाऊ नये म्हणून घेतलेल्या हरकतीचे स्वरूप थोडक्यात असे—

पंडिता रमाबाईंच्या प्रकृतीची अशक्तता आणि त्यांची लहान मुलगी, इंग्रजी भाषेचे अज्ञान, आर्य महिला समाजाचे काय होईल ? ख्रिश्चन लोकांच्या सहवासात राहणे बरोबर नाही, इंग्लंडसारख्या देशात इतक्या तरुण वयात जाणे बरोबर नाही, स्वदेशप्रिती रहाणार नाही. या सर्व आक्षेपांना त्यांनी आपल्या पुस्तकात उत्तरे दिलेली आहेत.

त्यापैकी इंग्लंडसारख्या चैनबाजीच्या मुलुखात अशा तरुण वयात जाणे बरोबर नाही याला उत्तर देताना त्या लिहितात—

" इंग्लंडच काय पण त्याच्या सहस्रपट चैनबाजीच्या मुलुखात गेले तरी ज्याला जे करावयाचे नाही ते त्याच्याने कधीच करवणार नाही. चैनीला तरुण आणि वृद्ध असा विचार नसतो. आमच्या देशात अनुभ्दिन्नश्मश्रु असे पुष्कळ राजासारखे श्रीमंत संन्यासी होऊन गेले आहेत. आणि उद्या ज्यांच्या शरीराची आहुती क्रव्यादाग्नीत पडणार, जे अंग गलितं पलीतं मुंड दशनविहीनं जातं तुण्ड वृद्धो याति गृहीत्व दण्ड.... ! अशा प्रकारचे सशक्त आणि तरुण असे हजारो वृद्ध ८-९

वर्षांच्या मुलींशी लग्न करून आपले अग्निहोत्र कायम ठेवतात. रणात गेल्याशिवाय शूराची परीक्षा होत नाही. अभाव वैराग्याला वैरागी अशी संज्ञा देता येत नाही. एखादा पदार्थ आपल्याला तो आवडत नाही असे म्हणणे हे शुद्ध ढोंग आहे. मला ह्या चैनबाजीच्या मुलुखात आपल्या मनाची परीक्षा करावयाची आहे. "

स्वदेशप्रीती राहणार नाही या आरोपाला त्या उत्तर देतात–

" इंग्लंडात डोळे दिपून आपल्या जन्मभूमीचा विसर पडणे हे मनुष्य स्वभावाच्या विरुद्ध आहे. आपली आई गरीब असून म्हातारी आहे, म्हणून तिला टाकून (किंवा लाथ मारून) दुसऱ्या तरुण आणि सुस्वरूप बाईला आईप्रमाणे सन्मान देणारे मनुष्य मनुष्यरूपी राक्षस असे म्हटले पाहिजे. भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे ' ते के न जानीमहे ' ते कोण हे (त्यास काय म्हणावे) हे आम्हास माहीत नाही. इंग्लंडात येऊन इकडच्या वैभवाने डोळे दिपून आपल्या जन्मभूमीला तुच्छ मानणारे नरपिशाच आमच्या दुर्दैवी मातेच्या पोटी पुष्कळच उपजले आहेत, यात संशय नाही. परंतु हल्ली तर मला असे वाटते की माझ्या आईबद्दलची माझी प्रीती कमी होईल अशी पिशाच प्रकृती अद्याप माझ्यात शिरली नाही आणि ईश्वरी कृपेने ते न होवो. "

बाईंनी बाकीच्या शंकांनाही उत्तरे दिली आहेत. तुमचे प्रेम आमच्यापेक्षा मिशनऱ्यांवर अधिक आहे, या आक्षेपाला त्या असे उत्तर देतात, " कोणाचे खरे रूप झाकून राहत नाही हे तुम्हास माहीत आहे. "

सुविचार संग्रह – संग्राहक : अमृत. भा. त्रिभुवन.

प्रका. अ. भा. त्रिभुवन, अहमदनगर, विजय प्रेस, पुणे १९२९ पृ. ५५
(ठोकळ.)

हा शंभर सुविचारांचा संग्रह आहे. या सुविचारांत अनेकविध विषय आहेत. मांडणी विषयाच्या अगर कोणत्याच वर्गीकरणाने केलेली नाही. सुविचारांची निवड सर्वांगीण व दर्जेदार असल्यामुळे पुस्तक वाचनीय व दर्जेदार झाले आहे. पुस्तक सचित्र आहे, काही सुविचारांस अनुरूप चित्रे आहेत. लेखकाने आपले दोन शब्द सांगताना म्हटले आहे " हे पुस्तक म्हणजे वाचकांना काही अज्ञात पूर्व गोष्टी अगर तत्त्वे सांगण्याचा प्रयत्न नव्हे. तसला विचारही माझ्या मनाला शिवलेला नाही. जुन्याच गोष्टी नव्या नव्या पेहरावांत पुढे येतात व काही काळ नवीन भासतात. गहू, बाजरी, ज्वारी इ. धान्ये सालोसाल शेतात पेरली जातात व हंगामात तयार होऊन घरी येतात. पोत्यात भरून ठेवलेले धान्य सारखेच पण त्यातील थोडे थोडे दरवेळेस दळून केलेल्या पिठाची भाकरी मात्र ' ताजी ' वाटते. हीच भावना मनात बाळगून हा संग्रह वाचावा अशी वाचकांना माझी आग्रहाची विनंती आहे. "

सुविचारांचे स्वरूप कसे आहे ते पहा—

उदा. ' जहाज पाण्यात चालते, पण जहाजात पाणी चालत नाही, पाणी शिरल्यास अनर्थ होतो. जन्मास आलेल्या प्राण्यांचे असेच आहे. भवसागरात तो आहे, पण वासनेचे जल प्राण्यांत पसरून चालत नाही. '

हरिदासी—

प्रका. दि. शं. सावरकर, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई. १९३१ पृ. ४४. (ठोकळ)

हरिदासी हे पुस्तक श्री. जीवनकृष्ण मुकर्जी यांनी बंगाली भाषेत लिहिले. अनेक भाषांत भाषांतरित झाले. हे मूळ बंगाली पुस्तक मिसेस कोटिलिंगम् ह्यांनी इंग्रजीत उतरले. यावरून हे मराठीत भाषांतर केले.

श्री. मुकर्जी ह्यांच्या परिचयाच्याच एका कुटुंबाची दारूमुळे जी दुर्दशा झाली तिचे हे शब्दचित्र त्यांनी रेखाटले आहे. मद्यपान निषेधाचा समर्थ प्रसार अशा पुस्तकांच्याद्वारे काही प्रमाणात होईल अशी पुस्तककर्त्याची अपेक्षा आहे.

दारूच्या व्यसनामुळे एका सुखी संसाराची होणारी धूळधाण अतिशय चटका लावणाऱ्या भाषेत लिहिली आहे.

ख्रिस्ती गृहशिक्षण – मूळ लेखक Dorothy Dikison Barbar

प्रका. मिस्. ए. ए. ॲबट, फॉर ऑल इंडिया लिटरेचर कमिटी,

मुद्रक – आर्यभूषण प्रेस, १९३५ पृ. २०२. अनुवादकाचे नाव दिलेले नाही.

प्रस्तुत पुस्तकात घरात मुलांचे संगोपन करताना मुलांस योग्य शिक्षण केव्हा व कसे द्यावे या विषयी मार्गदर्शन केले आहे. मुलांच्या व्रात्यपणाला प्रतिबंध कसा घालावा, घरात कामास मदत करण्यास शिकवणे, आज्ञापालन, व प्रामाणिकपणा, सद्विचार, दुसऱ्यावर प्रेम करणे, हे सारे गुण मुलांस कसे ' शिकवावे ', मुलांना वळण कसे लावावे, देवाची ओळख कशी करून द्यावी या सर्वांबाबत मार्गदर्शन करणारे विचार सांगितले आहेत.

हिंदुस्थानात दारू व अफू यांचा खप – लेखक जे. एफ्. एडवर्डस्.

प्रका. जे एफ्. एडवर्डस्, पश्चिम हिंदुस्थानातील संयुक्त ईश्वरविज्ञान पाठशाळा, पुणे. १९३७. पृ. १२०.

हिंदी ख्रिश्चन लोकांचे दारूबंदीविषयक धोरण पाठिंब्याचेच आहे हे स्पष्ट करण्याच्या हेतूने पुस्तक लिहिल्याचे प्रस्तावनेतच नमूद केले आहे.

पुस्तकात गांधीजींच्या तीन वर्षांत संपूर्ण दारूबंदी करण्याच्या मतांचा उल्लेख केला आहे. दारूबंदीमधील प्रमुख अडचणी निवेदन करून दारूबंदी अस्पृश्य व दलित लोकांच्या दृष्टीने अधिक आवश्यक असल्याचे निरूपण केले आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडूनही तशी मागणी असल्याचे अनेक पुरावे दिले आहेत.

मद्यपानाच्या घातक परिणामांविषयी सांगून मद्यपान विरुद्ध या देशाने सुरू केलेल्य. युद्धाचे वर्णन दिले आहे. १९१९ च्या दारूबंदीविषयक सुधारणा निराशाजनक का झाल्या ते स्पष्ट केले आहे. हिंदी लोकांची दारूबंदी विषयक ध्येये व हक्क यांचा विचार, या प्रश्नांबाबत सर्वधर्मी हिंदी लोकांचे मत, परदेशी दारूमुळे ओढवणाा " अरिष्ट, " हिंदी लोकांचे दारूविरुद्ध नैतिक बंड, इत्यादी विषय चर्चिले आहेत दारूबंदीच्या प्रश्नांमुळे निर्माण होणारी मुख्यतः सरकारी पैशाची अडचण, त्यावरून जनता व सरकार यात निर्माण होणारा दुरावा याचाही विचार केला आहे. दारू व्यापारावर उपाय, मद्यपानबंदीचा सत्य संकल्प हे सारे सांगून जनतेने अफू वगैरे मादक पदार्थांचे सेवन करणे वर्ज्य करावे हेच योग्य, असे म्हटले आहे. अफूच्या निर्यातीबद्दल तत्कालीन हिंदुस्थानचे धोरण स्तुत्य असल्याने कौतुकास पात्र ठरविले आहे. तसेच अफूचा या देशात होणारा खप अतिशय असल्याने खेद व्यक्त केला आहे. अफूच्या उपयोगाबाबत वैद्यकीय मतांचा विचार करून सरकारी दृष्टिकोणही विशद केला आहे. अफूच्या खपाविरुद्ध ख्रिस्ती पुढाऱ्यांनी सुरू केलेली मोहीम सांगितली आहे. अफूच्या खपासंबंधी अधिकृत आकडेवार, माहिती दिली आहे.

पुस्तकात ठिकठिकाणी पुराव्यादाखल अनेक वक्त्यांचे बोल नियतकालिकांतील उतारे, विविध सभासंमेलनाचे ठराव, इत्यादी, तारखेसह उद्धृत केले आहेत. लेखकाचे परिश्रम व उद्योग मोठा आहे. ख्रिस्ती धर्म व जनता यांचा दारूबंदीस संपूर्ण पाठिंबा असल्याचे अनेकवार सांगितले आहे.

ख्रिस्ती गृह यावरचे पत्रक

प्रका. मिस्. ए. ए. ॲबट, ऐव्ही टॉवर्स, पुणे, आर्यभूषण प्रेस, १९४२ पृ. ५१ (हिवाळे).

अनेक ख्रिस्ती लेखिकांच्या लेखांचा हा संग्रह आहे. यात समाविष्ट झालेले लेख व लेखिका पुढीलप्रमाणे.

(१) गृहाचे प्राधान्य– मिस् रूथ उर
(२) चीनमधील ख्रिस्ती गृहजीवनाची चळवळ– मिसेस्– जे. एल. गोहीन.
(३) घरातील धर्म– डीकन्स कॅरल ग्रॅहम.
(४) कौटुंबिक नाती– डॉ. विनिफ्रड एल. वैस.
(५) गृहसौंदर्य– मिसेस् डब्ल्यू. एस्. गुल्ड.
(६) घरासाठी उत्कृष्टपणाची प्रमाणे.
(७) घरासाठी मध्यस्थीची उपासना– रे. टी. डब्ल्यू. गार्डनर.

चोरटी दारू– लेखक शां. द. उजगरे.

प्रका. शां. द. उजगरे, २७. मेहताब बिल्डिंग, पाईप रोड, कुर्ला; मुद्रक– रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, त्रिभुवन रोड, मुंबई. १९५१. सुमारास, पृ. ३३.

चोरटी दारू या पुस्तकाचे प्रकाशन साल दिलेले नाही. पण प्रस्तावना स्वरूप "सारेच विलक्षण"मध्ये म्हटले आहे की जुलै ५१ अखेर "भारतज्योति" साप्ताहिकाने लेखकाचा The Credit side of prohibition हा लेख छापला. या लेखानंतरच्या प्रतिक्रिया अनुकूल वाटल्याने "चोरटी दारू" हे दारूबंदी विषयक पुस्तक लिहिले गेले. त्यावरून "चोरटी दारू" या पुस्तकाचा प्रसिद्धी काल १९५१ नंतरचा असावा.

या पुस्तकात १९४७ सालापासून दारू गाळणे वा ती पिणे अथवा पिण्याकरता लोकांस विकणे हा गुन्हा झाला. तत्पूर्वी तो गुन्हा नव्हता. त्यावेळचे सरकारी धोरण अप्रत्यक्षरीत्या दारूच्या व्यवसायात उत्तेजन मिळावे असेच होते. ताड, माड इत्यादी दारू काढण्यास उपयोगी पडणाऱ्या झाडांवर कर. दारू भट्टयांच्या लायसन्स स्वरूपाचा कर, दारू विक्रीकरिता दारू दुकानांचा लिलाव, अशा मार्गांनी दारूच्या व्यवसायातून सरकारचे वाढते उत्पन्न होते. वाढत्या खर्चासाठी या वाढत्या उत्पन्नाकडे सरकारचे उलट अधिक लक्ष होते. अशी एकूण स्थिती होती.

६ नोव्हेंबर १८४९ साली मुंबईच्या नागरिकांनी दारूविरुद्ध तक्रारी व दारूबंदीची मागणी करणारा एक अर्ज गव्हर्नरकडे केला. त्यावर अनेक शिकलेल्या लोकांसह ५०,००० जणांच्या सह्या होत्या. असे अनेक दारूबंदीसाठी झालेले प्रयोग पुराव्यासह लेखकाने नमूद केले आहेत.

१८४७ पासून दारूबंदीच्या झालेल्या प्रयत्नात डॉ. भाऊ दाजी, हरी केशवजी, जी. गिल्डर आणखी मोठे लोक अशांच्या सह्यानिशी दारू पिण्याने होणारे अनर्थ सांगणारे एक मोठे पत्रच सर्वत्र छापून पाठविले. त्याचा तारीखवार आधार लेखकाने दिला आहे.

लेखकाने आपल्या पुस्तकात दारूबंदीविषयी नेमके चित्र उभे केले आहे. निवेदनात योग्य तो विस्तार असून पाल्हाळ नाही. निवेदन वेळोवेळी साधार आहे. वस्तुस्थितीचे सत्यचित्र उभे करण्याची लेखकाची प्रामाणिक इच्छा जाणवते.

परदेशी खिस्ती मिशनरी – लेखक – बी. एस्. समुद्रे

प्रका. रे. बी. एस्. समुद्रे, पास्टर मिरज चर्च, बसवराज छापखाना, मिरज १९५४, ज्ञानोदयाचे माजी संपादक रे. प्रा. शा. ल. साळवी यांची प्रस्तावना आहे. (नगर कॉलेज)

परदेशी खिस्ती मिशनरी, त्यांचे कार्य, त्याकाळी परदेशी खिस्ती मिशनऱ्यांबद्दल पसरत चाललेला असंतोष, त्या असंतोषाची कारणे, नाग लोकांचे संशयास्पद वर्तन, राजकीय बाबींसंबंधी येशूचे शिक्षण, हिंदी–खिस्ती लोक, त्यांची राजनिष्ठा, परदेशी मिशनरी देत असलेली भारतसरकार विरुद्ध चिथावणी – जुलूम जबरदस्तीने बाटवणे – हिंदुधर्म त्यात एकजिनसीपणा आहे काय ? मागासलेले लोक त्यांची सेवा

हिंदू धर्मातील कर्मविषयक विचार, ख्रिस्ती झालेले लोक, त्यांचे जीवन, मिशनरी लोक, गरिबांना आश्रय का देतात ? या गरीब बापड्यांनी ख्रिस्ती का होऊ नये ? ख्रिस्ती जिण्याने झालेला फायदा – सार्वजनिक जाहिरनामा वगैरे रीतीने विषयाचा विस्तार मांडला आहे. शेवटी रे. विश्वासराव सत्राळकर यांनी लिहिलेली " ख्रिस्ती धर्माचे स्वरूप " ही पुरवणी जोडली आहे.

नियोगी रिपोर्ट मार्गदर्शिका भाग १ ला – अनुवादक– स. ना. सूर्यवंशी.

प्रका. रे. गॅस्पर. ए. पिंटो, बनारस ५, इ. स. १९५७. पृ. १६ + ७,४.

गॅस्पर ए. पिंटो यांच्या इंग्रजी पुस्तकाचे हे मराठी भाषांतर आहे. १९५४ साली मिशनऱ्यांची चौकशी करण्यासाठी नागपूरचे सेवानिवृत न्यायाधीश डॉ. नियोगी यांच्या नेतृत्वाखाली एक चौकशी समिती नेमली. या समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्याचे हे मराठी भाषांतर. सूर्यवशी यांनी ' पुरस्कारा 'त भारतात ख्रिस्ताचे आगमन, भारतात ख्रिस्ती धर्मास राजाश्रय, युरोपियन ब्राह्मण व पाचवा वेद, हिंदूंचा कायापालट, धर्मातील एकराष्ट्रीयत्व, ब्रिटिशांची फोडा झोडा नीती, मिशनऱ्यांविरुद्ध वादळ, मिशनऱ्यांची चौकशी, मिशनरी कार्यास पैसा कुठून येतो, प्रचारकी कार्याचे स्वरूप, अनाथ मुलांचे धर्मांतर, इतर संस्थांतील धर्मप्रसार, नॅशनल चर्च, अशा कित्येक विषयांवर विचार लिहिले आहेत. राष्ट्रघातकी प्रवृत्ती, सामुदायिक धर्मांतरे, बेकायदेशीर बाप्तिस्मे, ख्रिस्ती महामंडळे – अशा अनेक विषयांवर व मागच्या पुढच्या अनुषंगिक विषयांवर विचार व्यक्त केलेले आहेत.

पुस्तकाचे स्वरूप नियोगी रेगे कमिटीच्या अहवालाचा परामर्श, अशा स्वरूपाचे आहे.

भारत कुणीकडे – संपा. सोशल इन्स्टिटयूट.

प्रका. मिस्. व्ही. ए. कोरे, कोरे पब्लिकेशनकरिता, ९७६/२, शुक्रवार, पुणे २. मुद्रण – संजीवन मुद्रणालय, ६९३/३, बुधवार, पुणे. १६७, इ. स. १९५८.

(लेदर्ले)

डी. नोबिली कॉलेजातील धर्मशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या मनात या महाराष्ट्रीय वृत्तीची प्रेरणा होऊन त्यांनी या तत्त्वज्ञानाला उक्ति व कृती यांची जोड दिली आणि प्रस्तुत प्रबंध तयार केला.

या प्रबंधाचे चार भाग पडले आहेत.

(१) पहिल्या भागात समस्यांचे दिग्दर्शन केले आहे. संपत्ती, सुस्थिती, यांची विषम विभागणी, वर्ग कलह, राष्ट्रीय असंतोष, आंतरराष्ट्रीय अस्वास्थ्य या गोष्टींचा यात समावेश होतो.

(२) दुसऱ्या भागात हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट लोकांनी कसा

केला आहे ते दाखविले आहे. " भौतिक विकास हेच जीवनाचे सार सर्वस्व आहे " हे कम्युनिस्टांचे ब्रीदवाक्य आहे. भौतिक यशावरच आधारलेल्या मतप्रणालीमध्ये, भौतिक वादामुळे आध्यात्मिक मनोवृत्तीची वाढ खुंटते. कम्युनिस्टांची तत्त्वे आणि पद्धती यामुळे खरेखरे स्वातंत्र्य व आत्मविकास यांची गळचेपी होते आणि मनुष्यांतील जिवंतपणा नाहीसा होतो.

(३) तिसऱ्या विभागात सामाजिक तत्त्वज्ञानाने हा प्रश्न सुटण्याची शक्यता कितपत आहे या गोष्टीचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. धार्मिक व आर्थिक मूल्यांना अग्रस्थान दिले पाहिजे. प्रत्येक मनुष्यावर प्रेम करून त्याला योग्य तो आदर दाखविला पाहिजे. प्रत्येक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घटनेमध्ये सर्व लोकांस आणि सर्व राष्ट्रांना औदार्य, समता व न्याय यांचा लाभ झाला पाहिजे. शांतता व समझोता आणि विधायक प्रगती या धोरणांचा अंगीकार केला पाहिजे.

वरील तत्त्वांच्या भक्कम पायावर उभारलेल्या कार्यक्रमाने व्यक्ती आणि समाज यांची एकवाक्यता होईल आणि प्रत्येक व्यक्तीचे कल्याण आणि समाजाचे कल्याण ही एकरूप होतील.

अशा रीतीने सर्वांगीण मानवतावाद साकार होईल.

चौथ्या विभागात भारतातील सद्यःस्थिती आणि त्यातील आधुनिकीकरणाचे प्रयत्न यांचे निवेदन केले आहे.

" सर्वसामान्यतः सामाजिक कायदे, सामुदायिक योजना, भूदान चळवळ वगैरे उपरिनिर्दिष्ट गोष्टीतील तत्त्वे कॅथॉलिक मंडळींच्या तत्त्वाशी बहुतांशी जुळतात." असे पुस्तकाला लिहिलेल्या दोन शब्दांत म्हटले आहे.

पुस्तकातील सर्व लिखाण सविस्तर स्वरूपाचे नसून, संक्षिप्त टिपणवजा आहे. पण अनेक मुद्द्यांचा समावेश आहे. वेळोवेळी माहितीपूर्ण तळटीपा दिलेल्या आहेत.

मराठी ख्रिश्चन नेम्स

गोन्सालिव्स रेजिनाल्ड आणि बॅरान्को जोकिम–

प्रका. जे. व्ही. वेलिंकर, डी नोबिली कॉलेज, पूना–६. लोकसंग्रह प्रेस, पुणे. ८–९–१९५९. पृ. ४७, किं. ७५ पैसे.

श्री. डी. व्ही. चांदोरकर यांच्या साह्याने, कॅथॉलिक मराठी लिटरेचर बोर्डाचे सल्ल्याने हे पुस्तक लिहिले आहे. मराठी ख्रिश्चनांची नावे उच्चार व अर्थ दृष्ट्या ख्रिस्ती संत थोर पुरुषासारखी असावी त्यासाठी हा उपक्रम.

(१) यासाठी वापरात असलेली मराठी नावे स्वीकारली. काही ठिकाणी असलेल्या नावात जडण–घडण केली आहे.

(२) काही हिब्रू लॅटिन नावे मराठीत रूढ करण्याचा प्रयत्न आहे. जोसेफ योहान.

(३) लोकप्रिय संतांची नावे सुचविली आहे.
(४) त्याच अर्थाची मराठी नावे सुचविली आहेत.
(५) उच्चारसाम्याने नावे स्वीकारली आहेत.
(६) काही वेळा अर्थसाम्याने नावे स्वीकारली आहेत.

एकूण १५०० नावांची यादी दिलेली आहे.

कुटुंब नियोजन

(वैद्यकीय व नीतिविषयक प्रश्न–विवाहसंस्था आणि मानवी जीवन) अनु. विनय द. पुनोळकर, ये. सं.; मेनेन्झिस, ये. सं., डी. नोबिली कॉलेज, श्री. मुद्रण मंदिर, पुणे. दुसरी आवृत्ती १९६३. पृ. २१. (लेदर्ले)

अखिल भारतीय कॅथॉलिक महागुरूस्वामी परिषद यांच्या अधिकारयुक्त निवेदनाचा हा अनुवाद आहे. प्रस्तुतची दुसरी आवृत्ती आहे, पहिली आवृत्ती १९६० च्या दरम्यान असावी असे गृहीत धरले आहे.

या निवेदनास नैसर्गिक नीति-नियमांचा पाया आहे. निवेदनाचा सारांश असा, वाढत चाललेली लोकसंख्या व त्या अनुषंगाने निर्माण होणारे अन्नवस्त्र, घरदार, शिक्षण, व्यवसाय इत्यादी प्रश्न ही भारतीयांपुढील गंभीर समस्या आहे. ख्रिस्त महामंडळाचे खरे कार्यक्षेत्र धर्म व नीतिविषयक प्रश्न सोडविणे हेच होय. पण लोकांच्या दुःखाशी एकरूप झाल्याशिवाय हे खरे कार्य करणे कसे शक्य आहे ? देशबांधवांच्या सर्वांगीण हिताची जबाबदारी महामंडळाने पत्करणे आवश्यक आहे.

सध्या संततिनियमनाचे विविध प्रयोग चालतात. त्यास ख्रिस्ती जनांचा विरोध कॅथॉलिक धर्माच्या विधिनिषेध नियमानुसार नसून नैसर्गिक नीति–नियमानुसार आहे. लैंगिक संबंध विवाहित स्त्रीपुरुषांमध्येच असावा. विवाहाच्या प्रयोजनात परमेश्वराची पवित्र इच्छा ग्रंथित केली आहे. प्रजोत्पादनाच्या कार्यात विवाहित दांपत्ये परमेश्वरी इच्छेशी सहकार्य करीत असतात, असे महामंडळास वाटते. मोठे कुटुंब महामंडळास आवडते. नियमन साधनांनी संततिनियमन करणे म्हणजेच कृत्रिम संततिनियमन असून ते दोषार्ह होय. जननेंद्रियाचा मूळ परमेश्वरनिर्मित हेतू अपत्योत्पादन हाच असून कृत्रिम संततिनियमनाने घरदार, अन्नवस्त्र, धंदा, शिक्षण वगैरे बाबतीत होणारे फायदे तात्कालिक असतात. कृत्रिम संततिनियमनाने विषयसुख मिळून अपत्योत्पादनातून निर्माण होणारे कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रश्न सुटले तरी, त्यायोगे सामान्य जनतेचे मनोधैर्य खचते. परदेशात या मार्गाने गेल्यावर मिळणारी कटु फळे लोकांनी अनुभवली आहेत. ती पाहून भारतीयांनी शहाणे व्हायला हवे. वन्ध्यीकरण, गर्भपात वगैरे उपाय अन्यायकारक आहेत. कृत्रिम गर्भधारणा याचाही हे महामंडळ निषेध करते.

असे सर्व विचार या पुस्तकात मांडले आहेत.

प्रकरण सातवे

ख्रिस्ती मराठी नियतकालिके

इ. स. १८४२ साली अहमदनगर येथील मित्र मंडळास जाणवू लागले की, हिंदुशास्त्र व खिस्ती धर्मशास्त्र याविषयी समाजात प्रसृत असलेले कित्येक गैरसमज दूर करण्यास समर्थ ठरेल असे एखादे नियतकालिक सुरू करणे आवश्यक आहे. त्या गरजेनुसार ' ज्ञानोदय ' हे नियतकालिक सुरू करण्यात आले. १८४४ च्या अमेरिकन मिशन रिपोर्टमध्ये ज्ञानोदय सुरू करण्याची कारणे सांगताना म्हटले आहे. " मुंबईमध्ये नुकत्याच घडलेल्या कित्येक प्रसंगांवरून, हे पूर्वीपेक्षाही अधिक स्पष्ट झाले आहे की, छापखान्यांचा ज्ञानसाधन म्हणून वापर करणे महत्त्वाचे आहे. समाजात प्रसृत झालेल्या कित्येक धर्मपर वा धर्मविरुद्ध समज-असमज निर्मळ करण्यासाठी छापखाना हे ज्ञानसाधन विशेष उपयोगात आणणे आता मिशनरी कार्याचे दृष्टीने अधिक अगत्याचे झाले आहे. आपल्या स्वतःच्या बळावर चालू असलेले कितीतरी छापखाने सध्या एतद्देशीयांच्या मालकीचे आहेत. त्यांच्या समजुती व प्रमादशील विचार यांनाच पोषक ठरेल असा या छापखान्यांचा वापर होत आहे. ते छापत असलेले सर्व छापील साहित्य कमी पैशाने विकले जाते, अधिक वाचले जाते आणि अगदी क्वचित बिनजरुरीचे म्हणून फेकले जाते. एतद्देशीय भाषेतून सध्या ८–१० नियतकालिके निघत आहेत. धर्मचर्चा हेच त्या बहुतेक सर्व नियतकालिकांचे कार्य आहे. त्यांतील काही नियतकालिके तर पवित्र शास्त्रातील तत्त्वे व उपदेश यांचे गैरप्रतिनिधित्व समाजास सांगतात. त्यांची अवहेलना करतात व त्यायोगे खिस्तीधर्मावर जोरदार हल्ले करतात. त्यांनी दिलेली समर्थने, दाखवून दिलेले उपहासविषय, आणि योजिलेली निंदावचने ही बहुतांशी खिस्ती देशांतील धर्मावर श्रद्धा न ठेवणाऱ्या लेखकांच्या पुस्तकांवर आधारलेली असतात. कारण त्याच पुस्तकांचा त्यांना अधिक परिचय झालेला असतो.

अशा प्रयत्नांना प्रारंभ होऊन पुरेसा कालावधी लोटला आहे व आता अशा प्रयत्नांना प्रतिक्रियात्मक कार्य करून त्या प्रयत्नांचे वाढते वर्चस्व थांबणे आवश्यक झाले आहे. "

इ. स. १८४४ च्या अहमदनगरच्या रिपोर्टमध्ये नमूद केले आहे की, " अशा नियतकालिकाची गरज दिवसानुदिवस अधिक स्पष्ट होते आहे; कारण मुंबईमधील विधर्मी लोकांचा खिस्ती धर्मास विरोध वाढतो आहे. हिंदुधर्माचे कैवारी म्हणविणाऱ्या नयतकालिकातील लेखनातून खिस्तीधर्मातील उच्च लेखकाविरुद्ध नीच, वक्रोक्तीपूर्ण

आरोप केले जात आहेत व ईश्वरनिंदा होत आहे. प्रसिद्ध करण्यास लज्जास्पद वाटावे असे त्यांच्या दृष्टीने काहीच नाही. आणि असे जितके भडक व ईश्वरनिंदात्मक ते (हिंदू) लिहितात तितके त्याबद्दल, औत्सुक्य समाजात निर्माण होत आहे व ते अधिक वाचलेही जात आहे. लोकांचे समुदाय खिस्ती धर्माविरुद्ध उसळविण्यासाठी आपल्या लेखनात व भाषणात खिस्ती धर्मास भरपूर भडक शिव्याशाप उच्चारणे हे तर त्यांचे यशस्वी साधन झालेले दिसते. असे ते सर्व साहित्य स्वतःशी प्रतारणा करीत आहे व लोकांची प्रतारणा करीत आहे. अशा परिस्थितीत देशी भाषेतील 'ज्ञानोदय' हे एकमेव नियतकालिक खिस्ती धर्मास वाहिलेले आहे आणि सत्यदर्शनाचे पवित्र कारणासाठी हे फार महत्त्वाचे आहे. "

मिशनच्या सर्व मित्रमंडळात 'ज्ञानोदय'चे स्वागत झाले. ओरिएंटल खिश्चन स्पेक्टटरच्या फेब्रुवारी १८४३ च्या अंकात प्रारंभी 'ज्ञानोदया'बद्दल प्रशस्तीपर व शुभेच्छापर उद्‌गार काढले असून नंतर, " भूगोलविद्या, पदार्थविद्या वगैरेबद्दल ज्ञान-चर्चेची उत्तुंग उंची, नीतिमूल्ये व धर्मज्ञान यांस उपयुक्त असे सारे असलेले...." अशा शब्दांत ज्ञानोदयाचा गौरव केला आहे.

'ज्ञानोदय'चा पहिला अंक जून १८४२ मध्ये अहमदनगर येथे प्रसिद्ध झाला. तो फुलस्केप चतुष्पत्री आकाराचा २० पृष्ठांचा होता. रे. ए. ॲबट यांच्या देखरेखी-खाली शिळाछाप छपाई काम पुरे झाले. " अमेरिकन मिशन शिळाछाप अहमद-नगर १८४२ रामा गुजराथी छापणारा " असे त्यावर लिहिले आहे. रे. हेन्री बॅलँटाईन हे ज्ञानोदयाचे पहिले संपादक. पहिल्या अंकाच्या पहिल्या पृष्ठावर ते म्हणतात. " हे पत्र दर महिन्यात एकवार छापले जाईल. एक एक पत्राला दोन आणे किंमत पडेल. " ज्ञानोदयाची वार्षिक वर्गणी दीड रुपया असे. 'साहेब' लोकांस मात्र तीन रुपये पडत. ज्ञानोदयाच्या वर्गणीदारात बरेचसे खिस्तीतर वर्गणीदार असत. त्यात डॉ. भाऊ दाजी लाड, दादाभाई नवरोजी, यांच्याबरोबरच भुसावळचे अॅक्टिंग पुलिस इन्स्पेक्टर मुन्शी वजीर अल्ली, सुभेदार सालोमन ईस्रायल तसे करसेटजी आणि कंपनी, रावबहादूर दादोबा पांडुरंग, चीफ ऑफ औंध अशी विविध नावे आढळून येतात. खिस्ती वाचकांत बाबा पदमनजी, नारायणराव शेषाद्री, गणपतराव नवलकर, कृष्णराव सांगळे, मेजर कँडी वगैरे नावे आहेत.

दुसरा अंक ऑगट १८४२ मध्ये निघाला. तो १६ पृष्ठांचा होता. या अंका-पासून १८४४ अखेरीपर्यंत ज्ञानोदयाचा अंक दर महिन्यास (मासिक) निघत होता. पहिल्या वर्षभरात ज्ञानोदयाचा अंक अहमदनगरमध्ये शिळा प्रेसवर निघत असे. (१८४२-१८४३). इ. स. १८४३ पासून मुंबईस मिशन प्रेसमध्ये छापण्यास सुरुवात झाली. १८४५ च्या जानेवारीपासून मुंबईच्या मित्रमंडळाने (Bombay brotheren) जबाबदारीचा वाटा घेतला. व त्यानंतर ज्ञानोदयाचे पाक्षिकात रूपांतर झाले. ते १८७३ अखेर चालू राहिले. इ. स. १८७३ जुलैमध्ये ते साप्ताहिक स्वरूपात

प्रकाशित होऊ लागले आणि पृष्ठसंख्या १६ ऐवजी १२ झालेली दिसते.

इ. स. १८४२ ते इ. स. १८४४ या काळामध्ये ज्ञानोदय हे मासिक होते. इ. स. १८४४ पासून ते पाक्षिक झाले. इ. स. १८७३ पासून ते साप्ताहिक झाले. दर गुरुवारी ज्ञानोदय प्रकाशित होत असे. इ. स. १८७३ ते ९० या सतरा वर्षांत ज्ञानोदयाचा जोड अंक म्हणून ' बालबोध मेवा ' प्रसिद्ध होत असे.

ज्ञानोदयाचे संपादक

रे. हेन्री बॅलंटाईन	इ. स. १८४२ ते १८४४
रे. आर. डब्ल्यू. ह्यूम	,, १८४४ ते १८५४
रे. एस्. बी. फेअरबॅंक	,, १८५४ १८५५
रे. ए. हेजन	,, १८५५ ते १८५८
रे. एच. बॅलंटाईन	,, १८५८ ते १८६५
रे. ए. हेजन	,, १८६५ ते १८६७
श्री. शाहू दाजी कुकडे	,, १८६७ ते १८७२*
रे. सी. डब्ल्यू. पार्क	,, १८७३ ते १८७६
रे. इ. एस. ह्यूम	,, १८७६ ते १८७७
रे. सी. डब्ल्यू. पार्क	,, १८७७ ते १८८०
रे. आर. ए. ह्यूम	,, १८८० ते १८८१
रे. इ. एस. ह्यूम	,, १८८१ ते १८८२
रे. आर. ए. ह्यूम मि. कुकडे	,, १८८२ ते १८८५
जे. इ. ॲबट	,, १८८५ ते १८९०
तुकाराम नथोजी सुमंत विष्णू करमरकर	,, १८९० ते १९००
रे. ना. वा. टिळक	,, १९०० ते १९१९
दे. ना. टिळक	,, १९१९ ते १९३१
सा. पां. हिवाळे	,, १९३१ ते १९५१
शा. ल. साळवी	,, १९४८
प्र. शि. भोसले	,, १९४८
सु. धो. रामटेके	,, १९५०
रे. डी. जे. तिवडे रे. र. ह. केळकर	,, १९५८

* इ. स. १८६८ ते १८७२ या काळात एकटे कुकडेच ज्ञानोदयाचे संपादक होते. ते मराठीतून ज्ञानोदय काढीत असत. या काळात कुणीही श्वेतवर्णी संपादक नव्हता. कुकडे ज्ञानोदयाचे २९ वर्षं संपादक होते.

इ. स. १९४१ मध्ये ज्ञानोदयाची व्यवस्था पश्चिम भारतातील सहा मिशनऱ्यांच्या संयुक्त मंडळाकडे आली.

पहिल्या शंभर वर्षांत ज्ञानोदयातून प्रामुख्याने पुढील महत्त्वाची सदरे चालविली जात होती.

(१) वर्तमानपत्रे (२) अनिष्ट चालीरीती (३) शिक्षणविषयक (४) स्त्रियांचे प्रश्न (५) प्रजा आणि सरकार (६) ख्रिस्ती महामंडळाविषयी (७) वाङ्मय (८) विविध माहिती.

(१) वर्तमानपत्रे :– या सदरात ज्ञानोदयाच्या पहिल्या अंकाची माहिती, हिंदू लोकांचा वृथा अभिमान, त्यांनी नव्या विज्ञानदृष्टीचा स्वीकार करण्यासाठी विचार मांडणे, मिशनच्या छापखान्याची माहिती, ज्ञानोदयाचे कार्य, ज्ञानोदयाने लोकांस विचार करण्यास कसे लावले, प्राप्त परिस्थितीला – विरोधाला – निंदेला न घाबरता कसे तोंड दिले, यासंबंधी माहिती येते.

(२) अनिष्ट चालीरीती – या सदरात इंग्रजांची राजवट चाल, हिंदू लोकातील गुरुभक्ती, जरीमरी, सतीविषयीचे वर्तमान, भारतीय हिंदू लोकांतील अंधश्रद्धा, प्रेतदहनाची अवस्था, गाडेबगाड, हिंदू लोक व उरूस, गोमूत्र टाकून पाणी शुद्ध करण्याची पद्धत, लग्नातील अमंगळ चाली, न्हावण्य, मनुष्यबळी देण्याची पद्धती, नाटकापासून नासाडी, पतंग व वावडी यांचा विवाह, रोमन कॅथॉलिकांचे सण, जगन्नाथाची गोष्ट, पुष्कळ खाण्याचा परिणाम, होळी, या विषयांवर विविध लेख व माहिती येते.

(३) शिक्षणविषयक – या सदरात भारतीयांना इंग्रजी भाषेची आवश्यकता, परीक्षा पद्धती, हिंदू व मुसलमानी विद्या, हिंदू लोकांमध्ये असलेले अज्ञान, शिक्षणाचे माध्यम कोणते असावे, स्वभाषेची अनास्था करण्याचे फळ, पुण्यातील नवीन विद्यालय, पुण्यातील विद्यालय, पुण्यातील पाठशाळा व विद्यावृद्धी, अतिशूद्रादिकास विद्या शिकविण्याविषयाची मंडळी, पुण्यातील मांग, महारांची शाळा व तिचा रिपोर्ट, धर्मरहित विद्याभ्यासाचा परिणाम, मिशनरी शाळा, मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना, हे कलियुग कसे आदी विषय हाताळले जात.

(४) स्त्रियांचे प्रश्न – या सदरात लहानपणी लग्न न करण्याचा निर्बंध, पोरी विकण्याची चाल, चवदा वर्षांच्या स्त्रियेस संन्यास, सकेशा विधवांची दुर्दशा, ब्राह्मणी विधवेचा पुनर्विवाह, मथवून लावलेला पुनर्विवाह, पारशी स्त्रिया, मुंबईतील बायकांची संख्या, असे विषय हाताळले जातात. जून १५, १८५४ या ज्ञानोदयात स्त्रीविद्याभ्यास याविषयी एक निबंधवजा लेख येतो. त्यात मिशनरी लोकांनी इ. स. १८२४ साली मुलींची शाळा मुंबईस सुरू केली. इ. स. १८२६ पर्यंत दुसऱ्या नऊ शाळा सुरू केल्या, त्या नऊ शाळांत २०४ मुली विद्याभ्यास करीत होत्या, इ. स. १८२९ च्या रिपोर्टावरून त्यावेळची मुलींच्या शाळेत शिकणाऱ्या मुलींची संख्या चारशे होती, असे दिसते.

मिशनच्या शाळेत शिकणाऱ्या मुलींच्या हुशारीबद्दल ' दर्पण 'कार बाळशास्त्री जांभेकरांनी लिहिलेला मजकूर ' ज्ञानोदया 'त उद्धृत करताना लिहिले आहे. " गेल्या बृहस्पतवारी भेंडीबाजारात अमेरिकन मिशन देवळात, हिंदू लोकांच्या मुलींसाठी ज्या शाळा घातल्या आहेत, त्याची परीक्षा झाली. तेथे बहुत युरोपिअन मडमा व साहेबलोक आले होते. आम्हीही हजर होतो. अकरा वाजता मुलींची परीक्षा मराठी वाचण्यात झाली. त्यांनी खडखडीत वाचले आणि हुशारीने उत्तरे दिली. नंतर अशा मधुर (आवाजात) गीत गाईले की, इंग्लिश लोकांच्या लेकरांच्यानेही गाववले नसते. वाचण्याची परीक्षा झाल्यानंतर मुलींनी जे शिवणकाम केले होते, ते दाखविले. पायमोजे व लहान लेकरांचे पायमोजे, जे त्यांनी विणले होते व नाना तऱ्हेचे कशिदे काढले होते, ते इंग्लंड देशात जसे करितात त्याप्रमाणे होते, किंबहुना त्यापेक्षाही सरस. ज्या मडमा तेथे आल्या होत्या त्यांनी लेकरांची व ज्या मडमेने त्यास शिकविले तिचीहि स्तुति केली. सहा महिन्यांत जर त्या एवढे शिकल्या, तर तेथे प्रत्येक जणाची अशी खात्री झाली की त्या लवकरच उपयोगी काम शिकतील. वर आम्ही सांगावयास विसरलो की त्या शाळांतील मुलींची हस्ताक्षरे कित्याप्रमाणे होती. " याशिवाय अहमदनगरातील कन्यांच्या शाळांची गोष्ट. लग्नासंबंधी खर्च व मुलींचे वय याविषयी, अनेक लेख प्रसिद्ध होताना दिसतात.

(५) प्रजा आणि सरकार– या सदरात गव्हर्नर जनरलने आदितवारच्या सुटीचे काढलेले फर्मान, शेतकऱ्यांची दुर्दशा, रयतेची दुर्दशा आणि त्यासाठी उपाय, सरकारी कामगार लोकांच्या पगाराविषयी, हिंदुस्थानातील रयत लोक जमिनीचे मालक होतील असा ठराव, सरकारी चावड्या, हिंदुस्थान सरकारची गादी कलकत्त्याहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याविषयी, दारूपासून अनर्थ, १८५७ सालच्या बंडाचे मूळ, कोल्हापूर येथे झालेले बंड, अशा अनेकविध विषयांवर माहिती येते.

(६) ख्रिस्ती महामंडळाविषयी – दोन विभागांत माहिती येते. ' अ ' विभागात सामाजिक व इतर हक्क यासंबंधी– त्यात नेटिव्ह ख्रिस्ती लोक, एतद्देशीय ख्रिस्ती लोक, याविषयी सरकारी ठराव, धर्मांतर करण्याचा हक्क, बंडवाल्याचा जाहीरनामा, वलायतअलीच्या बायकोची गोष्ट, स्वधर्म सोडल्याने कोणाचा दावा बुडत नाही, नवऱ्याचा अधिकार दुसरा धर्म स्वीकारल्याने बुडत नाही, बाटग्ये (Convert) शब्दाविषयी, नगर पाणी प्रकरण, ख्रिश्चनांनी पाणी घेण्यासंबंधी सरकारी ठराव, इंग्लंडचा हुकूम, जातीत परत घेण्याविषयी विवाद, अशा बाबतीत मजकूर प्रसिद्ध होत होता.

' आ ' विभागात ख्रिस्ती समाजांची खबरबखबर येते. त्यात बर्जेस मॅडमचा मृत्यू, नागपूर येथील हिसळणसाहेब, अमेरिकन मराठी मिशनची व्यवस्थापकीय विभागणी व त्यांच्या कार्यभूमीची माहिती, एतद्देशीय ख्रिस्ती लोकांच्या शुभवर्तमान प्रसारक मंडळ्या, मूर्ख समजुती या विषयावरील माहिती व लिखाण प्रसिद्ध

होताना दिसते.

(७) वाङ्मय– या विभागात ख्रिस्ती धर्म प्रसारार्थ लिहिलेले लेख, कविता, कोडी, कथा, उपदेश यांचा समावेश होतो. ज्ञानोदयात पहिली कविता म्हणून भागोबा पवार किन्हीकर यांची आध्यात्मिक लावणी प्रसिद्ध होताना दिसते. त्यानंतर मुंबई " त्राक्ट आंद बुक सोसायटीची " स्थापना, तिने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची माहिती दिलेली दिसते. याशिवाय मेजर क्यांडीच्या विरामचिन्हांची परिभाषा, पुस्तकाची उपयुक्तता, मराठी भाषांतर करण्याविषयी क्यांडीवर झालेली टीका, क्यांडीचे उत्तर, भाषाविषयक महत्त्वाचे लेख येतात. पवित्रशास्त्राचा मराठी भाषेत तर्जुमा करण्यासंबंधी झालेले प्रयत्न व भाषांतर यासंबंधी माहिती येते.

(८) विविध माहिती– या विभागामध्य अहमदनगर, सोलापूर, मुंबई यासंबंधी ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, क्लोरोफॉर्म, उल्का, १४०० वर्षांपूर्वीची मुंबई, 'स्टॉकिंग' व ' बूट ' घालण्याची चाल, मुंबईतील दंगा, भरतखंडातील प्रथमचा लोखंडी रस्ता, रेल्वे कंपनीची अव्यवस्था, गायकांचा डबा, बोरघाटातील अचाट काम, श्रावणी आदितवाराविषयी, मळमळीविषयी, ब्राह्मणांचे ब्राह्मणत्व, कसबिणी व रांडा, जात, अशा विषयांवर अनेक लहानमोठे लेख प्रसिद्ध होताना दिसतात.

ज्ञानोदयाने आपल्या धर्मप्रसाराकरिता व मतप्रसाराकरिता अनेक लेख व निबंध प्रसिद्ध केले. पहिल्या साठ वर्षांत कविता, कादंबरी, चरित्र, प्रवासवर्णन इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान असे अनेक विषय ज्ञानोदयाने हाताळलेले दिसतात.

ज्ञानोदयातील प्रारंभीच्या निबंधाचे स्वरूप साधारणपणे असे सांगता येईल.

यात लिहिणारे निबंधकार धीटपणे सामाजिक विषय हाताळत. निबंध सूत्रमय व आटोपशीर आहेत. हळूहळू त्यात अलंकारप्राचुर्य व प्रौढभाषा येताना दिसते. (१८४२–१८५०) या काळात विचारप्रकटीकरण आणि भाषा याबाबत कौतुकास्पद प्रगती केलेली दिसते. १८५७–१८७४ या काळातील ' प्रभाकरां 'ची गद्य लेखनशैली पाहिल्यावर असे लक्षात येते की ज्ञानोदयाची भाषा अधिक सुबोध, सुटसुटीत, प्रौढ व मार्मिक आहे.

इ. स. १८५० ते १९६० या काळात ज्ञानोदयात गद्य लेखन करणारे लेखक–रे. पी. एस. भोसले (वडाळे); डॉ. कृ. ल. कोल्हटकर, सौ. कृष्णाबाई कृ. कोल्हटकर (बारामती); श्री. जे. पी. सुळे (नगर); मा. भि. कसोटे (पुणे); बी. बी. कांबळे (डिक्सळ); श्रीपत यशवंत निर्मळ (दहिपूरकर); सत्यवान नामदेव सूर्यवंशी (नासिक); रे. एस. एस. साळवे (तळेगाव दाभाडे); रे. व्ही. जे. साळवे, बी. एस. निकम (घोलवड); शां. ल. साळवी, भास्कर डी. चांदणे (सोलापूर); प्र. शं. कुलकर्णी (केडगाव); रे. हरिभाऊ ग. रुकडीकर, सु. जी. भोसले (सोलापूर); इ. डब्ल्यू. मेन्झिल (रायपूर); रे. ना. र. पंडित (राहुरी); श्री. वामन निर्मळकर (नासिक); रे. एच. जी. हॉवर्ड (इस्लामपूर); प्रभाकर मेश्रामकर; मिस बी.

क्रिमन, रे. दा. आ. पटेकर (वडाळे); रे. डी. जे. भोसले, रे. जी. टी. गायकवाड बी. ए. पटेकर (पुणे); मधु गायकवाड (सोलापूर); सौ. रत्नाबाई नवलकर, रामभाऊ बंडोपंत सगळगिळे, र. आ. हिवाळे, रे. शां. तु. नवगिरी, रे. सु. धो. रामटेके (कोडोळी); जयंत भांबळ (वडगाव); सौ. विश्रांतीबाई हिवाळे, रे. सु. ना. थोरात, सलोमीबाई भास्करराव गायकवाड (सातारा).

या काळच्या गद्य लेखात अनेकविध विषयांचा समावेश आहे. त्यात ठिकठिकाणच्या चर्चेचे अहवाल, निधनवृत्ते, अभिनंदनपर लेख, विवाहवृत्त, विविध ठिकाणच्या महाविद्यालयांची प्रगती, मान्यवरांच्या जीवनातील ठळक प्रसंग, परदेशागमनागमन, ख्रिस्तीधर्मविषयक नोंदी, ख्रिस्तीगृह, ख्रिस्तीसेवा, आदर्श ख्रिस्ती जीवन, पवित्र शास्त्रवचनाचा बोध, कित्येक बोधपर घटना व प्रसंग, वाचकांची पत्रे, संपादकास अनावृत पत्रे, संपादकीय, मान्यवरांची निधनोत्तर चरित्रे, परिषदांचे वृत्तांत, भारतीय पातळीवरील महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी, ख्रिस्ती मंडळ्यांचे कामकाज वगैरे....यातील सर्व लेखक महाराष्ट्रातील ख्रिस्ती आहेत.

या काळात ज्ञानोदयात 'कविता' लिहिणाऱ्या कवींमध्ये प्रामुख्याने सत्यवान नामदेव सूर्यवंशी (नासिक); म. दा. पाटोळे (बडोदे); प्रल्हाद शांतवन रणदिवे (पुणे); विश्वासकुमार (नेवासा); भास्कर भिकाजी कसोटे (पुणे); वामन निर्मळकर (वडाळा); श्री. रा. काळे (येलूर); सो. स. ठोकळ, पी. जे. भोसले (डहाणू रोड); के. सा. मिसाळ (पुणे); म. भा. आढाव, सौ. प्रियवंदा रुकडीकर, जयंत भांबळ, देवदत्त बाबूराव कांबळे, भाऊराव व्ही. पाडळे, सुधाकर आढाव, भि. रा. मुलुंडकर, रामभाऊ सगळगिळे, शं. व. कुलकर्णी, एल. जी. चांदेकर, सौ. लीलावती कसोटे.

कवितांचे विषय – येशू ख्रिस्त, जन्म, पुनरुत्थान, मरण, त्यांची शिकवण, बोध, त्यांचे दुःखसहन, नाताळच्या शुभेच्छा, ख्रिस्त जयंती वगैरे विषयांवर आहे.

येशूचा सेवाधर्म, येशू प्रभू, उद्धारकर्ता, दीनदयाळू, पतितांचा कैवारी वगैरे प्रकारचे येशूचे मोठेपण व्यक्त करणाऱ्या या कविता आहेत. बहुतेक कविता भक्तिरसप्रधान व धार्मिक आहेत. ललितवाङ्मयाच्या दृष्टीने विचार केला तर स. ना. सूर्यवंशी, प्रल्हाद यशवंत रणदिवे, विश्वासकुमार यांच्या कविता उल्लेखनीय वाटतात.

ज्ञानोदय मासिक अजूनही चालू असून, सध्या (१९८१) हरिश्चंद्र उजगरे हे संपादन करतात.

मराठी भाषेत आपले वाङ्मय लिहिणारे ख्रिस्ती मराठी लेखक आपले प्रारंभीचे लिखाण कोणत्या ना कोणत्या स्वरूपात ज्ञानोदयामध्ये करताना दिसतात. या दृष्टीने मराठी ख्रिस्ती वाङ्मय निर्मितीत 'ज्ञानोदया'चे स्थान फार मोठे आहे हे उघड आहे.

उदयप्रभा

जानेवारी १८५६ या वर्षी बाबा पदमनजी यांच्या संपादकत्वाखाली ' उदय प्रभा ' नावाचे स्वतंत्र मासिक काढण्याचा प्रयत्न झाला. आपल्या मित्रांच्या साहाय्याने भारतीय ख्रिस्ती व तारण इच्छिणारांना मार्गदर्शन करण्याचे उद्देशाने हे नियतकालिक त्यांनी सुरू केले. एतद्देशीय नागरिकास वार्षिक वर्गणी बारा आणे व युरोपियनास दीड रुपया अशी होती.

१ जानेवारी १८५६ च्या अंकात ज्ञानोदयकार ' उदय प्रभा 'संबंधी आपला अभिप्राय लिहिताना म्हणतात : " या मासिकातील लेखांची भाषा शैलीदार आहे, देशी ख्रिस्ती लोक ' मिशनरी मराठी ' लिहितात अशी अनेक वेळा तक्रार केली जाते. पण आमची अशी खात्री आहे की, या मासिकात शुद्ध मराठी वळणाची शैली असेल. ती परकीय मिशनऱ्यांना मार्गदर्शक ठरेल. मराठी बोलीभाषेत फार कमी पुस्तके आहेत अशी तक्रार मराठी भाषा शिकू इच्छिणारे परकीय करीत असतात. त्यांची गरज या ख्रिस्ती मासिकाने भागू शकेल. "

हे ख्रिस्ती मासिक छापायला प्रारंभी कुणी छापखानेवाला तयार होत नव्हता. कसेतरी करून बापू हरशेट यांनी आपल्या शिळाप्रेसमध्ये छापायचे कबूल केले. या मासिकाच्या २५० प्रती काढीत. या मासिकाला अनेक ख्रिस्तीतर वर्गणीदार मिळाल्यामुळे यात बाबांनी विविध विषयांवरील लेख प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला. पहिली दोन वर्षे ठीक चालले होते. इ. स. १८५८ च्या शेवटी शेवटी त्याला उतरती कळा लागली. आपल्या छापखान्यात ख्रिस्ती मासिक छापतात म्हणून बापू हरशेट यांना लोकांनी त्रास द्यायला सुरुवात केली. त्यांनी मासिक छापावयाचे बंद केले. या संदर्भात ' उदयप्रभा 'कार लिहितात. " एकतर त्यांचा शिळा छाप बरोबर नव्हता व दुसऱ्या काही कारणावरून वाचकांस त्याचा कंटाळा येऊ लागला होता. आणि छापणारा हिंदू होता. त्यानेही हे ख्रिस्ती पत्र छापण्याचे सोडून दिले. " डिसेंबर १८५८ मध्ये या मासिकाचा शेवटचा अंक निघाला आणि हे मासिक बंद पडले. या मासिकातील लेखनाचा काही नमुना असा–

इंग्रजी पत्र " ब्रिटिश पॅसेंजर " वरून घेतलेली " भयंकर स्वप्न " नावाची एका सुताराची गोष्ट. त्यात मनुष्य आपल्या दुर्व्यसनाने नाश कसा पावतो व दारू पिणे किती घातक आहे, दारू न पिता येशूवर विश्वास ठेवावा – असा सद्भाव निर्माण करणारी ही सुताराची गोष्ट आहे. पुढे ज्ञानोदयाने उदयप्रभेवरून ही गोष्ट उद्धृत केलेली आहे.

प्रभोदय

' उदयप्रभा ' अस्त पावल्यानंतर जवळजवळ तीन महिन्यांच्या कालावधीनंतर ' प्रभोदय ' मासिकाची सुरुवात झाली. ज्ञानोदयाच्या १ एप्रिल १८५९ च्या अंकातील

माहितीवरून मुंबई इलाख्यातील ख्रिस्ती लोकांना आर्थिक सहाय्य देऊन नव्या रूपात हे मासिक सुरू केले. या मासिकाचे संपादक नारायण शेषाद्री हे होते. मुंबईला टॉमस ग्रॅहम यांच्या छापखान्यात ते छापीत. वार्षिक वर्गणी एक रुपया, नंतर दिल्यास दीड रुपया आणि फुटकळ अंकास तीन आणे अशी किंमत होती. एकूण वीस पृष्ठे त्यात चार इंग्रजी, सोळा मराठी अशी विभागणी होती. 'ईश्वराचे ज्ञान व उपयुक्त विद्या' असा या मासिकाचा उद्देश असल्याचे संपादक सांगतात आणि ब्रीदवाक्य म्हणून 'आपण बरे करताना थकू नये, कारण की आपण थकलो तर यथाकाळी पीक पावू' असे दिलेले आढळते. हे जेमतेम चार वर्षे चाललेले दिसते, अशी माहिती भास्करराव जाधव आपल्या मराठी ख्रिस्ती नियतकालिकात देतात, तर धर्मांतर करून आलेल्या नवख्रिश्चनांसाठी आणि इतर ख्रिस्ती धर्म जिज्ञासूंसाठी बाब पदमनजी यांनी हे नियतकालिक काढले असे दोला मुद्रिताचे संपादक सांगतात. (दोला ४६२)

'प्रभोदय' खिळाटाइपवर छापले जात असे. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांसारख्या हिंदुधर्माभिमानी लोकांशी मिशनऱ्यांनी चालविलेला वैचारिक संघर्ष हे त्या काळचे वैशिष्ट्य होय. या संघर्षाचे प्रतिबिंब 'प्रभोदय'मध्ये पडलेले दिसते.

ज्ञान, मनोरंजन व लोकहित या दृष्टीने ज्ञानोदयकार प्रभोदयातील कित्येक वृत्ते 'ज्ञानोदया'तून उद्धृत करीत असतात.

"डॉ. भाऊ दाजी यांनी थोड्या दिवसांत मोठ्या कुशलतेने एका सात वर्षांच्या मुलीचा मुतखडा काढला. त्याचे वजन तीन तोळे होते." अशा प्रकारच्या महत्त्वाच्या घटनांची नोंद यात दिसते.

"पुण्यातील फ्री चर्च विद्यालयात चारशे मुले व इंग्लिश विद्या व ख्रिस्ती धर्म शिकतात."

"हिंदुस्थानातील शाळा व पाठशाळा यामध्ये ख्रिस्ती शास्त्र शिकविण्याविषयी पार्लमेंटमध्ये वादविवाद झाला." अशी वृत्ते या नियतकालिकात प्रसिद्ध होत. य सर्वांवरून प्रभोदयकाराजवळ लोकस्थितीचे निरीक्षण, निवड, लोकमताचा अभ्यास. हे गुण असल्याचे दिसून येते.

सत्यदीपिका (धाकटी)

जानेवारी १८६१ पासून बाबा पदमनजी यांनी मुलांसाठी हे मासिक सुरू केलेले दिसते. याची वार्षिक वर्गणी आगाऊ दिल्यास सालीना चार आणे. दर अंकास केवळ एक फद्या किंवा चार पै. इंग्लंड देशातील 'ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी' या मासिकासाठी आर्थिक साहाय्य देत असे. या मासिकाचा उद्देश ज्ञानोदयच्या १ मार्च १८६१ च्या अंकात सांगितला आहे तो असा–'लहान लेकरांस उपयुक्त गोष्टीचे ज्ञान द्यावे व त्यांची कोमल मने सुधारून आतापासून चांगल्या गोष्टीकडे व देवाकडे

लागावी. ' मराठीतील खास बालवाचकांसाठी सुरू केलेले पहिलेच बाल मासिक म्हणून सत्यदीपिकेकडे बोट दाखविता येईल. मुलांसाठी निघालेल्या मराठीतील या पहिल्या मासिकाचे स्वरूप असे सांगता येईल.

या मासिकाचा आकार ५½" × ४" असा असून मासिकाला मुखपृष्ठ रंगीत असे.

आक्टोबर १८६३ च्या अंकातील विषय असे आहेत.

' वनस्पतिविद्या ' या पाठात पानांची माहिती दिली आहे.

ब्राह्मणभोजनाविषयी एक संवाद असून त्यात अतिभोजनाचे तोटे वर्णिलेले आहे....तसेच ब्राह्मणभोजनासाठी खर्च होणारा पैसा, शाळा वगैरेसाठी खर्च झाल्यास सामाजिक सुधारणा होईल असा विचार सांगितला आहे.

दयाप्रकाश नावाची एक कथा हिंदी भाषेत छापून वाचकांना हिंदी भाषेची ओळख करून दिली आहे.

मुलांचे खाद्य, यात–ख्रिस्ती धर्मप्रसाराचा हेतू आहे.

मुलांची बुद्धी या सदरात गंमतीदार कथा, किस्से व त्यावर एकदोन वाक्यांत भाष्य आहे.

उदा. ' शनिवारवाडा बांधताना पायाच्या नारळाचा प्रसाद मुलांना टाळून वाटला. मुले पेशव्यांकडे गेली व म्हणाली, ' मुलांना टाळून प्रसाद वाटला. तसा चिपा गाळून प्रसाद वाटा. '

छोट्या सोप्या कविता, छोटे निबंध, शास्त्रीय माहितीचे लेख, पत्रव्यवहार, सुभाषिते, सुविचार, जाहिराती, पुस्तकपरीक्षणे, अनेक देशांची माहिती, मोठमोठ्या नामांकित लोकांचे कार्य, अशी निरनिराळी सदरे या मासिकात दिसतात.

सतत तेरा वर्षे हे मासिक चालू होते. यापूर्वीच्या 'सुमित्र', 'एल्फिन्स्टन स्कूल पेपर ' यासारख्या नियतकालिकांचे स्वरूप केवळ मुलांसाठी नियतकालिक असे नव्हते.

यात चंद्रवर्णन, स्पंज, वनस्पतिविद्या, ग्रंथपरिचय, मुलांचे जुगदान असे विविध विषयपर लेख समाविष्ट केलेले असत. फेब्रुवारी १८७३ मध्ये या मासिकाचा शेवटचा अंक निघाला. आर्थिक अडचणींमुळे हे मासिक बंद पडले.

सायंदीपिका

रा. गो. कानडे यांच्या ' मराठी नियतकालिकांचा इतिहास ' या ग्रंथात ' सायंदीपिका ' या मासिकासंबंधी नोंद सापडते. त्यावरून हे मासिक इ. स. १८६१ साली सुरू झाले व त्या मासिकाचा उद्देश ' ख्रिस्ती मतप्रसार ' होता हे कळते. यापेक्षा याची माहिती मिळत नाही.

पहारेकरी

१ एप्रिल १८७० पासून ' पहारेकरी ' नावाचे मासिक मुंबई येथून निघत

होते अशी माहिती ज्ञानोदयाच्या १५ एप्रिल १८७० च्या अंकात मिळते. बाकी या अंकासंबंधी काही माहिती मिळत नाही.

ऐक्यप्रदर्शक पत्र

इ. स. १८७१ च्या ऑगस्ट महिन्यात मुंबई येथील युनियन छापखान्यामधून गणपतराव रघुनाथ नवलकर यांनी 'ऐक्यप्रदर्शक पत्र' हे त्रैमासिक प्रकाशित केले हे त्रैमासिक इंग्रजी, मराठी, गुजराथी भाषेत निघत असे. याचा पहिला अंक ७२ पृष्ठांचा असून दर अंक ४४ पृष्ठांचा असेल, असे त्रैमासिक-कर्त्याने प्रारंभी सांगितले आहे. याची वार्षिक वर्गणी एक रुपया चार आणे अशी होती. "ख्रिस्ती लोकात बंधुप्रीति वाढावी व धर्मसंबंधी कामात एकमेकांस साहाय्य करावे" हा या नियतकालिकाचा उद्देश होता. या त्रैमासिकाचे संपादन बाबा पदमनजी करीत होते असे बाबानी आपल्या अनुभव संग्रहात (भाग २) सांगितलेल्या माहितीवरून दिसते. डिसेंबर १८९३ मध्ये या नियतकालिकाचा शेवटचा अंक निघाला आणि ते बंद पडले. या संदर्भात ७ डिसेंबर १८९३ च्या ज्ञानोदयात नोंद येते. "ऐक्य प्रदर्शक पत्रिकेस पैशाची अडचण आली नसताही तिच्या सन्मान्य कर्त्यास वयपरत्वे अशा त्रासापासून विसावा घेण्याकरिता 'पत्रिका' बंद करावी लागली."

शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधी नानाविध संग्रह

या मासिकाचे इंग्रजी नाव "द गॉस्पेलर अँड चर्च मिसलेनी". ते इंग्रजी व मराठी भाषेतून प्रसिद्ध होत असे. त्याचे संपादन कॅनन टेलर, एस. पी. जी. मिशन, कोल्हापूर हे करीत. एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यात ते छापले जाई. आर्थिक साहाय्य त्यावेळचे मुंबईचे बिशप डॉ. हेनरी अलेक्झांडर डग्लस हे देत. वार्षिक वर्गणी १२ आणे व किरकोळ अंकास १ आणा पडे. यात आलेले ख्रिस्ती महामंडळाच्या इतिहासाचे लेख डग्लस यांनी लिहिलेले आहेत. इ. स. १८७६ च्या सुरुवातीस हे त्रैमासिक बंद पडले.

बालबोधमेवा

ख्रिस्ती धर्मावरील एतद्देशीयांकडून होणारे हल्ले परतवून लावण्यासाठी सुरू झालेल्या ज्ञानोदय पुस्तक ३२ अंक १ (१ जानेवारी १८७३) च्या अंकात एक निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे, ते असे : 'अमेरिकन मिशनने अशी एक योजना केली आहे की, ह्या नवीन वर्षी मुलांकरिता एक वर्तमानपत्र छापावे, ते ज्ञानोदयाबरोबर महिन्यातून एकदा मुलांचा भाग (ज्ञानोदयाची पुरवणी) या नावाने निघत जाईल. व त्यात चित्रे, नाना प्रकारच्या बोधकारक गोष्टी, गायने, शास्त्रातील वेचे, आहाणे कोंडी व तरतऱ्हेचे खेळ छापावे, असा हेतु धरिला आहे; आणि हा भाग मुलांस आवडता व हितकारक होईल अशी आमची आशा आहे.' (पृ. १)

प्रारंभी या मुलांच्या भागाची पृष्ठसंख्या चार होती व टाईप मोठा होता. पहिल्या अंकाचे स्वरूप तपशिलाने स्पष्ट केल्यास एकंदर ' बालबोधमेव्या 'चे स्वरूप आपल्या लक्षात येणे शक्य होईल.

अंकात प्रारंभी पवित्रशास्त्रातील एक सुविचार दिला आहे. ' लांडगा कोकरापासी राहिल, बकऱ्यापासी चित्ता बसेल व वासरूं व सिंह एकत्र बसतील आणि धाकटा पोर त्यास नेईल, आणि कालवड व अस्वल एकत्र चरतील, त्यांची वासरे एकत्र निजतील असा सुदिन येणार तो एकत्र येवो. ' (पृ. १) त्यानंतर ' रोगी शिपायाची गोष्ट ' असून त्याचे तात्पर्य ' जसा बाप आपल्या पुत्रावर प्रीति करीत होता तसा ईश्वर आपला प्रियपुत्र येशू ख्रिस्त यावर करतो. ' ' लहान मार्टिन ' या गोष्टीत उपदेश आहे. तो असा : ' जसे आपल्यावर तसे आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर. ' यानंतर ' आहाणे ' आहेत. या आहाण्यांचे स्वरूप असे आहे – " एक माणूस तुरुंगात पडला. त्यासाठी रदबदली करण्यास दुसरा आला, न्यायाधीशाने त्याला विचारले, " तू त्या माणसाचा कोण आहेस ! " हा म्हणाला, मला भावंडे कोणी नव्हती, पण याचा बाप माझ्या बापाचा पुत्र आहे, तर तो त्यांचा कोण होता ? " ' कोडी ' या सदरात वाक्यातून गुप्त नावे शोधून काढणे, असा प्रकार दिसतो. या अंकात दिलेले वाक्य असे आहे : ' जसा तारा चमकतो तसे त्याचे डोळे चमकले ' यात एका शहराचे नाव आहे. याच अंकात एक सूचना केली आहे. त्यानुसार ' वरील आहाण्याची व प्रश्नांची उत्तरे जर कोणी मूल जिंकील व पत्राद्वारे लिहून कळवील तर आम्हास बरे वाटेल. रे. पार्कसाहेब, अमेरिकन मिशन, सोलापूर यांच्या नावावर पत्रे लिहिली, तर आम्हास पावतील आणि जर कोणी मित्र चांगले आहाणे किंवा प्रश्न या कागदात छापविण्याकरिता पाठवील तर आम्ही ते मोठ्या खुशीने छापवू. '

तेव्हा ख्रिस्ती धर्ममताचा प्रचार, मुलांच्यावर नैतिक संस्कार, मुलांना विविध प्रकारचे ज्ञान देणे हा या अंकाचा हेतू होता हे स्पष्ट होईल. तसेच, वरील सूचनेचा अर्थ जास्तीत जास्त वर्गणीदार व्हावेत, नियतकालिक निर्मितीसाठी सर्वांचे सहकार्य लाभावे अशी इच्छा होती, हे स्पष्ट आहे.

१ जानेवारी १८७४ पासून मुलांचा भाग दुप्पट म्हणजे आठ पृष्ठांचा झाला. त्यासंबंधी १ जानेवारी १८७४ च्या ज्ञानोदयातील निवेदन सांगते : ' मुलांचा भाग ' म्हणून दरमहा आमच्या पत्राची जी पुरवणी निघत असते, ती आता दुप्पट केली आहे. या पुरवणीकरिता आम्ही नवीन सुंदर मोठाली चित्रे आणविली आहेत. या प्रकारे आम्ही आपल्या अल्पवयस्क मित्रांचे मनोरंजन करण्याकरिता जे प्रयत्न करीत आहोत, त्यावरून त्यास विशेष आनंद वाटत जाईल अशी आम्ही आशा करतो. ' १ जानेवारीं १८७४ च्या ज्ञानोदयाच्या ' मुलांचा भाग ' या अंकात प्रथमच ' बालबोधमेवा ' अशी साकी वृत्तातील कविता प्रसिद्ध झालेली दिसते.

त्या कवितेत :

विद्याज्ञानहि कलाकुशलता।
शिका करा चिज तयाचे।
स्वहिताही परहितार्थ लावा।
सेवेस्तव जनित्याचे ॥

असा उपदेश आहे. प्रसिद्ध मराठी ख्रिस्ती कवी कृ. र. सांगले यांची कविता प्रथमच या अंकात दिसते. ७ मे १८७४ या अंकात 'बालबोधमेवा' या नावाने कवितांचे सदर प्रसिद्ध होताना दिसते.

३१ डिसेंबर १८७५ पर्यंत 'मुलांचा भाग' या नावाने प्रसिद्ध होत असलेली ८ पृष्ठांची ही 'ज्ञानोदया'ची पुरवणी १ जानेवारी १८७६ ला नव्या रूपात प्रकट होते. खरे या काळापासून 'बालबोधमेवा', नावाचे मुलांचे मासिक सुरू होते. ज्ञानोदयातील मुलांचा भाग हे त्याचे पूर्वस्वरूप होते, हे लक्षात घ्यावे लागते. या संदर्भात ६ जानेवारी १८७६ च्या बालबोधमेव्यात निवेदन येते. ते असे :

"मुलांच्या भागाने ह्या नव्या वर्षी आपला जुना पोषाक व आपले नाव बदलले आहे. आणि आता 'बालबोधमेवा' या नावाने हे पत्र तुम्हास सलाम करिते व तुम्हाला हे नवे वर्ष केवळ आनंदाचे व्हावे अशी याची इच्छा आहे. मुलांचा भाग या ज्ञानोदयाच्या पुरवणी अंकाच्या व नंतर नामांतर झालेल्या 'बालबोधमेवा'च्या संपादिका प्रारंभापासून मिसेस् सी. डब्ल्यू. पार्क या अमेरिकन बाई होत्या. इ. स. १८०० पर्यंत त्यांनीच संपादन-कार्य केले. त्यानंतर पूर्वाश्रमीच्या मिस् हॅरी ब्रूस म्हणजे मिसेस इ. एस. ह्यूम व त्यानंतर त्यांच्या जाऊबाई आर. एस. ह्यूम संपादिका झाल्या. पुढे डॉ. मिस इ. आर. बिसेल (इमिली बिसेल–बिसेल मावशी) या संपादिका म्हणून काम करीत होत्या.

इ. स. १८७४ पर्यंत या अंकात कृ. र. सांगळे यांसारखे काही अपवाद वजा करून लेखकांची व कवींची नावे देण्याची पद्धती दिसत नाही. १८७६ नंतर मात्र काही नावे दिसतात. पण ती नावांची आद्याक्षरे आहेत. उदाहरणार्थ, तु. ज., शा. दा. कु., मे. फे., कृ. र. सा. इत्यादी. पहिल्या अंकाचे जे स्वरूप दिले आहे, त्या धर्तीवरच 'बालबोधमेवा' साधारणपणे १९००–१९०५ पर्यंत वाटचाल करताना दिसतो. बालबोधमेव्यात जी संपूर्ण पृष्ठभर व इतर चित्रे छापली जात, त्यांचे ब्लॉक्स अमेरिकन मिशन लंडनची रिलिजस ट्रस्ट सोसायटीकडून आणि इतरांकडून मिळविले जात. हे सर्व अंक सचित्र असून सर्व चित्रे कृष्णधवल रंगामध्ये छापलेली आहेत. चित्रे ठसठशीत, मुलांना आवडतील अशी आहेत. त्यात मांजर, उंट, कोल्हा, एडका, कुत्रा, खेकडा वगैरे विविध प्राण्यांची चित्रे आहेत. तसेच येशू ख्रिस्ताच्या चरित्रातील प्रसंगावर आधारित चित्रे आहेत. विज्ञान विषयावर तसेच भौगोलिक, ऐतिहासिक, सृष्टिविज्ञान आदी विषयांतील माहिती देणारी चित्रेही

आहेत. कधी कधी दोन पानांवर मावणारे–एवढे मोठेही चित्र असून त्यासंबंधी स्वतंत्र माहिती दिलेली दिसते. मुखपृष्ठ सचित्र असून त्यासंबंधी माहिती आतल्या भागात दिलेली आहे.

हे मुलांसाठी मासिक चालविण्यामागे मुलांना नवीन ज्ञान देण्याचा, त्यांच्यावर चांगले संस्कार करण्याचा ' बाळबोधमेवा ' कर्त्यांचा हेतू आहे. त्यादृष्टीने या मासिकात माहितीपूर्ण लेख सचित्र स्वरूपात येतात. मुलांना समजेल अशी सोपी भाषा वापरली जाते. भौगोलिक माहिती देण्यासाठी–पॅलेस्टाईन देशातील प्रवास, वाहतूक, हल्लीचे यरूशलेम शहर, उत्तर अमेरिकेतील इंडियन लोक, मादागास्कर बेटातील एका झाडाची माहिती, सुवेज कालवा, असे माहितीपूर्ण लेख येतात. निरनिराळ्या देशचे लोक, खाद्यपेये, उद्योगधंदे, झाडे, घरे, इमारती, वगैरेसंबंधीची माहिती सविस्तर, नेमक्या आकडेवारीसह, मनोरंजक रीतीने दिलेली दिसते. निरनिराळ्या प्राण्यांच्या संबंधीही अशीच सचित्र माहिती येते. याशिवाय वसंतऋतू, खगोलविद्या, उत्तरध्रुवाचा शोध घेण्याचा प्रयत्न, स्पंज, मांसरस, बिनतारी संदेश, घड्याळ व त्यांचा शोध, पार्लमेंट सभा, उत्तरेकडील लोक अमेरिकेत कसे गेले, अशा प्रकारच्या कितीतरी विषयांवर या मासिकात लिहिले गेले आहे. मुलांनी आपले व सभोवतालचे आरोग्य कसे राखावे यासंबंधीही माहितीपूर्ण लेखांचा समावेश आहे. मुलांना ज्ञात अशी विज्ञानाची माहिती देता देता त्यांचे मनोरंजन करण्याचा ' बाळबोधमेवा ' कर्त्यांचा हेतू आहे. पण या कथांचा प्रमुख हेतू नीती शिकविणे, सुसंस्कार करणे, बोध, उपदेश करणे, असा आहे. त्या काळच्या वाङ्मयीन प्रेरणांनुसार हे वाङ्मय आहे. त्यात केवळ कलावादी भूमिका नाही. असे असूनही काही ' बालकथा ' आपल्या लक्षात राहून जातात. उदाहरणार्थ, ' एक विलक्षण कंडक्टर ',' पगारवाली मांजरे, ' ' खिन्न झालेली एक राजकन्या व तिचा सोनेरी पक्षी ' काही कथा मनोरंजक, मुलांना आवडतील अशा हास्यरसप्रधान वा परिकथेच्या धर्तीच्या आहेत. पण अशा कथांचे प्रमाण अत्यल्प आहे.

मुलांच्या पुढे भावी जीवनादर्श ठेवण्यासाठी थोरांची व प्रसिद्ध पुरुषांची चरित्रे मुलांना आकलन होतील अशा भाषेतच चित्रासह दिलेली आहेत. त्यात हेलन केलर, शाहू दाजी कुकडे, थॉमस एडीसन, डॉ. वानलेस, किर्लोस्कर, पीटर कूपन (न्यूयॉर्कमधील एक शिल्पशास्त्रज्ञ), गझनीचा महंमद, इत्यादींचा समावेश आहे.

नीतीसाठी शिकविण्याच्या दृष्टीने बाळबोधमेव्यात खूप बोधकथा येतात. उदाहरणार्थ, कुंभारमाशी आणि गांधीलमाशी, ' म्हणणे आणि करणे ',' वाईट खोड, ' ' अभिमान ',' झाकलेले मित्र ',' धनाढ्यतेची कृपणतेची कथा.' असे लेखवजा संमिश्र लिखाण येते. ते लिखाण केवळ उपदेशपर, बोधपर नाही वा त्या केवळ मनोरंजक कथा नाहीत. बोधपर लिखाण कथा–गोष्टीरूप घेऊन व्यक्त होते आणि मुलांच्या मनावर संस्कार घडविण्यास समर्थ ठरते. लिखाण मनोरंजक करण्याकडे लेखकांचा

वा भाषांतरकर्त्याचा रोख असतो.

साधारणपणे प्रारंभीच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे संपादक कार्य होते तोपर्यंत ' मेव्या 'चे स्वरूप प्रामुख्याने गद्य, ख्रिस्तीधर्माच्या प्रचाराला प्राधान्य देणारे होते. आहाणे, कोडी, प्रश्नसुद्धा ' पवित्रशास्त्र ' किंवा ख्रिस्तीधर्मपर ज्ञान यांवर आधारलेले होते. डॉ. एमिली बिसेल, देवदत्त टिळक, यांच्याकडे संपादकीय जबाबदारी आल्यावर केवळ बोध, नीति, धर्मप्रचार असे स्वरूप न राहाता ' साहित्या 'च्या अंगाने बाळबोधमेवा बाळसे धरू लागल्याचे दिसते.

इ. स. १८९३ च्या मे महिन्यापासून ते फेब्रुवारी १९०१ पर्यंत सुमारे आठ वर्षे ' बाळबोधमेव्या 'ची संपादकीय कामगिरी मि. एच. एल. ब्रूस (ह्यूम) पाहात होत्या. तरी १८९६ ते १९१० पर्यंतचे बाळबोधमेव्याचे संपादन रे. ना. वा. टिळक करीत होते, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

या काळात रे. टिळकांनी आपली मुलांसंबंधीची कविता, प्रासंगिक, धार्मिक कविता, बालबोधमेव्यातून विपुल प्रमाणात प्रसिद्ध केली. पण त्याचबरोबर दत्तांची शिशुगीते म्हणजे मराठी वाङ्मयाला मिळालेली मौलिक देणगी होय, असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ' दत्तां 'च्या या शिशुगीतांना बालबोधमेव्याने प्रसिद्धी दिल्याची नोंद आपल्याला घ्यावी लागते. ' आंदोलन ' ५ नोव्हेंबर १८७४ (ताई गुणाची माझी छकुली), ' शहाणी बाहुली– २ मार्च १८९९, ' बोलत का नाही ' ३ नोव्हेंबर १८९८, अशा क्रमाने दत्तांची शिशुगीते प्रसिद्ध झाली. त्यांची ' आंदोलन ' कविता अनेक वर्षे बालबोधमेव्याच्या मलपृष्ठावर जाहिरातवजा छापलेली आढळते. दत्तांच्या काव्यसंग्रहात या कविता काही कडवी कमी करून छापलेल्या दिसतात. दत्तांची ' नवे पान उघडले ' ही कविता प्रथम ६ जानेवारी १९५८ च्या बालबोधमेव्यात प्रसिद्ध झाली. त्या कवितेवरून ख्रिस्ती धर्माचा दत्तांवरील परिणाम त्यातील ' प्रभु ' या शब्दाने जाणवतो. केशवसुतांची ' दंवाचे थेंब ' ही कविता ३ फेब्रुवारीत १८९८ च्या बालबोधमेव्यात प्रसिद्ध होते. तिच्या मथळ्यावर प्रारंभी मोठ्या टाईपात ' तुमचे आयुष्य कसे ' ते तर वाफ आहे, थोडाच वेळ दिसते आणि मग नाहीसे होते; ' याकोबा– ४ : १४ असे वचन छापलेले दिसते. कदाचित केशवसुतांची ही कविता वरील वचनाच्या चिंतनातून सुचलेली असेल किंवा संपादकांनी कवितेला योग्य असे ख्रिस्ती धर्मातील वचन देण्याचा नेमकेपणा दाखविला असेल. काही असो, मराठीतील एका युगप्रवर्तक कवीची कविता प्रसिद्ध करण्याचे श्रेय बाळबोधमेव्याला लाभते. बालकवींच्या एकूण पाच कविता इ. १९०९ ते १९१० या काळात प्रसिद्ध झालेल्या दिसतात. ' भिकारी ', (डिसेंबर १९०९), ' आनंदी पक्षी ' (जानेवारी १९१०), ' पाहत राहू गोदिला ग माघाभाऊ ' (मार्च १९१०), चिवचिव....चिमणुताई ' (मे १९१०), ' गोफ ' (सप्टेंबर १९१०). पवित्रशास्त्रविषयक किंवा येशूख्रिस्त, ख्रिस्तीधर्म याविषयीचे लिखाण म्हणजे येशूचे

चरित्र. 'पवित्र शास्त्रा'तील दृष्टान्त पिलग्रीम-प्रोग्रेस कर्त्या बनयनचे चरित्र, निरनिराळ्या ठिकाणी ख्रिस्ती धर्मांचा चाललेला प्रचार, बायबलवर आधारित छोटी छोटी कोडी, कित्येक लहान मुलामुलींनी ख्रिस्ती धर्म स्वीकार केल्याची वातमीपत्रे, नाताळ व इतर सणानिमित्त संपादकांनी, वाचकांनी प्रकट केलेल्या शुभेच्छा, धर्मविषयक तत्त्वाची माहिती देणारे लेख, धार्मिक बोधास्तव कथा, येशूचा थोरपणा, त्याने सोसलेले हाल, संकटे वगैरे संबंधीची माहिती, अशा स्वरूपात धर्मपर लिखाण आढळते.

धर्मांतर केलेल्या ख्रिस्ती लोकांत प्राधान्याने खालच्या वर्गातील लोकांचा भरणा होता. धर्मांतर केलेल्या लोकांची भाषा अशुद्ध असल्याची जाणीव ख्रिस्ती झालेल्या विचारवंतांना व इतरांना होती. (रे. सदाशिवराव लोटलीकर, आदि). ख्रिस्ती धर्म-प्रचारकांच्या मनातही ही खंत होती. त्या दृष्टीने मुलांच्या मनावर लहानपणीच संस्कृत भाषचे संस्कार झाले तर त्यांची भाषा सुधारेल, असे त्यांना वाटत होते. त्या दृष्टीने बालबोधमेव्यातून संस्कृत उतारे देऊन त्यांचे चांगल्या मराठीत भाषांतर करणारांना बक्षिसे देण्याची योजना 'ख्रिस्तानुसारी' या टोपण नावाने लिहिणाऱ्या व्यक्तीने काही काळ राबवून पाहिलेली दिसते. पुढे पुढे 'जगन्मित्र'ची (रे. टिळक) संस्कृत शब्दप्रचुर कविता शब्दार्थासहित प्रसिद्ध करण्यात येत होती. त्यासंबंधी बालबोध सेवाकर्त्यांचे निवेदन पाहण्यासारखे आहे.

"आम्हास आनंद वाटतो की परमेश्वराने ती आपली आशा (धर्मांतर) पूर्ण केली व सांप्रत ते 'बालबोधमेव्या'चे एक पंडित आहेत. आमच्या वाचकांनी त्यांच्या किंचित कठीण भाषेला न भिता मनात ज्ञानेच्छा धरून बालबोधमेवा वाचावा, म्हणजे त्यास तितके अधिक भाषाज्ञान होईल. इतकेच नाही, तर कोणत्या विषयाला कशी भाषा असावी हे समजून मोठा फायदा होईल. त्यांच्या लिखाणात कोठे कोठे संस्कृत वाक्येच्या वाक्ये येतात, पण ही वाक्ये उच्च जातीय मराठ्यांच्या नेहमी वापरण्यातली असून, ती आपण ख्रिस्ती लोकांस समजली पाहिजेत म्हणून ते मुद्दाम देत असतात, या वाक्यांचा ते अर्थही देतात तरी त्याचा योग्य उपयोग करून घेणे आपले काम आहे." (बापाचे प्रेम या कवितेखालील टीप, बालबोधमेवा पृ. १३८, इ. स. १८९५). ख्रिस्ती लोकांची भाषा सुधारली पाहिजे याची जाणीव बालबोधमेव्याकर्त्यांना होती. त्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रयत्न केलेले दिसतात. भाषेत शब्दाचे निरनिराळ्या प्रकारे उपयोग करणे, वाक्प्रचार, म्हणींचा संग्रह, त्यांचा अर्थ, शब्दांच्या व्युत्पत्ती अशा अनेक अंगांनी भाषा संवर्धनाचा बालबोधमेव्याने प्रयत्न केलेला दिसतो.

याच प्रयत्नाबरोबर इंग्रजी भाषेतील किंवा अन्य भाषांतील साहित्याचे भाषांतर ह्यूम, फेअर बँक, ढालवाणी, यांनी सुरस मराठीत करवून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुढे पुढे इंग्रजी भाषेतील कवितांचे भाषांतर मराठीत करवून घेण्याचा

बाळबोधमेवाकर्त्यांचा प्रयत्न केलेला दिसतो. या दृष्टीने ६ जून १८९५ च्या अंकात (पृष्ठ ८७) भाषांतराची कसोटी या सदरात त्यांनी The Robin नावाची इंग्रजी कविता प्रसिद्ध केली व (या) 'इंग्लिश कवितेचे गद्य किंवा पद्य रूपाने मराठीत उत्तम भाषांतर तयार करील त्याला आम्ही एक रुपया देऊ करतो' असे जाहीर केले. त्यानुसार आलेल्या कवितांपैकी तीन उत्कृष्ट भाषांतरे निवडून ४ जुलै १८९५ च्या बाळबोधमेव्यात प्रसिद्ध केली. कवितेच्या मराठी भाषांतरात उत्कृष्ट भाषांतरकार म्हणून हैदराबादच्या बनूताई अण्णाराव पंडित, सौ. लक्ष्मीबाई नारायण टिळक व वि. कै. पंडित अशा व्यक्ती होत्या. मराठीत 'स्मृतिचित्रे' लिहून प्रसिद्ध पावलेल्या लक्ष्मीबाईंचे हे अंग बऱ्याच लोकांना अज्ञात असेल. अशा प्रकारची भाषांतरे करून घेण्यामागे मेवाकर्त्यांची भूमिका कोणती होती, ते पुढील निवेदनावरून लक्षात येईल : 'एकाच नेमलेल्या विषयावर निरनिराळ्या मनुष्यांची मने लागली असता, किती निरनिराळ्या प्रकारची कार्ये घडून येतात, हे दिसण्यात येते. या तीन लेखांची परस्पर तुलना करण्याचे काम मनोरंजक आहे' (पृ. ११०). यानंतरचा प्रयोग 'मेव्या' ने इ. स. १८९८ साली केलेला दिसतो. वरील कवितेचे भाषांतरकार सर्वसामान्य वाचक व कवि होते, तर केशवसुत, आनंदीरमण व दत्त या तीन कवींना The Dollies Lament ही Hattie Bruce ची कविता एकाच वेळी भाषांतर करायला दिली व ती भाषांतरे १ सप्टेंबर १८९८ च्या बालबोधमेव्याच्या अंकात प्रसिद्ध केली. त्या संबंधीची संपादकीय टीप अशी आहे : 'एकाच काव्याची तिघा कवींनी केलेली तीन भाषांतरे आहेत. खरोखर तिन्ही चांगली साधली आहेत. तथापि प्रत्येकात बाकीच्यात नाहीत असे गुण आहेत व तेही कमी अधिक प्रमाणाने आहेत. कोणत्या भाषांतरात कोणता गुण आहे ते पहाणे मोठे मनोरंजक काम आहे.' (पृ, १४२). मराठी साहित्यक्षेत्रातील हा प्रयोग मोठा लक्षणीय आहे हे आपणास मान्य करावे लागेल. (केशवसुतांच्या व दत्तांच्या कविता संग्रहात या कवितांचा समावेश नाही. पाहा – आलोचना मार्च १९७३).

जून १९२८ अखेर डॉ. एमिली बिसेल म्हणजे बिसेल मावशी, किंवा आत्याबाई बालबोधमेव्याच्या संपादिका होत्या. त्यांना भारतीय संगीत, साहित्य, याबाबत आपुलकी होती. त्यांनी बालबोधमेव्यातून छोट्या छोट्या मुलांसाठी कथा, उपदेशपर गोष्टी, गीते, गीत गाण्याच्या पद्धती, यांविषयी खूप लिहिले आहे. बाळबोधमेव्यातच 'बोधसुधा' हे प्रकरण त्यांनी सुरू केले. ते साधारणपणे इ. स. १९२७ च्या सुमारास. त्यासंबंधी देवदत्त टिळक बालबोधमेव्याच्या जुलै १९२८ च्या अंकात लिहितात : 'बालबोधमेव्या'त 'बोधसुधा' हे प्रकरण डॉ. एमिलीबाईंनी दीड–पावणे दोन वर्षांपूर्वी सुरू केले. माझा व त्यांचा ह्याबद्दल जो पत्रव्यवहार झाला होता, त्यावरून दिसते की 'बोधसुधा' हा भाग १६ वर्षांवरील मुलांमुलींसाठी त्यांनी चालू केला.

'आज तुमच्या आत्याबाई म्हणजे बोधसुधेच्या जननी व बालबोधमेव्याच्या

पालनकर्त्या काही दिवसांसाठी तुमच्याशी बोलण्यासवरण्याचे काम मजवर सोपवून एका महत्त्वाच्या कामाला स्वतः वाहून घेत आहेत.' (जुलै १९२८). जुलै १९२८ पासून १९४३ डिसेंबरपर्यंत देवदत्त टिळक बालबोधमेव्याचे अतिशय चांगल्या प्रकारे संपादन करीत होते. शं. वा. किर्लोस्कर, ना. धों. ताम्हनकर, आढाव, दिघे आदी लेखकांचे, कवींचे सहकार्य त्यांनी मिळविले होते. बदलत्या काळानुसार बालबोधमेव्याचे स्वरूप बदलले होते. ते बालमानसशास्त्र, [शिक्षण, आणि साहित्य यांच्या अंगाने विकसित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शं. वा. कि. नी आपली रेखाचित्रेही वेळोवेळी बालबोधमेव्याच्या वाचकांना भेट म्हणून दिली होती. स्वतः देवदत्त टिळकांनी, कथा-बोधकथा, एकांकिका, अगदी लहान मुलांसाठी लेख, आदी खूप साहित्य या अंकासाठी लिहिले. मुलांना हे मासिक कसे आवडते होईल असा त्यांचा प्रयत्न होता. धार्मिक प्रसार व तद्संबंधीच्या बाबींना कमी महत्त्व दिले जाऊ लागले. रे. टिळक, केशवसुत, बालकवी, दत्त, आनंदीरमण, लक्ष्मीबाई टिळक, ना. धों. ताम्हणकर, शं. वा. कि, शा. ल. उजगरे, दालवाणी, मनोहर आढाव या लेखकांचे बालबोधमेव्याला त्यांच्या प्रारंभीच्या अवस्थेत जसे साहाय्य लाभले, तसेच मराठीतील मान्यवर कवी व नाटककार 'कुसुमाग्रज' यांच्या कविता बालबोधमेव्यातून प्रसिद्ध झालेल्या दिसतात. 'खेळायला जाऊ चला' हे मुलांचे गीत १९२९ च्या सप्टेंबर महिन्याच्या अंकात मोठ्या थाटात प्रसिद्ध झालेले दिसते, तर 'मोहनमाला' ही दीर्घ कविता आक्टोबर १९२९ च्या अंकात प्रसिद्ध झालेली दिसते. कुसुमाग्रजांची बालबोधमेव्यातील कविता–'कुसुमाग्रज–शिरवाडकर' अशा नावाने प्रसिद्ध होते. 'मोहनमाला' या कवितेवरून बालकवींच्या फुलराणी व इतर कवितांचा कुसुमाग्रजांवर झालेला परिणाम सहज लक्षात येतो. उदाहरणार्थ–

जागी झाली मोहकबाला
गळा दिसेना मोहनमाळा
ठाऊक नसतां तिला स्वतःला
अश्रू गालावरि ओसरला
म्हणोत कोणी चंद्र तयाला
म्हणोत कोणी कांहि कशाला !

डिसेंबर १९४२ च्या अखेर देवदत्त टिळकांनी बालबोधमेव्याचे संपादकत्व सोडलेले दिसते. त्या संदर्भात 'आवेशकार' सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांचे निवेदन बोलके आहे. 'रा. देवदत्त नारायण टिळक यांनी बालबोधमेवा यांच्या संपादकत्वाचा राजीनामा दिला हे वृत्त वाचून वाईट वाटते....या परिस्थितीत बालबोधमेवा कसा चालू ठेवावा व त्याचे योग्य संपादन कोणी करावे? हा बालबोधमेवा कमिटीपुढे मोठा प्रश्न आहे. दुसरी काही व्यवस्था लागेपर्यंत 'तरुणांचा ख्रिस्ती आवेश' या मासिकात बालवाङ्मय प्रसिद्ध करावे अशी विनंती बालबोधमेवा

कमिटीने मला केली व कमिटीची अडचण लक्षात घेऊन ती विनंती मी मान्य केली आहे.'

आपला नम्र,
आवेशकार सत्यवान व नामदेव सूर्यवंशी
नवा नागपाडा, मुंबई
७–१–१९४३

ज्ञानोदयातील श्री. सूर्यवंशी यांच्या या निवेदनानंतर १८–२–४३ च्या ज्ञानोदयात अमेरिकन मिशनच्या सेक्रेटरी के. इ. मन्सन यांनी याबाबत शिक्कामोर्तब केले ते असे—" ऑल इंडिया ट्रेझर चेस्ट कमिटीने असा ठराव केला की, "बालबोधमेव्याचा समावेश ' तरुणाचा ख्रिस्ती आवेश ' या मासिकात करून मराठी ट्रेझर चेस्ट म्हणून आवेश प्रसिद्ध करावा. ' आवेश ' ची वर्गणी वर्षाला एक रुपया ठेवावी असे ठरले आहे."

यानंतर ' आवेश ' मधून बालबोधमेवा प्रसिद्ध होऊ लागला. पण स्वतः श्री. सूर्यवंशी त्याबाबत समाधानी नव्हते. दीडवर्ष म्हणजे इ. स. १९४५ च्या मध्यापर्यंत त्यांनी आवेशमधून बालबोधमेव्याची सेवा केली. त्यांची त्यामागची अडचण काय होती ती सांगताना आपल्या आत्मचरित्रात (अगा जे कल्पिले नाही–मध्ये पृ. १४३ वर) लिहितात : " मला हवे ते मी या पत्रांत यापुढे लिहू शकत नाही हे मला समजून आले. आवेश आवेश उरला नाही. त्यात चिऊकाऊच्या गोष्टी दिल्या पाहिजेत आणि त्यातही निम्मा मजकूर इंग्रजी ' ट्रेझर चेस्ट ' चेच भाषांतर करून मी छापले पाहिजे अशी समज मला देण्यात आली. कसा तरी दीड वर्ष मी हा ' आवेश ' काढीत होतो. " यावरून आपल्या हे ध्यानी येईल की बालबोधमेवा प्राधान्याने ख्रिस्तीधर्मप्रसारासाठी वापरावा अशी अमेरिकन मिशनची भूमिका होती. देवदत्त टिळक, सूर्यवंशी सोडले तर मराठी ख्रिस्ती संपादक जवळ जवळ नाहीत. अर्थात डॉ. एमिली बिसेल ते देवदत्त टिळक या संपादक द्वयाच्या कारकीर्दीत बालबोधमेवा अनेक अंगांनी विकास पावला. त्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे डॉ. एमिली बिसेलची व्यापक दृष्टी व त्यांनी रे. ना. वा. टिळकांचे ' मुक्तपणे घेतलेले सहकार्य'. टिळकांमुळेच मराठीतील नामवंत कवि–लेखकांना बालबोधमेव्यात लिहावे लागले. स्वतः टिळकांनी मुलांसाठी लिहिलेली कविता व इतर कविता वैपुल्याने बालबोधमेव्यात प्रसिद्ध झाली. मराठीत खऱ्या अर्थाने मुलांची कविता, किंवा शिशुगीते दत्तांनी लिहिली, ती बालबोधमेव्यातूनच, तसेच बालकवींची शिशुविषयक कविताही बालबोधमेवा प्रसिद्ध करतो, यातच बालबोधमेव्याचे पर्यायाने रे. टिळकांचे वैशिष्टय आहे, हे लक्षात घ्यावे लागते. केशवसुतांची कविता बालबोधमेव्यात प्रसिद्ध झाली, याचेही श्रेय रे. टिळकांना द्यावे लागेल. मराठीतील शिशुगीतांची सुरुवातही हे कवि या मिशनच्या संपर्कात आले त्यामुळे झाली असे दिसते. याबाबत डॉ. एमिली

बिसेलचे कार्य मोठे आहे. पुढे त्यांनी बालोद्यान नावाचा मुलांचा गीतसंग्रह काढलेला दिसतो.

रे. टिळकांनी जसे मराठी भाषा, साहित्य या अंगांनी बालबोधमेव्याला अनेक मित्रांच्या सहकार्याने जोपासले, तसेच देवदत्त टिळकांनी जोपासले. अनेक ख्रिस्ती लेखकांना त्यांनी लिहिण्यास, भाषांतर करण्यास प्रवृत्त केले. तसेच ख्रिस्ती लेखकांचा संग्रह केला. ना. धों. ताम्हनकर, शं. वा. कि, यांचे साहाय्य घेतले. तसेच रामटेके, शां. द. उजगरे, आढाव, ई. शि. वाघमारे, शंकर बनकर, केळकर, हे लेखक उदयाला आणले व बालबोधमेवा केवळ ख्रिस्ती धर्मप्रसाराचे मासिक न बनता मुलांचे आवडते मासिक बनले. पण त्यांनाही कालांतराने राजीनामा द्यावा लागलेला दिसतो. तेव्हा जो अनुभव श्री. सत्यवान सूर्यवंशी यांना कालांतराने आला तोच अनुभव थोड्याबहुत फरकाने त्यांना आला असावा का ? असो.

थोडक्यात, बालबोधमेवा साधारणपणे इ. स. १९४५ अखेरपर्यंत चाललेला दिसतो. या काळात महाराष्ट्रात मुलांची अनेक विषयांवर अनेक नियतकालिके सुरू झालेली दिसतात. पण दीर्घकाळ चालणारे मुलांचे मासिक, शालापत्रक, ही सोडल्यास बालबोधमेवाच प्रमुख म्हणावे लागेल.

या संदर्भात द. वा. पोतदारांचे उद्‌गार लक्षात घेण्याजोगे आहेत. ते म्हणतात, 'महाराष्ट्रातील अलीकडील दोन पिढयांत बालबोधमेव्याच्या द्वारे पुरेसे शिक्षण मिळाले आहे. (तुम्ही) जीवनाकडे व्यापक उदार दृष्टिकोणातून पाहाण्याच्या प्रवृत्तीचा वापर केला. ही जीवनदृष्टी ख्रिस्तीधर्मतत्त्वामुळे उत्कृष्ट प्रकारे परिपुष्ट झालेली होती.' (अमेरिकन मराठी मिशनची दीडशे वर्षे–१८१३–१९५३, पृ. ८७).

प्रारंभीच्या काळात पाश्चात्त्य संस्कृती, विज्ञान, वाङ्मय आणि नवे ज्ञान देण्याच्या बाबत बालबोधमेवा जागरूक होता. धर्मप्रसाराचे अंग वजा केले तर महाराष्ट्रातील बालमनावर नीतीच्या ज्ञानाचे संस्कार करण्यात व वाङ्मयाची अभिरुची प्रारंभीच्या काळी घडविण्याची कामगिरी बालबोधमेव्याने केलेली दिसते आहे.

सत्यदीपिका–थोरली

संपादक बाबा पदमनजी यांनी मार्च १८७३ मध्ये आपली 'थोरली सत्य-दीपिका' सुरू केली. हे मासिकपत्र होते. वार्षिक वर्गणी आगाऊ भरल्यास रु. २–०० फुटकळ अंकास तीन आणे पडत. यात कादंबऱ्या (नावेल्स) खेरीज करून चांगली पुस्तके विकण्याच्या जाहिराती स्वस्त दराने छापल्या जातील अशी जाहिरात केलेली आढळते. ख्रिस्तीतर वर्गणीदारात रा. ब. नाना मोरोजी, दादोबा पांडुरंग, महादेव गोविंद रानडे वर्गणीदार असलेले दिसतात. पहिली दोन वर्षे दीपिका चांगली चालली तीत मराठीबरोबर इंग्रजी लेख, कविता प्रसिद्ध होत असत. तसेच हिंदू, जैन, बौद्ध धर्म व तत्त्वज्ञानावरही लेख येत असत. डिसेंबर १८७७ साली शेवटचा अंक प्रसिद्ध

केला व आर्थिक अडचणीपायी बाबांनी सत्यदीपिका नाइलाजाने बंद केलेली दिसते.

विशेष म्हणजे दंभहारक, निबंधमाला या नियतकालिकाशी झालेल्या संघर्षाचे प्रतिबिंब ' सत्यदीपिके 'मध्ये पहावयास मिळते.

मान्ना

घोडनदी येथील धडाडीचे कार्यकर्ते शेख उमर यांनी १८७७ मध्ये ' मान्ना ' या नावाचे मासिक अहमदनगर येथे सुरू केले. ' मान्ना ' मासिकाचा पहिला अंक मार्च १८७७ मध्ये प्रसिद्ध झाला. तो अष्टपत्री आकाराच्या चार पृष्ठांचा होता. सप्टेंबर १८७७ पासून सहा पृष्ठांचा करण्यात आला. ' ख्रिस्ती लोकांस शब्बाथ या दिवशी वाचण्याजोगे विषय मिळून शास्त्रसंबंधी व दुसरी उपयुक्त माहिती मिळावी ' हा या मासिकाचा उद्देश होता. त्याची वार्षिक वर्गणी ३ आणे होती. दर महिन्याच्या महिन्याच्या पहिल्या सोमवारी ते प्रसिद्ध होत असे. आर्थिक अडचणीमुळे मध्ये काही दिवस अंक निघाले नाहीत पण आर्थिक अडचण दूर होताच मागील अंक छापून भरपाई केली. स्वतः आर्थिक झीज सोसून शेख उमर यांनी हे मासिक चालविले होते. पण २७ मार्च १८८१ या दिवशी त्यांचे निधन झाले आणि त्याबरोबर ' मान्ना ' मासिकही बंद पडले.

प्रकाशता-प्रकाशक-प्रकाष्ठा

अहमदनगर येथे एस्. एस्. पी. मिशनच्या वतीने ' प्रकाशता ' हे मासिक सुरू करण्यात आले. १८७८ मध्ये प्रथम निघाले त्यावेळी पहिले संपादक रे. टी. विल्यम हे होते. या मासिकात प्रारंभी पंचांग, ख्रिस्ती शास्त्राचा अचूकपणा, स्थिरीकरण म्हणजे काय, चर्च इतिहास, अपास्टलांचा काळ, उपदेशासंबंधी, शिकविण्याचे नियम, व्याकरणासंबंधी वगैरे विषय असत. मिशनच्या कामदारांना धर्मशिक्षण देणे हा या मासिकाचा मूळ हेतू होता. अहमदनगर येथे मिशनात काम करणाऱ्या प्रत्येकाला यातील लेखांचा अभ्यास करावा लागे. दर महिन्यास त्यांची परीक्षा घेतली जाई. एखाद्या विषयात कुणी नापास झाला तर त्याला जबर दंड भरावा लागे. रे. कॅनन टेलर, कॅनन किक व रे. दि. र. आठवले हे या पत्राचे संपादक झाले.

पहिल्या महायुद्धाच्या काळात ते बंद पडले होते. मधल्या काळात ते ' प्रकाशक ', ' प्रकाष्ठा ' या नावाने प्रसिद्ध होत होते. जवळ जवळ ६० वर्षे चालून हे मासिक बंद पडले.

शब्बाथ शाळेच्या धड्यावर टीका

शब्बाथ शाळेतील शिक्षकांना, शास्त्राभ्यास करणाऱ्याना व शिकविणाऱ्यांना उपयुक्त अशी ही माहिती. १८८० पासून ज्ञानोदयात छापून येत असे. ती (स्वतंत्रपणे) निराळी छापून हे मासिक चालविले होते. याची आठ पृष्ठे असत व

वार्षिक वर्गणी एक रुपया होती. पुढे १८९३ मध्ये याच टीका 'बालशिक्षका'त समाशिष्ट करण्यात आल्या.

सत्यवादी

मुंबईत बाबा पदमनजी यांनी २ फेब्रुवारी १८८२ रोजी 'सत्यवादी' हे पाक्षिक सुरू केले. त्याची वार्षिक वर्गणी एक रुपया व पृष्ठसंख्या आठ होती. हे नेमके केव्हा बंद पडले त्यासंबंधी माहिती मिळाली नाही. या 'पाक्षिका'बद्दल ज्ञानोदयकार १६-३-८२ च्या अंकात लिहितात, "याची भाषा फार चांगली आहे ....हे ख्रिस्ती व इतर लोकांसाठी काढले आहे. म्हणून यात ख्रिस्ती लोकांच्या तसेच इतर लोकांच्या उपयोगी पडण्याजोगे विषय येतील."

मुक्तिसमाचार

नोव्हेंबर १८८२ पासून मुक्तिसमाचार हे मराठी वर्तमानपत्र सुरू झाले. १९ सप्टेंबर १८८२ मध्ये मुंबईस आलेल्या मुक्तिफौजेच्या चार मिशनऱ्यांनी हे काम केले. ज्ञानोदयाच्या ३० नोव्हेंबर व ७ डिसेंबर १८८२ च्या अंकात मुक्तिसमाचार-मध्ये प्रसिद्ध झालेल्या कविता उद्धृत केलेल्या दिसतात. हे वर्तमानपत्र किती काळ चालले. केव्हा बंद पडले यासंबंधीची काही माहिती मिळत नाही.

कुटुंबमित्र

बी. ब्लेकच्या संपादकत्वाखाली बॉम्बे ट्रक्ट ॲण्ड बुक सोसायटीच्या वतीने जानेवारी १८८४ पासून हे मासिक सुरू झाले. याची वार्षिक वर्गणी एक रुपया आठ आणे होती. किरकोळ अंकास दोन आणे. अंकात २४ पृष्ठे असत. "विलायतेप्रमाणे हिंदुस्थानात मासिक पुस्तकांचा प्रसार व्हावा व मराठी वाचकास नाना प्रकारच्या विषयांचे ज्ञान व्हावे ह्याकरिता मुंबईतील ट्राक्ट व बुक सोसायटी ह्या मंडळीने 'कुटुंबमित्र' मासिक काढले होते."

पहिल्याच अंकापासून 'प्रेसिदेंत गारफिल्ड' यांचे चरित्र क्रमशः देण्यात येऊ लागले. हे मासिक सचित्र होते. त्यात लघुकथा, कविता, पशुपक्ष्यांची रेखाचित्रे, माहिती, बातम्या वगैरे असत. एप्रिल १८८५ पासून बाबा पदमनजी या मासिकाचे संपादक झाले व त्यांच्या मदतीला आणखी चौघेजण दिले. पण डिसेंबर १८८६ मध्ये शेवटचा अंक निघून हे मासिक कायमचे बंद झालेले दिसते.

राजमार्ग (स्वर्गमार्ग)

राजमार्ग हे मासिक ऑक्टोबर १८८५ पासून सुरू झाले. असे ज्ञानोदयाच्या ८ ऑक्टोबर १८८५ च्या अंकावरून कळते. याचे पहिले नाव 'स्वर्गमार्ग' असे होते. पहिले दोन तीन अंक काढल्यावर ते बंद पडले. एप्रिल १८८६ पासून पुन्हा सुरू झाले. या अंकात पतिव्रता नम्रतेने गाजविणे, धर्मसंजीवन, तारण, पूर्ण पतिव्रता,

धर्मसंबंधी अनुभव, पतिव्रतेसंबंधी सात प्रार्थना, या विषयांवर लेख आहेत. हे केव्हा बंद पडले यासंबंधी काही माहिती उपलब्ध नाही.

सुमंत

कारवारच्या कोण्या ख्रिस्ती बंधूने जानेवारी १८८८ मध्ये 'सुमंत'चा पहिला अंक प्रसिद्ध केला. हा शिळाछापात असून चार पृष्ठांचा होता. कोणत्याही मिशनच्या आधाराशिवाय स्वतंत्रपणे हे पत्र चालवावें अशी संपादकांची इच्छा होती. हे मासिक खास ख्रिस्ती लोकांसाठी असून प्रॉटेस्टंट नेटिव्ह ख्रिस्ती, ख्रिस्ती तरुणांचे कर्तव्य, वालंटिअर कोर वगैरे लेख व वर्तमानसार असे. हे नियतकालिक फार दिवस चाललेले दिसत नाही.

सिंहनाद

जानेवारी १८८९ पासून मुक्ति फौजेचे मुखपत्र म्हणून सुरू झाले. इ. स. १८८२ मध्ये चालू झालेल्या 'मुक्तिसमाचार' नियतकालिकाचे 'सिंहनाद' हे नामांतर असावे. इ. स. १८८२ हे प्रारंभ वर्ष धरले तर या नियतकालिकाने आपले एक शतक पुरे केले असे म्हणावे लागेल. सिंहनादाच्या प्रथम संपादिका कर्नल युद्धाबाई या होत्या. मुक्तीच्या संदेशाचा प्रचार करणे हा या मासिकाचा उद्देश होता.

याच काळात 'जागल्या' आणि 'धांडोरा' अशी दोन नियतकालिके प्रसिद्ध हो होती अशी माहिती मिळते पण त्याबाबत काही तपशील मिळत नाही.

दिव्यप्रकाश

इ. स. १८९० च्या फेब्रुवारीत पुण्यातील काही तरुणांनी हे मासिक सुरू केले. याची वार्षिक वर्गणी १२ आणे होती. हे मासिकही फार काळ चालले नसावे, असे १८९० च्या एका ज्ञानोदयातील नोंदीवरून दिसते.

आचार्य, सूर्यप्रकाश या नावांची दोन नियतकालिके १८९२ च्या सुमारास नघत होती पण त्यासंबंधी माहिती उपलब्ध नाही.

मबास्सेर

जेम्स हेन्री लॉर्ड याने मार्च १८९२ मध्ये खास बेने इस्त्रालय लोकांसाठी मबास्सेर (सुवार्तिक) हे मासिक पत्र सुरू केले. मासिकाचा उद्देश सांगताना संपादक लिहितात–" हे पत्र सुरू करण्याचे कारण हेच की आम्ही ख्रिस्ती असल्यामुळे बेने–इस्त्राएल मित्रास कळविण्याकरिता दैवाने आम्हास एक निरोप सोपविला आहे. तो त्यांच्या राष्ट्राच्या प्राचीन आशेचा म्हणजे येणाऱ्या मशीहासंबंधीचा व त्याकडून प्राप्त होणाऱ्या सुखदायक काळाविषयीचा असून कुशलाचा आहे; आणि तो त्यास कळवावा म्हणून ईश्वराने आम्हा ख्रिस्ती लोकांस आज्ञा दिली आहे." आर्थिक अडचणीमुळे हे मासिक १९०५ मध्ये बंद पडले.

स्त्रियांची मैत्रीण

मराठी ख्रिस्ती वाङ्मयाच्या इतिहासात या मासिकासंबंधी माहिती देताना भा. कृ. उजगरे लिहितात, " स्त्रियांची मैत्रिण हे मासिक ख्रिस्ती व ख्रिस्तीतर स्त्रियांकरिता इ. स. १८८६ साली मेथॉडिस्ट मिशनच्या युरोपिअन स्त्रियांनी काढिले. स्त्रियांना विविध विषयांची माहिती देऊन त्यांच्या धार्मिक वृत्तीचा विकास व्हावा हा या पत्राचा हेतू असावा असे दिसते. या मासिकाचे चालकत्व आतापर्यंत (१९२७) युरोपिअन स्त्रियांकडे होते. सांप्रत अलिबागच्या सौ. चंद्राबाई पोळ ह्या या मासिकाच्या संपादिका आहेत. " (पृ. ३६–३७)

मराठी ख्रिस्ती नियतकालिके या आपल्या निबंधात भास्करराव जाधव या मासिकासंबंधी सांगतात, " खास स्त्रियांकरिता म्हणून एकही नियतकालिक निघाले नव्हते. ते प्रथम काढण्याचा मान ' स्त्रियांची मैत्रिण ' या मासिकाने पटकावला. हे मासिक मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्चच्या परदेशीय स्त्री–मिशनरींनी १८९३ त काढले. गृहशिक्षण, मुलांचे संगोपन, बोधपर लेख वगैरे स्त्रियांना उपयुक्त अशा विषयांवर यात लिखाण व गोष्टी असत. याची वार्षिक वर्गणी १२ आणे व किरकोळ अंकास एक आणा असे. मे १९४० त याचा ४/५ अंक प्रसिद्ध झाला. जूनचा अंक निघाला नाही. जुलै १९४० पासून ज्ञानोदयात दोन पाने पुरवणी म्हणून प्रसिद्ध होऊ लागली. डिसेंबर १९४२ पर्यंत हे मासिक चालून बंद पडले. " (पृ. १४–१५)

भास्करराव जाधव म्हणतात तसे हे खास स्त्रियांसाठी निघालेले पहिले मासिक नव्हे. ' स्त्रीभूषण ' (१८६४) साली स्त्रियांसाठी मासिक निघालेले दिसते.

मला ' स्त्रियांची मैत्रिण ' या मासिकाचे तीन अंक बघायला मिळाले. ऑक्टोबर १९३५ जानेवारी १९३९, पुस्तक ५३ अंक १, मे १९३९ पुस्तक ५४ अंक ५. त्यावरून या काळात मिस् ए. ए. ॲबट या संपादिका असलेल्या दिसतात.

बाळशिक्षक

शाब्बाथ शाळेच्या धड्यावर टीका – बाळशिक्षक – सप्टेंबर १८९२ पासून ज्ञानोदय साप्ताहिकाबरोबर ' शाब्बाथ शाळेच्या धड्यावर टीका ' ही पुरवणी प्रसिद्ध होऊ लागली. डॉ. एस्. बी. फेअरबँक यांच्या प्रेरणेने हे काम मार्गी लागले होते. इ. स. १८९३ च्या प्रारंभाला मुंबईच्या ' संडे स्कूल युनियन 'ने पुरवणी द्वारे प्रसिद्ध होणाऱ्या ' धड्यांना ' स्वतंत्ररीत्या प्रसिद्ध करण्याची जबाबदारी उचलली. शाब्बाथ शाळेच्या धड्यावरील टीकेबरोबर चित्रे, बोधकथा, लघुकथा, कविता यांचा समावेश करून ' बाळशिक्षक ' नावाचे साप्ताहिक सुरू करण्यात आले. प्रकाशनाचा सर्व खर्च बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीने उचलला होता. ३१ मे १८८८ रोजी डॉ. फेअरबँक वारले. तेव्हा सुमंत विष्णु करमरकर संपादक झाले. ऑक्टोबर १९०७ पर्यंतचे अंक पाहायला मिळतात. त्यानंतर ते केव्हा बंद पडले ते कळत नाही.

सन्मित्र

मुंबईच्या काही ख्रिस्ती तरुणांनी जानेवारी १८९४ मध्ये हे मासिक सुरू केले. ख्रिस्ती भावांचा मेळा या संस्थेच्या वतीने ते निघत होते. हे फार काळ चाललेले दिसत नाही.

सुवार्तिक

जानेवारी १८९८ पासून चर्च मिशनरी सोसायटीच्या वतीने हे निघू लागले. यात ख्रिस्तधर्मविषयक बातम्या, स्थानिक सी. एम्. एस्. च्या बातम्या आणि 'सुवार्ता' प्रचारासाठी उपयुक्त सूचना यासंबंधीची माहिती असे. या मासिकासंबंधी फारशी माहिती उपलब्ध होत नाही.

एतद्देशीय ख्रिस्ती लोकांचा कैवारी

मुंबईच्या इंडियन ख्रिश्चन युनियनतर्फे हे मासिक ऑगस्ट १८९९ पासून प्रसिद्ध होऊ लागले. या मासिकाचे संपादन दिनकर पदमनजी हे होते ज्ञानोदयाच्या ७ फेब्रुवारी १९०१ च्या अंकावरून या मासिकाची माहिती मिळते. ती अशी : 'हे पत्र दर महिन्यास नेमाने चार पेजी निघत जाईल व ज्या कोणास या पत्राचे वर्गणीदार होण्याची इच्छा आहे, त्यांनी मि. एरन वासकर, मॅनेजर कैवारी पत्र, ट्रीचर कंपनीसमोर, भायखळ्यावरील धर्मशाळा या पत्त्यावर टपाल हशीलाबद्दल फक्त तीन आणे वर्गणी पाठवावी म्हणजे कैवारी पत्र मोठ्या संतोषाने त्यांच्या सेवेत सादर होत जाईल.'

ख्रिस्ती

रे. नारायण वामन टिळक यांनी सप्टेंबर १९०० पासून अहमदनगर येथे हे नियतकालिक सुरू केले. हे नियतकालिक काढण्याची प्रेरणा त्यांना उमरशेख यांच्या 'मान्ना' मासिकाकडून मिळाली होती. या नियतकालिकात ख्रिस्ती जिण्याचा निबंध, पवित्र शास्त्रावर टीकात्मक लेख, कविता, चरित्रे, वगैरे माहिती येत असे. ख्रिस्तीतर वाचकांनीही वाचावा असा संपादकाचा हेतू होता. मिशनच्या साहाय्याशिवाय अंक चालविण्याची रे. टिळकांची इच्छा होती. वार्षिक वर्गणी आठ आणे होती. १ सप्टेंबर १९०१ पासून ते दुप्पट आकारात निघू लागले पण लोकाश्रयाअभावी १९०२ नंतर ते कायमचे बंद पडलेले दिसते.

विवेचक

इंडियन ख्रिश्चन असोसिएशन या मुंबई येथील संस्थेने आपल्या कार्याची माहिती जनतेला व्हावी म्हणून जाहिरातवजा माहिती देणारे एक पत्रक इ. स. १८९८ मध्ये सुरू केले. त्याचे १८९९ मध्ये मासिकात रूपांतर केले. नंतर इ. स.

१९०० मध्ये त्या मासिकाचा आकार वाढविण्यात आला. त्याचे नाव ‘ इंडियन ख्रिश्चन त्रैमासिक ’ असे ठेवण्यात आले व ते त्रैमासिक झाले. ते इंग्रजी व मराठी भाषेत निघत असे. इ. स. १९०१ पासून त्याचे नाव ‘ विवेचक ’ असे झाले व ते द्वैमासिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. लवकरच ते बंद पडलेले दिसते. त्याची संपादकीय जबाबदारी एन्. जी. वेलिंगकर आणि सुमंत विष्णू करमरकर हे सांभाळीत होते. प्रत्येक अंकाची किंमत ६ पै होती. मुंबईतील ख्रिस्ती समाजाच्या आशा, आकांक्षा, विचार वगैरे जनतेपुढे मांडणे हे यांचे ध्येय होते.

निरोप्या

एप्रिल १९०३ पासून अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील वळण या गावाहून ‘ निरोप्या ’ हे मासिक निघू लागले. ते निघण्यामागील उद्देश ‘ नगर जिल्ह्यातील काथोलिकांच्या शिक्षणासाठी व धर्मप्रसारासाठी ’ हा होता. या मासिकाचे संपूर्ण नाव ‘ येशू हृदयाचा निरोप्या ’. या मासिकाचे संस्थापक व पहिले संपादक हेनरी डोरिंग, ये. सं. हे होते. १९०७ हे पुण्याचे महागुरु (बिशप) झाले. यांनी १९१४ पर्यंत मासिकाचे संपादन केले. ते जर्मन असल्यामुळे इ. स. १९१४ च्या महायुद्धात भारतात राहणे अशक्य झाले. त्यांना रोमला जाणे भाग पडले. त्या काळात फ्रान्सिस त्रेकांम, ये. सं. हे या मासिकाचे संपादन करीत होते. पहिल्या महायुद्धाच्या काळात मासिक बंद होते. इ. स. १९२७ मध्ये आर्चबिशप डोरिंग पुण्यात आले व जून १९२८ पासून ‘ निरोप्या ’ पुन्हा प्रसिद्ध होऊ लागला. या मासिकाचे स्वरूप धार्मिक व सामाजिक होते. त्याशिवाय त्यात लेख, कविता, ख्रिस्ती मंडळाच्या हालचाली वगैरेसंबंधी माहिती येत असे. वार्षिक वर्गणी रु. ३ होती.

निरोप्याच्या एप्रिल १९०३ च्या अंकाची एकूण दहा पृष्ठे होती आणि (१) एप्रिल महिन्यासाठी प्रार्थनचा विषय, (२) पवित्र ‘ मिस्सेचा चाकर ’ होणे, (३) लेओ तेरावे. परमगुरुस्वामीचा सण, (४) तुझे राज्य येवो, (५) एक रक्तासाक्षी हे विषय आलेले होते. एप्रिल १९३७ चा अंक ११ व पुस्तक २१ वे असे म्हटले असून प्रकाशक पुण्याचे आर्चबिशप, प्रकाशनस्थळ एक्झामिनर प्रेस, मुंबई, अशी माहिती दिलेली आहे. हे मासिक आतापर्यंत चालू आहे.

ख्रिस्ताश्रम

जानेवारी १९०४ पासून ‘ कवितेचे मासिकपत्र ’ सुरू करून, शंकर बळवंत कुलकर्णी व मनोहर विठ्ठल तर्खडकर या कवींनी कवितेच्या द्वारे ख्रिस्ती समाजाची सेवा करण्याचे ठरविले. केवळ कवितेसाठी निघालेले हे पहिले ख्रिस्ती मासिक म्हणावे लागेल. हे केडगाव (जि. पुणे) येथील मुक्तिमिशनमधून प्रसिद्ध होत असे. ऑक्टोबर १९०४ च्या दहाव्या अंकात आठ रत्ने, लोभाविषयी जपा, लाजारस,

ख्रिस्तस्तवन या विषयांवर कविता आल्या होत्या. टपाल खर्चासह वार्षिक वर्गणी फक्त तीन आणे होती. साधारणपणे एखादे वर्ष हे कवितेचे मासिक चालले असावे असे दिसते.

मधमाशी

पंडिता रमाबाई यांनी मार्च १९०४ पासून ' मधमाशी ' नावाचे मासिक सुरू केलेले दिसते. त्यांच्याच केडगाव येथील मुक्तिमिशनमध्ये छापून ते प्रसिद्ध करण्यात येई. या मासिकाच्या स्वरूपाविषयी ज्ञानोदयकार २७-१०-१९०४ च्या अंकात लिहितात, " बाळबोध व सुलभ गोष्टी, दाखले स्पष्टीकरण यांच्याकडून शास्त्रवचन शिकविण्याचा या पुस्तकाचा बाणा दिसतो. अज्ञान मुलापासून सुशिक्षित थोरापर्यंत या मासिकापासून आत्मिक अन्न मिळावे अशी योजना आहे. या पुस्तकात तत्त्वज्ञानाने भरलेले विषय नाहीत. कठीण व गहन विषयांची फोड दिसून येत नाही. जाडथा संस्कृत शब्दांनी भाषेचे थोरपण दाखविलेले नाही. ख्रिस्ती लोकांनी ही मधमाशी आपल्या घरांत ठेवावी व हिच्या मधाने आपली व आपल्या लेकरांची जीभ गोड करावी. " याची वार्षिक वर्गणी टपालखर्चासह एक रुपया. या मासिकाचे ब्रीदवाक्य ' मनोरम वचने मधाचा शिसा ' अशी आहेत, ती जिवाला गोड व हाडांस आरोग्य आहेत ' आणि परमेश्वराचे न्याय सत्य आहेत. मधापेक्षा, मोहराच्या पाझरापेक्षाही ते गोड आहेत. या मासिकात रे. ना. वा. टिळक, मनोहर विठ्ठल तर्खडकर यांच्या कविता प्रसिद्ध होताना दिसतात. एका वर्षाचे बारा अंक निघाले आणि फेब्रुवारी १९०५ नंतर ते मासिक बंद पडले.

ख्रिस्ती नागरिक

याचा पहिला अंक १५ डिसेंबर १९०४ मध्ये प्रसिद्ध झाला पण त्याआधी नमुना अंक म्हणून जानेवारी १९०४ मध्ये एक अंक प्रसिद्ध करण्यात आलेला होता. भास्कर नानजी कोतक यांनी हे मासिक प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला. म्हणजे कोणत्याही मिशनचे आर्थिक साहाय्य न घेता स्वतंत्रपणे नियकालिक चालविण्याचा हा प्रयत्न होता. मासिकाचे संपादक रे. ना. वा. टिळक होते व भा. ना. कोतक व्यवस्थापक होते. पत्राची वार्षिक वर्गणी टपालखर्चसुद्धा १ रुपया ३ आणे होती. या मासिकात धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयांवर लेख, वादविवाद, गोष्टी, चरित्रे व कविता प्रसिद्ध होत असत. या मासिकाचा एक इंग्रजी विभाग होता व त्याचे संपादक गणपतराव नवलकर होते. श्री. कोतक यांनी बरीचशी आर्थिक झीज सोसून तीन वर्षे हे मासिक चालविले. शेवटी नोव्हेंबर १९०७ पासून हे मासिक कायमचे बंद करावे लागले. रे. टिळकांनी १९०५ मध्ये आपली संपादकीय जबाबदारी सोडली होती.

पवित्र नाम

डिसेंबर १९०६ पासून पुणे येथील सट जॉन मिशन, पंचहौद या संस्थेचे मुखपत्र म्हणून पवित्रनाम मासिकपत्र सुरू झाले. दर महिन्याच्या पहिल्या तारखेला ते प्रसिद्ध होत असे. त्याचे संपादन रुबेन ढवळे करीत असत. त्याची वार्षिक वर्गणी १२ आणे असून किरकोळ अंकाची किंमत अर्धा आणा होती. सुरुवातीला चार पाने होती. फेब्रुवारी १९०७ पासून आठ पाने करण्यात आली. हे मासिक पुणे येथे इस्लाईट प्रेसमध्ये छापीत असत. पण नंतर कोल्हापूरच्या मिशन छापखान्यात छापले जाऊ लागले. या मासिकात ख्रिस्ती मासिक पंचांग, धर्मक्षेत्रीय बातम्या, सामाजिक घडामोडी, रे. लोटलीकर, जे. हेन्री लॉर्ड, भाऊराव चक्रनारायण वगैरे व्यासंगी लेखकांचे लेख तसेच शं. व. कुलकर्णी, मनोहर तर्खडकर यांच्या कविता प्रसिद्ध होत असत. यात फेब्रुवारी १९०५ पासून इंग्रजी विभाग सुरु करण्यात आला होता. १९१३ साली रुबेन ढवळे यांची मुंबईला बदली झाली आणि त्यामुळे हे मासिक बंद पडले.

बंधुप्रीती

इ. स. १८९४ ते १९०८ या दरम्यान जालन्याजवळील बेथेल येथून ‘ बंधुप्रीती ’ नावाचे मासिक निघालेले दिसते. जालना प्रांतातील ख्रिस्ती कार्याचा शतवार्षिक संक्षिप्त अहवाल १८५५–१९५५ या पुस्तिकेवरून या मासिकासंबंधी थोडीशी माहिती मिळते ती अशी : जालना प्रांत व बेथेल प्रांत यातील स्कॉटिश चर्चच्या दोन मंडळ्यांचे हे मुखपत्र असून ते आर. बी. डग्लस हे काढीत असत. यात वरील मंडळाच्या कामाच्या तारखा, बाप्तिस्मे, लेख, कविता वगैरे छापीत असत. हे मासिक सुमारे आठदहा वर्षे चालले होते.

सच्छास्त्रप्रदीपक

विल्यम सी. अर्विन यांनी १९०८ पासून ‘ सच्छास्त्रप्रदीपक ’ हे मासिक बेळगाव येथून स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. ९–५–१९०८ च्या आपल्या निवेदनात ते लिहितात, “ आम्ही सच्छास्त्रप्रदीपक नावाचे हस्तपत्रक प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. ते महिन्याला एकदा निघेल. या पत्रकाचे मुख्य उद्देश, शास्त्रस्पष्टीकरण, त्याचा क्रमवार अभ्यास, व ख्रिस्ती धर्माच्या मुख्य सिद्धांताचे विवेचन असे विविध आहेत. हे पत्रक एतद्देशीय ख्रिस्ती लोकांस व मिशन कामगारांस त्यांच्या शास्त्राध्ययनात उपयोगी पडून त्यांच्यात शास्त्राविषयी विशेष प्रीती व आदर उत्पन्न करण्यात व त्यांची त्यांच्या अतिपवित्र कर्मांत स्थापना करण्यात साहाय्यकारक होईल अशी उमेद बाळगितो. हे ज्यास पाहिजे असेल त्यांनी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा म्हणजे त्यास फुकट पाठवून देण्यात येईल. जर कोणाला आपल्य

मित्रमंडळीत व ओळखीच्यांत नेमाने वाटावयाचे मनात असेल तर त्यांनी आपणाला किती प्रती लागतील हे कळवावे. किंमत किंवा टपालखर्च पडणार नाही. पहिला अंक जून महिन्यात मिळेल." पहिला अंक जून १९०८ मध्ये प्रसिद्ध झाला. इ. स. १९३७ पर्यंत अर्विन यांनी हे मासिक चालविले. डिसेंबर १९३२ पासून स्टॉरी हे संपादक व प्रकाशक होते. त्या काळात शंकरराव कुलकर्णी सहसंपादक होते. या मासिकाच्या लेखकवर्गात सुमित्रराव मोडक, व. बा. आढाव, आदी लेखक होते. अर्विन यांनी जवळ जवळ तीस वर्षे हे मासिक चालविले व नंतर उतारवयामुळे १९३७ साली त्यांना ते बंद करावे लागले.

पुढे १९४९ साली ॲटकिन्सन यांनी हे मासिक पुन्हा सुरू केले आणि १९६३ च्या आक्टोबरपर्यंत चालविले, व नंतर बंद केले. या काळात मुलांचा विभाग त्यात सुरू झालेला होता. शिवाय बायबलमधील दोन अध्यायांचा अभ्यास करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे मागविण्यात येत. ती तपासून गुण देण्यात येत व अधिक गुण मिळविणारांस बक्षिसे वाटीत. १९४९ नंतर या मासिकाची वार्षिक वर्गणी एक रुपया होती. कोणत्याही मिशनचे पाठबळ नसताना ४४ वर्षे हे मासिक चालविले जात होते.

धर्मदीपिका

डेविड लुकास जोशी, यांनी जानेवारी १९१० पासून 'धर्मदीपिका' हे मासिक सुरू केले. याची मासिक वर्गणी एक रुपया दोन आणे असे. हे केडगाव येथे मुक्तिमिशन छापखान्यात छापून पहिले एक वर्षभर द्यायचे असे पंडिता रमाबाईंनी मान्य केले होते. या मासिकाच्या प्रत्येक अंकात २४ पाने व कधी कधी अधिक पाने असत. त्यात धर्मपर व आंग्ल संप्रदायी मंडळयांतील घडामोडी, स्फुट विचार, धर्मपर लेख, ख्रिस्तपुराणातील वेचे व मनोहर तर्खडकर, बाजी ल. साळवी, शंकरराव कुलकर्णी या कवींच्या कविता असत. इ. स. १९१३ मध्ये दिनकर आप्पाजी यार्दी हे या मासिकाचे सहसंपादक झाले. मार्च १९१६ पासून हे मासिक संपूर्णपणे इंग्रजीत निघू लागले. त्यांचे इंग्रजी नाव 'इंडियन ख्रिश्चन रिव्ह्यू' असे होते.

शाब्बाथ शाळा पत्रिका

बॉम्बे ट्रक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे मॅनेजिंग एडिटर यांनी जानेवारी १९१२ पासून 'शाब्बाथ शाळा पत्रिका' हे नियतकालिक सुरू केले. "एकंदरीत हे पुस्तक आकाराने व मजकुराने फार चांगले साधले आहे." असे ज्ञानोदयकार ११-१-१९१२ च्या आपल्या अंकात म्हणतात. मे १९१४ पर्यंत हे नियतकालिक चाललेले दिसते.

प्रेमदर्शिका

यंग वुईमेन्स खिश्चन असोसिएशनने इ. स. १९१२ च्या आजूबाजूला 'प्रेमदर्शिका' हे त्रैमासिक सुरू केलेले दिसते. पण ते लवकरच बंद पडलेले दिसते. हेच पुढे 'त्रैमासिक पत्रिका' या नवीन स्वरूपात मार्च १९१५ पासून पुन्हा सुरू झालेले दिसते. या नियतकालिकात – हे हिंदी स्त्रियांकरिता व मुलींकरिता आहे, यात वर्षारंभीचा संदेश, तरुण खिस्ती स्त्रियांचे चतुर्वार्षिक संमेलन, मराठी शाखेची वार्षिक सभा, निवांत वेळेकरिता दोन विचार, शास्त्रात वर्णिलेल्या एका स्त्रीच्या चरित्रावरून विचार, हिंगणे अनाथ बालिकाश्रमाची माहिती, उपयुक्त शिक्षण, स्त्री सौंदर्याचे अध्ययन, आदी विषय समाविष्ट केलेले आहेत. याची वार्षिक वर्गणी पाच आणे होती. फुटकळ अंकास सव्वा आणा पडे. संपादिका म्हणून मिसेस आर. एस. रोज ह्या काम पाहात होत्या. हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यामागील भूमिका सांगताना संपादक लिहितात, "खिस्ती स्त्रियांकरिता एकही मराठी पत्र नाही. म्हणून ही उणीव भरून काढली." हे त्रैमासिक १९२६ पर्यंत चालले व नंतर बंद पडले.

समाजादर्श

जानेवारी १९१३ पासून हिरालाल जीवनलाल राहाटोर यांनी 'समाजादर्श' हे मासिक सुरू केले. मासिकाचा उद्देश 'खिस्ती लोकांच्या निरनिराळ्या मतांस जागा मिळून लेखक वर्गास उत्तेजन प्राप्त व्हावे' असा होता. या मासिक पुस्तकात सामाजिक, नैतिक, व्यावहारिक आणि धार्मिक विषय असून शिवाय सुरस गोष्टी अथवा चालू कादंबरी प्रसिद्ध होईल अशी या मासिकाची जाहिरात केलेली दिसते. अहमदनगर येथील वडाळे येथून ते प्रसिद्ध होत असे. संपादकांना साहाय्यक म्हणून भाऊराव भागोबा चक्रनारायण व प्रभाकर प्रतापराव गोर्डे हे मदत करीत असत. १९१३ डिसेंबर अखेर या मासिकाचे बारा अंक निघाले आणि मासिक बंद पडले.

धर्मप्रचारक

"आपण आपली मने आपल्या राष्ट्राइतकी किंबहुना त्याहून अधिक विस्तृत करण्याचे प्रयत्नास लावले पाहिजे." या हेतूने शांतवनराव आठवले यांच्या संपादकत्वाखाली व मालकीखाली पहिला अंक सप्टेंबर १९१३ ला निघालेला दिसतो हे मासिक फुकट वाटण्यात येईल अशी जाहिरात केली होती. हे मासिक किती काळ चालले यासंबंधीची तपशीलवार माहिती मिळत नाही.

सुवृत्तप्रसार

अकोल्याहून मिस्. एल. बी. फुलर यांनी 'सुवृत्तप्रसार' या नावाचे मासिक १९१६ पासून प्रकाशित करण्यास सुरुवात केली होती. वर्षभर चालून हे मासिक बंद पडलेले दिसते.

तरुण शिपाई

हे मुक्तिफौजेचे मासिक इ. स. १९१९ साली सुरू झाले. प्रारंभी कर्नल अथाया हे या मासिकाचे संपादक होते. पण १९२७ पासून लेफ्टनंट कर्नल दयासागर हे संपादक झाले. या मासिकाचे स्वरूप धार्मिक होते, विशेषतः मुक्तिफौजेतील तरुण मंडळींकरिता ही धार्मिक माहिती असे. पुढे जानेवारी १९५० पासून हे नवीन स्वरूपात निघू लागले. यात कोअर कॅडेटचे धडे, ममत्व अभ्यास मार्गदर्शक, पलटणीच्या हालचाली वगैरे मुक्तिफौजविषयक मजकूर असतो. हे मासिक मुंबई-हून प्रसिद्ध होत असते. किरकोळ अंकाची किंमत सहा पैसे आहे.

मेथॉडिस्ट संदेश

सुदामराव विश्रामजी हिवाळे यांनी सुरू केले होते. हे मासिक पत्र मेथॉडिस्ट मिशनचे रे. एफ्. वुड व रे. एस. हिवाळे यांनी इ. स. १९२४ साली मुंबई येथे काढले. ' अशी माहिती रे. भा. कृ. उजगरे ' ख्रिस्ती वाङ्मयाच्या इतिहासात देतात, तर रे. हिवाळे ' माझी अल्पशी प्रभुसेवा ' या आत्मचरित्रात इ. स. १९२१ मध्ये मेथॉडिस्ट संदेश हे मासिक माझ्या संपादकत्वाखाली निघू लागले, हे मासिक सुमारे दोन वर्ष चालले व नंतर लोकांचे सहकार्य न मिळाल्यामुळे हे मासिक बंद पडले, अशी माहिती देतात.

मातृसंघ

मुंबई येथील माजगावमधील ऑल सेंट्रल होम या संस्थेच्या वतीने ' मातृसंघ ' या नावाचे एक त्रैमासिक १९२२ मध्ये सुरू झाले. पहिल्या संपादिका म्हणून मिसेस होटन यांनी काम पाहिले. विवाहाचे पावित्र्य कायम राखणे, मुलांना योग्य शिक्षण देणे व त्यासाठी मार्गदर्शन करणे, असे या त्रैमासिकाचे उद्देश होते. वेळोवेळी संपादकीय जबाबदारी बदलत गेलेली दिसते. मिस. ए. एट्स. सौ. सोनुबाई आढाव, सौ. मुक्ताबाई ओहोळ, सौ. प्रेमलाबाई डेव्हिड, सौ. सुलोचनाबाई तिडके, सौ. पद्मा पगार, सौ. जेसिकाबाई साळवी अशी नावे आढळतात. या अंकात मुंबई, नासिक नागपूर या आंग्लसंप्रदायी धर्मप्रांतातील मातृसंघाच्या शाखेचे कार्य व अहवाल, गोष्टी, स्त्रियांसाठी लेख, कविता, सुगरणीचे पान, वगैरे उपयुक्त विषय असत, १९६५ पासून हे नियतकालिक नासिक प्रांतातर्फे निघू लागले. दरवर्षी तीनच अंक निघत होते. नियतकालिकाची छपाई नासिकला नागरिक छापखान्यात केली जाई. प्रत्येक अंकाची किंमत १५ पैसे होती. १९६८ च्या सुमारास हे नियतकालिक बंद पडले.

ख्रिस्ती सेवक

" आपल्या समाजाचे वैशिष्ट्य त्याचे अंतिम ध्येय व झपाट्यान वाढत

असलेल्या कार्यांचे स्वरूपाची माहिती देण्यासाठी " 'नॅशनल मिशनरी सोसायटी'चे 'ख्रिस्ती सेवक' हे त्रैमासिक १९२३ पासून सुरू झाले. याचे संपादक शांतवन लक्ष्मण साळवी हे अमेरिकन मिशनचे अहमदनगर येथील गृहस्थ होते तर व्यवस्थापक दिनकर राघोबा आठवले हे अहमदनगर येथील एस. पी. जी. मिशनचे होते. यात पुरुष, स्त्रिया व विद्यार्थी यांना मनोरंजनार्थ कूट प्रश्न विचारण्यात आले होते व बिनचूक उत्तरांना बक्षिसे देण्यात येणार असे जाहीर केले होते. हे त्रैमासिक फक्त एक वर्षाच्या कालावधीपुरते चालले.

ख्रिस्ती

वरील 'ख्रिस्ती सेवक' त्रैमासिकाच्या काळात 'ख्रिस्ती' नावाचे एक मासिक जुलै १९२३ पासून निघत असल्याचे दिसते. ते मुंबईच्या लक्ष्मीनारायण छापखान्यात छापले जाई व प्रकाशक म्हणून रे. जे. स्मिथ, सेक्रेटरी, बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी हे काम पहात असे असे कळते.

नवा शिक्षक

अहमदनगर येथे १९२३ साली एक शैक्षणिक परिषद भरविण्यात आली होती. त्यावेळी शिक्षकांना नवीन शिक्षणतंत्राची माहिती व अनेक शैक्षणिक समस्या समजावून देण्यासाठी 'नवा शिक्षक' नावाचे नियतकालिक सुरू करण्याची कल्पना निघाली. प्रारंभी पंजाबातील मोगा येथील डॉ. डब्ल्यू जे. मॅकी हे 'व्हिलेज टीचर्स जर्नल' हे इंग्रजी नियतकालिक चालवीत असत. त्यातील मजकुराचे भाषांतर 'नवा शिक्षक' ने छापावे अशी कल्पना होती. पण नंतर लक्षात आले. महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रश्न त्यामुळे सुटणार नाहीत. त्यामुळे 'नवा शिक्षक' मधून नवीन स्वतंत्र पुस्तकेच प्रसिद्ध करावीत.

या नियतकालिकातून खेडेगावच्या शाळा, मिशन शाळातील धार्मिक शिक्षण, खेडेगावाकरिता छोटी प्रहसने, कथाकथन, ग्रामपुनर्रचना वगैरे विविध विषयांवर पुस्तिका तयार करण्यात आल्या. याचे पहिले संपादक विल्बर स्टान डेमिंग आणि सहायक मिस जिन क्लॅथम व शांतवन लक्ष्मण साळवी हे होते. या मासिकाचा पहिला अंक जुलै १९२४ मधे प्रसिद्ध झाला. याची वार्षिक वर्गणी रुपये १-८-० होती. फुटकळ अंकास तीन आणे. भाषांतराचे काम दिनकर शंकर सावरकर व त्यानंतर मिस अॅना अॅग्नेस अॅबट यांच्याकडे होते. १९३१-३२ साठी रे. पफर व मिसेस पफर हे होते व पुढे होरेस. के. राईट व मिसेस राईट हे संपादक होते. १९४० पर्यंत हे मासिक चाललेले दिसते.

मेसेज

पुण्यामध्ये भास्करराव भाऊराव चक्रनारायण यांनी १९२५ पासून 'मेसेज

हे इंग्रजी व मराठी पाक्षिक चालविलेले दिसते. राजकीय, सामाजिक व धार्मिक विषय असलेले हे साप्ताहिक दर महिन्याच्या ५ व २० तारखेस प्रसिद्ध होत असे. यात शाह्रू दगडोबा उजगरे, यांचे लेख व कविता, रामचंद्र प्रल्हाद देशपांडे, जॉन वासुदेव धुपकर वगैरेंचे लेख असत. सुमारे चार वर्षे चालून हे मासिक बंद पडलेले दिसते.

अंमलदार

आक्टोबर १९२५ पासून मुक्तिफौजेच्या अंमलदारासाठी 'अंमलदार' हे खास मासिक सुरू करण्यात आले. सुरुवातीला ले. कर्नल दयासागर हे संपादक होते. १९३९ पासून ते त्रैमासिक स्वरूपात निघत आहे.

मुक्तिफौजेच्या अधिकारी वर्गाकरिता ते प्रसिद्ध होत असल्याने एकप्रकारे ते खासगी प्रकाशनच होय. त्यात अंमलदाराकरिता उपयुक्त लेख मुक्तिफौजेचे तत्त्वविषयक लेखक, ग्रंथपरिचय व इतर घडामोडी असे विषय असत.

प्राग्ज्योति

श्रीमती लीलावती गायकवाड यांनी १९२५ च्या सुमारास 'प्राग्ज्योति' हे नियतकालिक सुरू केले. रोमन कॅथॉलिक समाजात स्वतंत्र नियतकालिक काढण्याचा कदाचित पहिला प्रयत्न असावा, असे भास्करराव जाधव म्हणतात. रे. भा. कृ. उजगरे यांनी या नियतकालिकाचा उल्लेख केलेला आढळतो. या नियतकालिकासंबंधी फारशी माहिती उपलब्ध होत नाही.

हिंदी ख्रिस्ती पंचांग

इ. स. १९२६ पासून लाजरस पाडळे, यांनी दे. ना. टिळक यांच्या संपादकत्वाखाली 'हिंदी ख्रिस्ती पंचांग' नावाचे स्वतंत्र मासिक सुरू केले होते. सर्व तऱ्हेच्या हालअपेष्टा सोसून १९२९ अखेर म्हणजे चार वर्षे मासिक चालवून आर्थिक अडचणीमुळे त्यांना ते मासिक बंद करावे लागले.

सुवृत्तप्रसार

जानेवारी १९२९ पासून चर्च ॲण्ड मिशनरी अलायन्सने जबाबदारी स्वीकारल्यावर 'सुवृत्तप्रसार' हे मासिक अकोला येथून सुरू झाले. याचे पहिले संपादक रे एन. के. मेश्रामकर हे होते. सुमंत धों. रामटेके यांचे काही काळ साहाय्य मिळत होते.

यात लघुकथा, सामाजिक व धार्मिक लेख, संडे स्कूलचे पाठ, चरित्रे, सामाजिक हालचाली, कविता वगैरे विविध मजकूर येत असे. हे सात मिशनचे मुखपत्र म्हणून निघत असे. १९७३ साली हे मासिक बंद पडले.

नाशिक धर्मप्रांत

आंग्ल संप्रदायी नाशिक धर्मप्रांताचे मुखपत्र म्हणून 'नाशिक धर्मप्रांत' या नावाचे मासिक ऑक्टोबर १९३० पासून निघू लागले. हे मासिक नाशिक डायोसेसन कमिटीतर्फे दिनकर राघोबा आठवले यांच्या संपादकत्वाखाली भुसावळ येथे प्रसिद्ध होत असे. प्रत्येक अंकात १२ पृष्ठे असत. वार्षिक वर्गणी रु. १-४-०. इ. स. १९४२ पर्यंत हे नियतकालिक चालू होते.

ख्रिस्ती लोकशिक्षणमाला

डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्या संपादकत्वाखाली मुंबईहून १९३२ साली 'ख्रिस्ती लोकशिक्षणमाला' हे मासिक प्रसिद्ध होऊ लागले. "ख्रिस्ती लोकशिक्षण, ख्रिस्ती सभाजाची सेवा करण्याकरिता जन्मास आले आहे" असे संपादकांनी संपादकीयमध्ये म्हटलेले आहे. हे मासिक तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई येथे छापले जात असे. या मालेच्या प्रत्येक अंकात एका विशिष्ट विषयावर निबंध, काव्य, भाष्य वगैरे दिलेले असे. त्यानुसार बायबलमधील ग्रंथावर भाष्ये, त्यांचा इतिहास, यहूदी पंथ, ख्रिस्त पुराणातील वेचे, काही उद्योगधंदे इत्यादी विविध विषयांवरच्या आठदहा पुस्तिका प्रसिद्ध झाल्या. प्रत्येक पुष्पाची म्हणजे अंकाची किंमत एक आणा असे. हे मासिक १९३२ पासून १९३७ पर्यंत चालले व नंतर बंद पडले.

शोध आणि बोध

वसईहून जानेवारी १९३५ मध्ये 'शोध आणि बोध' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. हे कॅथॉलिक पंथीय लोकांसाठी होते. १९३७ पर्यंत हे मासिक होते. त्यानंतर १९३८ पासून त्रैमासिक करण्यात आले.

ख्रिस्ती नागरिक

बालबोधमेव्याबरोबर दर दोन महिन्यांनी पुरवणी स्वरूपात [निघणारे 'ख्रिस्ती नागरिक' हे मासिक १५ सप्टेंबर १९३७ पासून स्वतंत्र मासिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. संपादक दे. ना. टिळक होते. पुढे १९३८ पासून टिळकांच्या नागरिक प्रेसमध्ये ते छापले जाऊ लागले. सुरुवातीला हे मासिक संपूर्णतया मराठी असे. पण पुढे काही मजकूर इंग्रजी येऊ लागला. यात स्फुट विचार, सामाजिक घडामोडी व लेख, शास्त्र, पाठवचन, संघाकरिता पाठाचे स्पष्टीकरण, कविता वगैरे येत असत. ऑक्टोबर १९४१ पासून नारायण देवदत्त टिळक यांचे संपादक झाले. कालांतराने हेही मासिक बंद पडले.

ख्रिस्ती निरीक्षक

मुंबईहून अनंत विश्राम मकासरे यांनी 'ख्रिस्ती निरीक्षक' हे मासिक सुरू

केले. याची वार्षिक वर्गणी बारा आणे असून किरकोळ अंकास एक आणा पडे. याचा पहिला अंक मे १९३८ मध्ये बाहेर पडला. १९४० पासून ते 'निरीक्षक' या नावाने प्रसिद्ध होऊ लागले. मे १९४१ पासून बी. ए. पाटेकर व १९४९ साली शा. द. उजगरे हे या मासिकाचे सहसंपादक झाले. यात सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा विविध विषयांवर लेख येत. याशिवाय बातमीपत्र, कविता व साहित्य-विषयक मजकूर असे. स्वतंत्र बाण्याचे हे मासिक १९५० पर्यंत नियमितपणे चालले आणि नंतर बंद झाले.

आमचे पत्र

याचा पहिला अंक मे १९३८ मध्ये बाहेर पडला. याचे प्रकाशक एस्. एन्. काळे हे होते. खेडयापाडयातील ख्रिस्ती जनतेच्या आध्यात्मिक उन्नतीकरिता लेख, बातमीपत्रे वगैरे मजकूर यात असे. याची वार्षिक वर्गणी सहा आणे होती.

समाजसेवक

ऑगस्ट १९३८ पासून 'समाजसेवक' हे स्वतंत्र मासिक पुणे येथून प्रसिद्ध होऊ लागले. संपादक डॅनियल शांतवन सूर्यवंशी हे होते. हिंदी ख्रिस्ती समाजाच्या सर्वांगीण उन्नतीस हे वाहिलेले होते. इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांत हे मासिक निघत असे. प्रारंभी वार्षिक वर्गणी आठ आणे होती. नंतर रु. २-८-० झाली. या मासिकाचे ब्रीदवाक्य 'जनसेवा ही ईश्वरसेवा' असे होती.

पुण्याच्या इंडियन ख्रिश्चन असोसिएशनचे हे मुखपत्र होते. यात राजकीय, सामाजिक, धार्मिक लेख, घडामोडी, बातम्या, कविता आणि इतर मनोरंजक मजकूर असे. ऑक्टोबर १९४८ पासून हे मासिक संपूर्णपणे इंग्रजीतून निघू लागले. ऑगस्ट १९४९ नंतर बंद पडले.

सुवार्ता

कोल्हापूर चर्च कौन्सिलचे मुखपत्र म्हणून सुवार्ता नावाचे मासिक जानेवारी १९३९ पासून कोल्हापूरहून सुरू झाले. विश्वास आनंद सत्राळकर हे संपादक होते. या मासिकाविषयी अधिक माहिती मिळाली नाही.

दलित-दीपक

ख्रिस्तसेवासंघ औंध, पुणे, येतील म. का. गोरे यांच्या संपादकत्वाखाली ८ एप्रिल १९३९ पासून एक स्वतंत्र मासिक सुरू झाले. ख्रिस्तसेवासंघाचे प्राचार्य शंकरराव बी. वैरागर हे या मासिकाचे संचालक तर केशवराव भास्कर हे प्रकाशक होते. या मासिकाच्या उद्देशासंबंधी संपादक म्हणतात, "लोकसेवेच्या आकांक्षेतून जन्मास आलेल्या 'दलित-दीपक'चा हा प्रथमांक प्रिय वाचकांच्या सेवेस सादर

व समर्पण करीत असता, नकळत मनास प्रस्थापित होत असलेल्या आनंदाची जाणीव हृदयास स्पष्टपणे होत असली, तरी शब्दांनी ती व्यक्त करणे कठीण आहे. आजतागायत अनेक समाजसेवक निरीक्षणपूर्वक समाजाला खरे नागरिक बनविण्याची शिकस्त करीत असता दीपकाच्या वाट्याला काही विशेष कार्यक्षेत्र येणार आहे असे नाही. या दृष्टीने दीपकाला आपल्या स्वल्पाधिकाराची जाणीव सदैव राहील. पण प्रिय वाचकांना जाता जाता असेही विचारण्याची धृष्टता करावीशी वाटते की, विशाल गगनी, साऱ्या भुवनाला उजळून टाकणारा चंद्रमा, गुरु, मंगळादी तेजःपुंज स्वस्थ पदार्थ, तो-पहाटेचा शुक्रतारा व आपल्या स्वरूपाने जगाला अजब मोहिनी घालणाऱ्या त्या तारका यांचे वैशिष्टय अनेक दृष्टींनी बहुमोल ठरत असले तरी जगाला आपला प्रकाश देण्याच्या पवित्र आकांक्षेने आपल्या मिणमिणत्या प्रकाशानेच जगाची सेवा करणाऱ्या एखाद्या दुर्बल तारकेचे महत्त्व कुण्या दृष्टीने कमी असू शकेल का ? निदान दीनदुबळ्यांच्या जीवनावर प्रकाश पाडण्याचे कार्य 'दलित-दीपक' नेटाने करील.

दीपक पेटविण्याचे काम आम्ही केले. आता तो तेवत ठेवून जीवनाच्या कोनाकोपऱ्यातून त्याचा प्रकाश पोचविण्याची जबाबदारी आम्ही प्रिय वाचकांवरच टाकीत आहोत....वाचकांचे सहाय्य जमेस धरून 'दलितदीपक' सर्व दृष्टींनी आदर्श ठेवण्याची शक्यतो खबरदारी घेण्यात येईल. लघुकथा, सामाजिक, राजकीय वा धार्मिक विषयांवरील दणदणीत व सशास्त्र लेख, विनोदी लेख, इ. साधनांनी दीपकाची घटना जरी व्यक्त होणार असली तरी सत्य व न्याय यांचे रक्षण करण्याची दीपक शक्य ती काळजी बाळगील. होतकरू लेखक, लेखिका, कवी, कवयित्री यांस विशेष उत्तेजन देण्यात येईल."

या मासिकाची वार्षिक वर्गणी बारा आणे होती. किरकोळ अंकाला एक आणा पडे. हे स्वतंत्र पुरोगामी विचारांचे मासिक फार काळ चालले नाही.

ख्रिस्ती आवेश

सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांच्या संपादकत्वाखाली मुंबईहून 'तरुणांचा ख्रिस्ती आवेश' हे मासिक ऑक्टोबर १९४१ पासून सुरू झाले. ख्रिस्ती तरुणांकरिता मार्गदर्शनपर लेख यात प्रसिद्ध होत असत. वार्षिक वर्गणी एक रुपया होती. इ. स. १९४२ पासून "तरुणांचा ख्रिस्ती आवेश आणि बालबोधमेवा" या नावाने हे मासिक प्रसिद्ध होऊ लागले. मे १९४४ ला हे बंद पडले. पर्यायाने बालबोधमेवा हे मुलांचे मासिकही मे १९४४ ला बंद पडले.

आवेश

सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांनी मे १९४७ साली 'आवेश' या नावाने जुन्या मासिकाचे पुनरुज्जीवन केले. या मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये आठ आणे

होती. डिसेंबर १९४७ पासून तीन रुपये करण्यात आली. या मासिकाला कोणत्याही संस्थेचा अगर व्यक्तीचा पाठिंबा नव्हता. खुद्द संपादक गावोगावी कीर्तने करून द्रव्य जमवीत होते. जुलै १९४७ मध्ये साप्ताहिकात रूपांतर करण्याची एक योजना होती पण ती प्रत्यक्षात आली नाही. या मासिकात ख्रिस्ती संस्था, व्यक्तींचे परिचय, कविता, लघुकथा, महिला व मुलांसाठी गोष्टी, सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह, चुटके व अन्य विनोदी लिखाण वगैरे विविध मजकूर असे. त्यामुळे ते बरेच लोकप्रिय झाले होते. १९४८ अखेर केव्हा तरी ते बंद पडले.

अंकुश

मुंबईचे द. ह. चक्रे यांच्या संपादकाखाली १८ जुलै १९४२ पासून ' अंकुश ' हे मासिक निघू लागले. या मासिकाचे प्रकाशक पी. डी. मर्चंट हे होते. यात सामाजिक, धार्मिक तसेच राजकीय लेख, समाजातील घडामोडीवर विचार, लघुकथा व ' चौफेर नजर ' असे सदर होते. या मासिकाचे ब्रीदवाक्य—

कुणासाठी चाबुक पुरा होतो ।
पराणीने बैल हा मार्गि येतो ।
परी हत्ती मस्तीस जेवि येई ।
तेंवि अंकुश माहूत करी घेई ।।

असे होते. याची वार्षिक वर्गणी एक रुपया व किरकोळ अंकास एक आणा असे. १९४७–४८ पर्यंत अंकुश चालला आणि नंतर बंद पडला.

१५ सप्टेंबर १९५३ पासून तो साप्ताहिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागला. आर. पी. लोंढे हे याचे व्यवस्थापक होते. हे साप्ताहिक नेमके केव्हा बंद पडले हे सांगता येत नाही.

रणशिंग

फ्रेंड डब्ल्यू शिलॅडर यांनी नॉर्थ वेरार चर्च कौन्सिल या संस्थेचे मुखपत्र म्हणून १९४४ पासून ' रणशिंग ' नावाचे नियतकालिक सुरू केले. नंतर वीरसेन व्ही. हिवराळे हे या नियतकालिकांचे संपादक झाले. सुरुवातीला हे छोटेसे वार्तापत्रक चर्च ॲण्ड मिशनरी अलायन्सच्या मंडळयातील घडामोडी एकमेकांना कळाव्यात या उद्देशाने काढले होते. जे. आर. रायबोर्डे या नियतकालिकांचे संपादक झाल्यावर ते मुद्रित स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. हे अकोला येथे छापून अंजनगाव (वऱ्हाड) येथे प्रसिद्ध होत असे.

' इकडे तिकडे चोहिकडे ' या सदरात संस्थेच्या प्रांतातील घडामोडी, बातम्या वगैरे येत. याशिवाय काही धार्मिक लेख, धर्मपर कविता वगैरे मजकूर असे. हे मासिक १९५० अखेर बंद पडले असावे.

दीपक

मुंबईहून सदानंद अप्पाजी पाठक यांनी १ जून १९४७ पासून 'दीपक' नावाचे मासिक सुरू केले. बायबलचे शिक्षण देण्यासाठी हे मासिक सुरू झालेले दिसते. बायबल शिक्षणाबरोबर प्रार्थना, प्रवचने, गाणी, गोष्टी, शंकानिरसन वगैरे उपयुक्त मजकूर या मासिकात येत असे. वार्षिक वर्गणी तीन रुपये, किरकोळ अंकास सहा आणे पडत. १९४९ च्या फेब्रुवारी महिन्यात हे बंद पडले.

आमचा बालमित्र

लोणंद येथील आयरिन डोव्हर यांनी खास मुलांकरिता 'आमचा बालमित्र' हे मासिक सप्टेंबर १९४७ पासून सुरू केले. त्यानंतर सुमंत धोंडो रामटेके हे या मासिकाचे संपादक झाले. व एच. जी. हावर्ड हे सहसंपादक झाले. त्यांच्या काळात ते मासिक कोल्हापूर जिल्ह्यातील कोडोली गावाहून निघत असे. तिसऱ्या वर्षापासून नासिकच्या नागरिक प्रेसमध्ये छापले जाऊ लागले. यात ताईचे पत्र, संपादकीय हितगुज, बोधकथा, कविता वगैरे मजकूर असे. 'माझ्या कोकरास चारा' असे या मासिकाचे ब्रीदवाक्य होते. प्रारंभी वार्षिक वर्गणी एक रुपया होती. नंतर ती तीन रुपये झाली. एकतर आर्थिक अडचणींमुळे व संपादकांच्या आकस्मिक मृत्यूमुळे हे मासिक १९५१ मध्ये बंद पडले.

ख्रिस्ती हितचिंतक

डिसेंबर १९४७ पासून वऱ्हाडातील अकोल्याहून मधुकर एरन दामले यांच्या संपादकत्वाखाली हे मासिक निघू लागले. १ मार्च १९४२ ते मे १९४५ या काळात ते हस्तलिखित स्वरूपात निघत होते. त्यानंतर ते केडगावच्या मुक्ति मिशन प्रेसमध्ये छापले जाऊ लागले पण अल्पावधीतच ते बंद पडले.

डिसेंबर १९४७ पासून ते नवीन स्वरूपात निघू लागले. यात धर्मपर लेख, सामाजिक हालचाली, कविता, स्त्रियांकरिता व मुलांकरिता खास लेख असत. इ. स. १९६५ च्या सुमारास ते कायम बंद पडले.

प्रगति

जानेवारी १९४८ पासून सुमंत दयानंद करंदीकर यांनी मुंबईहून 'प्रगति' नावाचे एक स्वतंत्र मासिक सुरू झाले. करंदीकरांना प्रथम साप्ताहिक काढायचे होते पण काही अडचणींमुळे मासिक काढावे लागले. 'ख्रिस्ती विचारवंत वाचक ज्या पत्राची इतके दिवस वाट पाहत होते, जी उणीव त्यांना बरेच दिवस भासत होती, ती या मासिकाद्वारे भरून निघणार आहे.' असा या मासिकाबाबत निर्वाळा संपादकांनी दिलेला आहे. या मासिकाचे ब्रीदवाक्य–

हे भुवन उजळण्या जरी ठाकले सज्ज दिप्तिचे सिंधू।
ही प्रगति पथावर शिंपील एकच परि तेजाचा बिंदू ॥

असे होते. १९५० पासून कमलाकर करमरकर ‘प्रगति’चे सहसंपादक झाले. १९५१ मध्ये मासिक बंद पडले.

ख्रिस्ती जीवनप्रकाश

ख्रिश्चन अँड मिशनरी अलायन्स, अकोला, या संस्थेच्या वतीने सप्टेंबर १९४८ पासून खास साक्षरता प्रसारास वाहिलेले ‘ख्रिस्तीजीवन प्रकाश’ हे मासिक सुरू झाले. संपादक वीरसेन हिवराळे आणि सहसंपादक एल. आर. कारनर होते.

“आजकाल इकडे तिकडे चोहीकडे शेकडो खेडेगांवास ख्रिस्ती लोक आहेत. ...ह्या लोकांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांची आत्मिक वाढ झाली पाहिजे. त्यांना आत्मिक भूक लागली आहे. पण त्यांना खावयास कसे द्यावे ? खेडेगावातील लोकांसाठी ख्रिस्ती जीवनप्रकाश मिळावा आणि त्या प्रकाशात चालून ख्रिस्ती जीवनात वाढत वाढत जावे हा या मासिकाचा मुख्य हेतू आहे.” असे संपादकांनी म्हटले आहे. हे मासिक काही दिवस अकोला, नंतर मुंबई व नासिक येथे छापले जाई. पुढे १९५९ ते १९६३ या काळात पुण्याहून निघत होते. नीळकांत जाधव हे १९६२ याकाळी संपादक होते. त्यांनी बरीच मेहनत घेऊन ‘जीवनप्रकाश’ला नवीन स्वरूप दिले होते. मग १९६४ पासून पुन्हा अकोला येथे निघू लागले. १९६३ ते ६५ पर्यंत ते ख्रिश्चन ॲण्ड मिशनरी अलायन्स संस्थेचे होते. इ. स. १९६५ च्या नोव्हेंबर पासून त्याची मालकी जीवनीवचन साहित्यालय यांच्याकडे आली व ते पुणे येथून प्रसिद्ध होऊ लागले.

सप्टेंबर १९७० मध्ये पुन्हा अकोला येथे गेले. डिसेंबर १९७३ पर्यंत वीरसेन हिवराळे संपादक होते. जानेवारी १९७४ पासून या मासिकाचे नामांतर व रूपांतर झाले व त्यानंतर मुंबईहून दिलीप फणसळकर, जी. एल. कारनर व हिवराळे यांच्या नेतृत्वाखाली सध्या ते प्रकाशित होत आहे.

शांतिदूत

वसईच्या रमेदी चर्चचे रे. जे. एस. मिरांडा यांनी ‘शांतिदूत’ नावाचे पाक्षिक २५ डिसेंबर १९४८ रोजी सुरू केले. वसई परिसरात एक धर्मगुरू, साहित्यिक, पत्रकार, नाटककार व समाजसुधारक या विविध अंगांनी तळमळीने कार्य करणारांत रे. फादर मिरांडा यांचा उल्लेख करावा लागेल. ते माणिकपूर (वसई) मध्ये १९३३ साली आले. त्यावेळी त्यांनी मराठी भाषेच्या अभ्यासाला सुरुवात केली आणि अल्पावधीत मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविले. इ. स. १९३४

साली त्यांनी ' सद्गीतांजेला ' नावाचे धार्मिक गीतांचे पुस्तक प्रकाशित केले. इ. स. १९३७ मध्ये सत्यप्रसारक संघाची स्थापना केली व दरवर्षी किमान चार पुस्तके प्रसिद्ध करण्याचा संकल्प सोडला. त्यातूनच सामान्य प्रार्थना व मिस्साच्या प्रार्थना यासाठी सोप्या व चटकदार भाषेत ' लहान सांगाती ' पुस्तक प्रसिद्ध झाले. रिट्रीट-साठी ' सन्मार्गधारण ' पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले. ' आल्तार मुलगा ' लिहून चर्चमधील प्रार्थनाविधीकडे तरुणांना आकर्षित केले. किशोर वयातील मुलांमुलीं-साठी ' भूकमल ' लिहून प्रसिद्ध केले. ' सर्वधर्म सारखेच काय ' हे पुस्तक सर्वधर्मांचा अभ्यास करून ख्रिस्तावरील श्रद्धा दृढ करण्यासाठी लिहिले गेले. त्याशिवाय ' चौऱ्यांशी लक्ष योनी ', ' पन्नास प्रश्न ', ' क्रूसाची वाट ', ' पवित्र मरिया ', ' उपासकाल ' इत्यादीसंबंधी त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची जंत्री पाहिली तरी ती पस्तीसच्या पुढे जाईल.

रे. फादर मिरांडा केवळ पुस्तके प्रसिद्ध करून थांबले नाहीत. इ. स. १९३५ साली त्यांनी ' शोध आणि बोध ' मासिक सुरू केले. त्यानंतर १९४९ साली ' शांतिदूत ' पाक्षिक चालविण्याचा प्रयत्न केला. त्या पाक्षिकाचे ते प्रमुख लेखक, प्रकाशक, संपादक, प्रूफरीडर, व्यवस्थापक आणि वितरक स्वतःच होते. त्यात काव्य, धार्मिक लेख व ख्रिस्तपुराणाचे लिप्यंतर आदी मार्गांनी धर्मजागृती करण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे सामाजिक विषयांवर लेख लिहून वसईच्या परिसरात इतस्ततः पसरलेल्या कॅथॉलिक समाजास एकत्र येण्याची प्रेरणा देणारा पहिला कॅथॉलिक पत्रकार म्हणून रे. फादर मिरांडा यांचे कौतुक करावे लागेल. ' शांतिदूता 'चे कार्य पाहून प्रभावित झालेल्या कार्यकर्त्यांनी ' सुवार्ता ' नियतकालिक सुरू केले. ' सुवार्ता ' आजही आपले कार्य करीत आहे. त्यात लिहिणारे लेखक रे. मिरांडा यांच्या तालमीत तयार झालेले आहेत याची इथे नोंद घेणे आवश्यक आहे.

लोकशिक्षण करण्यासाठी रे. फादर मिरांडा यांनी नाट्यकलेचाही उपयोग करून घेतला. ' रोबीचे लग्न ' हे त्यांचे पहिले नाटक, माणिकपूरला इ. स. १९३८ साली झाले. ग्रांथिक मराठी भाषेतील वसईतील ख्रिस्ती नटांनी केलेले हे पहिलेच नाटक होय. त्यानंतर त्यांनी ' निर्दोष फादर ', ' उधळा पुत्र ', ' भक्तीची शक्ती ', ' सेंट मेरी माग्दालेना ' अशी धार्मिक नाटके लिहिली, तर ' नवे जुने ', ' दोन वैद्य ', ' चिकूशेट ', अशी सामाजिक नाटके लिहिली. त्यांनी एकूण एकवीस नाटके लिहिल्याचा उल्लेख सापडतो. त्यांनी आपण लिहिलेल्या नाटकांचे प्रयोग सादर केले आणि चर्चच्या आवारात रंगमंच उभा करून त्यांतून येणाऱ्या उत्पन्नाचा ओघ चर्च किंवा शाळा, इमारत निधी यांसारख्या विधायक कार्याकडे लावण्याची प्रथा पाडली. गुप्त संघटनेची सभासद होऊन समाजकार्य करणाऱ्या एका युवतीच्या जीवनावर आधारलेली एक कादंबरीही रे. फादर मिरांडा यांनी लिहिली होती. पण ती प्रकाशित झाली नाही अशी एक नोंद मिळते.

'शांतिदूत'चा धावता परिचय या सदरात ते लिहितात, "मुंबई धर्मप्रांताचे देशी महागुरु व प्रधानगुरु (बिशप व विकर जनरल) यांनी लोकांच्या सर्वांगीण सुधारणेकरिता नवीन मराठी पत्र काढण्याचे ठरविले आहे." हे पाक्षिक दर महिन्याच्या १० व २५ तारखेस प्रसिद्ध होई. किरकोळ अंकाची किंमत २ आणे. मॅनेजर एस. वाझ हे होते. यात 'सामाजिक व धार्मिक नाटके, उत्तम कविता, ख्रिस्तपुराणातील वेचक व रसिक परिच्छेद, संभाषणे, इतिहास, बातम्या, साधुसंतांची चरित्रे, महात्माजींची शिकवण, उद्योगधंद्याची माहिती, कायद्यांची जाणीव, धर्मशास्त्र, राजकारण, समाजसुधारणा, शिक्षण, कला, विनोद वगैरे विविध अभ्यासेतर तसेच जनन, मरण, लग्न, सण, सभा, यांच्या जाहिराती व माहितीवजा फोटो व चित्रे असली तरच लोकांचा हर्ष व ज्ञान वाढेल' अशी इच्छा व्यक्त करण्यात आली होती. २५ डिसेंबर १९४९ चा शेवटचा अंक काढून 'शांतिदूत' पाक्षिक बंद करण्यात आले.

सत्यवाणी

संपादक बाबूराव कोरे यांनी पुण्याहून १० जुलै १९४९ रोजी स्वतंत्र मासिक सुरू केले. वार्षिक वर्गणी तीन रुपये व किरकोळ अंकास पाच आणे पडत. पद्माबाई चक्रनारायण या मासिकाच्या महिला विभागाच्या प्रमुख होत्या.

"पुरोगामी विचारांचा निर्भीड पुरस्कार करून समाज जागृतीसाठी झटणारे अभिजात वाङ्मयीन ख्रिस्ती समाजाचे एकमेव मराठी मासिक" असे या मासिकाचे वर्णन करण्यात आले होते. ख्रिस्तविजय सांस्कृतिक कलापथकाचे हे मासिक होते. यात परमेश्वराच्या सान्निध्यात दावीदांच्या गोफणीतील फटकारे, शलमोनाच्या देवडीवरून, नानांची पत्रे वगैरे सदरे व कविता आणि बातम्या असत.

१९५० पासून व्ही. ए. कोरे हे संपादक व दानियल डोंगरे हे सहसंपादक झाले. नोव्हेंबर १९५७ पर्यंतचे अंक उपलब्ध आहेत. पुढे ते बंद झाले.

सूर्यकिरण

सूर्यकिरण हे पाक्षिक पुरोगामी विचारांचे आणि ख्रिस्ती समाजाचे सर्वांगीण उन्नतीस वाहिलेले पाक्षिक होते. हे १९४९ साली सुरू झाले. पुण्याहून प्रभाकर नथोजी यांच्या संपादकत्वाखाली ते निघत असे. वि. दा. गायकवाड सहसंपादक होते. जरी वार्षिक वर्गणी १-४-० अशी होती तरी गरीब ख्रिस्ती नागरिकास पत्ता कळविल्यास मोफत मिळत असे.

विक्रम

जे जे आपणासी ठावे । ते ते सकळां शिकवावे ।
शहाणे करूनि सोडावे । सकळ जन ॥

हे पुण्याहून निघणाऱ्या 'विक्रम' या साप्ताहिकाचे ब्रीदवाक्य होते. दर रविवारी हे प्रसिद्ध होत असे. याचा पहिला अंक २१-११-१९४९ रोजी प्रथम प्रसिद्ध झाला. आठवड्याचे भविष्य, फिल्मी दुनियेतील फेरफटका, कविता, बातम्या

वगैरे प्रसिद्ध होत. संपादक एस्. आर्. पवार व व्ही. ए. कोरे होते. पुण्यात वार्षिक वर्गणी दीड रुपया व बाहेरगावी दोन रुपये पाच आणे होती. हे नेमके किती काळ चालले ते सांगता येत नाही.

दीपज्योति

समाजसेवेस्तव द्वादश विषयांवर प्रकाश फेकणारे मासिक दीपज्योति मार्च १९५९ च्या दरम्यान निघाले. ऑक्टोबर १९६० चा वर्ष दुसरे, अंक २० मला पहायला मिळाला. याचे संपादक व प्रकाशक रत्नाकर आ. साळवी हे होते. "ख्रिस्ती समाज हा अत्यंत लहान समाज आहे. महाराष्ट्रात तर तो अतिशय अल्पसंख्यांक आहे. नवीन भारतात ख्रिस्ती कार्य, ख्रिस्ती संस्था चालविण्याची जबाबदारी पूर्णपणे आपल्यावर पडलेली आहे. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक, राजकीय असे कितीतरी प्रश्न महाराष्ट्र ख्रिस्ती समाज या नात्याने आपल्याला सोडवावयाचे आहेत. या प्रश्नांवर चर्चा करण्याकरिता, त्याविषयी नीट विचार करून ते समाजापुढे मांडणे, आपल्या रोजच्या जीवनात येणारे पेचप्रसंग घेऊन आपल्या लेखणीने त्याचे मार्मिक शब्दचित्र समाजापुढे मांडून त्यावर विचार करायला लावणे, धार्मिक प्रश्नांचा ऊहापोह करून त्यावर विचारविनिमय करणे हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. असल्या प्रश्नांवर प्रकाश पाडणे हे दीपज्योति आपले ध्येय समजते" असे संपादक सांगतात. हे मासिक मुंबईहून निघते. वार्षिक वर्गणी तीन रुपये व किरकोळ अंकास ३० पैसे. दरमहा एक तारखेस प्रसिद्ध होते.

उषा (The Dawn)

इ. स. १९५२ च्या ऑगस्ट महिन्यात डॉ. भा. पां. हिवाळे यांनी उषा (The Dawn) या नावाचे इंग्रजी–मराठी साप्ताहिक सुरू केले. दोनही विभागांचे संपादन डॉ. हिवाळे स्वतः करीत असत. पहिल्या वर्षी चार पृष्ठांचे असलेले हे साप्ताहिक इ. स. १९५३ च्या ऑगस्ट महिन्यापासून आठ पृष्ठांचे निघू लागले. त्यातील इंग्रजी भाषा पाश्चिमात्य लोकांसाठी असे तर मराठी मजकूर मराठी भाषिकांसाठी असे. त्याच काळात ते 'उषा प्रकाशन' व 'उषा मुद्रणालय' चालवीत होते. उषा साप्ताहिकात तत्कालीन राजकारण, समाजकारण, साहित्यिक विचार यासंबंधी संपादकीय लेख डॉ. हिवाळे यांनी लिहिले आहे.

२७ ऑगस्ट १९५४ वर्ष तिसरे अंक चवथा या अंकात 'पेरावे ते कापावे', 'प्रातःस्मरण', 'आमची मेदकची यात्रा', 'ख्रिस्ती शिक्षक-शिक्षिकांचे संमेलनवृत्तांत' आलेला आहे.

अशाप्रकारे ख्रिस्ती मराठी नियतकालिकांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराबरोबरच भाषिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्यापरीने भरीव कामगिरी करण्याचे प्रयत्न केलेले दिसतात.

प्रकरण ८ वे

ख्रिस्ती मराठी ग्रंथकारांनी लिहिलेले भाषिक वाङ्मय

ख्रिस्तपुराण मराठी भाषेत लिहून ख्रिस्ती मराठी धार्मिक वाङ्मयाची सुरुवात करण्याचा मान जसा फादर स्टीफन्सला मिळतो, तसाच पहिले व्याकरण Arte Da Lingua Canarim, 1640 कानारी (कोंकणी) भाषेचे व्याकरण लिहिण्याचा मान त्यालाच मिळतो. देशी भाषांचे हे जुन्यात जुने आधुनिक व्याकरण आहे. हे पोर्तुगीज भाषेतून लिहिलेले आहे. तत्कालीन स्थानिक उच्चवर्णीय ब्राह्मण लोक भाषा कशी बोलत होते हे या व्याकरणावरून लक्षात येते. या व्याकरणग्रंथाची निर्मिती युरोपिअन ख्रिस्ती धर्मगुरूंना देशी लोकांमध्ये धर्मप्रसार करण्यास उपयोगी पडावे म्हणून केली गेली आहे हे उघड आहे.

प्रारंभी हे व्याकरण हस्तलिखित स्वरूपात प्रचारात असावे. पण त्यानंतर दियोगु रिबैरू व आणखी चार धर्मगुरुंनी त्यात बऱ्याच सुधारणा व बदल केलेले दिसतात. आज उपलब्ध असलेले हे व्याकरण अनेक संस्कार स्वीकारून या स्वरूपात प्रथम इ. स. १६४० त रायतूर येथे प्रसिद्ध झाले. या व्याकरणाची माहिती अ. का. प्रियोळकर यांच्या "स्टीफन्सकृत मराठी बोलींचे व्याकरण" या लेखात मिळते. दुसरी आवृत्ती गोवा सरकारचे सेक्रेटरी कुञ्ज रिव्हार यांनी सन १८५७ मध्ये छापून प्रसिद्ध केली.

कानारी शब्दकोश

सासष्टी (गोवा) मधील अनेक मिशनऱ्यांनी संयुक्तपणे तयार केलेल्य 'कानारी'च्या कोंकणीच्या शब्दकोशातही (हस्तलिखित) दियोगु रिबैरूने इ. स. १६२६ साली महत्त्वाची भर घालून वाढविला. गोमंतकी बोलीतील निरनिराळ्या वैशिष्ट्यपूर्ण लकबींची भरपूर उदाहरणे देऊन रिबैरूने हा शब्दकोश बनविलेला आहे. या कोशाची एकंदर २६९ पाने (फोलिओज) असून त्यात सुरुवातीला गोमंतकी बोलीतील (कानारी) शब्द व नंतर त्याचा पोर्तुगीजमध्ये अर्थ दिलेला आहे.

कोंकणीचे व्याकरण – (Grammatica Da Lingua Conconi)

हे व्याकरण इटालिअन मिशनरी पाद्री फ्रान्सिस शाव्हियेर यान कानारी

(कोंकणी) मध्ये लिहिले. इ. स. १८५९ साली कुञ्ज रिव्हार याने ते संपादून प्रसिद्ध केले.* ह्या व्याकरणकाराने बाळबोध लिपी संबंधाने लिहून ती "बालबंद" किंवा नागर या लिपीपासून काही अक्षरांनी निराळी आहे व मोडी ही मात्र खरी मराठी आहे असे म्हटले आहे. ऋ, ॠ व लृ, ॡ हे चार स्वर सोडून बारा स्वर व छत्तीस व्यंजने त्याने मानली आहेत. तसेच जोडाक्षरे व अंक या संबंधीही विस्तृत विवेचन केलेले आहे. या व्याकरणातील उल्लेखावरून हा व्याकरणकार "सुकेरी" (कारवार) येथील राहणारा होता असे दिसते.

पोर्तुगीज कानारी कोश

कोंकणी-पोर्तुगीज शब्दकोशाप्रमाणे हा पोर्तुगीज – कानारी कोश आहे, हा केव्हा लिहिला माहीत नाही. याची प्रत गोवा सरकारच्या सरकारी ग्रंथालयात आहे.

मराठीचे व्याकरण (Grammatica Marastta, 1805)

हे व्याकरणाचे पुस्तक प्रथम इ. स. १७७८ साली रोममध्ये मुद्रित झाले. याची दुसरी आवृत्ती सन १८०५ मध्ये लीस्बन येथे सरकारी छापखान्यात छापण्यात आली. निजामशहा व आदिलशहा यांच्या राज्यामध्ये जास्त प्रचलित असलेल्या मराठीचे हे व्याकरण. त्या भागात धर्मप्रचार करणाऱ्या मिशनऱ्यांच्या उपयोगाकरिता असल्याचा मुखपृष्ठावर निर्देश करण्यात आला आहेच. हे व्याकरण संभाजीच्या काळात लिहिले गेले असावे असे आत दिलेल्या शब्दांवरून वाटते. या व्याकरणाची एकूण पन्नास पृष्ठे आहेत. या पुस्तकांची रोममध्ये मुद्रित झालेली इ. स. १७७८ची पहिल्या आवृत्तीची मायक्रोफिल्म मराठी संशोधन मंडळात आहे.

उत्तरेकडील कोंकणी बोलीचे व्याकरण

(Gammatica Da lingua Concani, no dialecto do Norte, 1858.)

फादर स्टीफन्सच्या व्याकरणाच्या अनुकरणातून हे व्याकरण तयार केलेले दिसते. इ. स. १८५८ मध्ये गोवा सरकारचे सेक्रेटरी मि. कुञ्ज रिव्हार यांनी ते प्रथम संपादन केले. उत्तर कोंकणीचे व्याकरण असे जे नाव त्याला देण्यात आले आहे, ते मूळ लेखकाने दिलेले नाव नसून संपादकाने दिलेले नाव असावे.

उत्तरेकडील स्थानिक भाषेचा कोश

(Vocabulario Da Lingua Canarim Do Norte concertodo and acresentado em, 1664.)

---

* हा ग्रंथ स्टीफन्सच्या व्याकरणाच्या नंतरचा आहे असे संपादकाने लिहिले परंतु त्याचा किंवा त्याच्या कर्त्याचा काळ नमूद केलेला नाही.

यु. म. अ. से. पृ. २५

उत्तरेकडील एतद्देशीय भाषेचा हा कोश आहे. ओरिएंटल स्टडीजच्या मर्सिडेन हस्तलिखिताच्या संग्रहात आहे. हा कोश अद्याप छापला गेला नाही.

विल्यम कॅरीने बायबलचे मराठी व कोकणी भाषेत भाषांतर करण्याचा केलेला प्रयत्न व त्याचे गुणदोष आपण यापूर्वी पाहिले आहेत. कलकत्ता येथे सुरू झालेल्या फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये इ. स. १८०४ मध्ये मराठी भाषेचा वर्ग सुरू करण्यात आला व कॅरीला त्या विषयाचा प्राध्यापक नेमण्यात आले. त्याशिवाय तो त्या कॉलेजात संस्कृत व बंगाली भाषाही शिकवीत होता. त्या कॉलेजमध्ये असताना त्याने काही पुस्तके लिहिली व आपल्या देखरेखीखाली काही पुस्तके लिहून घेतली. त्याच्या साहाय्याला मराठी पंडित कोण होता यासंबंधीची तपशीलवार माहिती मिळत नाही. मराठीतील पहिले मुद्रित व्याकरण त्याने इ. स. १८०५ मध्ये प्रसिद्ध केले.

A Grammar of the Mahratta language to which are added dialogues on familiar subjects, 1805

हे व्याकरणाचे पुस्तक कॅरीने इ. स. १८०५ मध्ये लिहिले. पुस्तकावर कॅरीचे नाव असल्यामुळे त्यानेच हे पुस्तक लिहिले अशी समजूत आहे. परंतु पुस्तकाच्या प्रस्तावनेत पंडित विद्यानाथ याने आपणास मदत केल्याचे तो नमूद करतो यावरून या दोघांनी मिळून हे व्याकरण तयार केलेले दिसते. असे पुस्तक लिहिण्याचे कारणही त्याने दिलेले आहे. कॉलेजात मराठी भाषा हा अभ्यासाचा विषय झाल्यामुळे व्याकरण ग्रंथाची गरज निर्माण झाली. तसे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली गेली. त्यामुळे अशा प्रकारचा ग्रंथ सिद्ध करण्याचा आपण प्रयत्न केला आहे असे तो सांगतो. हे पुस्तक देवनागरी लिपीत छापलेले आहे. देवनागरीत आपण हे पुस्तक का छापले आहे या संबंधी त्याचे म्हणणे असे की, साधारणपणे मराठी भाषिक लोक लिहिण्यासाठी देवनागरी लिपी वापरतात आणि खरी अडचण म्हणजे बंगालमध्ये त्यावेळेपर्यंत मोडी टाईप तयार होत नव्हता. सर्वसामान्यांपर्यंत भिडण्याची मिशनऱ्यांची वृत्ती लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांनी देवनागरी 'बालबोध' लिपी बरोबर मोडी लिपीशीही प्रारंभी जवळीक साधण्याचा प्रयत्न केलेला होता. याच व्याकरणाची दुसरी आवृत्ती इ. स. १८०८ मध्ये प्रसिद्ध झाली. ती मोडीत छापलेली आहे. याची प्रत महाराष्ट्र ग्रंथालय पुणे इथे आहे. इ. स. १८२५ मध्ये या पुस्तकाची तिसरी आवृत्ती निघालेली दिसते.

A Dictionary of the Mahratta Language; 1810.

मराठी भाषेच्या या कोशासाठी मोडी लिपीचा उपयोग केलेला आहे. या कोशाच्या प्रस्तावनेत कोशाच्या निर्मितीचा हेतू सांगताना कॅरी लिहितो—

" To those Europeans who reside in India, the study of its different languages is confessedly of great importance, as

tending to facilitate the interest of commerce and to pramote that free interecourse so necessary to the existance of mutual confidence between themselves and the natives. It is also highly important as a medium through which alone Europeans can become acquainted with manners and customs of the different Indian Nations, and with a variety of circumstances known to great body of the people and in which they are immediately interested."

या कॅरीच्या कोशात सुमारे ९–१० हजार शब्द असून कोशाची एकूण पृष्ठ-संख्या ६५२ आहे. या कोशात मराठी शब्द कोणते होते व त्याचा अर्थ कसा दिला गेला होता, त्याची कल्पना येण्यासाठी कोशाच्या पृष्ठ दहावरील काही भाग इथ योग्य ठरेल. हा कोश मोडीत छापलेला आहे.

अतुतपर, a, unskilled, inexpert
अतलस्पर्श, a fathomless, botomless,
अति, ad, very exceedingly,
अतीक्रम, s, Transgretion, an exceeding, a passing over, a leaping over appointed boundaries
अतिक्रमण s, a Trangressing, an exceeding,

सर्व आधुनिक भारतीय भाषा संस्कृतपासून निघालेल्या आहेत अशी कॅरीची धारणा होती. तो संस्कृत शब्दच फार देतो. याला त्याची ही धारणा कारणीभूत होती याची नोंद घ्यावी लागते. श्रीरामपूरसारख्या दूरवरच्या प्रदेशात राहून कॅरी आपला कोश रचतो आहे. प्रत्यक्ष लोकांच्या बोलीभाषेशी त्याचा संबंध आला असता तर त्याच्या कोशाचे स्वरूप निराळे दिसले असते. आधुनिक मराठीमध्ये पहिला कोश तयार करून, छापून देण्याचे काम कॅरी करीत आहे. हे मराठी भाषिकाला विसरून चालणारे नाही. त्याच्यासमोर अशा प्रकारची रचना, कुठल्याही स्वरूपात आधी नव्हती. त्या पार्श्वभूमीवर त्याच्या कोशाचे मूल्यमापन करणे औचित्यपूर्ण ठरेल.

हे भाषिक वाङ्मय निर्माण करण्यासाठी भावना, रीतिरिवाज आणि चाली-रीती या बाबतीत एतद्देशीयांशी तो एकरूप झाला होता म्हणून त्याला हे कार्य करणे शक्य झाले. पुढे मराठी वाङ्मय कोश वा व्याकरणे लिहिणारांसाठी त्याने केलेली सुरुवात महत्त्वाची मानावी लागते.

राज्यकर्ते मराठी भाषा शिकायला इतकेसे खुश नव्हते. राज्यकर्त्यांना भाषा शिकविण्यासाठी ईस्ट इंडीया कंपनीने 'हेलिबेरी कॉलेज' सुरू केले. पण या अधिकारी लोकांना भाषा विषयात विशेष प्रावीण्य मिळविता आले नाही. याचे

प्रमुख कारण हे लोक स्थानिक लोकांत फारसे मिसळत नसत. कारण जेते असल्याचा त्यांना अहंकार होता. भाषा शिकायची फारशी उत्सुकताही दाखवीत नसत. ख्रिस्ती मिशनऱ्यांची वृत्ती या सरकारी लोकांपेक्षा वेगळी होती. पूर्वी गोव्यातील पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी गोव्यातील स्थानिक भाषेच्या बाबतीत जे धोरण स्वीकारले तशीच सरकारी अधिकाऱ्यांची वृत्ती होती. विशेषतः हेलिबेरी कॉलेजातून जे लोक येथे येत, ते भारतीय लोकांकडे काहीशा पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहात. भारत सांस्कृतिक, वाङ्मयीन दृष्ट्या मागासलेला आहे असा त्यांचा ठाम विचार होता. मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन यालाही सरकारी अधिकाऱ्यांच्या अशा प्रकारच्या वागणुकीची माहिती होती. प्रारंभी तरी सरकारी अधिकाऱ्यांकडून मराठी भाषा वा वाङ्मय विषयक फारशी कामगिरी झाल्याचे दिसत नाही. पण एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रजांनी जे प्रांत जिंकले होते, त्या प्रांतांची व्यवस्था करून, इंग्रज अधिकाऱ्यांना देशी भाषांचे ज्ञान देण्यासाठी ठिकठिकाणी कॉलेजे उघडण्यात आली. या दृष्टीने पुढील उताऱ्यात व्यक्त झालेले धोरण लक्षात घेणे योग्य ठरेल.

" At the dawn of the present century the Government of India supported by the court of Directors of the East-India Company warmly espoured the necesity of their officers cultivating the equintance with Eastern Literature and the knowlege of the local language. "

इ. स. १८१८ त पेशव्याचे राज्य संपुष्टात आले व त्या प्रदेशाची व्यवस्था बघण्याची जबाबदारी एल्फिन्स्टन्वर, या प्रदेशाचा गव्हर्नर म्हणून आली. या बाबत एल्फिन्स्टनचे धोरण पुढील शब्दांत सांगता येईल. 'युरोपिअन अधिकाऱ्यांनी या देशातील लोकाचे आचारविचार समजावून घ्यावेत, तसे केल्याने महाराष्ट्रातील लोकांना त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण होईल. सरकारी (युरोपिअन) अधिकारी मराठी जाणणारे असले तर राज्यकारभार करणे सोयिस्कर ठरेल.'

" सनदी कामगारांस मराठी, उर्दू, गुजराती, कानडी, तुळवी किंवा कोणतीही मुलकी भाषा शिकल्याशिवाय कलेक्टरचे किंवा मोठ्या हुद्द्याचे काम मिळत नाही आणि राजनीतीही हीच आहे की, ज्या लोकांवर अंमल करावा त्यांची भाषा त्या कामगारास आली पाहिजे. म्हणजे त्याकडून बहुधा नीट व्यवस्था रहात असे. " माडगांवकर यांनी " मुंबई वर्णन " या पुस्तकात तत्कालीन सरकारी यंत्रणेसंबंधी असे लिहिले आहे.

पण युरोपिअन लोकांसाठी 'बॉम्बे कॉलेज' स्थापन करण्याची योजना यशस्वी झाली नाही. मराठीचा अभ्यास राज्यकर्त्यांना मराठीच्या साहित्यासाठी नको होता तर व्यावहारिक पातळीवर सरकारी व राज्यकारभाराचे काम चालविण्यासाठी, मराठी भाषेचे ज्ञान त्यांना हवे होते आणि तसे व्यवहारापुरते काम

चालविण्यापुरत्या मराठी भाषेची परीक्षा अनेक युरोपिअन पासही झालेले होते.

युरोपातून आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना भाषिक शिक्षण देताना खालील बाबींकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाई– (१) देशी भाषेत लिहिलेल्या अपरिचित उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करता येणे. काव्याचा अभ्यास अवश्य नसणे, उलट गद्य धडे, सरकारी अर्ज, पत्रे सरकारी कायदेकानूंची काही कलमे एवढ्यांचेच भाषांतर अपेक्षित असे. (२) इंग्रजीतील उताऱ्याचे व संभाषणाचे मराठीत भाषांतर करता येणे. (३) या अभ्यासक्रमात व्याकरणाचाही भाग होता. व्याकरण विषयक नियमांचे ज्ञान अभ्यासकाला असले पाहिजे असा आग्रह होता. (४) फारशी, देवनागरी, मोडी, गुजराती या लिपींचा परिचय विद्यार्थ्याला असला पाहिजे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आणि शतक अखेर भाषांतराची पुस्तके आणि व्याकरणविषयक पुस्तकांची निर्मिती का झाली असेल त्याचे उत्तर हे धोरण लक्षात घेतल्यास येण्यासारखे आहे.

युरोपिअन लोक मराठी भाषेचा अभ्यास करण्यासाठी जी मराठी पुस्तके वापरीत असत, त्यांची माहिती पुढीलप्रमाणे मिळते.

(१) लिपीधारा– मोडी लिपीतील क्रमिक पुस्तक सिव्हिल सर्व्हिसच्या उमेदवारांसाठी संपादित केले होते. संपादक F. P. Baker हे होते. पृष्ठसंख्या ५७, लंडन, १८६० ?

(२) संख्या (Numerals)

(३) लहान वाक्यांत मुलांना उपदेश (Advise to children in short sentences.)

(४) पंचोपाख्यान

(५) विदूरनीति

(६) सिंहासन बत्तिशी– ही पुस्तके मराठी भाषा अभ्यासासाठी उपयोगात आणली जात असावीत (युमअसे पृ. ११३). या पुस्तकांचे नेमके लेखक वा संपादकांची माहिती उपलब्ध होत नाही. तसेच सिव्हिल एक्झॅमिनेशन कमिटीला जी मराठी पुस्तके लागत त्या संबंधीची यादी पुढीलप्रमाणे,

(१) विदूरनीति (२) सिंहासन बत्तिशी (३) पंचोपाख्यान (४) केनेडी याने सुधारलेले व्याकरण (:).

Guide to the obligatory Test in Marathi–Part II; Captain C. Burrard–1849.

(:) हे व्याकरण महंमद मखबा याने लिहिलेले असून केनेडीने सुधारले होते. हे व्याकरण सन १८२४ मध्ये प्रसिद्ध झाले होते. युरोपिअन अधिकाऱ्यांना शिकविण्यासाठी हे व्याकरण वापरत असावेत असे दिसते. (युमअसे पृ. ११४)

इ. स. १८४९ साली कॅप्टन सी. बरार्ड यांनी हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. या पुस्तकाची पृष्ठसंख्या ५९ असून, पुस्तक लष्करी अधिकाऱ्यांसाठी लिहिले असावे असे दिसते. यात एका पानावर लष्करी अधिकाऱ्यांस लिहावयाचे अर्जांचे नमुने देवनागरी लिपीत व त्या समोरच्या पानावर रोमन लिपीत दिले आहेत. पुढे काही नमुने मोडी लिपीत व देवनागरी लिपीत दिले आहेत.

Hints on Examinations in the Vernacular Languages of Western India-Arthur St. John Richardson-1853.

युरोपिअन अधिकाऱ्यांना देशी भाषेचा (मराठीचा) अभ्यास करण्यास सोयीचे व्हावे म्हणून जॉन रिचर्डसन् याने लिहिलेले हे पुस्तक इ. स. १८५३ मध्ये प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्याने काही उतारे संपादित केलेले आहेत.

सरकारी पातळीवर मराठी भाषा शिकण्याचे काम युरोपिअन अधिकाऱ्यांकडून फारसे समाधानकारक झाले नाही. पण काही युरोपिअन अधिकाऱ्यांनी मनापासून मराठी भाषेचा अभ्यास केला आणि मराठी भाषा व वाङ्मयाची सेवा करण्याची संधी घेतली. अर्थात एल्फिन्स्टनच्या सरकारी धोरणाचे हे काहीसे फलित होते हे लक्षात घ्यावे लागते.

कोशाच्याबाबत कॅरीने केलेला प्रयत्न इतके करूनही त्यावेळच्या मुंबई इलाख्याबाहेर केलेला प्रयत्न होता ही गोष्ट खरी आहे. पण अशा कोशसदृश वाङ्मयाचे काम त्याआधी रॉबर्ट ड्रमंड याचे होते. त्याने Illustrations of the grammatical parts of Guzerattee, Mahratta and English languages

हे पुस्तक इ. स. १८०८ मध्ये कुरिअर छापखान्यात छापून प्रसिद्ध केले. हे पुस्तक मुख्यत्वे करून व्याकरणाचेच आहे. यात मराठीतील ४५० शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. डॉ. ड्रमंड या रचनेला (Glossary) असे म्हणतो. मराठी भाषेतील कोश म्हणून या रचनेला फार मोठे स्थान नाही, हे खरे असले तरी युरोपिअन ख्रिस्ती लेखकांनी मराठी कोश वाङ्मयाची किंवा भाषिक अभ्यासाची जी वाटचाल केली त्यातील एक प्रयत्न म्हणून नोंद घेणे आवश्यक आहे.

डॉ. ड्रमंड नंतर मराठी कोश निर्मितीचा एक मोठा व चांगला प्रयत्न कॅप्टन गिडिऑन हचिन्सन याने केलेला दिसतो. त्याची कोशाची कल्पना डॉ. जॉन्सनच्या इंग्रजी शब्दकोशानुसार आखलेली होती. मराठी भाषेत विज्ञान विषयक जास्त शब्द नसल्यामुळे ते कोशात समाविष्ट करू नयेत अशी त्याची भूमिका होती. इंग्रजी मराठी कोशाप्रमाणे मराठी–इंग्रजीही एक कोश करावा. या शब्दकोशात पन्नास हजार शब्द, म्हणी व वाक्संप्रदाय यांचा समावेश करण्याचा त्याचा हेतू होता. मुंबई सरकारकडे त्याने मदत मागितली होती. काही अंशाने त्याची

मागणी सरकारने मान्यही केली होती. पण हा कोश प्रत्यक्षात प्रकाशित झालेल दिसत नाही.

अशाच प्रकारे शब्दकोश करण्याचा आणखी एक प्रयत्न झालेला दिसतो. प्रत्यक्षात हा कोश प्रसिद्ध झाला नाही. या कोशाबाबत प्रयत्न करणाराचे नाव कॅप्टन डेव्हिड केपन होय. एलिफन्स्टनचे मराठी भाषा शिकविण्याविषयीचे धोरणसूत्र यापूर्वीच सांगितले आहे. असे असूनही युरोपिअन सरकारी अधिकारी वा नोकरांना मराठी शिकणे अवघड जात होते. हे अधिकारी मराठीचा अभ्यास पूर्ण न करता मध्येच सोडून देत. मराठीच्या अभ्यासातील ही गळती भरून काढण्यासाठी केपनला हा कोश तयार करावयाचा होता. त्याला मराठी भाषेचा विपुल शब्दसंख्या असलेला व अभ्यासकांना वारंवार उपयोगी पडणारा असा कोश तयार करायाचा होता. त्याने मुंबई सरकारकडे त्यासाठी आर्थिक सहाय्य व नोकरीत सवलती मागितल्या होत्या. पण त्याला सरकारकडून काहीच सवलती मिळाल्या नाहीत असे दिसते. आणि कोश प्रसिद्ध झाला नाही. त्याने ग्रँट डफच्या इंग्रजी बखरीचे केलेले मराठी भाषांतर प्रसिद्ध आहे. त्याची माहिती अन्यत्र येईल.

वरील दोघांनी मराठी कोश रचनेसाठी आराखडे आखले, प्रयत्न केले. काही अंशानी कोशाचे काम कच्च्या स्वरूपात केले पण ते प्रकाशित झाले नाहीत. या पार्श्वभूमीवर व्हॅन्स केनेडी यांचे कोशकार्य ठळकपणे उठून दिसते आणि महत्त्वाचे ठरते. (१८२४)

शब्दकोशाला जोडलेल्या प्रस्तावनेवरून कोशनिर्मिती संबंधी त्याची भूमिका लक्षात येते. ती अशी की—

" या अवाढव्य देशात सर्व ठिकाणी भाषा सारखीच असून शुद्धलेखन पद्धती व उच्चार यामुळे काही भागांत फरक पडला आहे. परंतु यामुळे निरनिराळ्या पोट-भाषा निर्माण न होता, भाषा बोलण्याच्या तीन पद्धती निर्माण झाल्या आहेत. त्या म्हणजे प्राकृत भाषा, विद्वान एतद्देशीय लोक बोलत असलेली भाषा व शेतकरी वर्गात प्रचलित असलेली भाषा. " या भाषा कुठे उपयोगात आणल्या जातात त्या संबंधी सांगताना लिहितो—

"The first of pracrit is employed in books only, and abounds in Sancrit words. The second is the language spoken by all well educated natives, and particularly by such as are employed in any situation Civil or Military under Government. It admits less frequently of Sanscrit words but adopts freely such as belong to Arabic, Persian or Hindi. The third style is peculiar to the cultivators and lower classes. " (युमअसे पृ. १४९)

थोडक्यात महाराष्ट्रातील सुशिक्षित लोक जी भाषा बोलतात व जिचा उपयोग

सरकारच्या मुलकी व लष्करी खात्यांत होतो त्या भाषेचा कोश व्हॅन्स केनेडी याला करायचा होता. त्यासाठी एखादा इंग्रजी शब्दकोश समोर ठेवून त्याचे मराठी भाषांतर त्याला करावयाचे नव्हते, तर त्यासाठी त्याने अमरकोशाचे मराठी भाषांतर करून घेतले. मराठी क्रियापदांची यादी तयार करून घेतली. कित्येक मराठी ग्रंथ जमविले. निरनिराळी कागदपत्रे आणि अर्ज गोळा केले. अशाप्रकारे कोशासाठी लागणारा शब्दसंग्रह त्याने गोळा केला.

केनेडीच्या शब्दकोशातील शब्द संख्या ८००० इतकी अल्प आहे. केनेडीला त्याची जाणीव आहे. फक्त सुशिक्षित लोकांची व सरकारी कामकाजासाठी वापरलेली भाषा आपल्या कोशासाठी त्याने स्वीकारली, त्यामुळे असे झाले आहे. मराठी भाषेत फार शब्द नाहीत. अशी मात्र त्याची गैरसमजूत झाली होती. तसेच मराठी भाषेत सामासिक शब्द नाहीत, शब्दसिद्धी नाही असे त्याला ठामपणे वाटत होते. मराठी भाषेतील शब्दांच्या निरनिराळ्या अर्थच्छटा जाणून घेणे त्याला अवघड झाले म्हणून असे झाले की मराठी भाषेचा अभ्यास दैनंदिन चालचलावू व्यवहारिक पातळीवर भागविण्याची सोय त्याला पाहायची होती हे कसे ठरवायचे ? इंग्रजीच्या किंवा युरोपिअनांच्या संपर्कामुळे मराठी भाषेचा अभ्यास केवळ Languge म्हणून एक व्यावहारिक साधन म्हणून ती वापरायला सुरुवात कशी झाली हे यावरून लक्षात येईल. मराठी भाषा वाङ्मय (Literature) म्हणून मागे पडायची ही सुरुवात आहे. परकीयांना मराठी भाषेच्या वाङ्मयात रस नव्हता. विशेषतः सरकारी नोकरांना. त्यामानाने मिशनरी कार्यकर्ते काही अंशाने तरी मराठी भाषेतील वाङ्मयाच्या अंगाने विचार व प्रयत्न करताना दिसतात. केनेडीला आपल्या कोशातील दोषांची पूर्ण कल्पना होती पण मराठी भाषेच्या शब्दसंग्रहाला मर्यादित ठरवून आपला व्यावहारिक हेतूभाग साधण्यासाठी त्याने हा कोश तयार केला हे एक व्यावहारिक सत्य आहे.

हा कोश देवनागरी लिपीत कुरियर छापखान्यात छापलेला आहे.

व्हॅन्स केनेडीने कोशाव्यतिरिक्त लिहिलेल्या ग्रंथांचा विचार त्या त्या विषयाच्या प्रकरणात केलेला आहे.

मोल्सवर्थ

मराठी भाषेमध्ये आपल्या परिश्रमाने कोश निर्माण करून कोश वाङ्मयाचा आदर्श आणि एक महत्त्वाचा पायंडा ज्या कोशाने घातला तो ' मराठी इंग्रजी कोश' मोल्सवर्थने १९३१ साली प्रसिद्ध केला.

A Dictionary–Marathee and English, 1831 मराठी–इंग्लिश शब्दकोश.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कोश निर्मितीमागील आपला हेतू सांगत असताना

म्हणतो– It was undertaken not from a thirst after honour or emolument but from humble desire of promoting the propogation of the glorious Gospel; and it was continued by the energy of this desire, through sickness and weakness and against troubles, and difficulties grievous discouragements.'

मोल्सवर्थची ही पहिली आवृत्ती अतिशय दुर्मिळ आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्ये ही आवृत्ती आहे.

A Dictonary Marathi & English by J. T. Molesworth & George & Thomas Candy (Asstt..) Second Edition Revised & Enlarged by Molesworth. Printed at Bombay Education Society Press for the Govt.

मराठी इंग्लिश शब्दकोश दुसरी आवृत्ती १८५७ पृष्ठे ३० + ९२० + १ ह्या कोशावर एक इंग्रजी अवतरण छापलेले आहे ते असे –

" Language is the armoury of human mind and it contains at once the trophies of its past, and the weapons of its future conquest. "

शब्दकोशाच्या या दुसऱ्या आवृत्तीतील " Notes on the Constitutent elements, the diffusion and the application of the Marathi language. " हा ९ पृष्ठांचा डॉ. जॉन विल्सनचा निबंध उल्लेखनीय आहे.

या कोशाची प्रमुख वैशिष्ट्ये–

पहिल्या आवृत्तीत सर्व प्रकारचे शब्द समाविष्ट केलेले नाहीत. तर दुसऱ्या आवृत्तीत वीस हजार शब्दसंख्या वाढली आहे. कारण सर्व प्रकारचे शब्द समाविष्ट केलेले आहेत.

(१) प्राकृत मराठी साहित्यातील कोणती अवतरणे वगैरे दिलेली नाहीत. एकतर चालू भाषा सर्वांना कळते. सर्वांना ही अवतरणे परिचयाची असतात, आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे कोशाची पृष्ठसंख्या भरमसाट वाढते.

(२) प्रचलित मराठी भाषेत मूळ संस्कृतातले फारसे रूढ न झालेले व सध्याच्या मराठीत त्यांची फारशी उदाहरणे न सापडणारे संस्कृत शब्द वगळले आहेत. काही Theological, religious, spiritual (secular truth practical wisdom) असे शब्द रूढ नसले तरी काही कारणासाठी स्वीकारले आहेत.

(३) कित्येक महत्त्वाचे संस्कृत शब्द, ज्यांच्या संस्कृत रूपाबद्दल शंका नाही व जे संस्कृत–इंग्लीश कोशामध्ये घेतले गेले नाहीत ते घेतले. उदा. gods, devils saints, legendary, heroes, contries, mountains, rivers इत्यादी.

इत्यादी. संस्कृत नावे असलेले शब्द कोशात समाविष्ट करावेत अशी सूचना असून, अशा शब्दांपैकी मराठीत जे शब्द रुळले होते त्यांचाच।शब्दकोशात समावेश केलेला दिसतो.

'अ' असलेले अभावसूचक (negative) असे संस्कृतमधील सर्व शब्द देणे अशक्य म्हणून कोशात दिलेले नाहीत. तसेच धनित्व, प्रभुता, पोरपणा यासारखे त्व, ता (पणा, पण लागून सिद्ध झालेले शब्द शब्दकोशात समाविष्ट केले नाहीत. पण मूळ शब्द मात्र दिलेले आहेत. कर्तृत्व, दातृत्व, भ्रातृत्व, पितृत्व, वक्तृत्व 'असे' त्व युक्त शब्द घेतले आहेत. कारण मूळ कर्तृ, दातृ चे कर्ता, दाता अशी रूपे मराठीत वापरतात.

आणभाक, वेणीफणी, केरकचरा, मीठभाकर, रांडपोर, दानधर्म, ख्याली-खुशाली, असे शब्द भाषेस जोरकसपणा, परिणामकारक आशयाभिव्यक्ती करणारे असल्यामुळे स्वतंत्ररीत्या नमूद केलेले आहेत.

दगडबिगड, भाकरीबिकरी, धोंडागिंडा या शब्दांतून पुनरावृत्ती असूनही जोरकसपणा व आविष्कारातील परिणामकारकता नाही म्हणून कोशात घेतले नाहीत.

सर्वसाधारणपणे युरोपियनांच्या लक्षात न येऊ शकणारे शब्दही कोशांत अंतर्भूत केलेले आहेत.

ज्यांच्या उत्पत्ती व घडण सहज समजण्यासारखी आहे असे सामाजिक शब्द घेतलेले नाहीत.

प्रचलीत मराठीत रूढ असलेले संस्कृत, हिंदुस्थानी, अरेबिक शब्द कोशात समाविष्ट केलेले आहेत.

वापरातील मराठी शब्दांच्या सूक्ष्म छटा त्यास इंग्रजी शब्द अर्थ स्पष्टी-करणातील नमकेपणा व अचूकपणा यावरून मराठी व इंग्रजी शब्दसंपत्तीचे मोल्सवर्थचे ज्ञान लक्षात येते.

अगदीच नवे शब्द फारसे घेतलेले नाहीत.

मराठी शब्दांच्या अर्थातील प्राथमिक व लाक्षणिक अर्थाची सुव्यवस्थित मांडणी केलेली आहे.

मराठी म्हणींची योग्य व उपयुक्त उदाहरणे दिली आहेत. उदाहरणासाठी अभिजात लेखकांच्या वाङ्मयातील वचने उद्धृत केलेली आहेत.

विशेष म्हणजे शिकाऊ विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त अशी व्युत्पत्तीविषयक व व्याकरणविषयक माहिती व चिन्हे दिलेली आहेत.

जोपर्यंत महाराष्ट्रात मराठी व इंग्रजी भाषेचा अभ्यास चालू राहील तोपर्यंत मोल्सवर्थच्या या कामगिरीचा कोणाला विसर पडेल असे ।वाटत नाही.

एल्फिन्स्टनच्या मराठी भाषाविषयक धोरणांमुळे युरोपिअन व आणि महाराष्ट्रीय लोकांत मराठी भाषाभ्यासाची प्रेरणा मिळाली. विशेषतः युरोपिअन

अधिकाऱ्यांना मराठीचा अभ्यास करणे राजकीय व शासकीयदृष्टया आवश्यक होते आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांना धार्मिक जवळीक साधण्यासाठी मराठीचा अभ्यास करणे अपरिहार्य होते. यातून मोल्सवर्थ व त्या आधीचे कोश कसे आकार घेत गेले याचा आढावा आपण आधी घेतला आहेच.

इंग्लिश-मराठी शब्दकोश–A Dictionary–English and Marathi.

थॉमस कॅन्डी

मुंबई सरकार, अमेरिकन मिशन प्रेस, मुद्रक–टी ग्रहाम, १८४७ पृ. २ + १९ + २ + ८३८.

या कोशाची आखणी आणि सुरुवात मोल्सवर्थने केली होती. तो आजारी पडल्यामुळे शब्दकोशाचे काम अपुरे राहिले. म्हणून मुंबई सरकारने अपुरे राहिलेले काम पुरे करण्यास कँडीस सांगितले. कँडीने या कामास सुरुवात केल्यावर हे काम पुरे करण्यास त्याला सात वर्षांचा काळ लोटला व इ. स. १८४७ ला कोश प्रसिद्ध झाला. या कोशाची मांडणी करीत असताना कँडीने मराठी भाषा शिकणारे युरोपिअन लोक, इंग्रजी शिकणारे भारतीय लोक डोळ्यांसमोर ठेवलेले होते. आपल्या कोशात इंग्रजी भाषेतील फळे, फुले, पशू-पक्षी किंवा ज्या इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द नाहीत असे शब्द समाविष्ट केलेले नाहीत. व्यावहारिक भाषा शिकण्यासाठी अनेक शब्दांचा संग्रह उपलब्ध करून भाषा शिकणाऱ्याला व वापरणाराला शब्दांची निवड करता यावी ही कोशनिर्मितीमागील त्याची भूमिका होती. या कोशाला A essay on the points of similarity and dissimilarity between the English and Marathi language. हा डॉ. स्टीव्हन्सनने मराठी भाषेवर लिहिलेला निबंध जोडण्यात आला आहे. या कोशावर डॉ. विल्सन यांनी चांगले मत प्रदर्शित केले आहे. कँडीच्या या कोशाची दुसरी आवृत्ती इ. स. १८७३ साली प्रसिद्ध झाली.

विरामचिन्हांची परिभाषा

पुणे, पुणे पाठशाळेचा छापखाना, मुद्रक नारो रामचंद्र ठकार, १८५० पृ. १ + १६ शिळा.

पूर्वी मराठी भाषेत विरामचिन्हे वापरण्याची पद्धती नव्हती; परंतु पाश्चात्य देशातील भाषांतविरामचिन्हे वापरण्याची सोय होती. विरामचिन्हे वापरल्यामुळे वाचकांची सोय होते. तसेच लेखकाला वाचकापर्यंत आपले विचार पोहोचविणे शक्य होते. इंग्रजी भाषेचा आपल्याकडे अभ्यास सुरू झाल्यावर त्या भाषेतील विरामचिन्हांच्या उपयोगाप्रमाणे मराठी भाषेतही चिन्हांचा उपयोग केला जावा अशा

सूचना काही लोकांनी कँडीला केली. त्या सूचनेचा विचार करून, इंग्लिश भाषेतील जी विरामचिन्हे मराठी भाषेत द्यावयाजोगी आहेत ती घेऊन त्यांचे ज्ञान सर्व लोकांस व्हावे या हेतूने ही परिभाषा केली आहे. (प्रस्तावना) प्रस्तुत छोट्या पुस्तकात स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, प्रश्नचिन्ह आणि उद्गारचिन्ह या पाच विराम-चिन्हांचे नियम सांगून उदाहरणे दिली आहेत.

कँडीने मराठी भाषेच्या लेखनपद्धतीत शुद्धलेखन, विरामचिन्हे, भाषांतर या अंगांनी बरीचशी एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला. वेळप्रसंगी त्याच्यावर टीकाही ालेली दिसते. पण मराठी भाषेच्या जडण-घडणीच्या बाबतीत कँडीने केलेले कार्य फार मोलाचे आहे याबद्दल शंका नाही.

आतापर्यंत आपण युरोपियन वा पाश्चात्य ख्रिस्ती लोकांनी मराठीत कोश वषयक केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. इंग्रजी राज्यकर्त्यांनी आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनी इथल्या लोकांना सुशिक्षित करण्यासाठी शाळा सुरू केल्या होत्या. त्यात हिंदूंबरोबर नव्याने ख्रिस्ती झालेले लोकही शिकत होते. नव्या संस्कृतीने, साहित्याने आणि पाश्चिमात्य जीवन-पद्धतीने लोक भारावले होते, तसेच ख्रिस्ती धर्माच्या येऊ घातलेल्या नव्या आक्रमणाने अस्वस्थ झाले होते. जसेजसे महाराष्ट्रातील नवख्रिस्ती शिकू लागले तसतशी ते ग्रंथनिर्मिती करू लागले. कँडीच्या कोशाचा संक्षेप करून तो छापावा अशी योजना मुंबई सरकारने मान्यही केली होती. आणि कँडीच्या कोशाचा संक्षेप श्रीकृष्ण तळेकर यांनी तयार केला व सरकारी विद्याखात्यातर्फे इ. स. १८६१ साली प्रसिद्ध झाला.

पण त्याआधी म्हणजे इ.स. १८६० साली "वयांडीकृत इंग्रजी-मराठी कोशाचा संक्षेप," थॉमस ॲण्ड ग्रॅहम छापखाना, बाबा पदमनजी यांनी प्रसिद्ध केलेला होता.

बाबा पदमनजीने रचिलेला हा पहिला शब्दकोश होय. यात २२००० पेक्षा अधिक शब्दसंग्रह असून सर्वसामान्यांना सोयीचा होईल अशा पद्धतीने या कोशाची रचना केलेली आहे. या कोशाची दुसरी आवृत्ती १८७० त व तिसरी आवृत्ती १८८९ (पृ. ६८०) साली एज्युकेशन सोसायटीने प्रसिद्ध केली.

२८ मार्च १८८९ च्या ज्ञानोदयात या कोशाची वैशिष्टये सांगण्यात आली आहेत ती अशी :-

(१) शब्दांचा अर्थ देताना त्यातील व्यत्पत्तीकडे लक्ष अधिक पुरविले आहे. उदा. Lock = कुलुप व Lock = झुलुप यांची व्युत्पत्ती भिन्न असल्यामुळे ते शब्द भिन्न केले आहेत.

(२) शब्दांची व्युत्पत्ती दिली आहे तेव्हा अमुक शब्दांचा अमुक अर्थ एवढेच सांगितले आहे. उदा. Lazar = म्हणजे कोडी हा अर्थ नव्या करारातील एका व्यक्तीच्या नावावरून प्रचारात आला आहे. व ज्या ठिकाणी तो आला आहे ते नव्या करारातील स्थळ दिलेले आहे.

(३) एका शब्दाचे अनेक अर्थ होतात व ते देताना त्या अर्थाचा प्रयोग ग्रंथात ज्या ठिकाणी आढळतो ते ठिकाण दर्शविले आहे. उदा. Light म्हणजे दिवस Job XXIV, 14, Light म्हणजेच सुख iviii, 6, Hight म्हणजेच विजयी XXIV. 8.

(४) प्रसंगी त्या त्या अर्थाचा प्रयोग ज्या ज्या वाक्यांत केलेला आहे, ती वाक्ये-ही ग्रंथातून दिली आहेत. उदा. Kiss या शब्दांचा अर्थ हळूच ममतेने स्पर्श करणे. त्यासाठी उदा. शेक्सपिअरचे When the sweet wind did gently kiss the trees हे वाक्य दिलेले आहे.

(५) शब्दांचा अर्थ देताना काही म्हणी देऊन त्या अर्थाच्या मराठी म्हणीही दिल्या आहेत. उदा. Peeny wise and pound foolish इळा मोडून खिळा करणे.

(६) एका शब्दाखाली मोडणारे अनेक शब्द किंवा संयुक्तशब्द त्या त्या शब्दाखाली दिले आहेत.

उदा. High high noon म्हणजेच ऐन दोन प्रहर, high colour गहिरा रंग, high heat कडक ऊन.

(७) ग्रंथविस्तार होऊ नये म्हणून त्या मुख्य शब्दांच्या स्पेलिंगाची पुनरावृत्ती न करता केवळ त्याचे पहिले अक्षर लिहून दुसरा शब्द दिला आहे. उदा. n–noon.

(८) तोच शब्द जर दिलेल्या उदाहरणात किंवा म्हणीत बहुवचनी असेल, अगर त्यास एखादा प्रत्यय लागत असेल तर त्याचा प्रयोग स्पष्ट समजण्यासाठी त्याची सर्व रूपे दिलेली आहेत. उदा. day शब्दाखाली now-a-d असे न लिहिता now-a-days असे लिहिले आहे.

या कोशाच्या तीस वर्षांच्या काळात तीन आवृत्त्या निघाल्या. त्यावरून त्याची लोकप्रियता अजमाविता येईल.

शब्दरत्नावली—Help to Marathi students and authors.

बाबा पदमनजींनी 'शब्दरत्नावली' हा कोश लिहिला. थॉमस ग्रॅहमने तो मुद्रित केला व १८६० साली कोश प्रसिद्ध झाला.

आपल्या प्रस्तावनेत बाबा लिहितात, " कँडीकृत इंग्लिश व मराठी कोशाचा संक्षेप करतेवेळी महाराष्ट्र भाषेतील शब्दरूप रत्ने पाहून लेखकास आनंद व आश्चर्य वाटले. अशी ही आपली मातब्बर भाषा आपल्या लोकांस माहिती नसावी व इंग्लिश लोकांनी तिचा लाभ घ्यावा याचे दुःखही वाटले. मोल्सवर्थकृत कोशाचे अवलोकन केले असता अनेक प्रकारचे शब्द, अनेक विषय, त्यांची उपपत्ती व्याख्या दृष्टोत्पत्तीस आल्या. त्या सर्वांचा शोध घेण्यास शेकडो ठिकाणी शेकडो

ग्रंथांचा शोध घ्यावा लागेल. अशा शब्दांचा संग्रह त्या महान ग्रंथात केला आहे. पण हे ग्रंथही घेण्यास (कँडी, मोल्सवर्थचे कोश) लोक समर्थ नाहीत. शिवाय इंग्लिश भाषा व स्वभाषा यांची अभिरुची ते महाग्रंथ घेण्याइतकी तीव्र नाही. ते भारतप्राय ग्रंथ हजारातून एकापाशीही मिळणे कठीण. म्हणून महाराष्ट्र भाषा शिकणाऱ्या तरुण लेखकांस असे शब्द व विषय मिळावे म्हणून पूर्वोक्त ग्रंथातील सहस्रावधी शब्दांतून कित्येक निवडून लहानशी ' शब्दरत्नावली ' केली.

या शब्दरत्नावलीचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात मोल्सवर्थकृत कोशातील कित्येक चमत्कारिक पारिभाषिक, ज्यांच्या पोटात अनेक उपविषय, व्याख्या आहेत असे शब्द निवडून, त्यांचा संग्रह आहे. या पहिल्या भागात ३५८ शब्द त्यांचा अर्थ किंवा विस्तारदर्शक सर्व शब्द मिळून एकूण ४८५३ शब्द आहेत.

कोशाच्या दुसऱ्या भागात कँडीकृत कोशातील ज्या महाराष्ट्र शब्दास बहुत उपशब्द आहेत ते त्या शब्दासह निवडून घेतले आहेत. या भागात मूळ शब्द २६५ व त्यांचे उपशब्द, भाषण, सांप्रदायिक शब्द मिळून ,६५८२ आहेत. दोन विभाग मिळून एकूण शब्द संख्या १३००० आहे. कोशाच्या अखेरीला दोन अनुक्रमणिका आहेत.

(पहिल्या भागाच्या अनुक्रमणिकेत मूळ शब्दाचे मोल्सवर्थकृत कोशावरून घेतलेले इंग्रजीत अर्थ दिलेले आहेत. दुसऱ्या भागात इंग्रजी शब्दावरून मूळ शब्दाचा अर्थ देताना अर्थ म्हणून विविध प्रकार व अर्थ छटा सांगणारे शब्द दिले आहेत.)

उदा. साकर प्र. खांड, गुली, चिनी, दाणा, दुबोटा, नावदसाकर, बुरासाकर, खंडीसाकर, रायपुरीसाकर वगैरे. मूळ शब्दाचा अर्थ म्हणून विविध उदाहरणे दिलेली आहेत.

उदा. (संक्षेपन) ती. तीर्थरूप, तीर्थस्वरूप, अशी उदाहरणे सोयरे धायरे अनेक नातेवाईकांचा उल्लेख.

मामा, चुलतसासू, मावससासू, नणंद, काका, काकी, मूळ शब्दांचा अर्थ देऊन भाषण संप्रदाय असे म्हणून त्या अर्थाचे वाक्प्रचार दिलेले आहेत.

उदा. संतापणे, तडफडणे, धडपडणे, जळणे, तापणे असे. अंगास आग लागणे, तृतिय नेत्र उघडणे, रुद्रावतार धारण करणे, वर्दळीस येणे, अंगुष्टाची आग मस्तकात शिरणे.

कोशाच्या दोन भागांच्या रचना मांडणीपद्धतीत तसा फारसा वेगळेपणा दिसत नाही. पण पहिल्या भागात मोल्सवर्थकृत व दुसऱ्या भागात कँडीकृत कोशांचा संक्षेप आहे. एवढ्या एकाच कारणास्तव दोन भाग भिन्न केलेले दिसतात. एरवी नामकोश, धातुकोश विशेष-नामकोश असे बदल म्हणून वेगळे भाग केले आहेत असे दिसत नाही.

कधी कधी शब्दाचा अर्थ देतांना आधारार्थ संस्कृत श्लोक देण्याची घाटणी दिसते.

उदा. " अठरा धान्ये " गहू, साल, तूर, जव, जोंधळा, तांक, चणा, जवस, मसूर, मूग, राळा, तीळ, हरिक, कुळीथ, सावा, उडीद, चवळी.

श्लोक– गोधूमशालि तुवरी यावनाल वातांन लांक चपका अतसी मसूरा।
मुग्दप्रियंगु तिला कोद्रयकाः कुलित्थाः श्यामक माष चवला इति
धान्य वर्ग ।।

मोल्सवर्थच्या डिक्शनरीचा संक्षेप :–A compendium of Molesworthi's Marahi and English Dictionary

एज्युकेशन सोसायटी प्रेसने, भायखळा, मुंबई इथे हा कोश प्रसिद्ध केला. इ. स. १८६३. पृष्ठ संख्या १२ + ४८२ विशेष म्हणजे या कोशाला दक्षिणा प्राईज कमिटीचे चारशे रुपयांचे बक्षिस मिळालेले होते.

या कोशाच्या प्रस्तावनेत प्रारंभी कोशकर्त्यांच्या कार्यातील अडचणी स्पष्ट करून, संक्षेप करताना मूळ लेखकाची शैली बदलली नसल्याचे स्पष्ट केलेले आहे. मूळच्या म्हणजे मोल्सवर्थच्या इ. स. १८५७ साली प्रसिद्ध झालेल्या कोशाच्या ६००० शब्दातून व्यवहारोपयोगी अशा १९,००० शब्दांची निवड केलेली आहे. संक्षेप करीत असताना मराठी शब्दांस इंग्रजी प्रतिशब्द दोनापेक्षा अधिक दिलेले नाहीत. त्या बाबत संक्षेप केला. अगदी काही किरकोळ स्वरूपाच्या अर्थछटा देणारे शब्द वगळले आहेत. प्रस्तुतचा कोश भाषांतरकार, विद्वान शिक्षक, व्यापारी आदी लोकांना उपयोगी पडेल व परवडेल असा विश्वास बाबांनी व्यक्त केला आहे.

या कोशाची मांडणी पुढे सांगितल्याप्रमाणे केलेली आहे.

(१) जे शब्द मुळात संस्कृत आहेत पण आजच्या सुविद्य मराठी भाषिकांत सर्रास रूढ झाले आहेत असे शब्द (S) अशा खुणेने दाखविले आहेत.

(२) मूळ संस्कृतातील शब्द मराठीत रूढ झालेले पण कमी प्रमाणात असे शब्द S असे कंसाविना दाखविले आहेत. तसेच इतर निरनिराळ्या भाषांतून मराठी आलेले शब्द त्या मूळ भाषांस संक्षेप अक्षरे वापरून ती अक्षरे त्या शब्दापुढे लिहून दाखविला आहेत.

संस्कृत मराठी कोश

बाबा पदमनजी, निर्णयसागर प्रेस, मुंबई १८९१.

या कोशासंबंधी प्रस्तावनेत बाबा लिहितात–

" या कोशांत मराठी भाषेत जे रूढ व व्यावहारिक संस्कृत शब्द आहेत, त्यांचा संग्रह केलेला आहे. ",

या कोशाची मांडणी करीत असताना–

(१) मूळ घेतलेले शब्द जाड टाईपात असून प्रथम त्याचे व्यावहारिक अर्थ दिलेले आहे. व ज्या शब्दाचे जे अर्थ फक्त संस्कृतात आहेत त्यांचा कित्येक स्थळी कंसात अर्थ दिलेला आहे. उदा. जय – फत्ते, विजय, (२) संबोधनवाचक शब्द जयदेव वगैरे (३) जिंकणे (वाद – खेळ). निवार्ण– (१) कडे, शेवटी बाजू, निदान (२) मरण (३) ईश्वरी पद मिळणे, मोक्ष, मुक्ती, (विश्रांती, पोकळी, आनंद (बौद्धमत) नाहीसे होणे.)

मुख्य शब्द अर्थ बहुधा उपशब्दांनी किंवा पर्यायी शब्दांनी दिलेले आहेत. क्वचित व्याख्यांच्या रूपाने दिलेले आहेत. व्याख्या शब्दाचा अर्थ शास्त्रीय अर्थ घेऊन चालणार नाही. कोशकाराच्या आशयानुसार व्याख्या म्हणजे वर्णनच. एकाच पर्याय शब्दात अर्थ दिलेला नाही. उदा. अनुनासिक मुख आणि नासिका यांनी ज्याचा उच्चार होतो. पर्याय शब्दाविषयी साधारण नियम असा दिसतो की प्रथम एक किंवा दोन सोपे मराठी शब्द व नंतर एक दोन सोपे संस्कृत शब्द दिलेले आहेत.

उदा. उच्छृंखल – (१) स्वेच्छेने वर्णन करणारा.

(२) गैरचालीचा, अन्यथाचारी.

हे उपशब्द विद्यार्थी किंवा ग्रंथकार यांना उपयोगी पडतील, असे निवडण्याचे धोरण ठेवले आहे.

बहुतेक व्याख्या दुसऱ्या कोशातून घेतल्या आहेत व त्यांत ज्या फार दुर्बोध होत्या त्या सुबोध केल्या आहेत. अशुद्ध वाटल्या त्या शुद्ध केल्या आहेत. काही नवीन योजिल्या आहेत. शब्दांचा अर्थ अधिक स्पष्ट करण्याकरिता अनेक स्थळी उदाहरणे दिलेली आहेत.

उदा. असिपत्रवन (वर्णन) नरक (जेथे सर्व झाडांची पाने तरवारीच्या धारेप्रमाणे तिखट आहेत).

बहुतेक सर्व अर्थभेद अंकांनी चिन्हित केले आहेत. तरी कित्येक अर्थांच्यामध्ये अर्धविरामचिन्ह मात्र घातलेले आहे. अर्थाचे बारीक पोटभेद अथवा एखाद्या नामवाचक शब्दाचे अर्थ अंक भेदाने दर्शविल्यावर त्याच्या विशेषणाचे किंवा क्रिया विशेषणाचे तेच अर्थ अर्धविराम चिन्हाने दर्शविलेले आहेत. उदा. द्रव या शब्दाचा रस, सार (२) पाझर, स्राव असे अर्थभेद दिल्यावर द्रावक या विशेषणाचे तेच अर्थ दाखविण्यासाठी (१) द्रवविणारा या शब्दानंतर अर्धविराम म्हणजे द्रवरूप म्हणजे रस, स्राव असे रूप करणारा, अर्थात नामाचे तेच अर्थ विशेषणांत अभिप्रेत म्हणून पुन्हा उल्लेखिण्याची जरुरी नाही (असे स्पष्टीकरण). खिशात बाळगता यावा म्हणून हा कोश इंग्लिश पॉकेट डिक्शनरीच्या आकाराचा छापला आहे.

अशा प्रकारचा मराठी भाषेतील हा नवीनच कोश असल्यामुळे मोठ्या श्रमाने आणि काळजीने हा कोश सिद्ध केला असे लेखकाचे म्हणणे आहे.

महाराष्ट्रातील नव्याने ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या ख्रिश्चनांनी ख्रिस्तीधर्म श्रद्धा स्वीकारली होती, तरी मराठी भाषा, संस्कृती, स्वदेश यांबद्दल त्यांच्या मनात आपुलकी होती, जवळिक होती. महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांकडून त्यांच्या भाषेचे विडंबन वा दोष दिग्दर्शन, नाटक–कादंबऱ्यांतून होत होते. पण नव्याने ख्रिश्चन झालेल्या मंडळीत पूर्वसंस्कारसंपन्न उच्चवर्णीयांची संख्या कमी होती आणि इतर जाती–जमातीतील नव्याने ख्रिस्ती भाषा धर्म स्वीकारलेली मंडळी मिशनच्या शाळेत शिकत होती. त्यांची ‘ प्रमाण भाषा नव्हती. ’ ती बोलीभाषेत मिशनऱ्यांच्या शाळेत शिकल्यामुळे ती प्रमाण भाषेकडे वळत होती. आज बोली भाषांच्या व्याकरणाचा अभ्यास करण्यात येत आहे. पण ही नव्याने शिकलेली तळागाळातील मंडळी मराठी बोलत होती ती प्रमाण नव्हती. पण या सर्व मंडळींनी शिकून महाराष्ट्रातील चांगल्या मराठा, ब्राह्मणासारखी मराठी बोलावी असे ख्रिस्ती मराठी विचारवंतांना वाटत होते. या संदर्भात ‘ बालबोध ’ मेव्यात ’ केलेल्या प्रयत्नांचा विचार अन्यत्र केलेला आहे. पण या दृष्टीने रे. सदाशिव बळवंत लोटलीकर यांनी “ **मराठी भाषेची योग्यता व तिची अस्थापूर्वक अभ्यास करण्याची आवश्यकता** ” हा ३१ पृष्ठांचा, लिहिलेला छोटेखानी निबंध मनोहर कृष्ण उजगरे यांनी, मराठी लिटरेचर मिशनरी ऑफ द बॉम्बे रिप्रेझेंटेटीव्ह कौन्सिल ऑफ मिशनच्या वतीने १९२१ साली प्रसिद्ध केला.

यात प्रकाशकाने आपले दोन शब्द सांगताना म्हटले आहे “ लोटलीकरांचे हे व्याख्यान १९१२ साली युनिअन हायस्कूलात ख्रिस्ती समाजापुढे झाले. नंतर पुन्हा प्रसंगानुरूप बदल करून “ जॉन स्मॉल मेमोरिअल हॉल मध्ये ” हिंदू श्रोते मंडळी समोर दिले. वि. मो. महाजनी, चिंतामण गंगाधर भानू, वासुदेव बळवंत पटवर्धन, बा. गो. आपटे यांचे अभिप्राय पुस्तिकेच्या मलपृष्ठावर छापले आहेत. प्रथम हे पुस्तक ज्ञानोदयांत हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध झाले होते.

मराठी भाषेची योग्यता व तिचा आस्थापूर्वक अभ्यास करण्याची आवश्यकता पटवून देण्यासाठी ही पुस्तिका लिहिली आहे हे उघड आहे. स्वभाषेविषयीची अनास्था सांगत असताना लोटलीकर सांगतात की “ मराठी ही आमची जन्मभाषा असून आम्हास ती शुद्ध बोलता वा लिहिता येत नाही. न, ण, ष, श, ल, ळ वगैरे अनेक वर्णांच्या उच्चारातील चुका—ऱ्हस्व दीर्घाच्या चुका, संघट्टनं, परोक्ष, अपरोक्ष, अंधःकार, हाहाकार अशा कित्येक शब्दांचा-चुकीच्या अर्थाने वापर दाक्षिणात्याच्या धर्तीवर पाश्चिमात्य, पौर्वात्य सारखे असंयुक्तिक प्रयोग वगैरे अनेक चुका अनेक जण करीत असतात. तसेच इंग्रजी येणारांचे भाषेत इंग्रजी व मराठी शब्दांचे व वाक्यांचे मिश्रण असतेच. अशा विविध तऱ्हेने भाषेस अनिष्ट वळण लागत आहे.”

लेखकाने बोलभाषेत व लेखी (प्रमाण) भाषेत असणाऱ्या भ्रष्ट मराठीची अनेक उदाहरणे दिलेली आहेत.

अशुद्ध मराठी प्रचारात असण्याची कारणे देताना ते लिहितात–

(१) सर्वांस इंग्लिश भाषेने वेडावून टाकले आहे. त्यांचे मातृभाषेबाबत अभिमान व प्रेम कमी व ती शुद्ध रीतीने बोलणे व लिहिणे याबाबत उपेक्षा वृत्ती फार. हायस्कुलातून सर्वच विषय इंग्रजीमधून शिकवितात. त्यामुळे मूल जरी लहानाचे मोठे होते, तो त्यास इंग्रजी भाषेचा संबंध अधिक जडतो. इंग्रजीचा अधिक प्रभाव राहतो व मराठीची उपेक्षा होते.

(२) इंग्रजीचे ज्ञान उदरनिर्वाहाचे व प्रतिष्ठेचे साधन झालेले असल्यामुळे त्या भाषेचा अभ्यास अधिक आस्थेने केला जातो. तितका मराठीचा केला जात नाही.

(३) मराठीत अभिप्राय चांगला व्यक्त करता येत नाही असे अनेक विद्वानांचे म्हणणे पडते.

या सर्व कारणांचा परिपाक म्हणजे मराठी भाषेच्या योग्यतेची जाणीव नाही व अभ्यासाची आस्था नाही. ग्रंथ रचनेच्या दृष्टीने ही भाषा कशी समृद्ध करता येईल ते सांगताना ते लिहितात–

(१) प्रसंगानुरोधाने प्रौढता आणण्यास व शास्त्र परिभाषेचे नवे शब्द रचण्यास मराठी भाषेस संस्कृत भाषेमुळे अनुकूलता आहे. वक्रीभवन, वातावरण, भूमध्य-समुद्र असे कितीतरी शब्द संस्कृत भाषेच्या सहाय्याने रूढ होऊ शकले आणि कर-ण्याची सोय आहे.

मराठी भाषा अभिप्राय व्यक्त करण्यास कशी समर्थ आहे ते कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या अनेक विद्यामूल तत्त्वसंग्रहाच्या व अन्य आधारांनी स्पष्ट केलेले आहे.

प्राकृतभाषा सामान्यजनांच्या कशी उपयोगी पडते ते सांगून शास्त्री पंडितांनी (प्राकृत) मराठी भाषेचा तिरस्कार करून तिची अवहेलना केली पण संतांनी तिचे महत्त्व ओळखले होते, युरोपिअन लोकांनी मराठी भाषेचे महत्त्व ओळखले होते ते सोदाहरण स्पष्ट केले आहे. आणि मग मराठी भाषेचा अभ्यास करण्याची कारणे सांगताना लिहितात–

(१) ती आपली मातृभाषा होय.

(२) मराठी संस्कृती समजून घेण्यासाठी मराठी भाषेचा अभ्यास आवश्यक आहे, कारण मराठी भाषेतूनच या संस्कृतीचे सर्व लेखन झालेले आहे.

(३) व्यापक प्रमाणावर भारतीय हिंदुधर्माची माहिती पण मराठी भाषेच्या अभ्यास वाचनाने होते.

भाषा व धर्म यांचा निकटचा संबंध असल्याने धर्माचरणाच्या अनेकविध अंगांची माहिती त्या त्या भाषेतील ग्रंथवाचनाने मिळते. मराठीच्या अभ्यास वाचनाने

हिंदू धर्मातील पाणी सोडणे, राम म्हणणे, दशग्रंथ, पंचगव्य, एकादशीच्या घरी शिवरात्र अशा अनेक प्रकारच्या वाक्प्रचारांत आचरण तपशिलाची माहिती मिळते.

देश सुधारणेस भाषाज्ञानाची आवश्यकता व उपयुक्तता असते.

मराठी भाषेच्या मोठेपणाचा आवर्जून पुन्हा पुन्हा उल्लेख केलेला आहे.

शास्त्रासंबंधी कोश

भाषेच्या शब्दकोशाबरोबरच मराठी नवख्रिस्ती लोकांना बायबल व इतर धार्मिक ग्रंथांची माहिती व्हावी व त्यांना मराठी भाषेत शास्त्राचा अभ्यास करणे सोयीचे व्हावे म्हणून ख्रिस्ती-मराठी लोकांनी शास्त्राचे निरनिराळे कोश लिहिलेले दिसतात. अर्थात यांतील बरेचसे कोश हे भाषांतरित असून ख्रिस्ती मिशनरी संस्थांनी ते प्रसिद्ध केलेले दिसतात.

अमेरिकन प्रेसबिटेरीअन मिशनने, मुंबईला एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यात इ. स. १८९० मध्ये २+२९३ पृष्ठांचा **शास्त्र प्रतिकदर्शक कोश** प्रसिद्ध केला. मूळ G. A. Ferris कृत या ग्रंथाचे भाषांतर आहे. भाषांतर कुणी केले त्यासंबंधी माहिती मिळत नाही.

ढाळवाणी कासम महंमद यांनी **शास्त्रासंबंधी कोश** तयार केला व तो हेन्री ब्रूसने शुद्ध करून बाँबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीने कोल्हापूर मिशनकरिता प्रसिद्ध केला इ. स. १९१२. पृ. १६+५५५+२.

इंग्लिश मराठी ईश्वरविज्ञान विषयक शब्दसंग्रह

रे. एम्. आर. सोज्वळ, पुणे, संयुक्त ईश्वरविज्ञान पाठशाळेचे ईश्वर विज्ञान विषयक मराठी प्रकाशन. चक्रमुद्रित प्रत. कालोल्लेख नाही.

युरोपिअन ख्रिस्ती मराठी लोकांनी ख्रिस्तीधर्मप्रसार करण्यासाठी मराठी भाषा आत्मसात केली. ती भाषा आत्मसात करण्यासाठी इंग्रजी मराठी कोश, व्याकरणे लिहिलेली आपण पाहिली. पण ख्रिस्ती धर्मातील ईश्वरविषयक ज्ञान मिळविण्यासाठी त्या विषयातील पारिभाषिक शब्दांचा कोश बनविण्याचा भारतीय ख्रिस्ती मराठी अभ्यासकांनी केलेला प्रयत्न औचित्यपूर्ण म्हणावा लागेल.

या दृष्टीने सोज्वळ यांनी केलेला कोश महत्त्वाचा आहे. मला उपलब्ध झालेली प्रत चक्रमुद्रित केलेली असून नगर कॉलेजच्या हिवाळे संग्रहात उपलब्ध झाली. संग्राहकाने निवेदनात म्हटले आहे, 'बराकपूर (पश्चिम बंगाल) येथे भरलेल्या संमेलनात हिंदी भाषेतील शब्दसंग्रह आधारभूत मानून विनिमय करण्यात आला. त्या प्रेरणेतून या कोशाची पहिली प्रत तयार करण्यात आली. आलेल्या सूचनांचा विचार करून सिद्ध केलेली ही आवृत्ती आहे. या शब्दसंग्रहाचा उपयोग ईश्वर विज्ञान पाठशाळेतील विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता भाषांतर करणारे लेखक, शालेय विद्यार्थी व मराठी भाषेचे अभ्यासक या सर्वांना होईल अशी आशा आहे.

निवेदनानंतर ' विशेष विनंती ' असून त्यात या शब्दसंग्रहाचे वाचन करीत असता लक्षात घ्यावयाच्या सूचना, मार्गदर्शन, नवीन शब्दांची घालावयाची भर, यथार्थ शब्दांची नोंद वगैरे संग्राहकाकडे पाठविल्यास पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यापूर्वी स्वीकार केला जाईल असे सुचविले आहे.

कोशाची मांडणी आकारविल्ह्याने केलेली आहे. एका इंग्रजी शब्दांस अनेक मराठी शब्द दिलेले आहेत. त्यातही एका इंग्रजी शब्दाच्या मराठीत विविध अर्थछटा दाखविण्यासाठी १-२-३ असे आकडे घातले आहेत.

उदा. Absolution (१) दोषपरिमार्जन, दोषमुक्तता
(२) क्षमा, क्षमादान, मुक्तता
(३) पापविमोचन, पापक्षालन, पापक्षमा

ईश्वर विज्ञान विषयक (Theological) शब्दसंग्रह असे म्हटले आहे. पण सामान्य वापरातील शब्दांचा अंतर्भाव केलेला दिसतो.

नव्या कराराचा स्थलदर्शक कोश भाग २ रा व भाग ३ रा

संपादक – एच्. जी. हावर्ड, प्रकाशक – टी. एच्. वीरकर, सेक्रेटरी बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई. मुद्रक–लक्ष्मी नारायण प्रेस, ठाकुरद्वार मुंबई २. इ. १९५३ प. आ. किंमत ३ रु. पृ. २५६+७१ (जेसुईट फादर्स नगर)

विविधशब्द विविध-शुभवर्तमानात केव्हा आले आहेत ते संदर्भक्रमांक व कसे वापरले आहेत ती वाक्ये उद्धृत केलेली आहेत. असा हा कोश आहे.

नमुन्यादाखल : रोम ११:७ वरकड बधिर झाले.
२५ इस्राएल लोक अंशतः बधिर झालेले आहेत.
इफि ४:१९ ते बधिर झाल्यामुळे त्यांनी हावरेपणाने (पृ. ३)
मीठ

मीठ

मत्तय
५:१३ तुम्ही पृथ्वीचे मीठ आहा
जर मिठाचा खारटपणा गेला तर.
मार्क ९:४९ प्रत्येक बलिदान मीठाने खारट करीतील
५० मीठ चांगला पदार्थ आहे
मीठाचा खारटपणा गेला तर
आपणात मीठ असू द्या.

अशा प्रकारचा हा स्थळ दर्शक कोश आहे.

मी, बाळगणे, बसणे, चालणे, महाराज, यरुशलेम, यहुदी, मोठा इत्यादी कित्येक शब्दांचा वापर वारंवार अनेक वेळा झाला असल्याने त्या शब्दांची स्थळदर्शक यादी खूपच मोठी झालेली आहे. प्रसंगी २, ३, ४ रकाने, पाने अशीही मोठी

आहे पण तेवढी मोठी यादी दिलेली नाही.

दुसऱ्या भागाच्या अखेरीस प्रभू येशूची नावे, संज्ञा व पदव्या यांची एक सूची संदर्भात दिलेली आहे. ती इंग्रजी स्थळदर्शक कोशाच्या आधारे दिली असल्याचे नमूद केले आहे.

भाग तिसऱ्यामध्ये बायबल सोसायटीचे माजी जनरल सेक्रेटरी रे. जे. एस्. एम्. हुपर यांच्या योजनेप्रमाणे तयार केलेली ग्रीक शब्दांची यादी दिलेली आहे. या योजनेतील सर्वच शब्द छापण्यास फारच खर्च येईल म्हणून ट्रॅक्ट सोसायटीच्या ठरावानुसार काही निवडक शब्दांचीच यादी येथे छापली आहे.

इंग्रजी शब्दांचे अचूक उच्चार व अर्थ – लेखक भा. पां. हिवाळे

(इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची साधने) प्रका. रे. भा. पां. हिवाळे, इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची साधने या मालेतर्फे, उषा मुद्रणालय, अहमदनगर, १ ली आवृत्ती १९५६.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. हिवाळे सांगतात, “सध्या अहमदनगर कॉलेजात प्रवेश करणाऱ्या मुलामुलींचे इंग्रजी भाषेचे ज्ञान फार कमी असते असे आढळून येत आहे. इंग्रजी माध्यम आहे तोपर्यंत उच्च शिक्षण मिळवू इच्छिणाऱ्यांचे त्यामुळे फार नुकसान होत आहे. केव्हा तरी मराठी माध्यम होईलच. तोपर्यंत इंग्रजीचा अभ्यास चांगला व्हावा हे इष्ट आहे. म्हणून अहमदनगर कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता “इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची साधने” नावाची एक ग्रंथमाला गुंफण्याचा आमचा विचार आहे.” या मालेतील हा पहिला ग्रंथ होय.

या ग्रंथाची मांडणी करीत असताना इंग्रजी शब्दांस मराठी प्रतिशब्द दिलेला आहे. इंग्रजी शब्द अकारविल्हाने दिलेले आहेत. एका इंग्रजी शब्दास बव्हंशी एक मराठी प्रतिशब्द व क्वचित २–३ मराठी प्रतिशब्द आहेत. इंग्रजी शब्दातील अवयवांचे पृथक्करण करून त्यासह देवनागरी लिपीत उच्चार दिले आहेत. उच्चारात स्वराघात असलेले अक्षर जाड टाईपामध्ये आहे. एकूण ३५० शब्द आहेत. शब्दांची निवड करीत असताना केवळ नित्य व्यवहारोपयोगी शब्द निवडले आहेत.

क्रियापदांस पुढे येणाऱ्या प्रेपोझिशनसह अगर त्या क्रियापदांच्या अथवा त्या क्रियापदांपासून बनलेल्या नामाचा वापर करून तयार होणारे विविध वाक्प्रचार व भाषिक लकबी देऊन त्याचे मराठी अर्थ दिले आहेत.

ही आपली पद्धत नवीन आहे असे लेखकाचे म्हणणे आहे.

प्रकरण ९ वे

शालेय क्रमिक विषयावरील पुस्तके

लोकांच्या जुन्या श्रद्धा व अशास्त्रीय समजुती व कल्पना नाहीशा करून शास्त्रीय कल्पनांचे बीजारोपण करण्याच्या हेतूने मिशनऱ्यांनी शास्त्र विषयावरील पुस्तकांचा अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमात केलेला दिसतो. या दृष्टीने '**पदार्थविद्या–भाग पहिला**, हे अमेरिकन मिशनने आपल्या प्रेसमध्ये टि. ग्रॅहम प्रिंटर्सकरवी इ. स. १८४६ साली प्रसिद्ध केलेले पहिले पुस्तक दिसते. पृष्ठसंख्या ७३ अधिक २२ अशी असून लेखकाचे वा संपादकाचे नाव दिलेले दिसत नाही. या पुस्तकात गती आणि त्याविषयी नियम, गुरुत्व, वेग, जोर, प्रेरणा, गुरुत्वकेंद्र, अनेक प्रेरणांनी वस्तूची गती, त्रिकोनाचे गुरुत्वकेंद्र, वस्तूंचा संपात, पूर्णनियताकारत्वाचा वस्तूविषयी, चाक व आस आणि कपी, कपीचे विवरण, मळसूत्र, कल्पनक्षेत्रावरून वस्तू पाडण्याचा नेम, लंब, इत्यादी अनेक प्रकारचे विवेचन उदाहरणासह आहे.

विवेचनाची एकूण ७३ पृष्ठे व नंतर आकृत्या एकूण ७८ आहेत. सुगम, सोपी मराठी भाषा विवेचनासाठी वापरली आहे. मराठी परिभाषा व समान इंग्रजी परिभाषा दिलेली आहे.

रे. ह्यूमचे तयार केलेले '**पशुज्ञानप्रकाश**' (१८५१) हे एक महत्त्वाचे मिशनरी शालेय पुस्तक होय. मनोरंजक पद्धतीने मुलांना प्राण्यांची ओळख करून द्यावी ही या पुस्तकामागील भूमिका आहे. जनावरांची चित्रे काढून संक्षपाने जनावरांची माहिती दिली आहे.

"मनुष्याने ईश्वराला ओळखून त्याच्या आज्ञेत राहावे, परंतु गाई–बैल, घोडा इत्यादी पशूंस ईश्वराच्या सेवेविषयी ज्ञान नाही. ते मनुष्यापेक्षा हलके व मनुष्यांच्या उपयोगाकरिताच त्यास ईश्वराने उत्पन्न केले आणि बैल, घोडा इत्यादी मनुष्याच्या कामासाठीच असतात. कित्येक अज्ञानी लोक ईश्वरास सोडून, त्यांची पूजाअर्चा करितात आणि त्यापेक्षा आपणास हलकेपणा आणितात. परंतु असे करणे मनुष्याला योग्य नाही." अशाप्रकारे ह्यूम विषय मांडतो.

'**ईश्वरी विद्या**' हे रे. विल्डरने लिहिलेले शालेय पुस्तक इ. स. १८५७ साली प्रसिद्ध झाले. या पुस्तकाला इंग्रजी प्रस्तावना असून त्यात भाषांतरकाराने पुस्तकाची मूळकथा दिलेली आहे.

शिक्षापद्धती - भाग १ व २ - बाबा पदमनजी.

बाबा पदमनजींच्या नावावर असलेले हे पुस्तक, प्रत्यक्ष पहायला मिळालेले नाही. पण या पुस्तकासंबंधी १६ डिसेंबर १८६१ ज्ञानोदयात (पृष्ठ ३७२) आलेला अभिप्राय असा-

" शाळेतील शिक्षण योग्यप्रकारे चालावे व विद्यार्थी चांगले, हुषार व्हावे म्हणून शिक्षकांनी काय केले पाहिजे हे या पुस्तकात चांगले सांगितले आहे. शिक्षेचे प्रकार, व्यवस्था, प्रश्न विचारणे, वर्णरचना, लेखन इत्यादी विषयांवर यात लेखन केलेले आहे. "

शिक्षकांना अशा पुस्तकाची गरज आहे असे अभिप्रायात म्हटले आहे.

मुलांकरिता १ ले २ रे ३ रे पुस्तक - बाबा पदमनजी.

त्या काळात मुलांसाठी मुद्दाम क्रमिक पुस्तके तयार करून घेतली जात. त्यानुसार बाबा पदमनजींनी केलेला हा प्रयत्न. प्रत्यक्ष पुस्तके उपलब्ध नाहीत. पण यासंबंधी ज्ञानोदयावरून कळते ती माहिती अशी—

मुलांकरिता पहिले पुस्तक - यात लिपिधारा, बाराखड्या नाहीत. जोडाक्षरे शिकविण्यावर भर दिलेला. मजकूर, पुस्तकाची मांडणी नवी (ज्ञानोदय, १६ डिसेंबर १८६१, पृ. १७०)

ज्ञानोदयकारांनी नव्या 'मांडणी'चे कौतुक केले आहे. पण कठीण व जड शब्द वापराबद्दल तक्रारीचा सूर आहे.

बाबांच्या या सर्व पुस्तकांची रचना मिशन कार्यास उपयुक्त अशी आहे.

मुलांकरिता ४ थे पुस्तक - यात एकूण १८० पाठ आहेत. ते विद्या, कला, शास्त्रे, इतिहास, नीतिशास्त्र इत्यादी विषयांवर आहेत. अनेक प्रकारच्या बोधपर कविताही यात आहेत. काही पाठ व कविता ज्ञानोदयावरून व इतर दुसऱ्या पुस्तकावरून घेतलेल्या दिसतात. हे पुस्तक ट्रॅक्ट सोसायटीसाठी खिश्चन व्हर्नाक्युलर सोसायटीतर्फे इ. स. १८६२ साली प्रसिद्ध केले.

शाळांकरिता महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास - बाबा पदमनजी, खिश्चन व्हर्नाक्युलर सोसायटी, ओरिएंटल प्रेस, मुंबई १८६६.

महाराष्ट्र देशाच्या इतिहासाबद्दल बाबा पदमनजींचे काळी 'मराठ्यांची थोरली बखर' व 'मराठ्यांची संक्षिप्त बखर' ही दोनच पुस्तके उपलब्ध होती. त्यांपैकी थोरली बखर फारच मोठी, किंमतीने न परवडणारी व संक्षिप्त बखर त्रोटक वाटावी अशी. म्हणून मध्यम दर्जाचे असे या विषयावरील पुस्तक हवे ही गरज लक्षात घेऊन बाबांनी 'शाळांकरिता महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास' हे पुस्तक लिहिले.

या पुस्तकात एकूण दहा प्रकरणे आहेत.

प्रथम प्राचीन वृत्तांतात – इतिहास शिकविण्याचे अगत्य, देशमर्यादा, प्राचीन आर्य, बौद्धादी लोक, ग्रीस वगैरे देशांच्या स्वाऱ्या, शालिवाहन शक इत्यादीविषयी माहिती दिली आहे.

त्यानंतर महाराष्ट्र देशातील मुसलमानी राज्ये, मराठ्यांचा म्हणजे सातारच्या राज्याचा इतिहास हा विषय निवेदन केला आहे.

शेवटी पेशव्यांचा इतिहास व उपसंहार आहे.

यात पूर्वीची राज्ये, त्यांची राजनीती, त्यापासून लाभ, हे सरकार इतके चांगले कशाने झाले, त्याचा धर्म, इथला धर्म या गोष्टींचा विचार केला आहे.

साहित्यशतक – बाबा पदमनजी, अँग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, मुंबई, १८७६ पृ. ७०.

'साहित्यशतक' हे बाबा पदमनजींचे पुस्तक म्हणजे सुभाषितवजा संग्रह आहे. त्यात संस्कृत व प्राकृत अनेक वेच्यांचा संग्रह आहे. हे वेचे इतर ग्रंथांवरून घेतलेले आहेत. संग्रहात अलंकार, धर्म, नीती, चातुर्य, प्रपंच, परमार्थ, व्यवहार, विज्ञान, जातिभेद इत्यादी शंभर विषयांचा समावेश केलेला आहे. पाठांतराची सवय लावणे, उच्चार घटविणे, आचारशुद्धतेची आवड उत्पन्न करणे, सत्याचे मंडण, असत्याचे खंडण, इत्यादी रीतीने शिक्षणात सुभाषितांचा जो उपयोग होतो तो प्रस्तुत संग्रहातील वेच्यावरून होईल असे लेखकास वाटत असल्याचे प्रस्तावनेत नमूद केले आहे.

ज्योतिःशास्त्राची मूलतत्त्वे

ले. हेन्री जे. ब्रूस, एज्युकेशनल सोसायटीचा छापखाना, भायखळा,
मुंबई, इ. स. १८८२ पृ. २१२.

मराठी शाळा व विद्यार्थी यांच्या उपयोगाकरिता अमेरिकन मिशनातील रे. हेन्री जे. ब्रूस यांनी हे पुस्तक तयार केले.

मूळ इंग्रजी भाषेत लिहिलेल्या ग्रंथाचे मराठी भाषांतर रे. कासमभाई महंमदजी यांनी केले. या पुस्तकात खालील मुद्द्यांवर विषय विवेचिला आहे.

ज्योतिःशास्त्राची व्याख्या : ज्योतिःशास्त्राचा उपयोग, मुहूर्त, ज्योतिषविद्या ज्योतिषशास्त्राचा इतिहास, हिंदू लोकांचा सिद्धांत, कोपरनिकसचा सिद्धान्त, टेकोब्राहे याचा सिद्धान्त.

भूमितीच्या मूलतत्त्वांची आवश्यकता, भूमिती विषयक, निरनिराळ्या उपांगांचे विवेचन.

सूर्य मंडळी म्हणजे काय, सूर्यापासून ग्रहांची अंतरे इत्यादी माहिती. ग्रहांच्या गतीविषयी केप्लरचा सिद्धान्त.

सूर्य व पृथ्वीवर त्याचा व्यापार, सूर्यावरील वातावरण, स्पेक्ट्रोस्कोप या नावाचे यंत्र – त्यासंबंधी माहिती.

बुधाचे महत्त्व व बुधासंबंधी माहिती. शुक्राचे महत्त्व, शुक्रासंबंधी माहिती. चंद्रासंबंधी माहिती. सर्व ग्रहासंबंधीची माहिती.

प्रकाश परमाणूसंबंधी सिद्धान्त वगैरे.

काळाचे विभाग, नक्षत्र, दिवस, सौर दिवस, मध्यसौर दिवस, व्यावहारिक दिवस, महिना, वर्ष, इंग्लिश पंचांग, हिंदू पंचांग, महंमदी पंचांग, पारशी लोकांचे पंचांग, यहुदी लोकांचे पंचांग.

ऋतू, भरतीओहोटी, धुमकेतू, यासंबंधीची माहिती.

उपसंहारामध्ये उपग्रहमाला, ग्रहमाला, सूर्यमाला, सूर्यमालासमूह, नक्षत्र जथ्यांच्या माला, मानवी ज्ञानाची मर्यादा, सृष्टीचे अतिथोरपण, ख्रिस्तीशास्त्र आणि विद्या याची चर्चा केलेली आहे.

अखेरीस ज्योतिःशास्त्रासंबंधी इंग्लिश आणि मराठी विशेष शब्दांची यादी, ज्योतिःशास्त्रासंबंधी विशेष शब्दांचा कोश, वर्णवार अनुक्रमणिका दिलेली आहे.

वाचनपाठावली – बाबा पदमनजी, ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, मुंबई, १८८४

वाचनपाठावली बाबांनी तयार केलेला संग्रहस्वरूपाचा ग्रंथ आहे. ज्ञानोदयाच्या जुन्या अंकातून जवळजवळ पन्नास उतारे बाबांनी संग्रहित केलेले आहेत.

बाबांनी निवडलेल्या उताऱ्यांस शीर्षके घातली, धर्म, नीती, रीतिभाती, लोकसुधारणा या सर्व बाबतीत बदल व वृद्धी कशी होते, हे त्या सर्व उताऱ्यांवरून लक्षात येते. हा ग्रंथ वाचणारास बहुत बोध व ज्ञान होईल असे ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे.

ब्राह्मणधर्माची अर्वाचीन उत्पत्तियात्रा व जरीमरी, गुरुकृपेची किंमत, गुजराती लोकांचे महाराज, माहिमची गंगा, सतीविषयी, हिंदू लोकांचे नवेनवे देव, भविष्य कसोटी, तामसपण याचे वर्णन, रेवाळेश्वर, बाळ गंगाधरशास्त्री, चोर धरण्याची युक्ती, राममोहन रॉय, सौम्यता - इत्यादी विषयांवरील उतारे आहेत. नावावरून त्यातील विविध विषयांची कल्पना येते. रंजन व ज्ञान असा हेतू साध्य होण्याजोगा हा संग्रह आहे. तत्कालीन लोकांमध्ये या संग्रहास लौकिक प्राप्त झालेला होता. भाषाशैली, विचारधन, वाङ्मयप्रकार या दृष्टीने हा संग्रह उपयुक्त वाटतो.

तुलनात्मक शरीरशास्त्र, मानव शरीरशास्त्र आणि इतर प्राण्यांशी तुलना, (Anotomy, human and Comparative) रे. हेन्री जे ब्रूस, अमेरिकन मराठी मिशन, एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १९०१ पृष्ठे ८ अधिक २१३, किंमत १ रुपया ४ आणे.

पश्चिम हिंदुस्थानातील शाळा व विद्यार्थी यांच्या उपयोगाकरिता हा ग्रंथ लिहिला गेला आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे–

मराठी भाषेमध्ये शरीरशास्त्र व प्राणिगुणधर्मशास्त्र या विषयावर एक बालबोध व संक्षिप्त ग्रंथ असण्याचे अगत्य आहे. ही गोष्ट सर्व मान्य करतील. ही वाण दूर करण्याकरिता हा ग्रंथ रचण्याचा उद्योग केला आहे. हे कार्य सिद्धीस नेण्याकरिता ग्रंथकर्त्याने या विषयावर अनुक्रमाने काही व्याख्याने द्यावी म्हणून अमेरिकन मिशनने त्याला काही वर्षांमागे म्हणजे सन १८७० साली नेमले होते. तथापि हे काम संपूर्ण होण्यापूर्वीच त्याची शरीरप्रकृती बिघडून त्याला अमेरिकेत जाणे भाग पडले. तयार केलेली व्याख्याने इ. स. १८७२ सालच्या ज्ञानोदयाद्वारे 'इंग्लिश व मराठी भाषेत छापून प्रसिद्ध झाली' ग्रंथासंबंधी आभार मानताना म्हटले आहे, 'रे. एस. बी. फेअरबँक यांनी या भाषांतराचा मूळ इंग्लिश ग्रंथ फार चांगल्या रीतीने तपासला. उपयुक्त सूचना केल्या. ज्ञानोदयकर्ते मि. शाहू दाजी कुकडे, रे. कासमभाई महंमदजी यांनी हे मराठी भाषांतर करण्यात विशेष साह्य केले.'

दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होण्यापूर्वी रे. डब्ल्यू. ओ. बॅलेंटाईन यांनी समग्र ग्रंथ वाचून वैद्यकीय दृष्टीने उपयुक्त सूचना केल्या. त्यानुसार दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली.

पुस्तकात अनेक चित्रे आहेत. चित्रांची यादी दिलेली असून एकूण १६२ चित्रे आहेत. पुस्तकाच्या अखेरीस (१) इंग्लिश पारिभाषिक शब्दांचे मराठी समानार्थी शब्द (२) मराठी कठीण शब्दांचे अर्थ व जरूर तेथे अधिक स्पष्टीकरण. (३) पुस्तकातील विषयांची वर्णवार अनुक्रमणिका–एवढी परिशिष्टे दिलेली आहेत. संपूर्ण पुस्तक ठळक अक्षरात छापले आहे. चित्रांची माहिती व टीपा बारीक टाइपात छापली आहे.

एकूण आठ प्रकरणांत हा विषय विस्ताराने मांडलेला आहे.

A Start in Marathi; Edward Fairbank, Re. E. Fairbank, American Marathi Mission, Wadala, India; 2nd ed. 1915, third ed. 1922, Pages 226.

द्वितीय आवृत्तीच्या प्रस्तावनेत 'मराठी भाषेच्या प्राथमिक अभ्यासासाठी तयार केलेले पुस्तक असून मि. शांतवन एल. साळवे, रे. नारायणराव टिळक, रे. प्रतापराव गोर्डे यांच्या सहकार्याचा ऋणनिर्देश केला आहे. व तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत एन. एल. हर्षे, जीवनराव गायकवाड यांच्या साहाय्याचा ऋणनिर्देश आहे.

प्रस्तुत पुस्तक मराठी भाषा शिकणारांसाठी तयार केलेले आहे. मराठी भाषा शिकण्यासाठी माध्यम म्हणून इंग्रजी भाषेचा वापर केला आहे.

मराठीची वर्णमाला, त्यातील वर्णांचे उच्चार हे शिकण्यासाठी इंग्रजी शब्दातील उच्चारांची साम्यस्थळे दिलेली आहेत.

सर्व वर्णांचे (स्वर–व्यंजने) उच्चार सांगितले आहेत.

व्यंजने व स्वर मिळविण्याच्या पद्धती, त्यांचे नियम, इत्यादी देऊन नंतर जोडाक्षरांसंबंधी माहिती दिली आहे.

शिकविण्यासाठी Direct method वापरली आहे. हे काय आहे, असा शिक्षकाने प्रश्न विचारून अंगुली निर्देश करून दाखवून सांगणे. हा हात आहे, हा डोळा आहे, हे तोंड आहे, तो कान आहे, ते बोट आहे वगैरे. संभाषणामधून मराठी भाषेचे व्याकरण, शब्दसमूह इत्यादी प्रकाराने भाषाज्ञानसंबंधी विवरण केले आहे.

पुस्तक सचित्र केले असून प्राण्यांची माहिती चित्रांवरून सांगितली आहे. तसेच छोट्या छोट्या नवशिक्षितांस भाषेच्या दृष्टीने उपयुक्त पण सोप्या गोष्टी दिल्या आहेत. या गोष्टींसाठी पण चित्रांचा वापर केलेला आहे.

व्याकरणातील वचन, विभक्ती, लिंग, काळ, अर्थ, अव्यये, शब्दांचा विशेष उपयोग, संख्या इत्यादी सर्वच वरील पद्धतीने संभाषणद्वारा शिकविले आहे. त्यात व्याकरणाचा रुक्षपणा नाहीसा करून सुगम अर्थवाही रीतीने व्याकरणज्ञान शिकविण्यात खूपच यश आले आहे. मराठी भाषेच्या काही विशेष लकबी त्यांनी इंग्रजी भाषेत कशा व्यक्त करता येतात अशी तुलनात्मक वा सदृश स्थळे पण एकत्रित करून दिली आहे.

उदाहरणार्थ, 'गंगूबाई नावाची एक बाई होती' अशा वाक्याऐवजी मराठी भाषिक 'गंगूबाई म्हणून एक बाई होती' असे वाक्य वापरतो. उदाहरण म्हणून यास इंग्रजीत सदृश रचना (Called by name) therefore नव्हे. अशी नेमकी स्थळे उद्धृत करून त्यास इंग्रजी रचना दिली आहे. अखेरीस मराठी शब्दांस इंग्रजी प्रतिशब्द असा कोश, अकारविल्हे दिला आहे. सुमारे १००० ते ११०० शब्दांचा असावा. मराठीतील वाक्यसमूह दिले आहेत. त्यावरून पोस्ट ऑफिस, बाजार, शाळा संबंधीच्या शब्दांची माहिती दिलेली आहे. अन्य भाषिकास मराठी भाषा शिकताना जाणवणाऱ्या अडचणी म्हणजे पर्यायाने मराठी भाषेतील अवघडपणा, वा उणिवा, नियमबाह्य स्थळे वगैरे या पुस्तकावरून चांगली समजतील.

धार्मिक शिक्षण

मराठी सशास्त्र पाठशाला – प्रका. इंटरनॅशनल ट्रॅक्ट सोसायटी लखनौ, १९१६, पृ. २१४. (बर्फे)

या पुस्तकास प्रस्तावना नाही. पुस्तकात एकूण तीस धडे आहेत. प्रत्येक प्रकरणात प्रश्न विचारले आहेत. उत्तरादाखल पवित्रशास्त्रातील उचित अशी वचने उद्धृत केली आहेत. उदाहरणार्थ–

प्रकरण १ले – 'देवाचा शब्द'

कोणत्या रीतीने सर्व शास्त्र आपणास दिले.

'संपूर्ण शास्त्र देवाच्या प्रेरणेने झाले, आणि उपदेश, निषेध, सुधारणूक, न्यायीपणाचे शिकविणे यासाठी' (तिमथ्यस ३:१६)

खिस्ताची व्यक्तिसेवा– मूळ लेखक – एल. बिलवर मेसर, प्रका: रे. जे. स्मिथ, ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक – श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई १९१७, पृ. १६ (Christ as a Personal Worker या पुस्तकाचे भाषांतर)

प्रस्तुक पुस्तकात शास्त्र शिक्षणाच्या वर्गासाठी विषय आणि पद्धती सांगितल्या आहेत.

व्यक्तिसेवेसंबंधी सूचना दिल्या आहेत. ज्या इसमाला खिस्ताकडे आणण्याचा प्रयत्न असेल त्या इसमाला केव्हा भेटावे, त्याच्याशी केव्हा व कसे भेटावे, त्याच्याशी केव्हा, कसे बोलावे, 'पवित्रशास्त्राचा' वापर किती करावा या व अशाच अनेक गोष्टींबद्दल सूचना आहेत.

शास्त्राभ्यास क्रमिक पाठमाला पुस्तक १ ले

लेखक क्लेटन, ए. सी. प्रका.– रे. आर. बी. डग्लस, मुद्रक– लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, १९१९, पृ. ८ अधिक १९९ व क्रमिक पवित्रशास्त्र पाठमाला पुस्तक २ रे, क्लेटन ए. सी. प्रका.– बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, आर्यभूषण प्रेस, पुणे १९२२. पृ. ८ अधिक २९४. क्रमिक पवित्रशास्त्र पाठमाला पुस्तक तिसरे, क्लेटन ए. सी. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, आर्यभूषण प्रेस, पुणे १९२३, पृ. ८ अधिक १८० अशी तीन पुस्तके क्लेटनने प्रसिद्ध केलेली दिसतात. प्रत्यक्षात ही पुस्तके पहायला मिळालेली नाहीत.

उपदेशकांस सूचनाः– लेखक– जेम्स. आय. मॅक्नेअर प्रका. रे. एन. मॅक्निकल, ॲक्टींग मराठी लिटरेचर मिशनरी, १ स्टेवली रोड, पुणे १, १९२५.

प्रस्तुत पुस्तक हे एका इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर आहे. रे. मॅक्नेअर या अनुभवी धर्मोपदेशकाने आपले अनुभव सांगण्यासाठी ते लिहिले आहे. खेड्या-पाड्यातील साधारण लोकांपुढे खिस्ती धर्माचा संदेश मांडावयाचा तर उपदेशकांस आवश्यक ते शिक्षण कोणते व कसे द्यावे, उपदेशकाने पाळावयाचे नियम, करावयाची तयारी असे विषय यात विवेचिले आहेत.

व्यायाम शिक्षक– लेखक – एस. व्ही. भोसले, प्रका. ए. व्ही. भोसले, द्वारा प्रिन्सिपॉल युनिअन ट्रेनिंग स्कूल, अहमदनगर, मोहनमुद्रा मंदिर, अहमदनगर. १९२७, पृ. ४२ (ठोकळ)

पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये पुस्तक लेखनामागची भूमिका व व्यायाम शिक्षकास सूचना दिल्या आहेत. सहा प्रकरणांत हे पुस्तक लिहिलेले असून इयत्तेनुसार कवा-यतीचे प्रकार व विविध खेळासंबंधी माहिती दिलेली आहे. तसेच आरंभ, सुरू करा,

झडप, मोजणे, फेर अशा शब्दांचे व्यायामाचे संदर्भातील अर्थ दिले आहेत.

आंतरशुद्धी व मातृपदाची योग्यता– मूळ लेखिका – मिसेस आर. ए. वेस्ट प्रका.– बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, आर्यभूषण प्रेस, पुणे, मे १९२८ पृ. ६४ A clean heart or lessons on Motherhood by Mrs. R. A. West.

या पुस्तकाचा अनुवाद, अनुवादकर्त्याचे नाव दिलेले नाही. ख्रिस्ती मुलींच्या शाळातून शिक्षणास योग्य व उपयुक्त असे पुस्तक. संवाद रूपाने हे पुस्तक लिहिलेले असून माणसाचे मूल कसे उत्पन्न होते, आईच्या पोटात ते वाढते कसे, नवजात बाळाची काळजी कशी घ्यावी, निगा कशी राखावी, स्वच्छता कशी व कोणत्या बाबतीत ठेवावी, वळण, सवयी, संस्कार, तब्येत अशा अनेक अंगांनी जपणूक कशी करावी, अनेक रोगांची निर्मिती, काळजी, उपाय, इत्यादी अनेक प्रकारची उपयुक्त माहिती दिली आहे. पुस्तकाची भाषा कौटुंबिक स्वरूपाची आहे. (ठोकळ)

मिशन शाळांत धर्माचे शिक्षण कसे द्यावे — पद्धतीचे संक्षिप्त पुस्तक

प्रका – नवशिक्षक, ए. पी. जी. मिशन प्रेस, अहमदनगर, १९३४, पृ. ११४ How to teach religion in Mission Schools, a brief manual of Method by Rv. D. A. Mc Gavran या पुस्तकाचे भाषांतर.

प्रारंभी मिशनशाळांच्या अस्तित्वासंबंधी मीमांसा केलेली आहे. त्यानुसार ' अज्ञान नाहीसे करणे हे एक ख्रिस्ती कार्यच आहे. ह्या देशात ज्ञानाचा प्रसार करावा म्हणून आरंभी मिशन शाळा स्थापण्यात आल्या. त्या काळात वाचन, लेखन व गणित हे विषय शिकविणे हा प्रधान हेतू शाळांत ठेवणे योग्य होते. आज मिशनशाळा बंद केल्या तरी हे व्यावहारिक शिक्षण मुलांना इतर शाळांतून आता मिळू शकेल. परंतु तरी आजही लाखो रुपये खर्चून मिशनशाळा चालवाव्या. कारण मिशन शाळांतून व्यावहारिक शिक्षणाशिवाय नैतिक, धार्मिक व संस्कृतीपर शिक्षण देण्याचे कार्य चालते. मुलांना त्यांच्या पुढील आयुष्यात सुख व्हावे व त्यांचा जीवनक्रम सुखी व्हावा म्हणून त्यांच्यामध्ये प्रभू येशू ख्रिस्ताच्या व्यक्तित्वाचा विकास करवून त्यांच्या शीलाला योग्य वळण लावले जाते. मिशन शाळातील शिक्षण अधिक श्रेष्ठ प्रतीचे, मुलांच्या परिस्थितीला अधिक जुळते, अधिक कार्यक्षम करणारे अधिक मानसशास्त्रानुसार असते.

मिशनच्या शाळा असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

धर्मशिक्षणाचे पाठ (चवथ्या इयत्तेसाठी) रे. इ. एल. किंग. प्रका. पी. डी. सावरकर, ४६४ रास्ता पेठ, पुणे, आर्यभूषण प्रेस. १९३४. पृ. २५८. (अहमदनगर कॉलेज) Youth's Pattern A study of the life of Jesus. या पुस्तकाच्या दुसऱ्या अर्ध्या भागाचे भाषांतर – ख्रिस्ती शाळांतून धार्मिक शिक्षण देण्याकरिता ' चार्टर हाऊस प्रोग्रॅम मालिके 'तील एक पुस्तक.

येशूच्या जीवनातील गोष्टी कशा सांगाव्यात, शिक्षकाने तयारी कशी करावी, तयारीसाठी मार्गदर्शक साहाय्य कोणते घ्यावे आदीसंबंधी निवेदन.

शिक्षणाचा उद्देश ‘ शक्तिसंवर्धन ’ हाच डोळयांसमोर ठेवून उचित असे गुण-विशेष लक्षात घेऊन मुलांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करावा.

धार्मिक शिक्षणपद्धती व तत्त्वे (प्राथमिक शिक्षकांकरता रूपरेषा)

लेखक :- ए. एफ. राईट, १९३१, दुसरी आवृत्ती, १९३५.

चर्चेसाठी आरंभी काही प्रश्न दिले आहेत. या प्रश्नानुसार विद्यार्थ्यांची धार्मिक प्रवृत्ती तपासून पाहता येईल असे हे प्रश्न आहेत. धार्मिक शिक्षणाच्या शाळेत कोणत्या हेतूने आला, तुमच्या कोणत्या प्रकारच्या जिण्यासाठी कोणत्या प्रकारच्या अभ्यासाची आवश्यकता आहे, वगैरे प्रकारचे प्रश्न आहेत.

यानंतर ख्रिस्ती शिक्षकाची मुख्य जबाबदारी, ख्रिस्ती धर्मशिक्षण म्हणजे काय, धर्मशिक्षणाचे मुख्य नियम, धर्मशिक्षणाची साधने, ती निवडावी कशी, धर्म-शिक्षणाचा लहान मुलांसाठी अभ्यासक्रम, धर्मशिक्षणाच्या निरनिराळ्या पद्धती या-संबंधी माहिती प्रश्नोत्तररूपाने दिलेली आहे.

लैंगिक शिक्षण – मूळ लेखक हर्बर्ट ग्रे. अनुवादक लीलाबाई बेकर, एस. पी. जी. मिशन प्रेस, अहमदनगर, डिसेंबर १९३६, पृ. ४१.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे हर्बर्ट ग्रे यांच्या Sexs Teaching या पुस्तकाचे भाषांतर होय. या पुस्तकात – मुलामुलींना लैंगिक शिक्षण देण्याची आवश्यकता, पहिल्या प्रकरणात प्रतिपादन केलेली आहे. दुसऱ्या प्रकरणात लैंगिक शिक्षण देण्याचे कार्य पार पाडण्यासाठी शिक्षकाची तयारी कशी असावी यासंबंधी सूचना दिल्या आहेत. तिसऱ्या प्रकरणात शिक्षण कसे द्यावे याविषयी सूचना आहेत. ‘ संभोगा-विषयी भीती निर्माण होऊ न देणे, संभोगाविषयी पापभावना जागृत होऊ न देणे. अगर ती एक मजेची व चैनीची गोष्ट आहे, असेही वाटू न देणे, याबद्दल शिक्षकाने जागृत राहाणे आवश्यक आहे. चवथ्या व पाचव्या प्रकरणात मुलामुलींना हे शिक्षण देताना कोणती काळजी घ्यावी त्यासंबंधी सूचना आहेत. सहाव्या प्रकरणात मुलामुलींची मैत्री कशी असावी याबद्दल विवेचन.

अनक्षर लोकांकरिता सोपी वाचनपद्धती भाग १ ला – ले. रे. भा. पां. हिवाळे, श्याम भुवन, बाबुलनाथ रोड, तत्त्वविवेचन प्रेस, मुंबई, १९३७.

ख्रिस्ती लोकशिक्षणमाला यातील पुष्प सातवे. डॉ. फ्रँक लाऊबाक यांच्या पद्धतीनुसार डॉ. हिवाळे यांनी मराठीकरण केलेले आहे. पुस्तक सचित्र आहे.

एक राजा होता
राजाचा बाग होता
राजा बागेत आला

राजाला नाग दिसला
नाग राजावर धावला
राजा ओरडला नाग, नाग, नाग

अशा शैलीत काही आशय व्यक्त करणारी ओघवती रचना आहे. मधून मधून नाग, गान, राणी, राजा असे शब्द लेखन शिकविले आहे. येणाऱ्या शब्दांचे अर्थ व्यक्त करणारी चित्रे आहेत. उदा. राजा, राणी, भूत, डंख, चूल, नाग, पेरू, पंतोजी, यज्ञ, टरबूज, ढग इत्यादी. अखेरीस जोडाक्षर विवरणाचा तक्ता दिलेला आहे.

शेवटच्या पानावर (मलपृष्ठ) पुस्तक कसे शिकवावे या विषयी इंग्रजीमध्ये सूचना आहेत.

नवा शिक्षक

सुधारलेल्या ग्रामीण शाळा–लेखक मेसन ऑलकॉट, प्रका. रे. ए. के. राइट, प्रिन्सिपॉल युनिअन ट्रेनिंग स्कूल, अहमदनगर १९३९, पृ. ३१६.

होरॅस के. राईट यांच्या इंग्लिश पुस्तकाचे सेन ऑलकॉट यांनी हे भाषांतर केले आहे.

या पुस्तकात खेड्यातील परिस्थितीचे अवलोकन करून त्याबाबत मते, माहिती व सुधारणा करण्यासाठी सूचना केलेल्या आहेत. महत्त्वाचे मुद्दे असे–आर्थिक बोजा पडण्याची विविध कारणे, खेड्यातील अनारोग्य, जातीय व राजकीय अवस्थेचे रूप-प्राचीन हिंदी विद्यामंदिरांचे स्वरूप– सध्याच्या परिस्थितीत कोणता अभ्यासक्रम असावा, शिक्षणव्यवस्थेत खेड्यातील शाळांचे स्थान कोणते, प्रौढ शिक्षण असावे काय, अध्यापन शाळांचें ध्येय कोणते असावे, उत्तम प्रकारच्या अध्यापन शाळा कोणत्या, खेड्यातील शाळांमधील शिक्षकांची योग्यता काय असावी– याशिवाय याला पाच परिशिष्टे जोडली आहेत.

शिक्षकांचा मार्गदर्शक पुस्तक पहिले – लेखिका मिसेस ॲनेट, प्रकाशक–दि. शं. सावरकर, सेक्रेटरी ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, आर्यभूषण प्रेस, आवृत्ती दुसरी, पृ. ९६

खेडेगावातील शाब्बाथ शाळात व बालवर्गास शिकविताना उपयोग करण्यासाठीचा शिक्षणक्रम यात आहे. या पुस्तकात एकूण ५२ धडे दिले आहेत.

ओळखा पाहू – लेखक–रे. सदानंद अप्पाजी पाठक, प्रका. स. अ. पाठक, प्राध्यापक, बिशप कॉलेज, कलकत्ता, तत्त्वविवेचक प्रेस, वेलासिस रोड, मुंबई ८, प्रथमावृत्ती मार्च १९५३.

पवित्र शास्त्रातील गोष्टीसंबंधी प्रश्नोत्तरे असलेले छोटेसे पुस्तक एकूण १२५ विषय व ५५५ प्रश्न आहेत.

मुलांना करमणुकीबरोबरच पवित्र शास्त्रातील माहिती देणारा खेळ अशा स्वरूपाचे हे पुस्तक आहे.

देवधर्माच्या, निसर्गाच्या, प्राण्यांच्या अवयवांच्या, नात्यागोत्यांच्या, छोट्या-मोठ्यांच्या, प्रपंचाच्या, रोग, मरणादिकांच्या, इतर काही, अशा विविध गोष्टींवर प्रश्न दिले आहेत. नंतर प्रश्नांची उत्तरेही दिलेली आहेत.

ख्रिस्ती मंडळींच्या सभासदाच्या शिक्षणाचा सारसंग्रह – संपादक रे. प्र. शि. भोसले, प्रका. मिस ईडिथ प्राईस, चेअरमन, लिटरेचर कमिटी, अमेरिकन मराठी मिशन, नगर, १९५५ पृ. ६०

रे. प्र. शि. भोसले, को-ऑर्डिनेटर, अमेरिकन मराठी मिशनसाठी, यांनी प्रास्ताविक लिहिले आहे. मुळात हे पुस्तक बाप्तिस्मा घेणारासाठी, पुस्तकाच्या रूपाने अभ्यासक्रम ठरवावा म्हणून हे पुस्तक तयार करण्यात आले. या पुस्तकाचे भाषांतर केशव सयाजी ठोकळ यांनी केले. या पुस्तकात सहा प्रकरणे असून ख्रिस्ती महामंडळ आणि त्याचा अर्थ, ख्रिस्ती मंडळीची शिस्त आदी विषयांचे विवेचन केलेले आहे.

प्रकरण १० वे

ख्रिस्ती मराठी ललितवाङ्मय

इ. स. १८१५ सालच्या उत्तर भागात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मुंबईमध्ये पहिली शाळा सुरू केली. शासकीय विरोध आणि लोकांत शिक्षणाबद्दल असलेल्या अनास्थेमुळे, मिशनऱ्यांना ही नवीन शाळा सुरू करताना व पुढे चालू ठेवण्यास खूपच त्रास झाला. परंतु ही शाळा सुस्थिर झाल्यावर, मग मात्र भराभर अनेक शाळा उघडल्या गेल्या. शाळांच्या स्थापनेमुळे शालेय पुस्तकांची निर्मिती ही एक काळाची गरज ठरली. त्या निमित्ताने क्रमिक पुस्तके, कथा-कवितांची पुस्तके, उपासना गीतसंग्रह इत्यादी प्रकारचे मराठी ख्रिस्ती वाङ्मय निर्माण होत गेले. त्यावेळच्या वाङ्मयाची गुणवत्ता कशीही कमीजास्त असली, ते सदोष असले तरीही ते तत्कालीन गरज भागविण्यास समर्थ ठरले. वेळोवेळी त्या वाङ्मयातील गुणवत्ता सकस होत गेली व त्यांतील अपुरेपणा व दोष कमी कमी होत गेलेले दिसतात. इ. स. १८२४ मध्ये भूगोलाचे शास्त्रीय व खगोलशास्त्रीय मूलतत्त्वे, इ. स. १९४० मध्ये कोलबर्नच्या अंकगणिताचे भाषांतर, इंग्रजी-मराठी व्याकरणावरील पुस्तके, पवित्र शास्त्रातील वेचांचे संग्रह, तर्कशास्त्र, पदार्थविद्या, शरीरशास्त्र, अशा प्रकारची विविध शास्त्रे आणि विद्येवरची पुस्तके तयार झाली. तसेच वाचनमालाही सिद्ध झाल्या.

मुलांसाठी पहिले पुस्तक स्कॉटिश मिशनने इ. स. १८२८ साली प्रसिद्ध केले. त्याच्या पाच आवृत्त्या निघाल्या. जवळ जवळ अर्धा लाख प्रती निघाल्या. पहिल्या आवृत्तीच्या वेळी हे पुस्तक सोळा पृष्ठांचे होते. ते पाचव्या आवृत्तीत ४४ पृष्ठांचे झाले. पहिल्या आवृत्तीत सहा धडे होते तर त्याचे वाढत वाढत सतरा धडे झाले. हे पुस्तक स्कॉटिश मिशनचे मिशनरी डॉ. स्टीव्हन्सन यांनी तयार केले व अमेरिकन मिशनच्या रे. आर. डब्ल्यू. ह्यूम यांनी ते सुधारले.

प्रथम हे पुस्तक स्कॉटिश मिशनने इ. स. १८२८ मध्य प्रसिद्ध केले व १८२९ साली दुसरी आवृत्ती काढली. पण इ. स. १९३० साली बॉम्बे ट्रॅक्ट सोसायटीने प्रसिद्ध केले. इ. स. १८३५ पर्यंत ट्रॅक्ट सोसायटीन सहा आवृत्त्या काढल्या. तर हेच पुस्तक अमेरिकन मिशनने इ. स. १८३५ व इ. स. १८४४ मध्ये प्रसिद्ध केले. इ. स. १८३७ व इ. स. १८४१ मध्ये अमेरिकन मिशनने बालबोध व मोडी अशा दोन्ही लिपीत प्रकाशित केले. पुढे इ. स, १८४४ मध्ये

बॉम्बे ट्रॅक्ट सोसायटीने बालबोध मोडी लिपीत हे पुस्तक प्रसिद्ध केले. आणि पुढची गंमत म्हणजे पुढे कालांतराने या पुस्तकाचा लेखक कोण असा वाद निर्माण झालेला दिसतो.

मराठी भाषेमध्ये निरनिराळ्या पुस्तिका व ग्रंथ निर्माण करण्याचे कामी मिशन संस्थांनी खूपच काम केले. या सर्व पुस्तिका व ग्रंथांची विषयांची विविधता लक्षणीय आहे. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास व वाढीस ही सर्व वाङ्मयनिर्मिती उपयुक्त ठरली. अशा प्रकारे निर्माण झालेल्या ख्रिस्ती मराठी वाङ्मयामध्ये पवित्रशास्त्राची भाषांतरे, चरित्रे, काही तत्त्वविवेचनपर पुस्तिका, पापक्षालनाचे उपाय, अपराध कबुली जबाब, अपराध्याचे क्षमेने उद्धरण, इत्यादी बाबतीतले वर्तन विशद करणारी पुस्तके, माता, तरुण पिढी, मुले वगैरे सर्वांसाठी ख्रिस्ती कर्तव्ये समजावून सांगणाऱ्या पुस्तिका अशा प्रकारच्या साहित्याचा त्यात समावेश आहे. यातील सर्वच पुस्तके चिरस्थायी मूल्यांची आहेत असे मानता येणार नाही. कित्येक पुस्तके पहिल्या आवृत्तीपुरती मर्यादित राहिली. पण त्यातील काही पुस्तके पुढील आवृत्त्यांच्या रूपात वा आधारभूत पुस्तकांच्या रूपात पुष्कळ काळ उपयुक्त ठरली.

पहिल्या दहा वर्षांच्या कालावधीत सर्व ख्रिस्ती मराठी वाङ्मय निर्मितीचे श्रेय युरोपियन ख्रिस्ती मिशनरी लेखकांनाच द्यावे लागेल. प्रारंभीच्या काळात जे थोडे फार लोक ख्रिस्ती झाले, ते ख्रिस्ताच्या उपदेशानुसार मराठी भाषेत पुस्तके लिहू शकतील इतक्या ताकदीचे नव्हते. पहिल्या दहा वर्षांत युरोपिअन मिशनऱ्यांनी लिहिलेली २४ पुस्तके, पुस्तिका ख्रिस्ती मराठी वाङ्मयात तयार झालेली दिसतात. काही काळ ही संख्या ४० पर्यंत वाढलेली दिसते. आणि एतद्देशीय नवख्रिस्ती लेखकांच्या वाङ्मय निमितीस प्रारंभ झाल्यावर युरोपिअन ख्रिस्ती धर्मियांच्या महाराष्ट्रातील धर्म प्रसाराच्या व्यवहारास प्रारंभ झाल्यानंतरच्या ८० वर्षांचा जो आढावा (Catologue Marathi Christian Literature 1813–1892) मध्ये घेतला आहे.

त्यावरून या काळात ख्रिस्ती मराठी लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचे विषयवार विवरण पुढीलप्रमाणे.

इ. स. १८१३ ते इ. स. १८९२ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठी ख्रिस्ती पुस्तकांच्या वरील कॅटलॉगवरून या काळात ख्रिस्ती मराठी लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचे विषयवार विवरण पुढे केले आहे. पुढील तक्त्यांत या काळात विविध विषयावर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची संख्या दिलेली आहे. पण या कॅटलॉगमध्ये हिंदू लेखकांनी लिहिलेली सत्तर पुस्तके आहेत.

तक्ता "फ"

ग्रंथविषयक	ग्रंथसंख्या
संकीर्ण	२३५
वादविवाद विषयक	८९
उपदेशपर	८६
मुलांसाठी	८३
शैक्षणिक	५६
भक्तिपर	५०
काव्य	४१
इतिहास	३५
चरित्रात्मक	१७
स्त्रियांसाठी	१६
टीका इत्यादी	१४
खिस्तीधर्माचे पुरावे	११
विज्ञानपर	८
एकूण	७४१ *

त्यातील शेवटच्या दशकात मिशनरी लोकांची पुस्तके पुन्हा एकदम संख्येने भराभर वाढलेली दिसतात आणि या दशकात युरोपिअन मिशनरी लेखकांच्या पुस्तकाची संख्या ६० पर्यंत गेलेली दिसते. एतद्देशीय नवखिस्ती लेखकांनी मराठी वाङ्मय निर्मितीस हातभार लावल्यावर व त्यांचे त्या क्षेत्रातील कार्य वाढीस लागल्यावर मिशनऱ्यांनी मराठीतून पुस्तके लिहिण्याचे थांबविणे उचित होते, कारण काही झाले तरी, मराठी ही त्यांची मातृभाषा नव्हती, नेहमीच्या व्यवहाराची भाषा नव्हती. त्यांनी विद्वान पंडितांची मदत घेऊन काम करण्याचा प्रयत्न केला हे जरी खरे होते, तरी युरोपिअन मिशनऱ्यांच्या लेखनात काही ना काही उणिवा राहाणे शक्य होते. त्याचबरोबर हेही काही अंशी खरे असते की काही वाङ्मयप्रकारच असे असतात की केवळ विचार देवाणघेवाणीच्या पातळीवर ते वाङ्मय प्रकार आकाराला येतात. तिथे वाङ्मयीन व साहित्यिक मूल्ये विचारात घेण्याची आवश्यकता असते.

या देशात खिस्ती धर्माचा प्रसार सुरू झाल्यावर पहिल्या चाळीस वर्षांच्या कालावधीत मुंबई प्रांतात तरी नवधर्मांतरित खिस्ती लोकांकडून फार भरीव स्वरूपाचे वाङ्मयीन कार्य झालेले दिसत नाही. अशा खिस्ती लोकांची एवढ्या कालावधीत दहापेक्षा अधिक पुस्तके नाहीत. पण युरोपिअन मिशनरी लेखकांना मराठी लिहिण्या-

* यातून हिंदूंनी लिहिलेले ७० ग्रंथ वजा करावयाचे आहेत.

साठी लेखनसहाय्यक म्हणून त्यांनी मोठी कामगिरी केलेली दिसते. पाचव्या दशकात म्हणजे मिशनरी कार्यास प्रारंभ होऊन चाळीस वर्षे लोटल्यावर एतद्देशीय नवख्रिस्ती लोकांनी मराठीत लिहायला सुरुवात केलेली दिसते, याची काही कारणे स्पष्ट आहेत. मुख्य म्हणजे या दशकात रे. बाबा पदमनजी आणि रे. नारायण शेषाद्री यांनी लेखनास सुरुवात केली. दुसरे कारण म्हणजे 'ज्ञानोदय'चा उदय आणि त्यातून प्रसिद्ध होणारा मराठी विभाग व त्यास दिले गेलेले महत्त्व. इ. स. १८५० नंतर ज्ञानोदयाच्या मराठी विभागाची सूत्रे प्रथमच श्री. शाहू दाजी कुकडे यांच्याकडे सोपविली गेली. या सर्व गोष्टींचा निश्चितपणे असा परिणाम झाला की नव्यानेच ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या तरुण पिढीस या सर्व लेखनाने अधिकाधिक लेखनाची प्रेरणा दिली. रे. बाबा पदमनजी, रे. नारायण शेषाद्री, रे. शाहू दाजी कुकडे, श्री. शेख दाऊद, रे. रामकृष्णपंत व्ही. मोडक, श्री. सदोबा पवार, रे. हरिपंत आर. ख्रिस्ती ही या पाचव्या दशकातील उल्लेखनीय नावे आहेत. या नंतरच्या सहाव्या दशकात असे प्रेरणादायी लेखन रे. अप्पाजी बापूजी, श्री. कृष्णराव आर. सांगळे, शिदोबा बी. मिसाळ इत्यादींनी केले. इ. स. १८६३ ते १८७२ या सातव्या दशकातील काळात मात्र देशी मराठी ख्रिस्ती वाङ्मय फारसे वाढले नाही. परंतु त्यानंतर मात्र पुन्हा देशी ख्रिस्ती लेखकांचे मराठी वाङ्मय लेखन जास्त वृद्धिंगत झाले. इ. स. १८५० ते १८७० या दोन दशकाचे काळात वर उल्लेखिलेल्या लेखकांनी भरीव कार्य केले. इ. स. १८७३ च्या सुमारापासून ही लेखकांची संख्या वीस पर्यंत गेलेली दिसते. शेवटच्या इ. स. १८७३ ते १८८३ या दशकात तरुण पिढीने या लेखन कार्यास मोठ्या प्रमाणात हातभार लावलेला दिसतो. आणि एतद्देशीय नवख्रिस्ती लेखकांची संख्या २० वरून ६२ पर्यंत वाढलेली दिसते. शिक्षणाचा प्रसार व नव्या प्रकाशन संस्था उदयास आल्यामुळे ही वाढ शक्य झालेली दिसते. तसेच खासगी संस्था आणि सर्वसामान्य वाचकांकडून खाजगी वापरासाठी पुस्तकांसाठी मागणीचे प्रमाण वाढलेले दिसते. इ. स. १८७३ ते १८८३ या दशकांत जवळ जवळ १०८ पुस्तकांची भर पडलेली दिसते.

आणखी एक विशेष म्हणजे या काळात युरोपिअन ख्रिस्ती मिशनचे काम न करणारे पण धर्माने ख्रिस्ती असलेले युरोपिअन ख्रिस्ती मराठीत वाङ्मयनिर्मिती करताना दिसतात. असे लेखक म्हणजे कॅ. जे. टी. मोल्सवर्थ, मेजर थॉमस कँडी ह्यांनी कोश तयार केले. अशा युरोपिअन ख्रिस्ती लोकांनी या काळात एकूण ३० पुस्तके या प्रारंभीच्या काळात लिहिली. त्यात २० पुस्तके मेजर कँडीची आहेत. या लेखकानंतर युरोपिअन ख्रिस्ती लेखकांचे मराठी लेखन मंदावलेले दिसते.

यमुनापर्यटन अथवा हिंदू विधवांच्या स्थितीचे निरूपण

लेखक– बाबा पदमनजी, प्रका. इ. व्ही. पदमनजी, यशोदा भुवन, ग्रँट रोड–

ब्रिज, मुंबई. मुद्रक– वैभव प्रेस, मुंबई, सँडहर्स्ट रोड, मुंबई– ४. आवृत्ती ४ थी, १९३७. पृ, १७५.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती १८५७, दुसरी आवृत्ती १८८२, तिसरी आवृत्ती १८९० मध्ये व चौथी आवृत्ती १९३७ साली निघाली.

चौथ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत इ. वि. पदमनजी यांनी पुस्तकाच्या पुनर्मुद्रणासंबंधीची माहिती, तसेच या पुस्तकावर प्रा. पोतदार आदींचे आलेले अभिप्राय उद्धृत करून पुस्तकाचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसे इ. वि. पदमनजी यांनी प्रस्तावनेत बाबा पदमनजी यांची चरित्रात्मक माहिती थोडक्यात दिलेली आहे.

मराठीतील काही समीक्षकांनी या पुस्तकाला मराठी भाषेतील पहिली कादंबरी म्हटले आहे.

यमुनापर्यटन ही एक विधवाविवाह समस्येवर लिहिलेली कादंबरी आहे. तत्कालीन वातावरणानुसार चार बुकं शिकलेली गुणी यमुना व तिला अनुरूप सुशिक्षित विनायकराव हे बारकाईने समाज निरीक्षण करणारे व योग्य विचार करणारे असे आहेत. समाजातील विधवांच्या दुःस्थितीबद्दल त्यांना सहानुभूती आहे. यमूची शेजारीण गोदू, तिच्यावर केशवपनाची जबरदस्ती झाली असता पळून जाऊन तिने विहिरीत जीव दिला हे दृश्य यमुनेने जवळून पाहिले. गोदू विधवा झाल्यावर तिच्यावर घरच्या मंडळींनी तिच्याबद्दल काढलेले अनुदार उद्गार ऐकले व दाखविलेली हीन वृत्ती पाहिली. तसेच नवऱ्याबरोबर परगावी गेली असता वेणू नावाच्या विधवेस मिळणारी मोलकरणीची वागणूक, शिळेपाके खावे लागणारे अन्न आदी होणारे हाल या जोडप्याने पाहिले. तसेच कुळंबिणी मार्फत फसविली गेलेली विधवा व नंतर त्या विधवेने कुमार्गाला लागणे. अशी अनेक चित्रे त्यांना पाहायला मिळाली. त्यामुळे ती मनाने अस्वस्थ झाली व त्यांना सुधारण्यासाठी उपाय काय करता येईल याचा विचार करू लागली. पुनर्विवाह मंडळ स्थापनेसाठी त्यांची धडपड सुरू झाली. पण दुर्दैवाने यमुनेवर वैधव्याचा प्रसंग ओढवला. घरची माणसे त्यामानाने बरी वागली पण हिंदू संस्कारानुसार केशवपनादी गोष्टींचा छळ सुरू झाला. पण यमुना धीटपणाने एका बांधवाच्या सहाय्याने त्या अडचणीतून सुटली आणि ख्रिस्ती झाली. नंतर मनासारखा सोबती मिळाल्यावर पुन्हा विवाह करून सुखी झाली. अशी थोडक्यात या कादंबरीची कथा आहे.

ख्रिस्तीधर्म प्रसारासाठी हे कादंबरी लिहिली गेली असेही टीकाकार म्हणतात. सामाजिक पहिली मराठी कादंबरी असाही या पुस्तकाचा उल्लेख केलेला आढळतो.

यमुनापर्यटन – पहिल्या आवृत्तीचे विशेष –

प्रथमपृष्ठ

WANDERINGS OF YAMUNABAI
OR
NARRATIVES OF HINDU WIDOW LIFE IN INDIA

BY
BABA PADAMANAJI

WITH A PRELIMINARY ESSAY ON THE REMARRIAGE
OF HINDU WIDOWS
IN SANSKRIT

BY
DADOBA PANDURANG, ESQ
Author of " A Grammar of the Marathi Language "

" Ye shall not affliet any widow ", EXOD XXII 22
' Plead for the widow ' ISA 17
BOMBAY

Printed by Thomas Graham
1857

अनुक्रमणिका

हे पुस्तक मिळण्यासाठी प्रकाशनपूर्व वर्गणी भरलेल्यांची यादी अखेरीस दिलेली आहे त्यात–

(१) भास्कर दामोदर (पाळंदे) (२) प्रो. केरो लक्ष्मण
(३) गोपाळ हरी (देशमुख) (४) रावबहादूर नाना मोरोजी
(५) विष्णुशास्त्री (६) जोतिबा गोविंदराव
(७) महादेव गोविंद आदी तत्कालीन मोठ्या लोकांचा समावेश आहे.

ज्ञानोदयाच्या अंकात " यमुनापर्यटन " पुस्तकावर तीन भागांत परीक्षण प्रसिद्ध झाले. तत्कालीन ख्रिस्ती मराठी लेखकांच्या ग्रंथपरीक्षणाचे स्वरूप समजण्याच्या दृष्टीने परीक्षणाचा एक भाग देत आहे. प्रस्तुत परीक्षण ज्ञानोदय ऑगस्ट १५, १८५७ पृ. १५१-१५३ वरून घेतले आहे.

यमुनापर्यटन,

पुनर्विवाह आणि सुधारलेले लोक

ज्ञानोदयकर्ते यास-

विनंती विशेष.

महाराज, अलिकडे राजश्री बाबा पदमनजी यांनी यमुनापर्यटन या नावाने जो ग्रंथ केला आहे, त्याजविषयी इंग्रेजी व मराठी वर्तमानपत्रामध्ये पुष्कळ वादविवाद झाले आहेत; जरी मराठी भाषेमध्ये अशा उत्कृष्ट प्रकारचा हा पहिलाच ग्रंथ आहे तरी, त्याचा गुणग्रहण करून त्याची प्रशंसा करणाऱ्यापेक्षा, तो ख्रिस्ती मनुष्याने रचिला व त्यात ख्रिस्ती धर्माविषयी पुष्कळ लिहिले आहे, एवढयावरून दुराग्रह धरून त्याच्या विरूद्ध लिहिणारे असे फार आहेत. ज्यापक्षी हा ग्रंथ एतद्देशीय लोकांकरिता लिहिला आहे, त्यापक्षी जे काही इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये लिहिले गेले ते मराठी पत्रामध्येही लिहिले असते तर बरे होते. असो. या ग्रंथाविषयी आपणही काही लिहावे असे माझ्या मनात आल्यावरून यापुढील चार ओळी आपणाकडे पाठविल्या आहेत. त्यास कृपा करून आपल्या अमूल्य पत्रामध्ये जागा द्यावी.

या पुस्तकाची प्रस्तावना फारच सुरस आहे. तिजमध्ये आमच्या देशातील सांप्रतच्या सुधारणुकीच्या विराट स्वरूपाचे जे वर्णन केले आहे ते शब्दशः यथार्थ आहे, असे जे निःपक्षपाताने विचार करून पाहतील त्यास दिसून आल्याशिवाय राहणार नाही.

खचितच, ही सुधारणूक जरी अशा प्रकारची आहे की, या देशातील पन्नास वर्षांमागे मरण पावलेला एखादा वृद्ध गृहस्थ, किंवा आमचे प्रख्यात नाना फडणवीस, हे जर आज जिवंत होऊन उठले व या आपल्या देशाच्या स्थितीकडे अवलोकन करू लागले तर, आपण जसे जणू काय नव्या सृष्टीतच आलो आहो असे त्यास वाटेल. तरी तिचे वास्तविक स्वरूप इतके विलक्षण आहे की, हे स्मशानमुक्त नाना-साहेब तिची तसबीर उतरून घेऊ लागले तर खाली लिहिल्याप्रमाणे चित्र निघेल.

तिचे मुख गौरवर्ण, हात सुंदर, पाय काळे, व त्यावर कोड उठलेले. तिचे वस्त्र निरनिराळे पट एकत्र शिवून केलेले. त्यातील कित्येक पट मोठया मौल्यवान भरजरी साडीचे तुकडे आहेत, आणि कित्येक ठिकाणी त्यावर मळकट चिंध्यांची ठिगळ लाविली आहेत. कित्येक पट फार जुन्या व जर्जर झालेल्या वस्त्राचे आहेत आणि त्यांची किनारी कोठे साध्या व कोठे जर भरलेल्या रेशमाची आहे. तिचे

अलंकार पाहिले तर त्यातून कित्येक जडावाचे दागिने आहेत. तिच्या गळ्यात एक मोत्याचा हार आहे. आणि त्यातच मधून मधून फुटलेल्या कवड्या ओवल्या आहेत. तिच्या हातात सोन्याची कांकणे व कथलाचे वाळे, पायात रुप्याची पैंजणे व लोखंडाची वेडी, तेणे करून तिचे पाऊल पुढे पडत नाही. केवळ तिचे तोंड मात्र सुंदर असून पुष्कळ चांगल्या गोष्टी बोलते. ती आपल्या आहारार्थ नाना प्रकारचे ताजे व गोड पदार्थ बाजारातून विकत घेते, पण ते सर्व पोटभर खाण्यापूर्वी त्यास बहुत दिवस शिळे व आंबट आणि कुजट करून नंतर खाणे आणि कित्येक मौल्यवान पदार्थ तर तसेच तिच्या घरात पडलेले असतात. कधी कधी अन्नसामग्री असतानाही ती उपास करून आपणास नाना प्रकारचे रोग लावून घेते.

माझ्या देशातील हल्लीच्या सुधारणुकीच्या ह्या चित्राविषयी माझे मत जर विचाराल तर मी असे सांगतो की यात अतिशयोक्ती केली असे मला अगदी वाटत नाही. जरी आपले लोक विद्या शिकून ज्ञानी व विचारवंत झाले आहेत, तरी त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाकरितां शाळा स्थापिल्या आहेत व स्वार्थबुद्धी ब्राह्मणांच्या धोर्त्या-मुळे ज्या महार मांग लोकांचे आज हजारो वर्षांपासून मातेरे होत आले आहे, त्यांच्या विद्याभ्यासाचीही सोय केली आहे. तरी ते मोठमोठाल्या सभा करून त्यांत नाना प्रकारच्या उपयुक्त विषयांवर व्याख्याने देतात, जरी ते सुंदर सुंदर निबंध व ग्रंथ लिहितात, आणि वर्तमानपत्रे व मासिकत्रैमासिक पुस्तके चालवितात, जरी त्यांची इच्छा अशी आहे की आपला देश सद्‌गुणी, सधन व सुखी व्हावा, तरी त्यांच्या ह्या स्तुत्य उद्देशास जे अनेक प्रतिबंध आहेत ते दूर करण्याचे धैर्य त्यांच्यामध्ये कोठे आहे ? सुधारणूक होण्याचे जे योग्य उपाय आहेत ते जर त्यांनी केले, तर सुधारणूक त्यांना “ मी तुमच्या देशात येत नाही जा, ” असे कधी म्हणणार नाही. आमच्या देशाची बिघाडणूक झाली आहे त्यास वाटते, म्हणूनच सुधारणूक व्हावी अशी इच्छा ते धरितात आणि हे योग्यच आहे. पण नुसती इच्छा धरून किंवा तोंडाने पुष्कळ बडबड करून, किंवा लेखणीने भारेचे भारे कागद पांढऱ्याचे काळे करून लाभ काय ? एक धैर्य असले तर पाहिजे तो उद्देश सिद्धीस नेता येईल. पण मुख्य हेच नसले तर त्यांनी आपल्या जीवांचा कितीही आटापीटा केला तरी त्यापासून काही एक निष्पन्न होणार नाही. जर त्यांना वाटते की मूर्तिपूजेनेच आपले लोक फार अज्ञानी झाले आहेत, तर त्यांचे जे सुधारलेले मित्र आपल्या आप्तांच्या मर्जीस्तव दैवतार्चने करितात त्यांना व ज्या दुसऱ्या लोकांवर आपले वजन आहे, त्यांना याविषयी ते बोध का करीत नाहीत व सरकारने कोणत्याही देवस्थानास आश्रय देऊ नये म्हणून मुंबई असोसिएशनच्या द्वारे पार्लमेंटास अर्ज का करीत नाहीत ? जर त्यांना वाटते की जातिभेदाच्या योगाने लोकांचे फार अकल्याण होते व सुधारणकीस प्रतिबंध होतो, तर ते जेव्हा जेव्हा, प्रसंग पडतो तेव्हा तेव्हा सर्वां-समक्ष उघडपणे स्वतः त्याचा त्याग करून इतर लोकांत कित्ता का घालीत नाहीत ?

जर त्यांना वाटते की आमच्या लोकांस एकी व्हावी, तर ते सर्व जातीशी स्नेहभावाने व प्रीतीने का वागत नाहीत ? आणि ज्या विद्यालयात ब्राह्मणादि उच्च वर्णाची मुले शिकतात त्यात अंतेजाच्या मुलांस का येऊ देत नाहीत ? (कारण त्यांनी या अनाथ लोकांकरिता शाळा वगैरे घालून कितीही कळवळा दाखविला तरी ते असे समजतील की हे आम्हांस अजून नीच व अस्पर्श असे लेखितात. आणि असे समजणे स्वाभाविकच आहे.) तर अशाने एकी कशी होईल ? जर त्यांना वाटते की आमचे लोक सुदृढ झाले पाहिजेत, तर ते बालपणी लग्ने करण्याची चाल, आपल्या कन्या-पुत्रांची लग्ने अल्पवयात न करण्याकडून का बंद करीत नाहीत ? जर त्यांना वाटते की आमचे लोक सद्गुणी व नीतिमान व्हावेत तर त्यांच्या आप्तांच्या किंवा स्नेह्यांच्या घरी लग्न कार्यात नाच होतात, तेव्हा दरवाज्यातूनच माघारे फिरून असल्या नीच व निंद्य कर्मांचा आपणास त्रास आहे, असे का दाखवीत नाहीत ? व जेव्हा ते दूरस्थळी सरकारी हुद्द्यावर किंवा दुसऱ्या निमित्ताने सडेच जातात, तेव्हा रात्रीच्या आपल्या बिऱ्हाडी जारणी स्त्रिया न आणिता आपल्या कामास आकळून का धरीत नाहीत ? जर त्यांस वाटते की आमच्या स्त्रिया विद्वान व्हाव्या, तर त्यांच्यातील पन्नासातून केवळ एखाद्याच्याच बायकोस थोडकेसे लिहिता व वाचता येते याचे कारण काय ? व ते आपल्या मुलींचा अभ्यास पूर्ण होईतोपर्यंत त्यांस अविवाहित का राहू देत नाहीत ? व लोकापवादास भिऊन आपल्या वडिलांच्या मूर्ख चालीप्रमाणे आपल्या थानतुटक पुत्रांची लग्ने केल्यावरून ज्या चिमण्या चिमण्या सुना त्यास येतात त्यांना ते शाळांमध्ये का पाठवित नाहीत ? जर त्यास असे वाटते की, विधवांचा पुनर्विवाह चालू द्यावा, तर त्यांच्यातून ज्यांच्या लेकी किंवा सुना किंवा बहिणी गतभर्तृका झाल्या आहेत, त्यांची लग्ने का करून देत नाहीत व त्यांच्यातून जो कोणी विधूर झाला असेल तो स्वतः दुसऱ्या कुमारीशी लग्न न करिता एखाद्या दीन व अनाथ अबलेस वैधव्यरूप दुःखार्णवातून का मुक्त करीत नाहीत ? हे सर्व उद्देश आपल्या देशाच्या कल्याणास मोठ्या अगत्याचे आहेत व ते सिद्धीस नेणे हे आमचे कर्तव्य आहे असे जर त्यास वाटते, तर अशा महदाग त्याच्या कामात आळस केला असता आपण ईश्वराच्या समोर दोषी ठरू नये असे भय त्यांना वाटत नाही काय ? त्यांनी ईश्वरापेक्षा लोकांचे भय अधिक का धरावे ? आपले कर्तव्य पाळण्याकडून ईश्वराची कृपा मिळविली असता त्याचे जे कल्याण होईल त्यापेक्षा अशा अयोग्य रीतीने लौकिक मिळविण्याकडून काय अधिक होणार आहे ? ह्या लोकांनी हे पक्के समजावे की जे उपाय आपल्या हातचे आहेत, ते धैर्य धरून केले व ईश्वराचे साह्य मागितले तरच आपले हेतू सिद्धीस जातील, एरव्ही नाही.

यमुना पर्यटनच्या विरुद्ध लिहिल्याने यांचे हेतू सिद्धीस जातील काय ? मिस्तर बाबा पदमनजी यांनी हा जो ग्रंथ लिहिला आहे तो काय सुधारलेल्या लोकांच्या प्रयत्नांस विघ्न करण्याकरिता लिहिला आहे काय ? नाही, नाही, त्यात ख्रिस्ती धर्मा-

संबंधी मते आहेत, एवढयावरून कोणी असे बळेच बोलू लागेल तर लागो. मला तर असे अगदी वाटत नाही. तेणे करून बाबांनी एवढेच दाखविले आहे की, ज्या प्रकारचे उद्योग तुम्ही चालविले आहेत त्याही करून तुमचे उद्देश सिद्धीस जाणे कठीण आहे. खिस्तीधर्म जसा तुमच्या कामास अनुकूल होईल तसा दुसरा कोणताही धर्म किंवा कोणतेही मत होणार नाही आणि हे खरेच आहे. जेव्हा–जेव्हा मी आपल्या देशांतील सांप्रतच्या सुधारणुकीविषयी आणि आपल्या तरुण विद्वान देशबंधूंच्या प्रयत्नाविषयी विचार करतो, तेव्हा तेव्हा, खिस्ती धर्माविरहित जी सुधारणूक ती रानटी अवस्था होय, " अशी जी इंग्रजीमध्ये एक म्हण आहे तिची नेहमी आठवण होते. वास्तविक सुधारणूक म्हणून जिला म्हणतात ती खिस्तीधर्मावाचून होणे दुर्घट. ज्या देशामधील सुधारणुकीकडे पाहून आमचे लोक आपल्या देशाची सुधारणा करून पाहतात, तीच मुळी खिस्तीधर्मावाचून आली नाही. जर खिस्ती धर्म नसता तर ते देश हा काळपावेतो रानटी अवस्थेतही राहिले असते व कधीही उदयास आले नसते. मला वारंवार असे वाटले की जर कोणी या विषयावर सुंदर ग्रंथ रचून त्यात खिस्ती धर्माशिवाय सुधारणूक होणे अशक्य आहे आणि प्राचीन काळी ग्रीस व इटाली वगैरे नामांकित देशांत जी सुधारणूक होती ती काही कामाची नव्हती, हे सिद्ध करून दाखवील तर फार चांगले होईल.

यमुनापर्यटन वाचणारा एक.

खिस्त जयंती आणि वर्षप्रतिपदा यावर गीते

रे. ना. वा. टिळक, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई. मुद्रक – निर्णयसागर प्रेस, प्रथमावृत्ती १९०३. पृ. २४.

रे. टिळकांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपली भूमिका स्पष्ट केलेली असून या पुस्तिकेत पंचवीस कवितांचा समावेश केलेला आहे. त्यात ' जगाचा उद्धारक ' जगाचा तारक खिस्तबाळ जन्मले, खिस्त असा का जन्मला, जगाचा प्रकाश, नव्या शतकाबद्दल उपकार स्तुती अशा कविता आहेत. धार्मिक गीतांचा हा कविता संग्रह आहे.

निबंधमाला:– बाबा पदमनजी, प्रका. दक्षिणा प्राईज कमिटी, पुणे. शिला प्रेस, बाळकृष्ण रामचंद्र ठकार, १८६०, ४ १७८.

१८९२ साली प्रथम बाबांनी दक्षिणा प्राईज कमिटीस सादर केलेला ' सर्वसंग्रही ' हा ग्रंथच पुढे " निबंधमाला " या नावाने प्रसिद्ध झाला. (१८६०) व तो ही कमिटीतर्फे.

लोक कल्याणासाठी विविध व उपयुक्त विषयांवर नाना प्रकारची माहिती अगदी सरळ व साध्या पद्धतीने देण्याचा प्रयत्न या निबंधातून केलेला आहे.

या ' निबंधमाला ' मधे नाना प्रकारच्या धर्मांच्या उपासना, पंथांचा विचार केलेला आहे. या निबंधावरून त्यांच्या मनावर याही काळात ख्रिस्ती धर्माचा पगडा असल्याचे दिसून येते. याशिवाय "अलेक्झांड्रिया" मधील पुस्तकगृहांचा नाश " विलायतेची लक्ष्मी" " स्वदेशप्रिती " "बाजीराव पेशवे यांच्या अमलांत मराठी राज्याची व देशाची स्थिती ", " स्त्रीविद्याभ्यास " " पौर्णिमेची रात्र, ग्रहणे पहा, सृष्टीतील गुह्य गोष्टी अशा विषयावर निबंध आहेत.

या निबंध संग्रहास दक्षिणा प्राईज कमिटीने प्राईज देऊनही छापण्यास विलंब लावला व काही निबंध वगळले याबद्दल बाबा, ज्ञानोदय व स्पेक्टेटर यांनी नाराजी नोंदविली आहे.

अर्वाचीन ग्रंथकर्त्यांच्या अडचणी – बाबा पदमनजी, प्रभोदय, डिसेंबर १८६२ पृ. १०

डिसेंबर १८६२ च्या प्रभोदयामध्ये " अर्वाचीन ग्रंथकर्त्यांच्या अडचणी " हा निबंध प्रसिद्ध केला. त्यात मुद्रणाचा शोध, वाचकांची संख्या, लेखकांची संख्या, प्रकाशन कागद, छाप, अर्थविषयक विवंचना, टीकाकार, ग्राहक, संदर्भ, राजाश्रय इत्यादी अनेक बाबतीत पूर्वीचे ग्रंथकार व आताचे ग्रंथकार यांच्यात भिन्नता आहे. अर्वाचीन ग्रंथकारांच्या मानाने पूर्वीचे ग्रंथकार सुखी असे बाबांचे मत दिसते.

अनेक निबंध – बाबा पदमनजी, सी. बी. ई. सोसायटीकरिता लिहिलेले.

बाबा पदमनजी यांनी सी. बी. ई. सोसायटीसाठी अनेक निबंध लिहिले. ते निबंध नंतर सोसायटीने छापून काढले. अशी छोटेखानी स्वतंत्र निबंधरूपाची कितीतरी पुस्तके आहेत. हे सारे निबंध १० ते १५ पृष्ठांच्या मर्यादेत असल्याने त्यांची छपाई पुस्तिका स्वरूपाचीच आहे. अशा काही पुस्तिकांची नावे–

(१) वेद कोणी लिहिले. (२) मुहूर्त ज्योतिष. (३) मानवधर्मशास्त्र (मनुसंहिता कोणी लिहिली ?) (४) गणेश चतुर्थी. (५) गोकुळ अष्टमी. (६) रामनवमी (७) होळी (८) श्रावणी व नारळी पौर्णिमा.

अशा या पुस्तिकांच्या नावाने सूचित केला जाणारा विषय हाच त्या त्या निबंधाचा मुख्य विषय आहे. लोकांनी विचारपूर्वक वागावे या विचारास प्राधान्य आहे.

बाबा पदमनजींनी अनेक मृत्युलेख वेळोवेळी लिहिले आहेत. त्यात विष्णु शास्त्री पंडित, स्वपत्नी, पदमनजी माणिकजी, काशिनाथ विश्वनाथ, मोल्सवर्थ, रे. नारायण शेषाद्री, ज्योतिबा फुले, मिसेस् नारायण शेषाद्री, आदी व्यक्ती आहेत. हे मृत्युलेख, ज्ञानोदय, सत्यदीपिका आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत.

वनवासी फूल

कवी ना. वा. टिळक, प्रकाशक– ना. वा. टिळक, मुद्रक– इस्लाईट प्रेस, पुणे, १९१० पहिली आवृत्ती, १९३३ साली दुसरी आवृत्ती. प्रकाशक– देवदत्त

नारायण टिळक, सुदर्शन प्रेस, नासिक या आवृत्तीत मराठीतील अनेक साहित्यिकांच्या अभिप्रायातील उतारे दिलेले आहेत. वनवासी फुलाची पाचवी आवृत्ती १९६२ साली देवदत्त नारायण टिळक यांनी संपादून श्री. पु. ना. देशमुख यांनी नागविदर्भ प्रकाशन, अमरावतीच्या वतीने प्रसिद्ध केलेली दिसते. या खंडकाव्याचा थोडक्यात आशय असा–

एक कवी असाच फिरता फिरता निर्जन वनात पोचला. तेथे त्यास एक सुकुमार फूल दिसते. त्या वन्य फुलास पाहून कवी एका क्षणात त्याच्याशी तन्मय झाला. या तन्मयतेचे कारण कवी व निसर्ग यांचे परस्पर संबंध अत्यंत जवळिकेचे असतात. ते कसे असतात ते संदर्भात कवीने सविस्तरपणे सांगितले आहे. या नंतर काव्याच्या अखेरीपर्यंत कवी व ते फूल यांच्यात घडलेला संवाद निवेदिला आहे. या संवादातून असे कळते की, जगदीशाला अर्पण झाल्याने फूल स्वतःला सामान्य जगापासून बुद्धयाच दूर ठेवते आहे. भारावून गेलेला कवी हात पसरून फुलास कवटाळू पहातो, तेव्हा फूल कवीस दूर राहण्यास सांगते. या नवविकसित फुलाची ही जगापासून अलिप्त राहण्याची वृत्ती कवीस नवलाईची वाटते. एवढ्या लहान वयात जगाचा फारसा अनुभव नसताना ही विरक्तता योग्य नव्हे, असे कवीस वाटल्यावरून कवी त्यास या निर्जन रानातील एकाकी जीवनाचा फोलपणा स्पष्ट करून सांगतो. निर्जन वनात राहिल्याने या सुंदर फुलाचे जगातील अस्तित्वही कोणास कळत नाही. अशा विफल जीवनात काय अर्थ आहे ? म्हणून कवी फुलास शहरातील उद्यानात येण्याचा आग्रह करतो. परंतु फुलाचे म्हणणे असे की गजबजलेल्या शहरातील उद्यानात विनाशाचा संभव अधिक, कारण या संसारात, या जगात स्वार्थीपणा फार. या संदर्भात मग " नगरवासी हाही स्वार्थी, कपटी, ऐहिकास, चिकटून राहणारा आहे. प्रेमाच्या नावाखाली तेथे सगळा लोभाचा सुळसुळाट असतो. अशा जगात हानीच जास्त होते, " वगैरे विचार फूल कवीस ऐकवते. त्यावर कवी या संसाराची दुसरी बाजू स्पष्ट करतो. " जग हे मंगल, प्रेममय असून प्रेमापोटी सोशिकता, निःस्पृहता, स्वार्थत्याग हे गुण वाढीस लागलेले दिसतात. जगात प्रसंगी संतसज्जनांची संगत लाभते. त्यापुढे सर्व सुखोपभोग तुच्छ वाटू शकतात. केवळ परोपकारी वृत्तीने राहून जगातील दोष जिंकता येतात. " असे विचार सांगून कवी फुलास असा सल्ला देतो की अशा एकाकी अरण्यात आपला जन्म फुकट घालविण्यापेक्षा जगात जाऊन कोणा विरहिणीच्या, कुणा प्रेमळाच्या, कोणा पंडिताच्या या ना त्या प्रकारे उपयोगी पडावे हेच फुलास अधिक सुखाचे होय.

पण सुखाची ही सामान्य व्याख्या फुलास पटत नाही. अनाघ्रात अर्पण होणे फुलास अधिक योग्य वाटते .अखेरीस फुल ऐकत नाही असे पाहून कवी दुःखित, निराश मनाने निघून गेला. तो कोठे गेला तेही फुलास माहीत नव्हते. परंतु कवी निघून गेल्यावर फूल लगेच गळून पडले. कवी सांगतो की ते फूल कविहृदयी रमले

रे. टिळकांच्या कवी मनाचा विकास म्हणजेच "वनवासी फूल" असे काही टीकाकारांचे म्हणणे आहे. मराठीत अत्यंत चांगल्या खंडकाव्यांपैकी कालिदासाच्या मेघदूतानुसारी खंडकाव्याच्या स्वरूपाचे हे मराठीतील एक महत्त्वाचे खंडकाव्य आहे असेही काही समीक्षकांनी नोंदवून ठेवले आहे.

यात रे. टिळक भारतीय वैदिक तत्त्वज्ञानच कसे बोलून जातात, ते काही उतारे देऊन स्पष्ट केल्यास गैर ठरणार नाही.

सज्जनसंगापुढे तुक्याला इतर सुखाची भुक्ति ।
तुच्छ वाटली फार कशाला 'न लगे' बोले मुक्ति ।
चिन्तामणिची, कल्पतरूची कामदुधेची महती ।।
नाही नाही साधुसंगतीपुढे महात्मे वदती
किंवा
सुधा तृष्णा शीतोष्ण उपाधी जनी रहा वा रानी ।
चुकले नाहीत कधी कुणाला दुःख सौख्य वा मानी ।।
पुन्हा सांगतो जीवन आणि प्रेम भिन्न नच एक
प्रेमहीनता मृति, केवळ तो स्वार्थाचा अतिरेक
प्रेमासाठी सुखा विसरणे हीच सुखाची पूर्ति
प्रेमासाठी देहविसर्जन हीच खरोखर पूर्ति
प्रेमासाठी देहविसर्जन हीच खरोखर मुक्ति
प्रेम मुक्तिसुख, परमेश्वर हा, स्वर्ग हाच ये पाहू
प्रेमरूप ये होऊ आपण, देवासन्निध राहू.

सुशीला– कवी– नारायण वामन टिळक, निर्णयसागर प्रेस, मुंबई १९०८, पृष्ठे ४ + २४.

या पुस्तकाची प्रस्तावना इंग्रजीमध्ये लिहिलेली आहे. त्यात कवी म्हणतो.

(i) One aim in this poem has been in my mind to elevate the matrimonial relation between the two sexes our young men and women and all India needs such simple poems, teaching true, pure love and real worth of the position of married persons in life.

(ii) It is more than a sermon on Christ's view of matrimony and paranthetically on pride, repentance and humility.

(iii) We have no Marathi Poetical literature of our own and this is the beginning of trying to have it.

या दीर्घकाव्याचा आशय थोडक्यात असा सांगता येईल.

एका बोर्डिंगात शिकणारी सुशीला नावाची मुलगी आपल्या सुखी कुटुंबात सुट्टीला घरी येते. घरचे सारे जण आनंदित होतात. पण पित्याला आपली मुलगी आता उपवर झाली आहे याची जाणीव होते व आपल्या मोठ्या मुलाचा मित्र चारुदत्त यास द्यावी असे ते ठरवितात. चारुदत्त कुलशीलवान व सनातन विचारांचा होता, हे त्यांच्या दृष्टीने पुरेसे होते.

शिवाय चारुदत्तासही सुशीला प्रिय होती. पण सुशीलेच्या मनःप्रवृत्ती वेगळ्या रीतीने वळण घेऊ लागल्या होत्या. त्या गावच्या परिसरात तीच एकमेव शिकलेली स्त्री होती. रूपानेही सुशीला आकर्षक होती. आपले शिक्षण व सौंदर्य यांनी ती फुलून गेली. आता चारुदत्त तिला आपल्यापुढे कमी वाटू लागला. आपल्या घरच्या लोकांनी आपल्या विवाहाबाबत घेतलेला निर्णय तिला आवडला नाही. घरातील प्रेमळ, आनंदमय वातावरण बिघडून गेले. त्या स्थितीत सुट्टी संपवून ती परत बोर्डिंगमध्ये आली. घरचे लोक बोर्डिंगमध्ये तिला भेटायला येताना चारुदत्तासही सोबत घेऊन येत, ते तिला आवडत नसे. वार्षिक परीक्षा संपवून सुशीला सुट्टीत घरी आली. आता तर ती गर्वाने अधिक फुगली होती. त्यानंतर काही दिवसांनी तिला देवीचा आजार झाला. घरच्या सर्वांनी आणि चारुदत्तानेही मनापासून तिची सेवा केली. या आजारानंतर तिचे सौंदर्य लयास गेले. त्यानंतर अंतर्मुख होऊन विचार करता सुशीलेस आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप झाला. सर्वांनी केलेल्या प्रेमाच्या वर्षावाने तिला जीवनाचा खरा मार्ग कळला. पश्चात्तापाने शुद्ध झालेल्या सुशीलेने चारुदत्तास होकार दिला व सुशीलेच्या प्रेममय संसारास सुरुवात झाली.

काव्याचा सूर बोधवादी आहे. दातृत्वाला आपल्या घरापासून सुरुवात होते हे सांगताना टिळक लिहितात

> सर्व माझेपण एकवटे जेथे। जिथे प्रेमाचे राज्य सदाचे ते ॥
> स्वार्थ कपटाचा लेश नसे जेथे। जगी उपमा कोणती त्या गृहाते ॥
> जिथे नाही अभिमान कुणा ठावा। एकमेकांची जिथे सौख्य सेवा ॥
> जिथे परहित ते स्वहित मानवाते। जगी उपमा कोणती त्या गृहाते ॥
> भिन्न मूर्तिमधि चित्त एक जेथें। भोगि दुःखाते अनुभवी सुखाते ॥
> स्वर्ग वाटे हा मर्त्य लोक जेथे। जगी उपमा कोणती त्या गृहाते ॥

सुशीलेला असे आदर्श घर लाभले होते.

ख्रिस्ती धर्मांचे माहात्म्य कसे व्यक्त होते पहा–

> ख्रिस्त शिष्या आमुची परि सुशीला।
> सर्व शाळाहून भिन्न तिची शाळा।
> विवाहाचा ती अर्थ करि निराळा।
> जसा प्रभुने तिजलागी बोधियेला ॥ ५७ ॥

विवाह विषयक ख्रिस्ती धर्ममत सुशीलेच्या तोंडून व्यक्त होते-

पूर्ण विकसित जाहल्यावर दोन।
मने प्रेमाच्या बंधने करून ।
एक करून अर्पणे ईश्वराला।
म्हणे युवती उद्वाह नाम झाला ॥ ५८॥

टिळकांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोण असा दिसतो—

स्त्रियांमधला स्त्रीपणा जे हरीते।
असो ऐशा धिक्कार शिक्षणाते ॥ ९८ ॥
विनयशांती, धृति, सहिष्णुता, प्रीती।
सदा परमेशी एकनिष्ठ भक्ती ॥
स्त्रियांचे हे सौभाग्य अहंकारे।
हरून न्यावे विद्वत्व हे कसे रे ॥ ९९ ॥

खऱ्या पश्चात्तापाने माणूस देवाच्या जवळ जातो हे सांगताना ते लिहितात—

गरल अन्नी मिसळले तिच्या जेवी।
तिच्या तल्पा अनुताप आग लावी।
अनु तिचे ते अशी नवी मोत्ये।
किती आवडली सांगू ईश्वराने ॥ ११९ ॥

देवाला फक्त प्रेम हवे असते—

वपू विद्या वक्तृत्व वस्त्र वित्त।
वकारांना या लुब्ध मनुजचित्त।
चित्त देवा पाहिजे, नको काही।
मला देवाविण कुणी जगी नाही ॥

टिळकांनी आपल्या प्रस्तावनेतच म्हटले आहे की कविता केवळ ख्रिस्ती लोकांनाच नव्हे, तर इतरांनाही आवडेल अशी आहे.

ख्रिस्त जयन्तीची भेट

लेखक – अमृत भागाजी त्रिभुवन, प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट अण्ड बुक सोसायटी, मुंबई, मुद्रण लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, १९२१. (पंधरा पृष्ठांची छोटी कथा).

सुस्थितीत असलेल्या दादासाहेब वकिलांकडे नाताळच्या सणाचा आनंद सुरू होता. आपल्या कन्येस देण्यासाठी त्यांनी एक सुरेख बाहुली आणली होती. पण तिला झोप लागत नव्हती. तिला सकाळीच गोठ्यात जन्मलेल्या येशू बाळाची गोष्ट आईने सांगितली होती. ती कथा तिला सारखी आठवत होती. अकराचे ठोके पडले. खरेच, येशू बाळ आता गोठ्यात जन्मले असेल या उत्सुकतेने ही ५–६ वर्षांची चिमुकली पोर हळूच गोठ्याकडे गेली. पलीकडे असलेल्या वस्तीत हरिणा नावाची

गरीब स्त्री राहात होती. त्याच दिवशी तिचा फलटणीत नोकरीसाठी गेलेला नवरा मेल्याची तार आली. अगोदरच गरोदर असलेली हरिणा, त्या दुःखद बातमीने अकालीच बाळंत झाली. त्या नवजात बालकाचे रडणे या चिमुकल्या पोरीने ऐकले. तिला आईने सांगितले होते, त्यानुसार येशू बाळाचा जन्म झाला असे वाटले. हरिणा दुःखावेगाने व वेदनांमुळे प्रसूतीनंतर मरण पावली. ते नवजात बालक दादासाहेबांनी सांभाळले. वीस वर्षांनी बहिण भाऊ बोलत आहेत असा निवेदनाचा रोख आहे.

अखेरीस तुम्ही दीनांपैकी एकाला केले म्हणजे मलाच केले या येशूच्या उपदेशस्मरणाने कथा संपते.

कथालेखन सुरेख, औत्सुक्यपूर्ण, रसाळ पद्धतीने केलेले आहे. चटकदार निवेदनशैली असलेली ही बोधपर कथा आहे.

ब्रिटॅनिआ

कवी–नारायण वामन टिळक, प्रका. बी. एन्. कोतक, रास्ते पेठ, पुणे शहर, प्रथम प्रसिद्धी नोव्हेंबर १९११. दुसरे मुद्रण फेब्रु. १९१२.

पंचम जॉर्ज व मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज एस्. क्लार्क यांचे फोटो प्रारंभी दिलेले आहेत. प्रस्तुत काव्य गव्हर्नरला अर्पण केलेले आहे. सुरुवातीला राष्ट्रगीत The National Anthem आहे.

तत्कालीन इंग्रजी राजवट व इंग्रजी भाषेबद्दल असलेली भूमिका " The Argument " मध्ये व्यक्त होते ती अशी—

The English has become the common language of commerce of the world. It combines in itself the distinctive features of all human tongues and reveals through its medium the stores of knowledge that each possessed separately in olden times. English literature has been the means of liberalizing the ideas of the world.

कवी ब्रिटानिआचे आणि आपले संबंध सांगताना लिहितो—

ब्रिटॅनिए, मी हिंद भूमिचा तव भगिनीचा लाल,
आपणा उभयांमध्ये नसावे उपचारांचे जाल ॥ १ ॥

इंग्लंडची जगावरची सार्वभौम सत्ता म्हणजे ईश्वरीकृपा आहे असे टिळकांना वाटते. म्हणून ते म्हणतात–

एक राजसत्ता जी वरती प्रदीप्त सूर्य सदाचा ।
हेतू तुझा नच, नच जगताचा, परंतु हा देवाचा ॥ ३० ॥
सर्व जगाचा नाथ, पिता, सखा, सर्व जगाचा वाली
सर्व जगाच्या हिताकारणे तुजला पुढती धाली ॥ ३४ ॥

ब्रिटिश सत्तेमुळे आपणास काय काय शक्य झाले ते सांगताना ते म्हणतात,

त्राता, नेता, शास्ता, शिक्षक भिषग्वर्य आम्हाला
ब्रिटनिए तू झालिस, ईश्वर निवडी धाडी तुजला ॥ १४० ॥
तुझ्या कृपेने जगलो, आलो योग्य पथावर आम्ही,
तुझ्या कृपेने झालो आम्ही स्वदेशसेवाकामी ॥१४१॥
त्वांच शिकविले आम्हा आम्ही कोण, कशाला आहो
हे गुरुराया अनुग्रह तुझा असाच सतत राहो ॥१४२॥
" भो परमेश्वरा, करुणासागर, जगदीशा,
सकळ शुभाकर देवा. श्रीमज्जॉर्ज धराधिपतीतें
भवपथ सुखमय, कर, दे, अक्षय, आयुर्बल जय. "

प्रका. श्री. कोतक यांचे दोन शब्द असून, प्रस्तावना के. आ. कीर्तीकर यांनी इंग्रजीमध्ये लिहिलेली आहे. टिळकांच्या कवितेबद्दल लिहिताना ते म्हणतात.

" Mr. Tilak is a master of the saki metre, pure and perfect as his diction is, the thoughts are worthy of a polished well informed and sympathetic mind, full of genuine loyal feeling towards the British Government. "

टिळकपूर्व काव्याचा धावता आढावा घेऊन कीर्तीकर टिळकांच्या कवितेचे वैशिष्टय आणि महत्त्व विशद करताना म्हणतात—

" For nearly fifty years past, Marathi poetry has been in a state of transition. It is a desirable change. The old Marathi poets down to Moropanta and Raghunath Pandit, who based their metric compositions on themes from the Mahabharata and the Ramayana, the Shrimadbhagwata, the eighteen Puranas and some tales, well known Sanskrit poems like the Naishadha, have well high rendered the old themes effect. We want now for modern Marathi something more in touch with the progress of the twentieth century. Mr. Tilak's Britannia is the earnest of such a well needed and much-wished for undertaking. "

हरवलेला बाबू (The stolen bridegroom from Indian adylls)

मिस् ऑन्स्टीस ॲबट यांच्या पुस्तकावर आधारलेले 'हरवलेला बाबू' हे भा. पां. हिवाळे यांचे अनुवादित कादंबरीवजा पुस्तक, बॉम्बे बुक ॲण्ड ट्रॅक्ट सोसायटीने प्रकाशित केले, मुंबईच्या लक्ष्मीनारायण प्रेस मध्ये ते १९१७ साली छापले.

पृ. ४ + ५६, आकार ७.२ × ४ असून किंमत आठ आणे.

त्याकाळी “ विधवा विवाह ” समाज सुधारकांचा समाज सुधारणेचा महत्त्वाचा विषय होता. त्याच पार्श्वभूमीवर “ हरवलेला बाबू ” या पुस्तकातील विषय आहे. हिंदू विधवाविवाह व हिंदू विधवांची दुःखे यात सांगितली आहेत.

“ बाबू ” हा पाच वर्षांचा नवरा मुलगा लग्नाच्या जेवणावळीच्या गडबड घाईत कुठेतरी हरवतो. त्याबद्दल त्याला सांभाळणाऱ्या अल्पवयी विधवा काकूला जबाबदार धरले जाते. ही विधवा काकू म्हणजेच ‘ काशी ’ अशुभ, पांढऱ्या पायाची वगैरे विशेषणास पात्र ठरलेलीच होती. हा हरवलेला बाबू मिशनरी लोकांच्या मदतीने मोठा होतो, शिकतो व डॉक्टर होतो. जनसेवक डॉक्टर नावाजला जातो. तो हरवल्यावर अनेक वर्षे सापडला नाही त्यामुळे त्याची लग्नाची बायको ‘ अनु ’ हिला पण दुर्दैवी विधवेचीच वागणूक मिळते. पुढे ईश्वरी संकेताने ‘ हरवलेला बाबू ’ विधवा काकू काशी, विधवा ठरलेली तरुण पत्नी अनु, बाळूचे आई-बाप वगैरेंच्या गाठी पडतात. ओळखी, नाती पटतात. सर्व ठीक होते.

कादंबरीत बाबूने मिशनरी लोकांजवळ राहून ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याचे दाखविले आहे. कादंबरीचा मुख्य रोख काशी व अनु या दोन प्रकारच्या दोन विधवांच्या दुःखाचे चित्र उभे करणे व विधवा विषयीचे आधुनिक विचाराने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी विचारांना गती देणे यावर रोख दिसतो. कादंबरीची भाषा ओघवती व प्रासादिक आहे. मांडणी नेटकी आहे.

बालबोध गोष्टी भाग १ ला

प्रकाशक– बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक– श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई १९१८. पृ. ४ + २३६ (तपशील उपलब्ध झाला नाही)

बालबोध गोष्टी भाग २ रा

प्रका. बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक-श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई १९१८, पृ. ४ + १७२ (तपशील उपलब्ध झाला नाही)

बालोद्यान गाणी

संपा. बिसेल एमिलीबाई, प्रथम आवृत्ती, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीने श्री लक्ष्मी नारायण प्रेसमध्ये छापून १९२१ मध्ये मुंबई येथे प्रसिद्ध केले. त्यावेळी पृष्ठ संख्या ६+१२+९६ इतकी होती. दुसरी आवृत्ती आर. बी. डग्लस, सेक्रेटरी बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीने साऊथ मिशन इंडस्ट्रीजमध्य मुद्रित करून १९२४ साली प्रसिद्ध केली. पृ. ८३. दुसरी आवृत्ती मिस् हार्डिंग यांना अर्पण केलेली आहे. एमिली बिसेलची प्रस्तावना असून पहिल्या आवृत्तीपेक्षा फारच थोडी गाणी समाविष्ट केली आहेत, असे नमूद केलेले आहे.

दुसऱ्या आवृत्तींत एकूण १७५ गाणी आहेत. कित्येक गाण्यांच्या खाली कवींची नावे दिलेली नाहीत. नावे दिलेल्या कवींमध्ये टिळक, त्र्यं. बा. ठोमरे, भा. रा. तांबे, ज्युलियनबाई विसेल, दा. भा. पाळंदे, ताराबाई टिळक, मंजुबाला, दे. ना. टिळक, एच्. पी. ब्रूस, म. रा. इनामदार अशी काही नावे आहेत. टिळकांच्या कवितांचे प्रमाण जास्त आहे. बहुधा ज्ञानोदय, बालबोधमेवा इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कवितांचा संग्रह असावा. कारण काही कवितांखाली ' बालबोधमेवाच्या अंकातून ' असा उल्लेख आढळतो, तर 'समग्र कविता ज्ञानोदयात पहावयास सापडेल' अशी टीप दिलेली आढळते.

या पुस्तकात खालील विषयविभागानुसार कविता आहेत. (१) प्रातःकाळची गीते (२) अभिवादक गीते (३) बोटांचा खेळ (४) ड्रिलची गाणी (५) चेंडूचे खेळ (६) चक्राचे आणि दुसरे खेळ (७) बाहुलीविषयी गाणी (८) घड्याळाची गाणी (९) प्राण्याविषयी गाणी (१०) पक्ष्यांची गाणी (११) सृष्टिवर्णनाची गाणी (१२) कामनिदर्शक गाणी (१३) धंदेविषयक गाणी (१४) स्फुट गाणी (१५) ख्रिस्त जयंतीची गाणी(१६)सायंकाळची गीते (१७) समापनगीते (१८) छोट्या कविता.

बरीचशी बालगीते सुरेख तालसुरात म्हणता येण्यासारखी आहेत. हा बालगीतांचा संग्रह मराठी साहित्यात उल्लेखनीय ठरण्यासारखा आहे. सुधारलेली आवृत्ती १९४९ साली. संपादक– व्हीलर एडवर्डस यांनी आर्यभूषण छापखान्यात छापून प्रसिद्ध केली, काही ठिकाणी जास्त गाणी घातली आहेत.

२. टिळकांची राष्ट्रीय अस्मिता राखणारी परंपरा

इ. स. १९१३ साली अमेरिकन मराठी मिशनला मुंबई राज्यांत येऊन शंभर वर्षांचा काळ लोटला. त्या निमित्त मिशनने " शताब्दि " साजरी केली. त्या वेळी अमेरिकन मिशनने " ज्ञानोदयाची," खास पुरवणी, सप्टेंबर १९१२ त प्रसिद्ध केली. या अंकाचे संपादन केले होते रे. ना. वा. टिळक यांनी. रे. ना. वा. टिळक राष्ट्रीय प्रवृत्तीचे होते. या शंभर वर्षांनिमित्ताने भारतीय ख्रिश्चनांसंबंधी त्यांनी आपले विचार मांडले, त्यात ते म्हणतात, १८१३–१९१३ पावेतो आमचे जे शतक गेले आहे, त्याचे खरे चित्र काढावयाचे झाल्यास एका कागदावर १८१३–१९१३ हे आकडे शिरोभागी लिहून त्याच्या खाली एक मोठा पाळणा काढावा, त्याची दोरी अमेरिकेच्या हाती द्यावी, जवळच पांगुळगाडे, लहान बाळाच्या दूध पिण्याच्या बाटल्या ठेवाव्या, सारांश बालपणाचे निदर्शक असे सारे साहित्य रेखाटावे म्हणजे झाले. आपण एकोणिसाव्या शतकातले ख्रिस्ती आहोत. जगातल्या प्रमुख ख्रिस्ती राष्ट्रातल्या म्हणजे सुधारलेल्या राष्ट्रातल्या लोकांना आम्हाविषयी निःसंशय अधिक सहानुभूती आहे. त्या राष्ट्रांच्या सुधारणेच्या मूलतत्त्वांचे ग्रहण आम्हाला जितके लवकर करता येण्यासारखे आहे, तसे हिंदुस्थानातील कोणत्याही दुसऱ्या

समाजास नाही. विचारसरणीत पूर्व आणि पश्चिम यांचे अत्यंत उपयुक्त, अत्यंत मनोहर संमेलन होण्याचा संभव असेल तर तो आमच्या ठायी आहे.

आमच्या देशाचे भावी उद्धारक खरोखर आम्हीच आहोत. १८१३–१९१३ या शतकाचे खरे खरे स्मारक म्हणजे आमच्या स्थितीत आणि कृतीत फरक पडणे होय.

आम्ही आपला पाळणा सोडला. दायावाचून आमचे चालू लागले. आमच्या ठायी तारुण्याची काही तरी चिन्हे दिसू लागली. तर आमचे १८१३ ते १९१३ शतक संपले खरे" (ज्ञानोदय १८१३–१९१३, शतवर्षोत्सव अंक, ३ सप्टेंबर १९१२, पुरवणी.)

रे. टिळकांच्या राष्ट्रीय अस्मितेतून भारत आपला देश आहे, भारतीय भाषा आपल्या आहेत, भारतीय संस्कृतीच्या संदर्भात भारतीय ख्रिस्ती समाज घडला पाहिजे व जीवन जगण्यास समर्थ बनला पाहिजे अशी भावना व्यक्त होत होती. टिळकांच्या या विचारतत्त्वाशी सहमत असणारी मंडळी पुढे आली आणि टिळकांची एक विशिष्ट परंपरा तयार झाली. प्रसंगी ही मंडळी युरोपिअन ख्रिस्ती मिशनऱ्यांशी काही कारणांनी झगडली आणि आपली स्वतंत्र अस्मिता टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागली. त्यांची वाङ्मय निर्मितीची, सामाजिक जीवनाकडे बघण्याची दृष्टी युरोपियन मिशनऱ्यांच्या दृष्टीहून भिन्न होती. ख्रिस्ती धर्मश्रद्धा आणि भारतीय जीवन परंपरा यांच्या मनोहर संमेलनातून त्यांचे विचार व भावना व्यक्त होण्यासाठी साहित्य निर्मिती होऊ लागली. रे. टिळकांच्या या परंपरेतील कवी, लेखकांनी अनेक अंगांनी ही भूमिका वारंवार मांडली आणि आज सत्यवान सूर्यवंशीसारखे लेखक आग्रहाने आणि सडेतोडपणे मांडताना दिसतात. प्रार्थना मंदिरात म्हटली जाणारी प्रार्थनागीते भारतीय व महाराष्ट्रीय संगीतानुसार रचली व गायिली जावी असाही आग्रह ह्या मंडळींचा होता. रे. ना. वा. टिळक, श्री. कृष्णराव सांगळे आदी कवींनी अशा प्रकारची प्रार्थनागीतेही लिहिली आणि ख्रिस्ती समाजात लोकप्रिय केली. संघटितरित्या असा सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन चळवळीचा प्रयत्न इ. स. १८२३ पासून प्रत्यक्षात सुरू झालेला दिसतो. रे. ना. वा. टिळकांच्या विचारधारेत तयार झालेल्या, त्यांच्या विचारांनी व कृतीने प्रभावित झालेल्या तरुणांनी एक मंडळ स्थापन केले. त्या मंडळाचे नेतृत्व शाहूराव दगडोबा उजगरे यांचेकडे होते. त्या मंडळाचे नाव होते "श्रीख्रिस्तशिष्य टिळक मंडळ" या मंडळाची स्थापना अहमदनगर येथ सप्टेंबर १९२३ साली झाली. प्रत्येक वर्षी ख्रिस्ती साहित्यिकांचे एक पुस्तक प्रसिद्ध करावे असा या मंडळाचा उद्देश होता. पण पहिले पुस्तक बाहेर पडायला इ. स. १९२६ साल उजाडले.

तिलकानुग्रह

संपादक– शा. द. उजगरे, प्रका. अमृत भागाजी त्रिभुवन, वकील, अध्यक्ष टिळक मंडळ, अहमदगर, विजय प्रेस, ५७० शनिवार, पुणे पृ. १०१, इ.स. १९२६.

संपादक आपल्या निवेदनात म्हणतात, "ख्रिस्ती समाजात वाङ्मय लेखन व वाचन याची आवड व प्रसार होणे रे. टिळकांच्यामुळे घडले. सुरेख शब्दांतील त्यांची गीते व भजने दिवसानुदिवस अधिकाधिक लोकप्रिय होऊ लागली व त्यातून प्रेरणा घेऊन ख्रिस्ती समाजात मराठी वाङ्मय लेखनाची आवड असलेले अनेक कवी पुढे आले. रे. टिळकांच्या प्रेरणेने पुढे आलेल्या या कवींच्या कवितांचा हा संग्रह आहे. आणि याच कारणासाठी संग्रहाचे नाव 'तिलकानुग्रह' असे ठेविले आहे." पुढे उजगरे लिहितात, "श्री ख्रिस्तशिष्य टिळक मंडळासारख्या संस्थांच्या परिपोषास आवश्यक असणारी सुस्थिती अजून हिंदी ख्रिस्ती लोकांची नाही, हे मला स्वानुभवाने कबूल करणे भाग आहे."

प्रस्तावनेत लक्ष्मीबाई टिळक यांनी तत्कालिन मराठी ख्रिस्ती समाजाची वाङ्मयीन अवस्था कशी होती, त्याचे चित्र रेखाटले आहे व नव्याने उदयास येणाऱ्या कवींचे स्वागत व कौतुक केले आहे.

प्रस्तुतचा काव्यसंग्रह रे. टिळकांना अर्पण केलेला असून प्रारंभी टिळकांचे छायाचित्र छापलेले आहे.

या संग्रहात एकूण १८ कवी व कवयित्रींच्या कवितांचा समावेश केलेला आहे. त्यांची थोडक्यात माहिती अशी–

(१) यदुतनया–जन्म १८८१, बी. ए. पर्यंत शिक्षण, बरीच स्फुट कविता प्रसिद्ध असून नागपुराहून निघणाऱ्या "प्राग्ज्योति" नावाच्या पाक्षिकाच्या संपादिका.

(२) सौ. सोनूबाई काळे–जन्म १८९८, मृत्यू १९२२.

(३) रे. मनोहरराव तर्खडकर–जन्म १८७६, प्रौढपणी ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली. यांची बरीच स्फुट कविता प्रसिद्ध आहे. हे 'शिवकाव्य' नामक एक महाकाव्य लिहीत होते, ते अपुरे राहिले. त्यांचे अहमदनगर मुक्कामी इ. स. १९२५ साली निधन झाले.

(४) तात्या नामाजी पारधे–जन्म १८६५, किरकोळ कविता लेखन.

(५) रे. बाजी लक्ष्मण साळवी–जन्म १८७०. या कवीचा काव्य व्यासंग खूप होता. यांची "चमत्कार रत्नमाला", दृष्टांत, मुक्तहार वगैरे अनेक खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. यांची स्फुट कविताही प्रसिद्ध आहे.

(६) शंकर बलवंत कुलकर्णी–जन्म १८७१, यांची स्फुट कविता बरीच असून ती वेळोवेळी, "ख्रिस्ताश्रमवासी", "चिखलापूरकर", "क्षेत्रस्थ" इत्यादी टोपण नावांनी प्रसिद्ध झालेली आहे. १० फेब्रु. १८९२ मध्ये ख्रिस्ती झाल्यानंतर त्यांचा बराच काळ पंडिता रमाबाई यांच्या आश्रमात केडगाव येथे गेला.

(७) सदाशिव नारायण देठे-जन्म १८८६ व्यवसायाने निष्णात चित्रकार. यांच्या "बालक" या टोपण नावाने प्रसिद्ध झालेल्या स्फुट कविता खूप आहेत. यांच्या कवितेत प्रसाद गुण भरपूर आहे. अहमदनगच्या मिशन ट्रेनिंग स्कूलमध्ये "ड्रॉइंग मास्तर" चे काम करीत होते.

(८) देवदत्त नारायण टिळक-जन्म तारीख १६ जुलै १८९१. रे. ना. वा. टिळक यांचे चिरंजीव. "लक्ष्मीतनय" व "देवदत्त" या नावाखाली कविता प्रसिद्ध झाली. हे "ज्ञानोदय" साप्तहिकाचे संपादक होते, बालबोध मेव्याचेही संपादक होते.

(९) विश्वास कृष्णाजी गायकवाड-जन्म १८९३. "कृष्णसुत" नावाखाली काही स्फुट कविता प्रसिद्ध आहे. व्यवसायाने शिक्षक.

(१०) दशरथ विठ्ठल कदम-जन्म १८९३, व्यवसायाने कारकून, कविता लेखनाची आवड.

(११) भाऊ सखाराम बोडके-जन्म १८९४, व्यवसाय शाळामास्तर, कवितेची आवड.

(१२) शाहू दगडोबा उजगरे-जन्म १८९४, व्यवसाय सरकारी नोकरी, अनेकविध विषयांवर लिहिणारा व्यासंगी लेखक.

(१३) अमृत भागाजी त्रिभुवन-जन्म १८९७, नगरास वकीली करणारे पहिले सनदी खिस्ती वकील, एक क्रियाशील समाजसुधारक, ज्ञानोदयात व इतर नियतकालिकांत खूप स्फुट लेखन प्रसिद्ध झाले.

(१४) रत्नाकर हरि केळकर-जन्म १९०१, कवितेची आवड.

(१५) चिंतामण रेवजी गायकवाड.

(१६) गंगाधर अहिलाजी भालेकर.

(१७) सदानंद आ. फाटक-जन्म १९०६, नगरला मिशन हायस्कूल मध्ये शिक्षण.

(१८) प्रभाकर बळवंत गिरी-जन्म १९०७, नगरला मिशन हायस्कूल मध्ये शिक्षण.

निरनिराळ्या वृत्तांत कविता करणारे कवी. विषय ठराविक, विशेषतः धार्मिक विचारांवर कविता. काही निसर्ग आणि सामाजिक भावना व्यक्त करणारे. रविकिरण आणि केशवसुतांची कविता या मधल्या मराठी कवितेची वैशिष्ट्यं या काव्यसंग्रहात जाणवतात.

काळे खिस्ती

संग्राहक- शा. द. उजगरे, प्रका. विश्वनाथ लक्ष्मण शिंदे, मुद्रक दि. सी. साखळकर लोकसेवा प्रेस, खटाववाडी, गिरगाव, मुंबई.

प्रस्तावना–अमृतराव त्रिभुवन, पृ. ५४. (केसरी, ज्ञानोदय, मेसेज या वर्तमान पत्रांमधून प्रसिद्ध झालेला मजकूर).

शाहुराव स्वभावाने स्वतंत्र वृत्तीचे, निर्भीड, सत्यवक्ते आणि स्पष्टवक्ते होते. अन्यायाची त्यांना चीड होती. त्यांनी ज्ञानोदयाच्या १९ ऑगस्ट १९२६ च्या अंकात " काळे ख्रिस्ती " नावाची एक खळबळ उडवून देणारी कविता प्रसिद्ध केली. ख्रिस्ती समाजात तर या कवितेवर वावटळ उठली. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या आक्षेपार्ह पद्धतीने कार्य करणाऱ्या गोऱ्या निमगोऱ्या अधिकाऱ्यांच्या वर्गालाच श्री. शाहुराव उजगरे ' काळे ख्रिस्ती ' संबोधितात. मुळातून ही कविता उद्‌धृत करणे योग्य ठरेल.

काळे ख्रिस्ती

वाऱ्यावरती भरभर उडती जेवी पिकली पाने ॥
फिरतो आम्ही मुके बिचारे तुडवित अनुदिन राने ॥ १ ॥
मनुष्यतेला परके झालो आम्ही काळे ख्रिस्ती ॥
दैवाचे त्रैराशिक आमुच्या विराम पावे व्यस्ती ॥ २ ॥
उठलो आधिच जातिजातीतुन, स्वसंस्कृतीला परके ॥
अन्तर्मुख कधि होऊन बघति, वसति मनाला चटके ॥ ३ ॥
निमगोऱ्यांचे गोऱ्यांचेही ख्रिस्तीपण व्यवहारी ॥
परस्थ आम्हा मानी, करून छळणूक आमुची सारी ॥ ४ ॥
धर्मगुरूंची शिकवण अवघी कंठापासून वरती ॥
कळकळ कुठली तयांस जे की खिसे कसेही भरती ॥ ५ ॥
राज्याचा रथ डौलभराने चाले, चाले काळ ॥
स्वामींना त्या कुठली परवा, फुटके आमुचे भाळ ॥ ६ ॥
होय उन्हाळा संसाराचा, भविष्य झाले खाक ॥
सुखासुखी ही अशी आमच्या जन्माची हो राख ॥ ७ ॥
भविष्यकाळी अगणित होईल शापाची लाखोली ॥
जन्माआधी भावी पिढयांच्या सौख्याचिही होळी ॥ ८ ॥
खरे समजुनी भुलता ऐकून बक साधूच्या गप्पा ॥
सात जन्मही स्वसौख्य होई, बघता बघता सप्पा ॥ ९ ॥
जसे करावे तसे भरावे, बोंबाबोंब कशाला ?
जग म्हणजे ही अनुभूतीची फुका न म्हणती शाळा ॥१०॥

प्रास्ताविकात रे. ना. वा. टिळक यांची मिशनरीस संदेश ही कविता संपूर्णपणे उद्‌धृत केलेली आहे. ती अशी :

बांधा रे गाठोडी व्हा रे व्हा चालते ॥
जया नावडे हिंदु भूमी ॥ १ ॥

हात जोडितो मी प्रेमाविण कोणी ॥
नका ख्रिस्त वाणी खोटी करू ॥२॥
तारील आम्हाला सत्ता किंवा वित्त।
हीच समजूत आधी खोटी ॥ ३ ॥
नकोत आम्हाला पितरे दैवते ॥
बंधुत्वाचे नाते जोडा पाहू ॥ ४ ॥
दास म्हणे झाले काळा ते विसरा ॥
नवी वृत्ती धरा आज आधी ॥ ५ ॥

(अभंगान्जली, अभंग १६०).

प्रस्तुत पुस्तिका म्हणजे "मूळ" काळे ख्रिस्ती ही कविता व नंतर त्यावर उलट सुलट झालेली चर्चा यांचा संग्रह आहे.

अनामिकाचे प्रेमपत्र अर्थात नवे अंजन (खंडकाव्य) – शा. द. उजगरे,

अमेरिकन मिशन, सुदर्शन प्रेस, अहमदनगर, इ. स. १९२९ साली रचण्यात आले. प्रकाशन काळ दिलेला नाही. पृ. सं. २५.

शाहुरावांचे ' अनामिकाचे प्रेमपत्र अर्थात नवे अंजन ' हे खंडकाव्य हे त्यांच्या उत्कृष्ट काव्य रचनेचे द्योतक म्हणावे लागेल. शाहुरावांची कविता सामाजिक बांधिलकी मानणारी होती. अस्पृश्यता नष्ट करण्याकरता कष्ट करणाऱ्या डॉ. आंबेडकरांस त्यांनी आपले पुस्तक अर्पण केलेले आहे. इतकेच नव्हे तर डॉ. आंबेडकर यांच्या स्तुतीपर एक " फटका " ही रचून या पुस्तकात समाविष्ट केला आहे.

' अनामिकाचे प्रेमपत्र ' या खंडकाव्यात दिंडी वृत्तातील एकूण एकशे एकवीस श्लोक आहेत. काव्याचा नायक एका हरिजन कुटुंबात जन्मलेला आहे. (गावकुसाच्या बाहेरील नायक इ. स. १९३० च्या काळात मराठी काव्यात प्रथम येतो) लहानपणीच आईबाप मरतात. नातेवाईक असले, तरी जो तो आपापल्या विवंचनेत. अशा परिस्थितीत एक मिशनरी त्या बालकास सांभाळतो. येशूच्या शिकवणुकीत तयार झालेल्या त्या मुलास जातिभेद मान्य नव्हते. तारुण्यात आल्यावर त्याला एक तरुणी भेटली. ती त्याला आवडली. तिला आपल्याबद्दल ' तसे ' काही वाटत आहे हे तोही जाणून होता. असे असूनही त्या दोघांनी सभ्य सुसंस्कृत वर्तनाच्या मर्यादा कधी ओलांडल्या नव्हत्या. नायकाने प्रांजळपणे त्या तरुणीच्या वडिलांकडे लग्नाबद्दल विचारणा केली. तरुणीचे वडील जरी ख्रिस्तीधर्मी होते, तरी धर्मांतरापूर्वी उच्चकुलीन होते व तरुण धर्मांतरापूर्वीचा अस्पृश्य होता. त्या तरुणीच्या वडिलांनी त्या तरुणाचा अपमान केला, इतकेच नव्हे तर धिक्कार केला. जिच्या समवेत आपले आयुष्य कंठावे असे त्याला वाटले, ती तर लाभली नाहीच, उलट जन्माने लाभलेल्या जातीमुळे अपमान, धिक्कार व वियोगाच्या झळा त्याला आयष्यभर जाळीत राहिल्या. अशी करुण कथा

या काव्यात ओघवत्या प्रासादिक शैलीत शाहुरावांनी अभिव्यक्त केली आहे.

कवीची सामाजिक विचारसरणी आणि देशभक्तीसंबंधीची दृष्टी व्यक्त झालेली दिसते ती अशी,

इथुन पुढती आमरण दलितवर्गा ।
मान्यतेच्या लावीन नीट मार्गा ।।
हाच माझा संकल्प असे झाला ।
कधि न बदलो जो एक वार केला ।। १ ।।
देश माझा जो सर्व गुणनिधान ।
देव धर्मच ज्या नेहमी प्रधान ।।
करिन त्याचे हे कार्य यथाशक्ति ।
हीच वाटे मज खरी देशभक्ति ।। ४ ।।

प्रस्तुत लेखकाला शाहुरावांचे वरील तीन ग्रंथ "दी ग्लीमस ऑफ गांधी" ही प्रकाशित पुस्तके व "स्फूर्तिलता" हा हस्तलिखित काव्यसंग्रह अभ्यासता आला. इ. स. १९५१ च्या जुलै महिन्यात "भारत ज्योति" या इंग्रजी साप्ताहिकाने शाहुराव उजगरे यांचा "द क्रेडिट साईड ऑफ प्रोहिबिशन" या मथळ्याचा एक विस्तृत इंग्रजी लेख प्रसिद्ध केला व त्यातूनच "चोरटी दारू" नावाची एक अभ्यासपूर्ण पुस्तिका प्रसिद्ध केली. त्या पुस्तिकेच्या प्रस्तावनावजा "सारे विलक्षण" या निवेदनात शाहुरावांनी लहानमोठी अशी पुस्तके लिहिल्याची नोंद आहे. त्यात "माणुसकीचे मारेकरी", "मस्तवाल मिशनरी" हे मोठे ग्रंथ, लेखकास श्री. विष्णू विनायक उजगरे यांच्या प्रोत्साहनाने पुरे करता आले असे सांगितले आहे. प्रत्यक्षात हे ग्रंथ पहायला मिळाले नाहीत.

२३ डिसेंबर १९६७ साली शाहुराव उजगरे यांना प्रभूचे बोलावणे आले. त्यांच्यावरील "मृत्युलेखात", "आपण" कार लिहितात श्री. उजगरे व्यासंगी, प्रतिभावान तसेच फटकळ तोंडाचेही होते. त्यामुळे जन्मभर उपेक्षा सहन करावी लागली. स्पष्टवक्तेपणा त्यांना पावलोपावली नडला. उजगरे सारख्या साहित्य रत्नास कुर्ल्यास किराणा मालाचे दुकान टाकून मीठ मिरच्यांच्या पुड्या बांधाव्या लागल्या हे जितके केविलवाणे आहे, तितके चीड आणणारे होते.

मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास (१८१०-१९२७)

महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्य सेवा मंडळ, प्रथम गुच्छ, प्रथमावृत्ती, १००० प्रती, डिसेंबर १९३१, किंमत आठ आणे, प्रकाशक, रे. भास्कर कृष्ण उजगरे, चिटणीस, महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्य सेवा मंडळ, सासवड, जि. पुणे. मुद्रक- गणेश काशिनाथ गोखले, ४९५-४९६, शनिवार पेठ, पुणे २.

पुस्तकात प्रारंभी रे. जे. सी. विन्सलो यांचा आशीर्वाद आहे. त्यात ते

म्हणतात, त्यांना (महाराष्ट्रातील ख्रिस्ती जनांना) आपल्या राष्ट्राच्या परंपरागत आलेल्या ज्ञानभांडाराबद्दल वाटत असलेला अभिमान व आनंद, त्यांचा त्यावेळचा पोशाख आणि त्यांच्या संवादाचे ते स्वरूप यावरून कोणालाही दिसून आला असता. महाराष्ट्रीय ख्रिस्ती मंडळीचा स्वदेश वाङ्मय विषयक दृष्टिकोण कसा बदलून गेला आहे, ह्याची साक्ष हे संमेलन फार उत्तम प्रकारे देत होते........हे संमेलन अशा अनेक संमेलनांचे अग्रगामी ठरो. (पृ. १)

मनोहर कृष्ण उजगरे यांची ७ पृष्ठांची प्रस्तावना आहे.

त्यात ते लिहितात– नाशिक येथे १९२७ साली (१८ एप्रिल) महाराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांचे पहिले साहित्य संमेलन झाले. त्या संमेलनात सहा निबंध वाचण्यात आले. त्या लेखांचा संग्रह म्हणजे प्रस्तुत ग्रंथ होय. ख्रिस्ती लोकामध्ये मराठीत अशा तऱ्हेचे हे पहिलेच पुस्तक होय. तसेच हे पुस्तक प्रसिद्ध करणारी महाराष्ट्रातील हिंदी ख्रिस्ती लोकांची ही पहिलीच संस्था होय.

यातील पहिला निबंध– " मराठी वाङ्मय व ख्रिस्ती समाज " रे. डॉ. मॅकनिकल् या मिशनरी गृहस्थांचा आहे. त्यात ते म्हणतात, महाराष्ट्रातील ख्रिस्ती चर्चवर टिळकांनी जे थोर उपकार करून ठेवले आहेत, त्याचे बलवत्तर कारण हे की टिळक हे अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे स्वदेशप्रेमी गृहस्थ होते. त्यांच्या मनावर दोन गोष्टींची छाप बसलेली दिसून येते. या दोहोंच्या संयोगाने त्यांचे ठायी नवजीवन व स्फूर्ती ही उदय पावली. यांपैकी पहिली म्हटली म्हणजे पूर्वपरंपरागत चालत आलेल्या धर्मकल्पना. ह्या कल्पना त्यांच्या हाडीमाशी इतक्या खिळल्या होत्या की, त्या जागृत झाल्या असता त्यांच्या हृदयाला पाझर फुटत असे. दुसरी गोष्ट ही की, पाश्चात्त्य देशांच्या महाविद्वानांच्या व कवींच्या परिशीलनाने त्यांच्या नवीन कल्पनांची व साक्षात्कारांची टिळकांच्या मनावर बसलेली छाप. या दोनही संस्कृतींचा संगम त्यांचे ठायी झाला असल्याने ते सुंदर व मनमोहन असे कवी बनले.

दुसरा निबंध – महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्याचे सामान्य समालोचन व तत्संबंधी काही संकीर्ण सूचना हा रे. भा. कृ. उजगरे, सासवड यांचा निबंध असून यात या साहित्य संमेलनाची प्रेरणा, हेतू, पूर्व तयारी प्रारंभी निवेदन केली आहे व ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा संक्षेपाने पण नेमका आढावा घेतला आहे व मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठी महाराष्ट्रीय ख्रिस्ती समाजाने काय करावे त्या सूचना दिलेल्या आहेत.

तिसऱ्या निबंधात ख्रिस्ती मराठी पद्य वाङ्मयाचा आढावा श्री. शा. द. उजगरे यांनी घेतला आहे. त्यांनी त्यात कृष्णाजी सांगळयांच्या कवितेचे महत्त्व, रे.ना. वा. टिळकांच्या धर्मांतराचा परिणाम, टिळकांची कविता या संबंधी विस्ताराने विचार मांडले आहेत. लेखाच्या अखेरीस नव्याजुन्या कवींची नामावली दिली आहे. त्यात ३४ कवींचा समावेश आहे.

चौथ्या निबंधात– रावबहादूर बा. न. आठवले, मुंबई यांनी ख्रिस्ती महामंडळाचा धर्मग्रंथ, पवित्रशास्त्र या निबंधात प्रारंभापासून बायबलच्या भाषांतराचे वेळोवेळी झालेल्या प्रयत्नाचे मराठी भाषेच्या, संस्कृतीच्या दृष्टीने त्यांनी मूल्यमापन केले आहे. बायबल भाषांतरात झालेले कालिक फरकही तुलनात्मक दृष्टया स्पष्ट केले आहेत.

अहमदनगर येथील रा. दा. का. ढालवाणी यांनी "आमच्या ख्रिस्ती कादंबऱ्या, चरित्रे, गोष्टी व नाटके" यांचा आढावा घेणारा पाचवा लेख लिहिला आहे. त्यांनी हे साहित्य तीन भागांत विभागले आहे. (१) बाबा पद्मनजींचा काळ. (२) ना. वा. टिळक यांचा काळ. (३) हल्ली चालू असलेला काळ. बाँबे रिप्रेझेंटेटीव ख्रिश्चन काऊन्सिलच्या वाङ्मय कमिटीचा काळ. शेवटी आमचे वाङ्मय क्षेत्र बरेच संकोचित आहे व ते वाढविण्यास बरीच जागा आहे, असे म्हटले आहे.

शेवटचा म्हणजे सहावा निबंध पुण्याच्या रे. जे. एफ. एडवर्डसूचा आहे. निबंधाचे नाव "संत तुकाराम व ख्रिस्ती समाज" असे असून मराठी ख्रिस्ती मंडळ तुकोबाचे कसे ऋणी आहे ते त्यांनी विशद केले आहे.

ख्रिस्ती लेखकांच्या वाङ्मयीन कार्याचा थोडक्यात आढावा घेणारा इतिहास म्हणून मराठी ख्रिस्ती वाङ्मयात या ग्रंथाला मोठे महत्त्व आहे.

रे. टिळकांनी ख्रिस्ती लेखकांना मराठीत लिहिण्यास प्रोत्साहन दिले. इतकेच नव्हे तर एक वाङ्मयीन धारा मराठी साहित्याच्या प्रवाहात सामील होण्यास ते निमित्त ठरले. टिळकांच्या "धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे" या अधिष्ठानावर ही लेखक मंडळी उभी होती व आहेत हे लक्षात घ्यावे लागते.

ख्रिस्ती मराठी साहित्यिक चळवळींची पुढील काळातील वाटचाल पाहण्याच्या दृष्टीने या पहिल्या साहित्य संमेलनाचे व वाङ्मय इतिहासाचे महत्त्व लक्षात घेण्यासारखे आहे.

ख्रिस्तायन

नारायण वामन टिळक, लक्ष्मीबाई टिळक; प्रका. बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, भायखळा, मुंबई. द्वितीयावृत्ती (संक्षिप्त) डिसेंबर १९५९, किं. २॥ रु. प्रथमावृत्ती– डिसेंबर १९३८. (पारधे)

'प्रकाशकाच्या दोन शब्दांत' सांगितल्याप्रमाणे या पुस्तकास फार मागणी येत होती, शिवाय ईश्वरविज्ञान पाठशाळेत ख्रिस्तायनातील काही अध्याय शिकविले जात असल्यामुळे तेथेही या पुस्तकाची आवश्यकता भासत होती, व इतरांचीही सोय व्हावी म्हणून या पुस्तकाची ही संक्षिप्त आवृत्ती काढली. दुसऱ्या आवृत्तीचे संपादन दे. ना. टिळक यांनी केलेले आहे. पुस्तकाच्या अधिक उपयुक्ततेसाठी दोन्ही बाजूंच्या समासांत कठीण शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. या दुसऱ्या

आवृत्तीच्या प्रकाशनासाठी अनेकांनी अर्थसहाय्य दिले. त्यांच्याही नांदी आहेत.

ख्रिस्तायनाचे पहिले साडेदहा अध्याय ना. वा. टिळक यांनी लिहिलेले आहेत. नंतरचे कित्येक लक्ष्मीबाई टिळक यांनी लिहिलेले आहेत. शेवटला स्वर्गारोहणाचा अध्याय श्री. देवदत्त टिळकांचा आहे, असे एकूण ७६ अध्याय आहेत. अकराव्या अध्यायातील पहिल्या १०६ ओव्या ना. वा. टिळकांच्या असून पुढील ओवीपासून श्रीमती लक्ष्मीबाईंनी लेखन केले आहे, असे १० व्या अध्यायाच्या समाप्तीनंतर नमूद केले आहे. तसेच श्रीमती लक्ष्मीबाईंनी लेखनास अंतःकरणातील प्रतिभेचा व प्रेरणेचा उपयोग केलेलाच आहे. परंतु बाबा पदमनजीचे "येशू ख्रिस्ताचे चरित्र" नजरेसमोर ठेवले आहे, असेही त्या निवेदनात म्हटले आहे.

एकूण सर्व ख्रिस्तायनाच्या लेखनास तीन कवींच्या लेखणीचा हातभार लागला असला, तरी सर्व लेखनाची बांधणी मात्र सारखीच आहे. सर्व लेखन 'ओवी' छंदात आहे. प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी प्राचीन धाटणीप्रमाणे "॥ अथ ख्रिस्तायने मंगलनामा प्रथमो अध्यायः ॥" "अथ ख्रिस्तायने मार्यानाम चतुर्थोःध्यायः ॥" "अथ ख्रिस्तायने योहान्ननाम पंचदशोऽध्यायः ॥" "अथ ख्रिस्तायने प्रभुदर्शनामा षट्सप्ततितमौऽध्यायः ॥" असे लिहिले आहे.

श्री. ना. वा. टिळक यांच्या लेखनात (१) मंगल, (२) आत्मनिवेदन, (३) आश्वासन, (४) मार्या, (५) योसेफ, (६) दम्पती, (७) जन्म, (८) दर्शन (९) समीक्षक, (१०) प्रतिक्षण, (११) हेरोद असे विषय आहेत. श्रीमती लक्ष्मीबाईंच्या लेखनात डोंगरावरील उपदेश, दाखले, ख्रिस्ताचे दुःखसहन, पुनरुत्थान हे विषय आहेत व शेवटचा ७६ वा स्वर्गारोहणाचा श्री. दे. ना. टिळकांच्या लेखणीतून उतरला आहे.

'मंगल' नाम प्रथमोध्यायामध्ये विश्वात्मक परमात्मरूपास, सर्वपिता येशू ख्रिस्त, याकोब, योहान, सर्व प्रेषित वगैरेस प्रारंभीचे नमन केले आहे. 'आत्मनिवेदन' कवि स्वतः अत्यंत हीन, क्षुद्र कसा आहे, पण सर्वपिता प्रभू येशूबद्दल गहन भक्ती मनी आहे व त्यामुळे अपात्र नीच असूनही त्याच्या मुखे दयाघन प्रभू आता जे काही वदवून घेत आहे तेच सांगत आहे, अशी भूमिका स्पष्ट केली आहे. 'आश्वासना'च्या अध्यायात आदाम-ईव्हचा काळ, निषिद्ध फळाचे भक्षण, महापापाचरणाचे परिणाम, आणि 'तारणारा' येणार असल्याची ग्वाही, वगैरे सांगितले आहे. मार्येच्या चवथ्या अध्यायापासून पुढे ख्रिस्तचरित्र कथनास सुरुवात झाली आहे. ख्रिस्तचरित्राचे अन्यत्र आलेले सर्व विषय- कुमारी माता, जन्म, बालपण, यरूशलेम शहरास जाणे, वगैरे वगैरे या काव्यातही हाताळले आहेत. अर्थात चरित्र माहितीत फरक पडणे शक्य नसले तरी लेखनशैलीचा, आविष्कार धाटणीचा फरक जरूर जाणवावा. त्या दृष्टीने विचार केला असता या काव्यावर स्वतंत्र असे पुष्कळ लिहिता येण्याजोगे आहे. परंतु तूर्त एवढेच नमूद करावेसे वाटते की पूर्वीच्या भारतीय

संतांच्या रचना, संकल्पना, वगैरेंचे अनेक संस्कार या काव्यात उमटलेले दिसतात चरित्र कथनाची धाटणी, शैली, पूर्वसूरींचे ऋण, भक्तिरस, सरस काव्यात्मता इत्यादी अनेक अंगांनी सविस्तर अभ्यासावा, असा हा एक ग्रन्थ असून ख्रिस्ती मराठी वाङ्मयात तर निर्विवादपणे, पण अखिल मराठी वाङ्मयात मानाचा तुरा लाभावा असा हा एक उल्लेखनीय ग्रंथ आहे.

बोबडे बोल

संग्राहक– इंदिरा त्रिभुवन व के. स. ठोकळ, प्रका. इंदिरा त्रिभुवन, सेंट अुर्सला हायस्कूल, नागपूर, नागरिक छापखाना, नाशिक, १९३९. पृ. ४०.

प्रारंभी श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांचे छायाचित्र असून त्यांना ही पुस्तिका अर्पण केलेली आहे. प्रस्तावना दे. ना. टिळक यांची आहे.

'बोबडे बोल' हा अनेक कवितांचा एक छोटा संग्रह. यात केशव सयाजी ठोकळ, शांतवन सयाजी ठोकळ, सुहासचंद्र साळवी, सत्यवान नामदेव सूर्यवंशी, ज. आ. थोरात, खुशालभाऊ घोरपडे, डी. एल्. साळवी, मेघश्याम पिराजी जाधव, इंदिरा त्रिभुवन अशा कवींचा समावेश आहे. सर्व कवितांचे विषय त्या काळानुसार सर्वसामान्य असे असून त्या काळानुसार रचना आणि वृत्तांचा उपयोग केलेला आहे.

आकाशगंगा (मुलांसाठी बोधकथा)

लेखिका– डॉ. एमेली बिसल, प्रका. देवदत्त नारायण टिळक, नागरिक प्रकाशन, नाशिक, पृ. ८३. प्रकाशनकाळ दिलेला नाही.

डॉ. एमेली बिसल यांनी मुलांसाठी लिहिलेल्या बोधकथांचा हा संग्रह आहे. संग्राहक व प्रकाशक देवदत्त नारायण टिळक आहेत. पुस्तकावर काळाची नोंद कुठेच नाही. सदर संग्रहात एकूण चौदा कथा संग्रहित केलेल्या आहेत. लहान मुलांना कथेच्या माध्यमातून उत्तमोत्तम नीतितत्त्वे शिकविण्याचा प्रयत्न या कथांच्या निमित्ताने केलेला आहे. लेखनात अनेकवार देवबाप्पाच्या कृपेचा उल्लेख येतो. रे. ना. वा. टिळकांच्या कित्येक काव्यपंक्ती उद्धृत केलेल्या आहेत. गोऱ्यासाहेबांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याबद्दल गौरवोद्गार आढळतात. तसेच मुलांना चांगले वळण लावणारी व्यक्ती म्हणज मुलांची आईच होय, हा विचार प्राधान्येकरून गृहीत धरून चित्रे रेखाटली गेली आहेत. आफ्रिका, चीन, जपान, भारत अशा अनेक देशातील अडाणी, अशिक्षित, रानटी लोकांचे जीवनचरित्र या कथांतून पहायला सापडते. कथसाठी युरोपिअन मिशनरी बाईंनी केलेला मराठी भाषेचा वापर कौतुकास्पद आहे.

विमल गीत

यशवंत दिघे; प्रका. नीलकंठ रंगनाथ मकासरे, पुणे, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई. इ. स. १९४० (?) पृ. १२.

निरनिराळ्या प्रकारच्या गीतांचा संग्रह 'नाव घेण्याची मनाची हुरहूर' 'लागणी' 'गृहराणीस' अशा निरनिराळ्या कविता आहेत.

आदर्श ख्रिस्तीगृह

कु. सुलोचनाबाई जाधव, रे. मि. सुमंत धो. रामटेके प्रका. मिस. एफ. एफ. मास्टर्स, ऐवी टॉवर्स, पुणे, आर्यभूषण प्रेस, पृ. १९, इ. स. १९४३.

ही एक छोटीशी नाटिका आहे.

ख्रिस्ती गृहोत्सवाचा आठवडा वायल्डर मेमोरिअल चर्चने कोल्हापूर येथे नाताळच्या सणात इ. स. १९४२ मध्ये मोठ्या उत्साहाने पार पाडला. त्यावेळी शाहुपुरी येथील ख्रिस्ती तरुण मुलींनी आदर्श ख्रिस्तीगृह या नावाची नाटिका बसविली ती ही. तीन अंकी आहे. आशय थोडक्यात असा—

" चैनी बाजीराव मित्रांच्या संगतीने व सल्ल्याने वडिलांकडे आपला संपत्तीचा हिस्सा मागून घेतो व मुंबापुरीत येऊन अनिर्बंध चैन करू लागतो. चैनीत मश्गूल असलेल्या बाजीरावास, मित्रांचा कावा लक्षात येत नाही. मित्र नशेत बेशुद्ध पडलेल्या बाजीरावास फसवून किल्ल्या घेतात व सारा पैसा लुटून पसार होतात. बाजीरावाचे मुंबईतील घराचे भाडे थकते. शेटजी कायदेशीर वागतात. अखेरीस भिकारी अवस्था भोगताना बाजीरावास पश्चात्ताप होतो. आपला अपराध त्यास समजतो. बाप इकडे पुत्रासाठी अस्वस्थ असतो. अखेरीस बाजीराव बापाकडे येतो. अपराधाची कबुली देतो. बाप क्षमा करतो. "

मुलाने मातृपितृसेवा करावी, अपराधाची कबुली द्यावी, अपराधास क्षमा करणारे उदार मन असावे. असा हा ख्रिस्ती घराचा संतोष आहे.

आठ लघुकथा

प्रका. सु. ना. थोरात, पब्लिकेशन सेक्रेटरी, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, फिरोझशहा मेहता रोड, मुंबई. आर्यभूषण मुद्रणालय, पुणे ४; १९४६.

प्रस्तावनेत " तरुण, होतकरू, चांगल्या पण सुप्त लेखकास शोधून काढून त्यास उत्तेजन देण्याच्या उद्देशाने, नॅशनल ख्रिश्चन कौन्सिलच्या लिटरेचर फंड समितीने बी. आर. सी. सी. च्या मराठी लिटरेचर कमिटीस म्हणजे बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीस ११० रुपयांची देणगी दिली. सोसायटीने आठ पारितोषिके जाहीर करून लघुकथा स्पर्धा जाहीर केली. त्यातील आठ बक्षिसपात्र ठरलेल्या कथांचा हा संग्रह आहे. जीवनातील एखादा प्रश्न किंवा एखादे तत्त्व असे विषयांचे बंधन होते, असे सु. ना. थोरातांनी प्रस्तावनेत म्हटले आहे.

संग्रहात एकूण आठ कथा आहेत त्या अशा—

(१) रिकामे ढग—शांतवन सयाजी ठोकळ

(२) धर्माची किंमत—नंदकुमार दामोदर गायकवाड
(३) माझ्या प्रभु ख्रिस्ताकडे—नलिनी ओहोळ
(४) पिठात मीठ—दिपीकाबाई ठोकळ
(५) देवाचे साहाय्य—अनंत थोरात
(६) ब्राह्मण ख्रिस्ती—एबिनेजर जे. साळवे
(७) सुशीलाबाईंची मशीन—मधुमालती मकासरे
(८) गिरणबाबू—सुधाकर थोरात

एकूण सर्व कथा, स्पर्धेतील नियमानुसार ख्रिस्ती तत्त्वांचा प्रचार करणाऱ्या आहेत. लालित्यापेक्षा प्रचारकी थाटाच्या आहेत.

ख्रिस्ती गाण्यांचा व पोवाड्यांचा संग्रह - संग्राहक - रे. पी. एस. भोसले. प्रका. मिस. एफ. एफ. मास्टर्स, ऐवी टॉवर्स, लॉरेन्स रोड, पुणे १. आर्यभूषण मुद्रणालय, पृ. ४६. इ. स. १९४७.

रे. पी. एस. भोसले प्रास्ताविकात-"महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील ख्रिस्ती मंडळ्यांच्या गरजा लक्षात घेऊन या पुस्तकातील कोरसांचा आणि इतर गीतांचा संग्रह करण्यात आला आहे," असे म्हणतात. पोवाडे व इतर रचना सोडून त्या शिवाय या संग्रहात संग्राहक भोसले १९३९ साली हैदराबाद संस्थानात ख्रिस्तसेवा पाहण्यासाठी गेले असता, त्यांनी ठिकठिकाणी गाणी ऐकली. तेथील खेड्यांतून लहानमोठी मुले गुरामागे फिरताना, मोट धरताना, खेळताना वगैरे किंवा बायका दळताना, पाळणा हलविताना, गोवऱ्या थापताना वगैरे कामाचे वेळी अशी ख्रिस्ताची गाणी म्हणताना त्यांनी ऐकली. ती त्याला आवडल्याने संग्राहकाने संग्रहीत करून प्रसिद्ध केली.

तीव्र जाणीव

देवदत्त नारायण टिळक, नागरिक मुद्रणालय, आग्रा रोड; नासिक, प्रथम आवृत्ती १९४७. द्वितीयावृत्ती १९६३.

प्रारंभी Published with the aid of the Indian Literature fund of National Christian Council of India-Nagpur. अशी नोंद आहे.

अर्पण पत्रिका - "माझ्या परमपूज्य" मातापित्यास "तीव्र जाणीव" ही "बी" कवींची कविता छापली आहे.

प्रस्तुत कादंबरी म्हणजे "मालती नामक एक स्त्री"चे चरित्र आहे. लेखकास त्याच्या नगर नागपूर प्रवासात आगगाडीच्या डब्यात प्रस्तुत स्त्री भेटली. त्या गाडीस अपघात झाला. त्यावेळी लेखकास थोडीफार इजा झाली. पण डब्यातल्या त्या स्त्रीने

चांगली शुश्रुषा केली. प्रस्तुत स्त्री व तिच्या बरोबरची दोन मुले यांचे वर्तन फार सुशील होते. लेखकास त्या माणसाबद्दल आदर वाटला. त्या आदर व आपुलकी-पोटी मालतीबाईंची जीवनकथा औत्सुक्याने समजून घेतली. टिळकांनी १९४७ साली कादंबरीरूपाने ती माहिती प्रथम प्रसिद्ध केली. १९६३ साली या पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघाली.

प्रस्तुत कादंबरीत तत्कालीन हिंदी ख्रिस्ती समाजाचे प्रामाणिक चित्र रेखाटले आहे. त्यात हिंदी ख्रिस्ती समाजाचे अंतर्गत प्रश्न, हिंदी ख्रिस्ती जनतेस या काळातही ख्रिस्तीतर समाजाकडून मिळणारी वागणूक, प्रभू येशूच्या मोठेपणाचा परिणाम, इत्यादींचे चित्रण या कादंबरीत आहे.

संघटना : (स्वतंत्र सामाजिक कादंबरी)

लेखक– खुशालभाऊ शांतवन घोरपडे; प्रका. घोरपडे बंधू, मुद्रण– गोदावरी प्रिंटिंग प्रेस, नांदेड पृ. १०८, एप्रिल १९४८, किंमत २ आणे, (ठोकळ)

प्रस्तुत कादंबरी केवळ मनोरंजनाप्रीत्यर्थ लिहिली नसून समाजातील पंथभेद, जातिभेद, वैमनस्य इत्यादी अवगुणांचे निर्मूलन होऊन समाजाची सर्वांगीण सुधारणा व्हावी असा लेखकाचा हेतू आहे.

कादंबरीत तरुण तरुणींनी उच्चनीच भेद न मानता विवाह करावे, प्रेमापेक्षा तत्त्व श्रेष्ठ इत्यादी मते कादंबरीतील व्यक्तिचित्रणातून व्यक्त केलेली आहेत.

दिव्य आत्मयज्ञ नावाची कादंबरीवजा रचना प्रस्तुत लेखकाने केलेली आहे. प्रकाशन काळ उपलब्ध नाही. येशूला पकडण्यासाठी करण्यात आलेला कट, येशूचा वध, येशूचे पुनरुत्थान अशा प्रसंगातून येशूच्या आत्मयज्ञाची माहिती दिली आहे.

ख्रिस्ती तारुण्य

सौ. आनंदीबाई एम्. दामले, प्रका. व्रदर देशपांडे, वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे. न्यू श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस, जळगाव, दुसरी आवृत्ती १९५०. पृ. ३५. (ठोकळ)

ही एक छोटीशी कादंबरी आहे. अशोक, सुशीला, रॉबर्ट, सुधा इत्यादी पात्रांद्वारे ख्रिस्तप्रेमाची ओढ व्यक्त केली आहे. ख्रिस्ती तरुण-तरुणींना मार्गदर्शन करणारी व ख्रिस्तीतर तरुणींना वा तरुणांना ख्रिस्ताकडे खेचणारी आहे.

कादंबरीच्या अखेरीस एम्. ए. दामले यांनी केलेली पंडिता रमाबाईंवरील कविता छापली आहे.

ख्रिस्त जयंतीसाठी पाच नाटिका

लेखक– दे. ना. टिळक, नागरिक छापखाना, नाशिक, पृ. ८८ इ. स. १९५१. (ठोकळ)

ख्रिस्त जयन्तीसाठी म्हणून करण्याजोग्या अशा या पाच नाटिकांचा हा संग्रह आहे.

यातील ' मम हृदयी जन्मा घेई ' ही एकांकिका फक्त मुलांसाठी आहे.

विजया व उषा वर्गभगिनी. उषा श्रीमंतांची कन्या, विजयास उषाच्या घरी ख्रिस्तजयंतीच्या समारंभास बोलावले आहे. विजया येशूमय मनाची– त्यांच्याच वयाच्या तिच्या घरीच आश्रित असलेल्या यमुना व गोदावरीस उषेने बोलाविले नाही. विजया जात नाही. विजयास निरोप सांगावयास आलेल्या उषाने विजयाचे भक्तिमय येशूगीत ऐकलेले असते. त्यातून बोध मिळून तिला आपली चूक कळते. तीही येशूमय होते. उषा यमुना व गोदावरी यांना स्वतः न्यायला येतात. नाटिकेची भाषा व मांडणी नेटकी आहे.

(२) **सॅन्टॉक्लॉज**– लहान मुले ख्रिस्त जयन्तीनिमित्त मोठ्या माणसांना चकीत करून प्रेझेंट द्यावयाचे ठरवितात. अडगळीच्या खोलीत गुप्त खलबते चालू असतात. अगदी छोट्या मंडळींच्या पसंतीनुसार गोट्या, आगगाडी, बाहुली, शिटी, पेपरमिंट अशी बक्षिसे जमतात. सॅन्टाक्लॉज निखालस बोवा सांगतो ही बक्षिसे मोठ्या माणसांना पसंत पडणार नाहीत. मुले नाराज होतात, त्यांच्यातील मोठ्या मुली मुलांचा प्रश्न सोडवतात. हार तुरे, गुच्छ ही बक्षिसे दिली जातात.

बालमनाचे दर्शन घडविणारी, बालमनाच्या वातावरणाची ही एक छान नाटिका आहे. मोठ्या माणसांचे संवाद पडद्याच्या आतून आहेत.

चला चला बघू बाळ चला – सत्यशील व सुशीला दोन्ही छोटी मुले खाऊच्या जमलेल्या पैशातून बक्षिस आणायला जातात. पाच आणे जवळ असतात. बाहुलीची किंमत सहा आणे मग दादाला काय उरणार ? पण सज्जन दुकानदार ती गोड मुले पाहून बाहुली फुकट देतो. तेवढ्यात म्हातारा बाप खेकसतो. सर्वांना टाकून बोलतो. रात्री देवदूत येऊन म्हाताऱ्याला खूप बोध करतात. म्हाताऱ्यास पश्चात्ताप होतो. आईच्या सांगण्यावरून मुले पैसे द्यायला येतात. पण पश्चात्तापदग्ध म्हातारा व दुकानदार त्यांचे कौतुक करतो. मुलांना परतायला उशीर होतो म्हणून मुलांची आई शोध घेत येते. सर्वजण आनंदाने भेटतात. मुलांना आजोबा व मामा भेटतात. म्हाताऱ्यास गुणी मुलगी भेटते. भावास बहीण मिळते. ख्रिस्त जयंती आनंदात साजरी होते.

(४) **नवीन मार्ग** – लहानपणी दुर्दैवाच्या चक्रात सापडलेले व सर्वांकडून हिडीसफिडीस करून वागणूक मिळालेले गंगाप्रसाद व भोलानाथ पुढे अट्टल चोर, दरोडेखोर बनतात. ख्रिस्त जयंतीचे दिवशी धर्मसिंग साधू येऊन त्यांचा हृदयपालट करतो. मग ते सदाचरणाच्या नवीन मार्गाने जातात.

(५) **राजेन्द्राचा शोध** – मूक नाटक आहे. येशूच्या जीवनातील दृश्यांवर आधारलेले आहे.

ख्रिस्ताची तत्त्वे विशद करणाऱ्याच सर्व नाटिका आहेत.

टिळकांची कविता

संपा. भास्कर कृष्ण उजगरे, प्रका. देवदत्त नारायण टिळक, नागरिक मुद्रणालय, शांतिसदन, आग्रा रोड, नाशिक, चवथी आ. १९५१. या पुस्तकाची पहिली आवृत्ती इ. स. १९१४ साली मनोरंजन प्रेस, मुंबई येथे छापून प्रसिद्ध झाली. तिसरी आवृत्ती १९४० साली केशव भिकाजी ढवळे यांनी छापून प्रसिद्ध केली आणि चवथी १९५१ साली देवदत्त नारायण टिळक यांनी प्रसिद्ध केली. त्यांनी चौथ्या आवृत्तीच्या प्रास्ताविकात टिळकांच्या कवितांचे दोन भागांत प्रकाशन करण्याचा मनोदय व्यक्त केला. एक काव्यात्मक कविता आणि दुसऱ्या धार्मिक कविता.

पहिल्या आवृत्तीच्या " संपादकाचे " चार शब्द सांगताना म्हटले आहे- या पुस्तकात आलेल्या कवितांचा संग्रहसुद्धा स्वतः कवीने केला नसून तो मीच करून ठेवला होता व तो आता प्रसिद्ध करण्यासंबंधाने कवीनी गुरूच्या व मित्रत्वाच्या नात्याने योग्य ते साह्य केले असले तरी या कामी मला मुख्यतः साह्य त्यांच्या कवितेच्या भोक्त्यांकडून झालेले आहे. तसेच या संग्रहाला नरसिंह चिंतामण केळकर यांनी उपोद्घात लिहिलेला आहे. त्यांनी टिळकांची तुलना रवींद्रनाथ टागोरांशी करून त्यांच्या साहित्यकृतींचा गौरव केलेला आहे.

संपादकांनी टिळकांच्या कवितांची तेरा विभागांत मांडणी केलेली आहे.

पहिल्या विभागात " कवि आणि काव्य "

काव्याचे आणि कवीचे परस्पर संबंध व रसिक कवी यांचे संबंध सांगितले आहेत. रसिक-कवी संबंधात कवी लिहितो—

> दृष्टिविना दृश्य करील काय ?
> चैतन्य जे त्यावीण रम्य काय ?
> रसज्ञ हो काय तुम्हाविना मी
> करू जगी घेऊन काव्य नामी ?

नंतर " कवीची विनवणी " आहे. त्यात—

> कारण कवने नच माझी । नच तुमची मी गातो जी
> ही निःश्वसिते । कोण सोडिते । मम हृदयी, ते–
> विचारूनी, भिऊनी त्याला पुढे करा मग कर आपुला ।।

कवीची मानसिक अवस्था सांगताना टिळक लिहितात—

> वर देवदूत बसले, कवि हृदयाच्या धरून कीलाते ।
> नाचविती करविती कविवाणीच्याकडून लीलाते ।

याचा गर्व कशाला ? बोलविता तो धनी निराळा हो ।
कविच्या द्वारा रसिका काव्यरसाचा करून दे लाहो ।

नंतर " तुम्ही कवि भिकारिण मी हो, तुमच्या दारी "
असे म्हणणारांस कवी उत्तर देतो
" प्रकाश तिमिरातुनी हळुहळू पुढे धावतो. "
प्रसन्नपण लोक हा निरखुनी जया वापतो,

" कवीचे उद्यान " या कवितेत काव्यविश्व हे स्वर्गाच्या उद्यानाहूनही श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे.

निसर्गपर कवितात—" सृष्टीची भाऊबीज " बाह्यसृष्टीचे आणि अंतःसृष्टीचे गानवादन, सृष्टीची करमणुकीची घटका, पर्वतारोहण आदी कवितांचा समावेश आहे. चवथा भाग म्हणजे " सुशीला काव्य. " त्या संबंधी अन्यत्र उल्लेख आलेला आहे.

पाचवा विभाग– माझी भार्या– प्रथम ही कविता १८८७ साली प्रसिद्ध झाली. त्या कवितेच्या अखेरीस खालील चरण आहेत.

केले काव्य, परंतु यात मम हो संबंध कांही नसे,
मित्रांनो ? जरि वाचितांच तुमच्या वाटेल चित्ता तसे ।
येथे नायक कल्पिला करितसे भार्यागुणांची स्तुति ।
तेंणे ती नकळे मदीय अथवा मग्देहिनीची स्थिती ।।

पुढे ते म्हणतात—

" मला कोणी कोणी उगीच जन हे स्त्रैण म्हणती ।
न जाणोनी कीं स्त्रीपुरुष मिळूनी दोन नसती ।
अहा अंगे जीची, अनुपम अशी शक्ती विलसे ।
पसारा तीचा हा, तिजविण कुठे काहिंच नसे
असो ते, राहु द्या, परि खचित सांगा मज कुणी ।।
कुडीला जीवाने अलग गणणे काय म्हणुनी ।
मला सांगा वाणीसह युत सदा अर्थ असला ।
म्हणोनी तो स्त्रैण प्रकट बुध, हा न्याय कसला ।।

पवित्र सप्तक (पोवाडारूपाने)

शाहीर– रामभाऊ बंडोपंत सगळगिळे, प्रका. टी. एच्. वीरकर, सेक्रेटरी बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई. पृ. १४ आवृत्ती पहिली १९५१ (ठोकळ)

जुन्या ऐतिहासिक पोवाड्यांच्या धर्तीवर ख्रिस्त जीवनातील पवित्र सप्तकाच्या आशयावर काव्य रचना केली आहे.

मुलामुलींसाठी कथात्म उपदेश

मूळ लेखक–चार्लस् एन्. थॉर्प, अनुवादक–ध्रुव देवदत्त टिळक, ‡
प्रका. एफ् एफ. मास्टर्स, आयव्ही टॉवर्स, लॉरेन्स रोड, पुणे १.
आर्यभूषण प्रेसचे मुद्रणालय, पुणे ४. १९५०. पृ. १४४.

(जेसुईट फादर्स नगर).

येशू ख्रिस्ताचे जीवनचरित्र, काही प्रेषित, ख्रिस्त शिकवणी इत्यादींचा बोध करणाऱ्या कथा या पुस्तकात आहेत. एकूण ३७ कथा आहेत. प्रत्येक कथेच्या प्रारंभी पवित्र शास्त्रातील वचने संदर्भ क्रमांकासहित दिलेली आहेत.

सर्वच कथा अतिशय चित्तवेधक आहेत. लेखनशैली भावपूर्ण, रसाळ व चटक-दार आहे. कथेची मांडणी हळुवार असून विषय अलगद उलगडत नेला आहे. किशोर वयातील मुलांना गोष्टी आवडतील. कथांचा शेवट बहुतेक वेळा अंतःमुंख करणारा आहे. एक सुरेख कथासंग्रह म्हणून स्वतंत्र महत्त्व द्यावे इतका महत्त्वाचा कथासंग्रह आहे.

रॉबर्ट रेक्स – (शाब्बाथ शाळा चळवळीचे जनक)

मूळ लेखिका–हेटी पॉल, अनु. के. स. ठोकळ, ज्ञानोदय, नोव्हे. १९५३ चे अंकातील लेखांचे पुनर्मुद्रण.

---

‡ ध्रुव देवदत्त टिळक हे देवदत्त नारायण टिळक यांचे पुत्र. यांनी लिहिलेल्या पुस्तकांची माहिती प्रा. अशोक टिळक कळवितात ती अशी—

(१) दोन नगरींची कहाणी
(२) संदेष्ट्यांते वाट पुसत
(३) सेवा
(४) धनगराचे पाहुणे
(५) साधेभोळे मेंढपाळ (नाटिका)
(६) नाझरेथकर येशू नावेतून चालला आहे (नाटिका)
(७) वधस्तंभाचे आवाहन (नाट्य प्रयोग)
(८) जगत्प्रकाश
(९) बरब्बा (धार्मिक नाटिका)
(१०) आरिमथाईकर योसेफ (नाटिका)
(११) गालील देशाची मुले (नाट्यप्रयोग)
(१२) चवथा मेंढपाळ (नाट्य प्र.)
(१३) जांभळ्या वस्त्राची विक्रेती (नाट्य प्र.)
(१४) नव्या जगाचे मेंढपाळ.

ही लहानशी ७-८ पानांची नाटिका आहे. रस्त्यावर उनाडपणा करून गटारांत लोळणे, चिखल फेकण, मारामारी करणे, वाचावाची यातच गुंग होणाऱ्या मुलांना रॉबर्ट रेक्सने शाळेची गोडी लावली, दारू पिणारांनाही शाब्बाथ शाळेने वेगळे वळण दिले. सर्वच शहर शाब्बाथ शाळेच्या वळणाने बदलले व शहरात शांतता, स्वच्छता, सौंदर्य निर्माण झाले, असा आशय व्यक्त करणारी नाटिका.

ख्रिस्त जयंतीसाठी आणखी चार नाटिका

लेखक व संग्राहक–दे. ना. टिळक, नागरिक प्रेस, नाशिक १९५४ (?)

पुस्तकास प्रस्तावना नाही. प्रकाशन सालाचा उल्लेख नाही पण " श्री. के. स. ठोकळ यांस सादर सप्रेम भेट "

दे. ना. टिळक २९–११–१९५४, असे या पुस्तकावर काळ्या शाईत हस्ताक्षरात लिहिले आहे. त्यावरून प्रस्तुत पुस्तक १९५४ वा तत्पूर्वीचे असावे असे मानता येईल.

या संग्रहातील चार नाटिकांपैकी दोन दे. ना. टिळकांनी लिहिलेल्या आहेत व दोन इतरांच्या संग्रहित केलेल्या आहेत.

(१) सुखाची माळ (२) ख्रिस्त जयंतीचा बक्षिस समारंभ (३) ख्रिस्त जन्म (४) मार्गी.

या चारही नाटिका प्रयोगशील व भाषेच्या दृष्टीने चांगल्या आहेत.

उपेक्षित पाहुणा – मूळ लेखक – रे. एम्. जी. गोसेलिंक.

अनुवादक – र. ना. हर्षे, प्रकाशक – र. ना. हर्षे, डब्ल्यू. डी. सी. मेथॉडिस्ट चर्च, बॉम्बे कॉन्फरन्सकरिता, आयव्ही टॉवर्स, लॉरेन्स रोड, पुणे १. मुद्रक – आर्यभूषण प्रेस, पुणे, प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९५७, (जेसुईट फादर्स, नगर.)

बेथलहेमातील उतारशाळेच्या मालकाची गोष्ट प्रस्तुत पुस्तकात सांगितली आहे.

प्रस्तावनेत अनुवादक सांगतो की ही गोष्ट सांगताना प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींची गुंफण कल्पनेच्या धाग्यांनी केलेली आहे. शुभवर्तमानात दिलेल्या प्रत्यक्ष हकिकतीच्या पार्श्वभूमीवर लेखकाने आपल्या कल्पना–विलासाच्या व प्रतिभेच्या जोरावर बेथलहेमातील उतार शाळेच्या मालकाचे चित्र रेखाटले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या उतार शाळेच्या मालकाचे नाव कुणालाच ठाऊक नाही. पण लेखकाने " उतार शाळेचा मालक " या अर्थाचा ग्रीक शब्द घेऊन त्याचे रूपांतर केले व " पान्डो केय " असे नाव त्याला देऊन टाकले. वास्तविक पाहता, उतारशाळेच्या मालकाने केलेल्या कोणत्याही गोष्टीची ऐतिहासिक नोंद नाही. पण त्याच्या जीवन चरित्रातील अनेकविध दालने जसजशी खुली होतात, तसतसे आपणास असे आढळून येते की, पुष्कळशा आस्थेवाईक व श्रद्धाळू माणसांचा आध्यात्मिक अनुभव ह्या उतारशाळेच्या

मालकाच्या ऐहिक जीवनयात्रेशी तंतोतंत जुळणारा असतो. अशा श्रद्धाळू....जीवा-विषयींची ही एक रूपककथाच आहे असे म्हटले तरी चालेल.

उपेक्षित पाहुणा, मेंढपाळाची साक्ष, मागी लोकांची साक्ष, पान्डोकेयचा तुरुंगवास, यरीहोच्या रस्त्यावर, बार्तिमय व जक्कय, यरुशलेमातील वल्हाडण सण, सन्मान्य पाहुणा या प्रकरणातून ही कथा सांगितली आहे.

धर्मशाळा (कादंबरी)

लेखक – सत्यवान नामदेव सूर्यवंशी, प्रका: सदानंद भटकळ, पॉप्युलर, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७. प्रकाशन स्थळ – कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार मुंबई १९५८. पृ. १००.

मुंबईच्या फुटपाथरीवरील दुनियेचे चित्र रेखाटणारी कादंबरी. वशा, मस्तान, रखमी, केळीवाली, बंगाली बानू सारीच माणसे अस्सल जाणवतात. या कादंबरीत दरिद्री दुनियेतील जीवन, त्यांची दुःखे अचूकपणे टिपलेली आहेत. भाषाशैली साधी सरळ व नेटकी.

पिग्मी लोकांचा मित्र, अपल्लो

लेखक संपादक– ई. मोरलंड व सत्यवान नामदेव सूर्यवंशी., प्रका. ई मोरलंड, सेक्रेटरी बाँबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसा. लक्ष्मीनारायण प्रेस, पृ. ५२ किं. ४ आणे.

या स्फूर्तिदायक चरित्राच्या वाचनाने इतर देशातील लोकांप्रमाणे महाराष्ट्रातील लोकांच्या मनालाही चेतना मिळेल या अपेक्षेने हे चरित्र लिहिले गेले.

आफ्रिकेतील युगांडाची राजधानी मेंगो जवळील एका खेड्यातील पिग्मी मनुबी, खिस्तीधर्माकडे कसा वळला आणि अफ्रिकेतील रानटी लोकांना खिस्तीधर्म शिकविण्यासाठी त्याला कोणकोणत्या दिव्यातून जावे लागले, या संबंधीची चरित्रात्मक माहिती दिली आहे. (अपेल्लो हे त्याचे खिस्तीधर्म स्वीकारल्यानंतरचे नाव)

तरीही तू मला आवडतोस

सुधाकर सुमित्र थोरात, प्रका. वत्सला थोरात, कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटल, पुणे १. डिसें. १९५९ पृ. १८४.

प्रस्तावना जे. डब्ल्यू. आयरन, विल्सन कॉलेज यांची, कादंबरीचे कथानक ही केवळ एक प्रेमकहाणी नसून नोकरी निमित्त आईबाप भावंडे सोडून परगावी राहावयास गेलेल्या एका तरुणास आलेल्या अनुभवांची ती कथा आहे. नोकरी लागल्यावर चालू झालेल्या या नवीन स्वतंत्र जीवनात भेटलेले विविध लोक, त्यांच्या समवेत घडलेले संभाषण, चर्चा यांतून अनेक विषय हाताळले आहेत. स्वतः नायक

खरा ख्रिश्चन शोभावा असे त्याचे स्वभावदर्शन घडते. सिस्टर सुवार्तांची करुण कहाणी ऐकूनही तिच्या बद्दलच्या प्रेमभावना कायम राहतात. नायकाचे आईबाप या विवाहास संमती देतात. त्यातून त्याचे एक उदात्त चित्र रेखाटले गेले आहे.

रावसाहेबांची कविता – कवी र. लु. जोशी

प्रकाशक– मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, जानेवारी १९६१ न. शें. पोहनेरकर यांनी रावसाहेबांचा लिहिलेला परिचय व ५१ कविता या संग्रहात समाविष्ट आहेत. "अद्‌भुत छंद" नावाचे खंडकाव्यही आहे. मराठी भाषा, महाराष्ट्र यांचे गौरवगान गाताना रावसाहेबांची वाणी बहरून येते. 'मायबोलीची भूपाळी' सारख्या कविता लक्षात राहून जातात.

चरित्रे-आत्मचरित्रे

अरुणोदय – आत्मचरित्र

लेखक– बाबा पदमनजी, प्रका. बाँबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक– अँग्लो व्हर्नाक्युलर प्रेस, १८८८.

बाबा पदमनजींचे हे आत्मचरित्र होय. या ग्रंथलेखनासाठी बाबांनी केलेली सामुग्री संकलनाची तपशीलवार माहिती दिली आहे. पण आत्मचरित्र लेखनामागील उद्देश स्पष्टपणे सांगत नाहीत. धर्मांतर केलेल्या व्यक्तींनी आपण पूर्वीच्या धर्मातून ख्रिस्तीधर्मात येताना काय काय भोगले आणि ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यावर मनाला खरीखुरी शांती कशी मिळाली हे सांगण्यासाठी अशा प्रकारची चरित्रे लिहून घेतली असावीत. ख्रिस्तीधर्म प्रसाराचा तो एक भाग असावा अशी शंका यायला खूप वाव आहे. पण मराठी भाषेच्या दृष्टीने एका नव्या क्षेत्रातील अनुभवाची अभिव्यक्ती या आत्मचरित्राद्वारे झालेली आहे. केवळ थोरामोठ्यांनी, मान्यवरांनी आत्मचरित्रे लिहायची असा असलेला संकेत कोसळून पडताना दिसतो. विषयदृष्ट्या आत्मचरित्राच्या कक्षा रुंदावताना दिसतात.

बाबा पदमनजी या आत्मचरित्रात लेखकाने आपले हिंदुधर्मात असतानाचे जिणे व आपल्या ख्रिस्ती धर्मांतरासंबंधी चित्रण विस्ताराने केलेले आहे. स्वतःच्या आयुष्याकडे मागे वळून पहाताना, हिंदुधर्मी असताना घेतलेला अनुभव मागच्या काळात जाऊन, पुन्हा तन्मयतेने अनुभवताना दिसतो. काही चांगली शब्दचित्रेही उभी करतो, आणि त्याबरोबरच तत्कालीन सामाजिक, धार्मिक-ऐतिहासिक जीवनाचे चित्रण विस्तृत अवलोकनाद्वारे उभे करतो. ख्रिस्ती मताचे त्याच्या मनात वाढणारे वर्चस्व त्याचे सगेसोयरे, बांधव वगैरेंच्या संदर्भात मनात आलेली अस्वस्थता या संदर्भात आपला मानसिक संघर्ष शब्दांकित करतो.

बाबांच्या आत्मचरित्रात त्यांचा जन्म झाला, त्या वेळगावच्या घरापासून शेतीभाती, आपल्या कुळाच्या चालीरीती, ज्या गल्लीत रहात असत ती गल्ली, तेथील शेजारी-पाजारी, त्यांचे खाणेपिणे, रीतीभाती, वागणे, बोलणे इत्यादी सारी बारीक-सारीक वर्णने आली आहेत. या सर्व वर्णनातून कुटुंब, कुलदैवत, दानधर्म, घरातील कर्मठपणा, सोवळे ओवळे, कलावंतिणीचे नाच, हरिकीर्तने, मंत्रघोष, आशीर्वाद याचे तपशीलासह नेमके उल्लेख असल्याने, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सामाजिक जीवनाचे चित्रण वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे राहू शकते.

तत्कालीन अभ्यासक्रमातील बरीच माहिती या ग्रंथात मिळते. त्यावेळचा अभ्यासक्रम, अभ्यासक्रमातील कित्येक पुस्तके, परीक्षेच्या पद्धती, शिकविणारे शिक्षक, शिक्षेच्या अनेक पद्धती वगैरे संबंधीची माहिती येते.

पापमुक्ती आणि आत्मोद्धार यासाठी बाबांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार कसा केला, त्यावेळच्या मनःस्थितीचे वर्णन कुठलाही अभिनिवेश न करता साधेपणाने निवेदन केलेले आहे.

ख्रिस्ती झाल्यानंतर वडिलांचे झालेले समजूतदार वर्तन, आईची व्याकुळ मनःस्थिती, हिंदुपत्नीपुढे निर्माण झालेला प्रश्न, तो सोडविण्याचा केलेला प्रयत्न तिच्या आईबापांचा दुराग्रह वगैरे संबंधीचे निवेदन बाबांनी प्रांजळपणे केलेले आहे.

हे आत्मचरित्र वाचनीय व माहितीपूर्ण आहे. आत्मचरित्र एक वाङ्मयीन कलाकृती म्हणून तसे सामान्यच आहे असे म्हणावे लागेल.

अनुभव संग्रह भाग १– बाबा पदमनजी, प्रका. बाबा पदमनजी, मुद्रक व्हिक्टोरीया प्रिंटिंग प्रेस इ. स. १८९५.

बाबा पदमनजी यांनी आपल्या बाप्तिस्मा विधीला चाळीस वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने आपल्या दैनंदिनीतील संस्मरणीय नोंदी घेऊन संग्रह केला व अनुभव-संग्रह भाग १ म्हणून प्रसिद्ध केला.

या पहिल्या भागात केवळ मराठी नोंदींचा संग्रह आहे. या भागातील नोंदीमध्ये वडिलांच्या आठवणी, वडिलांच्या नोकरी काळात आलेल्या अडचणी, त्यांचे निवारण, पहिले ख्रिस्ती लग्न, इ. स. १८६५ साली घडलेला ‘ आईचा मृत्यू, ’ बाबांना वाट-णारे प्रार्थनेचे महत्त्व, उद्योगाचे महत्त्व, प्रभूकृपा, पवित्रशास्त्र, ईश्वराविषयी आपली कर्तव्ये, त्या बाबत वृत्ती, प्रेरणा इत्यादी अनेक नोंदी आहेत. काहींचे स्वरूप मनन स्वरूपाचे आहे.

आपल्या अनुभवांचा फायदा दुसऱ्यास मिळावा ही या ग्रंथनिर्मिती मागील प्रेरणा आहे. ख्रिस्ती जिण्यासंबंधी अनेकवार प्रकटन झालेले आहे. त्यांतून बाबांच्या आध्यात्मिक जीवनाची वाटचाल कळते.

अनुभव संग्रह भाग २ – लेखक बाबा पदमनजी
प्रका. स्वतः; मुद्रक–तत्त्वविवेचक प्रेस, इ. स. १९०४ पृ. ६+९३+२२

अनुभवसंग्रहाचा दुसरा भाग पदमनजीच्या बाप्तिस्माच्या पन्नासाव्या वर्षी म्हणजे १९०४ साली प्रसिद्ध झाला. पहिल्या भागास ' जुने जीवन ' व दुसऱ्या भागास 'नवे जीवन ' असे स्वतःच म्हणताना दिसतात. दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेत ' या दोन्ही पुस्तकांचा हेतू एकच व दोन्हींची रचना व रूपही एकच आहेत. ' असे सांगतात.

अनुभव संग्रह भाग दोन या पुस्तकात इ. स. १८९४ ते १९०४ या काळातील बाबांच्या जीवनातील माहिती येते.

पुस्तकाचे स्वरूप दैनंदिनीसारखे आहे. जीवनात विविध ठिकाणी भेटलेली माणसे, त्यांच्या समवेत झालेली संभाषणे, आजूबाजूला घडणाऱ्या घटना, त्यावरील लेखकाच्या प्रतिक्रिया यासंबंधी वेळोवेळी लेखकाने जी टिपणे करून ठेवली ती या पुस्तक रूपाने प्रसिद्ध केलेली आहेत. या टिपणातून व नोंदीतून काही उल्लेखनीय नोंदी आढळतात. त्यापैकी काही अशा—

(१) पंडिता रमाबाईंची भेट–हे टिपण दि. १८ ऑगस्ट १८९५ चे आहे. मुंबईतील स्त्रियांच्या वार्षिक सभेकरिता पंडिता रमाबाई मुंबईस आल्या असता लेखकाच्या शेजारीच उतरल्या होत्या. पंडिता रमाबाईंनी लेखकाच्या (बाबा) अनुभव संग्रह भाग १ च्या प्रती शाळेसाठी विकत घेतल्या व पैसे लगेच दिल्याचा उल्लेख आहे. यापूर्वी लेखकाची रमाबाईंची भेट सहा वर्षांपूर्वी रे. मा. निकंबे यांच्या घरी क्षणभर झाली होती. पण ती अगदी असमाधानकारक होती असे बाबा म्हणतात.

(२) रा. सा. वासुदेव आ. कानिटकर– यांशी संभाषण असे जे टिपण आहे, त्यात वासुदेव कानिटकर यांची पुण्याहून मुंबईचा प्रवास करत असता आगगाडीत भेट झाली, त्यासंबंधी वर्णन दिले आहे. लेखक व कानिटकर यांच्यात घडलेल्या संवादात हिंदुधर्मीयाने ख्रिस्ती होण्याबाबत चर्चा झाली. कानिटकरांनी परखड शब्दांत धर्मांतराच्या वृत्तीवर टीका केली. व लेखकाने समर्थन केले. हे गृहस्थ ज्या बाईने आनंदीबाई जोशी यांचे चरित्र लिहिले, त्या बाईंचे सासरे होत असे शेवटी लेखकाने सांगितले आहे. टिपणास तारखेची नोंद नाही.

याशिवाय आणखी कितीतरी टिपणे आहेत. त्यांत नवे वर्ष, पाऊसपाणी, शाब्बाथ दिवस, जवळपासच्या नातलगांचे मृत्यू, जगाचे कसे होईल अशी चिंताग्रस्त मनोवस्था, हिंदुसाधू, त्यांचे आचार वगैरेचा ढोंगीपणा, प्रार्थनेचे बळ, बोधाचे कार्य, लेखकाचे काम, प्रवासात भेटलेली माणसे, भेटावयास आलेली माणसे, अशा कितीतरी विषयांना स्पर्श करणारी ही टिपणे आहेत.

ही दोन्ही पुस्तके प्रत्यक्षात आत्मचरित्रे नसली तरी आत्मचरित्र लेखनासाठी लागणाऱ्या साधन साहित्यापैकी आहेत. या दृष्टीने त्यांना निश्चितच महत्त्व आहे.

माझी साक्ष – (मूळ लेखिका पंडिता रमाबाई)

अनुवादक – रे. आर. जोशी, केडगाव, प्रका. आर. आढाव, रमाबाई मुक्ति मिशन, केडगाव, साधना प्रेस, ४३०/३१, शनिवार, पुणे ३०. १ ली आवृत्ती १९६८. दुसरी १९७०.

हे पंचावन्न पानांचे छोटेसे पुस्तक आहे. पुस्तकास प्रस्तावना वगैरे काही नाही. अनुवादाची भाषा साधी सोपी आहे. रमाबाईच्या या आत्मवृत्तांतात त्यांचे बालपण, शिक्षण, ख्रिस्ती धर्माचे प्रथम दर्शन, हिंदु समाजात दिसणारी स्त्रीजातीची करुण स्थिती, नवी अशा, ख्रिस्ती समाजाची ओळख, देवाचे कृपादान, माझी अल्पसेवा या विषयांचे थोडक्यात विवेचन आहे.

पन्नास वर्षांतील काही जुन्या नव्या गोष्टी

लेखक– दि. शं. सावरकर, प्रका. पी. डी. सावरकर, ४६४, रास्ते पेठ, पुणे शहर. मुद्रण– आर्यभूषण प्रेस, एप्रिल १९३३, आ. १ ली कि. ८ आणे पृ. ८७. (अहमदनगर कॉलेज)

लेखकाचे दोन शब्द– " प्रस्तुतचे पुस्तक माझे आत्मचरित्र नव्हे. पुण्यातील प्रेसबिटेरीयन वळणाचा ख्रिस्ती समाज मध्य कल्पून आणि काळ विभागाच्या त्रिज्येने जुन्या आठवणींची पाचसहा समकेंद्र वर्तुळे काढून माझ्या स्मरणनिधीतून निघालेल्या गोष्टी वर्तुळ परिघावर ठेवून दिल्या एवढेच.

" आशेची उदयप्रभा वरूनिया ये खालती भूवरी " ही कविता छापली आहे. ही मराठी कविता " भास्कर कृष्ण उजगरे " यांची आहे.

प्रस्तावना– इ. स. १८८३ ते १९३३, नाना पेठ, चर्च, पुणे संस्थेची माहिती व आठवणी, वरील कालखंडातील तत्कालीन पुण्याची माहिती व वर्णन.

प्रकरण १ इ. स. १८८५ ते १८९०

या काळातील पुण्यातील वास्तव्यात भेटलेल्या मंडळींच्या आठवणी, रावसाहेब रामजी गंगाजी भोर यांचा मुलगा जॉन, रे. रा. वि. मोडक यांचा मुलगा सुमित्र, कॉलेज सहाध्यायी डॉ. नारायण शेषाद्री यांची व्याख्याने ऐकण्याचा योग, फ्री चर्च मंडळींशी परिचय, धर्मविषयक वाद त्यानुसार वाचन, एल्. सी. ई. परीक्षा पास.

प्रकरण २– नोकरीनिमित्त पुन्हा पुण्यात फ्री चर्च मंडळाचे नाना पेटेतील नवे उपासना गृह.

प्रकरण ३– इ. स. १९०० ते १९०६.

सोलापुरात प्लेग, नवीन मिशनरी, अलेक रॉबर्टसन यांची माहिती. ट्रेनिंग कॉलेजला नेमणूक. १९०१–२ कालेजात महार जातीच्या विद्यार्थ्याला प्रवेश. प्रि.

काशीनाथपंत केळकर यांच्या हाताखाली काम करण्याची संधी. त्यांच्या औदार्याचे वर्णन. रे. निकल मॅक्निकल या मिशनरीचे पुण्यात आगमन. अलेक्झांडर रॉबर्टसन यांचे पुण्यात वास्तव्य.

प्रकरण ४– पुण्यात वास्तव्य, मल्हार साहेब पाळकाचा मृत्यू, त्याचे जागी अॅलेक रॉबर्टसन यांची नेमणूक, नाना पेठ मंडळींची सभासद संख्येत वाढ. प्रेस्बिटेरियनतर्फे "तरुणांच्या आत्मिकोन्नत्यर्थ परीक्षा" सुरू केल्या. तरुण ख्रिस्ती स्त्रियांची सभा सुरू. सी. एम्. एस्. ४–५ वर्षे गुजरात प्रांतात घालविल्यावर १९२१ जुलै अखेर निवृत्तिपूर्व रजा.

प्रकरण ५– यु. फ्री. चर्च मिशनशी सहकारित्व, रे. जे. एफ्. एडवर्डस् यांच्याशी ओळख, या काळात 'मेसेज' हे पत्र पुण्यात निघाले. "मेसेज टू इंडियन ख्रिश्चन" या पत्रांतून सावरकरांच्यावर टीका. ज्ञानोदयाचे संपादकपद, देवदत्त नारायण टिळक यांचे विरोधी वर्तन इत्यादी तत्कालीन घटनांचे उल्लेख.

प्रकरण ६– तरुण पिढीला मार्गदर्शक सूचना.

सावरकर दिनकर शंकर– जन्म ८ मे १८६७ मालेगाव कॅम्प येथे.
मृत्यू ८ जाने १९५२.

बॉंबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे एक माजी कार्यवाह. १९२२ मे पासून १९२५ फेब्रुवारी अखेर 'ज्ञानोदय' मराठी भागाचे संपादक होते. मार्च १८९१ ते जुलै १९२१ पर्यंत सरकारी नोकरी. एज्युकेशनल इन्स्पेक्टर. मराठी लिटरेचर कमेटीवर आठ वर्षे काम केले. एक वर्ष बॉंबे ख्रिश्चन कौन्सिलचे अध्यक्ष. रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष. संयुक्त ज्ञानोदय बोर्डाचे अध्यक्ष. सरकारी मराठी बुक कमिटीचे सभासद. नॅशनल ख्रिश्चन कौन्सिलचे सभासद.

ईश्वर परिज्ञान, मानोसोपचार, मानसशास्त्र, होमिओपथी, शास्त्रीयविषयक अशा विषयावरील पुस्तकांचे वाचनाची आवड.

पुस्तक लेखन– पन्नास वर्षांतील नव्या व जुन्या गोष्टी १९३३, (चरित्रपर) कथा– कवठी बंगला, सुभेदाराचा पुत्र (बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीचे हस्तलिखित स्पर्धेचे बक्षीस. पवित्र धर्मशास्त्र विषयक कोश १९४२ इत्यादी.)

डॉ. केतकर, बाबा पदमनजी, रे. धनजीभाई नौरोजी, वेणूबाई तर्खडकर, लोटलीकर, रामकृष्णपंत मोडक, शाहू दाजी कुकडे वगैरे लोकांत सावरकर प्रिय होते.

आत्मचरित्राची भाषा अगदी केवळ घटना निवेदनाची, रुक्ष आहे. पण लेखनात अवांतर पाल्हाळही नाही.

पंडित हर्षे यांचा आध्यात्मिक अनुभव– ले. ना. ल. हर्षे.

प्रका. रे. सु. ना. थोरात, बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुद्रक–आर्यभूषण मुद्रणालय, डिसेंबर १९४३. पृ. १३.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत रे. जे. एफ्. एडवर्डस यांनी म्हटले आहे, "बॉंबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटीने, अनुभव व चरित्रांची एक पुस्तकमाला प्रसिद्ध करण्याचे ठरविले. त्या मालेसाठी पंडित ना. ल. हर्षे यांचा आध्यात्मिक अनुभव पुस्तकरूपान छापला. प्रथमतः रे. जे. एफ्. एडवर्डस यांच्या "ज्ञानेश्वर" यांच्या ग्रंथात घालण्या-साठी रे. एड्वर्डस यांच्या विनंतीवरून श्री. हर्षे यांनी त्यांस लिहून दिला होता. तोच या मालेसाठी प्रसिद्ध करण्यात आला.

प्रारंभी हिंदू सनातनी घराण्यात बालपण गेले. मग प्रार्थना समाजाकडे त्यांचे मन आकर्षित झाले. पण भावनिक समाधान लाभले नाही. वारकरी पंथात मन रमले नाही. पुण्यात घेतले जाणारे बायबल क्लास, डॉ. मॅक्निकल, डॉ. स्टॅन्ले यांची धर्मविषयक व्याख्याने याकडे त्यांचे मन वळले. ख्रिस्ताचा धर्म योग्य वाटला. ५ मे १९३४ रोजी बाप्तिस्मा घेतला. धर्मांतर केल्याबद्दल कधीही पश्चात्ताप झाला नाही असे सांगतात.

अग्रेसर स्त्री कैवारी पंडिता रमाबाई – लेखक – सु. धो. रामटेके

संपादक – र. ना. हर्षे, प्रका. मिस्. सी. टेरी, रमाबाई मुक्तिमिशन, केडगाव. प्रकाशन स्थळ– आर्यभूषण मुद्रणालय, पुणे ४. जुलै १९५७. किंमत १ रु. कापडी बांधणी किं. १॥ रुपया. (लेदर्ले)

रे. सु. धो. रामटेके यांनी लिहून ठेवलेल्या रमाबाई चरित्राच्या हस्तलिखित प्रतीवरून श्री. र. ना. हर्षे यांनी रमाबाई चरित्राचे संपादित पुस्तक सिद्ध केले.

रमाबाईंचे जीवन-चरित्र जन्मापासून मृत्यूपर्यंत सुमारे ८० पृष्ठांत दिले आहे त्यानंतर मुक्तीच्या कार्याचे आजचे स्वरूप हा मिस्. सी. टेरी यांचा लेख आहे. तो सुमारे २० पृष्ठे आहे. शेवटच्या ३/४ पृष्ठांत मिशनबद्दल विशेष व्यक्तींचे अभिप्राय उद्धृत केले आहेत.

चरित्रामध्ये पूर्ववृत्तांत, बाळपण, प्रेमळ बंधूंच्या सहवासात, ईश्वरावरील अढळ श्रद्धा, अग्रेसर स्त्री कैवारी, समाजसेवेची प्रेरणा, समाजसेवेला प्रारंभ, मुक्ती सदनाची स्थापना, मुक्तिसदनाची वाढ, मुक्तिसदनाच्या आवारात, काही हतभागी स्त्रियांची कहाणी, पं. रमाबाईंची वाङ्मय सेवा, पंडिता रमाबाईंचे धार्मिक जीवन, विश्रांती या विषयांचा परिचय. रमाबाईंच्या जीवनाची ही ओळख केवळ धावती आहे. शिवाय चरित्रातील घटनांच्या सत्यता पटवून देण्याच्या प्रमाणांची, संदर्भाची गर्दी नाही. असे हे छोटेखानी, निवेदनपर, चरित्रलेखन आहे.

प्रस्तुत पुस्तकात ' टेस्टीमनी ' आणि ' मुक्ती प्रेअरबेल ' नावाच्या इंग्रजी मासिकात पं. रमाबाईंचा आत्मवृत्तांत, मुक्तिमिशनचा पूर्वेतिहास, देवाने त्यांच्यावर व त्यांना पाठविलेला कृपाप्रसाद यांचा बहुमोल अनुभव यांचा संग्रह सापडतो. त्याच्या संपादिका रमाबाई स्वतःच होत्या असा उल्लेख आहे. इतरत्र ' टेस्टीमनी ' ' मुक्ती प्रेअरबेल ' या नावाच्या पुस्तकांची रमाबाईंच्या नावे नोंद आढळते.

स्मृतिचित्रे : लक्ष्मीबाई टिळक

" स्मृतिचित्रे " च्या आजवर निघालेल्या आवृत्तींचा तपशील असा, सांगता येईल–

स्मृतिचित्रे भाग १, मुंबई प्र. श्री. कोल्हटकर, रामकृष्ण प्रेस, मुंबई, १९३४,८+१८६+४, ७·२×४·८ किंमत रु. १ ॥

स्मृतिचित्रें भाग २ रा, मुंबई प्र. श्री. कोल्हटकर, रामकृष्ण प्रेस, ४+१३९ ७×५·१ सचित्र रु. १ ॥

स्मृतिचित्रे भाग ३ रा. मुंबई प्र. श्री. कोल्हटकर, रामकृष्ण प्रेस. मुंबई, ६+१५४, ७·२×४·८ रु. १ ॥

लक्ष्मीबाई टिळक अर्थात स्मृतिचित्रे भाग ४ था, (साहा. देवदत्त नारायण टिळक) मुंबई, प्र. श्री. कोल्हटकर, रामकृष्ण, मुंबई, १९३६, ८+१९१, ७·२×४.८, सचित्र रु. २.

स्मृतिचित्रे ४ भागांत १९३४ ते १९३६ या काळात प्रथम प्रसिद्ध झाले.

त्यानंतर १९४० साली केशव भिकाजी ढवळे यांनी देवदत्त टिळक यांनी संक्षेप केलेली " **लक्ष्मीबाई टिळक यांची स्मृतिचित्रे**, न्यू टाईम्स प्रिंटरीमध्ये छापून प्रसिद्ध केले. त्यांची पृष्ठसंख्या ८+२२०, चित्रे ४; त्यानंतर १९४८ साली या संक्षिप्त भागाची दुसरी आवृत्ती केशव भिकाजी ढवळे यांनीच प्रसिद्ध केली.

स्मृतिचित्रे भाग पहिला, के. भि. ढवळे, यांनी १९४४ साली प्रसिद्ध केली.

त्यानंतर देवदत्त टिळकांनी संक्षिप्त केलेली स्मृतिचित्रे साहित्य अकादमी. नवी दिल्ली यांनी १९५७ साली कमलाबाई देशपांडे यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध केली व त्याची दुसरी आवृत्ती १९६८ साली, पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केली.

लक्ष्मीबाईंनी स्मृतिचित्रे लिहिताना कलावंताला आवश्यक असणारी कलात्मक, अलिप्तता साधली आहे. त्यांच्या अनुभव मांडण्याच्या तटस्थ वृत्तीमुळे वाचकही त्याच्यात सहभागी होऊ शकतो. पूर्वाश्रमीची हिंदुकुटुंबातील स्त्री, टिळकांसारख्या कवीच्या संसारात धर्मांतरामुळे उद्‌भवलेल्या धार्मिक, सामाजिक जीवनात जगताना ते अनुभवाचे ताण तणाव सोसते, त्याचे मनोहर चित्रण लक्ष्मीबाई करतात. ते करताना त्रोटक त्रोटक वाक्ये, लयबद्ध वाक्यरचना करून नेमकेपणे आपले अनुभव-विश्व उभे

करताना "स्मृतिचित्रे" मराठी साहित्यातील अनेक अंगांनी अभ्यासण्याजोगा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांमध्ये 'आत्मचरित्र' ह्या दृष्टीने आवश्यक तो सर्व जीवनवृत्तांत समाविष्ट झालेला आहे. बाईंनी आपले माहेर, सासर, सासरी झालेला सासुरवास, श्री. टिळकांचे ख्रिस्ती होणे, यानंतरचा पतिपत्नी वियोगाचा काळ, त्या-नंतर त्यांनी स्वतः ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यावर, मग पुन्हा उभयतांचा नवा संसार, पतिनिधनानंतरचा काळ, आयुष्यातील अशा सर्व महत्त्वाच्या कालखंडाची माहिती त्या स्मृतिचित्रांतून दिली आहे. तसेच वेळोवेळी निरनिराळ्या स्थळी आयुष्यात रहावे लागले, भाऊ, भावजयांच्या घरात, दिराकडे, नगर, राहुरी वगैरे त्याचप्रमाणे कित्येक संस्मरणीय घटना, प्रसंग काही बालकवींसारख्या भवतालच्या जगातील, पण त्यांच्या घराशी एकरूप होऊन गेलेल्या व्यक्ती, वगैरे या साऱ्यांची प्रसंगी किरकोळ तपशिलाने सुद्धा, तर कधी मर्मग्राही प्रमुख निवेदन सूत्र सांगून–आकर्षक निवेदन केले आहे. या सर्व जीवनवृत्तांत निवेदनात मनात भरणारी, मन हेलावून सोडणारी बाईंची निवेदन शैली हेच स्मृतिचित्राचे खास वैशिष्ट्य. ना. वा. टिळकांसारख्या लोकविलक्षण स्वभावधर्म व बुद्धी लाभलेल्या "सहचरा" समवेत अनुभवलेली सांसारिक सुखदुःखे आणि त्याचबरोबर त्या सहचराच्याच सान्निध्याने शिक्षण, जीवनदृष्टी वगैरे अनेक अंगांनी विकसित होत गेलेले स्वतः लक्ष्मीबाईंचे व्यक्तित्व-यातील सूक्ष्म छटा उलगडून दाखवताना "वेगळे निवेन" सारे कसे करावे या बाबतीतील लक्ष्मीबाईंचे मनाचे व लेखणीचे सामर्थ्य पण 'लोक-विलक्षण' जाणवते एवढेच तूर्त या स्मृतिचित्रांबद्दल नमूद करून बुध्याच थांबणे योग्य. एरवी लक्ष्मी-बाईंची स्मृतिचित्रे म्हणजे अनेक व्यक्तींना खाजगी जीवनात अनेक अभ्यासक समीक्षकांना आपल्या कार्यक्षेत्रात आणि अखिल मराठी–वाङ्मयात एक कधीच' न बुजणारी "स्मृति" आहे.

महाराष्ट्राची तेजस्विनी

लेखक– देवदत्त नारायण टिळक, प्रका. दे. ना. टिळक नागरिक प्रकाशन, नाशिक, १९६०. पृ. ५००.

दे. ना. टिळकांनी अतिशय परिश्रम घेऊन लिहिलेले पंडिता रमाबाईंचे हे विस्तृत चरित्र आहे. पंडिता रमाबाईंचे व त्यांच्या संबंधातील अनेक व्यक्तींचे फोटो देऊन पुस्तक अधिकच अर्थपूर्ण केले आहे. एकूण २८ प्रकरणांत पंडिता रमाबाईंचे चरित्र मांडले असून. अकरा परिशिष्टे विविध माहिती देण्यासाठी जोडली आहेत. हे चरित्र लिहिताना लेखकाने स्वीकारलेला मार्ग सांगताना तो लिहितो, "ह्या चरित्रात होता होईल तो रमाबाईंच्या शब्दांचा व विधानांचा उपयोग करणे व जेथे ते शक्य नसेल तेथे त्यांच्याबरोबर राहून त्यांचे व त्यांच्या कामाचे बारकाईने निरीक्षण

केलेल्या व्यक्तींचे शब्द प्रमाण समजून त्यांचा उपयोग करणे, अशा रीतीने मिस् लुश्या फुलर, क्लेमंटेना बटलर, मिसेस हेलन डायर, मनोरमाबाई मेधावी, रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई कर्वे, ह्यांच्या लिखाणाचा उपयोग केला आहे.

प्रस्तुत चरित्रात पंडिता रमाबाईंच्या जीवनचरित्रातील खालील पैलूंचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. (१) भारतात किंडर गार्टन शिक्षण पद्धत प्रथम आणणारी. (२) अंधांना लेखन वाचनाची कला देणारी. (३) आद्य शिक्षण-तज्ज्ञ. (४) चरितार्थ संपादनाचे पुरुषवर्गाचे सारे व्यवसाय स्त्रीजीवनाच्या कक्षेत आणणारी आद्य प्रवर्तिका. (५) हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे व देवनागरी लिपी व्हायला पाहिजे असे मत असणारी. (६) काँग्रेसमध्ये स्त्री प्रतिनिधी प्रथम नेऊन बसविणारी क्रांतिकारक महिला. (७) प्लेगच्या दिवसांत सरकारी अधिकाऱ्यांवर टीका करून इंग्लिश पार्लमेंटात आवाज उठविणारी वीरांगना. (८) इंग्लंडच्या राणीपेक्षा आपण आपल्या मायभूमीला अधिक मान दिला पाहिजे असे खडसावून सांगणारी देशसेविका. (९) विधवाश्रम काढून विधवांना आधार होणारी. दुष्काळग्रस्तांच्या मुखात घास भरविणारी ऋषितुल्य माता. (१०) खादीची सुरुवात करणारी भारतातील अग्रेसर राष्ट्रभक्त. (११) मुक्तिमिशनच्या रूपाने पतित स्त्रियांना आसरा देऊन त्यांना माणुसकीत आणणारी वत्सल पतितोद्धारिका (१२) प्रेमळ स्त्री कैवारी. (१३) दूरच्या देशातील स्त्रियांना स्फूर्ती देणारी स्फूर्तिदायिनी, या अनेक अंगांनी चरित्राची मांडणी केलेली आहे.

पंडिता रमाबाईंचे हे पहिलेच एवढे विस्तृत चरित्र असावे.

तत्कालीन धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना कोणकोणत्या सामाजिक, धार्मिक समस्यांना सामोरे जावे लागत होते यासंबंधीचा उलगडा करण्यासाठी या चरित्रांचा उपयोग होणे शक्य आहे.

परिशिष्ट पहिले

ख्रिस्ती मराठी लेखक (परिचय)

फादर टॉमस स्टीफन्स : (जन्म इ. स. १५४९; मृत्यू इ. स. १६१९)

मध्ययुगीन मराठी संतांच्या बरोबरीने मराठी भाषेची स्तुती करणारा, धर्म–प्रसारासाठी का होईना, मराठीचा उपयोग करून त्या भाषेचे वैभव वाढविण्यासाठी प्रयत्नशील असलेला फादर टॉमस स्टीफन्स याच्या कुटुंबाविषयी, त्याच्या बालपणा-विषयी फारशी माहिती उपलब्ध होत नाही. त्याचा जन्म इंग्लंडमधील विल्टशायर परगण्यात बुस्टन येथे इ. स. १५४९ साली झाला. त्याचे वडील प्रथम बुस्टनला होते. नंतर काही काळ व्यापाराच्या निमित्ताने लंडनला स्थायिक झाले होते. ते इ. स. १५७१ पर्यंत हयात होते. त्याच्या आईचे नाव जेन होते. ती इ. स. १५७५ च्या आधीच मरण पावली होती. पॅरिसच्या सेमिनरीत धर्मशास्त्राचा प्राध्यापक असलेला त्याचा भाऊ रिचर्ड इ. स. १५८६ मध्ये मरण पावला. खुद्द फादर स्टीफन्स जेजुइट पंथात सामील होईपर्यंत त्याचे प्रारंभीचे शिक्षण कुठे झाले, कसे झाले या-विषयी नीटशी व फारशी माहिती मिळत नाही. आपण आपला वाङ्मयीन अभ्यास (Humanities) खाजगीरीत्या पुरा केला असे तो " सोसायटी ऑफ जीजस "ला लिहिलेल्या एका निवेदनपत्रात सांगताना दिसतो.

" सोसायटी ऑफ् जीजस " मध्ये दाखल होऊन स्टीफन्सने आपला धर्म-शास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास चालू केला. या अभ्यासाच्या काळात आपल्या मित्रांकरवी येशू संघात प्रवेश मिळविण्याची त्याची खटपट चालली होती. संत झेविअर्सच्या जीवन कार्यापासून त्याला धार्मिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली, आणि आपण स्वतः धर्मप्रचाराचे कार्य करावे अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली.

स्टीफन्सचा तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र यांचा अभ्यास चालू असतानाच वरिष्ठांनी त्याला गोव्याला जाण्याची अनुज्ञा दिली. धर्मप्रचाराच्या कार्यासाठी जाणाऱ्या मिशनऱ्यांनी लिस्बनमार्गेच गेले पाहिजे असे पोपचे फर्मान होते. त्यानुसार गोव्याला जाण्यासाठी ४ एप्रिल १५७९ रोजी स्टीफन्स लिस्बनला आला व त्याच वर्षी २४ ऑक्टोबरला आपल्या भावी कर्मभूमीत, गोव्याला सुखरूप येऊन पोहोचला. त्यावेळी त्याचे वय तीस वर्षांचे होते.

फा. स्टीफन्स हिंदुस्थानात आलेला पहिला इंग्रज जजुइट मिशनरी म्हणता येईल.

गोव्यात आल्यावर स्टीफन्सचा अपुरा राहिलेला धार्मिक शिक्षणाचा अभ्यास सुरू झाला. काही काळ आजारी झाल्यामुळे त्याच्या अभ्यासात खंड पडला. त्यातून बरा झाल्यावर सहा महिन्यातच त्याला धर्मोपदेशक म्हणून सासष्टी प्रांती पाठविण्यात आले. इ. स. १६११-१२ ही दोन वर्षे वगळली तर भारतातील आपली सर्व हयात फादर स्टीफन्सने दक्षिण सासष्टीत धर्मप्रचार करण्यात व्यतीत केली.

इ. स. १५९० ते १५९४ या काळात फादर स्टीफन्स रायतूरच्या जेजुईट कॉलेजचा रेक्टर होता, अशीही माहिती उपलब्ध आहे. इ. स. १६०८ सालापूर्वी पासून फादर स्टीफन्सला गोव्यातील नवख्रिश्चनांसाठी नागरी लिपीतील पुस्तके प्रसिद्ध व्हावी व तसे टाईप पाडले जावे असे वाटत होते. पण त्याचा हा विचार त्याच्या वरिष्ठांना पसंत नव्हता. याचबरोबर एका गोष्टीची नोंद घेणे आवश्यक ठरते. फादर स्टीफन्सच्या काळी गोव्याच्या परिसरात नागरी लिपी लोकव्यवहारात प्रचलित होती.

पाद्री एतिएन-द-ला-कुवा:- (फादर कुवा, इ. स. १५७९ ते १६४३)

जेजुइट संघाचा धर्मप्रसारक असलेला फ्रेंच पाद्री. याचा जन्म फ्रान्समध्ये १५७९ साली झाला. इ. स. १५९९ मध्ये त्यांनी जेजुईट पंथात प्रवेश केला. इ. स. १६०२ मध्ये धर्मप्रसारक या नात्याने तो हिंदुस्थानात आला. फादर स्टीफन्स नंतर आपल्या कर्तबगारीने रायतूर (गोवा) सेंट इग्नेशिअस कॉलेजात प्राचार्यही झाला. त्याने स्थानिक गोमंतकी बोलीवर आणि मराठी भाषेवर चांगलेच प्रभुत्व संपादन केले होते. मराठीतून ग्रंथरचना करणाऱ्या या मूळ फ्रेंच भाषिक कवीचा दि. २४ सप्टेंबर १६४३ रोजी गोव्यात अंत झाला.

फादर आंतोनियु द. सालदान्ज :- (इ. स. १५९८ ते इ. स. १६६३)

याचा जन्म इ. स. १५९८ मध्ये आफ्रिकेत झाला. याचा बाप पोर्तुगीज व आई इटालियन होती. याने प्रथम हिंदुस्थानात लष्करी खात्यात नोकरी धरली. परंतु पुढे ख्रिस्ती धर्माची ओढ लागल्यामुळे त्याने इ. स. १६१५ मध्ये गोव्यात जेसुइट संघाची दीक्षा घेतली व धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान या ग्रंथांचा अभ्यास करून तो धर्मोपदेशक बनला. आपले सर्व आयुष्य त्याने रायतूर येथे घालविले व तेथेच तो इ. स. १६६३ मध्ये मरण पावला. दक्षिण सासष्टीमध्ये धर्मप्रसार करीत असताना त्याने तेथील प्रचलित स्थानिक बोली व ग्रांथिक मराठी यांचा अभ्यास केला. त्याने " सेंट अँथनी पुराण ", " जीवन वृक्षाची फळे ", गोमंतक बोलीचा एक शब्दसंग्रह व काही धार्मिक पुस्तिका लिहिल्याचे नमूद आहे.

फै जुवांव द. साल मतियश

हा फ्रन्सिस्कन संघीय ग्रंथकार होय. याने आणि फै. आमोदार द. सांत या दोघांनी मिळून " ख्रिस्ताचे जीवन " किंवा पुराण आणि ख्रिस्ती धर्माची तत्त्वप्रणाली

या विषयांवर काव्ये रचिली होती. सहज गाता व पाठ करता यावे अशी त्याच्या पुराणाची रचना होती, हे कार्डिनल बालारमिन याच्या (Symbolo de Fe) (Symbol of faith) या ग्रंथाचे भाषांतर होते. अशी माहिती Biblioteca Lusitana या ग्रंथावरून मिळते. या ग्रंथाचे हस्तलिखित उपलब्ध नाही.

ग्रांथिक मराठीत ज्याप्रमाणे जेसुइट संघीयांनी मराठी ग्रंथ लिहिले, तसेच गोमंतकी बोलीतही काही मिशनऱ्यांनी ग्रंथ लिहिले आहेत. या बोलीचा ते Lingua deterra Corrente, Lingua Bramana, Bramana Canarim, किंवा Bramana vulgar असा निर्देश करतात. या बोलीला कोकणी हे नाव फार उशिरा मिळाले. या भाषेत लिहिणारा फादर दियोगु रिबैरू हा प्रमुख लेखक होय.

पाद्री दियोगु रिबैरू :- (इ. स. १५६०–१६३३)

जेजुइट संघीय ग्रंथकार यांचा जन्म लिस्बन येथे १५६० मध्ये झाला. त्याने जेजुइट पंथात इ. स. १५८० साली प्रवेश केला. त्याने स्थानिक मराठी भाषेचा व गोमांतकी बोलीचा अभ्यास केलेला होता. तो गोव्यातील रायतूरच्या (ता. सासष्टी) कॉलेजमध्ये दि. १८ जून १६३३ साली निवर्तला.

पाद्री मिगेल–द–आल्मेद :- (इ. स. १६०७–१६८३)

जेजुइट संघीय ग्रंथकार. याचा जन्म, पोर्तुगालमधील बैर प्रांतात झाला. गोव्यात आल्यावर १६२४ मध्ये जेजुइट संघात प्रवेश केला. एतद्देशियांच्या भाषेचे त्याने उत्तम प्रकारे अध्ययन केलेले होते. इ. स. १६२४ पासून १६८३ पर्यंतचे सगळे आयुष्य गोव्याला गेले. तिथेच वयाच्या ७९ व्या वर्षी तो खिस्तवासी झाला.

पाद्री जुवांव–द–पेद्रोझ :-(इ. स. १६१६ ते १६७२)

याचा जन्म पोर्तुगाल मधील कोइंब्र या गावी इ. स. १६१६ साली झाला, व तिथल्याच " सोसायटी ऑफ जिझस " या संस्थेमध्ये इ. स. १६३२ मध्ये जेसुईट संघात प्रवेश केला. रायतूर येथील कॉलेजचा तो रेक्टर होता. गोव्यात आल्यावर सासष्टीच्या मिशनमध्य धर्मप्रचाराचे काम करीत असता स्थानिक लोकांची भाषा शिकला. इ. स. १६७२ मध्ये गोव्यातच मरण पावला.

ख्रिश्चन फ्रेडरिक स्वार्ट्झ

स्वार्ट्झ याचा जन्म ८ ऑक्टोबर १७२६ मध्ये सोनेन्बर्ग (Sonnenburg) या गावात झाला. त्याचे सबंध नाव ख्रिश्चन फ्रेडरिक स्वार्ट्झ असे होते. त्याच्या वडिलांनी त्यास Custrin येथे विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी ठेवले. डॅनिश मिशनरी शूल्टझ यांनी त्याला प्रथम मदतीसाठी विनंती केली. पुढे स्वार्टझने खिस्तीधर्म-कार्याला वाहून घ्यायचे ठरविले. तंजावरला आल्यावर त्याने मराठी भाषेचा अभ्यास केला.

कॅरी विल्यम :– (जन्म १७६१, मृत्यू १८३४)

विल्यम कॅरी हा अर्वाचीन मराठी गद्य लेखनाचा पाया घालणारा पहिला इंग्रज पंडित. हा कोशकार, व्याकरणकार, व भाषांतरकार होता. याचा जन्म इंग्लंड-मधील पॉलेर्सवरी या खेड्यात झाला. याचे वडील शिक्षक होते. घरच्या गरिबीमुळे याला फारसे शालेय शिक्षण मिळाले नाही. पण स्वावलंबनाने विद्याव्यासंग अखंड चालू ठेवून तो बहुभाषी व बहुश्रुत बनला. वयाच्या सोळाव्या वर्षापासून तो वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षापर्यंत त्याला परंपरागत चांभाराचा धंदा करावा लागला. तो व्यवसाय चालू असतानाही त्याचे आपला विद्याव्यासंग चालूच ठेवला. त्याने व्याकरण ग्रंथाच्या सहाय्याने लॅटिन, ग्रीक, हिब्रू, फ्रेंच वगैरे भाषांचे ज्ञान उत्तमप्रकारे संपादन केले व त्याचा उपयोग खिस्तीधर्म ग्रंथाचा अभ्यास करण्यासाठी केला. धर्म-ग्रंथाचे अध्ययन व धर्मप्रसारकांची प्रवचने यांचा त्याच्या मनावर परिणाम होऊन त्यातूनच आपला परंपरागत धंदा सोडावा व स्वदेशाबाहेर धर्मप्रसारासाठी आपले आयुष्य वेचावे अशी त्याला प्रेरणा झाली. त्यानुसार इ. स. १७९३ साली तो हिंदु-स्थानात आला. सुरुवातीला माल्डा येथे त्याने शेती सुरू केली पण त्यात जम बस-ण्याचे चिन्ह न दिसल्यामुळे निळीच्या मळयात मुक्काम हलविला. ईस्ट इंडिया कंप-नीचे चीफ सर्जन डॉ. थॉमस यांच्या जवळ इंग्लंडहून येताना थोडा बंगालीचा अभ्यास केलेला होता. तो बंगालमध्ये येताच राम बसू यांच्या सहाय्याने अधिक दृढतर केला. निळीच्या मळयात कामगारांशी नित्य संबंध येत असल्यामुळे बंगाली सहज सुलभतेने बोलण्याइतपत त्याची प्रगती झाली. त्याने संस्कृत भाषेचाही अभ्यास सुरू केला. संस्कृत भाषा शिकल्यास बंगाली भाषा अधिक चांगली शिकता येईल हे त्याच्या लक्षात आले. तसेच हिंदूंच्या वेद–पुराणांचा अभ्यास करणे शक्य होईल हे त्याने जाणले. संस्कृत शिकणे ही एक त्याची महत्त्वाकांक्षा होती. व्याकरण व कोश यांच्या आधारे त्याने ती साध्य केली.

धर्मप्रसाराचे काम त्याच्या नजरेसमोर होते. इंग्रजांच्या राज्यात धर्मप्रसाराचे काम करण्यास बंदी होती हे लक्षात घेऊन कॅरीने कलकत्त्याजवळ डॅनिश वसाहत असलेल्या सेरामपूर गावी १० जाने. १८०० रोजी आपले ठाणे मांडले व तिकडे धर्मप्रसाराचे काम सुरू केले.

तेथील गव्हर्नरने त्यास सहानुभूती दाखवून खूप सहाय्य केले. त्याच सुमारास ज्या बाप्तिस्ट मिशनच्यावतीने तो हिंदुस्थानात आला होता, त्याच मिशनचे आणखी मिशनरी हिंदुस्थानात आले. त्यांचे सहाय्य त्याला लाभले. थोडीशी स्थिरता आल्या-वर त्याने सेरामपूर येथे शाळा व छापखाना सुरू केला. धर्मप्रसाराचे उद्दिष्ट असल्या-मुळे प्रांतिक भाषांचा अभ्यास, त्यांचे व्याकरण, कोश तयार करणे अशी कामे त्याने ताबडतोब हाती घेतली. विलायतेहून छापखान्यासाठी सर्व सामान आणवले. येथील

लोहाराकडून हवे तसे प्रादेशिक भाषेच्या छपाईसाठी खिळ तयार करून घेतले. मराठी भाषेत पहिल्याने छापील पुस्तक तयार झाले ते इ. स. १८०५ साली सेरामपूरच्या छापखान्यात. ते कॅरीनेच लिहिलेले मराठीचे व्याकरण होय. कॅरीचा मराठी भाषेतील मोडी लिपीतील कोश येथेच इ. स. १८१० साली छापला गेला. बायबलची भाषांतरे छापून त्यांचा धर्मकार्यप्रसारास त्याने उपयोग करून घेतला.

गोर्डन हॉल (जन्म ८ एप्रिल १७८४, मृत्यू २० मार्च १८२६)

याचा जन्म ८ एप्रिल १८७४ मध्ये आताचे टोलंड, पूर्वी त्याला ग्रॅनव्हिला म्हणून ओळखले जाई, येथे झाला. ते युनायटेड स्टेटच्या पूर्वभागात मॅसॅच्युसेट परिसरात आहे.

गोर्डन हॉल त्याच्या समवयस्क मुलांच्या मानाने लिहिणे, वाचणे या अंगांनी लक्षात भरण्यासारखा होता. त्यामुळे तो त्याच्या पाळकाचा आवडता झाला होता.

वडील शेतकरी होते. गोर्डन हॉलने कॉलेजचे शिक्षण घ्यावे, ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. पण त्याच्या पाळकाचा त्याच्या शिक्षणासाठी आग्रह व आर्थिक मदतीची तयारी यामुळे वडिलांनी पुढील शिक्षणास परवानगी दिली.

फेब्रुवारी १९०५ मध्ये तो विल्यम्स कॉलेजमध्ये दाखल झाला.

मुंबईला ११ फेब्रुवारी १८१३ मध्ये तो दाखल झाला. " परमेश्वर एक आहे. त्याच्या पुत्राच्या सहाय्यानेच मुक्ती मिळते " ह्या तत्त्वाचा प्रसार करण्यासाठी तो आला होता. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांची सेवा करीत असताना, २० मार्च १८२६ साली म्हणजे वयाच्या एकेचाळीसाव्या वर्षी तो भारतातच मरण पावला.

रे. हेन्री बॅलंटाईन

ख्रिस्ती मंदिरामध्ये म्हणावयाच्या भक्तिगीतांत याने विशेष करून फार मोलाची आणि मोठी भर घातलेली दिसते. ख्रिस्ती मराठी उपासना साहित्य या प्रकरणात त्यासंबंधी विचार केलेला आहे. हा मिशनरी ११ ऑक्टोबर १८३५ रोजी भारतात आला व ४ सप्टेंबर १८६५ रोजी मायदेशी परत गेला. तो एम्. ए. झालेला होता. त्याला ग्रीक व लॅटीन भाषा चांगल्या अवगत होत्या. संस्कृतचा त्याचा अभ्यास चांगला होता. काही काळ त्याने संस्कृत शिकविण्याचे वर्गही चालविले होते. चांगला धर्मोपदेशक व सर्वसामान्यांस सहज कळेल अशी मराठी भाषा बोलण्यात तो पटाईत होता. इंग्रजी भाषेतील गीतांचा सफाईदार मराठी भाषेत अनुवाद करण्याचे फार मोठे काम त्याने केलेले आहे.

ठोकळ केशव सयाजी :– (जन्म १५ फब्रुवारी १९०७)

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील मढी या गावी जन्म झाला. यचे मूळ गाव पाथर्डी तालुक्यातील 'मोहोज खुर्द.' इ. स. १९३१ साली मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा पास झाले. पंजाबातील मोगा येथे शैक्षणिक ट्रेनिंग

१९३९ साली घेतले. १९४७ साली एस्. टी. सी. झाले. १९५६ साली पुणे विद्यापीठाची बी. ए. परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाले.

प्रा. शांताराम बंडेलू एम्. ए. यांचा जन्म ७-११-१९२१ रोजी झाला. वाडिया कॉलेज पुणे येथे त्यांचे कॉलेज शिक्षण झाले. अहमदनगर कॉलेज १९४७ साली सुरू झाले तेव्हापासून त्या कॉलेजमध्ये ते मराठी विभाग प्रमुख म्हणून काम करीत होते. १९ डिसेंबर १९७० रोजी ते अचानक वारले. त्यांना वाङ्मयाबद्दल मनोमन प्रेम होते. त्यांची लिहिण्याची शैलीही आकर्षक होती. नगर कॉलेजच्या वाङ्मयीन कार्याच्या अभिवृद्धीस त्यांचा मोठा हातभार लागलेला आहे.

मिसेस मेरी एलिझाबेथ बिसल :- (भारतात आगमन १८९१; इ. स. १९०६ ख्रिस्तवासी) डॉ. एल्. बिसल यांची पत्नी. भारतात येत असताना वाटेतच डॉ. बिसल यांच्या सहाय्याने मराठीचा अभ्यास केला. महाराष्ट्रात आल्यावर अमेरिकन मिशनात घोडनदी, अहमदनगर येथे त्यांनी कार्य केले. स्त्रियांकरिता रोजची पोथी प्रार्थना, सभा घेणे, इत्यादी कार्यासोबत ख्रिस्तीतर स्त्रियांच्याही भेटी घेऊन त्यांच्या अडचणी निवारण्याचा त्या प्रयत्न करीत. काही काळ त्यांनी मुलींच्या शाळेचे काम पाहिले. विशेषतः स्त्रिया व मुले यांच्यासाठी त्यांनी वाङ्मय लिहिले. त्यात " शास्त्रातील स्त्रिया " या शीर्षकाची दोन पुस्तके, ख्रिस्ती स्त्रियांच्या कर्तव्याविषयी निबंध, एका आईचे शेवटचे भाषण, " बुलबुल ", ' लेकराकरिता मंजुळ गायने, देवप्रीतीची प्राचीन गोष्ट ' व ' दुसरी गायने ' इत्यादी पुस्तके आहेत. मुलांकरिता त्यांनी सुंदर गीते लिहिली व इंग्रजीवरून भाषांतरित केली. उपासना-संगीत या अमेरिकन मराठी ख्रिस्त मंडळाच्या प्रार्थना पुस्तकात त्यांचा १ अभंग आणि ४५ लोकप्रिय गीते संग्रहित केलेली आढळतात. ' बाळबोधमेवा ' या मुलांच्या मासिकाच्या बराच काळ त्या संपादिका होत्या. त्या संपादक असताना रे. टिळकांनी बाळबोधमेव्याचे स्वरूप वाङ्मयीन करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसतो.

सांगळे कृष्णराव रत्नाजी :- (जन्म मृत्यू)

अनेक ख्रिस्ती कवींनी जरी लोकप्रिय स्तोत्रे व रचना केलेल्या असल्या तरी कृष्णराव सांगळे हा एकमेव लोकप्रिय कवी पश्चिम महाराष्ट्रात होऊन गेला. कृष्णरावांचा जन्म कोष्टी समाजात झाला. इ. स. १८५९ साली त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला व १ जानेवारी १८६० साली अहमदनगर येथे त्यांचा बाप्तिस्मा झाला. प्रारंभी स्वतःच्या जातिबांधवांना शिकविण्याचे काम त्यांना देण्यात आले. त्यांच्या समाजामध्ये शाळा काढण्यात आली. प्रारंभी ४० विद्यार्थी होते. त्यानंतर त्यांना अहमदनगर येथील ' गर्ल्स स्कूलचे ' मुख्याध्यापक नेमले.

रे. टिळक नारायण वामन – (जन्म इ. स. १८६२; मृत्यू १९१९)

रे. नारायण वामन टिळक यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील करझगावी झाला. वडील वामनराव तलाठी असल्यामुळे त्यांना नेहमी फिरतीवर जावे लागे. म्हणून त्यांनी आपली मुले माणसे करझगावी ठेवली होती. तिथेच नारायणाच्या आयुष्याची पहिली सात वर्षे गेली. बाळपणीच्या काळात नारायणाच्या मनात निसर्गप्रीती व धार्मिकवृत्ती हे दोन संस्कार रुजले गेले आणि तेच त्याच्या काव्यात प्रामुख्याने उमटले.

करझगावच्या निसर्गरम्य परिसराने त्यास निसर्गप्रीती शिकविली आणि धार्मिकवृत्ती टिळकांचे अंगी बाणली ती त्यांच्या आजोबांमुळे. टिळकांचे आजोबा विरक्त वृत्तीचे होते. सर्वकाळ भजनपूजनात घालवावा हा त्यांचा नित्यक्रम होता. लहानग्या नारायणाला घेऊन ते जवळच्या रानात जात आणि तेथे भजन म्हणत. त्याला बरोबर घेऊन नाचत. त्यांच्यापासून टिळकात धर्मबुद्धीची जागृती झाली. मुलांविषयी लडिवाळपणा, नाचण्या-बागडण्याची आवड, हे गुण त्यांच्यात जोपासले गेले.

इ. स. १८६९ मध्ये वामनरावांची बदली मोखाड्यास झाली. तेव्हा त्यांनी आपले बिऱ्हाड कल्याणला नेले. तेथे नारायणाचे मराठी शिक्षण झाले. इ. स. १८७३ मध्ये टिळकांची आई वारली. टिळकांना आईविषयी फारच प्रेम व आदर होता. त्यांच्या मातोश्री जानकीबाई यांस चांगले लिहिता वाचता येत असे, कवने करण्याचाही नाद होता. आपल्या काव्यस्फूर्तीचा उगम आईपासूनच झाला असे टिळक मानीत. अर्थातच आईच्या मृत्यूचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला. इतका की आई वारल्यानंतर आपला घराशी आलेला संबंध संपला असे मानून ते आईच्या उत्तरक्रियेसाठी त्र्यंबकेश्वरला गेले, ते घरी परत न येता नाशकातच राहिले व स्वावलंबी बनले. तेथे गणेशशास्त्री लेले यांसारखे गुरू त्यास लाभले व त्यांचे जवळ टिळकांनी जुन्या शास्त्रीय पद्धतीने संस्कृत शिक्षण पूर्ण केले. नाशकास ते स्वावलंबी जीवन जगू लागल्यावर, वडिलांनी आणखी चार धाकट्या भावंडांस शिक्षणासाठी त्यांच्याकडे पाठविले. त्यामुळे टिळकांनी नोकरी धरली. इ. स. १८८० मध्ये नाशिकजवळ गोखले घराण्यातील ' मनुबाई 'शी नारायणाचा विवाह झाला. नाशिकमधील वास्तव्यात टिळकांचे संस्कृत व इंग्रजी शिक्षण झाले.

काव्यरसाची गोडी लागून कवने करण्यासही प्रारंभ झाला. त्यामुळे नाशिकमधील वास्तव्यास टिळक–चरित्रात फार महत्त्व आहे. नाशिकमध्येच एका शालेय शिक्षकाच्या स्फूर्तिपूर्ण वाणीने टिळकास देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. त्याचा परिणाम टिळकांच्या पुढील सर्व जीवनावर झाला. विवाहानंतर टिळकांनी नाशिक सोडले आणि पुढील अकरा वर्षे खानदेश, कऱ्हाड, पुणे, मुंबई, वणी, इत्यादी अनेक ठिकाणी भ्रमंती केली. या काळात त्यांनी पुराणिक, कीर्तनकार, छाप जुळविणारा, शाळा मास्तर, असे अनेक व्यवसाय केले. या सर्व भ्रमणात देशोन्नतीची त्यांची

कळकळ उलट वृद्धिंगत झाली. आपल्या देशाची कष्ट-दशा कशी संपेल? लोकांचे मानसिक दास्य कसे नाहीसे होईल? हाच ध्यास त्यांना झाला, त्याचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात अनेक रीतीने उमटलेले आहे.

टिळकांना आणखी एक ध्यास होता, तो म्हणजे ईश्वराच्या नवधर्मस्थापनेचे अनेक विचार त्यांच्या मनात सतत घोळत असत. आपण नवधर्मसंस्थापना करावी, त्यासाठी लोकांनी आपणावर विश्वास टाकला पाहिजे. त्यास आवश्यक अशी चमत्कार क्षमता अंगी आणण्यासाठी त्यांनी योगाभ्यासही केला. थोडी सिद्धीही मिळविली. पण लोकांचे लक्ष अखेरीस धर्माचे तत्त्वांचें आकलन व आचरण याकडे नसून आपल्या हितसाधनेकडेच असते, असे लक्षात आल्यावर त्यांनी नवधर्म-स्थापनेचा नाद सोडून दिला. याच सर्व मानसिक आंदोलनातून जाणवलेल्या स्वधर्माच्या असमाधानकारक जाणिवांमुळे टिळक ख्रिश्चन धर्माकडे वळले व अखेर १८९५ मध्ये त्यांनी बाप्तिस्मा घेण्यात त्याची परिणती झाली.

इ. स. १८९१ साली नागपूर येथे श्री. अप्पासाहेब बुटी यांच्या प्रेरणेने व सहाय्याने 'ऋषी' नावाचे धार्मिक मासिक त्यांनी चालविले. बुटींचा अलोट ग्रंथसंग्रह होता. तो वाचून काढण्याच्या मनीषेने 'ऋषींच्या' संपादकांची व ग्रंथ-भाषांतरे करण्याचीही त्यांनी जबाबदारी घेतली पण टिळकांच्या प्रगतीपर विचारा-मुळे मासिकही फार दिवस चालले नाही व बुटींकडील भाषांतरे करण्याची नोक-रीही बंद झाली.

अशा प्रकारे एक प्रकारच्या असामान्य, विपरीत स्वभावामुळे टिळकांना जीवन–निर्वाहाची अनेक साधने अनेक स्थळी स्वीकारावी लागली. बाप्तिस्मा घेतल्या-नंतर इ. स. १८९५ ते १९१७ पर्यंतचा काळ अहमदनगरला व इ. स. १९१५ ते १९१७ हा अखेरचा दोन वर्षांचा काळ साताऱ्यास मिशनरी वृत्तीने राहून ख्रिस्ती धर्माच्या सेवेत घालविला. बाप्तिस्मा घेतल्यावर त्यांची मानसिक तळमळ शांत होऊन 'लोकसेवा' हेच त्यांचे जीवनाचे ध्येय ठरले व पुढे ते केव्हाही बदलले नाही. ख्रिश्चन मिशनरी म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीचा परिणाम त्यांच्या काव्यावर दिसत नाही. धर्मांतराचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात जर कुठे दिसत असेल, तर ते उत्कट ख्रिस्तभक्तीत. त्यातही खास व विशिष्ट ख्रिस्ती भाग थोडा दिसतो ईश्वरविषयक भक्ती येथून तिथून सारखीच. त्यानुसार एखादा हिंदू रामाचा अगर विठ्ठलाचा धावा करील, तर टिळक ख्रिस्ताचा धावा करतात एवढाच फरक.

मिशनरी म्हणून टिळकांनी केलेल्या कार्याचा गौरव करावा तेवढा थोडाच आहे. हिंदी ख्रिस्ती लोकांनाही देशहितदक्ष कसे राहता येईल हे त्यांनी दाखवून दिले. ख्रिस्ती समाजाच्या मराठी भाषेतील धेडगुजरीपणा नाहीसा करून, त्या लोकांस सुसंस्कारित मराठी शिकविले. उपासना, प्रवचने, गीते, भजने मराठीतून करण्याची प्रथा पाडली व स्वतः रचून दिली. जुन्या चालीवर भजने, कीर्तने बसवून

त्याचा हिंदी ख्रिस्ती समाजात प्रचार केला. हिंदी ख्रिस्ती लोकांचे धर्ममंदिर हिंदी पद्धतीने व हिंदी परंपरेने उभारले पाहिजे असे नवे मत प्रस्थापित केले. शिवाय आजारी, रुग्ण यांची सेवा, दलित, दुःखी, कष्टीजनांना आधार इत्यादी लोकसेवेची कामे तर त्यांनी वैयक्तिक व कौटुंबिक सुखदुःखाचा विचार न करता अविरत केली

विलक्षण असाधारण स्वभाव, कळकळीचे देशप्रेम, दीनांचा कैवारी, प्रतिभावंत कवी, उत्कट निसर्गप्रेमी, ईश्वरभक्त, खऱ्या धर्माचा जाणकार, पुरोगामी विचारवंत, भाषाप्रभू अशा अनेकविध पैलूंचे दर्शन म्हणजे टिळक चरित्र.

(संदर्भ :- अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, प्रथम खंड, संपा. गं. दे. खानोलकर, एम्. एन्. कुलकर्णी, भारत गौरव ग्रंथमाला, ठाकुरद्वार, मुंबई-१९३१)

अमृत भागाजी त्रिभुवन

अमृत भागाजी त्रिभुवन यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यात इ. स. १८९७ साली झाला. वडील प्राथमिक शिक्षक होते व त्यांची शेतीही होती. अमृतरावांना ७ बहिणी व ३ भाऊ होते. राहुरीच्या मिशन शाळेतील बोर्डिंगात राहून त्यांनी शिक्षण घेतले. वॅलेन्टाईन साहेबांचे ते आवडते विद्यार्थी होते. माध्यमिक शिक्षण नगरच्या मिशन हायस्कूलमध्ये झाले व उच्च शिक्षण मुंबईच्या विल्सन कॉलेज-मध्ये झाले. पण गरिबीमुळे शिक्षण पुरे करता आले नाही. त्यानंतर साताऱ्यात काही काळ शिक्षकाचे काम केले. त्यानंतर पुण्याला कमिशन ऑफिसमध्ये काही काळ नोकरी केली. पहिल्या महायुद्धाच्या काळात मेसोपोटोमिया इत्यादी भागात काम केले. भारतात परतल्यावर काही दिवस मुंबईला वाय. एम. सी. ए. त सेक्रेटरी म्हणून काम केले.पण मुंबईचे हवामान मानवेना म्हणून त्यांना मुंबई सोडावी लागली. त्यानंतर त्यांनी वकिलीचा अभ्यास सुरू केला व जळगावला श्री. सोनाळकर वकि-लांच्या मार्गदर्शनाखाली कायद्याचा अभ्यास सुरू करून इ. स. १९२३-२४ मध्ये हायकोर्ट प्लीडरची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर इ. स. १९२४-२५ मध्ये त्यांनी वकिली व्यवसायाला सुरुवात केली. त्यांचा विवाह पुण्याच्या कु. चंद्रलीला जयवंतराव चौगुले यांच्या बरोबर झाला. त्यांना एकुलती एक मुलगी 'ज्योत्स्ना.' तिला त्यांनी बी. ए., एलएल. बी. पर्यंतचे शिक्षण दिले. अमृतरावांची वृत्ती सामाजिक कार्य-कर्त्यांची, मनमिळाऊ व विनोदप्रिय होती. त्यांचा मित्रपरिवार फार मोठा होता. सर्व जातीधर्मातील व सर्व थरातील लोकांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. नगर तालु-क्यातील केडगाव येथे त्यांनी स्वखर्चाने दलितांच्यासाठी प्राथमिक शाळा चालविली. ते उत्तम वक्ते आणि भाषांतरकार होते. इंग्रजी व मराठी या दोनही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. विशेषतः फौजदारी खटले चालविण्यात त्यांचा हातखंडा होता. अहमद-नगर पालिकेचे सदस्य, लोकलबोर्डाचे सदस्य, एक्स-सर्व्हिसमेन असोसिएशनचे सेक्रेटरी अशी पदे त्यांनी भूषविली. अहमदनगरच्या रिमांड होमच्या कार्यात सक्रिय

भाग घेतला. जानकीबाई आपटे यांनी अंगीकारलेल्या सामाजिक सुधारणेच्या कार्याला सहाय्य केले. ख्रिश्चन समाजातील अनेक संस्थांशी त्यांचा जवळिकेचा संबंध होता. इ. स. १९४१ साली त्यांनी महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य संमेलन भरविण्यात पुढाकार घेतला. महाराष्ट्रातील ख्रिश्चनांनी भरविलेले हे पहिलेच संमेलन होते. रे. ना. वा. टिळकांचे ते कट्टर अनुयायी होते. टिळक पतिपत्नी अमृतरावांना आपला मुलगा मानीत, तसा उल्लेख त्यांनी 'स्मृतिचित्रात' केलेला आढळतो.

गुणग्राहक, साहित्याबद्दल संपन्न अभिरुची, व लोकसंग्रह करण्याची वृत्ती यामुळे अनेक साहित्यिक त्यांच्या घरी येत. त्यांना भारतीय संतांबद्दल, त्यातही तुकारामाबद्दल विशेष आपुलकी होती.

वाचनाचा व पुस्तकांचा संग्रह करण्याची त्यांना विशेष आवड होती. २३ जून १९४९ (गुरुवार) रोजी रात्री ९ वाजता हृदयक्रिया बंद पडून ते ख्रिस्त-वासी झाले.

गोरे नेहेम्या :- (जन्म १८२५, मृत्यू १८९५)

नीलकंठशास्त्री गोरे यांचा जन्म झाशी जवळील ५० मैल अंतरावर असलेल्या एका खेडेगावात ८ फेब्रु. १८२५ रोजी झाला. त्यांचे घराणे एक उच्च-कुलीन कोकणस्थ घराणे होते. त्यांच्या वडिलांचा जन्म पुण्यातच झाला होता. पण नशीब काढण्यासाठी ते हिंदुस्थानभर हिंडले व झाशी जवळ मुक्काम असताना त्यांना हे पुत्ररत्न लाभले. नीलकंठशास्त्र्यांच्या जन्मानंतर काही दिवसांनी त्यांचे वडील बनारसला आले. तेथे त्यांच्या काकांना तेथील संस्थानचे दिवाण म्हणून काम मिळाले. त्यानंतर त्या घराची भरभराट होऊन सर्वजण ऐश्वर्याने राहू लागले. अशा भाग्य-काळात नीळकंठ लहानाचा मोठा झाला. त्या काळचे उत्कृष्ट शिक्षण त्याला मिळाले. वेद, न्याय व व्याकरण या विषयांतील तीन पारंगत शास्त्र्यांच्या हाताखाली नीळ-कंठाचे संस्कृत शिक्षण झाले. पारंपरिक अशा या शिक्षणाने वाडवडिलांचा धर्म व परंपरा यावर त्याची पूर्ण श्रद्धा बसली होती. आपल्या आत्मचरित्रात सांगितल्या-प्रमाणे ख्रिश्चन धर्माविरुद्धच्या अभिनिवेशातून त्यांनी त्या धर्माची पुस्तके वाचली, त्या धर्माच्याविरुद्ध विवाद केले आणि दोन्ही धर्मांचा तुलनात्मक विचार करता अखेरीस ख्रिस्ताच्या धर्मतत्त्वांनी ते भारले गेले. वृद्ध वडील, ऐश्वर्यात वाढविणारे काका, स्नेही, या साऱ्यांना सोडून १२ मार्च १८४८ रोजी ते जोनपूर येथील चर्च मिशनरी सोसा-यटीच्या आश्रयाला गेले व मंगळवार दि. १४ मार्च १८४८ रोजी रे. रॉबर्ट हॅवेस यांच्याकडून मिशन हाऊस, जोनपूर येथे त्यांनी बाप्तिस्मा घेतला. त्यावेळी 'नेहेम्या' हे ख्रिश्चन नाव त्यांना देण्यात आले. त्याच नावाने पुढे ते सर्वांना माहीत झाले. नंतर मिशनरी लोकांच्या व मॅजिस्ट्रेटच्या सहाय्याने त्यांच्या पत्नीला सर्वांच्या बंदोबस्तातून सोडवून आणण्यात आले. थोडयाच महिन्यांत लहानग्या मुलीसह पत्नीचाही

बाप्तिस्मा झाला. दुर्दैवाने काही दिवसांतच त्यांची पत्नी वारली पण मुलीला त्यांनी उत्तम शिक्षण दिले.

बाप्तिस्मा झाल्यानंतर गोरे यास प्रेससाठी ख्रिश्चन तत्त्वे वगैरे विशद करणारी भाषांतरे लिहिण्याचे काम देण्यात आले.

एकदा बनारस येथे महाराज दुलिपसिंग याजबरोबर ओळख व संभाषणाचा प्रसंग घडला. त्या ओळखीचे स्नेहात रूपांतर होऊन महाराजा दुलिपसिंगने त्यास आपल्याबरोबर ट्युटर म्हणून युरोपात नेले. तिकडील वास्तव्यात गोरे यांनी मोठ्या व्यक्ती व स्थळे यास भेटी दिल्या. महाराजांबरोबर बकिंमहॅम पॅलेसमध्ये दरबारी मंडळी व खुद्द राणी एलिझाबेथ यांचीही भेट झाली. ऑक्सफर्डला प्रो. मॅक्समुल्लर यांची भेट घेतली. लंडन, ऑक्सफर्ड, केंब्रिज सर्वत्र त्यांचे स्वागत झाले. सोळा महिने त्यांचे युरोपमध्ये वास्तव्य झाले. पण त्यांना भारतात परतण्याची जबरदस्त ओढ होती.

मुंबई, पुणे, अहमदनगर इत्यादी अनेक ठिकाणी हिंडून त्यांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराचे काम केले. त्यांचे पांडित्य, संस्कृत पुस्तकांचे वाचन, एतद्देशीय भाषांचे ज्ञान व मूळ धर्म पुस्तके चांगली समजण्याइतके उत्कृष्ट इंग्रजी ज्ञान या त्यांच्या सर्वगुणांचा धर्मप्रसारासाठी चांगलाच उपयोग झाला. या गुणांच्या जोडीला सतत वाचन व अध्ययन चालू होते. अहमदनगरला तर असे घडले की त्यांनी चार व्याख्याने दिली. ती ऐकूनच केवळ तीन तरुण ख्रिस्ती झाले. रे. रत्नोजी नौरोजी, रे. एम. कासीमभाई आणि रे. शाहू दाजी कुकडे हे ते तीन तरुण होत.

इंग्लंडहून परतल्यानंतर तेरा वर्षे त्यांनी हे कार्य अविरत केले. C. M. S. च्या कक्षेतील गर्ल्स स्कूलचे ते हेडमास्तरही होते. पुढे त्यांनी गॉस्पेल प्रपोगेशन सोसायटीत प्रवेश केला. १८६१ मध्ये दक्षिण भागात मुख्य प्रचारक म्हणून त्यांनी काम केले.

इ. स. १८७६ मध्ये ते पुन्हा एकदा इंग्लंडला गेले. यावेळेस सेंट जॉन, द इव्हॅन्जुऑलिस्ट सोसायटीमध्ये नवशिका म्हणून प्रवेश घेतला. येथील अठरा महिन्यांच्या काळात, ग्रन्थम येथे भरलेल्या मिशनरी कॉन्फरन्समध्ये त्यांनी एक निबंध वाचला. १८७७ मध्ये ते पुन्हा भारतात आले. नंतर ते इंदूरला आले. १८७९ च्या सुमारास पुन्हा पुण्यास आले. यानंतर उरलेले बहुतेक आयुष्य त्यांनी पंचहौद मिशनमध्ये पुण्यासच काढले. ते धर्मप्रसारासाठी ठिकठिकाणी हिंडले. मुंबईस ज्यू लोकांच्या समोरही त्यांची प्रसार व्याख्याने दिलेली होती. अखेरी अखेरीस १८८२ मध्ये प्रचारासाठी ते पंढरपूरातही गेलेले होते. शेवटी मात्र पुण्यासच मध्यवर्ती ठिकाणी ते घर घेऊन राहिले. पुण्यातील शिक्षित हिंदूंशी संपर्क साधता यावा हा त्यामागे हेतू होता.

पुण्याच्या या वास्तव्यात त्यांनी काही पुस्तके लिहिली, " Is there any

proof that Christianity is Divinely-given Religion ? "

या पुस्तकामुळे पंडिता रमाबाई ख्रिश्चन होण्याचे आधी त्यांच्या निर्माण झालेल्या काही शंकांचे निरसन झालेले आहे. इ. स. १८८८ मध्ये कलकत्त्याहून " Christianity not of Man, but of God. " या विषयावरील व्याख्यान-मालिका त्यांनी प्रसिद्ध केली. वक्तृत्वापेक्षा पांडित्य व लेखन गुण त्यांच्याजवळ अधिक होते. इंग्लिश व भारतीय भाषा या दोन्हींतही त्यांनी लिखाण केलेले आहे. षड्दर्शन दर्पण – हिंदी व नंतर त्याचे इंग्रजी भाषांतर The Genuiness of the holy Gospels असे केले.

हिंदूंच्या सनातनपणातील अनेक दोष व ख्रिस्ती धर्मशास्त्रातील तारणशक्ती दाखविणारे अनेक लेख त्यांनी लिहिले आहे.

२९ ऑक्टोबर १८९५ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी ते निधन पावले.

डॉ. मॅथ्यू लेदर्ले :– (जन्म इ. स. १९२६)

यांचा जन्म जर्मन देशात इ. स. १९२६ साली झाला. त्यांचे पूर्वायुष्य जर्मनीमधील बव्हेरीया या परिसरात घडले. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या अखेरीस ते मिलीटरी अॅकॅडेमीत सामील झाले आणि त्यांनी पॅराट्रुप्स रेजिमेंटमध्ये काही काळ नोकरी केली. त्यांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास डिलिजेन आणि म्युनिक या ठिकाणी झाला. इ. स. १९४७ पासून जेजुईट संघाचे सभासद आहेत.

इ. स. १९५१ पासून डॉ. लेदर्ले भारतात राहत आहेत. पुण्याच्या ज्ञानदीप विद्यापीठात आपला अभ्यासक्रम पुरा केल्यावर इ. स. १९६५ नंतर त्यांनी तत्त्वज्ञान विषयात संशोधन करून पुणे विद्यापीठातून पीएच. डी. पदवी मिळविली. इ. स. १९६६ साली त्यांना भारतीय नागरिकत्व मिळाले. त्यांना मराठी भाषा चांगली अवगत असून भारताच्या शहरी व ग्रामीण जीवन पद्धतीचे व्यापक ज्ञान आहे. पुणे येथील स्नेहसदन या संस्थेच्या संस्थापकांपैकी ते एक आहेत. त्या संस्थेत धर्मांतर्गत विचारांची देवाणघेवाण करणारे एक अभ्यास केंद्र आहे. पुण्यातील या संस्थेला आता " स्नेहसदन इन्स्टिटयूट फॉर द स्टडी ऑफ रिलिजन " या नावाने ओळखले जाते.

महाराष्ट्रातील विविध सामाजिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक चळवळीशी डॉ. लेदर्ले यांचा अगदी निकटचा संबंध आहे. सध्या ते पुण्यातच स्थायिक झालेले आहेत.

बाबा पद्मनजी

यांचे संपूर्ण नाव बाबा पदमनजी मुळे. यांची निश्चित जन्मतारीख उपलब्ध नाही (पण इ. स. १८३१ च्या मे महिन्यात बेळगांव येथे त्यांचा जन्म झाला, असा अंदाज आहे). घरची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी होती. घरी मध्यमवर्गीय

संस्कृतीला साजेल असे ब्राह्मणी वळण होते (बाबा जातीने कासार होते). आई धार्मिक व श्रद्धाळू होती. उपास, व्रते, तुळशीची पूजा, पोथी वाचणे–ऐकणे या गोष्टींची तिला आवड होती. त्यांच्या घरी शाक्तपंथी उपासना चालत.

लहानपणी बाबांचे शिक्षण बेळगाव येथील सरकारी शाळेत झाले. शिक्षणाची भाषा कानडी होती. तरी बाबांना घरगुती शिकवणुकीने मराठी व संस्कृत भाषेचे शिक्षण मिळाले. इ. स. १८४३ मध्ये बेळगावच्या मिशन हायस्कूलमध्ये बाबांनी प्रवेश घेतला.

हायस्कूलचे शिक्षण होईपर्यंत धार्मिक विचार, लौकिक सुखभाग, डामडौल, वगैरे बाबत बाबा इतर चारचौघांसारखे होते. परंतु हायस्कूलात मिळालेल्या शिक्षणाने ते अंतर्मुख झाले व धर्म, मूर्तिपूजा, कर्मकांड वगैरेबद्दल विचार करू लागले.

बेळगावनंतर मुंबईच्या एज्युकेशन सोसायटीच्या एल्फिन्स्टन विद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. त्याचे शिक्षण पुरे होण्याच्या आधीच त्यांचे लग्न झालेले होते. वडिलांच्या नोकरीच्या निमित्ताने ते वडिलांबरोबर एडनला गेले.

तिथून १८४९ मध्ये मुंबईस आले व मुंबईस फ्री चर्च हायस्कूलमध्ये पुन्हा शिक्षण घेण्यास सुरुवात केली. येथून पुढील काळ बाबांच्या मानसिक जागृतीचा काळ ठरला. या शाळेत नारायण शेषाद्री त्यांना शिक्षक होते. त्यांचा सहवास, तसेच रे. जॉर्ज बोवेन, रे. निसूबिट, रे. मरे मिचेल, रे. डॉ. विल्सन, इत्यादी मिशनऱ्यांचा सहवास व प्रभाकर, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, शतपत्रे, मिशनऱ्यांची भाषणे या सर्वांच्या परिणामाने बाबा धर्मासंबंधी खोलवर विचार करू लागले. त्याचा परिणाम त्यांच्या ख्रिस्तीधर्म स्वीकारात झाला.

३ सप्टेंबर १८५४ रोजी बेळगावला लंडन मिशन चर्चचे रे. टेलर यांच्या हस्ते बाबांचा बाप्तिस्मा झाला. १८५२ साली बाबांच्या वडिलांनी बाबांना ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये डॉक्टरकीच्या अभ्यासासाठी दाखल केले होते. बाबांचे मन त्या अभ्यासात रमले नाही.

इ. स. १८६० पर्यंत आपली हिंदू पत्नी आपणाकडे येईल म्हणून त्यांनी वाट पाहिली व नंतर आपण ख्रिस्तीधर्मानुसार लग्न केले. बाबांनी ख्रिस्त धर्मात गेल्यावर तीन विवाह केले; पण तीनही कुटुंबे वारली.

मराठी भाषेत बाबांनी विपुल लेखन केले आहे. सरकारी नोकरी अशी त्यांनी केली नाही. लेखन, वाचन, ख्रिस्ती धर्मप्रचार हेच त्यांच्या जीवनातील मुख्य व्यवसाय होत. अनेक संस्थांशी लेखक, अध्यक्ष, सेक्रेटरी इत्यादी अनेक नात्यांनी त्यांचा निकट संबंध आला. ख्रिस्ती धर्मप्रचारास्तव नियतकालिके पण त्यांनी चालविली. मुंबई ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, ज्ञानोदय, दक्षिणा प्राईस कमिटी या संस्थांनी बाबांचा सतत गौरव व कौतुक केलेले दिसते.

२९ ऑगस्ट १९०६ रोजी ते ख्रिस्तचरणी विलीन झाले.

पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाइचा जन्म एका चित्तपावन ब्राह्मणाचे घराण्यात एप्रिल १८५८ मध्ये झाला. त्यांचे वडिल अनंतशास्त्री डोंगरे हे एक विद्वान ब्राह्मण होते. मंगलोर जिल्ह्यातील पश्चिम घाटाचे पायथ्याशी असलेल्या मल्हरांबी गावचे ते मूळचे राहाणारे. त्याकाळच्या पुराणमताभिमानी सनातन ब्राह्मणांच्या मानाने अनंतशास्त्री काही बाबतीत सुधारक मताचे होते. वर्णव्यवस्था व जातिभेद जरी ते मानीत होते, तरी स्त्रीशिक्षणाचे मात्र ते मोठे पुरस्कर्ते होते. त्यांनी आपली पत्नी व आपल्या मुली यांना पारंपरिक संस्कृत शिक्षण घरी दिले. त्यांची मुले आईच्या मांडीवर संस्कृत शिकली. स्त्रियांना संस्कृत विद्या शिकविण्यास पुढाकार घेतल्यामुळे तत्कालीन समाजाने वाळीत टाकल्याप्रमाणेच वागविले. उदरनिर्वाहासाठी अनंतशास्त्री आपली पत्नी व मुलांसह गावोगाव हिंडत असत. आईवडिलांची ढासळती तब्येत, त्यांत पोटासाठी करावे लागणारे सायास, समाजाकडून दिली जाणारी गैरवर्तणूक, हे सारे या छोट्या मुलीने जवळून पाहिले व अनुभवले. अशाही स्थितीत बायको व मुली यांना शिकविण्याची वडिलांची हौस कमी झाली नाही. मुलेही शिक्षणास कंटाळली नाहीत.

इ. स. १८७६–७७ च्या दुष्काळानंतर अनंतशास्त्री फार काळ जगू शकले नाहीत. त्यानंतर रमाबाईंची आई व मोठी बहीण या अन्नावाचून क्षीण होऊन इहलोक सोडून गेल्या. रमाबाई व त्यांचा मोठा भाऊ दोघेच उरले. दोघेही गावोगाव हिंडत, मिळालेल्या शिक्षणाच्या आधारे मिळेल ते घेऊन कालक्रमणा करू लागले. दोघेही हिंडता हिंडता इ. स. १८७७ मध्ये कलकत्त्यात आली. तिथे गेल्यावर काही अंशाने त्यांचे जीवन स्थिरावले. कलकत्त्यात चौकाचौकांत उभे राहून रमाबाईंनी स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, वगैरे संबंधीचे आपले विचार लोकांसमोर मांडले. या शहरात त्यांच्या विचारांना प्रतिसाद काही अंशी मिळाला. एकतर रमाबाईंचे नवविचार सुधारकांना पटण्याजोगे होते. शिवाय रमाबाई बोलताना आपल्या सर्व विधानांना भारतीय संस्कृती व संस्कृत शास्त्रग्रंथ यातील आधार व दाखले वेळोवेळी देत असत.

अस्खलित संस्कृत वाणी बोलणाऱ्या या अविवाहित तरुणीचा लवकरच या शहरात 'पंडिता' म्हणून बोलबाला झाला. हळूहळू रमाबाईंना आपल्या जीवनकार्याची दिशा व आवश्यक तो अनुयायी वर्ग लाभला. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, दलित, दीन, विधवांना आधार वगैरे कार्यातील त्यांची पावले निश्चितपणे प्रगतीच्या दृष्टीने पुढेच पडू लागली. पुढील मुक्तिमिशन कार्याची बीजे अशा प्रकारे रोवली गेली. कलकत्ता शहरात येऊन या दृष्टीने जीवनास स्थिरता येत गेली, तर त्यांचा एकमेव बन्धू कलकत्ता येथे आल्यावर थोड्याच कालाने स्वर्गवासी झाला. त्यानंतर कलकत्ता विद्यापीठातून एम्. ए. झालेल्या व वकिली व्यवसाय असलेल्या बिपिन बिहारी मेधावी, यांच्याशी रमाबाईंनी विवाह केला. हे जातीने शूद्र होते. विवाहानंतरची दोन वर्षे (१८८०–८२) हा काल आसाममध्ये त्यांनी पतीसमवेत

काढला. त्यांना एक कन्यारत्न लाभले. इ. स. १८८२ मध्ये बिपिन बिहारी कॉलऱ्याने अचानक कालवश झाले व पुन्हा रमाबाईंचे वैयक्तिक जीवन संपून सामाजिक जीवनच सुरू झाले. कलकत्त्यात त्यांनी 'आर्य महिला समाज' ही संस्था स्थापन केली. अद्यापपर्यंत निषिद्ध मानलेले वेदांचे अध्ययन त्यांनी केले. केडगाव येथील मुक्तिमिशन व शारदासदन ही त्यांच्या समाजकार्याची भरीव स्मारके आहेत. इंग्लंड व अमेरिका देशात फिरून त्यांनी आपल्या कार्यासाठी मदत मिळविली. निराधार विधवांचे त्या आधारस्थान होत्या. इ. स. १८८३ मध्ये त्यांनी बाप्तिस्मा घेतला. त्यांची मुलगी मनोरमा त्यांच्यासारखीच हुशार व आईच्या मागे वारसा चालवू शकेल अशी होती. परंतु दुर्दैव असे की २४ जुलै १९२१ रोजी ती अकाली वारली.

५ एप्रिल १९२२ रोजी पंडिता रमाबाई ख्रिस्तचरणी विलीन झाल्या. (संदर्भ :-Indian Christians Biographical and Critical Sketches.)

कुकडे शाहू दाजी :-(जन्म इ. स. १८३३ : मृत्यू इ. स. १८८५ आक्टोबर १४)

बाप्तिस्मा – ९ जून १८५९ रे. रामकृष्णपंत मोडक यांच्याकडून.

शाहूरावांचे वडील दाजी जगन्नाथ कुकडे हे नागपूरचे राहणारे. हे अगदी कडकडीत ब्राह्मण्य पाळणारे गृहस्थ होते. लग्नानिमित्त अहमदनगरला आले व सासऱ्याच्या आग्रहामुळे व्यापारासाठी अहमदनगरला घर करून राहिले. अहमदनगरच्या नव्या पेठेत घर बांधून स्थायिक झाले. यांचे सर्वात ज्येष्ठ चिरंजीव म्हणजे शाहू दाजी कुकडे. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी आपला इंग्लिश शाळेतील अभ्यास पुरा केला. सरकारी शाळेचे हेडमास्तर मि. डिसिल्वा, यांनी, कुकडे यांची हुशारी, विद्येची आवड, सौजन्यशील स्वभाव पाहून त्यांच्या शिक्षणात विशेष लक्ष घातले. मि. डिसिल्वांच्या शिफारशीवरून इ. स. १८५३ साली शाहूरावांना सरकारी इंग्लिश शाळेत शिक्षकाचे काम मिळाले. विद्यार्थिदशेपासूनच शाहूरावांचे विचार एकेश्वरी मताकडे झुकू लागले होते. आपल्या वडिलोपार्जित धर्मावरील श्रद्धा कमी होऊ लागली होती. प्रारंभी इतरांप्रमाणे तेही ख्रिस्ती धर्माचा धिःक्कार करीत. सनातन अंधपरंपरेचा, अंध धार्मिक आचरणाचाही त्यांना उबग होता. स्वतःच्या सुधारक मतांचा अभिमान होता.

अहमदनगर येथे फादर नीलकंठशास्त्री गोरे (नेहेम्या गोरे) यांची 'ख्रिस्ती धर्माची तत्त्वे' या विषयावरील व्याख्याने ऐकून त्यांचे विचार पालटत गेले. फादर गोरे यांची व्याख्याने ऐकून शाहूराव, त्यांचा धाकटा भाऊ वासुदेव, कासमभाई ढालवाणी, रतनजी नौरोजी या चौघांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. रे. हेन्री वॅलेन्टाईन व डॉ. एस्. बी. फेअरबँक यांच्या लेखांचा व भाषणांचा शाहूरावांच्या मतपरिवर्तनास हातभार लागला. १९ मे १८५८ रोजी ते आपल्या एका

ख्रिस्ती मित्राकडे जाऊन राहिले व तिथून आपण ख्रिस्ती धर्म स्वीकारणार असल्याचे पत्र पाठविले. त्यांच्या मित्राच्या घरून मारपीट करून आपल्या घरी नेण्याचा त्यांच्या आईने प्रयत्न केला. खूप आरडाओरड झाली. आईचा हात कसा तरी झिडकारून शाहूराव आपल्या खोलीत आले व आतून कडी लावून घेतली. तरी लोक पुन्हा जमा होऊन फाटकावरून आत आले. तेव्हा मिशनकडून पोलिसात खबर देण्यात आली. इन्स्पेक्टर, डेप्युटी मॅजिस्ट्रेट आले असता 'या लोकांनी आमच्या मुलास फसवून आणले, त्याने घरचे अडीच हजारांचे दागिने चोरून आणले व येथे पाद्रीच्या बंगल्यात लपवून ठेवले' अशी फिर्याद केली. चौकशीचा फार्स झाला. मुलांना जुलुमाने आणण्यात आले आहे काय असे विचारण्यात आले, तेव्हा मुलांनी आम्ही स्वखुषीने आलो असल्याचे सांगितले. मुलांस काही काळ कचेरीत संरक्षणाखाली ठेवण्यात आले. नंतर मुलांना आपल्या घरी घेऊन जाऊ द्यावे म्हणून अर्ज विनंत्या केल्या. तेव्हा दर रविवारी ख्रिस्ती भजनालयात जाण्यास व मित्राकडे जाण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार आईबापांनी मुलांस घरी नेले. पण त्या मुलांना नेऊन एका रिकाम्या वाड्यात कोंडून ठेवले. वाड्याला बाहेरून कुलूप लावण्यात आले. जेवणापुरता दरवाजा उघडण्यात येई. अन्नही दुरूनच देण्यात येई. मधून मधून शास्त्री, पुराणिक यांचेकडून उपदेश करून, मन वळविण्याचे प्रयत्न केले जात. असा तीन दिवस छळ झाला. चौथ्या दिवशी धाकटा भाऊ वासुदेव प्रायश्चित्त घेऊन हिंदूधर्मात येण्यास तयार झाला. पण शाहूरावांचे मानसिक धैर्य अढळ राहिले. शाहूरावांच्या सुटकेसाठी मॅजिस्ट्रेटकडे प्रयत्न केले. त्यानुसार सुटका झाली. वासुदेव यास त्याच्या इच्छेनुसार आईबापांकडे राहू दिले. परंतु शाहूरावास ते मान्य नव्हते. मुलाचे मन वळविण्यास आईबापांनी आणखी आठ दिवसांची मुदत मागितली. ती देण्यात आली. व सर्वांच्या इच्छेवरून शाहूराव आणखी एक आठवडा आईबापांच्या घरी राहिले. या काळात शाहूरावांचे भाऊ-बहिणी आदी अनेक आप्तांनी हृदयद्रावक विलाप केला. पण शाहूराव कशानेही बधले नाहीत. अखेरीस ९ जून १८५६ रोजी रे. रामकृष्णपंत मोडक यांचेकरवी शाहूरावांचा बाप्तिस्मा झाला.

शाहूरावांनी आपल्या पत्नीस ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा आग्रह केला. पण त्यांचे सर्व प्रयत्न फुकट गेले. इ. स. १८५९ मध्ये शाहूरावांनी दुसरा विवाह केला. ख्रिस्ती झाल्यावर शाहूरावांनी सरकारी नोकरी सोडून मिशनरी कार्यास सुरुवात केली. अहमदनगरला दहा वर्षे राहिले. त्या काळात सार्वत्रिक ऐक्याच्या घटनेसंबंधी मदत केली. ते ऐक्याचे अध्यक्ष होते. (१८६६ ते १८८५). ख्रिस्ती मंडळ्यांना आर्थिक मदत मिळावी म्हणून त्यांनी अविश्रांत श्रम केले. इ. स. १८६७ मध्ये मुंबईस ज्ञानोदयाच्या इंग्रजी व मराठी संपादकाचे काम करण्यासाठी त्यांना बोलाविण्यात आले. पाच वर्षे त्यांनी ते काम केले (इंग्रजी संपादनाचे). मराठी

संपादनाचे काम इ. स. १८८५ पर्यंत केले. इ. स. १८६७ ते १८७१ पर्यंत त्यांनी बायबल सोसायटीच्या बायबल रिव्हिजन कमिटीत काम केले. चार शुभवर्तमाने व प्रेषितांचे कृत्ये यांची भाषांतरे केली. मार्क शुभवर्तमान मोडीत प्रसिद्ध केले. इ. स. १८७८ मध्ये आपली पत्नी सौ. चंद्राबाई हिच्या देखरेखीखाली हल्ली 'वौकर हॉल' म्हणतात, त्या मुलींच्या शाळेस प्रारंभ केला. बाँबे मिशनरी कॉन्फरन्सला ते दोनदा प्रतिनिधी म्हणून गेले होते. बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटीचे ते सेक्रेटरी होते. इ. स. १८८५ पर्यंत भाषांतर कमिटीचे सभासद होते.

(१) तलावातून पाणी घेण्याचा ख्रिस्ती लोकांचा हक्क
(२) बाप्तिस्मा करणारा योव्हान
(३) इस्लामी धर्माचा पापविरहित प्रवक्ता
(४) मोहरमचा सण

इत्यादी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली.

इ. स. १८८१ मध्ये ऑक्टोबर २६–३० तारखांना झालेल्या अमेरिकन मिशनच्या पन्नास वर्षांच्या ज्युबिली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाहूरावांना देण्यात आले होते.

१४ ऑक्टोबर १८८५ रोजी वयाच्या ५२ व्या वर्षी त्यांस देवाज्ञा झाली. बाबा पदमनजी, डॉ. एस. वी. फेअरबँक, वॅलेन्टाईन, रे. ॲलन हेजन, बापूराव आठवले, मि. जॉन पॉल, तुलसिंग इत्यादी नावाजलेल्या लोकांच्यात त्यांचे बसणे-उठणे होते.[१]

(१. संदर्भ – १. कुकडे व्ही. एस; शाहू दाजी कुकडे यांचे संक्षिप्त चरित्र, स्कॉटिश मिशन प्रेस, पूना.

२. बाळबोधमेवा, मि. शाहू दाजी कुकडे (मृत्युलेख) ५ नोव्हे. १८८५)

शेख उमर : हे घोडनदीचे राहाणारे. लहानपणी त्यांनी उर्दू, फारशी, अरबी भाषांचा अभ्यास केला. कुराणाचा अर्थ सांगण्यात ते अधिकारी होते. त्या वेळेस घोडनदीस रे. सिदोबा मिसाळ हे पाळक होते. त्यांच्याशी वादविवाद करताना अखेरीस त्यास ख्रिस्ती धर्माचे खरे स्वरूप समजले व आपला तरणोपाय ख्रिस्ती धर्मातच आहे हे लक्षात आल्यावर ता. २९ ऑक्टोबर १८६५ रोजी जाहीरपणे ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्यानंतरचा काल त्यांनी नगरात काढला. त्यांचे शिक्षण नगर येथील नॉर्मल स्कूलमध्ये झाले व त्याच शाळेत ते पुढे शिक्षक झाले. त्या शाळेचे मुख्य मि. हेग साहेब त्यांना आपल्या कुटुंबातील एक मानीत. ते कित्येक वर्षे नगर मंडळीचे कारभारी होते. खेडयापाडयांतील ख्रिस्ती लोकांसाठी 'मान्ना' नावाचे एक मासिक त्यांनी स्वखर्चाने चालविले. काही प्रमाणात वर्गणी काढून व काही स्वतःचे पैसे घालून वाकोडी व भिंगार येथे शाळा घातल्या आणि मुसलमान लोकांसाठी वाचनगृह स्थापिले. साधारण लोकास पवित्रशास्त्राच्या प्रती बक्षीस

द्याव्यात, अडीअडचणीला पैसे द्यावे,-प्रसंगी उपदेशास कोणी नसल्यास स्वतः पैसे देऊन लोक आणावे व उपदेश करावा, अशा अनेक प्रकारे त्यांनी प्रभूच्या शिकवणीचा प्रसार केला.

शेख उमर यांचा अंत क्षयाने झाला. ता. २७ मार्च १८८१ रोजी ते प्रभुचरणी विलीन झाले. त्यांची जन्मभाषा उर्दू असूनही मराठीमध्ये त्यांनी फार चांगली काव्यरचना केली. त्यांची भाषा प्रसादयुक्त आहे (संदर्भ – रे. ना. वा. टिळक, बालबोधमेवा, ३ ऑगस्ट १९००).

रे. एच्. के. राइट : परदेशातून येऊन हिंदुस्थानात शैक्षणिक व सामाजिक कार्य करण्याच्या मिशनरी लोकांची जी एक अखंड परंपरा चालू आहे, त्यात रे. होरेस के. राइट यांचे नाव प्रामुख्याने नमूद केले जाईल.

रे. राइट यांचा नगर युनियन ट्रेनिंग कॉलेजशी जवळ जवळ १९२५ पासून १९४२ पर्यंत संबंध होता. इ. स. १९२२ साली प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. त्यानंतर प्राथमिक शिक्षकाच्या ट्रेनिंगसाठी काही सरकारी संस्था निघाल्या, त्याचवेळी रे. राइट यांच्या खटपटीमुळे ‘ युनिअन ट्रेनिंग कॉलेज ’ अहमदनगर, या संस्थेसही ट्रेनिंगचे काम करण्यासाठी मान्यता मिळाली. त्यावेळेस युनिअन ट्रेनिंग कॉलेज ही नगरमध्ये मान्यता मिळालेली एकच खासगी संस्था होती.

जवळजवळ सतरा वर्षे राइटसाहेब या संस्थेचे चालक होते. या काळात या संस्थेच्या उन्नतीसाठी त्यांनी अविश्रांत श्रम केले आणि संस्था नावारूपाला आणली.

राइटसाहेबांनी शैक्षणिक कामात अनेक प्रकारे भर घातली वेळोवेळी ते सरकारने नेमलेल्या शैक्षणिक कमिट्यांचे सभासद होते. शैक्षणिक वाङ्मयात भर टाकावी म्हणून परदेशात चाललेल्या शैक्षणिक प्रयोगांची इकडील शिक्षकांना कल्पना यावी म्हणून त्यासंबंधीचे लेख, अनुवाद वगैरे प्रसिद्ध करण्यासाठी ‘नवा शिक्षक’ नावाच्या मराठी मासिकाचे त्यांनी अनेक वर्षे संपादन केले.

ते स्वतः शिस्त पाळत होते व इतरांना शिस्त लावावी यासाठी ते प्रयत्नशील असत.

अमेरिकेत त्यांच्या मायदेशी इ. स. १९४९ मध्ये ते ख्रिस्तवासी झाले.

(संदर्भ – ज्ञानोदय, २० जाने. १९४९)

हिवराळे व्ही. व्ही. –अकोला येथे बेथेल अलायन्स चर्चचे पाळक व गेली तीस वर्षे ‘ जीवनप्रकाश ’ मासिकाचे संपादक. इ. स. १९४०–१९६० पर्यंत त्यांनी ‘ सुवार्तिकेचे ’ आणि प्रौढ साक्षरतेचे कार्य केले. तसेच एन. सी. सी. मध्ये इ. स १९५५ ते १९६० या काळात प्रौढ साक्षरतेच्या संदर्भात प्रौढ शिक्षण ऑर्गनायझर म्हणून संपूर्ण महाराष्ट्रासाठी कार्य केले.

प्रौढ शिक्षणाला अनुसरून त्यांनी खालील पुस्तके लिहिली आहेत.

(१) वाचन किल्ली
(२) जोडाक्षरे कशी शिकवावीत (वाचन प्रगती)
(३) आकडे कसे शिकवावेत?
(४) सुमंत सुमती
(५) प्राचीन मंडळीचे साक्षीदार
(६) सापापासून सांभाळा

तसेच सुवार्ता कार्यासाठी (१) परमेश्वराचे दर्शन झाले काय? (२) तुम्ही तुमचे शास्त्र रोज वाचता काय–ही दोन पुस्तके लिहिली आहेत.

श्री. हिवराळे यांनी (१) सुवार्ता (२) रणसिंग (३) अंकुश– या आणखी नियतकालिकांचे संपादन केले आहे. पण आता ती तीनही नियतकालिके बंद पडली आहेत.

सर्वसामान्यांसाठी लिहिणारा, धडपडणारा एक लेखक व संपादक म्हणून केलेली कामगिरी गौरवास्पद आहे.

(व्ही. व्ही. हिवराळे यांच्या पत्रावरून)

रे. फादर मिरांडा : यांनी केलेल्या सामाजिक कार्याची थोडक्यात अशी माहिती सांगता येईल. मूळगाव चर्च इमारतीसाठी गोळा केलेला निधी, पाली, मर्सेस इत्यादी ठिकाणी बांधलेल्या शाळेच्या इमारती, माणिकपूर येथे खोदलेला तलाव, मर्सेस येथील खास मुलींची शाळा, डहाणू येथील चर्च इमारत व झरोलीसारख्या मिशन विभागात केलेली कार्ये त्यांच्या उत्कृष्ट श्रमदानाची व सहकार्याची साक्ष देतील. इ. स. १९४३ साली त्यांनी दारूबंदी मोहीम हातात घेतली. शेतकऱ्यांना अडचणीच्या वेळी मदत व्हावी म्हणून मर्सेस येथे परस्पर सहायक संघाची स्थापना केली. स्त्रियांच्या वस्त्रप्रावरणाच्या संदर्भात त्यांनी साडीचा पद्धतशीर उपयोग व्हावा म्हणून पुरस्कार केला.

मे १९६७ मध्ये रे. फादर मिरांडा ख्रिस्तवासी झाले. त्यांना ६९ वर्षांचे आयुष्य लाभले. ते सारे आयुष्य ख्रिस्ताची सुवार्ता प्रसारित करण्यासाठी खर्च केले. रे. फादर मिरांडा यांचा मूळ पेशा शिक्षकाचा आणि वृत्ती मिशनरी होती. ख्रिस्त प्रेम यांनी त्यांचे जीवन जसे मोहरले, तसे अखिल कॅथॉलिक मराठी भाषिकांचे जीवन मोहरावे म्हणून त्यांनी अखंड प्रयत्न केला आणि कॅथॉलिक वाङ्मयात मोलाची भर घातली.

(सुवार्ता – १५ एप्रिल १९६९ अंकावरून)

डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे – डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांचा जन्म २२ जानेवारी १८८९ रोजी सोलापूर येथे झाला. अहमदनगर येथील अमेरिकन मिशनच्या मुलांच्या हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. मॅट्रिक झाल्यावर त्याच हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. विश्वविद्यालयीन अभ्यासासाठी पहिली दोन

वर्षे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात गेले व नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून पुढची दोन वर्षे शिकून पदवीधर झाले. १० मार्च १९२१ ते ८ डिसेंबर १९२१ या आठ महिन्यांचे काळात त्यांनी ज्ञानोदयाचे संपादक म्हणून काम केले. त्यानंतर तत्त्वज्ञान विषयावर प्रबंध लिहून अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठाची पीएच. डी. पदवी १९२८ साली मिळविली. पीएच. डी. होऊन अमेरिकेतून आल्यावर मुंबईच्या विल्सन कॉलेजात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले. इ. स. १९३० ते १९४६ या काळात ते विल्सन कॉलेजात होते. इ. १९३२ ते १९३७ या काळात त्यांनी ' लोकशिक्षण माले 'चे संपादन व प्रकाशन केले. इ. स. १९३९ नंतर पुन्हा त्यांनी ज्ञानोदयाच्या संपादनाची धुरा स्वीकारली. ती मधून मधून काही काळ सोडल्यास इ. स. १९५१ पर्यंत सांभाळली. १९४० साली सरकारने जे. पी. म्हणून नेमणूक केली. इ. स. १९४७ च्या जूनमध्ये अहमदनगर येथे अहमदनगर कॉलेजची स्थापना केली. १९५१ पर्यंत त्या कॉलेजचे ते प्राचार्य होते. तेथून निवृत्त झाल्यावर १९५२ मध्ये त्यांनी उषा साप्ताहिक सुरु केले. उच्च शिक्षणाचा उपयोग ग्रामीण जनतेस व्हावा म्हणून त्यांनी कॉलेजचा एक भाग म्हणून ' ग्राम सुधारणा पथक ' उभे केले. ८ सप्टेंबर १९६१ या दिवशी ते खिस्तचरणी विलीन झाले.

डॉ. हिवाळे यांची साहित्यसेवा उल्लेखनीय आहे. त्यांचे साहित्य समाज-प्रबोधनासाठी लिहिले गेले आहे. ' हरवलेला बाबू ' या आपल्या पुस्तकात त्यांनी तत्कालीन ज्वलंत प्रश्न - विधवा विवाह व विधवांची दुःखे यावर प्रकाश टाकला आहे. खिस्ती लोकशिक्षण मालेतून प्रसिद्ध झालेली सर्व पुस्तके धार्मिक स्वरूपाची आहेत. ज्ञानोदय व उषा साप्ताहिक या दोहोंचे संपादनकार्य हेही त्यांचे प्रमुख कार्य होय.

रॉबर्ट ड्रमंड हा युरोपिअन गृहस्थ मुंबई इलाख्यात १७९३-९४ मध्ये आला. त्यानंतर मुंबईचा असिस्टंट सर्जन म्हणून सन १७९७ मध्ये त्याची नेमणूक झाली. त्याची एम. डी. ची परीक्षा झाल्यावर १८०३ मध्ये त्याला सर्जन म्हणून नेमले. इ. स. १८०९ मध्ये बोटीने इंग्लंडला जात असताना त्याला बोटीवरच मृत्यू आला.

कॅप्टन गिडिऑन हचिन्सन : याचा जन्म १८ मे १७८३ साली झाला. इ. स. १८०० मध्ये बॉम्बे इन्फट्रीमध्ये कॅडेट म्हणून भरती. इ. स. १८१४ कॅप्टन लेफ्टनंट, १८१७ मध्ये कॅप्टन, इ. स. १८२४ मेजर झाला. ३ ऑक्टोबर १८२४ रोजी आपल्या मोचा गावी मृत्यू पावला.

कॅप्टन डेव्हिड केपन : केपनचा जन्म १६ ऑगस्ट १७९३ रोजी झाला. वडील ईस्ट इंडिया कंपनीत लष्करी खात्यात नोकरीला होते. १७९४ साली त्याचा बाप्तिस्मा झाला. इ. स. १८०९ मध्ये तो लष्करात भरती झाला व १८४८ साली कर्नलच्या हुद्यावर चढला. सन १८१० ते १८१७ या काळात तो मुंबई व कोकण परिसरात होता. या काळात त्याने मराठीचा अभ्यास केलेला दिसतो. केपन लष्करात

कॅप्टनच्या हुद्यावर होता, त्यावेळी मराठी भाषेचा दुभाषा म्हणूनही तो काम पाहात असे. १७ डिसेंबर १८६९ साली तो मरण पावला.

व्हॅन्स केनेडी – (जन्म १७८४, मृत्यू २९ डिसें. १८४६)

याचा जन्म १७८४ साली झाला. याच्या वडिलांचे नाव रॉबर्ट केनेडी असे होते. आपले शिक्षण संपल्यावर ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी स्वीकारली. इ. स. १८०० मध्ये लष्करात भरती झाला व मुंबईस आला. इथे आल्यावर या प्रदेशातील निरनिराळ्या भाषा तो शिकला. पेशव्यांच्या तैनाती फौजेत इ. स. १८०७ मध्ये दुभाषा म्हणून त्याने काम केले. मुंबई आर्मीचा जज्ज व ॲडव्होकेट जनरल म्हणून इ. स. १८१७ ते १८३५ या काळात काम केले. पुढे १८३५ ते १८४६ या काळात मुंबई सरकारचे ओरिएंटल ट्रान्सलेटर या हुद्यावर त्याची नेमणूक झाली. २९ डिसेंबर १८४६ रोजी मुंबई येथे मरण पावला.

त्याचे विविध विषयांचे ज्ञान व त्यातील वाङ्मयाचा अभ्यास पाहून, पेशवे दरबारातील रेसिडेन्ट कर्नल क्लोज याची त्याच्यावर मर्जी बसली. तो त्याच्याशी पौर्वात्य धर्म व तत्त्वज्ञान या विषयांवर चर्चा करीत असे. एल्फिन्स्टनचाही केनेडीवर लोभ होता. केनेडीने मराठी, हिंदी, मल्याळी, फार्सी, संस्कृत या भाषांचाही अभ्यास केलेला होता. पौर्वात्य भाषांतील हस्तलिखिते व संस्कृत भाषेतील विविध ग्रंथांचा संग्रह करण्याचा त्याला नाद होता. मुंबईतील ' बॉम्बे लिटररी सोसायटीच्या ' कार्यातही त्याचा मोठा वाटा होता. या सोसायटीच्या ग्रंथालयातील ग्रंथांची यादी त्याने दोन खंडांत प्रसिद्ध केली. सोसायटीच्या ग्रंथालयातील सभांत त्याने अनेक संशोधनपर निबंध वाचले इ. स. १८१९ साली त्याला सोसायटीचा चिटणीस म्हणून नेमले. तिथे तो १८३१ पर्यंत होता. केनेडीचा हिंदू पुराणांचा अभ्यास लक्षात घेऊन कलकत्त्याच्या रॉयल एशियाटिक सोसायटीने आपल्या 'क्वार्टर्ली ओरिएंटल रिव्ह्यू' या नियतकालिकासाठी काही भाषांतरे लिहून घेऊन ती त्यांत प्रसिद्ध केली.

मोल्सवर्थ :

मोल्सवर्थचा जन्म नेमका केव्हा झाला ते माहीत नाही, पण त्याचा बाप्तिस्मा १५ जून १७९५ मध्ये सरे येथे झाला. त्याच्या वडिलांचे नाव ऑनरेबल रिचर्ड मोल्सवर्थ व आईचे नाव कॅथरीन. एक्झेटर (डेव्हन) येथे त्याचे शिक्षण झाले. शिक्षणानंतर लष्करी खात्यात तो दाखल झाला. १६ जून १८२१ रोजी बडोदे येथे त्याची नेमणूक झाली. इलाख्याच्या ठिकाणी राहून मोल्सवर्थला शब्दकोश पुरा करण्याची परवानगी देण्यात आली. मराठी–इंग्रजी शब्दकोशाचा पहिला भाग पूर्ण झाल्यानंतर सरकारने त्याचा गौरव केला व दुसरा भाग लिहिण्यास परवानगी दिली. पुढे तो आजारी पडल्यामुळे त्यास युरोपला जाण्याची परवानगी देण्यात आली. २४ एप्रिल रोजी त्याच्या नोकरीचा राजीनामा स्वीकारण्यात आला. मोल्सवर्थचा

हिंदी व मराठी या दोनही भाषांचा अभ्यास चांगला होता. मोल्सवर्थ धर्मनिष्ठ ख्रिस्ती होता. लष्करात कॅप्टनच्या हुद्यापर्यंत चढूनही त्याचे मन त्या पेशात रमले नाही. सैनिकाची वृत्ती ही सच्चया ख्रिस्ती धर्म प्रवृत्तीला पोषक नाही, असे त्याचे मत होते. इ. स. १८३१ साली निघालेल्या कोशाची पहिली आवृत्ती दहा-बारा वर्षांत संपली. त्यावेळेस मोल्सवर्थ सेवानिवृत्त होऊन विलायतेस गेला होता. त्यास बोलावून घेतले. सतत पंधरा वर्षे संग्रहाचे व संपादनाचे काम करून पहिल्या चाळीस हजार शब्दांच्या कोशात वीस हजार शब्दांची त्याने भर घातली. त्यात वाक्प्रचार म्हणी आदींचा समावेश केला.

मोल्सवर्थ कोशाच्या दुसऱ्या आवृत्तीसाठी डॉ. विल्सन यांची फार मदत झाली.

मोल्सवर्थ हा अत्यंत निःस्वार्थी, कष्टाळू व सर्वांशी प्रेमादराने वागणारा होता. शरीराने ऊंच, अंगकांतीने मजबूत, दिसायला रुबाबदार व खानदानी वृत्तीचा " मोल्सवर्थ " होता असे त्याचे वर्णन रे. जे. मरे मिचेलने केले आहे.

मोल्सवर्थच्या काळात महाराष्ट्रात मोल्सवर्थला लोक " मोरेश्वर शास्त्री " या नावाने ओळखीत असत.

विशेष म्हणजे मोल्सवर्थने आपल्या कोशाबद्दल कोणतेही मत व्यक्त केलेले नाही. किंवा आपल्या कार्याबद्दल गर्वाची भावनाही मनात आणली नाही. आपण मनापासून काम केलेले आहे. कोशाचे गुणावगुण वाचकांनी आणि अभ्यासकांनी ठरवावेत असे त्याचे म्हणणे होते.

थॉमस कँडी

याचा जन्म १३ डिसेंबर १८०४ रोजी झाला. शिक्षण ऑक्सफोर्ड येथील मॅग्डालेन कॉलेज स्कूलमध्ये झाले. त्यानंतर तो लष्करी खात्यात भरती झाला. हिंदुस्थानी भाषेत चांगली प्रगती दाखविली म्हणून बटालिअनमध्ये दुभाषा व क्वार्टर-मास्टरची बढती मिळाली. त्याने मराठी भाषेची परीक्षा चांगल्याप्रकारे पास होऊन दाखविल्यामुळे तो पुढे मराठीचा दुभाषा झाला. मोल्सवर्थने आपले शब्दकोशाचे काम सुरू केले, तेव्हा आपल्या कोशकार्याच्या मदतीसाठी थॉमस कँडीला द्यावे अशी विनंती त्याने मुंबई सरकारास केली होती. त्यानुसार १८२६ साली कँडी कोशकामासाठी मोल्सवर्थला मदत करण्यास आला. सन १८२८ मध्ये पुन्हा त्याने मोल्सवर्थला कोशकामात मदत करावी असे सरकारने सुचविले. त्यावेळी त्याने एक वर्षभर मोल्सवर्थला मदत केली. त्यानंतर मोल्सवर्थच्या इंग्लिश-मराठी शब्दकोशा-साठी १८३२ ते १८३४ या काळात त्याचे मोल्सवर्थला मोठे सहाय्य झाले. इ. स. १८३५ च्या दरम्यान रेग्युलेशनच्या मराठी भाषांतरात काही चुका राहिल्या होत्या, त्या दुरुस्त करण्याचे काम त्याला देण्यात आले होते. त्याच्या मराठी भाषेचा व्यासंग लक्षात घेऊन पुणे येथील हिंदू कॉलेज, व दक्षिणेकडील सरकारी शाळांचा सुपरिटेंडेंट म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली होती.

इ. स. १८३७ साली पुणे पाठशाळेचा तो मुख्याध्यापक झाला. तेव्हापासून जवळ जवळ ३०–३५ वर्षांपर्यंत त्याने मराठी भाषा व वाङ्मय या बाबतीत खूप काम केलेले दिसते.

याच काळात इंग्लिश-मराठी शब्दकोश, वाचन पाठमाला, भूगोल, शाळांतील मुलांकरिता पाठ्यपुस्तके – मराठी भाषाविषयक अनेक पुस्तके लिहून किंवा इतरांनी लिहिलेल्या पुस्तकात दुरुस्त्या करून मोठे काम केले. वैद्यक शास्त्रावरील मराठी भाषेत भाषांतरित झालेली पुस्तके अभ्यासक्रमात नेमून भारतीय शास्त्रावर आधारलेल्या वैद्यकीय अभ्यासास प्रोत्साहन दिले. मुंबई सरकारने ट्रान्सलेटर म्हणून त्याची केलेली नेमणूक व त्या दृष्टीने त्याने केलेली कामगिरी लक्षणीय ठरते.

कँडीला लष्करातही मोठमोठ्या जागा मिळाल्या होत्या. कँडीचा मृत्यू २६ फेब्रुवारी १८७७ रोजी झाला.

लक्ष्मीबाई नारायण टिळक (१८६८–१९३६)

कविवर्य रे. ना. वा. टिळक यांच्या पत्नी. शालेय शिक्षण असे झालेले नाही. टिळकांनी काही थोडेबहुत शिकविले असेल तेवढे. पण टिळकांच्या सहवासात त्यांचे साहित्यनिर्मितीचे गुण जोपासले गेले. प्रारंभी ज्ञानोदयादी नियतकालिकांत कविता आदी स्फुट लेखन. मराठी साहित्यातील चरित्र आत्मचरित्राच्या क्षेत्रात त्यांची "स्मृतिचित्रे" मुकुटमणी ठरली. त्याशिवाय रे. टिळकांचे अपुरे राहिलेले "ख्रिस्तायन" पुरे करण्याबाबत त्यांनी लावलेला हातभार टिळकानुग्रहासारख्या कविता संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावना महत्त्वाच्या आहेत. तसेच बालकवी आदी मराठी साहित्यातील महत्त्वाच्या साहित्यिक घडणीत त्यांचा वाटा आहे. त्यांचे सुपुत्र देवदत्त टिळक यांनी त्यांच्या साहित्य निर्मितीस वेळप्रसंगी हातभार लावला. मराठी साहित्यातील या साहित्यलक्ष्मीने मराठी साहित्याला अभिमानास्पद वाटावे असे "स्मृतिचित्रे" लिहून कायमचे ऋणी करून ठेवले आहे.

सूर्यवंशी सत्यवान नामदेव – (जन्म ३१ मार्च १९१६)

सूर्यवंशी सदन, शरणापूर, नासिक ४२२ ००२.

यांचा जन्म हंगे या गावी झाला. हे गाव अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात आहे. यांचे वडील प्रथम अमेरिकन मिशनमध्ये शाळा मास्तर होते नंतर ते पाळक झाले. याचे शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले.

प्रारंभी म्हणजे १९४० साली मुंबईस बॉंबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीच्या दुकानात दुकान झाडण्याच्या कामाला लागले. त्यांची लिखाण करण्याची हौस पाहून त्या संस्थेच्या सेक्रेटरी मिस. ई. मोरलँड या अमेरिकन मिशनरी बाईने लिखाण करण्यास शिकविले. आतापर्यंत विविध विषयांवर सुमारे १३० हून अधिक पुस्तके लिहिली. हजारो लेख लिहिले. नवा संसार, काल आज व उद्या आणि सोन्याचे

अंडे, या पुस्तकांना अनुक्रमे १९५४, १९५५, १९५६ या साली केंद्र सरकारची बक्षिसे मिळाली. तर १९५७ साली 'फूटपायरी' या नाटकास राज्य सरकारचे बक्षिस मिळाले. ऑल इंडिया रेडिओवरून अनेक श्रुतिका प्रसारित झालेल्या आहेत. दहा नाटके लिहून ती स्वतः दिग्दर्शित करून त्यांचे स्वतः प्रयोग केले. सहकार नाट्य कला केंद्र ही हौशी नाट्यसंस्था १५ वर्षे चालविली. महाराष्ट्र प्रबोधन कलापथक सुरू करून खेड्यापाड्यांत अनेक लोकनाट्ये केली. इ. स. १९५७ साली राज्य नाट्यस्पर्धांवर परीक्षक म्हणून सरकारने नेमले होते. त्याशिवाय बाँबे लेबर युनिअनचा उपाध्यक्ष म्हणून काही काळ काम केले. खेड्यापाड्यांत फादर फरेरे व फादर बारोंको यांच्या संस्थांत शेती विकास कामे करून दिली. वयाच्या तेविसाव्या वर्षांपासून ख्रिस्ती कीर्तनकार म्हणून महाराष्ट्रात सर्वत्र प्रसिद्ध आहेत. मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. त्यांनी साने गुरुजी कथामालेत कथा निवेदक म्हणून काम केले असून, ख्रिस्ती युवक संघटक, मुंबई मराठी नाट्यसंमेलनाचा चिटणीस, व इतर अनेक लहानमोठ्या धार्मिक, राजकीय व सामाजिक संस्थांच्या समित्यांवर सदस्य म्हणून काम केलेले आहे. 'आवेश' प्रेषित, बालबोधमेवा ही मासिके व 'ज्ञानोदय' 'आपण' या साप्ताहिकांचे संपादन केले आहे.

सूर्यवंशी यांची गाजलेली पुस्तके–

(१) अगा जे कल्पिले नाही	आत्मचरित्र
(२) 'हे राष्ट्रा – माझ्या राष्ट्रा'	प्रबंध
(३) पत्र्याची चाळ	कादंबरी
(४) गोड कारली	,,
(५) गोल देऊळ	,,
(६) धर्मशाळा	,,
(७) काल आणि आज	,,
(८) वेंजी	,,
(९) घरकुल	,,
(१०) लाल राज्य	,,
(११) स्वर्गाच्या सीमेवर	नाटक
(१२) ठासून झालेच पाहिजे	,,
(१३) फूटपायरी	,,

सध्या सेवानिवृत्त असून कीर्तने प्रवचने यांचे खूप दौरे करितात. अजून प्रकृती ठीक.

श्री. सूर्यवंशी यांचे मुळात शिक्षण फारसे झालेले नसूनही त्यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षापासून घरीच अभ्यासाला सुरुवात केली. त्यांचा अभ्यासाचा खास

विषय म्हणजे तुलनात्मक धर्मशास्त्र, सामाजिक व राजकीय इतिहास व इंग्रजी मराठी साहित्य, हे होय.

(सत्यवान नामदेव सूर्यवंशी यांनी कळविलेल्या माहितीवरून)

रे. भास्कर कृष्ण उजगरे – (जन्म २४ सप्टें. १८८७, मृत्यू २५ सप्टें. १९३५)

जन्म २४ सप्टेंबर १८८७ रोजी पुण्यानजिक भांबुर्डा मुक्कामी झाला. वडील कृष्णाजी उजगरे हे शिवाजीनगर, पुणे येथील मिशन शाळेचे हेडमास्तर होते. त्यांचे भास्करराव हे पाचवे अपत्य होय. लहानपणीच आई, बाप, वहीण व थोरले दोन भाऊ प्लेगला बळी पडल्यामुळे भास्कररावांवर मोठी जबाबदारी पडली. तेव्हा काहींनी चुलत्याच्या घरी राहून तर काहींनी मिशनच्या शाळेत राहून आपले मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पुरे केले. भास्कररावांचे शिक्षण घोडनदी येथील शाळेत काही वर्षे झाले. तिथेच त्यांना वाचनाची व व्यायामाची गोडी लागली. नंतर ते शिक्षणासाठी अहमदनगर येथे आले. चुलत्याकडे राहून शाळेत जाऊ लागले. ते चौथी पाचवीत शिकत असताना त्यांनी काही चांगल्या कविता केलेल्या आहेत. इ. स. १९१०–११ च्या सुमारास मिस. एमिली विसेलबाई व रे. ना. वा. टिळक यांनी ख्रिस्ती उपासना संगीताच्या अकराव्या आवृतीची जुळवा-जुळव चालविली होती. त्यासंबंधी लिहिण्याची कामे मिस विसेल बाईंनी भास्कररावांना दिली होती. त्याबद्दल जे वेतन मिळाले त्यामुळे त्यांच्या शिक्षणात बरीच मदत झाली. या निमित्ताने त्यांची ना. वा. टिळक यांच्याशी चांगली ओळख झाली व जाणे-येणे सुरू झाले. त्या कुटुंबातील व्यक्तींच्या सहवासामुळे त्यांचे काव्याकडे विशेष लक्ष लागले. उपासना संगीताच्या अकराव्या आवृत्तीत भास्कररावांनी रचलेली गीते समाविष्ट केली आहेत. त्यावरून त्या काळी ते चांगली काव्य रचना करीत होते असे दिसते. उपासना संगीताच्या बाराव्या आवृत्तीत त्यांची एकूण दहा गीते समाविष्ट केलेली आहेत. नगरच्या शाळेत श्री. भारदे नावाचे एक विद्वान गृहस्थ मराठी शिकवित. त्यांच्या शिकविण्याचा भास्कररावांवर चांगला परिणाम झालेला होता.

मॅट्रिकच्या वर्गात असताना भास्कररावांची दृष्टी एकदम बिघडली. मिरज येथील नेत्रवैद्यांनी सांगितले, " तुमचे डोळे बरे होण्याची फारशी आशा नाही. तरी आम्ही प्रयत्न करून पाहू. " हा निकाल ऐकून त्यांना अत्यंत दुःख झाले. आणि त्यांनी ईश्वराला असा नवस केला की, " जर मला माझी दृष्टी परत देशील, तर उरलेले सर्व आयुष्य तुझ्या सेवेतच खर्च करीन. " वैद्यांनी दिलेल्या एकवीस इंजेक्शनांनी आणि ईश्वरकृपेने त्यांना दृष्टी परत मिळाली. त्यावर ते परत म्हणाले होते, माझे डोळे बिघडले हे परमेश्वराचे मजवर उपकार झाले, याचे कारण तत्पूर्वी त्यांचे मन नास्तिकवादाकडे झुकत होते.

बरे वाटताच भास्कररावांनी पुण्याला यऊन रे. डॉ. मॅक्निकल व रे. ए. रॉबर्टसन यांच्या हाताखाली ईश्वर परिज्ञानाच्या अभ्यासाला सुरुवात केली व

चार वर्षांचा अभ्यासक्रम उत्तम प्रकारे पूर्ण केल्यावर ख्रिस्ती धर्म प्रचारकांची सनद व दीक्षा घेऊन १९१७ साली अलिबागेस कामावर आले. त्याकाळी २२ मे १९१९ रोजी त्यांचा विवाह झाला.

ईश्वर परिज्ञानाचा अभ्यास चालू असतानाच इ. स. १९१५ साली श्री. ना. वा. टिळक यांच्या कवितांचा संग्रह करून त्यांच्या परवानगीने 'टिळकांची कविता भाग १ ला' हे पुस्तक प्रसिद्ध केले. अलिबागेस आल्यावर लौकरच टिळकांचे सर्व भक्तिपर अभंग एकत्र करून टिळकांची कविता भाग २ म्हणजेच 'अभंगांजली' ह्या पुस्तकाचे संपादन केले. १९२० साली बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटीतर्फे ते प्रसिद्ध करण्यात आले.

या दोन पुस्तकांच्या प्रस्तावना वाचल्यास भास्कररावांच्या काव्यविषयक कल्पना, मराठी भाषेचा अभ्यास व त्यांची लेखनशैली यांची चांगली कल्पना येते. याशिवाय भास्कररावांनी मनोरंजन, नवयुग, बालबोधमेवा ह्या नियतकालिकातून व ज्ञानोदयातून त्यांच्या बऱ्याचशा कविता व लेख प्रसिद्ध केलेले आहेत. टिळकांची कविता भाग ३ रा ह्या पुस्तकाची जुळवाजुळव त्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी करून ठेवली होती. परंतु बऱ्याच अडचणीमुळे ते प्रसिद्ध होण्याचे राहून गेले. तसेच बालकवी ठोमरे, यांच्या आठवणी प्रसिद्ध करण्याचा त्यांचा बेत होता, तोही राहून गेला. आता तर ते हस्तलिखितही उपलब्ध नाही.

ख्रिस्ती जनतेमध्ये मराठी वाङ्मयाची व त्याच्या अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी म्हणून त्यांनी मराठी ख्रिस्ती साहित्यसेवा मंडळ स्थापन केले. ह्या मंडळातर्फे पहिले १९२७ साली नासिक येथे आणि दुसरे १९२९ साली मुंबई येथे आणि १९३१ साली तिसरे संमेलन निपाणी येथे घेतले. ती तीनही संमेलने मराठी समाजाच्या दृष्टीने लाभदायक ठरली. १९३३ साली नागपूर येथे ह्या मंडळाच्यावतीने एक संमेलन भरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे तो विफल झाला. इ. स. १९३५ साली अहमदनगर येथे एक संमेलन भरविण्याचे ठरविले होते. परंतु मध्येच त्यांचा मृत्यू ओढवल्यामुळे संमेलन व्हायचे राहून गेले. इ. स. १९३१ साली 'महाराष्ट्रीयन ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास' हा ग्रंथ मंडळाच्या वतीने छापून प्रसिद्ध केला. या इतिहासात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या निबंधात अधिक भर घालून तो प्रसिद्ध करावा अशी त्यांची इच्छा होती. ख्रिस्ती लोकांची भाषा सुधारावी ही त्यांची उत्कट इच्छा होती. त्यासाठी त्यांनी खूप माहितीही गोळा केलेली होती पण तो त्यांचा बेत अपूर्ण राहिला.

बॉम्बे रिप्रेझेन्टेटिव्ह ख्रिश्चन कौन्सलच्या विद्यमाने नेमलेल्या लिटरेचर कमिटीचे ते बरेच वर्षे सभासद होते. त्यावेळी ख्रिस्ती भक्तिपद्धतीत व इतर कामासाठी वापरात येणाऱ्या शब्दांसाठी इंग्रजी शब्दांचे पर्यायी मराठी शब्द निवडण्यात त्यांचा मोठा वाटा होता हे शब्द "ज्ञानोदयात" प्रसिद्ध झालेले आहेत.

ख्रिस्ती मंदिरातील उपासना युरोपीय पद्धतीने न होता हिंदी पद्धतीने व्हाव्यात अशी त्यांची इच्छा होती व ते स्वतःच त्या धर्तीवर उपासना चालवीत असत. त्या पद्धतीही त्यांनी लिहून काढलेल्या आहेत पण प्रसिद्ध केलेल्या नाहीत.

इ. स. १९२९ साली जी "नव्या कराराची" सुधारलेली आवृत्ती प्रसिद्ध झाली तिच्या कामी त्यांनी बरेच परिश्रम घेतलेले होते.

सासवडला असताना "सर्व धर्मांच्या लोकांना भाग घेता येईल अशी" 'धर्म जागृती मंडळ' नावाची संस्था त्यांनी स्थापन केली होती. त्या मंडळाची प्रत्येक रविवारी एक बैठक होत असे. त्यावेळी एक चर्चा प्रवर्तक नेमून तो तुकारामाच्या एका अभंगावर चर्चा करीत असे व नंतर इतर सभासद त्यावर भाषण करीत व भास्करराव उजगरे त्या कार्यक्रमाचा समारोप करीत.

त्यांचा मृत्यू २५ सप्टेंबर १९३५ रोजी पुणे येथे वाडिया हॉस्पिटलमध्ये झाला.

देवदत्त नारायण टिळक – (१६ जुलै १८९१, मृत्यू २७ डिसें. १९६५)

रे. ना. वा. टिळक व लक्ष्मीबाई टिळक यांचे हे सुपुत्र. यांचा जन्म १६ जुलै १८९१ रोजी झाला. लक्ष्मीबाई टिळकांचे हे तिसरे अपत्य. त्याचे पाळण्यातील नाव दत्तात्रय. बाप्तिस्म्याच्या वेळी देवदत्त नाव ठेवण्यात आले पण सर्वजण शेवटपर्यंत "दत्तू" या नावाने संबोधीत.

देवदत्ताचे शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालय, अहमदनगर आदी अनेक ठिकाणी झाले. अहमदनगर येथे असताना त्यांनी राजारामजी चांदेकर यांच्या हाताखाली मिशनस्कूलमध्ये तीनही ड्रॉईंगच्या परीक्षा पास केल्या. प्रिन्सिपल भा. ल. पाटणकर हे त्यांचे लहानपणापासून अखेरपर्यंत असलेले जिवाभावाचे मित्र होते. कॉलेजचे शिक्षण हिस्लॉप कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. रॉबर्टसन यांच्या सहाय्याने झाले.

वयाच्या सतराव्या वर्षी ते कॉलेजात दाखल झाले आणि त्याच सुमारास त्यांची 'गोंडेदार चाबूक' ही कविता प्रसिद्ध झाली. व उद्यान मासिकाने लावलेल्या गोष्टींच्या स्पर्धेत त्यांच्या गोष्टीला बक्षीस मिळाले.

एप्रिल १९१८ यावर्षी दत्तोपंतांचे लग्न 'रूथबाई'शी झाले. प्रापंचिक अडचणींच्या दृष्टीने त्यांचा मुंबईचा काळ अडचणीत गेला तरी वाङ्मय निर्मितीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा ठरला.

ह्या सुमारास सुप्रसिद्ध प्रो. पॅट्रिक बके गेडिस यांच्या नेतृत्वाखाली मुंबई युनिव्हर्सिटीने सोशिऑलाजीचे एम्. ए. वर्ग सुरू केले. त्यासाठी दत्तोपंतांनी दारूबंदीची आवश्यकता असा विषय घेऊन सुमारे १०० पानांचा निबंध इंग्रजीत लिहिला होता. तो त्यांचे परीक्षक प्रो. फरवाणी यांना आवडून त्यांना एम्. ए. करण्यासाठी रु. ५० ची स्कॉलरशिप मिळत होती पण घरगुती अडचणीमुळे त्यांना त्यावेळी एम्. ए. करणे शक्य झाले नाही. पण प्रा. फेरवाणींच्या मार्गदर्शनाने व उत्तेजनाने

आपण संशोधन करण्यास शिकलो व त्याचा उपयोग पुढे आपल्याला "नारायण वामन टिळक काव्य विवेचन व व्यक्तिदर्शन", "बायबलची तोंडओळख" व "महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई", ही पुस्तके लिहिताना फार झाला असे दत्तोपंत सांगतात.

देवदत्त टिळक ज्ञानोदय व बालबोध मेवा नियतकालिकांचे अनेक वर्षे संपादक होते. या दोनही नियतकालिकांची सततची छपाईची कामे होती. त्यांना त्या कामात छापखान्यात दिरंगाईचा कंटाळवाणा अनुभव येऊ लागला. त्यांतूनच २९-५-१९३८ रोजी नासिक येथे त्यांनी नागरिक प्रेस सुरू केला.

आपल्या वडिलांनी अर्धवट सोडलेली कामे पूर्ण करण्याचा त्यांचा हव्यास, शेवटी शेवटी उपासना संगीताच्या अठराव्या आवृत्तीच्या कामात व बायबल रिव्हि-जनच्या कामात मनापासून हातभार लावून त्यांनी पुरा केला.

रे. ना. वा. टिळकांच्या हातून पुढे न झालेले ख्रिस्तानुवर्तन (तिसरा भाग अर्धा व चौथा संपूर्ण) आपले कर्तव्य म्हणून दत्तोपंतांनी पुरे केले. ख्रिस्तायन हे त्यांनी मातेकडून पुरे करवून घेतले व शेवटी त्याही गेल्या तेव्हा शेवटला अध्याय स्वतःच पुरा करून टाकला.

लक्ष्मीबाईंच्या सुप्रसिद्ध "स्मृतिचित्रे" या आत्मचरित्राच्या चौथ्या खंडाच्या पुढील अर्धा भाग दत्तोपंतांना लिहून पुरा करावा लागला. साहित्य अकादमीला "स्मृतिचित्रांची" आवृत्ती तयार करून दिली.

बालवाङ्मयाला वाहिलेल्या मासिकाशी त्यांचा संबंध १९२४ पासून १९४२ पर्यंत होता. त्यामुळे बालवाङ्मयाच्या क्षेत्रात त्यांनी खूप काम केलेले आहे. त्यानंतर त्यांनी बोधसुधा, घटकाभर करमणूक, जंगली जनावरे, बाबू बाळाचा ग्रंथराज, वेणू वेडगावात ही पुस्तके मुलांसाठी लिहिली. ती पुस्तके खूप लोकप्रियही झाली.

डिसेंबर २७, २८, १९३२ या काळात निपाणी येथे जे तिसरे साहित्य संमेलन भरले त्याचे ते अध्यक्ष होते. त्यावेळचे त्याचे अध्यक्षीय भाषण फार गाजले.

ख्रिस्ती मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात रे. टिळकांनी राष्ट्रीय अस्मिता जोपासणारी परंपरा निर्माण करण्याची प्रेरणा ख्रिस्ती लोकांना दिली तर त्यांच्या सुपुत्रांनी आपल्या काळात शेकडो ख्रिस्ती व हिंदू नवोदित लेखकांस प्रोत्साहन देऊन साहित्यिक बनविले आहे. बालबोध मेव्याचे संपादक असताना त्याने केलेले विविध उपक्रम पाहिल्यास याची प्रचीती येईल.

आधार – (देवदत्त नारायण टिळक, संपादक, लेखक – सु. द. करंदीकर, संजीवनी प्रकाशन, डोंबिवली, ता. १६-७-१९६१.)

उजगरे मनोहर कृष्ण – जन्म इ. स. १८८३, मृत्यू १९४१ पुणे, इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत शिक्षण व पुढे ईश्वर परिज्ञान पाठशाळेत अभ्यास ज्ञानोदय नियतकालिकाच्या व्यवस्थापक कचेरीत सहकारी संपादक व मराठी

विभागाचे संपादक, बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह ख्रिश्चन कौन्सिलच्या ऑफिसमध्ये मराठी लिटरेचर मिशनरी, ३०–३५ इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतरास मदत, यांनी कविवर्य रे. ना. वा. टिळक यांचे चरित्र व इतर पुष्कळ लेख व भाषांतरे केलेली आहेत. इ. स. १९३० च्या दुसऱ्या महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व १९३० ते ३२ या काळात महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य सेवा मंडळाचे अध्यक्ष. १९३० साला-पासून बायबल सोसायटीचे सभासद.

शाहूराव उजगरे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देशवंडी येथे २१ ऑगस्ट १८९४ साली झाला. त्यांचे शिक्षण अहमदनगर येथे मिशन शाळेत (हॅरिस हॉल) झाले. त्यानंतर काही काळ सोलापूरच्या मिशन शाळेत शिक्षक म्हणून काम केले.

इ. स. १९११–१२ साली त्यांनी जनरल पोस्ट ऑफिसमध्ये नोकरी धरली. इ. स. १९१४ ते १९२१ या काळात पोस्टातील नोकरीच्या निमित्ताने परदेशात गेले. या काळात त्यांना इंग्लंड, फ्रान्स, इटाली, तुर्कस्थान या देशांत वास्तव्य करून राहण्याचा योग आला. याच काळात त्यांनी इंग्रजी भाषेचा विशेष अभ्यास करण्याची संधी घेतली. याच काळात ' कायरो ' येथे इजिप्शियन गॅझेट या इंग्रजी दैनिकाचा उपसंपादक म्हणून त्यांनी दोन वर्षे यशस्वीरीत्या कामगिरी पार पाडली. परदेशा-तून आल्यावर त्यांनी मुंबईस " कामगार मित्र " नावाचे साप्ताहिक दोन वर्षेपर्यंत स्वतःच्या खर्चाने चालविले होते.

सुप्रसिद्ध ख्रिस्ती लेखक रे. भास्कर कृष्ण उजगरे हे शाहुराव उजगरे यांचे चुलत बंधू. त्यांच्या सहवासाने शाहुरावांचा व टिळकांचा जवळून संबंध आला. याच काळांत त्यांना साहित्य निर्मितीची गोडी लागली. ते आपले काव्यविषयक व इतर लिखाण करू लागले. त्यांचे बरेचसे लिखाण ज्ञानोदयातील काव्यकुंज या सदरात तसेच बालबोध, केसरी, रत्नाकर या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहे.

रावसाहेब र. लु. जोशी (जन्म इ. स. १८७५ मृत्यू इ. स. १९५८)

रावसाहेब जोशींचे संपूर्ण नाव रेग्युएल लुकस जोशी. पण ते रावसाहेब र. लु. जोशी या नावानेच ओळखले जातात. त्यांचा जन्म नाशिक मधील शरणपूर येथे २ मार्च १८७५ रोजी झाला. त्याचे प्राथमिक शिक्षण नाशिक येथेच झाले. रे. लुकस जोशी काही वर्षे औरंगाबादेस येऊन राहिले होते, त्यामुळे त्यांचे काही शिक्षण औरंगाबादेत झाले. माध्यमिक शिक्षण मुंबईच्या रॉबर्ट मनी हायस्कुलात झाल्यावर कॉलेज शिक्षणासाठी हैदराबादेस निजाम कॉलेजमध्ये ते गेले. तिथले शिक्षण संपल्या-वर मुंबईस येऊन ते पोस्टात नोकरी करू कागले.

नोकरी निमित्ताने नाशिक, सोलापूर, हैद्राबाद अशा ठिकाणी त्यांना वास्तव्य करावे लागले. परंतु त्यांचा परोपकारी, मनमिळावू व लोकसंग्रह करण्याचा स्वभाव

असल्यामुळे त्यांनी अनेक मित्र मिळविले होते. हैद्राबाद येथे १६ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन डॉ. केतकरांच्या अध्यक्षतेखाली पूर्णपणे यशस्वी पार पाडण्याच्या कामी रावसाहेब जोशी यांचा धीरोदात्त स्वभाव व चिकाटी होती असा इतिहास आहे.

—मराठी साहित्याच्या दृष्टीने रावसाहेबांची मोठी कामगिरी म्हणजे डॉ. धनंजयराव गाडगीळांसारख्या सन्मित्राच्या सल्ल्याप्रमाणे रावसाहेबांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याची धुरा उचलली. एप्रिल १९३६ पासून डिसेंबर ४२ पर्यंत म्हणजे उणीपुरी सात वर्षे रावसाहेबांनी परिषदेची सर्वांगीण स्थिरता आणि उत्कर्ष यासाठी आपली वृद्ध काया शिणविली. प्रारंभी परिषदेच्या अडीचशेवर असलेली सभासद संख्या एक हजारावर नेली. डॉ. माधवराव पटवर्धनांच्या स्मारकाचे कार्य यशस्वीरीत्या शेवटास नेले आणि परिषदेचे काम मार्गी लावले.

रावसाहेब जोशी यांनी प्रत्यक्षात साहित्य निर्मिती त्यांच्या उत्तर आयुष्यात केली. आपल्या काव्याचे स्फूर्तिस्थान रे. टिळकांची कविता असल्याचे ते सांगतात व काव्याबद्दल रसिकता आपल्या वडील बंधूंनी निर्माण केली असे म्हणतात.

रावसाहेबांच्या काव्याचा साकल्याने विचार केल्यास मराठी आणि महाराष्ट्र यांचा डोळस अभिमान हा त्यातील स्थायीभाव दिसतो. त्यांनी शक्य तितक्या प्रकारांनी आणि पर्यायांनी आपल्या मातृदैवताची पूजा केलेली आहे.

मराठीचा साहित्य संसार स्थिर पायावर उभा करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांच्या संदर्भात ते लिहितात, " माझ्यासारख्या अनधिकारी माणसाने साहित्य-क्षेत्रांत लुडबूड करावी याचा मला आता पुरा वीट आला आहे. महाराष्ट्राची संघटना व मातृभाषेची सेवा करण्याची संधी या दृष्टीनेही मी परिषदेचे काम पत्करले होते व गेल्या सात वर्षांत स्वतःच्या प्रकृतीकडे किंवा आर्थिक परिस्थितीकडे काहीही लक्ष न देता उत्तर आयुष्यात सारे बळ एकवटून मी काम करण्याचा प्रयत्न केला. हीच शक्ती माझ्या नित्याच्या कार्यक्षेत्रात खर्च झाली असती तर माझ्या हातून प्रचंड कार्य पार पडले असते याची मला खात्री पटून खंत वाटते. "

मराठवाडा साहित्य परिषदेने त्यांच्या काव्याचा संग्रह " रावसाहेबांची कविता " या नावाने १९६१ च्या जानेवारीत प्रसिद्ध केला.

रावसाहेबांचा मृत्यू ४ ऑगस्ट १९५८ रोजी झाला.

परिशिष्ट २

ख्रिस्ती मराठी ग्रंथनिर्मिती (तक्ते)

इ. स. १८१३ ते १८९२ पर्यंत ख्रिस्ती मराठी ग्रंथलेखकांची ग्रंथनिर्मिती

तक्ता 'अ'

लेखक	ग्रंथ संख्या								
	१८१३ ते १८२२	१८२३ ते १८३२	१८३३ ते १८४२	१८४३ ते १८५२	१८५३ ते १८६२	१८६३ ते १८७२	१८७३ ते १८८२	१८८३ ते १८९२	एकूण ग्रंथ
मिशनरी	२४	३८	४५	५६	३०	२५	३६	६५	३१९
एतद्देशीय–ख्रिस्ती	—	२	२	६	४८	४३	७७	१४४	३२२
मिशनरी नसलेले युरोपिअन ख्रिस्ती	—	७	९	१०	१	२	१	—	३०
एकूण	२४	४७	५६	७२	७९	७०	११४	२०९	६७१

१८१३ ते १८९२ या काळातील ख्रिस्ती मराठी लेखक व त्यांची ग्रंथसंख्या

तक्ता 'ब'

लेखक	लेखक संख्या	ग्रंथ संख्या
मिशनरी	७२	३१९
एतद्देशीय ख्रिस्ती	६२	३२२
मिशनरी नसलेले युरोपिअन ख्रिस्ती	१०	३०

१८१३ ते १८९२ या काळातील ख्रिस्ती मराठी लेखकांचे स्वतंत्र भाषांतरित व संपादित ग्रंथ

तक्ता 'क'

	१८१३ ते १८२२	१८२३ ते १८३२	१८३२ ते १८४२	१८४३ ते १८५२	१८५३ ते १८६२	१८६३ ते १८७२	१८७३ ते १८८२	१८८३ ते १८९२	एकूण
स्वतंत्र ग्रंथ	२०	४०	३६	३५	४५	२८	५०	६३	३१७
भाषांतरे	४	७	२०	३६	३३	३५	१०३	१४९	३८७
संपादने	—	—	१	५	२	८	७	१४	३७

एकूण ७४१*

* यातून हिंदू लेखकांचे ७० ग्रंथ वजा करावयाचे आहेत.

१८१३ ते १८९२ या काळांत झालेली ख्रिस्ती मराठी प्रकाशने

तक्ता 'ड'

प्रकाशन	१८१३ ते १८२२	१८२३ ते १८३२	१८३३ ते १८४२	१८४३ ते १८५२	१८५३ ते १८६२	१८६३ ते १८७२	१८७३ ते १८८२	१८८३ ते १८९२	एकूण
अमेरिकन मराठी मिशन	२४	१८	३१	३८	१४	९	११	४	१४९
बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी	—	१४	१८	३६	५४	४७	४०	४७	२५६
स्कॉटिश मिशनरी	—	१४	२	—	—	—	—	—	१६
खासगी प्रकाशन	—	१	१	१	६	६	३१	१०८	१५४
चर्च मिशन	—	—	५	१	—	—	—	—	६
ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसा.	—	—	—	—	६	८	५१	२०	८१
सोसा. फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज	—	—	—	—	—	१	११	९	२१
सोसा. ऑफ सेंट जोन व इव्हान्जिलिस्ट	—	—	—	—	—	—	३	३	६
प्रेस बिटेरीअन मिशन	—	—	—	—	—	—	१	३	४
पंचहौद मिशन	—	—	—	—	—	—	१२	२०	३२
डायोसेन फंडस् ऑफ बिशप, मुंबई	—	—	—	—	—	—	—	५	५
मेथॉडिस्ट मिशन	—	—	—	—	—	—	—	३	३
मुक्ति मिशन	—	—	—	—	—	—	—	४	४
एकूण	२४	४७	५७	७६	८०	७१	१६०	२२६	७४१*

* यातून हिंदू लेखकांचे ७० ग्रंथ वजा करावयाचे आहेत.

नियतकालिकांची सूची

ग्रंथनामसूची

व्यक्तिनामसूची

पुरवणी

ग्रंथ सिद्ध होत असताना विस्तार वाढू लागला. प्रकाशनाच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक ठरले. म्हणूनच ग्रंथाचा विस्तार आवरता घ्यावा लागला. ग्रंथ सिद्ध झाल्यावर अनेक ग्रंथांची उपलब्धी वा पुस्तकांच्या नोंदी सापडू लागल्या. त्यांपैकी काही या पुरवणीत समाविष्ट केल्या आहेत. अशा प्रकारचे काम पूर्णतः कधी संपत नाही. ते चालूच रहाते. भविष्यांत कुणा महाभागाला या पुरवणीला आणखी पुरवणी जोडणे शक्य आहे.

खिस्ती मराठी वाङ्मय या ग्रंथात व पुरवणीत काही ग्रंथांचे संक्षेप योजले आहेत. त्यांचे विवरण असे :— (पृष्ठ....पहा) असे लिहिले आहे, ते पृष्ठ खिस्ती मराठी वाङ्मय ग्रंथाचे समजावे. इतर संक्षेप असे:-

(१) मराठी दोलामुद्रिते – (दोला)

(२) A Catalogue of Marathi Christian Literature (1813 –1892) – (मखि)

(३) मराठी ग्रंथसूचि – (दासू)

(४) Catalogue of Native Publication in Bombay Presidency – (ग्रँट)

(५) बाबा पदमनजी व्यक्ति वाङ्मय (टंकलिखित प्रबंध) – (कराड)

(६) अहमदनगर महाविद्यालय, ग्रंथसंग्रहालय – (अनम)

(७) ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, नगर – (ऐवसन)

(८) आनंद कुंभार – (आनकुं)

लेखक

(रे) ॲलन डी. ओ.

शास्त्रातील उपदेशसार : अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, १८२०, पृ. ८४, (मखि.) पृ. ५६.

मुलांकरिता प्रार्थना : अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, १८३४, पृ. १०, (मखि. ४४)

प्रार्थना : आ. ४, बीटीबीएस्, एक्श्चेंज प्रेस, मुंबई, १८६४, पृ. २ + ३ ते ३२, (दासू. ११७)

रे. अप्पाजी बापूजी

लेकुरवाळ्या स्त्रियांस बोध : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई, १८५६; पृ. ३१, (मखि. २५)

आमच्या लोकांच्या लग्नसंबंधी रीती व त्यांचे परिणाम : स्वतंत्र, खासगी, १८७०, पृ. ३२, (मखि. ९)

उपदेश प्रकरण : (संग्रा.); सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८७१; पृ. ३२, (मखि. ५१)

मालती अथवा दोन गड : (भाषां) खासगी, १८७३, पृ. ७९; (मखि. ३४)

परमेश्वर प्रीत्यर्थ दशमांश : स्वतंत्र, १८७४, पृ. २६, (मखि. पृ. २२)

मूर्खाची छडी : स्वतंत्र, बीटीबीएस्, १८७८ पृ. ४. (मखि. १९)

मंडळींची प्रश्नोत्तरावली : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग द ख्रिश्चन नॉलेज, १८८२; पृ. १५, (मखि. ११)

तिमथ्यस आणि फिलेमोन : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग द ख्रिश्चन नॉलेज १८८२, पृ. ६८ (मखि. ५७)

रे. हरी रामचंद्र खिस्ती यांचे चरित्र : स्वतंत्र, बीटीबीएस्, १८८३, पृ. १२५; (मखि ३३).

प्रश्नोत्तरावली शिकविण्याकरिता मुलांची पहिली पायरी : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग द नॉलेज, पृ. ८८ ? (मखि.)

स्थिरीकरणाची तयारी : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग द ख्रिश्चन ॅलेज, पृ १४; ? (मखि. ४४)

(रे) ॲबट. ए.

गृहवासी मुलांचे पुस्तक : अमेरिकन मिशन, मुंबई, १८३७, पृ. २० (मखि. ९)

गणित भाग १, २, ३ : अमेरिकन मिशन, मुंबई, १८३७, पृ. १८६ (मखि. ३)

ज्या बायांस लेकरे आहेत त्यांस सुबोध : अमेरिकन मिशन मुंबई, १८४१, पृ. २५ (मखि. २)

उरूस व यात्रेसंबंधी जरीमरी या विषयी संभाषणे : अमेरिकन मिशन, मुंबई १८४४ पृ. ४८, (मखि. ४२)
(आ. ३ री, १८७१, बीटीबीएस)

तरुणास एकांती बोध : स्वतंत्र, १८४४ पृ. २०, (मखि. ४५)

काफर मुलगी : (भाषा) अमेरिकन मिशन, मुंबई, १८४५, पृ. ३२, (मखि. २)

पदार्थ विद्या : भाग पहिला शिल्पविद्या : अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, टी, ग्रॅहम, १८४६, पृ. ७३ + २२ (मेमो. पे. पृ १८)

तर्कशास्त्र : अमेरिकन मिशन मुंबई, १८४०, पृ. ४०, (मखि. ३४)

गाण्याचे पुस्तक : अमेरिकन मिशन, मुंबई, १८४८, पृ. ६८ (मखि. ३७)

इंडेक्स टू द न्यू टेस्टामेंट : (संग्रा), अमेरिकन मिशन, मुंबई, १८६८, पृ. १० (मखि. २८)

स्त्रियांचे विकार : स्वतंत्र, खासगी, १८७२, पृ. ७९, (मखि. १५)

मसेस ॲबट ए.

गरीब स्वेजलंड : (भाषां) अमेरिकन मिशन, मुंबई १८४४, पृ. १८, (मखि. ४३)

(रे.) ॲबट जे. इ.

बापू : स्वतंत्र, १८८४, पृ, १२६, (मखि.)

(रे.) आइटकेन जे.

महत्त्वाच्या विषयांवर लहान निबंध : १८४५, पृ. ४२ (मखि. ५२)

(रे.) आठवले एन्. व्ही.

पवित्र मार्काने केलेले शुभवर्तमान यावर टीका : (भाषां) डायसेसन फंड ऑफ द बिशप ऑफ बॉम्बे, १८८६, पृ. १५६, (मखि. १२)

आठवले गोपाळ

राजपुत्र विजयसिंह : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८८६, पृ. १२ (मखि. ५५)

उमाजी लक्ष्मण

धर्मसंवाद भाग १ : स्वतंत्र, बीटीबीएस्. १८८३, पृ. १६, (मखि. ४७)
धर्मसंवाद भाग २ : स्वतंत्र, बीटीबीएस्. १८८४, पृ. १६, (मखि. ४७)
धर्मसंवाद भाग ३ : स्वतंत्र, बीटीबीएस्. १८८४, पृ. १८, (मखि. ४७)

(रे.) करमरकर विष्णु भास्कर

लहान गोष्टींचा दिवस : स्वतंत्र, खाजगी, १८७०, पृ. ८, (मखि. ६५)
मंगल समाचार कथन : (भाषां) बीटीबीएस्. १८७४, पृ. ३२, (मखि. २२)
स्वच्छ हवेची योग्यता : (भाषां) खाजगी, १८७५, पृ. ४४, (मखि. ६३)
धर्मोत्तेजक गीते : (संग्रा), खाजगी, १८७५, पृ. २८, (मखि. ४७)
व्हिलस् ऑफ इन्टेम्परन्स : स्वतंत्र, खाजगी, १८७६, पृ. १९, (मखि. १७)

करमरकर एस्. व्ही.

शुभवर्तमान प्रसारार्थ चला : स्वतंत्र, खाजगी, १८८८ पृ. ३०, (मखि. १०)
पद्यमणिमाला : (संग्रा), बीटीबीएस्. १८८९, पृ. १६२ (मखि. ४१)

हकॅनन एच्. ए.

अ मराठी ॲण्ड इंग्लिश व्होक्याबुलरी : अमेरिकन मिशन, मुंबई, टी. ग्रॅहम, १८५१, पृ. १२+१५९ (दासू. ३२७)

(मेजर) कँडी थॉमस

ऐक्य धर्माची चिन्हे : अमेरिकन मिशन, मुंबई, १८२९, पृ. ३२ (मखि. ३६)
नीतिज्ञान परिभाषा : दुसरी आवृत्ती, पूना कॉलेज, १८३१, पृ. ७१, (ग्रँट ६०४) (१८४८ १८५१ आवृत्ती)
येशू खिस्ताचा धर्म शिकविणारांची गोष्ट : बीटीबीएस्. १८३७, पृ. ५१ (मखि. १)
वाचनपाठमाला : (भाषां), पुणे बोर्ड ऑफ एज्युकेशन, मु. नारो रामचंद्र ठकार, १८५०, पृ. १५+२९६ (दोला)
कर्तव्य कर्माचा विचार : (भाषां), पूना कॉलेज, पूना, १८५१, पृ. ७५, (ग्रँट ५०४)
नीतिबोधकथा : आ. ४ थी, पुणे बोर्ड ऑफ एज्युकेशन, सरकारी पाठशाळेच छापखाना, मुद्रक नारो रामचंद्र ठकार, १८५६, पृ. ४+१६०, आवृत्ती ५, १८५८), (दोला)
दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयी कायदा : (१८५९ चा सिव्हिल प्रोसिजर कोड ॲक्ट नं. ८) एज्युकेशन सोसायटी मुंबई, १८५९, पृ. ९४, (ग्रँट ३९२)
हिंदुस्थानचे वर्णन : डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई, गणपत कृष्णाजीचा छापखाना, १८६०, पृ. ३+१२८, (आ. २ री १८६० पृ. ४ + १५६ + २, (दोला)
हिंदुस्तानच्या अपराध्यास शिक्षा करण्याविषयी कायदा : बॉम्बे व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी पुणे १८६०, पृ. १३२, (ग्रँट ४६४)
वाचनमाला पुस्तक दुसरे : एज्युकेशन डिपार्टमेंटकरिता, एज्युकेशन सोसायटी, पुणे १८६२, पृ. ७२, (ग्रँट ४०९)
वाचनमाला पुस्तक तिसरे : हिंदू प्रकाश, पुणे, १८६३, पृ. ११० (ग्रँट ७९५)
वाचनमाला पुस्तक चवथे : एक्श्चेंज प्रेस, मुंबई, १८६३, पृ. १९२ (ग्रँट ३५८)
वाचनमाला पुस्तक पाचवे : गणपत कृष्णाजी, मुंबई १८६२ पृ. २८५, (ग्रँट ६३४)
वाचनमाला पुस्तक सहावे : गणपत कृष्णाजी, मुंबई १८६३, पृ. ३८८, (ग्रँट ६९९)
वाचनपाठमाला (क्रमिक पुस्तक) ज्ञानसागर, धारवाड, १८६४, पृ. ३२, (ग्रँट ८०९)
भूगोलाचे वर्णन भाग १ : इंदुप्रकाश मुंबई, १८६३, पृ. १४+२८४+१, (दोला)
भूगोलाचे वर्णन भाग २ : ओरिएंटल छापखाना, १८६५ पृ. १०+३४२; (दासू. ८४०)
आशिया खंडाचे वर्णन : बापू हरशेट देवळेकर, मुंबई, १८६३ पृ. १२६, (ग्रँट २७४)

कँडी जी.

ख्रिस्तीधर्म कसा उत्पन्न झाला आणि कसा पृथ्वीवर वाढला : वीटीवीएस्. मुंबई, आ. १८३२ (पृष्ठे ३२) (मखि. ४०) आ. १८३८ (पृ. २०) (मखि. ६०) आ. १८६२ (पृ. ३०) (दासू. १२६)

मिसेस् कँडी थॉमस

मुलांसाठी बोधाच्या गोष्टी : (आ) वीटीवी एस्, मुंबई १८३३ पृ. ६० (मखि. २९) आ. ७, अमेरिकन मिशन प्रेस मुंबई टी. ग्रॅहम, १८५४,

सदाचरणाच्या गोष्टी : (भाषां) (आ.) वीटीबीएस्. मुंबई, १८३४. पृ. ९८, (मखि. ३७)

आ. अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई १८५४ पृ. ८५ (दासू १११)

बालमोतातल्या शाळेचे वर्णन : भाषां (आ.) वीटीबीएस, मुंबई, १८३४, पृ. ४० (मखि. ६०)

(आ.) वीटीवीएस्. १८३७ (बाळबोध) पृ. ४३, (दासू. ११०)

(आ.) १८४६ (मोडी.) पृ. (दासू. ११०)

(आ.) १८६२ एक्चेंज प्रेस.

काणे गोविंद

पवित्र क्लेमिथ यांचा संक्षिप्त इतिहास : (भाषा) डायसेसन फंड ऑफ दी बिशप ऑफ बॉम्बे १८८७, पृ. ४० (मखि. ५४)

काळे गंगाधर

जानकीबाई गोसावीन हिचा वृत्तांत : (भाषा) वीटीबीएस्, १८९१, पृ. १६ (मखि. ३०)

मेथदिस्त एपिस्कोपल चर्च नामे ख्रिस्ती मंडळींचा मतांगीकार व शिक्षण यांचा संक्षेप : (भाषां), अमेरिकन मेथाडिस्ट मिशन, १८९१, पृ. ९६, (मखि. ३५)

कासीम मोहमद

मोहमदी धर्माची परीक्षा : वीटीवीएस् मुंबई, १८६४, पृ. ४० (मखि. ३७)

क्लार्कसन विल्यम

जगाचा तारणारा जो येशूख्रिस्त या विषयी एक हिंदू गुरु आणि एक ख्रिस्ती उपदेशक यांची संभाषणे : वीटीबीएस. मुंबई १८५८, थॉमस् ग्रॅहम याचा छापखाना पृ. ४+१६७ (दासू. १०६)

किंग सी.

चर्चचा संक्षिप्त इतिहास : स्वतंत्र, डायसेसन फंड ऑफ बिशप ऑफ बॉम्बे,- १८८५ पृ. १०२ (मखि. ११)

दुपारची प्रार्थना आणि लिनती व प्रार्थना : (भाषां) खासगी, १८८९, पृ. २६
(मखि. ३९)
पवित्र युखारिस्ताची प्रार्थना : (भाषां), खासगी, १८८९, पृ. २६, (मखि. ४३)
प्रति दिवशी प्रार्थना करण्याचे जे पांच उपकार : (भाषां) खासगी, १८९१, पृ.
१९२, (मखि. १९)

कुकडे शाहू दाजी

विद्याभ्यास केलेल्या तरुणास व्याख्यान : अमेरिकन मिशन, मुंबई, १८५५, पृ. ५६,
(मखि. २)
खिश्चनांचा पाणी घेण्याचा हक्क: अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, १८५६, पृ. ४,
(मखि. ४८)
शास्त्रोक्त बाप्तिस्मा : (भाषां), अमेरिकन मिशन, मुंबई. १८६२, पृ. ६९
(मखि. ५)
मोहरमचा सण : स्वतंत्र, वीटीबीएस, १८६८, पृ. १६ (मखि. ३७)
कुराणात वर्णिलेला निष्पाप पैगंबर : (भाषां) अमेरिकन मराठी मिशन; १८७९,
पृ. १६ (मखि. ५३)
बिशपांच्या पत्रास उत्तरे : स्वतंत्र, खासगी, १८८४, पृ. ३६, (मखि. ४७)

कुकडे एस्. बी.

शीट लेखन : खिस्ती व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, पृ. १०, (मखि. ५१)

(रे.) कूपर जे.

मनःशांती कशी मिळवावी : स्कॉटिश मिशन, १८२७, पृ. २४, (मखि. २७)
मोठा विचार : वीटीबीएस्, मुंबई, १८२९, पृ. २२, (मखि. २३)

केनेडी व्हॅन्स

अ डिक्शनरी ऑफ मराठा लँग्वेज : कुरिअर प्रेस, मु॥ श्रीकृष्ण जगन्नाथ प्रभु, १८२४
पृ. १६ + १२८ (पृष्ठ २६८–२६९ पहा)

केपन डेव्हिड

मराठ्यांची बखर : मुंबई सरकारी छापखाना, १८२९, पृ. २ + ३३ + ४२७ + ५,
(दोला)
बखर मराठ्यांची : सरकारी छापखाना, मुंबई १८३० पृ. २ + ४ + २९ + ४२७
+ १ + ४. (ग्रँट डफकृत इतिहासाचे भाषांतर) (दासू ९८७)
बखर मराठ्यांची उत्तरार्ध : आ. २ री, पुणे पाठशाळा छापखाना, १८४७, पृ.
२४ + ३४० + ३, (दोला)

बखर मराठ्यांची पूर्वार्धं : आ. ३ री, पुणे, पाठशाळेकडील छापखाना, १८५२, पृ. ८ + २१ + २२३, (दासू. ९८७)
मराठ्यांची बखर भाग १ व २ : (भाषां) (ग्रँट डफच्या पुस्तकाचे भाषां, पूना कॉलेज, १८५३, पृ. ३२८ + २२) (ग्रँट ३२८)

केसकर पी. बी.

पवित्रशास्त्राविषयी माहिती : पी. बी. केसकर, स्वतंत्र, बीटीबीएस्. १८८२, पृ. ४७ (मखि. ६)

केळकर एच्. जी.

आजारी मनुष्यास संगोपनाची वचने : (भाषां) बीटीबीएस्, १८९२, (मखि. ६३)
त्रिवेणी : स्वतंत्र, बीटीबीएस्, पृ. १५, १८९० (मखि. ५८)

क्रेग डी. जे.

खरेपणा काय आहे ? : बीटीबीएस्, १८५६, पृ. २८ (मखि. ६२)

ख्रिस्ती हरिपंत रामचंद्र

मतपरीक्षा, भाग १ ला : अमेरिकन मिशन प्रेस, १८५६. पृ. २ + ७६, (मखि. १७) मेमोरिअल पेपर्स (११९) (पहा पृ. ४६–५१)
उद्धार महिमा : स्वतंत्र, बीटीबीएस्. पृ. १८, १८७३ (मखि २३)

खोण्डीलकर एस्. एन्.

चर्च ऑफ इंग्लड यांचे प्रमाणासुद्धा क्याटिकिझमचे पहिले वर्गाचे पुस्तक : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १९७४, पृ. १०९ (मखि. ३४)

(रे.) गॅडनी ए.

नाताळाची दहा गीते : (भाषां) खासगी, १८८२, पृ. १७ (मखि. ५६)

गेसफोर्ड

बाळमित्र भाग २ : आ. २ री (भाषां), गणपत कृष्णाजीचा छापखाना, मुंबई, १८५७, पृ. ८ + ३१७ (दोला)

गोखले व्ही. डब्ल्यू.

ख्रिस्ती वर्णन : (भाषां), बीटीबीएस्. १८८३, पृ. ६१ (मखि. ७)

गोरे नेहम्या

ख्रिस्तीधर्म ईश्वरदत्त आहे यास काही प्रमाण आहे काय ? : स्वतंत्र, पंच हौद मिशन, पृ. १६४ (मखि. ४५) (पहा पृष्ठ १३९)

प्रार्थना समाजाचा धर्म स्वबुद्धि कल्पित असल्याने मनुष्यांच्या उपयोगी पडणार नाही : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८८४, पृ. ११. (मखि. ४३)
बेनी इस्राएल लोकांस व्याख्यानाचा सारांश : स्वतंत्र, सोसायटी ऑफ सेंट जॉन इव्हेन्जिलिस्ट, १८८५, पृ. १८ (मखि. ३१)
पवित्र शुभवर्तमानांच्या अस्सल असण्याची प्रमाणे : स्वतंत्र, डायसेसन फंड ऑफ दी बिशप ऑफ बॉम्बे, १८८७, पृ. ९५. (मखि. २१)
उपदेश : स्वतंत्र, सोसायटी ऑफ सेंट जोन इव्हेन्जिलिस्ट, १८८८, पृ. १६. (मखि. ५१)
यशायाच्या ५३ व्या अध्यायातील सिद्धान्त व स्पष्टीकरण : खासगी, १८८९ पृ. ४६, (मखि. १६)
इस्राएल वाचकासाठी मित्रत्वाचे लेख : स्वतंत्र, सोसायटी फॉर जैन इव्हेन्जिलिस्ट, १८८९, पृ. ४७ (मखि. १०)
तुकारामाचे धर्माविषयी ज्ञान : स्वतंत्र, सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८९२ पृ. ९९ (मखि. ५६)

गोरे धोंडू

आत्म्याचा वैद्य : (भाषां), खासगी, १८८८, पृ. ८८ (मखि २३)
परमेश्वराबरोबर समेट : (भाषां), खासगी, १८८८ पृ. १०, (मखि. ४६)
खरा तारणार : (भाषां), खासगी, १८८८ पृ. ८ (मखि. ५९)
हिंदू धर्माविषयी प्रश्न : (भाषां), खासगी, १८८८, पृ. ८ (मखि. ४६)
आत्मे आणि तारे : (भाषां) खासगी, १८८८, पृ. २०. (मखि. पृ. ५४)
मोठी क्षमा : (भाषां) खासगी, १८९० पृ. ८ (मखि. १)

गोविंद गंगाधर

आत्म्याचे अमरतत्त्वाविषयी : अमेरिकन मिशन, मुंबई १८५५, पृ. ३५. (ग्रँट २७७)

चक्रनारायण भाऊराव बी

ईश्वरी अनुग्रह : (भाषां), खासगी, १८८८, पृ. ५० (मखि. ५१)

जर्विस जॉर्ज

ग्रथांची भाषांतरे किंवा नवीन ग्रथ करणारांस बक्षिसाविषयीचे प्रसिद्धीपत्र : हैंद-शाळा, शाळा पुस्तक मंडळी, मुंबई, १८२५. पृ. १४ + २० + २० (दोला)
विद्येचे उद्देश लाभ आणि संतोष या विषयांचे वाद : (भाषां) मुंबई १८२९, पृ. २ + १६९ (दोला)
गणितकृती गणितमार्ग : (भाषां) आ. २री, १८२६; पृ. ४ + १२५ (दोला)

गणित मार्ग दुसरा भाग, अपूर्णांक : (भाषां) बॉम्बे नेटिव्ह स्कूल बुक ॲण्ड स्कूल सोसायटीचा छापखाना, मुंबई, १८२६. पृ. ८ + २४७. (दोला)

कर्तव्यभूमिती : (भाषा), कुरिअर प्रेस, मुंबई, श्री. ज. प्रभू, १८२६, पृ. १६ + १७३, (दोला)

शिक्षामाला प्रथम पुस्तक : (भाषां) मुंबई १८२७ पृ. २ + ६७४ आ. १८२८ पृ. १० + ४७० (दोला)

शिक्षामाला भाग २ बीजगणित : (भाषां), आ. २ री, एलिफन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिटयूशन, मुंबई, १८४०, पृ. ४+२१७. (दोला)
आ. ९ वी, १८४२, पाठशाळा, पृ. ४+२४८ (दासू ३५६) पुनरावृत्ती १८४८, पाठशाळा छापखाना, पृ. २+२७० (दोला)

शिक्षामाला भाग ३ : (भाषां), आ. २ री, एलिफन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिटयूशन, इंपिरिअल छापखाना, १८४०, पृ. ४+१९५+२+२९, (दासू ३५७)

शिक्षामाला भाग ४ : (भाषां), आ. २ री, एलिफन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिटयूशन, मुंबई, इंपिरिअल छापखाना, १८४० पृ. ४+५६+२+४८+२ +२७+२३ अधिक कोष्टके (दासू ३५८)

द मार्गन याचा बीजगणित व मूळ पीठिका : मुंबई, आ. १८४८, पृ. ८+३८६+१ (दोला.) आवृत्ती दुसरी १८५१, अमेरिकन मिशन, मुंबई, पृ. ८+३२९+२ (दोला)

द मार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका : (भाषां) अमेरिकन मिशन, १८५०, पृ, २+२८०+२ (दोला)

अंकगणित प्रथम भाग पूर्णांक : (भाषां), आ. ६, सरकारी पाठशाळेचा छापखाना, पुणे, नारो रामचंद्र ठकार, १८५२, पृ. ४+१४९, (दोला)

अंकगणित दुसरा भाग अपूर्णांक : (भाषां), आ. ९ वी, १८५२, सरकारी पाठशाळेचा छापखाना, नारो रामचंद्र ठकार, पृ. ६+२०९ (दोला) आ. १८५८.

(कर्नल) जर्विस

अधिकरण भूमिती-प्राथमिक भूमिती : (भाषां), गणपत कृष्णाजी, १८५५, पृ, १७२, (ग्रँट २३२)

शालेय गणित पूर्णांक : (भाषां), आ. १८६२, नारो आप्पाजी गोडबोले, पुणे, पृ. ८०, (ग्रँट ६६७) आ. १८६३, विठ्ठल सखाराम अग्निहोत्री, पुणे, पृ. ४९, (ग्रँट ६६८) आ. १८६३, बुद्धिप्रकाश पुणे, पृ. ८०. (ग्रँट ६६६)

शालेय गणित अपूर्णांक : (भाषां) आ. १८६३, विठ्ठल सखाराम अग्निहोत्री, पुणे, पृ. १४४ (ग्रँट २६०) आ. १८६३, आप्पाजी बापूजी पाच्छापूरकर, पुणे, पृ. १०० (ग्रँट २६१)

(कर्नल) जेकब जी. ए.
मन:शांतीचा पाया : (भाषा), बीटीबीएस्. १८६३, मुंबई पृ. १६, (मखि. ५८)

जेड्डो डब्ल्यू.
गृहवैद्य : स्वतंत्र, खाजगी, १८७९, पृ. ९२ (मखि. २६)

(मिसेस्) टाऊनसेंड
जुन्या कराराच्या पुस्तकातल्या गोष्टी : (भाषां) अमेरिकन मिशन, १८३५, पृ. ६०
(मखि. ५०)
एकसोदसच्या गोष्टी : (भाषां), वीटीबीएस्, मुंबई, १८३६ (मखि. ३८)
सिद्दी चाकरमाणसाची गोष्ट : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई १८४५ पृ. ३४,
(मखि. ३८) आ. २ री, बीटीबीएस्, अमेरिकन मिशन, १८५३ पृ.
२ + ३ ते ३४. (दासू. १११)
फुले वेचणाऱ्या मुलींची गोष्ट : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई १८४५, पृ. ३६
(मखि. १९)
नव्या करारातल्या पुस्तकातल्या गोष्टी : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई, १८४८,
पृ. ११७, (मखि. १५०)

(रे.) टिळक नारायण वामन
संगीत आनंदराव किंवा पाशबद्ध स्वदेशाभिमानी : (नाटिका) सुबोध प्रकाश मुंबई,
पृ. १८८६, पृ. ४+६+१२८+२, (दासू ६७५)
घड्याळ काय म्हणते ? : सुबोध प्रकाश, मुंबई, १८८६, (पृ. २+१+७), (दासू ६०४)
माझा ओसाड पडलेला गाव : (भाषां), प्रका- नीलकंठ त्र्यंबक जोशी, स्वदेश
प्रकाश, मुंबई, १८८६, पृ. ४+३६ (दासू ६०४)
गंगा : बी. एस्. वैद्य आणि कंपनी, माझगाव, मुंबई, १८८७, पृ. २२ (दासू ८११)
वीरकन्या : (देवगडच्या रामाराज्याच्या काळचे कथानक) (कादंबरी) ज्ञानप्रकाश
पुणे, १८८८, पृ. २+७+८२ (दासू ७१६)
संगीत गोदुःख विमोचन नाटक : गोरक्षण, शिळाछाप, नागपूर १८८९, पृ. ९६
(दासू ६७५)
गोरक्षा : गोरक्षण शिळाछाप, नागपूर, १८८९, पृ. ४+११२ (दासू ४२३)
आमच्या विधवा : (ऑस्टिन अबॅटचा ग्रंथ सुधारणार) निर्णयसागर, मुंबई,
१९०१, पृ. ६९३, (दासू ८०४)
आनंदीबाई : (भाषा) बीटीबीएस्, निर्णयसागर, मुंबई, १९०३, पृ. ४ + ७८
(दासू ७४४)
मेरी जोन्स आणि तिचे शास्त्र, बीटीबीएस्, निर्णयसागर, मुंबई, १९०४,
पृ. ८+१५०, (दासू ११३)

भजन संग्रह : मुक्तिमिशन, केडगाव १९०५, पृ. ४ + ५८ (पृ. ११५ पहा) (दासू. ११७)

बोध आणि रंजन : वीटीवीएस्, निर्णयसागर, मुंबई, १९०६, पृ. ४ + १६७ (दासू ११५)

चांगला मेंढपाळ : वीटीवीएस, मेथॉडिस्ट पब्लिशिंग हाऊस, १९०६, पृ. ८८, सचित्र, (दासू ९३)

स्त्रियांचा रोजचा सहाय्यकारी : वीटीवीएस, मिशन छापखाना, कोल्हापूर १९०६, पृ. २ + ३१ आ. २ री. (दासू ११८)

उथले पुत्त : वीटीवीएस, मिशन छापखाना, कोल्हापूर १९०६, पृ. ४ + १००, (दासू ११३)

बापाचे अश्रू : निर्णय सागर प्रेस, मुंबई १९०९, पृ. ४ + १२ (दासू ५७४)

गवताची गंजी : अमे. मराठी मिशन, अहमदनगर, निर्णयसागर, मुंबई, १९११, पृ. १६ + १५ (दासू ६०४)

शीलं परं भूषणं : (सचित्र नाटिका) प्रका. शं. न. जोशी, चित्रशाळा, पुणे, १९१२, पृ. ६३ (दासू १०११)

ख्रिस्तानुवर्तन पुस्तक दुसरे : सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, एपीजी मिशन प्रेस, नगर १९१६, पृ. २ + ५० (दासू १०२) (पृ. ७८ व ७९ पहा)

प्रभुची प्रार्थना : बीटीवीएस, लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, १९१८, पृ. २ + ७ + १९ (दासू ८८)

रे. टिळक यांची राष्ट्रीय कविता : (पद्य), बीटीबीएस, १९१९, पृ. ५६, (दासू ५५३)

ख्रिस्तायन : प्रका. दे. ना. टिळक, मनोरंजन, मुंबई, १९२१, पृ. २ + ३० ★ २ + १ (दासू ३३६) पहा (पृ. ३२१, ३२२)

अभिनव काव्यमाला भाग २ रा : (संपा.), प्रका. लक्ष्मणशास्त्री लेले, विजय पुणे १९२२ आ. २ री, प. ४ + १६०, (दासू ५६९)

नवीन इसापनीती : (सचित्र), प्रका. दे. ना. टिळक, विजय, पुणे, १९२९, पृ. २ + ४२ (दासू १०२५)

टिळकांची कविता पुस्तक दुसरे : (अभंगांजली आ. २ री) संपा. भास्कर कृष्ण उजगरे, प्रका. दे. ना. टिळक, सुदर्शन प्रेस, नासिक, १९३०. पृ. ३१ + १०४ (दासू ५५३) (पृ. ३२ पहा)

विवाह मुद्रिका : (ख्रिस्ती बांधवांची विवाह पद्धती), प्रका. दे. ना. टिळक, नागरिक मुद्रणालय, नाशिक १९४०, पृ. २ + २५, (दासू ४१ खंड २)

विवाह पद्धती : (ज्ञानोदय साप्ताहिकावरून), बीटीबीएस, आर्यभूषण प्रेस, पुणे १९४०, पृ. २ + १३, (दासू ४१ खंड २)

बालोद्यान टिळकांची कविता भाग ३ रा : (संग्रा) दे. ना. टिळक, के. भि. ढवळे, कर्नाटक प्रेस, मुंबई, १९४७, पृ. २७ + १०० (दासू २२० खंड २) (पृ. ३१२–३१३) पहा.

वनवासी फूल : (संपा.) दे. ना. टिळक, प्रका. ब. गो. गर्गे, वीणा प्रकाशन, नागपूर, १९४७, पृ. ४ + ५२ + ५३ ते ११६), (दासू. २०९ खंड २) (पृ. ३०५–३०६ पहा)

संगीत गणपतीस्तव : (गणेशोत्सवाकरिता संगीताचे चालीवर भूपाळ्या, पदे व आरत्या), प्रका. विलासानंद मंडळी, मुंबई, इंदूप्रकाश, पृ, ११. (दासू ५८८)

नक्षत्रमंडळ-माझी रोषणाई-ग्रहमंडळ : (सचित्र) बीटीबीएस्, लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, पृ. ८ + १८६, (दासू ३६१) (सहाय्यक आत्याबाई)

गीतोद्धार : स्कॉटिश मिशन इंडस्ट्रीज कंपनी, ऑर्फनेज, पुणे, पृ. २४ + ८, (दासू ११७)

टिळक देवदत्त नारायण

राजेंद्राचा शोध : (मूकनाटक), सोलापूर, मिस. एमिली बिसेल, ऑर्फनेज, पुणे, १९२७, पृ. ३२, (दासू. १०८)

कृष्णा-एक मद्यपान निषेधपर गोष्ट : दी रिलिजस बुक डेपो, तत्त्वविवेचक, मुंबई, १९३०, पृ. ८ + १३२ (दासू. ११२)

ख्रिस्तानुवर्तन (भाषां) पुस्तक चौथे : सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, तत्त्वविवेचक, मुंबई, १९२९, पृ. ४ + ८२ (दासू १०२)

स्वावलंबन : इंडियन ख्रिश्चन मिशन, कोल्हापूर, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई, १९२६, पृ. ५३, (दासू ११९)

छोटा संस्थानिक : (भाषां) बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, पृ. २ + ७७. (दासू ८८)

आमची मित्र मंडळी : प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर, प्रेसिडेन्सी प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९३३, पृ. १२. (सचित्र ((दासू १०२५)

जातककथा : दे. ना. टिळक, सुदर्शन प्रेस, नाशिक, १९३२, पृ. ८ + ३ ते ७५ (सचित्र) चंद्रशंकर मणिशंकर भट्टकृत गुजरातीवरून (दासू. १०२५)

बोधसुधा : (सहा. रूथ टिळक), दे. ना. टिळक, राजगुरू प्रेस, पुणे १९३१, पृ. १६५ (दासू. १०२५)

घटकाभर करमणूक : आ. २ री मुंबई, केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक मुंबई, १९४६, पृ. ६ + ७ ते ५६, सचित्र, (गमतीदार प्रहसनांचा संग्रह) आ. १ ली १९४१ (दासू २६४ खंड २)

ठिणग्या : नासिक, दे. ना. टिळक, नासिक, १९४०, पृ. २+३० (अनेक संवाद,

ख्रिस्ती बांधवांसाठी) (दासू २६४ खंड २)

पाऊलवाट : मुंबई, बीटीबीएस, नागरिक, नासिक, १९३९, पृ. ४+३०+२ (तीन गोष्टी–ख्रिस्ती बांधवांसाठी) (दासू ३६८ खंड २)

टिळक रूथ देवदत्त

आपली परमेश्वरावरील श्रद्धा : (भाषां) एफ्. एफ्. मास्टर्स, आर्यभूषण पुणे, १९५०, पृ. ३९, (दासू ३७ खंड २)

धनगरांचे पाहुणे : पुणे, (भाषां), एफ्. एफ्. मास्टर्स, आर्यभूषण पुणे, १९५०, पृ. १२१, (दासू ३८ खंड २ रा)

हैदीची पुनर्भेट : (भाषां), एफ्. एफ्. मास्टर्स, आर्यभूषण पुणे, १९५०, पृ. ६+१८६, (दासू ३८ खंड २ रा)

सेवा : (भाषां), एफ्. एफ्. मास्टर्स, आर्यभूषण पुणे, १९५०, पृ. ६+९९, (दासू ३९ खंड २)

खेडेगावातील स्त्रियांसाठी ख्रिस्ती शिक्षणाचा अभ्यासक्रम : (भाषां), एफ्. एफ् मास्टर्स, आर्यभूषण, पुणे, १९४९, पृ. ६+५+६२, (दासू ४२ खंड २ रा)

टिळक अशोक देवदत्त

सावल्या : नासिक, दे. ना. टिळक, नागरिक, नासिक, १९३९, पृ. ४ + २४ (विनोदीकथा संग्रह) (दासू ३२१ खंड २ रा)

(रे.) टेलर जे.

प्रभूच्या प्रार्थनेचा उलगडा : (भाषां), सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज १८७२, पृ. १६ (मखि. ३४)

तुळशीचे लग्न : स्वतंत्र, सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८७४, पृ. १९, (मखि. ५९)

लिंगमार्गापेक्षा फार उत्कृष्ट मार्ग : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८८१, पृ. ४३ (मखि. ?)

ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म : (भाषां), पंचहौद मिशन, १८८२, पृ. ३२ (मखि.११)

जातिभेद : स्वतंत्र, सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८८२, पृ. २४, (मखि. १७)

प्राचीन व अर्वाचीन गीते : (भाषां), पंचहौद मिशन, १८८४, पृ. १९४ (मखि. २७)

करिंथकरास पहिल्या पत्रावर टीका : (भाषां), सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८८८, पृ. २६१ (मखि ११)

पवित्र योहानाने केलेले शुभवर्तमान यावर टीका : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८९०, पृ. १२५ (मखि. १२)

मिसेस् टेलर के. एम्.

धाकट्या मेगची मुले : (भाषां) खासगी, १८८९, पृ. १४८ (मखि. ३३)

(रे.) डिक्सन जे. बी.

इंग्लिश ख्रिस्ती मंडळाची भजनपद्धती : चर्च मिशनरी सोसायटी, मुंबई, अमेरिकन मिशन प्रेस, १८३५, पृ. ७१२ (दासू १२१)

साधारण प्रार्थना : (भाषां), चर्च मिशन, १८३५, पृ. २७१ (मखि. ६)

पुरातन परम पवित्र लेख– यशाया मलआखी भाग ४ : अमेरिकन मिशन छापखाना मुंबई, १८३७, पृ. ५४५ (दासू. ८३)

पुरातन परम पवित्र लेखातले काव्यग्रंथ : अमेरिकन मिशन छापखाना, मुंबई, १८३९, पृ, २ + २९१ (दासू ८२)

पुरातन परम पवित्र लेख – येहोशू अहराजे : (भाषां) अमेरिकन मिशन छापखाना, मुंबई, टी. ग्रॅहम १८५१, पृ. १ + ४३३ (दोला)

डिसोझा मेरी

येशूचे पहिले व शेवटले प्रभू भोजन : (भाषां) खासगी १८९२, पृ. १६ (मखि. १६)

डेव्हिड आर.

आत्मारामपंत मृत्यु शिपायी : (पद्यात्मक रचना), स्वतंत्र, बीटीबीएस्, मुंबई १८९१, पृ. ३३ (मखि. ४) (पृ. ५० पहा)

(रे.) तुकाराम नथूजी

कुटुंबाचा मित्र : स्वतंत्र, अमेरिकन मिशन, १८७७, पृ. १९६, (मखि. १८)

तरुणाचा मित्र : स्वतंत्र, ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८८१, पृ. १७२ (मखि. ६४)

रे. विष्णु भास्कर करमरकर यांचे चरित्र : स्वतंत्र, खासगी, १८८४: पृ. ९६ (मखि ३३)

अविश्वासाचे विष : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. ४२)

आत्म्याने दीन : (भाषां) खासगी, १८९०, पृ, ८, (मखि. ४३)

आंधळ्या मनुष्याची प्रार्थना : (भाषां), खासगी, १८९० पृ. ८, (मखि. ४३)

सत्याचा शोध : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८, (मखि. ५०)

जगाचा उजेड : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. ३३)

मनुष्याचा वाईट स्वभाव : (भाषां) खाजगी, १८९०, पृ. ८ (मखि. ३५)

धर्महीन मनुष्य : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८, (मखि. ३६)

सर्वांत जुना धर्म : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ४०)

कापणी आणि पेरणी : (भाषां), खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. ५४)

सर्पदंश : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८, (मखि ५४)
रूक्ष देशातील ओहळ : (भाषां) खासगी, १८९० पृ. ८, (मखि. ५५)
खरा धर्म : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८, (मखि. ५८)
अज्ञान देव : (भाषां), खासगी १८९०, पृ. ८, (मखि. ६०)
हाययेस्ट नॉलेज : (भाषां), खासगी १८९०, पृ. ८, (मखि. २४)
देवाचे खळे : (भाषा) खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. २२)
महारोगाविषयी : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८, (मखि. ३१)
विश्वास आणि आज्ञापालन : (भाषां) खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. ५)
काळपाणी : (भाषां), खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. ६)
भट्टीप्रमाणे जळणारा दिवस : (भाषां), खासगी, १८९०, पृ. ८ (मखि. १४)
रुंद मार्ग : (भाषा) खासगी, १८९०, पृ. ८, (मखि. ७)

(मेजर) थोमास जी. इ.

सुप्रिटेन्डेंट ऑफ पुलिस ब्रीफ समरी ऑफ द पीनल कोड : (भाषां) समाचार बेळगाव, (संक्षिप्त रूपात कायदा), १८६४ पृ. १५७, (ग्रँट ३४७)

(रे.) दाजी पांडुरंग

ख्रिस्ती लोकांचा विश्वास व कर्तव्यकर्म : (भाषां) सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८७३, पृ. ६४ (मखि.) १८

(रे.) नवलकर गणपतराव आर.

रामूशेटीची स्वारी : (भाषां) खासगी, १८७५, पृ. २२, (मखि. ३०)
गुरुचरित्र आणि गुरुबोध : स्वतंत्र, बीटीबीएस मुंबई, १८७८, पृ. ११२ (मखि. १३२)
आर्यनीतिसुधा : (भाषां) खासगी, १८७९, पृ. २८, (मखि ३)
स्टुडन्टस मराठी ग्रामर : स्वतंत्र, खासगी, १८८०, पृ. ३४०, (मखि. ५६)
इंट्रोडक्शन टु मराठी ग्रामर : स्वतंत्र, खासगी, १८९१, पृ. ५३, (मखि. २९)

नवलकर एच. एन.

एका सत्यशोधकाचे आपल्या देशबांधवाशी संभाषण : स्वतंत्र, बीटीबीएस मुंबई, १८८३, पृ. २७, (मखि. १७)

न्यूटन हेन्री

मुंबईतील सदर दिवाणी अदालतीत मुकदमे फैसल झाले त्यांचे हकिकतीचे मराठींत भाषांतर : एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, मुंबई, १+१६३ (सन १८४० ते १८४८ पर्यंत माहिती) (दासू. २७०)

(रे.) नेस्बिट आर.

खरे प्रायश्चित्त : आ. १८३०, बीटीबीएस् मुंबई, पृ. ४७ (मखि. ५८) आ. १८५५, अमेरिकन मिशन, (ग्रँट ५१८)

भगवद्गीतेचे सार : बीटीबीएस्, मुंबई, १८३२, पृ. ११० (दोला)

ब्राह्मणाचे महत्त्व : आ. १८३४, बीटीबीएस्, मुंबई, पृ. ४६, (मखि. ७) आ. ४ थी, १८४८, बीटीबीएस्, मुंबई, पृ. १२७ (दासू. १०६) आ. ६ वी, १८६५, बीटीबीएस्, मुंबई, पृ. ६४, (दासू. १०६)

पृथ्व्यादी भूतांचें भजन : बीटीबीएस् मुंबई, १८३५, पृ. ३६, (मखि. ६३)

सभेची थोडक्यांत प्रश्नोत्तरावळी : १८३६, (मखि. ८)

(रे.) पवार शिदोबा बी.

दिव्यप्रकाश : बीटीबीएस्. मुंबई १८६२, पृ. १५९ (मखि. ५७)

शाब्बाथ निरूपण : (भाषां) बीटीबीएस्. मुंबई १८६३, पृ. ६४, (मखि. ४८)

आकाश लोकाविषयी संवाद : (भाषां), बीटीबीएस्. मुंबई, १९६३, पृ. ६८, (मखि. १४) आ. २ री, बीटीबीएस्. १८६६, पृ. ६ + ६४ (दासू. ९८)

ऋणमज्जन : बीटीबीएस्. मुंबई, पृ. २७ (मखि. ५)

बोधामृत अथवा कुणबी लोकांस पत्रे : स्वतंत्र, अमेरिकन मिशन, १८६८, पृ. ६० (मखि. ३२)

अर्वाचीन बखर : (भाषां), खासगी १८७०, पृ. १२०, (मखि ४१)

पवार भागोबा (किन्हीकार)

पदसंग्रह : खासगी पृ. ६८. (मखि. ४१)

पंडित व्ही. राव रामाजी

पवित्र लेखात वर्णिलेले आमच्या धन्य प्रभूचे द्वितीय आगमन आणि त्यानंतरच्या चर्चेविषयीच्या भावी गोष्टी यांचे संक्षिप्त टिपण : (संग्रा.) खासगी, १८८७, पृ. २३. (मखि. ५२)

पंडिता रमाबाई

शास्त्रासंबंधी चित्राचे पुस्तक : (भाषां), पंचहौद मिशन, १८८४, पृ. ९३. (मखि. ६)

मिसेस पार्क सी. डब्ल्यू

दोन मेंढरांची गोष्ट : स्वतंत्र, बीटीबीएस्, मुंबई १८७२, पृ. ४३ (मखि. ५५)

राजाचा पुत्र : स्वतंत्र, बीटीबीएस्. मुंबई १८७४, पृ. २७ (मखि. ३१)

उत्तम मित्र : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई, १८७५ पृ. ७४ (मखि. ५)

पायर्स फिलिप नेरी

ग्रॅमॅटिका मराठा : अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, १८५४, पृ. ८ + १५ + १०६, (दोला)

(रे.) प्राईस डब्ल्यू. एस्

भरत खंडातील यात्रेकरी : (भाषां), बीटीबीएस्, १८४८, पृ. २९१ (मखि २८)
ख्रिस्ती मंडळीची बखर : (भाषां), बीटीबीएस्, मुंबई १८५०, पृ. ३६४. (मखि ५)
ल्यूथराचा इतिहास : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई, आ. १८५२, बीटीबीएस्, मुंबई, पृ. ६ + ४ + ५ ते १७९. (दासू ९१७) (पहा पृष्ठ १५५)
ख्रिस्तीवीर : (भाषां), बीटीबीएस्, मुंबई, १८७९, पृ. ११९. (मखि. ११)

(रे.) ब्रिस्टले जे. जे.

प्रभुभोजन याच्या पद्धतीवर टीका भाग १ : (भाषां) डायसेसन फंड ऑफ बिशप ऑफ बॉम्बे, १८८५, पृ. ३९, (मखि. १२) (पृ. १०६ पहा)
सकाळची आणि संध्याकाळची प्रार्थना याच्या पद्धतीवर टीका : डायसेसन फंड ऑफ बिशप ऑफ बॉम्बे, १८८६ पृ. ४६ (मखि. १२)
मतांगीकार आणि सार प्रार्थना यावर टीका : डायसेसन फंड ऑफ बिशप ऑफ बॉम्बे, १८८७, पृ. ६९, (मखि. १२)

फर्नांडिस

स्थिरीकरणाविषयी थोडा निर्देश : (भाषां) खासगी, १८८५, पृ. १६, (मखि.२९)
(मिसेस) फरार
हेनरी आणि त्याचा संभाळणारा गडी संभू याची गोष्ट : (भाषां) अमेरिकन मिशन, मुंबई, आ. १८३३, पृ. ३२ (मखि. २४) नाशिक, आ. १८३५ पृ. २+३८ (दोला)
चमत्कारिक गोष्टी : (भाषां) बीटीबीएस्, १८३४, पृ. ६६ (मखि. ४) आ. १८३८, अमेरिकन मिशन, पृ. २+२+९४ (सचित्र,) (दोला) नाशिक आ. १८३५, बीटीबीएस, पृ. ४+८४ (दासू ८१३)
पूर्वीच्या शिक्षणाच्या सुधारणेसंबधी सूचना आणि शिस्त : (भाषां) चर्च मिशन, १८३५, पृ. ५६, (मखि. २५)
कुटुंबप्रवर्तननीति : नाशिक, १८३५, पृ. २+८+५६, (दोला)
यात्रेकऱ्याचा वृत्तांत : नाशिक, १८३८, पृ. १४६, (दोला)
बालबोध गोष्टी : (क्रमिक पुस्तक) सरकारी प्रेस, नाशिक, आ. १८३८, पृ. ७१ (ग्रँट २८८) आ. ३ री, १८५१, सरकारी पाठशाळेचा छापखाना, पुणे, नारो रामचंद्र ठकार, पृ. ४+९१ (दोला) (पृ. ७७ व ३१२ पहा.)

(रे.) फरार सी. पी.

ईश्वराचे पवित्रत्व व न्यायत्त्व यांचे प्रदर्शन : वीटीबीएस, १८३४, पृ. २२, (मखि. २६) आ. १८३५ बीटीबीएस, नाशिक, पृ. २+२२ (दासू ९१)

विवरणात्मक चर्चा : १८३५, पृ. ९४, (मखि. १८)

गीते विभाग १ : (संपा.), आर, प्रेरा; मुंबई, १८३६, पृ. २+८४ (दोला)

गीते विभाग २ : (संपा.), गणपत कृष्णाजींचा छापखाना, १८३८, पृ. २+९८, (दोला)

गीते विभाग ३ : (संपा.) मुंबई, आर, प्रेरा; १८३९, पृ. २+७९, (दोला)

दाविदाची गीते : चर्च मिशन, १८५०. पृ. २९१, (मखि. २४५)

रे. फ्रॉस्ट ए.

एक नास्तिक मनुष्य ख्रिस्ती झाला याविषयी हकिकत : (भाषां), वीटीबीएस, मुंबई, १८५८, पृ. ५६, (मखि. ४७)

फ्लीन जेम्स

भाषण : (भाषां), मुंबई, गणपत कृष्णाजी छापखाना, १८४८, पृ. १३ + ४३, (दोला)

रे. फुलर एम्. बी.

सफल प्रार्थना : (भाषां), खासगी, १८८९, पृ. १२१ (मखि. ४४)

मिसेस फुलर

तारण पावण्याच्या अटी : स्वतंत्र, खासगी १८८९ पृ. २२ (मखि. २७)

रे. फेअर बँक एस्. बी.

पवित्र शास्त्रातील गोष्टी : स्कॉटिश मिशन १८२७ पृ. १६ (मखि. ५०) आ. ३ री १८५३, अमेरिकन मिशन, पृ. ७२. (दोला)

लहान गणित : अमेरिकन मिशन, मुंबई १८४८ पृ. ७२ (मखि. ३) आ. ३ री, बीटीबीएस्. १८४० पृ. १३० (दासू ७८) आ. १८५१ अमेरिकन मिशन पृ. ७२ (मखि. ५०)

शास्त्रातल्या गोष्टी : आ. ३ री, बीटीबीएस्. १८४० पृ. १३० (दासू ७८) आ. १८५१ अमेरिकन मिशन पृ. ७२ (मखि. ५०)

म्युझिकल मॅनुअल : अमेरिकन मिशन, मुंबई १८५३ पृ. १२ (मखि. ३७)

सृष्टीतील चमत्कार : (संपा.) वीटीबीएस्. अमेरिकन मिशन १८५३ पृ. ४ + १८७ (सचित्र) (मेमोरिअल पेपर्स १९)

नवशिक्यासाठी मराठी व्याकरण : ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, मुंबई १८६५ पृ. ३२ (मखि. ३५)

भूगोलावरील प्रश्नोत्तरे : अमेरिकन मिशन, मुंबई १८६७ पृ. १६४ (मखि. २१)

भूगोल विद्या : अमेरिकन मिशन, मुंबई, ओरिएंटल प्रेस, १८६७, पृ. २ + ७ + १६४ (सचित्र) (दासू ८४०).
तुल्यार्थदर्शक नवा करार : (संग्रा.) अमेरिकन मिशन १८६८ पृ. ६०४ (मखि. ३९)
ट्यूनस् फॉर दी सेक्रेट साँगज् : अमेरिकन मराठी मिशन, १८६८, (मखि ५९)
गणित : स्वतंत्र, अमेरिकन मराठी मिशन, १८७५ पृ. १२. (मखि ३)
गणित पार्ट १ : स्वतंत्र, अमेरिकन मराठी मिशन, १८७६ पृ. ३६ (मखि. ३)
गणित पार्ट २ : आ. १८७९, पृ. २४ (मखि. ३)
गणित पार्ट ३ : अमेरिकन मराठी मिशन, १८८३ पृ. २८ (मखि. ३)

(मिसेस) फेअरबँक एस्. बी.

पवित्रशास्त्रांत वर्णिलेली मुले : (भाषां) १८६९ पृ. ९१, (मखि. ९)

(मिसेस) फेरिस एल्. एच्.

ख्रिस्त कोणत्या प्रकारचा उपदेशक होता ? : (भाषां) खासगी, १८८५, पृ. ३२ (मखि. १०)

रे. फेरिस जी. एच्.

मुका मुलगा ज्यक : (भाषां), वीटीबीएस् १८८६ पृ. ४० (मखि. ३०)
बोधपर प्रश्नोत्तरावली : (भाषां), प्रेसबिटेरिअन मिशन, पृ. २९ (मखि. ८)
शास्त्रप्रतिदर्शक कोश : (भाषां), प्रेसबिटेरिअन मिशन, १८९०, पृ. १९३, (मखि. ६) (पृ. २८० पहा).

(रे.) फ्रेंच. ओ.

राधानाथाची गोष्ट : अमेरिकन मिशन, मुंबई १८४४ पृ. ३७ (मखि. ३२)
पावसाविषयी विचार : अमेरिकन मिशन, मुंबई १८४५ पृ. ८ (मखि. २९)]
मद्यपानाची फळे : (भाषां,) अमेरिकन मिशन, मुंबई १८४७ पृ. १२ (मखि. ४७)
पश्चात्तापाविषयी ग्रंथ : (भाषां.) अमेरिकन मिशन, मुंबई १८४८ पृ. ९२. (मखि. १०)

(मिस्) बर्नार्ड इ. टी.

गॉस्पेल साँग्ज् : (संग्रा.) खासगी १८७९ पृ. ८ (मखि. २२)
तू मी अथवा दुसरा एखादा : (भाषां.) खासगी १८८३ पृ. १८ (मखि. २८)
चार सुखाचे शब्द : (भाषां.) खासगी १८८९ पृ. २३ (मखि. ६३)
नाहीशी झाली : (भाषां.) खासगी १८८९ पृ. २४ (मखि. १५)
सदाचरणाची मूलतत्त्वे : (भाषां.) खाजगी १८८१ पृ. १७ (मखि. ३७)

रे, ब्लॅक डब्ल्यू

सत्यधर्म : (बाप्तिस्मा घेण्याची तयारी करण्याकरिता) (भाषां.) पंचहौद मिशन १८८१ पृ. १८ (मखि. ४८)

(रे.) व्हॅलेन्टाईन एच्.

देवाचे भजन करण्याची गीते : अमेरिकन मिशन १८४५ पृ. १४८ (मखि. २७) आ. १८५५, पृ. २७९ (मखि.)४८.

जगन्नाथाविषयी : अमेरिकन मिशन मुंबई १८४६, (मखि. १)

कोकराचा चारा : अमेरिकन मिशन, मुंबई १८५१, पृ. ५२ (मखि. ३१)

निरनिराळे धर्म : अमेरिकन मिशन, मुंबई १८५१, पृ. १०० (मखि. ६०) (पहा पृ. ४८)

मनोकृत्य गणिताचा आलेख : (भाषां), अमेरिकन मिशन, मुंबई १८५४, पृ. ८३, (मखि. ३०)

गीत चालीसुद्धा-प्रार्थना : अमेरिकन मिशन, मुंबई १८५५, पृ. ३३६, (ग्रँट ४४२)

लाखीराम बाबाविषयी : अमेरिकन मिशन, मुंबई १८५५, पृ. १८, (मखि. १)

मतपरीक्षा भाग २ : अमेरिकन मिशन प्रेस, बीटीबीएस, मुंबई १८५८, पृ. २ + १३६ (मखि. १७) (पृष्ठे ४६ व ५१ पहा)

लेकरांची गायने : अमेरिकन मिशन, मुंबई १८६२, प. ६४. (मखि. २७)

मिसेस् व्हॅलेंटाईन एच्.

मनोकृत्य गणित : (भाषां), अमेरिकन मिशन, मुंबई १८४०, पृ. १६९ (मखि. २९)

लहान खगोलविद्या : अमेरिकन मिशन, १८४७, पृ. ४४, (मखि. २१)

व्हॅलेंटाइन जेम्स. आर.

अ ग्रामर महरट्ट लँग्वेज : एडिंबर्ग जे. हाल यांचा छापखाना, १८३९, पृ. ४ + ५२, (मोडी) (दोला)

(रे.) बाबा पदमजी

नेपोलियन बोनापार्टीची शकुनवंती : (भाषां), खाजगी, सखाराम अग्निहोत्री यांचा शिला प्रेस, सुमारे १८४८

स्त्रीविद्याभ्यास निबध : बीटीबीएस, मुंबई १८५२. पृ. ५९, (दोला)

पुरंदर तालुक्यातील समस्त लोकांस पत्र : बीटीबीएस, एक्श्चेंज प्रेस, मुंबई, १८६४ पृ. १४ (मखि. २)

दुसरी प्रश्नोत्तरावली : ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८६४, पृ. ४९, (मखि. ९)

तिसऱ्या पुस्तकाचा उत्तरार्ध : (भाषा) ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८६५, पृ. १३५ (मखि ५७)

स्त्रीकंठभूषण : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८६८, पृ. १४९, (सचित्र) (मखि ४६)

स्वर्गवर्णन : वीटीवीएस, मुंबई, १८७८, पृ. ४ + ५९ आ. १८८४, पृ. ५९ (कराड) (मख्रि २३)
चित्रासुद्धा शास्त्रातील कथा : वीटीवीएस्, मुंबई, १८७९ (कराड)
दाविदाची कथा : (भाषां.) वीटीवीएस, १८७९, पृ. १६ (मख्रि १)
मोश्याची गोष्ट : (भाषां), वीटीबीएस्, मुंबई, पृ. १६ (मख्रि. २६)
श्री येशूख्रिस्तकृत शांतिकल्याणदायक-सुसंवाद : (भाषां), वीटीवीएस् मुंबई, १८७९, पृ. २६०, (मख्रि. ५)
प्राचीन काळच्या कथा : (भाषां), वीटीवीएस्. मुंबई, १८७९, पृ. १८, (सचित्र) (मख्रि. ३९)
बदखलास : (भाषां), बीटीबीएस, मुंबई, १८७९ पृ. २७ (मख्रि. ४०) आ. २ री १८८२ आर्फनेज प्रेस, बीटीबीएस्, (कराड)
दी न्यूथ वर्थ : खासगी, १८७९ पृ. १५ (मख्रि. ३९)
चमत्कारिक कृत्ये : (भाषां), वीटीवीएस्, मुंबई, १८७९ पृ. १६ (मख्रि. ३३)
उपदेशरत्नमाला : (भाषां), आ. १ ली, वीटीवीएस्, १८८० अँग्लोव्हर्नाक्युलर प्रेस, पृ. २१४ (मख्रि. ५१) आ. २ री १८८२ पृ. ४ + २१४, (कराड)
मूर्तिपूजेविषयी संभाषणे : स्वतंत्र, वीटीवीएस्, मुंबई, १८८० पृ. १०० (मख्रि १५)
वेदांत काय आहे : स्वतंत्र, वीटीवीएस, मुंबई, १८८० पृ. ८१ (मख्रि. ६२)
तारणाच्या मार्गाचे शुद्धीकरण : स्वतंत्र खासगी १८८१ पृ. ८ (मख्रि. ११)
कुटुंबमित्र : स्वतंत्र, बीटीबीएस्, १८८४-८५, पृ. ५७६ (मख्रि. १८)
येशूख्रिस्ताचे चमत्कार : (भाषां), वीटीबीएस्, १८८६ पृ. २४ (मख्रि. ३६)
शाब्बाथ दिवशी सैतान कुठे असतो ? : (भाषा), वीटीबीएस्, १८८६ पृ. ८ (मख्रि. ४८)
मरण आणि न्याय : स्वतंत्र, वीटीवीएस्, १८८७, पृ. १६ (मख्रि. १५)
येशूकडे पहात राहणें : (भाषां), बीटीबीएस्, १८८७, पृ. ८ (मख्रि. ३४)
प्रभूभोजन घेणाराचा साथी : (भाषां), खाजगी, १८८९, पृ. २२४ (मख्रि. १२)
मिस्टर बाबा पदमनजी यांचे स्वर्गवासी पत्नीचा शेवटले तीन दिवसाचे वृत्त : स्वतंत्र खासगी १८९०, पृ. ३२ (मख्रि. ५२)
भगवत्‌गीता शास्त्र मतपरीक्षा : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी १८९०, पृ. २४ (मख्रि. ५)
एकनाथ चरित्र परीक्षा : स्वतंत्र, वीटीवीएस्, १८९१ पृ. ३२ (मख्रि. ४७)
सॅम्युअल बज्जेट ख्रिस्ती व्यापार : (भाषां), वीटीवीएस् १८९१, पृ.४५, (मख्रि.४८)
वैदिक हिंदू धर्म : एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, मुंबई, १८९२, पृ. ६ + १४६ (कराड)
हिंदू वाचकाकरिता ख्रिस्तीधर्माचे स्पष्टीकरण : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८९२, पृ. ११८, (मख्रि. ११)

आक्षेप विवेचन : बीटीबीएस्, जॉईंटस्टॉक प्रेस, मुंबई, १८९२ पृ. ४ + ८७, (कराड)

हिंदुभक्ती व ख्रिस्तीभक्ती यांची तुलना : ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, जॉइँटस्टॉक प्रेस, मुंबई, १८९३, पृ. २ + २० (कराड)

मिसेस् ॲनी बेझेंट बाईंच्या आत्मोन्नती विषयक व्याख्यानपर चर्चा : १९०३, (कराड)

ओळीवर ओळ-बालबोध गोष्टी भाग १ ला : बीटीबीएस् मुंबई, १८१८, पृ. २+२३६ (कराड)

ओळीवर ओळ-बालबोध गोष्टी भाग २ : बीटीबीएस्, लक्ष्मीप्रेस, १९१८, पृ. २+१७२ (कराड) (पृ. ७७ व ३१२ पहा)

बावाचा कावा : (विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्यावर ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या दृष्टिकोणातून लिहिलेले पुस्तक, टीकात्मक स्वरूप– या पुस्तकाचा उल्लेख माडगांवकरांच्या ' मुंबई वर्णन ' यात पृ. ३४६ वर आहे) (कराड)

बाबा पदमनजींच्या पुस्तकांच्या मलपृष्ठांवरील जाहिरातीत ज्या पुस्तकांचा निर्देश आहे, परंतु जी प्रत्यक्षात उपलब्ध झाली नाहीत. अशा पुस्तकांची नावे.

(१) अंत:करण कसे शुद्ध होईल ?

(२) स्टॉदर्ट साहेबाच्या मरणाविषयी सरमन.

बाबाजी

बाबाजीची बखद : अमेरिकन मिशन, मुंबई १८४५, पृ. ४+७६ (पहा रोड होलीस) (दासू ८८५)

बार्थ सी. जी.

ख्रिस्ती मंडळीची बखर : बीटीबीएस्, मुंबई, अमेरिकन मिशन प्रेस, १८५०, पृ. ४+२६० (दोला)

मिसेस् बॉस्वेल

ओळीवर ओळ : (भाषां), बीटीबीएस्, १८७५, पृ. ४१६, (मखि. ३३) (पृ. ७७ व ३१२ पहा)

(मिसेस्) बिसेल एल्.

देवप्रीतीची प्राचीन गोष्ट व दुसरी गायने : बीटीबीएस्, १८७३, पृ. ५०, (मखि. ३९)

बुलबुल (संग्रा) : अमेरिकन मिशन, १८७४, पृ. ६२, (मखि. ७) (पृ. ११२ पहा)

एका आईचे शेवटचे भाषण : बीटीबीएस्, १८७५, पृ. ३१ (मखि. ३७)

ख्रिस्ती स्त्रियांच्या कर्तव्याविषयी निबंध : स्वतंत्र, खासगी, १८८४, पृ. २१, (मखि. ४५)

शास्त्रांत वर्णिलेल्या स्त्रिया : (भाषां) बीटीबीएस्, १८८८, पृ. २८९, (मखि. ६२) (पृ. ६५ पहा)
नव्या करारात वर्णिलेल्या स्त्रिया : बीटीबीएस्, १८९० पृ. २५०, (मखि. ६२)

(रे.) बिसेल एल्

जगाचा तारणारा जो येशू ख्रिस्त त्याच्याकडून मनुष्याच्या तारणोपाय या विषयी : (भाषां), बीटीबीएस्, मुंबई, १८५८, पृ. १६७, (मखि. ४९)
प्रार्थनेचे सामर्थ्य : (भाषां), अमेरिकन मिशन, मुंबई, १८५९, पृ, २३, (मखि. ४३)
वाचन पाठावली : (आर. व्ही. मोडक) (संग्रा), बीटीबीएस् १८८४, पृ. १५३, (मखि. ६१)

(रे.) बिस्क्रिय जे. डब्ल्यू.

पवित्र भागीपणाच्या विधीसाठी राग : (संग्रा), पंचहौद मिशन, १८८४, पृ. १५, (मखि. ३६)

(रे.) ब्रूस. एच्. जे

घडचाळ करणारा व त्याचे कुटुंब : (भाषां) बीटीबीएस्, मुंबई, १८६७, पृ. ७०, (मखि. ६१)
येशूकडे ये : (भाषां), अमेरिकन मराठी मिशन, १४६८, पृ. ७५, (मखि. ११)
विश्वासू कुत्रा आणि त्याची टोपली : स्वतंत्र, अमेरिकन मिशन, १८८९, पृ. १६, (मखि. १८)
लहान मुलांकरिता गणित : स्वतंत्र, खाजगी, १८८१, पृ. ५२, (मखि. ३)
शास्त्रातले पशू : स्वतत्र, खासगी, १८८६, पृ. २४, (मखि. ५)
शास्त्रासंबंधी कोश : (रे. कासमभाई महमद, सहा) बीटीबीएस, १८८५, पृ. ४५३, (मखि. ५) (पृ. २८० पहा)

मिसेस ब्रूस एच्. जे.

ईश्वरी भक्तास सर्व गोष्टी कल्याणकारक होतात याविषयी : बीटीबीएस्, १८६९, पृ. २८, (मखि. ५७)
सगेनबाग गावातील लोहार : (भाषां), बीटीबीएस्, १८७१, पृ. ४८, (मखि.५३)
जॉन्सन बाबा : (भाषां), अमेरिकन मराठी मिशन, १८७९, पृ. १६, (मखि.६०)
आळशी मुलगा : (भाषां), १८७९, पृ. ४, (मखि. २)
तरुण मोफेरा अथवा जेन नामे मुलगी : (भाषां), अमेरिकन मराठी मिशन, १८८०, पृ. १४, (मखि. ६४)
आमच्या आकाशातील बापाची ममता : (भाषां), खासगी, १८८७, पृ. ३०, (मखि. ४०)

(मिस) ब्रूस हॅटी एल्.

येशू खिस्ताचा चरित्रपट : (चार्टसह), स्वतंत्र, खासगी, १८९०, पृ. २४
(मखि ९)

(मिसेस) वेदरहेड

मुलांची पहिली पायरी : (भाषां), बीटीबीएस, मुंबई, १८६३, पृ. १४५
(मखि. ४१)

बेरी यशवंत एन्.

क्रूसाची छाया : (भाषां), पंचहौद मिशन, १८८३, पृ. ९३, (मखि. ५१)

बेल विल्यम हेन्री

शिल्प विद्या या विषयाचे निबंध : १८३५, मुंबई, पृ. २+५+३०४, (दासू ३६८)
(सहा. नारायणशास्त्री चौलकर)

यात्रिकक्रमण भाग २ : बीटीबीएस, आ. १८५४, पृ. २७२, (मखि. ४२) आ
१८५७, पृ. २+३ ते २१५) (दासू ११५)

(रे.) बोपेन जॉर्ज

हिंदू धर्माविषयी प्रश्न : (भाषां), बीटीबीएस, मुंबई, १८५२, पृ, १३, (मखि.४५)
(पृ. ५५ पहा)

मिस भोर एम्.

पुष्पकरंडक : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. १५० (मखि. ५)

(रे.) बोर्जेस इ.

खगोलविद्या : अमेरिकन मिशन, मुंबई, १८४६, पृ. ३८, (मखि. ४)

मराठी भाषेचे व्याकरण : अमेरिकन मिशन, १८४८, पृ. ६ + ११०, (मखि. ३५)
आ. १८५४, पृ. ८ + १८२ + १, अमेरिकन मिशन, (दोला)

इंग्लिश व्याकरण आणि सांप्रदायिक वाक्ये : अमेरिकन मिशन, मुंबई, १८५१, पृ.
११ + ७९ + ८१ ते २८४) (दासू ३१४)

गुजरात देशाचा इतिहास : (भाषां), दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणारी मंडळी
मुंबई, अप्पाराम रामजीचा छापखाना, १८५०, पृ. ४ + ३०३, (दोला)

नाना फडणवीस यांची बखर : डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, मुंबई,
गणपत कृष्णाजी छापखाना, १८५२ पृ. ४ + २१५ + १२, (दोला)

(रे) मल्हार डी. जी.

शुभवर्तमानासंबंधी प्रश्नोत्तरमाला : (भाषां), खासगी, १८८७ पृ. ५८, (मखि. ८)

हिंदुस्तानातील तरुणास पत्रे, भाग १ ते ५ : (भाषां), बीटीबीएस, १८९२, पृ.
१०८ (मखि. ३२)

माहातेकर एल. आर.

मादागास्कर बेटातील ख्रिस्ती धर्माचा इतिहास : (भाषां) बीटीबीएस्, १८७५, पृ. १०६. (मखि ११)

(रे) मिचेल जे. एम.

उद्धाराचा इतिहास : स्कॉटिश मिशन, १८३३, पृ. २२ (मखि. ६१)
नारळी पौर्णिमा : बीटीबीएस्. १८५१, पृ. ८ (मखि. ११)
सुबोधा भंग : बीटीबीएस्, मुंबई, १८५२, पृ. ३६ (मखि. ११)
पंढरपूरची यात्रा : बीटीबीएस्. १८५५, पृ. ६९ (मखि. ४१)
खंडोबाची गोष्ट : बीटीबीएस्. १८५५, पृ. ३६ (मखि. ३१)
तुकाराम यांची गोष्ट : बीटीबीएस्. मुंबई, १८५६, पृ. ५१ (मखि. १)
संस्कृत सुबोध श्लोक : बीटीबीएस्. मुंबई, १८५७, पृ. ३७ (मखि. ४८)
शकुन मुहूर्त इत्यादी याविषयी : बीटीबीएस्. १८६२, पृ. ३६ (मखि. ३८)
कुणब्याशी संभाषण : बीटीबीएस्. १८६३, पृ. २० (मखि. ५२)
पुष्पमाला : बींटीबींएस्. मुंबई, १८६३, पृ. ४८ (मखि. ५३)

(रे.) मिचेल डब्ल्यू.

प्रार्थना : अमेरिकन मिशन, मुंबई, १८२५, पृ. ६३ (मखि. ४३)
मुलांसाठी प्रश्नोत्तरावली : (भाषां). बीटीबीएस्. मुंबई, १८२८, पृ. ३६ (मखि.८)

(रे.) मिचेल मरे

शकुन मुहूर्त इत्यादी याविषयी संवाद : आ. २ री, बीटीबीएस्. मुंबई, एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १८६७ (मोडी) पृ. २ + ३ ते ४७ (दासू १०५)

(रे.) मिसाळ एस. बी.

गालीप्रधान निषेधक ग्रंथ : बीटीबीएस्. मुंबई, १८६५, पृ. २१ (मखि. १)
ज्ञातिभेदावर संभाषण : स्वतंत्र, बीटीबीएस्. मुंबई, १८७०, पृ. ४४ (मखि. १३)
मंजुळवाणी : स्वतंत्र, १८८१, पृ. ३१ (मखि. ३४).

रे. मूर डब्ल्यू. ए.

खरे श्राद्ध : स्वतंत्र, खासगी, १८९०, पृ. ११, (मखि. ५९)
पुनर्जन्म पावलेला किंवा खरा द्विज : स्वतंत्र, खासगी, १८९०, पृ. ७, (मखि. ५९)

डॉ. मॅक्लेनन जॉन

औषधी कल्पना विद्या : सरकारी लिथोग्रॅफिक प्रेस, मुंबई १८२५, पृ. ३१७, (ग्रँट ८६६)
औषधी कल्पना विधी : सरकारी छापखाना, १८२८ पृ. १०+१८४, (दोला)
निदान : सरकारी लिथोग्रॅफिक प्रेस, मुंबई, १८२८, पृ. ४+२२+१३७+३+४+१४२+२ (दासू. ४११)

रोगनिदान : बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, बॉम्बे १८५२, पृ. २३+१३७
[(दोला)
(दोला)
विषविद्या : बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १८५२, पृ. ६+१४२+३,
ॲनॉटॉमी : (शारीरशास्त्र), बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा छापखाना १८५२,
पृ. २०+१४०+२७ (दोला) [६+१२६, आकृत्यासह (दोला)
अवातिजन्यास्थिविकार : बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा छापखाना, १८५३ पृ.

मॅकडोनेल्ड आर्चबाल्ड

गुजराथ देशाचा इतिहास : (भाषां) दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणारी मंडळी,
आप्पा रामजीचा छापखाना, १८५०, पृ. ४+३०३ (दोला).
नाना फडणवीस यांची बखर : डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, मुंबई,
गणपत कृष्णाजी छापखाना, १८५२, पृ. ४+२१५+१२ (दोला).

(रे.) मोडक आर. व्ही.

होळीविषयी निबंध : अमेरिकन मिशन मुंबई, १८४९, पृ. ७२ (मखि. २६)
जनावरांविषयी : (भाषां) अमेरिकन मिशन, १८५०, पृ. ३३ (मखि. ४०)
विद्यार्थी : (भाषां) वीटीवीएस्, टी. ग्रॅहम, १८५०, पृ. १७४ (दोला) आ.
२ री, १८५७, पृ. ६+७ ते १८२ (दासू १०१)
अनेक जन्म निर्णय : वीटीवीएस्, मुंबई, १८५२, पृ. २० (मखि. ५८)
ईश्वर विद्या : (भाषां) अमेरिकन मिशन, १८५७, पृ. २+२५७ (दोला)
चहाडीविषय बोध : वीटीवीएस्, मुंबई, १८६३, पृ. २५ (मखि. ५३)
जातिभेद निर्णय : वीटीवीएस्, मुंबई, १८६३, पृ, ५४, (मखि. ७) आ. २ री
वीटीवीएस्, १८६५, पृ. ५३, (दासू. १०६)
पाप्यांचा सखा : (भाषां), वीटीवीएस्, मुंबई १८६४, पृ. १६ (मखि. ५३)
बॅलंटाईन मडमासाहेबांच्या मरणावरून विचार : स्वतंत्र, खासगी, १८७४ पृ. ५७,
[(मखि. ५१)
(मखि. ५१)
खिस्तीधर्म सिद्धान्त कथन : स्वतंत्र, अमेरिकन मराठी मिशन, १८८०, पृ. २२५,
अमेरिकन मराठी मिशन यासंबंधी मंडळयांची संक्षिप्त बखर : स्वतंत्र, अमेरिकन
मिशन, १८८३, पृ. १५८, (मखि. २५)
मंडळीशी पालकाचा संबंध व कर्तव्ये : स्वतंत्र, खासगी, १८८३, पृ. २४, (मखि. ४६)
हिंदू ॲण्ड द खिश्चन आयडिआज् ऑफ साल्व्हेशन : वीटीवीएस्, १८८५,
(मखि. २४)
खिस्ती धर्म खरा आहे काय ? : (भाषां), वीटीवीएस्, १८९० पृ. ६० (मखि. ३०)
एतद्देशीय तरुणांची कर्तव्ये : (मखि. ६५)
खिस्ताचे पुन्हा उठणे हे खिस्तीधर्माच्या सत्यतेचेप्रमाण : (भाषां) (मखि. ६५)

ख्रिस्ती भावांचे ऐक्य : (मखि. ६५)

मोडक रघुनाथ व्हीं.

महाराणीची गोष्ट : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८८२, पृ. ५ (मखि. ३४)

मोडक जी. वी.

एका ब्राह्मणाची गोष्ट : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८८२, पृ. २४, (मखि. ७)

बंडवाल्याची गोष्ट : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८८२, पृ. १५ (मखि. ४६)

सोन्याचे आमंत्रण : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८८२ पृ. १७ मखि. २२)

लंकेतील मुलीची गोष्ट : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्यलर एज्यु. सोसायटी, १८८३, पृ. २० (मखि. ३३)

पहिल्या भावांची गोष्ट : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसा. १८८३, पृ. ९ (मखि. ५४)

पहिल्या मनुष्याची गोष्ट : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसा. १८८३ पृ. ९ (माख. ५४).

मराठी दुसऱ्या पुस्तकातील कवितांचा अन्वयार्थ : स्वतंत्र, ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन, सोसायटी, १८८६ पृ. २९ (मखि. १७)

मराठी तिसऱ्या पुस्तकातील कवितांचा अन्वयार्थ : स्वतंत्र ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेश, सोसायटी, १८८६, पृ. २३ (मखि. १८)

मराठी चवथ्या पुस्तकातील कवितांचा अन्वयार्थ : स्वतंत्र ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु· सोसायटी, १८८६ पृ. ६५ (मखि. १७)

प्राचीन काळची प्रसिद्ध मुले : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८९२ पृ. ७८ (मखि. १८)

मोडक शाहूराव आर्

पवित्रजिणे : (भाषां), साल्वेशन आर्मी, १८८४ पृ. ४३ (मखि. २६)

जेसिकेची पहिली प्रार्थना : (भाषां), वीटीवीएस्, १८९२, पृ. पृ. ४२ (मखि. ३०)

मोडक चिंतामण आर.

एका हाताच्या खुर्चीचे आख्यान : (भाषां), वीटीवीएस्, १८९२, पृ. १३४, (मखि. ५१)

(कॅप्टन) मोलसवर्थ जे. टी.

देव दयाळू असता माणसाने दुःख का भोगावे : वीटीवीएस्, मुंबई १८५०, (मखि. २१)

मोझेस इझिकेल संकर

मंदिराचा नाश झाला या संबंधाने उपाय : (भाषां), खासगी, १८८७, पृ. १४ (मखि. १८)

(रे.) मंगर एस. बी.

मंगर म डमसाहेब इचे निरूपण : अमेरिकन मिशन, मुंबई, १८५८, पृ. २००, (मखि. ३६)

यार्डे सदानंद ए.

प्राविडंट फंड : स्वतंत्र, खाजगी, १८९२, पृ. १२ (मखि ४२)

युद्धाबाई

मुक्ति फौजेच्या मराठी गीतांचे पुस्तक (सहा) : साल्हेशन आर्मी १८९०, पृ. २२७, (मखि. ३६)

डॉ. रामजी मल्हार

डॉक्टर रामजी मल्हार यांच्या धर्मांतराची हकिकत : स्वतंत्र, खासगी, १८८९, पृ. १५ (मखि. ४६)

रामजी भोर

पश्वादिभूतदया : बीटीबीएस, अमे. मिशन, १८५३, पृ. ९२ (दोला)

रामचंद्र बाबाजी

समुद्रकिनारीचा वादविवाद : (भाषां) बीटीबीएस्, १८७२, पृ. १९१, (मखि.१५)

(रे.) रॉबिन्स डब्ल्यू. ई.

शास्त्रसंबंधी प्रश्नोत्तरावली : (भाषां), अमेरिकन मेथॉडिस्ट मिशन, १८८४, पृ. ९२, (मखि. ९)

(रे.) रिव्हिंग्टन सी.एस्.

नित्य प्रार्थना : (भाषां), पंचहौद मिशन, १८७८, पृ. ४१, (मखि. १४)

लेकरांचे भजन : (भाषां), पंचहौद मिशन, १८७८, पृ. १२, (मखि. १०)

की ट द ओल्ड टेस्टामेंट : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८७९, पृ. १६, (मखि. ३१)

लेटर ऑफ द इंडिअन बिशपस् : (भाषां), पंचहौद मिशन, १८८३, पृ, १०, (मखि. ३२)

पवित्र पौलाचा इतिहास : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८८४, पृ. ४१, (मखि. २५)

नव्या करारासंबंधी चित्रांचे पुस्तक : (संग्रा), पंचहौद मिशन, १८८४, पृ. ८०, (मखि. ३९)

दुष्काळातील डोंबकावळ्यांची गोष्ट : (भाषां), पंचहौद मिशन, १८८४, पृ. ९, (मखि. ५६)

पवित्र आठवडा : स्वतंत्र, पंचहौद मिशन, १८८५, पृ. २७, (मखि. २६)

(रे.) रोड होलीस

बाबाजीची बखर : अमेरिकन मिशन, १८३५, पृ. ७६, (मखि. ३२) (पहा बाबाजी)

(रे.) लॉर्ड ह्यूज. एफ.

पवित्र चर्चेतील वार्षिक उपास व सण : स्वतंत्र, खाजगी, १८८७, पृ. ३६, (मखि. ६४)

चर्चेतील लेकरांकरिता प्रश्नोत्तरावली : (भाषां), डायसेसन फंड ऑफ बिशप ऑफ बॉम्बे, १८८७, पृ. ६६, (मखि. ८)

ख्रिस्ती धर्म खरा व ईश्वररूप आहे याविषयी अनुकूल प्रमाणे : स्वतंत्र, खासगी, १८८९, पृ. ११८, (मखि. ४५)

पवित्र ल्यूकाने केलेले शुभवर्तमान यावर टीका : (भाषां), सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८९०, पृ. १२८, (मखि. १२)

(रे.) लॉर्ड जे. एच.

इस्रायल वाचकासाठी मित्रत्वाचे लेख : स्वतंत्र, सोसायटी फॉर जॉन इव्हेंजिलीट, १८८४, पृ. ५५, (मखि. २०)

दोन प्रकारचे मूर्तिपूजक : (भाषां), खाजगी, १८८५, पृ. २०, (मखि. ५९)

मशिहाविषयी भविष्ये व त्यांची पूर्तता : (सहा-लोटलीकर एस्. बी.) सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८८९, पृ. ४४, (मखि. ४५)

मुलांकरिता जुन्या करारातील कथासंबंधी चित्रे : (संग्रा), सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेज, १८८९, पृ. ४७, (मखि. १०)

(रे.) लेले आर. बी.

पवित्र भागीपणानंतरची उपकारस्थिती : (भाषा), पंचहौद मिशन, १८८५, पृ. ८, (मखि. ५७)

(रे.) लोटलीकर एस. व्ही.

प्रार्थना आणि एक्लेसियेतील विधी सांक्रामेंत या विषयीची प्रश्नोत्तरावली : (भाषां), सोसायटी सेंट जोन इव्हेंसिलीट, १८८०, पृ. ३३, (मखि. ९)

(रे.) लोटलीकर एस. बी.

लहान मुलांकरिता प्रार्थना : (भाषां), सोसायटी सेंट जोन इव्हेंसिलीट, १८८२, पृ. ८, (मखि. ४४)

वाक्यरत्नावली : (भाषां), खाजगी, १८८२, पृ. १६, (मखि. ३३)

पवित्र यूखारिस्टचा : (भाषां) पंचहौद मिशन, १८८५, पृ. ५१, (मखि. १५)

पवित्र भागीपणासंबंधी गुरु शिष्य संवाद : (भाषां), सोसायटी फॉर प्रमोटिंग खिश्चन नॉलेज, १८८६, पृ. ८, (मखि. २६)
प्रार्थना-ती करण्याची कारणे व तिची अंगे : स्वतंत्र, खासगी, १८८८ पृ. ६६ (मखि. ४४)

(रे.) वाइल्डर आर. जी.

साल्सबेरी मैदानावरील धनगर याची गोष्ट : (भाषां) अमेरिकन मिशन, मुंबई, १८४९, पृ. ५८ (मखि. ५२)
गवळ्याच्या कन्येची गोष्ट : (भाषां), वीटीवीएस्. १८५०, पृ. ६४, (मखि. १४)
हिंदुशास्त्रातील पदार्थ विज्ञान : वीटीबीएस्. १८५५ पृ. ७५ (मखि. ४२). आ. १८६६, ओरिएंटल छापखाना, मुंबई, पृ. २ + ७१.
ईश्वरी विद्या : एल्. ए. डिसुझा यांचा छापखाना, १८५६, (अनम) (पृ. २८३ पहा.)
पवित्र शास्त्रातील मुख्य विषय : (भाषां), वीटीबीएस्. मुंबई, १८५७, पृ. १९०, (मखि. ४९)
माथीयावर टीका : (भाषां.) वीटीवीएस्. मुंबई, १८५७, पृ. ४०४, (मखि. १२)
मार्क यावर टीका : स्वतंत्र, वीटीवीएस्. १८७०, पृ. ९० (मखि. १२)
लूकाने केलेले शुभवर्तमान यावरील टीका : स्वतंत्र वीटीबीएस्. १८७५, पृ. १९२ (मखि १२)

मिसेस वाइल्डर आर. जी.

लहान जेन : (भाषां.) वीटीवीएस्. मुंबई, १८५५, पृ. ७९ (मखि. ३३)

वॉलेस रॉबर्ट

इंग्लिश शब्दोच्चार प्रदर्शक शाळांतीतले पहिले पुस्तक : डी. ग्रॅहम यांचा छापखाना १९५६, पृ. २ + ७०, (दोला)

(रे) डॉ. विल्सन जॉन

परमेश्वराच्या गौरवाविषयी : स्कॉटिश मिशन, १८२८, पृ. १६ (मखि. १)
देव कसा आणि खरे भक्त कसे : आ. १ ली १८३१, वीटीबीएस्. मुंबई पृ. २८, (मखि. ३८) आ. १८३३, पृ. २४ (दासू. ९१) आ. आठवी, १८५५, वीटीवीएस्. पृ. २४ (दोला) आ. ९ वी. १८६७, वीटीबीएस्. पृ. २ + ३ ते २६ (दासू ९१)
दी रूडिमेंटस ऑफ हिब्रू ग्रॅमर इन मराठी विथ पॉइंटस : १८३२, पृ. १४३, (दासू ३४४)
हिंदूधर्म प्रसिद्धी करण : मु. आर. प्रेस; मुंबई १८३२ पृ. २ + ३ ते १११, (दासू १००) (मोरभट्टास उत्तर)

पावसासाठी प्रार्थना : बीटीबीएस्. मुंबई, १८३३, पृ. ४ (मखि. ४४)

पहिली प्रश्नोत्तरावली : बीटीबीएस्. १८३३ पृ. २२ (मखि. ८) आ. आठवी, १८४०, पृ. २० (दोला)

दुसरे हिंदूधर्म प्रसिद्धीकरण : म. आर प्रेस यांचा छापखाना, १८३५, पृ. ४ + १६६ (दोला) (साताऱ्याकडील नारायणराव शिक्षकास उत्तर)

वाक्यावली इंग्रजी आणि मराठी : १८३३, पृ. ८ + २५८ (दासू १०४५) आ. दुसरी १८३९, अमे. मि. प्रेस, मुंबई पृ. ३३०, (दोला) आ. चौथी, १८६०, टी. ग्रॅहम, (दोला)

खरा जो ख्रिस्तीधर्म त्यात काही हिंदू लोकांनी प्रवेश केला त्याविषयी वर्तमान : बीटीबीएस्, मुंबई, १८३८, पृ. १३, (मखि. २४)

भगवान कसा ओळखावा याविषयीची गोष्ट : आ. ४ थी, १८४५, बीटीबीएस्, अमे. मि. प्रेस मुंबई पृ. २+३ ते ११ (दासू. ११०)

मिसेस फरार यांच्या मरण प्रसंगीचा उपदेश : १८६३, पृ. २१ (मखि. ५१)

मिसेस विल्सन

मेदी आणि पारशी लोकांचे वृत्तांत कथन : मुंबई, आपा रामा यांचा छापखाना, १८३५, पृ. २+४२, (दोला) आ. २ री, १८३८, पृ. २+६०, आपा रामा यांचा छापखाना, (दोला)

आशूरी आणि बाबोली लोकांचे वृत्तांत कथन : आपा रामा यांचा छापखाना, मुंबई. १८३८, पृ. २+६१ (दोला)

ग्रेकी लोकांचे वृत्तांत कथन : आ. २ री, १८३८, पृ. ६४ आप्पा रामाचा छापखाना, मुंबई, (दोला)

प्राचीन मिसरी लोकांचे वृत्तांत कथन : आ. २ री १८३९, आपा रामा यांचा छापखाना, पृ. ८०, (दोला)

विल्सन एच. एच.

ए ग्लॉसरी ऑफ ज्युडिसिल ॲण्ड रेव्हयून टर्मस् : विल्यम एच् ॲलन ॲण्ड कंपनी लंडन, १८५५, पृ. २+२४+७२८+४ (दासू ३१२)

(रे) वूड डब्ल्यू

सचोटीविषयी : (भाषां), अमेरिकन मिशन, मुंबई, १८५० पृ. २९, (मखि. २६)

धर्माविषयी संवाद : बीटीबीएस्, मुंबई, १८५०, पृ. ५०

ख्रिस्ती शास्त्रातल्या कथा : (भाषां) ,बीटीबीएस्, मुंबई, १८५१, पृ. १८१, (मखि. ५)

ख्रिस्ती शास्त्रातल्या कथा नव्या कराराच्या : (भाषां), बीटीबीएस्, मुंबई, एक्स्चेंज प्रेस, १८६३, पृ. ६+३००, (सचित्र) (मोडी) (दोला)

वेदनायकम्

प्रतिमापूजा खंडन : वीटीबीएस्, मुंबई, १८९२, पृ. १६ (मखि. २८)

शेख उमर

इनसिडेंटस् फ्राम दी लाईफ ऑफ मिसेस फेअरबँक : स्वतंत्र, खासगी, १८७८, पृ. २४ (मखि. २८)

रे. एडवर्ड पेसनसाहेब यांचा संक्षिप्त वृत्तांत : (भाषां), वीटीबीएस्, १८७९ पृ. ३१ (मखि. ३६)

पतित आणि पतित पावन : (भाषां) वीटीबीएस्, १८७९, पृ. ६४ (मखि. ३७)

शेख दाऊद

प्रभूचा शब्द : वीटीबीएस्, मुंबई, १८५५, पृ, १२, (मखि ६३)

ख्रिस्ती धर्मांचा प्रसार होण्याविषयीच्या भविष्य वचनाची पूर्णता : वीटीबीएस्, मुंबई, १८५७, पृ. ९१, ((मखि. २०)

ख्रिस्ती स्त्रियांस बोध : वीटीबीएस्, मुंबई, १८६०, पृ. ७२ (मखि. १४)

(रे) शेषाद्री नारायण

ख्रिस्तीशास्त्र ईश्वरदत्त आहे या विषयी इतिहासावरून घेतलेली प्रमाणे : वीटीबी. एस्, अमेरिकन मिशन, मुंबई, १८५६ पृ. ४ + ८२ (मखि. २५)

बाला सुंदराबाई टागोर : वीटीबीएस्, मुंबई, १८५६, पृ. ७९ (मखि. ४)

गोकुळाष्टमी : वीटीबीएस, मुंबई, १८५६. पृ. १६ (मखि. २२)

होळीचे सणाविषयो ग्रंथ : वीटीबीएस, मुंबई, १८५६. पृ. ३९, (मखि. २६)

रामनवमी : वीटीबीएस, मुंबई, १८५६, पृ. १०, (मखि. ४६)

गणेशचतुर्थी : वीटीबीएस्, मुंबई, १८५५, पृ. १६ (मखि. ५२)

पाप, त्याचा दोष व अनर्थ : वीटीबीएस्, मुंबई, १८५७, पृ, ४६ (मखि. ५२)

वेगाने जाणारे प्रवासी : (भाषां), वीटीबीएस्, मुंबई, १८५८, पृ. २८ (मखि.४६)

एरिक नामक दासाचा वृत्तांत : (भाषां), वीटीबीएस्, मुंबई, १८५८, पृ. २९, (मखि. १७)

फुलमनी आणि करुणा : मिसेस मुलेन्स यांच्या इंग्रजी पुस्तकाचे भाषां टी–ग्रॅहम, १८५९, पृ. १७५ (ग्रॅट ६५४)

प्राचीन मूर्तिपूजक धर्म व ख्रिस्तीधर्म : वीटीबीएस्, मुंबई, १८६२, पृ. २१ (मखि. २)

मनुष्य जबाबदार आहे काय ? : वीटीबीएस्, मुंबई, १८६२, पृ. २०, (मखि. ३०)

कोणावर अथवा कशावर विश्वास ठेवावा ? : (भाषां), वीटीबीएस्, : मुंबई, १८६३, पृ. १६ (मखि ६२)

चोरी करण्यापेक्षा प्रार्थना करणे बरे : वीटीवीएस्, मुंबई १८६३, पृ. १२ (मखि. ४३)

लहान बदली : वीटीवीएस्, मुंबई १८६३, पृ. २० (मखि. ३३)

माझ्याने येथे कोणाचे काही कल्याण करवेल काय ? : (भाषां), वीटीवीएस्, मुंबई १८६३ पृ. २२, (मखि. ७)

एका नास्तिकाची ईश्वराच्या अस्तित्वाविषयी खात्री झाली : वीटीवीएस्, मुंबई, १८६३, पृ. ३२, (मखि ४)

खऱ्या धर्माची कसोटी : स्वतंत्र, वीटीवीएस्, १८६८, पृ. ४४, (मखि. ९)

ज्ञानाचे मोल माणिकाहून अधिक आहे : (भाषां), वीटीवीएस्, मुंबई, १८६८ पृ. ३० (मखि. ४४)

खरा पश्चाताप : स्वतंत्र, वीटीवीएस, पृ. २४, १८६८, (मखि. ५९)

सुभक्ति उत्तेजक ग्रंथ : (संग्रा), वीटीवीएस्, १८७२, पृ. ७६ (मखि. ?)

मिसेस शेषाद्री नारायण

शॉर्ट अकौंट ऑफ दी ऑर्फन स्कूल अँट इंदापूर : स्वतंत्र खासगी, १८७८, पृ. १६ (मखि. ५२)

शेळके जोसेफ एल.

प्रेसिडेंट जेम्स. ए. गारफिल्ड यांचे चरित्र : (भाषां), बीटीबीएस्, १८८५, पृ.१९९ (मखि. ३४)

सर्जन एम्.

येशू ख्रिस्त जो मसिहा त्याविषयी भविष्य गोष्टी : (भाषां), वीटीवीएस्, १८५७, पृ. ३६, (मखि. ४५)

साळवी राणू जानोजी

कुणबी लोकांकरिता ज्ञानसंग्रह : स्वतंत्र, वीटीवीएस्, १८८१, पृ. ४८, (मखि. २९)

(रे.) सांगळे कृष्णराव आर.

खरा तरणोपाय : स्वतंत्र, बीटीबीएस्, मुंबई, १८७०, पृ. ७६, (मखि. १५)

परमेश्वर स्तुतीची गीते आणि काव्यरूप इयोबाख्यान : स्वतंत्र, खासगी, १८७६, पृ. ५४, (मखि. ५३)

सत्यावताराचा वृत्तांत : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी १८८२ पृ. ७४, (मखि. ५८)

बाळाजन्म : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८८९, पृ. ८२, (मखि. ९)

मुलींच्या गोष्टी : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८९२, पृ.४४, (मखि. ५५)

मुलांकरिता चित्रांचे पुस्तक : (भाषां), खिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८९२, पृ. ३७, (मखि. ७)

सांगळे ए. एम्.

शिशुपाल : (भाषां), अमेरिकन मराठी मिशन, १८७९, पृ. ७५, (मखि. १०)
महाराणीचे चरित्र : (व्हिक्टोरिया) (भाषां), खाजगी, १८८७, पृ. ५२, (मखि. ३२)
दी किंगडम ऑफ गॉड : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ३१)
चांगली व वाईट झाडे : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८, (मखि. ४)
पापांची क्षमा : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. २०.)
परमेश्वराचा निरोप : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८, (मखि. २२)
गॉडस् लॉ इन दी हार्ट : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. २२)
गॉडस् अडॉप्टेड चिल्ड्रेन : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. २१)
वंडरफुल लव ऑफ गॉड : (भाषा), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ६३)
वॉटर ऑफ लाईफ : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ६१)
दोन धनी : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८, (मखि. ५९)
पतित मनुष्यास आमंत्रण : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८, (मखि. ५९)
ट्रू हार्ट : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ५८)
पॅराडाइज : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ४१)
व्हिक्टरी ओव्हर डेथ : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ५०)
बाप्तिस्मा म्हणजे काय ? : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ६१)
पापनिद्रा : (भाषां), वीटीवीएस्. १८९०, पृ. ८, (मखि. ५३)
सिन अँण्ड इट्स् पनिशमेंट : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. ५३)
अंतःकरण शुद्ध : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८, (मखि. ४५)
भक्ति आणि प्रार्थना : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८, (मखि. ६३)
डार्कनेस ऑफ सिन : (भाषां), खाजगी, १८९०, पृ. ८, (मखि. १४)
शरीर आणि आत्मा : (भाषां), वीटीवीएस्, १८९०, पृ. ८. (मखि. ६)
मानसिक धैर्य : (भाषां), वीटीवीएस, १८९१, पृ. ४०, (मखि. ३७)

सांगळे डी. एम.

सन्मार्गदर्शक : (भाषां), अमे. मराठी मिशन, १८८०, पृ. ६५, (मखि ४८)

स्पायसर्स जेम्स

पोलिस कायदे, सन १८२४ पासून १८५२ : (भाषां), (परशरामशास्त्री), लक्ष्मण

माहेश्वरशास्त्री साहा.) ज्ञानसागर छापखाना, मुंबई, मु॥ रघुनाथ त्रिंबक जोशी, १८५५, पृ. ४+५६, (दोला)

(रे.) स्वार्टझ सी. एफ्.

हृदयदर्पण : (भाषां), बीटीबीएस्, मुंबई, १८६२, पृ, ८६ (मखि. २३)

ख्रिस्तीधर्म प्रकरणी प्रश्नोतरावली : (भाषां) बीटीबीएस्, १८६९, पृ. ३०, (मखि. ७)

मिस् स्वार्टझ सी.

रक्त शिंपडले आहे काय ? : (भाषां), खासगी, १८७८, पृ. २९, (मखि. ३०)

(रे) स्टे व्हन्सन जे.

ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेची प्रमाणे : बीटीबीएस्, मुंबई, १८२८, पृ. ४०, (मखि. ५०)

कित्येक ब्राह्मण, मराठी इत्यादी आणि ख्रिस्तदास यामध्ये हिंदूधर्म आणि ख्रिस्तधर्म याविषयी संभाषणे : बीटीबीएस्, १८२९, पृ. ५०, (मखि. १४)

भगवान कसा ओळखावा : बीटीबीएस्, मुंबई, १८३१, पृ. १२ (मखि. ४०)

त्रिविद्या त्रिगुणात्मिका भाग १ : (भाषां), अमे. मिशन प्रेस, १८३३, पृ. ६०+५६ (दोला)

इंग्लिश भाषेच्या व्याकरणाची मूळ पीठिका : आ. २ री, बॉम्बे नेटिव्ह एज्यु. सोसायटी, आर. प्रेरा; यांचा छापखाना, १८३३, पृ. २+१२७+१ (दोला)

दी प्रिन्सिपलस् ऑफ मराठी ग्रामर : स्वतंत्र, खासगी, पृ. १६५, (मखि. ४५) आ. २ री १८४३, कोलेट ॲण्ड कंपनी, अमे. मिशन पृ. ८ + १६३ + ८ (दासू. ३३६) आ. ३ री १८५४, ठकार आणि कंपनी एज्युकेशन सोसायटीचा छापखाना पृ. १४+१७७.

(मिसेस) स्कूफ

चांगले मुलगे किंवा तुम्ही आपली परीक्षा करा : (भाषां), बीटीबीएस्, मुंबई, १८३८, पृ. १४, (मखि. २२)

(रे.) सेलर जी. डब्ल्यू.

गतेच खोऱ्यातील लाकूडतोड्या : (भाषां), खासगी, १८७६, पृ. ७८, (मखि, ६३)

लघुप्रश्नोत्तरावली : (भाषां), प्रेसबिटेरियन मिशन, १८७७, पृ. ४४, (मखि. ९)

मिस सोराबजी मेरी

मुलांकरिता गाणी : (भाषां), खासगी, १८८३, पृ. ४० (मखि. ५३)

रे. स्टोन सी.

मरणाची तयारी : अमे. मिशन, मुंबई, १८८३३, पृ. ९, (मखि. ४४) (पृ. ४४ पहा)

रे. स्टोन जे,

चांगल्या सूचना : अमे. मिशन, मुंबई, १८३३, पृ. ९, (मखि. २२) (पृ.४४ पहा)

मिसेस हल

गुरुपरीक्षा : (भाषां), बीटीबीएस्. १८८६, पृ. ३६ (मखि. २३)

रे. हार्डिंग सी.

गाननिधी : (संग्रा.) खासगी, १८८६, पृ. २१५ (मखि. ५३)

गाननिधी आणि त्याची पुरवणी : १८९०, बीटीबीएस्. पृ. १३० (मखि. ५४)

हॉल गोर्डन

लेकरांची पहिली पोथी : अमेरिकन मिशन, मुंवई, १८१८, पृ. ४४, (मखि. १९)

मोक्षाचा मार्ग : अमे. मिशन, मुंबई १८१८, पृ. १६, (मखि. ६१)

इंग्लिश भाषांचे ज्ञान मिळविण्यासाठी साह्यकारक पुस्तक : अमे. मिशन, मुंबई, १८१९, पृ. १८० (मखि. २४) आ. ४ थी. पृ. १८३, १८५१, (दासू ३१४) आ. १८३१, मिशन प्रेस, पृ. १६०, (दोला)

परमेश्वराच्या भक्तीविषयी : अमेरिकन मिशन, मुंवई, १८२२ पृ. ३२, (मखि. ६३).

खगोल विद्या आकृतीसुद्धा : अमे. मिशन, मुंबई,| १८२४, पृ. २४ (मखि. ३) आ. १८४० (मखि. २१)

होणार क्रोध : अमे. मिशन, मुंबई, १८२५, पृ. २४ (मखि. ६३).

शास्त्राचा सारांश : अमे, मिशन, टी. ग्रॅहम प्रिंटर, मुंबई १८४५, पृ. ४३ (अनम) (पृ. ४२ व ४३ पहा)

त्रिभुवनाची गोष्ट : अमे. मिशन, मुंबई, १८४६, पृ. २० (अऐपस) (पृ. ३७ पहा)

(रे.) व्हाईट ए.

नवसाला पावणे याविषयी विचार – बीटीबीएस्, मुंबई, १८६२, पृ. २२, (मखि. १६).

दृष्टांतदर्पण – बीटीबीएस्. मुंबई, १८६३. पृ. ८२, (मखि. २९)

येशू ख्रिस्ताची मध्यस्ती : बीटीबीएस्. मुंबई, १८६५, पृ. ३२ (मखि. ३६)

(रे.) ह्यूम आर. डब्ल्यू.

मूर्तीचा उच्छेद, बीटीबीएस्, मुंबई, १८५०, पृ. ३२. ((मखि. २८)

विश्वास कथन : (भाषां), अमेरिकन मिशन, मुंबई, १८५०, पृ. १२० (मखि. १८)

मुलांकरिता चित्रांचे पुस्तक : अमे. मिशन प्रेस, मुंबई, १८५०; पृ. ३२ (मखि. ४२)

लेकरांकरितां चित्रांचे पुस्तक : बीटीबीएस्, मुंबई १८५१ पृ. ३२ (मखि. १०)

नारायण बाबा : बीटीबीएस्, मुंबई, १८५१, पृ. ३१ (मखि. ३८)

गुरु करण्याविषयी : बीटीवीएस्, मुंबई १८५१, पृ. ८ (मखि. १०)

(रे.) ह्यूम आर. ए.

नव्या करारात वर्णिलेली ख्रिस्ती मंडळींची व्यवस्था : (भाषां), अमेरिकन मिशन, १८८३, पृ. ९१ (मखि. १६)

(मिसेस) ह्यूम आर. ए.

शेवंती आणि चिमणी : (भाषां), खासगी, १८८५, पृ. १२७ (मखि. ५२)
अंतरंग : (भाषां), खासगी, १८८७ पृ, ३००, (मखि. ४१)

(मिसेस्) ह्यूम इ. एस्.

आमचा आकाशातील बाप : (भाषां), खासगी, १८८३ पृ. ५० (मखि. ४०)
जुने वाद्य अथवा प्रियसदन : (भाषां), खासगी, १८८५, पृ. १५९ (मखि. ११)
समुद्र मुक्त कन्या : (भाषां), खासगी १८८९, पृ. ९६ (मखि. ४९)

ह्यूम एडवर्ड. एच्

टिप लुईस आणि त्याचा दिवा : (भाषां), खासगी १८९१ पृ. २१६ (मखि. ५७)

(मिस्) ह्यूम. एस्.

शास्त्रासंबंधी स्फुट प्रश्न आणि त्यांची उत्तरे : स्वतंत्र, खासगी १८८४. पृ. ६८ (मखि. ६)

हेग जे. एस्.

व्याकरणासंबंधी सोपे धडे भाग १-२-३ : स्वतंत्र, ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसायटी, १८६९-१८७४, पृ. १२६, (मखि. १६)
एसे एक्झरसाईझिस इन ऑलजिब्रा : (भाषां), ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसा. १८७५ पृ. ३३ (मखि. १६)
मुलांकरिता पहिले पुस्तक भाग १-२ : (सहा. व्हि. के. ओक) स्वतंत्र, ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी, १८७६ पृ. २४ (मखि. १९)
स्क्रीपचरल पोर्शन्स : (संग्रा.) ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्यु. सोसा. १८८९, पृ. १२ (मखि. ५०)

रे. हेजन एलन

बहुभाषभाषी : अमेरिकन मिशन, मुंबई, १८५०, पृ. ४२ (मखि. ४१)
मातृबोध : (सुधारणार), बीटीवीएस, अमे. मिशन, १८४२, पृ. ४+२१७, (दोला)
ख्रिस्तीशास्त्रातल्या कथा : वीटीबीएस्, अमे. मिशन प्रेस, मुंबई, १८५२, पृ. ८+३५५ (सचित्र) (अ. ना. कुंभार)
सिनॉपसीस ऑफ द गोस्पेल विथ मॅपस् : अमेरिकन मराठी मिशन, १८६८, पृ. २० (मखि. ५६)

लेखक वा संपादकाचा निर्देश नसलेली पुस्तके

अगाथस म्हणजे उत्तम मनुष्य : (भाषां) पंचहौद मिशन, १८८४, (मखि. २)

अतिमहत्त्वाचे ज्ञान : (भाषां), खासगी, १८९०, पृ. ८, (मखि ३७)

अविचार पश्चात्ताप व प्रायश्चित याविषयी गोष्ट : (ज्ञानोदय पुनर्मुद्रित) १८४५ पृ. २८, (दासू ९७)

आत्म्याच्या मुक्तीसंबधी विचार : स्कॉटिश मिशन, १८२८, पृ. २४, (मखि. १३)

आमचा जो प्रभू व तारणारा येशूख्रिस्त त्या विषयी हा नवा करार : दुसरी छापणी, शास्त्रमंडळी, मुंबई, १८३०, पृ. ६६१, (दासू ८४) (पृ. ७६ पहा)

आमचा जो प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त, त्याचे सुवर्तमान, शास्त्रमंडळी मुंबई : १८३२, पृ. १७४+२ (पृ. ४० पहा) (दासू ३६)

आमचा तारणारा व प्रभू येशूख्रिस्त याविषयी सुवर्तमान पवित्र लेखातून काढले : ट्रक्ट सोसा, अमेरिकन मिशन मुंबई, १८३६, पृ. ५+७ ते ३१८, (दासू ८५) (पृ. ४० पहा)

आमचा प्रभू येशू ख्रिस्त या विषयी हा नवा करार : अमेरिकन मिशन, मुंबई, १८५५, पृ. ४ + २६८, (पृ. ७६ पहा) (दोला)

आपल्या मोक्षप्राप्तीसंबंधी हिंदूंचा अपराध : अमेरिकन मिशन, मुंबई, १८४५, पृ. २८, (मखि १९)

ऑन रिजनरेशन : स्वतंत्र, अमेरिकन मराठी मिशन, १८८३ पृ. १६ (मखि ४६)

ईश्वराची आवघी गोष्ट विशेषत मनुष्याच त्राण आणि कार्यशोधन करायासाठी नेत्य प्रकाश केल गेल आहे अर्थात धर्मपुस्तक, त्याचा अंतर्भाग ते आमचे प्रभु : तथा त्राण करणारे येशू ख्रिष्टांचे विषयक मंगळसमाचार, श्रीरामपुरी छापले, १८०७, ९४, (मोडी ३८ पर्वे) (दासू पृ. ८५)

ईश्वराच्या अवघ्या गोष्टी : श्रीरामपूर, मिशनप्रेस, १८१२, पृ. ५४९, शिळा, (दोला)

इंग्लंड व आयर्लंड देशाच्या संयुक्तिक मंडळीतील जे संस्कार व जी इतर धर्मकृत्ये चालतात, त्यांच्या पद्धती : अमेरिकन मिशनप्रेस, १८५१, पृ. ४ + १४३ (दोला)

इंग्लिश भाषणाचे ज्ञान मिळवायासाठी शीघ्र आणि सोपा उपाय : मुंबई, मिशन प्रेस, १८१८, पृ. ४ + १६८१ (दोला)

इंद्रियदमनहितार्थ मद्यपानवर्जक बोधपर गीते : खासगी, १८८८ पृ. १७ (मखि. ६५)

उद्धार होण्याचा उपाय : हर्णे, १८३१, पृ. २२ (दासू ९६)

आत्म्याचा उद्धार होण्याविषयीचा विचार : हर्णे, १८३१ पृ. १८, (दासू ९६)

उपदेश : अमेरिकन मिशन, मुंबई, १८३५, पृ. २४ (मखि. ५१)

खरा मार्ग कोणता याचा विचार : हर्णे १८३२, पृ. २४ (दासू. १०३)

खरा आश्रय : (भाषां) बीटीबीएस १८५७, पृ. ५४, (मख्रि. ५८)

ख्रिस्तीधर्म याविषयी सूचना : वाणकोट, १८३०, पृ. ५६, (दासू. १०६)

ख्रिस्ती भक्तांच्या गोष्टी : बीटीबीएस, अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई १८५३, पृ. ४ + २८४ (दासू. ८९५)

ख्रिस्ती धर्म ईश्वरस्थापित आहे याविषयी संवाद : (भाषां) बीटीबीएस, मुंबई, १८५७, पृ. ६६, (मख्रि. १४) आ. २ री. बीटीबीएस, १८६७, पृ. ५५ (दासू ९९)

ख्रिस्ती धर्माचे सार : अहमदनगर मिशन, ज्ञानसिंधू छापखाना, १८६०, पृ. २+१२ (दासू ?)

गरीब योसेफाची गोष्ट : बीटीबीएस, मुंबई, १८४६, पृ. १२ (मख्रि. ४३)

गरीब सेराईची गोष्ट : (भाषां) बीटीबीएस, १८४९, पृ. ३६, (मख्रि. ४३) आ. १८६०, एक्श्चेंज प्रेस, बीटीबीएस; मुंबई, १८६० पृ. ३४ (दासू १०८)

गीतांचे पुस्तक : बॉम्बे ऑक्झलीरी बायबल सोसायटी, मुंबई १८५३, अमे. मिशन प्रेस, पृ. २ + २६०, (दाते ?)

जगात पापाचा शिरकाव कसा झाला : स्कॉटिश मिशन १८२७, पृ. २२, (मख्रि.२७)

तीन संभाषणे : बीटीबीएस्, अमे. मिशन प्रेस, मुंबई, १८५४, पृ. ६१, (दासू १०६)

दारू पिणारास सुबोध : टेम्परन्स सोसायटी, अमेरिकन मिशन, मुंबई, १८४६, पृ. ४+६२ (दासू. १०४०)

दुसरा इंग्लिश इंस्ट्रक्टर यांचे भाषांतर : ज्ञानोदय, मुंबई, १८३३, पृ. ८०. (दोला)

दी बॉम्बे ग्रायमर : आ. ३ री, मुंबई, अमेरिकन मिशन छापखाना, टी. ग्रॅहम, १८५४, पृ. ३७ (दोला)

धर्मपुस्तक यातला प्राचीन करार : बॉम्बे ऑक्झलरी बायबल सोसायटी, अमे. मिशन प्रेस मुद्रक टी. ग्रॅहम, १८५३, पृ. ४+९४२ (दासू. ?)

धर्म प्रबोध : बीटीबीएस्, मुंबई, १८५१, पृ. ४४, (मख्रि. १५)

धर्मपुस्तकाचे वर्णन व त्या गोष्टीसंबंधी विषयी प्रश्नोत्तरावली : अमे. मिशन, मुंबई, १८४०, पृ. २+७५, (दासू. ५८)

धर्मग्रंथातील सूचना : स्कॉटिश मिशन, १९२७, पृ. ८ (मख्रि. २९)

धर्माच्या मुख्य गोष्टी पवित्र पत्रातून काढल्या : बाणकोट, शिळा छाप, १८२७, पृ. २२, (दासू. ८८)

धर्मांचे पुस्तक अर्थात मनुष्याचे त्राण आणि कार्य शोदूचे खातीर देवान कोण सगळी उत्त प्रकाश केल्याती तिचं श्रीरामपुरांतू मुद्रित झाले : १८२१, पृ. ४+५४६ (दासू. ८०)

नवा उत्पन्न जो त्याचे निरूपण : आ. २ रा, अमे. मिशन, मुंबई, १८५३, पृ. ५१, (दासू ९०)

नवा करार : बॉम्बे ऑक्झलरी बायबल सोसायटी, अमे. मिशन छापखाना, १८३६ (दोला)

नव्या हृदयाची गरज : स्कॉटिश मिशन, १८२७, पृ. १६ (मखि. ३८)

निघणे : अमे. मिशन, मुंबई, १८४६, पृ. ८८, (दासू ८१)

पवित्र शास्त्रातील इतिहास : अमे. मिशन, मुंबई, १८१९, पृ. ७०, (मखि. ४९)

पवित्र शास्त्रावरील दोन पुस्तिका : अमे. मिशन, मुंबई, १८१९. पृ. १ (मखि.६०)

पवित्र शास्त्रातील प्रकरणानुसार प्रश्नावली : अमे. मिशन, मुंबई, १८४४, पृ. १०१, (मखि. ५७)

पवित्र शास्त्र म्हणजे नवा व जुना करार : आ. २ री, अमेरिकन मिशन प्रेस मुंबई १८५७, पृ. ४+११९६ (दोला)

पहिले पुस्तक : स्कॉटिश मिशन, १८२९, पृ. १७, (मखि. १८)

पंचोपख्यान : चर्च मिशन, १८३७, पृ. ५४, (मखि. ३९) (पृ. २६६ प्रहा)

पंचांग : १८४७, अमे. मराठी मिशन, पृ. १८४७, पृ. १६८ (मखि. २)

प्रभूच्या प्रार्थना : स्कॉटिश मिशन, १८२७, पृ. ८, (मखि. १४)

प्रभूची खरी भक्ती : अमे. मिशन मुंबई, १८३४, पृ. १२ (मखि. ५९)

पाण्याला संरक्षण कसे द्यावे : स्कॉटिश मिशन, १८२७, पृ. १६, (मखि. २७)

प्रार्थना : स्कॉटिश मिशन, १८२८, पृ. ३४, (मखि. ४४)

प्रार्थना : आ. ४ थी, अमेरिकन मिशन प्रेस, १८४१, पृ. १९, (दोला)

प्रार्थनेचे स्वरूप : अमेरिकन मिशन, मुंबई, १८३२, पृ. ३२, (मखि. ३८)

प्राथमिक अंकगणित : अमेरिकन मिशन, मुंबई, १८२६, पृ. ४८, (मखि. ४३)

पुनर्जन्म : अमेरिकन मिशन, मुंबई, १८३३, पृ.१६, (दासू ९८)

बालाभ्यासाचे पुस्तक : अमेरिकन मिशन, मुंबई, १८२४, पृ. २४, (मखि. ३५)

भजनाची पद्धती : अमे. मिशन, मुंबई, १८३२, पृ. २२, (मखि. २०)

भजनाचे मासले : मुंबई, १८३२, पृ. ? (गद्यपद्य) (दासू ११८)

मत्स्यपुराण आणि इब्रीशास्त्र यांच्या पुरातन कथांचे बरोबर पाहणे : अमे. मिशन, मुंबई, १८४५, पृ. ४३, (मखि. ४३)

मद्यादी पदार्थापासून शरीरबुद्धीस विकार होतात ते : आंग्रोळीत छापले, मुंबई, १८३६, पृ. २+३ ते ३४ (दासू १०४०)

मराठी अंकलिपी : अमे. मिशन, मुंबई, १८१८, पृ. ४२, (मखि. ३५)

मराठी श्लोकातून बायबलमधील सूचना : बायबलीकल इन्स्ट्रक्शनस् इन मराठी श्लोकाज् अमे. मिशन, मुंबई, १८३३, पृ. ९४, (मखि. ६)

मराठी बोधवचने : आ. ४ थी, आर्. प्रेरा; मुंबई, १८३३, पृ. ५२, (मोडी व बालबोध) (दासू ४१)
मराठी आणि इंग्रजी क्रियापदांच्या काळाचा परिपाठ : मुंबई, अमे. मिशन प्रेस, मु. इ. ए. वेब्स्टर, १८४०, पृ. २+९५ (दोला)
मराठी व इंग्रजी व्होकॅब्यलरी : ख्रिस्ती एज्यु. सोसा. १८६३, पृ. ३२, (मखि. ६०)
महंमदाचा वृत्तांत : वीटीवीएस्, अमे. मिशन, प्रेस, १८५३, पृ. २+१६०, (दोला) (हरि रामचंद्र यांनी केलेले भाषां.)
मात्थीने लिहिलेले शुभवर्तमान : आर्. प्रेरा; यांचा छापखाना, मुंबई, १८३४, पृ. १४४, (दासू ८६)
मात्थीने केलेले शुभवर्तमान यावरील टीका : वीटीवीएस्, टी. ग्रॅहम यांचा छापखाना, मुंबई, १८५८, पृ. ३+३०४+१ (दोला)
मुक्ति म्हणजे काय ? : साल्व्हेशन आर्मी, १८९०, पृ. २४, (मखि. ६५)
मुलांकरिता दुसरे पुस्तक : (गद्यपद्य), ख्रिस्ती व्हर्नाक्युलर एज्यु. सोसा. एक्स्चेंज प्रेस, मुंबई, १८६१, पृ. ६+७५, (दोला)
मुंबईतील वादविवाद : स्कॉटिश मिशन, १८३०, पृ. ४० (मखि १५)
मूर्तिपूजेतील विसंगती : अमेरिकन मिशन, मुंबई, १८२८, पृ. २२ (मखि ६०)
मूर्तिपूजेविषयी जे जे ख्रिस्तीशास्त्रामध्ये लिहिले ते : संग्रा. वीटीवीएस्, १८७३, पृ. १८ (मखि ६१)
मोठा विचार, मरणानंतर काय प्राप्त होईल : हर्णे, १८३२. पृ. १९. (दासू ९८)
मोठ्या शास्त्रसंग्रहातून निवडून घेतलेली शस्त्रे किंवा पवित्र शास्त्रातून निवडलेल्या ओव्या : संग्रह, वीटीवीएस्. १८८३, पृ. ४४. (मखि २३)
यथातथ : मुंबई, अमेरिकन मिशन, टी ग्रॅहम, १८४६, पृ. ७२, (दोला)
यहुद्यांनी दुःख भोगणाऱ्या अभिषिक्तास न मानण्याची खरी कारणे : (भाषां) सोसायटी सेंट जोन दी इव्हन्जिलिस्ट, १८८०, पृ. १६ (मखि ६५)
येसोबा पवार याचा वृत्तांत : अमे. मिशन प्रेस, १८५८ पृ. २+२७ (दोला)
योसेफाची गोष्ट : (भाषां) चर्चमिशन, (मखि ५४)
येशूच्या यातना आणि मृत्यु : अमेरिकन मिशन, मुंबई, १८३३, पृ. १५, (मखि ५६)
येशूख्रिस्त जो मशीहा त्याविषयी भविष्य गोष्टी : आ. २ री, वीटीवीएस, ओरिएंटल प्रेस, १८६७, पृ. ३६ (दासू ९२)
रघुजी भोसल्याची वंशावळी : श्रीरामपूर १८१५, पृ. १०३, (दोला)
रत्नमाला : वीटीवीएस्, मुंबई, १८५१, पृ. २२४ (मखि. २१)
रोम बादशहाच वृत्तांत : वीटीवीएस्, मुंबई १८५७, अमे. मिशन प्रेस, पृ. ६+२०५ (अनाकुं)
लेकरांची पहिली पोथी : बाणकोट, १८२८, पृ. १८ (दासू ९०)

लेकरांची दुसरी पोथी : आ. २ री, चर्च ऑफ स्कॉटलंड, १८४०, पृ. ५९ (दासू ९०)

लेकरांची गीते : संग्रा. बीटीबीएस्, १८८२, पृ. ४० (मखि ४०)

ल्युकाने केलेले शुभ वर्तमान व प्रेषितांची कृत्ये : बॉम्बे ऑक्झिलीरी बायबल सोसायटी १८६५, पृ. २२० (दासू ८७)

शहाणपणाच्या सूचना : स्कॉटिश मिशन, १८२७, पृ. १६ (मखि २९)

शालेय वाचन पुस्तक : अमेरिकन मिशन, मुंबई, १८१८ पृ. ६४, (मखि. ४९)

शालेय संभाषणे : अमेरिकन मिशन, १८३९ पृ. ४१ (मखि. ४९)

शुभवर्तमानासंबंधी प्रश्नोत्तरावली : वीटीबीएस्, १८४१ पृ. ६४ (मखि. ८)

शुभवर्तमानसंबंधी प्रश्नोत्तरावली : मुंबई, अमे. मिशन प्रेस, टी. ग्रॅहम, १८४५, पृ. ३५ (दोला)

शुभवर्तमान : बीटीबीएस्, मुंबई, १८५६, अमे. मिशन, १८५६, पृ. २७ (दासू ८५)

सार प्रार्थना : (संग्रा) सोसायटी फार द प्रमोटिंग ऑफ ख्रिश्चन नॉलेज, १८८२ पृ. ४८ (मखि. ११)

साहित्यदर्पण : चर्चमिशन, १८३९, पृ. ९४ (मखि. १४)

स्क्रिपचरल फेलोशिप : खासगी, १८७७, पृ. २४ (मखि. ४९)

सुमार्ग शोधकांचा वृत्तांत : आ. ४ थी, बीटीबीएस्, आंग्रोळीत छापले, मुंबई, १८४५ पृ. २८ (दासू १११)

सूक्ते आणि गीते : अमे. मिशन. मुंबई १८३५, पृ. ३८ (मखि. ४५)

सृष्टिजन्य ईश्वरज्ञान : अमे. मिशन, बीटीबीएस, १८५० पृ. ७ + २२५, २७ चित्रे. (दोला)

स्वर्गमार्ग : अमे. मिशन, मुंबई, १८२२, पृ. ७२ (मखि. २४)

संदर्भ ग्रंथ सूची

1. *A Catalogue of Marathi Christian Literature*, (During eighty years) 1813 to 1892, by Rev. J. E. Abbott; Bombay Tract and Book Society, Nirnaya Sagar Press, 1892.

2. *Memorial Papers of the American Marathi Mission* 1813–1881. Presented at the Semi Centennial anniversary of the commencement of the Ahmednagar Mission Oct. 16-30-1881, Printed at the Education Society's Press, Byculla 1882.

3. *Historical Sketch Mission to the Maharattas of Western India*. Published by American Board of Commissioners for Foreign Missions, New York John-A Gray, Printer, steriotyper and binder corner of Frank-fort and Jacob Street 1862.

4. *Combined Catalogue of Marathi Christian Books*, 1940. Published by S. P. C. K. and The Bombay Diocesan Vernacular Literature Committee, S. P. C. C. K. B. T. B.S.

5. *Catalogue of Native Publications in Bombay Presidency* up to 31st December 1864, prepared under order of Govt. by Sir A. Grant. Second edition (with numerous additions and corrections). Printed at the Education Society's Press, Byculla 1867.

६. कुलकर्णी कृष्णाजी भिकाजी, **आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती, प्रका.** कृ. भि. कुलकर्णी, मुद्रक मोहन प्रिंटरी, मुंबई १९५६.

७. पिंगे श्री. म. **युरोपिअनांचा मराठीचा अभ्यास व सेवा**, प्रका. श्री. म. पिंगे, औरंगाबाद, मुद्रक– साधना प्रेस, पुणे १९६०.

८. **मराठी ख्रिस्ती वाङमयाचा इतिहास** (१८१०–१९२७) प्रका. रे. भास्कर कृष्ण उजगरे, मुद्रक– गणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणे १९३१.

९. प्रियोळकर अनंत काकाबा, **ग्रांथिक मराठी भाषा आणि कोंकणी बोली,** पुणे विद्यापीठ, पुणे १९६६.

१०. **अमेरिकन मराठी मिशनची दीडशे वर्षे** (१८१३–१९६३) अमेरिकन मिशनच्या विद्यमाने बाँबे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई, १९६६.

११. सातोस्कर बा. द. **गोमंतक प्रकृती आणि संस्कृती, खंड २ समाजरचना व समाज जीवन**; प्रका. शरद गोगटे, शुभदा सारस्वत, पुणे १९७९, मुद्रक– विश्वकर्मा मुद्रणालय, पुणे.

१२. संपादक – डॉ. प्रभुदेसाई वि. बा. व डॉ. भुंडी बा. ना. **कृष्णदास शामा विरचित श्रीकृष्ण चरित्र कथा**, प्रका. मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई १९७५.

१३. भास्कर जाधव, **मराठी ख्रिस्ती नियतकालिके** (१८०० ते १९५०) महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषद प्रकाशन, पुणे मे १९८१.

१४. संपादक व लेखक – करंदीकर सुमंत दयानंद, **देवदत्त नारायन टिळक**; (सतराव्या वाढदिवसानिमित्त अभिनंदन पुस्तिका) संजीवनी प्रकाशन, डोंबिवली, १९६१.

१५. संपादक– हिवाळे भा. पां.; **ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे (१८४२–१९४१) ग्रंथ पहिला** (१८४२–१८६१); प्रका. भा. पां. हिवाळे, तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई, १९४२.

संपादक– हिवाळे भा. पां.; **ज्ञानोदयाची पहिली शंभर वष, (१८४२–१९४१) भाग पहिला**, प्रका. ज्ञानोदय बोर्ड ऑफ मॅनेजमेंट, मुंबई १९४१.

१६. टिळक दे. ना.; **महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई**, नागरिक प्रकाशन, २२ ऑक्टो. १९६०.

१७. प्रभु भेंब्रे लक्ष्मीकांत व्यंकटेश, **पोर्तुगाली राजवटीपूर्वीचे गोव्यातील धार्मिक वाङ्मय**, गोमंतक मराठी भाषा परिषद, मुद्रक– प्रदीप प्रेस, पोर्तोईश, पणजी गोवा इ. स. १९७९.

१८. तुळपुळे शं. गो.; **मराठी ग्रंथनिर्मितीची वाटचाल**, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे. सुलभ मुद्रणालय, पुणे १९७४.

१९. संपा. गावस्कर सु. आ.; **मराठा दोलामुद्रिते**, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई २. आवृत्ती दुसरी १९६१.

२०. संपा. अशोक देवदत्त टिळक, **देवदत्ताची कविता**, प्रका. अ. दे. टिळक नागरिक छापखाना, नासिक १९७५ ?

२१. डॉ. मालशे स. गं. **फादर स्टीफन्स आणि त्याचे ख्रिस्तपुराण**, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, १९६५,

२२. टिळक अशोक देवदत्त, **विश्रब्ध शारदा खुर्द**, प्रका. सौ. मायावती अ. टिळक, शांतिसदन, नागरिक छापखाना, नाशिक १९७८.

२३. **ख्रिस्ती साहित्य समेलन (प्रबंध संग्रह)** प्रका. महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषद, पुणे २९–१२–१९७३.

२४. लेदर्ले म. रा; ये. सं; **ख्रिस्ती महामंडळाचा संक्षिप्त इतिहास**, मार्ग प्रकाशन, सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ती १९६३, पुणे.

२५. **मराठी वाङ्मय कोश, प्राचीन खंड**, संपा. अ. ना. देशपांडे आणि इतर, नागपूर विद्यापीठ प्रकाशन, मुद्रक–शा. श्री. वनहट्टी, धनतोली, नागपूर १९७४.

२६. **मराठी ग्रंथसूची** (१८००–१९३७) **प्रथमखंड, ग्रंथ वर्णन कोश**, संपा. शं. ग. दाते, पुणे १९४३.

२७. **मराठी ग्रंथसूची** (१९३८–१९५०), संपा. शं. ग. दाते, पुणे १९६१

२८. **मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चौथा** (१८००–१८७४), संपा. रा. श्री. जोग; महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे १९६५.

२९. **प्रा. अ. का. प्रियोळकर स्मृतिग्रंथ** संपा. डॉ. सुभाष भेंडे, प्रा. अ. का. प्रियोळकर, स्मृतिग्रंथ समिती, मुंबई १९७४.

३०. **लक्ष्मीबाई टिळक जन्म शताब्दी**, नासिक, संपादिका सौ. मायावती टिळक.

३१. **अगदी स्टेप बाय स्टेप**, संपा. अ. दे. टिळक, प्रका. मायावती टिळक, शांतिसदन, नासिक.

शुद्धिपत्र

मुद्रित असे आहे	पृ.	ओळ (वरून)	असे वाचावे
हाकलावे	३	२०	हाकलावें १
सोपे झाले	३	२७	सोपे झाले २
म्हणता येते	५	११	म्हणता येते ६
१६७९ ते १५४३	१९	१६	(१५७९ ते १६४३)
१५९८ ते १६५३	२२	१	(१५९८ ते इ. स. १६६३)
दुसरी आ.	३२	२५	तिसरी आ.
तेरता चमत्कार	४१	२	तेरा चमत्कार
वरील	४८	२२	खालील
हिंदुतर्क	५०	१७	हिंदु-तुर्क
बोपेन	५५	२४	बोवेन
	६६	३०,३१,३२	एतावत् सरसिजकुड्मंगलस्य कृत्यं । भित्वाम्भः सरासे विनिर्गमो बर्हियत् ॥ आमोदो विकसनात् इंदिरा निवासः । तत् सर्व दिनकरस्ये कृत्यमामनन्ति ॥
यात्रिक्रमण	७२	१७	यात्रिकक्रमण
Christian	८८	१४	Christan Giving
ना. वि. टिळक	१००	३२	ना. वा. टिळक
कृ. रा. सांगळे	१००	३०	कृ. र. सांगळे
संत्र पेत्रस	१०६	६	संत पेत्रस
अनुवादक	१११	३०	अनुवाद
ना. वि. टिळक	११५	२	ना. वा. टिळक
मॅकनिनल	११९	३१	मॅकॅनिकल
वा. म. गद्रे	१३१	२२	वा. म. गद्रे
मा. ल. हर्षे	१४९	२६	ना. ल. हर्षे
स्वतःची	१५४	१	संतांची
लथरचा	१५५	६	ल्यूथरचा
मार्क	१९३	३३	पार्क
रे. आर. के. ह्यूम	१९३	३४	रे. आर. ए. ह्यूम.

मुद्रित असे आहे	पृष्ठ	ओळ (वरून)	असे वाचावे
निषधक	२०५	७	निषेधक
अनुभ्दिन्नश्मश्रु	२११	३१	अनुद्‌भिन्नश्मश्रु
	२११	३३,३४	अंगं गलितं पलितं मुण्डम् दशनविहीनं जातं तुण्डम् वृद्धो याति गृहीत्वा दण्डम्
यशवंत	२२५	३२	शांतवन
शा. ल उजगरे	२६३	१३	शा. द. उजगरे
दि. र. आठवले	२३९	२५	दि. रा. आठवले
वी. ए. पाटेकर	२५३	३	वी. ए. पटेकर
भ्रार्तृत्व	२७१	७	भ्रातृत्व
वा. गो. आपटे	२७८	२३	वा. गो. आपटे
१९३०	२९०	२९	१८३०
दृष्टान्त, मुक्तहार	३१५	२९	दृष्टान्तमुक्ताहार
फाटक	३१६	२६	पाठक
बा. न. आठवले	३२१	१	बा. ना. आठवले
थोरात ज. आ.	३२३	१३	थोरात ज. जा.
यशवंत दिघे	३२३	३१	यशवंत दिवे

डॉ. गंगाधर मोरजे यांची ग्रंथ संपदा

मराठी लावणी वाङ्मय : (प्रारंभ ते इ. स. १८६०)
महाराष्ट्र शासनाचा १९७५–७६ चा समीक्षा व सौंदर्यशास्त्र विभागातील उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार: इचलकरंजी एज्युकेशन ॲण्ड चारिटेबल ट्रस्ट पुरस्कार.

रामजोशीकृत लावण्या : (डॉ. वि. म. कुलकर्णी यांच्या सहकार्याने संपादन) १९७३

शाहीर वरदी परशराम : संपादन, १९८०

तोचि साधु ओळखावा : संत इग्नातीच्या आत्मचरित्राचा अनुवाद, १९८२

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व विचारधारा : १९७३

डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे : जीवनकार्य : (संपादन) १९७३

अक्षरवेध : बारा संशोधनपर लेखांचा संग्रह – १९८२
महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे, पुरस्कार, इचलकरंजी एज्युकेशन ॲण्ड चारिटेबल ट्रस्ट पुरस्कार.

प्रकाशनाच्या वाटेवर

लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र : लोकसाहित्य अभ्यासाची नवी दिशा स्पष्ट करणारा ग्रंथ.

ज्ञानोदय लेखसारसूची : संपादन, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर, द्वारा आलोचना प्रस्थान, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान देऊन पुरस्कृत केलेला प्रकल्प – खंड पहिला – भाग पहिला (१८४२–५०) भाग दुसरा (१८५१–१८५७) महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणारी लेखसार सूची.

याशिवाय—

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वाङ्मयेतिहास खंड २ व ३ मधील एक लेखक
महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ' भाषा व साहित्य संशोधन ' दुसरा भाग, मधील एक लेखक.

मराठी संशोधन पत्रिका, नवभारत, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, युगवाणी आदी नियतकालिकांतून संशोधनपर व समीक्षापर लिखाण.

मूल्य रुपये चाळीस फक्त

ग्रंथासंबंधी

डॉ. गंगाधर मोरजे यांनी अतिशय मेहनतीने ख्रिस्ती मराठी वाङ्मय (फादर स्टीफन्स ते इ. स. १९६०) हा ग्रंथ सिद्ध केला आहे.

मराठी भाषा, मराठी वाङ्मयाचा अभ्यासी वाचक, इतिहास लेखक, समीक्षक, ख्रिस्ती मराठी वाङ्मयाची माहिती मिळवू पाहणारा संशोधक आणि सर्वसामान्य जिज्ञासू, यांना आपापल्या उद्देशपूर्तीसाठी उपयुक्त माहिती या ग्रंथातून मिळू शकते. इतक्या व्यापक आणि सर्वांगीण माहितीचा हा पहिलाच ग्रंथ आहे.

ग्रंथात विविध साहित्याचे यथामूल संकलन झालेले असले तरी ते संशोधनात्मक आहे. साधनग्रंथ असे त्याचे स्वरूप आहे. असा ग्रंथ सिद्ध करण्यासाठी निरनिराळे ग्रंथ, नियतकालिके, सूची, इतिहास, विवरणग्रंथ, दुर्मिळ संदर्भ यांचे प्रयत्नपूर्वक आणि संशोधनाधारित सहाय्य डॉ. मोरजे यांनी घेतले आहे.